म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं.

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
संग्रहालय क्रमांक
लेखक
पुस्तकाचें नांव
सन

२५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

## अध्यायांप्रमाणें विषयांची अनुक्रमणिका.

॥ १ ॥ पृष्ठ १—६.

हरिपदकमला नमुनी, ॥ वंदुनि वाल्मीकि- नारदादि मुनि,
सुरसींच अनेकांनीं, ॥ ऐकवि दशमा मयूरकवि कानीं.
शेषशयन भू- देवां ॥ दे वांछित सुवर अवतरायाचा;
कीं, "करिन उपाय, तुह्मी, ॥ होउनि वसुदेवसुत, तरायाचा."
शौरिविवाह, खवाणी, ॥ तद्वय- सुतहनन- बंधनहि होती,
कंसापासाव जना ॥ त्रास; कथियली समग्र ती रीति.

॥ २ ॥ पृष्ठ ६—९.

मग भगवान् जगतरणा ॥ देवक्युदरीं सुशुद्धि अवतरला;
ती अज- जगदीशकथा ॥ नवनव ऐकूनि, लोक भव तरला.

॥ ३ ॥ पृष्ठ ९—११.

देउनि दर्शन पितरां, ॥ नंदगृहा आपणासि नेववि तो;
तैशीच यशोदेच्या ॥ कन्येला कृष्ण गुप्त आणवितो.

॥ ४ ॥ पृष्ठ ११—१४.

स्वास्ववन करायातें, ॥ अजमाया, कंस मारितां तीस,
सांगे भविष्य त्यासी, ॥ निसटुनि दाऊनि दिव्य कांतीस.

॥ ५ ॥ पृष्ठ १४—१६

सुतजातकर्म करवी ॥ मुनिंकरवीं, देइ नंद गोदानें;
रस, मणि, हेमहि दिधलें॥ भरिलें व्रज सर्व पुत्रमोदानें.

॥ ६ ॥ पृष्ठ १६—१९.

योजूनि अहित कृष्णा, ॥ दुष्ट बकी गोकुळासि जी आली,
धरुनी तद्वधतृष्णा ॥ प्रभुनें मृत- शोषिलीच मृत्यालि.

॥ ७ ॥ पृष्ठ १९—२३.

शकटा ध्वंसूनि हरी, ॥ लीलानरतनु वधी तृणावर्ता.
घाबरला व्रजजन जो ॥ कृष्णा देखे मृतासुरावर्ता.

# मयूरकृत

## बृहद्दशम अथवा कृष्णविजय,

हा

आर्यागीतिबद्ध ग्रंथ


**शंकर पांडुरंग पंडित**

सीनियर स्कालर एल्फिन्स्टन कालेज


याणीं

टीकाचिन्हांकनादिकांनीं सुबोध केला

तो


मुंबईंत

इंदुप्रकाश छापखान्यांत छापिला.

१८६३.

To

BHAU DAJI Esq., G. G. M. C.

One of Her Majesty's Justices of the Peace ;

Fellow of the Bombay University ;

Member of the Bomby Branch of the Royal Asiatic Society,

&c. &c. &c.

This humble attempt at the promotion of the study of Maráthi poetry is most respectfully dedicated, as a token of approbation of his zeal and labours in the cultivation of Maráthi Literature,

By

His most humble and obedient servant

**The Editor.**

# प्रस्तावना.

—o—

महाराष्ट्र भाषा आणि महाराष्ट्र कविता यांमध्यें जो परस्परावयव संबंध आहे तो प्राचीन भाषांतून संस्कृत, ग्रीक, लाटीन इत्यादि, व अर्वाचीन भाषांमधून इटालियन् इंग्लिश, फ्रेंच, पोर्चुगीस, कानडी इत्यादिकांच्या तत्तत्कवितेशीं असलेल्या संबंधापासून फार भिन्न आहे. मराठी गद्यच लिहिणाऱ्यांस व तेंच वाचणाऱ्यांस, अभंग आणि साधारण ओव्या वगैरे खेरीज करून, बाकी सर्व मराठी कविता केवळ भिन्न भाषेंत लिहिली आहे असें वाटत असतें. आतां हें उघडच आहे कीं असें वाटण्याचें कारण विचारांतर आणि विषयविजातीयता हीं नव्हेत; पण भाषाप्रकार, रूपभेद आणि शब्दनाव्य हीं होत. परंतु मुख्य कारण ह्मटलें तर आतां सांगितलेल्यांतून शेवटचें, ह्मणजे नवेनवे शब्द आंत येणें हें आहे. आणि ज्या संस्कृत भाषेंतून मराठी कवितेचे विषय, त्यांतील अलंकार, आणि लिहिण्याचे प्रकार मराठी कवींनीं घेतले आहेत त्यांतूनच हे वर सांगितलेले शब्द बहुधा आलेले आहेत. आतां ते येण्याचें कारण तर उघडच आहे; त्यांस प्रचारांत आणण्याच्या योग्यायोग्यतेविषयीं लिहिण्याचा प्रसंग हा नव्हे; आणि बिनतरीच्या अवश्यकतेखेरीज त्यांकडून ध्वनिमाधूर्य, अर्थालंकार, छंदमृदुत्व आणि वाक्यसंकलन यांचा लाभ कवितेस किती होतो तें येथें दाखविणें हें माझ्या विषयाबाहेर आहे.

तर असे संस्कृत नवेनवे शब्द; अव्यवहारित, जुने, देशिक असे प्राकृत शब्द; वारंवार येणारे संस्कृतांतील भाषणसांप्रदाय; संस्कृत शब्दांचे लांब लांब समास; सर्व पदें, मध्यें जागा सोडिल्या शिवाय, एकत्र लिहिलेलीं; छंदासाठीं शब्द, वाक्यरचनेच्या नियमांप्रमाणें न लिहितां, मागें पुढें लिहिलेले; अर्थावश्यकता साधून आलीं तर कवितेचीं मुख्य भूषणेंच, पण अर्थास आपल्या मागून चालावयास लावतील तर कवितेला लज्जा आणणारीं व्यंगेंच, अशीं लांब लांब यमकें व प्रास; आणि यांतूत कित्येकांस सुसह करणारें जें विरामचिन्हांकन तें तर अगदीच नाहीं;— या सर्व प्रौढ, अज्ञात, आणि दृष्टीला दिपावून टाकणाऱ्या अलंकारांसह आणि सद्गुणास व दुर्गुणास गोंधळून

टाकणाऱ्या अशा व्यंगांनिशीं जेव्हां आमची कविता एकाद्या वाचणाऱ्यापुढें येऊन ठाकते, तेव्हां तो बिचारा तिजकडेस पाहाण्याचेंच सोडून देतो, आणि आपल्या मार्गानें निमूटपणें जातो.

अस्तु. पण या आणि यासारिख्या दुसऱ्या कित्येक कारणांनीं महाराष्ट्र कविता बहुतेकांस समजण्याची मोठी अडचण पडते. आतां हें स्पष्टच आहे कीं त्या कारणांतून मुख्य ह्मटलीं तर तीन होत; ह्मणजे अज्ञात शब्द, पदें पाडलेलीं नसणें, आणि विरामचिन्हें न लिहिणें. आतां यांच्या योगानें होत असलेले परिणाम थोडेसे वर सांगितलेच आहेत. अर्थ न समजला, किंवा समजला तो वर सांगितलेल्या कारणांमुळें कवीच्या अर्थाहून भिन्न लागला, तर मग, त्या कवितेचा अर्थ, तींतील विचार, तिची भाषा, आणि अलंकार, यांच्या गुणावगुणांविषयीं विवेचन करणें; कवीची काव्यशक्ति, तत्छ्रष्टयावलोकन, मानवी स्वभाव आणि मानुषीक व्यवहार यांविषयीं त्याचें ज्ञान, यांची परीक्षा त्याच्या कवितेवरून करणें; आणि जहालेल्या दोषांचें लक्षपूर्वक अवलोकन करून, पुढें महाराष्ट्र कवितेची सुधारणा करित जाणें हें तर किती वरें कठीण आहे ?

आतां हें खरें आहे कीं पूर्वोक्त अडचणी सर्वांसच पडतात असें नाहीं; आणि संस्कृत शब्दांची व समासांची बरीच माहिती असेल तर महाराष्ट्र कविता समजण्याला पुष्कळ साह्य होत असतें,— मग ती मोरोपंताची असो, अथवा वामनाची, ज्ञानेश्वाराची, मुक्तेश्वराची, किंवा दुसऱ्या कोणत्याहि कवीची असो. तरीही केवळ इतकेंच पुरत नाहीं. साधारण सर्व लोकांस समजण्याकरितां शोधपूर्वक तयार करून छापलेले ग्रंथ निघून असाह्य आणि ससाह्य वाचणाऱ्यांस मदत होणें हें अवश्य आहे.

तर वाचणाऱ्यांस कोशादिकांचें सहाय असलें किंवा नसलें तरी, शोधपूर्वक तयार करून साधारण लोकांस वांचण्यासाठीं आणि विद्यार्थ्यांच्या अध्ययनासाठीं प्रसिद्ध करण्यास जे खरोखर योग्य ग्रंथ मराठी कवितेंत आहेत त्यांतीलच हा मयूरकृत बृहद्दशम होय. आणि विद्वज्जनांचें मत याविषयीं असें आहे कीं या कवीनें केलेले दुसरे ग्रंथ ज्यांणीं वाचले असतील त्यांस हा ग्रंथ वाचल्यावर असें समजून येईल कीं, त्याणें यांत अत्यंत मोठे श्रम केले

आहेत इतकेंच नव्हे, पण त्याणें आपल्या सर्व कवनचातूर्याचा, विषयसंबंधें वगैरे त्याच्यानें जितका खर्च करवला तितका, अंश या ग्रंथांत खर्च केला आहे. आणि वर सांगितलेल्या सर्व अडचणी यास लागू असल्यामुळें, आणि त्याची योग्यताहि तशीच असल्यामुळें, त्यांतील आर्यांचीं पदें पाडून, शब्द निरनिराळे छापून, संस्कृत आणि अव्यवहारित इत्यादि मराठी शब्दांचे अर्थ आणि फार करून सर्व कठीण संस्कृत समासांचे विग्रह व अर्थ प्रत्येक पृष्ठाच्या खालीं लिहून, आणि विरामचिन्हें सर्व ग्रंथांत लिहून, वाचणाऱ्यांस आणि अध्ययन करणाऱ्यांस हा ग्रंथ होईल तेवढा व तूर्त करवला तेवढा सुबोध करून आह्मीं प्रसिद्ध केला आहे.

परंतु इतकें केलें तरी हा ग्रंथ पुष्कळ लोकांस सर्वांशीं समजण्याजोगा नाहीं असें ह्मटलेंच पाहिजे. कारण कीं यांत कित्येक आर्या अशा आहेत, कीं त्यांची सविस्तर टीका लिहिल्याशिवाय सर्व वाचणाऱ्यांस तो समजेल अशी आशा करवत नाहीं. पण वाचणाऱ्यांस दिसून येईल कीं यांत शब्दांच्याच टीका फार लिहाव्या लागल्या आहेत. आतां शब्दान्वयाकडे व अर्थस्पष्टीकरणाकडे पूर्ण लक्ष न देतां, कठीण शब्दांचेच अर्थ लिहिण्याचें कारण असें कीं, आपल्या भाषेंत कोशांपासून जितकें साह्य व्हावयाचें तितकें अजूनपर्यंत अगदीं होत नाहीं; आणि ते शब्द ज्यांत सांपडतील असे जे थोडेसे कोश आपल्या भाषेंत तुर्त आहेत ते फार मोठे असून थोडक्याच वाचणाऱ्यांजवळ असतात; यास्तव साधारण वाचणाऱ्यांच्या सोईसाठीं शब्दार्थस्पष्टीकरणाकडेस ज्यास्त लक्ष दिल्हें आहे. माझ्याहि मनांत फार इच्छा होती कीं संस्कृत काव्यास जशा भरपूर टीका असतात तशा, अथवा इंग्रेजींत क्लासिकल् कवितेस ज्या "अनोटेशन्स" ह्मणून असतात तशा सविस्तर टीका या ग्रंथांत लिहून संबंधी वाक्यें उघड करून दाखवावीं, धात्वर्थावरून शब्दार्थाची सिद्धता स्पष्ट करावी, आणि याच कवीच्या इतर ग्रंथांतील व अन्य कवींच्या अनेक ग्रंथांतून उदाहरणें प्रत्यंतरास आणून शब्दयोग्यायोग्यता अथवा रसगुणावगुण यांचें योग्य स्थळीं विवरण करावें. परंतु वर सांगितलेल्या कारणांमुळें व माझ्या अभ्यासाच्या योगानें वेळ सांपडला नाहीं ह्मणून मनाप्रमाणें जहालें नाहीं. कदाचित् या ग्रंथाची दुसरी आवृत्ति निघाली तर तसें करण्याची इच्छा आहे.

परंतु कोणी असें समजूं नये कीं टीका करून सर्व कठीण आर्यांचा अवघा अर्थ लिहिला नाहीं, ह्मणून लिहिला आहे तेवढा अपूर्ता होय. कांकीं पदें पाडून विराम चिन्हें दिल्हीं आहेत, शब्दांचे अर्थ लिहिले आहेत, आणि समयविशेषीं पदान्वय दाखवून कोठें कोठें अर्थही दिल्हा आहे.

आपल्या भाषेमधील हे असे ग्रंथ छापण्याची परिपाठी नसल्यामुळें छापण्याकरितां शुद्ध प्रत मिळण्याची अडचण सर्वांस ठाउकच आहे. दैववशात आह्मास सांपडलेली प्रत शुद्ध होती. परंतु कित्येक आर्यांचा संशय आल्यामुळें त्यांचीं पदें पाडल्याशिवाय, व पाडलींच तर विरामचिन्हें न लिहितां तशाच सोडिल्या आहेत. पण त्या सर्व मिळून आठदहांच्या आंत होतील. जशी, आर्या ४६, पृष्ठ ७२; आर्या ३७, पृष्ठ १४१ इत्यादि.

या ग्रंथांतील कवितेचीं पदें पाडणें आणि त्याचा अर्थ लावणें या आरंभींच्या कामांत रा० रा० जगन्नाथ धोंडदेव गर्दे शास्त्री, मुकाम बेळगांव याणीं जें आह्मांस साह्य केलें त्याबद्दल त्यांचे आह्मीं मनःपूर्वक आभार मानितों.

या सर्व ग्रंथामधील विषयांची अनुक्रमणिका, अध्यायांच्या क्रमाप्रमाणें, चरित्र तात्पर्य थोडक्यांत काढून, थोडेसे अध्याय खेरीज करून, दर अध्यायास एक गीति लिहून आह्मीं ग्रंथाच्या आरंभीं घातली आहे.

आतां या सर्व करण्यानें ग्रंथ छापण्याचा हेतु सिद्धीस कोठपर्यंत गेला आहे याचा विचार वाचणारे करितील अशी आमची इच्छा आहे. आणि या अशा छापण्याच्या नवीन रीतीपासून लोकांस लाभ जहाला असें ऐकिल्यानंतर आमचे श्रम सफळ जहाले असें आह्मीं समजूं.

मुंबई
२२ जून १८६३.

शं. पां. पं.

काव्य-२८

## अध्यायांप्रमाणें विषयांची अनुक्रमणिका.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

॥ १ ॥ पृष्ठ १—६.

हरिपदकमला नमुनी, ॥ वंदुनि वाल्मीकि- नारदादि मुनि,
सुरसींच अनेकांनीं, ॥ ऐकवि दशमा मयूरकवि कानीं.
शेषशयन भू- देवां ॥ दे वांछित सुवर अवतरायाचा;
कीं, "करिन उपाय, तुह्मी, ॥ होउनि वसुदेवसुत, तरायाचा."
शौरिविवाह, खवाणी, ॥ तद्वय- सुतहनन- बंधनहि होती,
कंसापासाव जना ॥ त्रास; कथियली समग्र ती रीति.

॥ २ ॥ पृष्ठ ६—९.

मग भगवान् जगतरणा ॥ देवक्युदरीं सुशुद्धि अवतरला;
ती अज- जगदीशकथा ॥ नवनव ऐकूनि, लोक भव तरला.

॥ ३ ॥ पृष्ठ ९—११.

देउनि दर्शन पितरां, ॥ नंदगृहा आपणासि नेववि तो;
तैशीच यशोदेच्या ॥ कन्येला कृष्ण गुप्त आणवितो.

॥ ४ ॥ पृष्ठ ११—१४.

स्वास्थवन करायातें, ॥ अजमाया, कंस मारितां तीस,
सांगे भविष्य त्यासी, ॥ निसटुनि दाऊनि दिव्य कांतीस.

॥ ५ ॥ पृष्ठ १४—१६

सुतजातकर्म करवी ॥ मुनिकरवीं, देइ नंद गोदानें;
रस, मणि, हेमहि दिधलें॥ भरिलें व्रज सर्व पुत्रमोदानें.

॥ ६ ॥ पृष्ठ १६—१९.

योजूनि अहित कृष्णा, ॥ दुष्ट बकी गोकुळासि जी आली,
धरुनी तद्वधतृष्णा ॥ प्रभुनें मृत- शोषिलीच मृत्यालि.

॥ ७ ॥ पृष्ठ १९—२३.

शकटा ध्वंसूनि हरी, ॥ लीलानरतनु वधी तृणावर्ता.
घाबरला व्रजजन जो ॥ कृष्णा देखे मृतासुरावर्ता.

॥ ८ ॥ पृष्ठ २३–२७.

बाळपणींच्या हरि करि ॥ मृद्भक्षणजीवनाग्रहण खोडी;
मुख दावुनि कळवी कीं, ॥ आपण संसारसागरीं होडी.

॥ ९ ॥ पृष्ठ २७–२९.

स्तन पाजितां यशोदा ॥ जाय, ह्मणुनि फोडि कृष्ण डेऱ्याला.
न पुरति दामें जरि, हरि ॥ सुकृतनदीनें तरीहि बांधियला.

॥ १० ॥ पृष्ठ २९–३२.

यमलार्जुन- उन्मूलन ॥ करुनि, हरी असुर वत्स मग मारी.
बकही मारुनि, वृंदा- ॥ वनवसतीमधुनि संकटा वारी.

॥ ११ ॥ पृष्ठ ३३–३५.

पसरुनि टाळा, काळा- ॥ परि जो बाळां गिळीत अघ राहे,
त्या दुष्टातें मारुनि, ॥ हरिनें नेले सुरक्षित घरा हे.

॥ १२ ॥ पृष्ठ ३५–३८.

गोपांसह वनिं जेवी, ॥ तों विधि गो, वत्स, गोप सर्व हरी;
आपण नटूनि वृंदा, ॥ घालवि विधिचा समग्र गर्व हरी.

॥ १३ ॥ पृष्ठ ३८–४०.

वर्षं एका विधि ये, ॥ गो, वत्सप, वत्स पूर्ववत पाहे;
जाणुनि निजअपराधा, ॥ तो नमि पद सर्वरूप सुतपा हे.

॥ १४ ॥ पृष्ठ ४०–४२.

पश्चात्तापविवेकें ॥ शुद्ध मनें शरण जाय बापास.
मागे निजागमोचन ॥ विधि त्द्दतभवदावभक्ततापास.

॥ १५ ॥ पृष्ठ ४२–४६.

धेनुक खर वधुनि, करी ॥ हरि निर्भय सफलगंधतालवन.
उठवी गोपां, मरती ॥ जे यमुनेचें पिऊनि काल वन.

॥ १६ ॥ पृष्ठ४६–५१.

ज्या कालियसापानें ॥ ऱ्हद विषमय होय, त्यासि हरि नाशी;
देउनि विपतरणाऽशी, ॥ तो मग दवडी तया स्वभुवनाशी.

॥ १७ ॥ पृष्ठ ५१–५३.

भेटे जनका माये, ॥ ज्यां सुत वाटे फिरूनि जन्मा ये;
पी दव, करूनि माये. ॥ मग तो आनंद खांतहि न माये.

॥ १८ ॥ पृष्ठ ५३–५५.

खेळत असतां सर्वहि, ॥ वत्सपवेषें प्रलंब ये; हरि त्या
जाणे अंतरिं. मग बळ ॥ त्या कपटा मारि आपणा हरित्या.

॥ १९ ॥ पृष्ठ ५५–५६.

फिरतां गाईमागें, ॥ सांपडती गोप, वत्स, गो दावीं.
दवपानें त्यां तारी, ॥ ह्मणतां, “मरतों, पद प्रभो! दावीं.”

॥ २० ॥ पृष्ठ ५६–५७.

वनिं जेविति, वानें पीती, ॥ हरि बळसह गोप सर्व सुख घेती;
बालतरुणवृद्धा रति ॥ दे वन तें, देवपतिवन न दे ती.

॥ २१ ॥ पृष्ठ ५७–५८.

निजकालीं वर शोभा ॥ शरदागम जो व्रजा वना आणी,
कृष्णहि वाजवि वेणू, ॥ त्यातें वर्णी मयूरकविवाणी.

॥ २२ ॥ पृष्ठ ५८–६०.

अंबे गोपी पूजिति, ॥ करुनी व्रत, कीं रमाप नवरा हो;
तत्सहहरिपरिहासा ॥ वर्णियलें. प्रेम त्यांत नव राहो.

॥ २३ ॥ पृष्ठ ६१–६५.

ऋषिपत्न्यांसी अन्ना ॥ रामासह हरिजन क्षुधित याची.
पश्चात्ताप मुनिजना ॥ दे, शोधुनियां हरी मति तयाची.

॥ २४ ॥ पृष्ठ ६५–६७.

त्यजुनी इंद्रातें, हरि ॥ गोपजनाकरवीं विप्र, धर, गाय
पूजवि; देवेशातें ॥ कोपवि; तो रस मयूरकवि गाय.

॥ २५ ॥ पृष्ठ ६७–६९.

गोवर्धनधारण हरि ॥ करि, पविधरमेघवृष्टितें वारी;
वारिपासाव जना ॥ तारी, हरिमद हरूनि कितवारि.

॥ २६ ॥ पृष्ठ ७२.

एवं विस्मयकारक ॥ फार करी हरि, लहान परि, चरितें;
तें पाहुनि व्रजजनता ॥ विस्मित उमजे रमापती हरितें.

॥ २७ ॥ पृष्ठ ७२–७६.

जाणुनि निज अपराधा, ॥ ये इंद्र तदाच शरण मापतिला.
अभिषेकि कामधेनु ॥ स्वामीतें; सुवर दे रमाप तिला

॥ २८ ॥ पृष्ठ ७६–७८.

यमुनावनांत न्हातां, ॥ नंदा पाताळिं भृत्य अरुणाचा
ने; हरि मग बा तारी, ॥ धांवा करितां स्वभक्तकरुणाचा.

॥ २९ ॥ पृष्ठ ७९–८५.

वेणुरवद्रुतगोपी ॥ वाहति कृष्णा- कृपानदीशांत;
उपदेशी नरतनु त्यां. ॥ तो रस बहु रसिककर्ण करि शांत.

॥ ३० ॥ पृष्ठ ८६–९२.

वशतम गोपीगर्वें ॥ गुप्त जहाल्यावरी हरी रानीं,
धुंडिति त्या रडत पडत, ॥ बहुरुक्षारण्यहतशरीरांनीं.

॥ ३१ ॥ पृष्ठ ९२–९५.

श्रांता मग त्या कांता, ॥ त्या कांतारीं बसोनि, कांतास,
स्वांता शोधुनि, विनविति, ॥ दांतविषय- भूमिभारकांतास.

॥ ३२ ॥ पृष्ठ ९५–९८.

विरहदवें दग्ध सती; ॥ त्यां हरिकरुणाघनागमाशा नसती;
तों भेटुनि रातिस, ती ॥ निववि हरिणपंक्ति. "वृत्त अभिनव पुसती."

॥ ३३ ॥ पृष्ठ ९८–१००.

भक्तप्रिय करि त्यांशीं ॥ रासा, रूपें बहूत घेऊनी.
स्वप्रेमा- वरित्याशी ॥ पावुनि, जाती रसेश सेवूनी.

॥ ३४ ॥ पृष्ठ १०१–१०३.

अजगरगलगत नंदा ॥ सोडवि हरि; मग सराम गाताना,
गोपी हरि शंखशिखर; ॥ त्या दुष्टा वधिति, सोडुनी ताना.

[stamp]

सं॰ ग्रंथ ३८



॥ ३५ ॥ पृष्ठ १०३–१०४.

नैकचरितविस्मित, बहु ॥ उपकृतिंनीं बद्ध गोपिका हरितें,
हरितें नाम जयाचें ॥ भव, त्या सेवीति, गाउनी चरितें.

॥ ३६ ॥ पृष्ठ १०४–१०७.

धृतपशुवेषअरिष्टें ॥ आक्रमितां, त्या वधी हरि क्रूरा.
नारदतप्तें कंसें ॥ पाठविलें मग व्रजास अक्रूरा.

॥ ३७ ॥ पृष्ठ १०७–११२.

हरिवेष-केशिवध करि. ॥ भेटे, मारूनि व्योम, पौत्रास.
गोपी-मुख- व्रजजन त्या ॥ भजती प्रेमें, न ठेवि जो त्रास.

॥ ३८ ॥ पृष्ठ ११३–११८.

दुर्जनकंसप्रेरित, ॥ दभ्रकुलज, भुवनपतिकडे गामी
आपण; नंद यशोदा ॥ सुतविरहाकुल; सतीहि हरिकामी;–
ऐसें मार्गीं चिंतन ॥ अक्रूर करी; व्रजासि मग पावे.
त्याला सेविति बळ हरि, ॥ भव यच्चरणीं अनेक हरपावे!

॥ ३९ ॥ पृष्ठ ११८–१२४.

ऐकुनि हरि जाणार, ॥ प्रेक्षुनि जातो असें, व्रजीं वामा
विरहानलतापानें ॥ त्रस्त प्रार्थिति अनेकसुखधामा.
कोण विगतभव्याशा- ॥ हूनि जनिं असे विपन्नतर सांगें;
कोण भरितभव्याशा- ॥ हूनि सुखी निजमनांत वा आंगें ?
गोपी निजसुखहानी ॥ शोचिति येथें जया स्वशोकांनीं,
कवण रडति मोहांनीं ॥ न, ऐकती जरि विलाप तो कानीं?

॥ ४० ॥ पृष्ठ १२४–१२५.

हरि मग मथुरामार्गीं ॥ स्नानावसरीं स्वसेवका दावी
निजविश्वरूप, जाया ॥ किंतु; दया येथ केविं न वदावी ?

॥ ४१ ॥ पृष्ठ १२५–१२७.

पावुनि पाहे सुरपुरि- ॥ ऱ्हीप्रद मथुरे सगोप- बळ हरि त्या;
करि त्या हरिमूर्तीचें ॥ प्रेक्षण जन चकित, रजकअसुहरित्या.

मग रामा-गोपांसह ॥ दे वस्त्रें भक्त साळवी त्यातें,
निरवधि- जग- वीत्यातें, ॥ गगनपटें विश्व लेववीत्यातें.
॥ ४२ ॥ पृष्ठ १२७–१३०.

कुब्जादासीतें हरि ॥ उजरवि; मोडी धनुष्य कंसाचें;—
जो मग मल्लसभेतें ॥ सजि, योजुनि अहित सुखतंसाचें.
॥ ४३ ॥ पृष्ठ १३०–१३३.

वधुनि कुवलयापीडा, ॥ आक्रमुनी धृष्ट जो सुरापीडा
द्वारीं गज करि पीडा, ॥ दंतावलरिपु हरिस दे-व्रीडा.
॥ ४४ ॥ पृष्ठ १३३–१३८.

चाणूर- मुष्टिकादिक ॥ बळ- हरिशीं मल्लजन करी लगट;
प्रेक्षकनयनां वाटे ॥ शक्ति जयाची जनां करील गट.
मल्लवधाउपरि, हरि ॥ जनपीडक वधिहि कंसरायातें.
यादव- वंश- अरि हरी, ॥ सुव्हृदस्वजनार्ति ते सरायातें.
वध पाहुनि, शोकांतें ॥ कंसाच्या अबल बायका करिती;
ती भासे लोकांतें ॥ कुररींची रीति काय काकरिती.
॥ ४५ ॥ पृष्ठ १३८–१४६.

स्वजनांतें मुक्त करी, ॥ वसुदेवा देवकीस हरि भेटे;
तदुभयमह वर्णाया, ॥ शब्द कवणता न तोकडा वाटे ?
विरहें माय यशोदा ॥ हाय ह्मणुनि, काय न करु ते कवळ
चिंते, यास्तव विनविति, ॥ गोकुळिं जायासि नंद, कृष्ण बळ.
मग सांदीपिनिपासुनि ॥ विद्या सकला शिकूनि, मृत तोकां
त्याच्या आणुनि देती; ॥ छंद गुरूचा न पुरविती तो कां ?
॥ ४६ ॥ पृष्ठ १४६–१५१.

न जळावीं विरहदवें ॥ नंद यशोदा ह्मणूनि, हरि धाडी
उद्धव व्रजासि. दे तो ॥ प्रेमा, देइल सुधा न ती, गोडी.
॥ ४७ ॥ पृष्ठ १५१–१६५.

ऐकुनि व्रज-रामवाया ॥ हरिनें उद्धव व्रजासि पाठविला,

गोपींनीं निजसुखनिधि ॥ रोषें प्रेमेंहि कृष्ण आठविला.
मग उद्धव, सांगुनि त्यां ॥ हरिसंदेशास, निववितां जाला,
कीं त्यां प्रेमपरांशीं ॥ भेटी लवकरिच होइल अजाला.

॥ ४८ ॥ पृष्ठ १६५–१६८.

अक्रूरगृहागमना- ॥ उपरी, जाणूनि कुंतिखेदास,
त्या गजपुरीस धाडी, ॥ शमवाया आर्त निज सखे दास.

॥ ४९ ॥ पृष्ठ १६८–१७२

भीष्म- द्रोणप्रमुखां ॥ भेटे अक्रूर, तेविं कुंतीस;
तत्तनयांही भेटुनि, ॥ कृष्णाशय मग सखा वदे तीस.
कुंतीसांत्वन करुनी, ॥ धृतराष्ट्रा करुनि व्यर्थ उपदेशा,
दे शासन कितवां जो ॥ त्या मग भेटे फिरुनि वरदेशा.

---

[stamp]

# बृहद्दशम.

अथवा

## कृष्णविजय

“हरिपद भव[1]संतमसीं ॥ भास्कर,” हें गुह्य बोलिले संत मसीं[2]. ॥
गंगेच्या उगमातें ॥ त्यातें[3] वंदन असो प्रणति[4]सुगमातें. ॥ १ ॥
करि जी प्रतियुगलीला, ॥ त्या नमन शरण्य विष्णुपद[5]युगलीला, ॥
मुनिमानसशिबि[6]केला, ॥ जीणें निज[7]कीर्तिलेशजित शिबि[8] केला. ॥ २ ॥
ह्मणती संत, “ तगाव्या ॥ चित्तीं हरिच्या कथाचि; संतत गाव्या. ” ॥
या उपदेशासम न ॥ प्रिय इतर[9]; व[10]रि प्रमोददेशा[11]स मन. ॥ ३ ॥
शुकमुखशुचि[12]समजनता ॥ देवू हरिगुणसुधैक[13]रुचिस मज नता[14]. ॥
करुत कृपा वहु सुकवी. ॥ भाव प्रणतीं[15] स्वपादपूज्य न चुकवी. ॥ ४ ॥
वृ[16]त्तीं आधीं आर्या ॥ श्राव्या[17] सेव्या[18]चि फार साधी आर्या[19] ॥
युक्ता[20] सद्यमकांनीं[21]; ॥ प्यावी रसिकीं करूनि उद्यमें[22] कानीं. ॥ ५ ॥
ह्मणति भलीला आर्या ॥ तैसीच सरोजनाभलीला[23] आर्या; ॥
संगत[24] हें दोघींतें ॥ जैसें रविह[25]रिपदोथ्थसरिदोघीं तें. ॥ ६ ॥

---

१ संसाररूपी महान् अंधारीं. २ मजपासीं. ३ पदातें. ४ प्रणति, नमस्कार तेणेंकरूनच सुलभ अशा ( पदातें ). ५ विष्णूच्या दोन्ही पदांस. ६ मुनिजनांच्या मनांस शिबिका ह्मण जे पालखी अशी जी तीतें ( पदयुगलीतें ). ७ आपल्या कीर्तीच्या किंचित अंशानेंच जिंकिलेला. ८ एका कीर्तिमान् राजाचें नांव. ९ दुसरा ( उपदेश ). १० स्वीकारितें. ११ आनंदाचें स्थळच अशा ( उपदेशास ). १२ शुक-मुख-शुचि-सम जनता, शुकादि शुद्धजनांचा समूह. १३ हरिगुणच कोणीएक अमृत त्याची जी श्रेष्ठ रुचि ती. १४ नम्रास, ( हें ‘मज’ याचें विशेषण ). १५ शरण आलेल्यांच्या ठायीं. १६ कविताप्रकरणीं. १७ श्रवण करण्यास योग्य. १८ सेवन करण्यास योग्य. १९ श्रेष्ठ. २० भरलेली. २१ सत्-यमकांनीं, चांगल्या यमकांनीं २२ उद्योग, श्रम. २३ सरस्-ज-नाभ-लीला, कमलनाभाची ( विष्णूची ) लीला. २४ संबंध. २५ सूर्य आणि विष्णु यांच्या पायांपासुन निर्माण झालेल्या ‘सरित्-ओघीं’ नद्यांच्या ( गंगेच्या आणि यमुनेच्या ) प्रवाहीं.

कृष्णकथा शुक राया, ॥ अभिमन्युसुतास[1] मुक्त आशु[2] कराया ॥
वदला स्पष्टा दशमीं[3]; ॥ त्या गायिन एकवीसअष्टादश[4] मी. ॥ ७ ॥
निजसुखराशि[5] शुकाचा[6] ॥ बोल वदे; किति मयूर हा शिशु काचा? ॥
तांडव उचितचि हें र्या; ॥ कौतुक मानुनि रसज्ञ ह्मणति न हेर्या. ॥ ८ ॥
सादरं हो[10] मन नामीं; ॥ हरिचरिताच्या करीन हो मनना मी. ॥
ह्मणती संत, " तमातें ॥ हें चिंतन रवि घडेल संतत," मातें. ॥ ९ ॥
आपुलिया संतानीं[11] ॥ पूर्ण करावी दया सदा संतांनीं. ॥
श्रोत्र निवे, कीरमती ॥ बोधिति बोलविति; सद्विवेकी रमती. ॥ १० ॥
धरि गिरि वन पुर; साहे ॥ न दुरितकर[12] असुरभर परंतु रसा[13] हे. ॥
स्वत्रास कळवि धात्या[14] ॥ गोरूपातें धरूनि सकळ विधात्या[15]. ॥ ११ ॥
"आलें बा, धामातें[16] ॥ सांगों जाली असह्य बाधा मातें. ॥
सांपडलें गाय वनीं ॥ दैत्यजनीं फार पीडिलें गा यवनीं. " ॥ १२ ॥
संतत नम्य[17] सन्नतिचें[18] ॥ परिसे प्रभु अश्रुवर्धन[19] व्यसन तिचें. ॥
"हें हरिल विभू[20] ; मी तें ॥ करिन विदित सकळ," विधि ह्मणे भूमीतें. ॥ १३ ॥
द्रुहिण[21] भवास[22] वसुमति-[23] ॥ श्रेयोर्थें घे से[24]देव वासव सुमती. ॥
जाय, रुपा दावि नवी, ॥ जो त्या दुग्धाब्धिशायि[25]पादा विनवी. ॥ १४ ॥
त्या सगुणब्रह्माची ॥ घे अभयोक्ति समाहित[26] ब्रह्मा चि. ॥
हें विदित वृषाकपिला[27] ॥ प्रथमचि; कां न हरि हो शिशुतृषा कपिलीं[28]? ॥ १५ ॥
तापातें हरि[29] चव दे ॥ अमृताहुनि, अभय जें मुखें हरिच वदे. ॥
तें सभवा[30] परिसविता ॥ जाला विधि तन्मुखांबुजां परिस[31]विता. ॥ १६ ॥
"शीघ्र यदुकुळीं अमर[32] ॥ स्वांशें जन्मोत हरिपदाब्जभ्रमर[33] ॥

---

१ परिक्षितीस. २ लवकर. ३ (भागवताच्या) दशम स्कंधीं. ४ एकूण चाळीस. ५ आत्मसुखाचा राशी. ६ शुकरूपी पोपटाचा. ७ मयूरकवी हाच कोणी एक मोर. ८ मला. ९ त्याज्य. मला मोरास तांडव - नृत्य योग्य; तशांत मी गायन केलें असतां सज्जनकौतुक मानितील. 'हेया' हें 'आर्या चें' विशेषण. १० होवो. ११ लेंकरावर. १२ पापी १३ पृथ्वी. १४ ब्रह्मदेवास. १५ जाणणाऱ्यास. १६ घरास. १७ नवें. १८ नमन करणारीचें. १९ अश्रूतें वाढविणारें. २० विष्णु. २१ ब्रह्मा. २२ शिवास. २३ पृथ्वीच्या कल्याणार्थ. २४ देवासहित. २५ विष्णुपदास. २६ समाहित—समाधिस्थ, ध्यानस्थ. २७ विष्णूला. २८ गाई. २९ हरण करी. ३० शिवासकट (देवांस). ३१ त्यांच्या वदनरूपी कमलास सूर्य सारिखा असा जो (ब्रह्मा). ३२ देव. ३३ हरीच्या पदरूपी कमलाचे भ्रमर.

[library stamp]

भगवत्पदबंधुरता[1] ॥ सेवा, जा अर्जवा भजकबंधुरता.[2] ॥ १७ ॥
भूश्रम हा जननी ती ॥ हरिल, जिची वर्णिती महाजन नीती. ॥
वसु देवा ची सुतता ॥ स्वीकारुनि करिल कीर्ति लोकीं सुतंता.[3] ॥ १८ ॥
ह्मणवुनि सत्वर महिला[4] ॥ जाव्या भगवत्प्रियार्थ निर्जर[5]महिला ॥
प्रकटेल प्रथम हि मा[6] ॥ मलशेषहि दाखवील अवितथ[7] माहिमा. ॥ १९ ॥
प्रभुची मायादेवी, ॥ तेही जन्मेल; जे भ्रमा या दे, वी ॥
विश्वाला, सहजगती ॥ भुवनें यदनुग्रहें[8] चि मत्सह[9] जगती. " ॥ २० ॥
एवंविध आज्ञापी ॥ सुरसेनां[10] ही सुधा तसी आज्ञा पी. ॥
केलें गमनहि; महितें ॥ समजावुनियां, निजालया मुनिमहितें.[11] ॥ २१* ॥
पूर्वी यदुपति होता ॥ शरदहनीं[12] रणमखीं पराहुति[13]होता; ॥
नृपनीतिप्रिय शरणीं; ॥ प्रकृतीचा पटु; जयासि येचि यश रणीं. ॥ २२ ॥
प्रेमें साधुजनपदा ॥ तो माथुर[14] शूरसेननाम जनपदा[15] ॥
वीर्यें सेवि,— प्रकृति[16]—प्रिय, गुरु तो, शूरसेन[17], मर्तविप्र[18], कृती[19]. ॥ २३ ॥
मूर्तानंदथु[20] राहे ॥ प्रभु जींतसदा पुरीश्वरी मथुरा हे. ॥
त्या पासुनि नृपधानी ॥ वर्णिलि यदुभूपहरिगुहा[21]चि बुधांनीं[22]. ॥ २४ ॥
तेथें देवक[23] रीति[24] ॥ प्रकटी; आश्चर्य फारदेव करीती. ॥
जैसा शिवगौरीचा[25] ॥ केला उद्वाह[26] देवकीशौरीचा[27]. ॥ २५ ॥
भगिनिस्नेहें भुलता ॥ जाला खळकंस उग्रसेन हि चुलता ॥
आंदण दिधलें, कीं तें ॥ उचितचि बुध देति नैक[28]विध लेंकीतें. ॥ २६ ॥
घेउनिआंदण गेहा[29] ॥ शौरि[30] निघे; कंस करि महा दणगे[31] हा. ॥
कनकरथीं[32] बैसविता ॥ जाला; शोभे सदारवर[33] तैं सविता[34]. ॥ २७ ॥

---

१ भगवत्पदीं लीनता, नम्रता. २ भक्तरूपी बंधूचे ठायीं रत अशा ( ईश्वरास ). ३ प्रसिद्ध. ४ जगीं, पृथ्वीवर. ५ देवस्त्रिया. ६ लक्ष्मी. ७ सत्य. ८ जीच्या प्रसादानें. ९ माझ्यासुद्धां १० देवसमूह. ११ मुनिपूजितें. १२ मथुरेचा. १३ देशास. १४ प्रजेसप्रिय. १५ शूर आहे सेना ज्याची. १६ मान्य आहेत विप्र ज्यास. १७ चतुर. १८ बाणरूपी अग्नींत. १९ शत्रुरूपी आहुतिचें हवन करणारा. २० मूर्तीमान् आनंद. २१ यादवराजा हाच सिंह त्याची गुहा. २२ बुद्धिमंतांनी. २३ देवक नांवांचा राजा. २४ परिपाठ, शिष्ट सांप्रदाय. २५ शिवपार्वतीचा. २६ विवाह. २७ देवकी आणि वसुदेव यांचा. २८ अनेक प्रकारचें. २९ घरीं. ३० वसुदेव. ३१ कडकडाट. ३२ सुवर्णरथीं. ३३ बायकोसहित नवरा. ३४ सूर्य.

त्या कंसविभूं[१] मिरवी ॥ राजपथीं; शौरिही गमे भूमिरवी[२]. ॥
सारथि तो भाउ; दया ॥ प्रेमोत्सव[३] करि; अपार शोभा उदया[४]. ॥ २८ ॥
या स्नेह—रसमयांत[५] ॥ स्वजनाच्या दृष्टि चित्तहर समयांत ॥
कंस श्रवणीं अशनीं[६] ॥ गगनोक्ति[७] पडे, जसें हळाहळ[८] अशनीं[९]. ॥ २९ ॥
"रे कंसा वेडसरा, ॥ लालन करितां हि नाग चावे डसरा; ॥
होउनि सूत[१०] वहासी ॥ तूं कन्यानिर्विशेषं[११] जीस पहासी, ॥ ३० ॥
अष्टमगर्भ, कराया ॥ त्वद्वध[१२], होणार ईसं अर्भक[१३] राया. ॥
न चुके भावि[१४]; लयातें ॥ जासिल, जरि घित्त अनृत भाविल यातें." ॥ ३१ ॥
हें ऐकुनि पापरती[१५] ॥ कंस, करी, मानसांतुनि, कृपा परती. ॥
तो घाली कर वालीं[१६] ॥ भगिनीच्या वाम[१७]; दक्ष[१८] ही करवालीं[१९]. ॥ ३२ ॥
भगिनीचा वध मतिला ॥ रुचला. उठला वधावया अधम तिला. ॥
जों तो बालिश[२०] हाणी, ॥ शौरीची नीति[२१] जाहली शाहाणी. ॥ ३३ ॥
बोध सकळ सोमास[२२] ॥ ब्रह्मा करु. नारिकेल खळ सामास[२३]. ॥
जरि साश्रु[२४] दरिद्रें[२५] वदे ॥ तें कुधनिक[२६]मानसास न परि द्रव दे. ॥ ३४ ॥
स्त्री आतंकाकुळ[२७] ती ॥ देखुनि करि फार शौरि तो काकुळती. ॥
परि तो उग्र न वळला. ॥ उदकें न शमेचि तैल[२८]वन्हि खवळला[२९]. ॥ ३५ ॥
केलें यद्यपि कानीं ॥ बधिरांच्या[३०] गान[३१] नित्य हृद्य[३२] पिकांनीं[३३], ॥
फळ नुभवि[३४]. तथा[३५] यास ॥ ज्ञान कथुनि शौरि होय वितथायास[३६]. ॥ ३६ ॥
न धरि द्रवलेश शिला, ॥ विधुमणि[३७] पाहुनि, रस प्रसवले, शशिला[३८]. ॥
खळ बहु मळके; वळते ॥ उपदेशा, तरि भले कुशल केवल ते ! ॥ ३७ ॥
भाव विमळ[३९] कळवीला ॥ पुत्रार्पणनिश्चयें[४०]चि खळ वळवीला. ॥

---

१ कंसराजा. २ भुमीवरचासुर्य. ३ प्रीतियुक्त आनंद. ४ सुदेवरूपी सूर्याच्या उदयास=देखाव्यास. ५ "समयांत" याचें विशेषण. ६ वज्र. ७ आकाशवाणि. ८ विष. ९ जेवणांत. १० सारथी. ११ कन्ये सारिखीच. १२ तुझा वध. ३ मुलगा. १४ भविष्य. १५ पापांत प्रीति आहे ज्यास. १६ केशीं. १७ डावा १८ उजवा. १९ तरवारीस. २० पोर, मूर्ख. २१ कौशल्य, युक्ति. २२ सहा. २३ पुनर्मैत्रभावास. २४ स-अश्रु. २५ गरीब. २६ वाईट धनवानाच्या मनास. २७ अति व्याकूळ. २८ तेलानें युक्त. २९ खवळलेला. ३० बहिऱ्याच्या. ३१ गायन. ३२ रमणीय. ३३ पिकपक्ष्यांनीं. ३४ उत्पन्न न करी. ३५ तसें. ३६ व्यर्थ आहेत श्रम ज्याचे. ३७ चंद्रकांत. ३८ चंद्रला. ३९ निर्मळ. ४० पुत्रदेईन या निश्चयानेंच.

कथि सानंद[1], "नसे जें ॥ त्वदधिक मज, घे समस्त नंदनें[3] सेजें[4]." ॥ ३८ ॥
या वचनें तो शमला[5] ॥ कंस. ह्मणे, " जाहला परम तोष मला." ॥
भगिनीच्या क्षणनींच[6] ॥ प्रोद्यत होता न लाविता क्षण नीच! ॥ ३९ ॥
सोडी कचनिचय[8] महा ॥ खळ. विश्वासे[9] तदीय वचनिंच यम हा. ॥
श्येनगुरु वि[10]धी; टपणें ॥ त्याचें[11] अवितर्क्य, न समजे धीटपणें. ॥ ४० ॥
स्थिर करुनि मन, स्वीयां[12] ॥ गारां[13] गेला निवारुनि मनस्वी[14] या. ॥
रिपुसि, यशोवसु[15] देव— ॥ स्तुत्य[16] प्रथमज[17] समर्पि तो वसुदेव. ॥ ४१ ॥
सत्याला जतनेला ॥ ठेवूनि, प्रथम सुत न लाजत नेला. ॥
स्ववचनचि सदा कुलजें ॥ रक्षावें, न तनुजादि[18] विपदा[19] कुल जें ॥ ४२ ॥
कंस तदर्पण-समयां[20]-॥ माजि गणी शुद्धरत्नदर्पणसम[21] या; ॥
बोले, "रिपु अष्टम. हा ॥ न्या, भावोजी ! नको करूं कष्टमहो[22]". ॥ ४३ ॥
शौरि गृहाजाय; जि[23]णें ॥ पुत्राचें परि गमे मना जा य[24]जिणे. ॥
कीं खळनृपविश्वास ॥ व्यर्थ. निघोंदे पडोनि न प[25]वि श्वास. ॥ ४४ ॥
शौरिवरी फार दया ॥ कंस करी, तों रहस्य[26] कथि नारद यां[27], ॥
कीं, "नर-तनु-खोळ, खरे ॥ त्वदहित[28] सुर[29] नंदयदुकुळीं ओळख रे. ॥ ४५ ॥
हे सहसा माराया ॥ दितिदनुजां[30] जपति; न करिं सामा राया ! ॥
अहित[31] नृपा ! ते. जावें ॥ आप्तपणा वरि न; पळ न पातेजावें[32]." ॥ ४६ ॥
सोष्ण[33] सदर्प श्वासा ॥ सोडी वृकव्याघ्र कृष्ण सर्प श्वासां[34]. ॥
धावे. यद्यपि साळे ॥ वाक्पतिचा[35] पढुनिही अवद्य[36] पिसाळे. ॥ ४७ ॥

---

१ स-आनंद, आनंदानें. २ त्वत् अधिक, तुझ्यापेक्षा जास्त. ३ मुलगे. ४ क्रमानें. ५ शांत जहाला. ६ मारणींच. ७ अति उद्युक्त. ८ केशसमूह. ९ विश्वासठेवी १० नशीब. ११ विधीचें. नशीब श्येनपक्ष्याहून जास्त; कारण श्येनाचें 'टपणें' 'धीटपणानें' समजे; परंतु विधीचें नसमजे; अतएव 'विधी' जास्तहोय. १२ आपल्या. १३ घरांस. १४ मनाच्या स्वाधीन. १५ यशच आहे 'वसु' ह्मणजे धन ज्याचें. १६ देवांला स्तुत्य. १७ प्रथमचा मुलगा. १८ तनुज-आदि, मुलगा इत्यादि. १९ विपदेचें स्थान. २० तदर्पणसमयीं, त्यासदेतेवेळीं. २१ निर्मळ आरशा सारिखा. २२ श्रम, दुःख. २३ जगणें. २४ योजणें =अनिश्चित. २५ वज्र. २६ गुह्य. २७ कंसास. २८ त्वत्-अहित तुझे शत्रु. २९ देव. ३० दितिजां व दनुजां, दैत्य व दानवांस. ३१ शत्रु ३२ विश्वास, भरवसा ठेवणें. ३३ सोष्ण=सऊष्ण, सदर्प, उष्ण व गर्विष्ट असा उच्छ्वास. ३४ लांडगा, वाघ काळा सर्प किंवा 'श्वा' ह्मणजे कुत्रा यां सारिख ३५ बृहस्पतीच्या. ३६ मूर्ख अज्ञानी.

पातकराशि शुनकसा[1] ॥ धांवे खळ कंस; ये करा शिशु न कसा ? ॥
शौरिनगें[2] न हा लवला ॥ शोकभरें न भयमारुतें[3] हालवला. ॥ ४८ ॥
मारी वृक पोतातें,[4] ॥ हरिणीचा, श्येन जापरि कपोतातें,[5] ॥
तैसा वधिला भाचा ॥ कंसें; तो मानिला दिवस लाभाचा. ॥ ४९ ॥
जो सत्कारावा स-॥ स्त्रीकं[6], तया शौरिलाहि कारावास,[7] ॥
बद्ध करुनि दिधला हो, ॥ कीं निजरिपुजनक[8] दुःख बहुविध[9] लाहो. ॥ ५०
नेले विलया सहसा ॥ कंसें ऐसेचि शौरिसुत यासह सां[10] ; ॥
श्रम दे निरवधि[11]; कारा-॥ वास पित्यासहि, हरूनियां अधिकारा. ॥ ५१ ॥

इतिश्रीमत्कृष्णविजयेप्रथमोध्यायः ॥ १ ॥

क्षयें[12] खवळी व्याधींतें, ॥ कीं श्वगणा[13] मृगयु[14], जें गदीं[15] व्याधीं तें, ॥
कंस ससचिवें[16] क्रौर्य ॥ प्रकट करी यादव प्रमथनीं[17] शौर्य. ॥ १ ॥
अतिदुष्ट समस्त बक-॥ प्रलंबमुख गरळ वल्लि कुसुम[18] स्तवक. ॥
चित्तांत शिरोनि हित-॥ छद्में, जे होति तापद शिरोनिहित[19] तें. ॥ २ ॥
करि विलया दवसा[20]; हे ॥ तृण त्यातें[21]; दुःख कोण यादव साहे ?॥
न लवुनियां मग पळ ती ॥ मथुरावनिका[22] त्यजूनि यदुमृग[23] पळती. ॥ ३ ॥
त्यजिले ठाव कितेकीं. ॥ ज्याला धृति[24] रीति नीति ठावकि ते कीं. ॥
भजती त्यासचि वांचे ॥ स्थिति त्यांची जे विधेय[25] त्या सचिवांचे. ॥ ४ ॥
ऐसा शोकद[26] नातें ॥ न गणुनि करि कुमति कंस तो कदनातें[27]. ॥
देती ताप सहाय[28]-॥ क्रूर ह्मणति सर्व साधु, तापस[29] "हाय[30]." ॥ ५ ॥
यमसम देखे पतिला[31] ॥ मथुरेच्या, सातवी न दे खेप[32] तिला ॥
सुख; जीचे बाळक सा ॥ वधि जो तो नाठवेल खळ काळ कसा? ॥ ६ ॥

---

१ कुत्र्या सारिखा. २ वसुदेवरूपीपर्वत. ३ भय हेंच वारा तेणें. ४ मुलाला. ५ कवड्यातला ६ बायको सहित. ७ बंदिखान्यांत वास. ८ आपल्या शत्रुचाबाप. ९ बहुत प्रकारचा. १० सहा. ११ अत्यंत. १२ क्षयरोग. १३ कुत्र्यांस. १४ पारधी. १५ रोगीं. १६ प्रधानांसह. १७ यादवांच्या नाशीं. १८ बक आणि प्रलंब इत्यादि राक्षस जसे कांहीं विषवल्लीच्या फुलांचे तुरे. १९ शिरस्-निहित, डोईवर धारण केलेले. २० दावाग्नी सारिखा. २१ कंसांत. "त्यातें हे ( यादव ) तृण " =कंसरूपी दावा ग्नीपुढें ( यादव ) तृण जहाले. २२ अरण्य. २३ यादवरूपी सावधें. २४ धैर्य. २५ आज्ञापरिपालक. २६ शोकदेणारा. २७ मर्दनातें. २८ मित्र. २९ तपस्वी. ३० 'हाय' 'हाय' ह्मणती-खेद करिती इ०. ३१ कंसाला. ३२ सातव्या गर्भाची 'खेप' हें 'देखे' व 'दे' या क्रियापदांचा कर्ता.

"सप्तम गर्भ कसा" हे ॥ "वांचेल," ? ह्मणे; न कंस अर्भक साहे. ॥
कुनृपतिचें[1] निधिला[2] भें[3] ॥ दुःख असें मनिं अनंत सुख निधिलाभें[4]. ॥ ७ ॥
कंसकृतोपद्रव[5] ते ॥ यदु जाले सृजुनि अशन[6] झोप द्रवते[7], ॥
हें कळतां अगदी न ॥ प्रभु साहे; कीं स्वशासनीं[8] जगदीनें[9]. ॥ ८ ॥
"सर्वहि यांद[10] वनाशे[11] ॥ व्यसु[12] निरुदक[13] मीनें[14], तेविं यादव नाश ॥
मजविण पावतिल; पती ॥ मी रक्षिन; किति भयार्त[15] धावति लपती!" ॥ ९ ॥
ऐसें चिंतुनि, माया[16] ॥ करि; हरि निजदास दुःख किंतु निमाया. ॥
आज्ञापी परं[17] माया ॥ देवी ते जे अनुव्रता[18] परमा[19] या. ॥ १० ॥
" रक्षूं लोकां माये, ॥ देवि, सादिष्टार्थ[20] सिद्ध हो कामा, ये; ॥
जा गे गोपावासा[21]. ॥ समयचि हा लाभ त्यास ओपावासा; ॥ ११ ॥
व्रजपति नंद नयेंतें[22] ॥ जाणे; करि शौरि साधु वंदन यातें. ॥
कीं करउनि दे विवरें ॥ कंसभयार्त स्वयोषितां[23] देवि, वरें;[24] ॥ १२ ॥
रोहिण्या[25]ऽव्हा यांची[26] ॥ स्त्री आहे शेषजन्मदा[27] व्हायाची. ॥
तज्जठरीं[28] तेजातें ॥ ने; धरिते देवकी सती ते जातें. ॥ १३ ॥
मग मी देवकजा[29] या ॥ तेजा जननी करिन सेवक जाया. ॥
दुग्धाब्धि यदुदरांतें[30] ॥ स्तवि त्या जावुनि, विनाशिन यदुदरांतें[31]. ॥ १४ ॥
नंद सुकृतमयें[32]; दुहिता[33] ॥ हो त्याची तूं करूनि काम यदुहिता[34]; ॥
योग्याचि यशोदा त्या ॥ त्वन्मातृत्वा समुज्वलें[35] यशोदात्या. ॥ १५ ॥
वरितिल वर मानव स-॥ प्रेम भजुनि तुज; तूंहि परमा[36] नवस ॥

---

१ कोणत्याहि वाईटराजाचें. २ द्रव्याला ( त्याच्या प्रजेंतून कोणत्याहि मनुष्याच्या ). ३ भय. ४ विष्णुलाभें. ५ कंसानें केला आहे उपद्रव ज्यांस. ६ खाणें. ७ विरघळते. ८ आपल्या आज्ञे विषयीं. ९ जगत्-ईन=जगाचा स्वामी. १० जलचर. ११ वन-आश, उदकेछु. १२ वि-असु=प्राणरहित. १३ निःउदक. १४ मच्छ. १५ भयानें आर्त=पीडित. १६ दया. १७ श्रेष्ठ. १८ अनुसरणारी. १९ ईश्वरास. २० सत्-इष्ट-अर्थ. २१ गोप-आवास, गोकुळास २२ नीतीतें. २३ कंसाच्या भयानें आर्त. अशा आपल्या ( वसुदेवाच्या ) बायकांस. २४ श्रेष्ठ. हें 'विवरें' याचें विशेषण. २५ रोहिणी -आव्हा, रोहिणी नावाची. २६ नंदाची. २७ शेषाला जन्म देणारी. २८ त्याच्या पोटीं. २९ देवकाची कन्या=देवकी. "यातेजा" =मला. ३० यत्-उदरातें=जीच्या ( देवकीच्या ) उदरातें. ३१ यादवांच्या भयातें. ३२ पुण्यमय. ३३ मुलगी. ३४ यादवांच्या हिता साठीं. ३५ सम्-उज्वल-यशस्-दात्या.=उत्तम यश देणाऱ्या, हें "त्वन्मातृत्वा" याचें विशेषण. ३६ श्रेष्ट,

सद्भाव पुरविशील ॥ स्वजनाघतमीं[1] धरूनि वपु रविशीलें.[2]" ॥ १६ ॥
माया श्रीशास[3] नती[4] ॥ करूनि करी शीघ्र सर्वही शासन[5] ती; ॥
हें किति? जडजग वीते, ॥ अघटितघटनापटीयसी[6] जगवीते. ॥ १७ ॥
निंदिति पातक सारे ॥ "जाला," जन ह्मणति "गर्भपात कसा रे ? "॥
[7]विधिचें लिहिलें कांतें ॥ न घडे? कर्में चिपावालि हि लेकातें. ॥१८॥
[8]समधिष्ठी अवदाता[9] ॥ देवक्युदरा[10] मुकुंद उत्सवदाता.[11] ॥
देवांच्या जशि तरूंची[12] ॥ वसति पयोधींत[13] हरिदिशेंत[14] सितरूची.[15] ॥ १९ ॥
पळ न चुके वळसा[16] जे ॥ आनकदुंदुभिवधू[17] न केवळ साजे ॥
पावुनिहि अमररमणि[18] कीं ॥ कारासदनांत[19]; शिखिशिखा[20] जसि मणिकीं.[21] ॥२०॥
कीं ह्मणती कविराजे ॥ ज्ञानखळीं[22] जसि सरस्वती नविराजे.[23] ॥
कीं जन्हि सुंदर साजे ॥ कविता न तदाननीं,[24] भजति न रसा जे.॥२१॥
शिशुवधकाम[25] सतीतें ॥ जेंव्हां अवलोकि कंस तामस तीतें, ॥
अत्यद्भुत शोभा जे, ॥ तीणें नयनीं मनीं हि खळ तो भाजे. ॥ २२ ॥
स्पष्ट नवी हे रीती ॥ जाणे, ते अद्भुत[26] छवी हे[27] रीती. ॥
जरि तो खळ, कर्कश, तें ॥ तेज न साहे; गमे हरिच तर्कशतें. ॥ २३ ॥
नघडे घात; नवा हे[28] ॥ दावी तेजः प्रकार; हात न वाहे.[29] ॥
पाहे प्रसवावधि[30] तो. ॥ न असमयीं तक्षकादि डसवा[31] वधितो. ॥ २४ ॥
न चले अशनीं[32] शयें[33]. न ॥ स्थिर मति, सिंहासनीं हि भवनीं[34]; शयनें[35] ॥
नघडे धड; कीं नाशें[36] ॥ बद्ध तसा भी; मनांत धडकी नाशें. ॥ २५ ॥
कीं हरिमय[37] जग जाला, ॥ होय भयद उग्रसेनतनुजगजाला[38]. ॥
नदिसे नीज नसे जे ॥ चिंतेंत रुचे न कामिनी जन सेजे. ॥ २६ ॥

---

१ स्वजनाच्या पातकरूपी अंधारीं. २ सुर्यस्वभाव. ३ विष्णूस. ४ नमन. शासन. ५ आज्ञेप्रमाणे वर्त्ते असा भावार्थ. ६ अघटित जी घटना ती करण्या विषयीं अतिकुशल. ७ ब्रह्मदेवाचें ८ आंतउत्पन्न होय. ९ शुद्ध. १० देवकीच्या पोटास. ११ उत्सव=आनंद देणारा. १२ कल्पतरूंची. १३ क्षीरसागरीं. १४ पूर्वेस १५ शुभ्र (स्वच्छ) कांति. १६ घेरा. १७ देवकी. १८ विष्णु. १९ बंदीखान्यांत. २० अग्निज्वाला. २१ डेऱ्यांत. २२ ज्ञानाविषयीं दुष्ट. २३ शोभे. २४ त्यांच्या तोंडीं. २५ मुलांचावध करण्याविषयीं इच्छा आहे ज्यास. २६ आश्चर्य कारक प्रकाशमान् २७ पाहे. २८ देवकी. २९ उठे. उभारी. (कंस हात न उभारी इत्यर्थः). ३० प्रसवअवधि. ३१ सर्प. ३२ अन्नीं. ३३ हस्त. ३४ घरीं ३५ निद्रा. ३६ यमानें. ३७ कृष्णरूप सिंहमय. ३८ उग्रसेनसुत (=कंस)- रूप हत्तीस; (जग "हरिमय" व "भयद" जाहला).

सदनीं वसुदेवाच्या ॥ विधि[१] भव[२] मुनि शक्र[३] सिद्ध वसु[४]; देवाच्या ॥
कारिति दयास्तवना, कीं ॥ केला वर सत्य; जय जयास्तव[५] नाकीं[६]. ॥ २७ ॥
"माते देवकि, तव हा ॥ आला पोटासि देवदेव कितवहा[७]. ॥
कंसांतक यदुप कृती[८] ॥ होइल गातील सुरतरु[९]हि यदुपकृती[१०]. ॥ २८ ॥
नाशिल रिपुसह कारा-॥ वासा; जप[११] अस्मदादिपिकसहकारा[१२]; ॥
सुरतरुदेवा[१३] तनया ॥ तुझिया विघ्नाख्यकंप[१४] दे वात न या." ॥ २९ ॥
प्रभुचरण स्तवुनि, सुर ॥ स्वपदा गेले मनांत होवुनि निसुरे[१५]; ॥
कीं विश्वनिकाय[१६] जना ॥ उद्धरिल मुकुंद रक्षक निका यजना[१७]. ॥ ३० ॥

इतिश्री कृष्ण विजये द्वितियोऽध्यायः ॥ २ ॥

जगदिष्टोत्तमसमया[१८] ॥ माजि निशिथीं हरी सुधाकरसम[१९] या ॥
देवक-सुप्रिय-दुहिता- ॥ प्राचीतुंनि[२०] उदय करि चकोरयदुहिता[२१]. ॥ १ ॥
पाहे माय तनय न ॥ प्रतिनिधि जा पंकज-छेदायतनयन[२२]. ॥
भुज चारि निजदरारी[२३] ॥ शोभति, जेथें गदासरोज[२४] *दरारी. ॥ २ ॥
श्री-वत्सें उर विलसे[२५]; ॥ दृक्काम[२६] न कंठ कौस्तुभहि उरविलसे. ॥
विद्युत्पीतांबर वा ॥ घननीळ विलोचनासि[२७] पीतां बरवा. ॥ ३ ॥
कर्णीं लोलें[२८] समानें ॥ मकराकृति रत्न कुंडलें लसमानें[२९] ॥
ज्यांहि दिसातिहि मकरांचीं ॥ रूपें बिंबेंचि भास्कर हिमकरांचीं. ॥ ४ ॥
ज्यांत मणींद्र[३०] तपनसे[३१] ॥ मुकुट शिरीं तो स्तवावयासि तप नसे. ॥
कुंतळ ते मधुपाळी ॥ पाजूनि जिला मुखाब्ज निजमधु पाळी. ॥ ५ ॥
मणिखचिता दाबे[३२] रवि ॥ द्युति घंटापंक्ति रम्यनादा[३३] बरवी. ॥
कंकण अंगद[३४] याला ॥ धरणें भक्तार्थ जेवि अंग दयाला! ॥ ६ ॥

---

१ ब्रह्मा. २ शिव. ३ इंद्र. ४ अष्ट वसु. ५ ज्या वरासाठीं. ६ स्वर्गीं. ७ दुष्टाचा संहार कर्ता. ८ चतुर. ९ कल्पवृक्षहि. १० ज्याचा उपकार. ११ सांभाळ कर. १२ अस्मत्—आदि—पिक— सहकार= आम्ही आदि करून जे पिक (= कोकिल) यांचा पिकलेला आंब्याचा वृक्ष (= कृष्ण) त्यास. १३ कल्पवृक्षांच्या राजास. १४ विघ्ननामक कंप. १५ निःकाळजी १६ विश्वस्थान. १७ यज्ञास. १८ जगांत अत्यंत इच्छित अशा समयीं. १९ चंद्रसम. २० देवकीरूपी पूर्वेहून. २१ चकोरां सारिख्या यादवांच्या कल्याणार्थ. २२ कमल पत्रवत् विस्तृत. नयनें ज्याचीं. २३ आपल्या भयाचे शत्रु. २४ गदा आणि चक्र. २५ शोभे. २६ दृष्टीची इच्छा. २७ नयनांस. २८ अलंकार विशेष. २९ शोभायमान्. ३० मणिश्रेष्ठ. ३१ सूर्यासारिखे. ३२ कंबरपट्टा, ३३ मधुर आहे नाद जीचा, ३४ हातांतील एक अलंकार. * शंखचक्र.

द्युति[1]भाजन कारा[2] हे ॥ जाली; भीति न मुकुंद- जनका[3] राहे. ॥
पाहुनि अद्भुत तनया ॥ होय मनें अयुत धेनुदान ततनया[4]. ॥ ७ ॥
जाणे पुरुषपर[5] महा[6] ॥ वरुनी वसुदेव तुष्ट[7] होय परम हा. ॥
स्मरला वास्तव नातें; ॥ करि जोडुनि हस्त, तेधवां स्तवनातें. ॥ ८ ॥
"धरणीला अवतारीं ॥ दीनजना या सुखप्रदा[8] अवतारीं ॥
जाला सुदिवस मजला; भक्तीं तुझा प्रसाद पूर्ण समजला. ॥ ९ ॥
मद्गृहिं[9] जननं[10] भावी[11] ॥ ऐकूनि तुझें स्वभद्र[12] कुजन[13] न भावी. ॥
वधिले भवदग्रजनीं[14]; ॥ या खळ कंसा असा नसे उग्र जनीं. ॥ १० ॥
आझुनि न निवे दावा; ॥ कैसा वृत्तांत तूज न निवेदावा? ॥
प्रसव वदावे दारा ॥ उपासिती दूत कथिति दावेदारा. ॥ ११ ॥
कळतां, घातक साप ॥ त्वरितचि धांवेल; करिल घात कसाप. ॥
केले सहसा वध हो; ॥ यास्तव ह्मणतों विभो, तुला सावध हो." ॥ १२ ॥
स्तवुनि धरुनि जननीती ॥ कंसभयव्याकुळा वदे जननी ती. ॥
"हे आकृति कमनीया[15] ॥ आच्छादीं शीघ्र; फार धाक मनींया." ॥ १३ ॥
"जालों सुत वरदानें[16];" ॥ पूर्वकथा सर्व कथियली वरदानें[17] ॥
सांगे तो; कन्या या ॥ नंदाची घेउनी, स्वतोक[18] न्याया. ॥ १४ ॥
प्राकृत शिशुसम, जावी ॥ शंका ह्मणवूनि, होय; हित समजावी. ॥
आज्ञावश्या मनिं घे, ॥ ऊचलुनी शौरि तो घनःश्याम, निघे. ॥ १५ ॥
पूर्वींच अजनमाया[19] ॥ जे प्रोक्तानंदमंदिरीं[20] जनमाया, ॥
त्या समयीं जनिं[21] लाहे ॥ शुद्ध यशोदोदरांतुनीं जनिलो[22] हे. ॥ १६ ॥
ज्या साठीं "जनमो हे" ॥ देव ह्मणे तो तिणें सकळ जन मोहे. ॥
जनतेला[23] निजलीला[24] ॥ मायापतिची कसी कळे निजलीलो[25]? ॥ १७ ॥
कांडकटाहा न खरा ॥ भेदीलावूनि धाकटा नखरा ॥
बद्धद्वारां जवळी ॥ ये तींनुघडति कसीं महाराज बळी? ॥ १८ ॥

१ कांतीचें पात्र. २ बंदीखाना. ३ वसुदेवास. ४ प्रसिद्ध आहे नय=न्याय ज्याचा. ५ पु-
रुष श्रेष्ठ= कृष्ण. ६ आनंदास. ७ खुष. ८ सुख देणाऱ्या. ९ माझ्या घरीं. १० जन्म. ११
होणार. १२ कल्याण. १३ दुष्ट (कंस). १४ तुझे वडील बंधु. १५ सुंदरा. १६ वरदान दि-
ल्यामुळें. १७ कृष्णानें. १८ आपला मुलगा. १९ जन्मरहित. २० नंदाच्या सांगितलेल्या घरीं.
२१ लोकीं. २२ जन्माला. २३ जनता=जनसमूह. २४ आपली लीला. २५ निजलेल्यास.

गळिजेलें कुलपानीं; ॥ द्वारप[1] निजले जसे मदाकुल[2] पानीं[3]; ॥
बहुतम घन[4] तीव्र जनीं; ॥ केवळ हीना गमे वसुमती[5] व्रजनीं[6]. ॥ १९ ॥
छत्र अनंत[7] रमेना[8]– ॥ वरि होय; त्यजुनियां अनंत[9] रमेना. ॥
सद्भक्ताला भजनीं ॥ आवडि मोठी; नसे दुजा लाभ जनीं. ॥ २०
मिति नाहीं औंवतां[10]; ॥ बहु मोठा पूर; जो नये आवर्तां[11] ॥
परम[12] कराला टाकी ॥ तीरा बाहेरि समकरा[13] लाटा कीं. ॥ २१ ॥
परिते यमुना सरिता[14], ॥ मार्ग करुनि दे व्रजाभिगमनास[15] रिता[16], ॥
सागर सेतू– सरणी[17] ॥ जैसा दे दशमुखांतहेतूस[18] रणीं ॥ २२ ॥
शौरि महानंदाच्या[19] ॥ कंदा ने मग सुखें गृहा नंदाच्या. ॥
करुनी तीव्र जवासी[20] ॥ गेला, पाहे न जागती व्रजवासी[21]. ॥ २३
नंदाची महिला[22] हे ॥ माया मुग्धा[23] श्रम प्रकाम[24] हि लाहे[25] ॥
'प्रसवें,' हो तीस, "मज ॥ प्राप्त सुता सुत, " असे न होती समज. ॥ २४॥
तच्छयनीं[26] निजलीला- ॥ नरतनु[27] सुत ठेवि नकळतां निजलीला, ॥
तो दृढचित्त यदुहिता[28]; ॥ तीची ने निजगृहास निर्भय दुहिता[29]. ॥ २५
पूर्वस्थिति न विघडली; ॥ जाणो होतीच ते न हे नवि घडली; ॥
चलन नसे कुलपाला ॥ चरणयुगीं[30] श्रृंखळाहि यदुकुलपाला[31]. ॥ २६

॥ इतिश्रीमत्कृष्णविजये तृतीयोध्यायः ॥ ३ ॥

ते नेल्या उपरि सती[32], ॥ बाळध्वनि करि, तयास पाळ[33] परिसती. ॥
ते कथिति निजवरा[34], ज्या ॥ गर्भजनिध्यास[35], त्या करुनि जव[36] राज्या. ॥ १ ॥
गर्भ दुराशय[37] नाशी, ॥ तैसा हा ही गणी, त्यजी शयनाशी[38]. ॥

---

१ द्वारपाळ. २ मदानें व्याकूल. ३ मद्यपानानीं. ४ मेघ. ५ वसुमति = भूमि. ६ गमनीं- ७ शेष. ८ रमा– ईन = कृष्णावर. ९ विष्णु=कृष्ण. १० वृष्टीला. ११ आवरितां=वारायास. १२ तीव्र. १३ मकरांसहित. १४ नदी. १५ गोकुळास जाण्याकरितां. १६ मोकळा. १७ सागरांत सेतुरूपी मार्ग. १८ रामास. १९ महा–आनंदाच्या. २० वेगासी. २१ गोकुळवासी. २२ स्त्री. २३ भ्रमिस्त. २४ फार. २५ लाधे. याचा कर्ता " नंदाची मुग्धा महिला." २६ तत् – शयनीं, तिच्या बिछान्यावर ( नंद स्त्रीच्या ). २७ आपुल्या लीलेनें नराची तनु (शरीर ) धरिली ज्यानें असा मुलगा. २८ यादवांच्या हितासाठीं. २९ मुलगी. ३० पायांत. ३१ वसुदेवाला. ३२ माया. ३३ द्वारपाळ. ३४ आपल्या स्वामीस. ३५ गर्भाच्या जन्माचा ध्यास. ३३ वेग. ३७ द्वाड आहे अभिप्राय ( मन ) ज्याचें. ३८ निजेला.

धांवे मृगराज[1] वन- ॥ द्विपकलभावरि[2] जसाचि घारा जवन[3]. ॥ २ ॥
तो येतां माराया, ॥ बोले कंसासि शौरिरामा[4], "राया," ॥
बहुदीनापरि, "सून ॥ प्रभुजी तुजि कीं द्रवेल हें पारिसून. ॥ ३ ॥
करुणा आचर; भाजे ॥ बहु सुत वधिले; दिजे सुता चरमा[5] जे; ॥
स्त्रीचा वध न बरा हो! ॥ वांचो. त्वत्पुत्र, तो इचा नवरा हो." ॥ ४ ॥
तन्मन अशुभ द्रवलें ॥ न तदुक्तें[6]; तत्सुतेसि गतभद्र[7] वळे ॥
चरणीं धरुनी; चपळ ॥ क्रोधें ओढी; न रा हुं दे नीच पळ. ॥ ५ ॥
ते पसरुनि "आ" रडली ॥ भगिनी, जन्हि धार्य मोकलुनि आरडली, ॥
न धरी पाडें[8]; सखा तो ॥ व्याघ्र वृकाचाचि काय! पाडसं[10] खातो. ॥ ६ ॥
येइल कां[11]पां याला ॥ करुणा? ते धरुनि कन्यका पांयांला ॥
ऊचलुनी पातें[12] शिला[13]- ॥ पृष्ठीं करि कंस दिव्यरूपा[14] तशिला. ॥ ७ ॥
तों जाय नभां[15], उसळे, ॥ तेव्हां स्वमनांत देवकीभाउ[16] स[17]ळे. ॥
करुनि सभाजर्न[18] माये ॥ गांयें[19] नमी, गगनिं सुरसमाज, न मांये[20]. ॥ ८ ॥
स्वपदाला शिवला हो! ॥ तरि दर्शन-पात्र खळहि; हा शिव[21] लाहो ॥
हें माया भावी; जे ॥ दावी ते दुःसहा निजा[22] भा[23] वीजे. ॥ ९ ॥
दिव्यशरीरा[24] हेति- ॥ प्रवराष्ट[25]- भुजा नभींत[26] रीं राहे ती. ॥
सद्रत्न-कलाप[27] तिचे ॥ भासति घडिले दिवाकरकलापतिचे[28]. ॥ १० ॥
बोले ते असुरा[29] या, ॥ "कृपणाचे[30] हरिसि कां वृथा असु[31] राया? ॥
जेणें तुज नाश, मला ॥ ठावा; तो, वाढतो, न कुजना! शमला." ॥ ११ ॥
बोलुनि सहसामें[32] हिता[33] ॥ देवी तेथूनि जाय सहसा[34] महिता[35]. ॥
राहे नैकनि[36] केतीं, ॥ धरि नामें बहुत, देति लोक निके[37] तीं. ॥ १२ ॥

---

१ सिंह. २ वनांतील हत्तीच्या छाव्यावर. ३ तरुण. ४ वसुदेवाची स्त्री. ५ शेवटची (सुता = कन्या). ६ तिच्या बोलण्यानें. ७ हतभाग्य. ८ ओरडाओरड. ९ विशाद. १० पिलें. ११ कां? १२ पतन. १३ दगडावर. १४ दिव्य आहे रूप जीचें. १५ आकाशांत. १६ कंस. १७ रागावे. १८ पूजा. १९ याचा कर्ता 'सुरसमाज' =देवांचा समूह. २० मावे. २१ कल्याण. २२ आपली. २३ प्रभा (कांति). २४ दिव्य (देवांसारिखें) आहे शरीर जीचें. २५ श्रेष्ठ शस्त्रीं युक्त आहेत अष्टभुज जीचे. २६ आकाशीं. २७ सत्-रत्नकलाप= चांगल्या रत्नाचे दागिने. २८ दिवाकर कलापति = चंद्रसूर्याचें. २९ कंसाला. ३० गरीबाचे. ३१ जीव. ३२ सामासह. ३३ हितासाठीं. ३४ एकदम. ३५ पूज्य. ३६ अनेक स्थळीं. ३७ चांगले.

संग्रह नं. 36
ता. १३

विस्मित कंस हि परते; ॥ समजावी स्वस्वसा[1] सुदेवनपर[2] ते. ॥
"गमली सत्य नभोगी;[3] ॥ चुकलों; मन्मनहि काय ताप न भोगी? ॥ १३ ॥
नरचि न बोलति लटिकें ॥ हें कळतें, तरि मनीं न बोल तिलें[4] टिके; ॥
सत्य ह्मणति संत तिलीं,[5] ॥ यास्तव संहारिलें तुजा संततिला. ॥ १४ ॥
हा[6] शिशुंसा भावो[7] जी! ॥ मना; तुह्मी पितर; न स्वसा भावोजी. ॥
संततिघातकराशी[8] ॥ रक्षा; मी स[9]र्वथैव पातकराशि." ॥ १५ ॥
करि सांत्वन; बुधरीती, ॥ जे कविशोकाग्निशामकांबु,[10] धरी ती. ॥
त्या दोघांला विनवी, ॥ बंध निवारूनि; आवडी लावि नवी. ॥ १६ ॥
नमुनि शिरीं पद, "राशी ॥ अपराधांचा" ह्मणे, पसरि पदराशीं; ॥
द्वेष मनांतिल सरला; ॥ वृत्ति तयाची विलोकिली बहु सरला.[11] ॥ १७ ॥
आनकदुंदुभि[12] याला ॥ समजावी, कीं स्वकर्मविंदु[13] भियाला, ॥
हा; "विधिनेम[14]; उगे हा" ॥ ह्मणतां तो जाय होवुनी मउ गेहा[15]. ॥ १८ ॥
मग कंस, सखे मंत्री ॥ जे सुररिपु[16] मूढ खळ तयां आमंत्री[17]. ॥
त्यांला सांगे व्यथित ॥ स्वांतें[18] तें सर्व योग-निद्रा[19] कथित. ॥ १९ ॥
ऐकुनि सर्व कुकवि[20] ते ॥ जाले त्या कुमतिला कुमंत्र शिकविते. ॥
पूर्णाचि अमा[21] त्यांहीं ॥ करिजेत्ये अंध भूपति अमात्यांहीं[22]. ॥ २० ॥
"बाहिर आंत दशाहा[23] ॥ ते शिशु[24] मारूं, नभो-जितत्रिदशा,[25] हा ॥
प्रथमोपाय सुनय न ॥ व्यभिचार फळीं, पहा तुह्मी हि सुनयन[26]. ॥ २१ ॥
हरि हर शक्र शतधृती[27] ॥ यद्यपि तुझिया भयें सदा विगतधृती[28]. ॥
करितां रिपुगद[29] हानी ॥ समुपेक्षितं[30], निवडिलें असेच दहांनीं. ॥ २२ ॥
देवाचें मूळ हरी ॥ तेथें धर्म हि न; भिन्न सिंधू लहरी ॥

---

१ आपलीबहिण. २ शोकांत गुंतलेली. ३ नभस्गी= आकाशवाणी. ४ तिलमात्रहि. ५ आकाशवाणीला. ६ मी. ७ मुलासारिखा. ८ संततिचा घात करणारास. ९ सर्व प्रकारें. १० कवी- शोक.—अग्नि-शामक (शांतक रणारे). अंबु (उदक). ११ सरळ. १२ वसुदेव. १३ आपलें कर्म जाणणारा. १४ प्रारब्धाचा नियम. १५ घरीं. १६ देवांचे शत्रु. १७ बोलावी. १८ दुःखित अंतःकरणानें. १९ मायेनें सांगितलेलें २० कुज्ञानी. २१ अमावास्या. २२ प्रधानांनीं. २३ दश आहा, दाहा दिवसांचें. २४ मुलगे. २५ जिंकिलें आहे. देवांस ज्यानें. २६ चांगले आहेत डोळे ज्याचे. २७ ब्रह्मा. २८ धैर्यहीन. २९ शत्रु आणि रोग ३० उपेक्षिलेले.

त्या धर्माचें प्रभवें[1]– ॥ स्थान तपश्रुतिसमूह[2] गो[3] विप्र सर्व[4]. ॥ २३ ॥
“राहें स्वस्थ नयज्ञां[5] ॥ जेकरिती स[6] विधि धर्मजीवन[7] यज्ञा, ॥
गोवेदतपोनिर्लय ॥ ब्राह्मण त्याचा बळेंचि साधूनि लयं[9]. ॥ २४ ॥
तप, दम, गो, विप्र, शम, ॥ श्रद्धा[10], क्रतु[11], सत्य, सुर, दया, रुट्प्रशमें[12], ॥
हरिच्या तनु अकरा या, ॥ आज्ञा दे यांचिया क्षयास कराया. ॥ २५ ॥
हरि सर्वगुहाशयन[13]; ॥ ग्रहणीं त्याच्या बळी तुजा हा शय[14] न. ॥
करणें तन्नाश[15] मनीं, ॥ आज्ञा आह्मासि दे ऋषींच्या शमनीं[16].” ॥ २६ ॥
ऐकुनि दानव- निकरां[17] ॥ कंस ह्मणे,“ जा, गतद्विजा[18] अवनि[19] करा.” ॥
मग तो गोविप्रांशी ॥ विस्तारुनि कपटपाश गोवि[20] प्रांशी[21]. ॥ २७ ॥
ते दानव अहितमती[22] ॥ जनपीडक भीतिदाकृती[23] अहि[24] तम ती ॥
वधुनि सदश्व[25] जनास, ॥ प्रेक्षिति[26] साधावया खगध्वजनास[27]. ॥ २८ ॥
धरुनि सदसद्वेष[28] ॥ छळिती दाटूनि साधु सद्वेषें[29] ॥
जोडिति अघ[30] पृथु[31]; कां तें ॥ कल्याण करील मारितां पृथुकांतें[32]? ॥ २९॥

इति श्रीकृष्णविजये चतुर्थोध्यायः

साधूत्तम[33] हा नंद ॥ स्वात्मजजन्मीं[34] धरूनि सुमहानंद[35], ॥
मग बोलावुन मुनितें ॥ करवि सविधि जातकर्म त्यास नमुनि तें. ॥ १ ॥
विप्रांतें मोदानें[36] ॥ दे सालंकार[37] लक्षयुग[38] गोदानें[39]. ॥
गाती गायक तानें[40] ॥ जनमनधन जें[41] हरूनि आयकतां ने. ॥ २ ॥
दुंदुभिच्या[42] ध्वानींहीं[43] ॥ गणिलां[44] पृथुकुक्षितो[45] सुराध्वा[46] नाहीं. ॥
वाल्मीक्यादिकवि[47] नयें ॥ स्तविती ते; सूत बंदि मागध विनयें. ॥ ३ ॥

---

१ जन्मस्थल. २ तप आणि वेदसमूह. ३ गाई. ४ यज्ञ. ५ न्याय जाणणाऱ्या. ६ विधीनें. ७ धर्माचें संरक्षण. ८ गाई, वेद, आणि तप यांचें स्थान. ९ नाश १० विश्वास. ११ यज्ञ. १२ क्रोधशांति. १३ सर्वहृदयांत आहे शयन ज्यास. १४ हात. १५ त्याचा नाश ( हरीचा ). १६ मर्दनीं. १७ समूहास. १८ भ्रष्ट आहेत ब्राह्मण जिजमधून. १९ पृथ्वी. २० बांधी. २१ भक्षी. २२ दुष्टवासनेचे. २३ भयंकर आहे आकृति ज्यांची. २४ सर्प. २५ सत् अश्वा, सन्मार्गी. २६ पाहती. २७ हरीचा नाश. २८ साधूंचा आणि असाधूंचा वेष. २९ द्वेषी. ३० पातक. ३१ मोठें. ३२ मुलांस. ३३ साधूंत उत्तम. ३४ आपल्या मुलाच्या जन्मकालीं. ३५ सु – महा – आनंद. ३६ आनंदानें. ३७ स – अलंकार. ३८ चार लक्ष. ३९ गाईचीं दानें. ४० सूर. ४१ गायन. ४२ देववाद्य. ४३ नादांनीं. ४४ मानिला. ४५ मोठें आहे पोट ज्याचें. ४६ आकाश. ४७ वाल्मीकि इत्यादि कवी.

विप्रमुखीं स्व[1] स्ति; मिते-[2] ॥ प्रद सुरतरु[3] धरुनि राहिले स्वः[4] स्तिमितें[5]. ॥
न लजाति कामित[6]दाते ॥ ब्राह्मणवृंदा[7] समस्त कां मितदाते? ॥ ४ ॥
त्या उत्सव बहळ[8] दिनीं; ॥ कीं माखिति निज पशूहि तेल हळदिनीं, ॥
व्रजजन; नंद नवनवा ॥ करि हर्ष; तसा न नाक[9] नंदन वन वा[10]. ॥ ५ ॥
व्रज पशुपालांस[11] मुदा-[12] ॥ वह वैकुंठापरिस जाला समुदा[13]; ॥
गोकुळ शोभारतिचें[14] ॥ वर्णन मन लाजवील हो भारतिचें[15]. ॥ ६ ॥
येतांचि रमानवरा ॥ व्रज पावे त्रिभुवनांत चिर[16] मान वरा[17]. ॥
अजन-जननवासर[18] हा ॥ सकळर्धींतें[19] ह्मणे, "करा वास, रहा." ॥ ७ ॥
नोहे सोपा यजनां[20] ॥ योगा, घोषांत[21] दावि तो पाय जना; ॥
संसृतिच्या[22] जो पारा ॥ नेता, गवळ्यांस जाहला सोपारा. ॥ ८ ॥
व्रजपालाजिर[23] वाणें ॥ आणुनि जैं भरिति युवति[24], लाजिरवाणें ॥
तैं मुख करि नाकवर[25]; ॥ त्रिजगांतहि गोप जातिचें नाक वर! ॥ ९ ॥
मानुनियां परम हिता ॥ गोपी आल्या प्रहर्षतत्पर महिता[26]. ॥
दृष्टि हरिति विश्वाची; ॥ लाजति रंभा तिलोत्तमा विश्वाची[27]. ॥ १० ॥
देति हरिस परमाशी[28]; ॥ दृष्टि जडे तेथ जसि सितापरे[29] माशी. ॥
त्या कोकिलगल सकला[30] ॥ गाती नंदात्मजासि मंगल सकला. ॥ ११ ॥
बहुतचि कुतूहलें[31] दिनें ॥ त्या गोपी स्नेहस-द्रसार्द्र[32] हलदिनें. ॥
सिंचिति गोपसमुदया ॥ पावलिया अतुळहर्ष भाग्य समुदया[33]. ॥ १२ ॥
सिंचिति गोप समुदित ॥ प्रेमें अन्योन्य भूरि[34] गोरस मुदित[35]. ॥
दधिदुग्धघृतोदानीं ॥ व्रजकीं आलिंगिला महा मोदांनीं. ॥ १३ ॥
अभिमत दान वितरणीं ॥ अदेय कां हीं यशें तदा नावें तरणीं. ॥

---

१ कल्याण. २ मोजलेलें देणारे=थोडकें देणारे. ३ कल्पतरू. ४ स्वर्ग. ५ निश्चल. ६ इच्छित देणारे. ७ ब्राह्मणस मुहास. ८ फार. ९ स्वर्ग. १० अथवा. ११ गवळ्यांस. १२ आनंददायक. १३ सगळा १४ गोकुळांतील शोभारूपी रतीचें. १५ सरस्वतीचें. १६ नेहमी. १७ बरा ( यमकासाठीं ) बरा. १८ कृष्ण जन्म दिवस. १९ सर्व समृध्धींतें. २० यज्ञास. २१ गोकुळांत. २२ संसाराच्या. २३ व्रजपाल– अजिर, नंदाचें अंगण. २४ बायका. २५ इंद्र. २६ पूज्या. २७ एक देवांगना. २८ परम - आशी, मोठमोठे आशीर्वाद. २९ साखरेवरची. ३० कलायुक्त ३१ कौतुक. ३२ स्नेह –सत्– रस–आर्द्र; स्नेह = तेल, प्रीति; आर्द्र = भिजलेलें. ३३ अनुपम्य हर्ष आहे ज्यांत अशा भाग्याचा उत्कर्ष. ३४ पुष्कळ. ३५ आनंदित.

वर्णें गौर वियाला ॥ नंद; सकळ. साधुलोक गौरवि याला. ॥ १४ ॥
वार्षिक-कर[1] वसु देवा[2] ॥ कंसा दे नंद भेटही वसुदेवा. ॥
क्षणमात्र सखे दमन ॥ क्लेशाचें करिति बोधुनि सखेद मन. ॥ १५ ॥
शौरि वदे "स्थविरतमीं[3] ॥ तुझिया ठायीं प्रजा*! सुखी अविरत[4] मी. ॥
सुत सुखहेतु जतन या ॥ करिं; भाग्यें करुनि गांठि हे तुज तनया." ॥ १६
नंद ह्मणे "अहितांनीं[5] ॥ तूं तप्त सख्या; नृपाळ हा अहि[6]; तानीं ॥
बाळें वधि; मग तनया ॥ आठविं; या न भय न त्रपा विगतनयां[7]." ॥ १७
सुखदुःखें विधिजनितें ॥ जाणे जो कीं विवेक नीरधि[8] जनिं तें ॥
दैव न तन्मन मोही ॥ न दुज्यां[9] करूं त्यासि सप्त जन्म नमो हीं. ॥ १८ ॥
मग सहसा, "गेहातें ॥ जा," ऐसें यासि शौरि सांगे; हा तें ॥
समजुनि नंद निघाला, ॥ कीं भांवी[10] सुचविला स्वनंदनिं घाला. ॥ १९॥

इतिश्रीमत्कृष्ण विजये पंचमो ध्यायः ॥ ५ ॥

हरिसि ह्मणे कातर[11] तो, ॥ "देवा, त्वच्छरण[12] दुःख. शोका तरतो. ॥
भजकसुगम[13] संताना, ॥ विघ्न न बाधो व्रजांत ममसंताना!" ॥ १ ॥
साधाया क्षिप्र[14] हिता ॥ कंसानें बाळघातिनी जी प्राहिता[15] ॥
ते पूतनिका[16] स्वधि[17] ती ॥ राष्ट्रांत फिरे छळे मुलांला वधिती. ॥ २ ॥
ते मृत्यूची आली[18] ॥ शिशुमारी एकदा व्रजाला आली. ॥
शोणितरुचिर[19] त नुसती ॥ धरि मायेनें वरीच रुचिर[20] तनुस ती. ॥ ३ ॥
उल्लसमान[21] वपु सती ॥ देखुनि, चकित स्त्रिया न मानव पुसती. ॥
मानिति कीं, अमरमणी ॥ हरि[22] शोधी त्यासि हे तदुत्तमरमणी[23]. ॥ ४ ॥
लावण्याचे सरिते[24] ॥ मायशोदा हि रोहिणी दूसरि ते ॥
वारूं न शकति कोणी. ॥ चकितमनें त्या उग्याचि बैसति कोणीं[25]. ॥ ५ ॥
निजगुण खरतर[26] वारी[27] ॥ सौंदर्यें कोशगर्त[28] जसी तरवारी. ॥

---

१ द्रव्य. २ राजाला. ३ वृद्धतमीं. ४ निरंतर. ५ शत्रूंनीं. ६ सर्प. ७ न्यायभ्रष्टास. ८ समुद्र. ९ 'दुजा' असाहि पाठ आहे. १० होणारा. ११ भ्यालेला. १२ तुला शरण आलेला. १३ हे भक्तांस सुलभ अशा कल्पतरो! १४ लवकर. १५ पाठविलेली. १६ पुतना. १७ पटकी. १८ सखी १९ रक्ताच्या गोडींत मग्न. २० सुंदर. २१ सुंदर आहे शरीर जीचें. २२ विष्णू. २३ लक्ष्मी. २४ नदीस. २५ कोपऱ्यांत. २६ फार तीक्ष्ण. २७ लपवी. २८ मेनांत झांकलेली. * संतति.

पावे श्रीहरि, पाशीं[1] ॥ बांधुनि नेली मृगी जसी हरिपाशीं[2]. ॥ ६ ॥
भस्मछन्न[3] अनलसा[4] ॥ शिशुतनु पाहे निजात्मघातिं अनलसा[5]. ॥
घे अंकीं[6] कितवमती[7]; ॥ स्तन जीचे गरळ[8] कुंकुमांकित वमती. ॥ ७ ॥
द्याया हा रस मतिनें ॥ गणिला शिशुकाळसर्प[9] हारसम तिनें. ॥
जेणें क्षणहि न तगती ॥ प्राण, विषस्तंन्य[10] तें हि घे विनतगति[11]. ॥ ८ ॥
दे विष यद्यपि याला, ॥ हरि तें मानूनि अमृत द्वंद्य[12] पियाला. ॥
घे गरळाच्या रुचितें; ॥ जननीवेषें सुमंगला[13] चारुचि[14] तें. ॥ ९ ॥
दे जरि उग्र विष महा ॥ सदय मुकुंद स्वयें न होय विषम हा. ॥
वदनीं मारक थानें ॥ धरिलीं श्रुतिगीतपूतसारकथानें[15]. ॥ १० ॥
मुखि धरुनि कुचघट घटा– ॥ त्मजसा[16] तज्जीवनासि सेवि घटघटा; ॥
वरुनीं भू नितळमळ– ॥ प्रकृति[17] करि "पुरे! पुरे!" ह्मणोनि तळमळ. ॥ ११ ॥
करि बहुपरि देवन[18], "हा!" ॥ ह्मणत रडे स्तन्य- तृप्त[19] परि देव न हा. ॥
वर्णें अभ्र मुरडतां ॥ प्रकृतिकडे भासली हि अभ्रमु रडतां. ॥ १२ ॥
जाली ते असुराहितां[20] ॥ बालग्रह कुमति पूतना असु– रहिता[21]. ॥
पसरे वपु[22] सा क्रोशें[23]; ॥ व्रज होय भयें करूनि बहु साक्रोशें[24]. ॥ १३ ॥
पडतां, तीव्र जवासी[25] ॥ वारुनि, रक्षी जगत्पति व्रजवासी[26]. ॥
लोक सकळ कांपविला; ॥ तनु गिरिला लाजवी; प्रभु न कां पविला[27]? ॥ १४ ॥
प्रथम व्रज हा केला ॥ मृतबधिरसमान[28] मारुनी हाकेला. ॥
वर्णुनि काय कराळें[29] ॥ क्रूरेचा त्यजुनि देव काय कराल? ॥ १५ ॥
होउनि सावध जाया ॥ गोपांच्या कृष्णलालसा[30] वध ज्या या ॥
दुष्टेचा सुकर[31] तिच्या ॥ उरिं देखिति त्या निधीसि कौतुकरतिच्या. ॥ १६ ॥

---

१ पाशांत, जाळ्यांत. २ सिंहाजवळ. ३ राखेंत झांकलेला. ४ अग्नीसारिखा. ५ आळस नाहीं अशी. ६ मांडीवर. ७ दुर्मति, दुष्ट बुद्धी आहे जीची. ८ विष. ९ लहान काळा सर्प = डोमाचें पिल. १० विषयुक्त दूध. ११ नम्राची (शरणगतांची) गतिच असा कृष्ण. १२ मधुर. १३ अति स्वच्छास= कृष्णास. १४ सुंदरच. १५ श्रुति–गीत– पूत– सार– कथा= वेदांनीं गायिल्या आहेत पवित्रसार (पवित्र आहे सार ज्यांचें) कथा ज्याच्या अशानें (कृष्णानें). १६ अगस्तीसारिखा. १७ मलीन आहे प्रकृति=स्वभाव जीचा. १८ शोक. १९ दुधानें तृप्त. २० असुरांचें हित करणारी. २१ प्राण रहित. २२ शरीर. २३ कोश. २४ स–आक्रोश. २५ वेगासी. २६ गोकुळांतील लोक. २७ वज्राला. २८ मेलेला आणि बहिरा असा. २९ वि–काळ. ३० कृष्णाविषयीं उत्कंठा आहे ज्यांस. ३१ सोपा.

स्वमनापरिस त्वरती[1] ॥ गोपी सुखमूर्ति[2] काढिती सत्वर ती. ॥
देती तज्जननिकरीं[3]; ॥ जाला आनंद बहुत सज्जननिकरीं[4]. ॥ १७ ॥
जें विघ्नमशकचवरी[5] ॥ फिरविति गोपुछ भगवदाकृतिच[6]–वरी. ॥
सिंपुनि गोमुत्रा त्या ॥ न्हाणिति भवभंजना[7] सुरचमूत्रात्या[8]. ॥ १८ ॥
जो भगवान् कृत्स्नपिता[9], ॥ तत्तनु ते गोरजःसमूहस्नापिती[10]. ॥
गोमय गोधूलीला ॥ धरि; तीची या मनासि शोधूं[11] लीला. ॥ १९ ॥
स्त्री ह्मणति, "सुरक्षण हो[12]," ॥ विसरति ज्यां स्वकवचास न सुरक्षण हो! ॥
ज्यांहीं बहु भव तरले ॥ चरणप्लव[13] ते न जाणती अवतरले. ॥ २० ॥
व्रजदेवीजन्यास[14] ॥ स्वस्ति[15] घडाया अजादिबीजन्यास[16] ॥
अंगीं सविधि करीती; ॥ चित्त हरी गोपयुवतिकौतुकरीती[17]. ॥ २१ ॥
त्या कौतुकजनकवचा[18] ॥ स्त्री गोपांच्या स्वयें महाजनकवचा[19] ॥
तन्नामें जगरां[20] या ॥ लेववितीं, हासविति मनीं जगराया. ॥ २२ ॥
ते गोपीकृतकवचा[21] ॥ स्तन पाजुनि नंदगेहिनी[22] भृतकवचा[23] ॥
निजवी सप्रेम; निजे ॥ ब्रह्मादिक सत्वमूर्ति चिंतिति मनिं जे. ॥ २३ ॥
नंदहि येतां पाहे, ॥ तों मार्गीं तन्मनासि दे तापा हे[24]. ॥
विस्मय होय समस्ता; ॥ ह्मणती, "कसि पावली असीहि समऽस्तां[25]!" ॥ २४ ॥
"शौरि तपस्वी, ज्ञानी, ॥ पूर्वीं आह्मी न जाणिला अज्ञांनीं[26]; ॥
तत्कथितोत्पात[27] खरा ॥ जाला; वसुदेवबुद्धि मोठी प्रखरा[28]." ॥ २५ ॥
भिन्नाकार[29], पर शुनी[30] ॥ कर्में रक्ताशिनी[31]; सुधारें[32] परशुनीं[33] ॥
छेदुनि, अवयव रचिती ॥ बळशाली[34] गोप जाळिती प्रवर[35] चिती. ॥ २६ ॥

---

१ लवकर. २ कृष्ण. ३ यशोदेच्या हातीं. ४ सज्जनांच्या समूहीं. ५ विघ्नरूपी माशा हांकून देण्यासाठीं चवरी. ६ कृष्ण शरीरावर. ७ संसारनाशकास, ८ देवांस तारणाऱ्या. ९ सर्वांचा बाप. १० गोरजः समूहें न्हाणलेली. ११ शुद्ध करूं. १२ होवो. १३ चरणरूपी नौका. १४ यशोदेच्या मुलास. १५ कल्याण. १६ अनादि नामाचा न्यास. १७ गोपींची कौतुकाची रीति. १८ कौतुक उत्पन्न करणारें वचन आहे ज्याचें. १९ महा जनांचें कवच अशा (कृष्णास). २० कवच. २१ गोपींनीं केलें आहे कवच ज्याला. २२ यशोदा. २३ धारिलें आहे कवच ज्याणें अशास. २४ ही=पूतना. २५ सम्–अस्ता= मृत्यूस. २६ अज्ञांनीं= अज्ञान्यांनीं. २७ त्यानें सांगितलेला उत्पात (धोका). २८ तीक्ष्ण. २९ आकार (शरीर) मात्र भिन्न. ३० कुत्री. ३१ रक्त खाणारी. ३२ चांगल्या धारेच्या. ३३ कुऱ्हाडींनीं. ३४ फार बलिष्ट ३५ मोठ्या.

धूमीं सौरभ[1] अगुरु[2]– ॥ स्मयहर; आश्चर्य काय? जो तीर्थगुरु[3], ॥
तो ह्रदयीं बाळकसा ॥ अंतीं होता; न होय अघक्षाळ[4] कसा? ॥ २७ ॥
अतिदुष्टा पूतनिका; ॥ हरिनें दिधला स्वलोक परि पूत[5] निका. ॥
मानियली जननी ती; ॥ प्रभुची गाती ह्मणोनि सज्जन नीति. ॥ २८ ॥
जे बाळकतिलघाणी[6], ॥ तीची जळतांहि कोण घेतिल घाणी? ॥
जो तो सुरभि[7] मधु पसा ॥ घ्राण पसरि, पी, गमेचि गोप मधुपसा[8]. ॥ २९ ॥
ह्मणति, "नसे परिमल या– ॥ सम, यद्यपि चंदनप्रभव[9], परि मलयां[10]; ॥
विस्मित घेउनि वासा ॥ नंदादिक गोप येति आत्मनिवासा[11]. ॥ ३० ॥
येतां वसतिस मस्तीं[12] ॥ नमुनि पतिसि कळविलें स्ववृत्त समस्तीं. ॥
सुतकुशळसमोदमना[13] ॥ विस्मितही परिसतां तिच्या[14] तो दमना. ॥ ३१ ॥
पाहुनि तोक मनीं या ॥ प्रोष्यागत[15] मानि नंद तो कमनीया[16]. ॥
माथा हुंगुनि बाला ॥ आलिंगुनि पुण्य सिंधु फार निवाला. ॥ ३२ ॥

इति षष्ठमोऽध्यायः ॥ ६ ॥

वधुनी बकी[17] कुशीला[18] ॥ प्रथमचि वळला जयीं मुकुंद कुशीला, ॥
जन्मर्क्षयोग[19]हि तदा ॥ ते तिथि झाली व्रजास केवळ हितदा. ॥ १ ॥
उत्सवपरमानसं[20] ती ॥ माता बाहे गृहा सबहुमान सती[21]. ॥
न्हाणी स्वांगजें[22]; रानें ॥ गाजति वाद्यांचिया महा गजरानें. ॥ २ ॥
ज्याची बरवी प्रकृती ॥ मंगळ करिती मुलास वर[23] विप्र कृती[24]. ॥
तो नेत्रांत निजे[25] हा ॥ दावी; जो पूर्वी सुरद्रु[26] निजेहा[27]. ॥ ३ ॥
शकटा[28]खालें काला ॥ बकीचिया मूर्तनिजसुखा लेंकाला. ॥
प्रेंखीं[29] मृदुलास्तरणीं[30] ॥ निजवुनि, माता निघे जनेष्ट[31] वितरणीं[32]. ॥ ४ ॥

---

१ सुवास. २ चंदनाचा गर्व हरण करणारा. ३ तीर्थपिता =हरि. ४ पातकाचा नाश. ५ पवित्र; निका=चांगला. ६ बाळकें हेच कोणी तीळ त्यांचा घाणा अशी. ७ सुवास. ८ भ्रमरा सारिखा. ९ चंदनास उत्पन्न करणाऱ्या. १० "मलय" पर्वतास. ११आपल्या घरीं. १२ मस्तकांनीं १३मुलगा कुशल आहे ह्मणून आनंद आहे मनास ज्याच्या. १४पूतनेच्या. १५ पुनः (मृत्यूपासून) आलेला. १६सुंदरास. १७पूतना. १८ "कु"= दुष्ट,आहे "शील" =स्वभाव जीचा. १९जन्म–ऋक्ष –योग, जन्माचें नक्षत्र आणि योग. २० उत्सवी आहे मानस जीचें. २१ स्त्रिया. २२ निजपुत्र. २३ श्रेष्ठ. २४ चतुर. २५ निजेला. २६ कल्पतरु. २७ निज–इहा, आपली इच्छा. २८ गाड्या खालीं. २९ पाळण्यांत ३० मृदुल –अस्तरणीं ( बिछान्यावर ). ३१ जन – इष्ट. ३२ दानीं.

स्वकरें सांगोपचिती[1] ॥ करि सुखवी विप्र बल्लवी[2] गोपचि ती. ॥
सकळां गौरवि; सरली ॥ न सुहृज्जनमंडळी; न पुत्र विसरली? ॥ ५॥
तों उठला विभु[3]; केला ॥ त्याग निजेचा; प्रसू बलावि भुकेला[4]. ॥
करि बहु रोदन; पर ते ॥ ऐकेना गडबडींत माय; न परते. ॥ ६ ॥
रडतां पदयुगलीला[5] ॥ झाडी तो तीहि दावि संयुगलीला[6].॥
ध्वंसेना शकट कसें ॥ तत्पविचक्रीं[7] रणीं पलाशकटकसें[8]? ॥ ७ ॥
शकटध्वंसें नवल ॥ व्रज करि, कीं ठावुकें शिशूचें न बळ. ॥
बाळक तन्निकटगं[9], ती ॥ कथिती नंदादिकांप्रती प्रगट गती. ॥ ८ ॥
“करचरणाला रडतां ॥ झाडित असतां कुमार बहु आरडतां, ॥
शकटास उघड घडला ॥ पदनखरस्पर्श[10] तोंचि हा घडघडला.” ॥ ९ ॥
वाणी विश्वा साची[11] ॥ त्या बाळांची जसी शुकाव्यासाची; ॥
वाणी[12] विश्वासाची ॥ घोषीं[13]; मायाचि हे रमावांसाची[14]. ॥ १० ॥
जननी धरि तोकास[15] ॥ स्वउरीं; ज्याची मुमुक्षु[16] धरितो कांस. ॥
मुनि, “सर्वस्व उरो,” जें ॥ ह्मणति तयालागिं तोषवी स्वउरोजें[17]! ॥ ११ ॥
स्वस्त्ययनादि[18] करिती ॥ ज्ञाते; सद्विप्र[19] शुद्ध वैदिक रीती. ॥
स्वकुशलसंजनन[20]—मुनी— ॥ प्रति दे व्रजपाळ वस्त्र गो धन नमुनी. ॥ १२ ॥
निजसुखदा या दास ॥ स्वस्तरुसें[21] व्रजपदार[22] दायादास[23] ॥
अंका वरि खेळविती ॥ एकाकाळीं, यदंघ्रि[24] बहु खेळ विती. ॥ १३ ॥
तों सुगुरुवपु[25] त्रास— ॥ प्रद[26] होतां, उतरि भूमिवरि पुत्रास ॥

---

१ सांग—उपचिति, सर्वविध पूजा. २ गोपी. ३ प्रभु=कृष्ण. ४ भूक लागली आहे ज्यास. “बलावी” याचा कर्ता “विभु.” ५ दोन्ही पांयांला. ६ युद्धलीला. ७त्याच्या वज्रानें व चक्रानें. ८ पल—आश—कटक, मांसभक्षकांच्या ( राक्षसांच्या ) सैन्यासारिखें. ९ त्याच्या ( कृष्णाच्या ) जवळहोतीं तीं. १० पांयांच्या नखाचास्पर्श. ११ खरोखर, सत्य. १२ कमताई. १३ गोकुळीं. १४ कृष्णाची. १५ मुलास. १६ मुक्तीची इच्छा करणारा. १७स्तन्य=दूध. १८ स्वस्ति—अयन—आदि=कल्याणाचें प्रकरण इत्यादि. १९ सत्-विप्र. २० आपल्या कुशलाची उत्पत्ति आहे ज्यांपासून. २१ भक्तांच्या कल्पतरूस. २२ यशोदा.( व्रज-प-दार=नंदाचे दार(स्त्री); ‘दार’ हा शब्द पुल्लिंगी असून अनेकवचनी आहे, असें असताहि, अर्थ “ एक स्त्री ” असा होतो. ) २३ मुलास. २४ यत्-अंघ्रि, ज्याचे पाय. २५ बहु जड असें शरीर. २६ त्रास देणारें.

नंदवधू; करि हरिचें[1] ॥ चिंतन भीत्युपशमार्थ[2] भवकरिहरिचें[3]. ॥ १४ ॥
इंदीवर[4]दामनिभें ॥ उपजविलें तनु[5]भरें यशोदामनिं भें[6], ॥
कीं येतां सदराती,[7] ॥ पावेल, विलोकितांचि त्यास, दरीं ती. ॥ १५ ॥
सुचवी गृहकृत्य जिला, ॥ तीणें तेथेंचि तो रमेश त्यजिला. ॥
तों ये ते वाहुटळे, ॥ नयन न झांकी, न हा महाबाहु टळे. ॥ १६ ॥
दैत्य महामायावी ॥ हरिवधकीर्ति स्वकीयधामा[9] यावी, ॥
ह्मणवूनि तृणार्दर्ता[10] ॥ दवसा[11] ये; जय गमे मनिं तृणावर्ता. ॥ १७ ॥
बहु पीडा दे वात्या[12]— ॥ रूपें खळ तो व्रजास; मग देवा त्या ॥
हरूनीं गगनिं पळाला, ॥ जैसा घेऊनि जाय गृध्र पळाला[13]. ॥ १८ ॥
गोपवधू लीना, कीं ॥ भरली नेत्रीं मुखींहि धूळी नाकीं. ॥
त्यांत ह्मणे "वो," वाळू; ॥ या समया प्रळयकाळही वोवाळू. ॥ १९ ॥
होय दिवस रजनि[14]; पट ॥ प्रावृत्त[15] जाल्या दिशा असें रज[16] निपट[17], ॥
न स्मरवि स्ववपुस ती ॥ वेळा; कोणासि कोण बांधव पुसती? ॥ २० ॥
कल्पान्ताचि केवळसा ॥ एक मुहूर्त व्रजांत ठाके वळसा[18]. ॥
जनता[19] स्वस्थितिलो[20], हे ॥ नंदाची परि सुतास न युवति लाहे. ॥ २१ ॥
निजसुतशोकाकुळ[21] ती ॥ नंदवधू बहु रडे, करी काकुळती; ॥
कीं स्थानींच नग[22] वसे, ॥ कृपणा दे ताप; चोरि नीच, न गवसे. ॥ २२ ॥
न पडे जननीस कळ; ॥ व्रजयुवती मिळति नंदसदनीं सकळ. ॥
रडति जशा कुररी[23] ती ॥ वदवेना शोकविषनगांकुर[24]रीती. ॥ २३ ॥
तो केवळ वळसाचीं; ॥ ते झष[25] जीवन[26]विहीन, वळवळ साची. ॥
गोपी बहु तळमळती, ॥ लोळति धूळींत, रम्य कुंतळ[27] मळती. ॥ २४ ॥
क्रमितां गगनपथ, कला ॥ वेगाची क्षीण होय; निष्कृप[28] थकला. ॥

---

१ ईश्वराचें. २ भीति–उप– शम– अर्थ= भयाच्या नाशा साठीं. ३ संसाररूपगजाविषयीं सिंहच अशा (हरीचें). ४ इंदीवराच्या ( कमलाच्या ) माळे सारिखा असा जो कृष्ण त्याणें. ५ शरीराच्या जडत्वानें. ६ भय. ७ सत् अराती, सद्वेष्टा [ तृणावर्त. ]. ८ भयास. ९ आपल्या घरीं. १० गवतावर. ११ पेटलेल्या अग्नीसारिखा. १२ वाहुटळेच्या रूपानें. १३ मांसास. १४ रात्र. १५ वस्त्रानें झांकलेल्या. १६ धुळीचे कण. १७ घण. १८ वावटळेचा "वळसा"= भ्रमण. १९ लोक २० "लाहे" हें क्रियापद अध्याहृत घेतलें पाहिजे. २१ सुत शोकानें व्याकुळ. २२ दागिना. २३ पक्षी विशेष. २४ शोकरूप विषवृक्षाच्या अंकूराची तऱ्हा. २५ मासे. २६ पाण्याशिवाय. २७ केश. २८ निर्दय =तृणावर्त.

नुचले धृतगरिमा[1]; या ॥ मुढाची काय वीर्यसागरिं[2] माया? ॥ २५ ॥
त्या कृतकपटा[3] काया ॥ न वहावे, योजितो अरूप टाकाया; ॥
भुवनपरिवृढ[4] गळाला ॥ धरि, तों सहनयन देह सदृढ गळाला. ॥ २६ ॥
कां करिल असत्य जुनी ॥ निज प्रतिज्ञा प्रभू तयास त्यजुनीं? ॥
आवळिलें खळनरडें; ॥ कीं व्रज पावेल भीति पुष्कळ, "न रडें." ॥ २७ ॥
तो निश्चेष्टवपु[5] रसा[6] ॥ वरि, हरशरदिर्ण[7] वेदशात्रव* पुरसा. ॥
पातकरूपा डिखळा— ॥ परि दैत्यांतर्क[8] शिळातळीं पाडि खळा. ॥ २८ ॥
त्द्दयावरि हरि खचला; ॥ खळनादें धरूनि गोपिका हरिख[9], "चला, ॥
पाहों," ह्मणवुनि जवना[10] ॥ धांवति चिंतीत चित्तमीनानिजवना[11]. ॥ २९ ॥
तों दैत्य कळेवरें[12] तें ॥ पडलें, धरूनि स्वजीवनं[13]कळे वरतें. ॥
पायांचा उर लाहो ॥ घे, म्हणवुनि तोहि कंठही उरला, हो. ॥ ३० ॥
व्रजयुवति सकळ वळल्या, ॥ तदुरीं[14] पाहोनियां हरिस, कळवळल्या. ॥
उचलूनि शवा[15]वरूनी ॥ घेति न योगादिकीं अनिशं[16] वावरुनी. ॥ ३१ ॥
देती त्या जननीलीं[17], ॥ ती घेवुनि पोटिसीं धरी, घननीला. ॥
जगदीशा नंद नमी, ॥ म्हणे "पुनर्जात लाधलों नंदन मीं." ॥ ३२ ॥
इष्ट यजन[18] तप दानें; ॥ भूतदयातोषितें[19] सुरनतपदानें[20] ॥
निज जननिपरिच याला ॥ रक्षियलें, स्मरुनि पूर्वील परिचयाला. ॥ ३३ ॥
"दैत्यशिशू लपवीला ॥ या संरें[21] क्षेपुढें त्रिशूलपवीला ॥
विष्णो, त्वज्जन न भिये ॥ त्वत्पदता सत्य वदति सज्जन नभि ये. ॥ ३४ ॥
जन हिंसापापरता ॥ हिंसक न दुजा तदीय पापापरता. ॥
स्वसमत्वें हानि भला ॥ पावे न कधीं, तसाच शिशु हा निभला[22]." ॥ ३५ ॥
बहुत बृहद्वनवसती[23]— ॥ माजि असीं अद्भुतें जयीं जयिं दिसती, ॥

---

१ धारण केली आहे "गरिमा" =जड-वाई ज्याणें असा ( कृष्ण ). २ बळसागरीं. ३ केलें आहे कपट ज्याणें. ४ भुवनाचा प्रभु. ५ निचेष्ट आहे शरीर ज्याचें. ६ पृथ्वी. ७ सांबाच्या शरानें चूर्ण. ८ दैत्याचा यम ( कृष्ण ). ९ आनंद. १० सत्वर. ११ चित्तरूपी माशाच्या पाण्यास (कृष्णास). १२ दैत्याचें शरीर. १३ कृष्णास. १४ तत्–उरीं, तृणावर्ताचे उरीं. १५ मढ्यावरून. १६ नेहमी. १७ आईला. १८ यज्ञ, कर्म, तप, दान हीं इष्ट=आवडीतील. १९ भूत दयेनें तोषित (तृप्त) अशानें. २० देवांनीं नमिलें आहे पद ज्याचें. २१ संरक्षा= संरक्षण. २२ वांचला. २३ बृहद्वनांत राहत असतां. *वेदशत्रु

मानी वसुदेवाचे ॥ विस्मित होवूनि नंद तो मनिं वाचे. ॥ ३६ ॥
पाजियलें कुरवाळी ॥ एकासमयीं स्वतोक लेंकुरवाळी. ॥
पाहे मु[1]खराजीवा, ॥ ज्याचा दे सुख अनंत मु[2]खेरा जीवा. ॥ ३७ ॥
पी सादर मूल कुच; ॥ प्राशी मुखरु[3]चिस गोपति[4]वधू; लकु[5]चें ॥
अमृतरस; न दे वमनीं ॥ चित्त रसिकपद; रुचे तिस तदेव मनीं. ॥ ३८॥
"वि[6]धु, तुझि हे तुच्छ, विरे ॥ न जड[7], निशाल्पद्रवैक[8]हेतु छ[9]वि रे. ॥
जितुनि तिसहि पळवि रवी; ॥ हरिमु[10]खविधु आजित कठिनत्[11]दृदुपळ विरवी!" ॥
ये जृं[12]भा, मुख वि[13]कसे, ॥ व्रजदेवीपुण्य[14]दृष्टिला सुखवि; के[15]से ॥
तो उत्स[16]वदालोक ॥ प्रति[17]कूल प्रकट होति चवदा लोक. ॥ ४० ॥
झांकि न मग कां पदरीं ॥ प[18]क्ष्मीं नयनें? तनु प्रकटि कांप द[19]रीं. ॥
परि तत्काळ विसरली; ॥ माया स्नेहीं स्मृतीस कालवि; सरली. ॥ ४१ ॥
इतिश्री कृष्णविजये सप्तमोऽध्यायः ७ ॥
वसुदेवोक्तें भर्ग– ॥ [20]प्रतिम, ज्ञानी, विवे[21]के जितषड्वर्ग, ॥
प्रेमभरें, अपवर्ग– ॥ [22]प्रदपद देखावया, व्रजा ये ग[23]र्ग. ॥ १ ॥
विप्रोत्तम हा नंदें ॥ पूजियला सविधि नमुनि सुमे[24]हानंदें ॥
नामक[25]रण त्याकरवीं ॥ पुत्राचें गुप्त उ[26]क्तरीत्या करवी. ॥ २ ॥
भूतभविष्यत्कथन ॥ प्रकट करी; परि न तो रहस्यवि[27]मथन; ॥
जें प्रभुला सम्मत न, ॥ व्यक्त न बोलोनि, तत्व केलें जतन. ॥ ३ ॥
"संकर्षण, राम, बळ, ॥ ज्ये[28]ष्ठाख्या; हा द्विषज्[29]जनविरामबळ. ॥

---

१ मुख कमळास. २ चेहरा. ३ मुख शोभेस. ४ यशोदा. ५ फल विशेष. ६ हे चंद्रा! (हें बोलणें यशोदेचें आहे). ७ दगड. ८ निशा– अल्प– द्रव– एक– हेतु, रात्रीच्या वेळीं मात्र किंचित् द्रव उत्पन्न करणारी. ९ कांति. १० कृष्णमुख रूपी चंद्रमा. ११ कठिन–हृत्–उपल, कठीण अशा अंतःकरणरूपी दगडास. १२ जांभई. १३ शोभे. १४ यशोदेच्या पवित्र दृष्टीस. १५ ब्रह्मदेवासारिखे. १६ उत्सवद– आलोक, आनंद देणारी अशी कांति आहे ज्यांत. १७ भिन्न भिन्न. १८ पात्यांनीं. १९ भयांनीं. २० सांबासारिखा. २१ विवेकानें जिंकिलें आहे काम क्रोधादि साहा वैऱ्याच्या समूहास ज्याणें. २२ मोक्ष देणाऱ्याचें पद (कृष्णाचें). २३ गर्ग ऋषी. २४ मोठ्या आनंदानें. २५ नांव ठेवणें इ०. २६ (शास्त्रांत) सांगितलेल्या रीतीनें. २७ गुह्याचें फोडणें. २८ ज्येष्ठ– आख्या, वडिलांचीं नामें. २९ शत्रूंच्या बळाचा नाश करणारा.

दुसऱ्यास सुखनिधानें[1], ॥ कृष्ण, तथा वासुदेव, हीं अभिधानें[2]. ॥ ४ ॥
शुचिगुणकृत्यनुरूपें[3] ॥ तव पुत्राचीं अनंत नामें; रूपें ॥
मज इतरांसहि अकळें[4]. ॥ हा सुत देयिल तुह्मासि कुशळें सकळें. ॥ ५ ॥
हा, साधुजनें त्रास ॥ त्यजिला, जोडुनि; तुझ्याहि निज नेत्रास ॥
निववील; तोका मखरा[5] ॥ श्रीच्या[6] जप; हो[7] अभीष्ट[8] तो काम खरा. ॥ ६ ॥
सुत नारायणसम हा, ॥ श्रीकीर्त्यनुभावसद्गुणा[9] वास महा. ॥
हे भाग्यखनि, जतन या ॥ नंदा! जीवापरीस करिं निज तनया." ॥ ७ ॥
भावुकहेतु[10] कवि खरी ॥ वाणी बोले असी सकौतुक; विखरी[11] ॥
आशीर्वचनेंसुमनें ॥ जातां सापत्यगोपतीवरि[12] सुमनें[13]. ॥ ८ ॥
लागति रांगायाला, ॥ करिति चरित्रें कवीश्वरां गायाला, ॥
ते दोघे भाउ; रति[14] ॥ व्रजनयनां देति नान्यशोभा[15] उरति. ॥ ९ ॥
करिति उदार कलीला[16] ॥ नाशाया प्रेक्षणीय[17] दारक[18] लीला. ॥
हरिति मदभ्रम हेला[19] — ॥ मात्रें; सुख पावती अदभ्र[20] महेला[21]. ॥ १० ॥
हळुहळु रांगति; लाजे ॥ श्री मनिं; देते मुनीश्वरां गतिला जे, ॥
ते सदुदारें[22] करीती ॥ लीला गोष्ठांत[23] गोपदारकरीती[24]. ॥ ११ ॥
लघु, मंजुलसीं जितकीं ॥ लेवविलीं भूषणें मधुर सिंजित[25] कीं: ॥
ऐकुनि कुतुक मनीं या ॥ जननीच्या, देति करुनि गति कमनीया[26]. ॥ १२ ॥
गमन त्रिचतुरपद[27], कीं ॥ भूषवितो भूमि नवरि सुचतुर पदकीं. ॥
लघु गति करित मुरडणे[28] ॥ जननिकडे जनभयें सुचकित मुरडणे. ॥ १३ ॥
तनु भरिती जंबाळें[29]; ॥ गळां बळें घालिती मिठी जैं बाळें, ॥
दाटे पान्हा थानीं; ॥ सेवावा आग्रहें जगन्नाथांनीं. ॥ १४ ॥

---

१ सुखसंग्रह. २ नांवें. ३ शुचि—गुण—कृति- अनुरूपें, शुद्ध गुण व कृति या अन्वयें. ४ अपूर्व. ५ रमणस्थानास. ६ लक्ष्मीच्या. ७ होवो. ८ इच्छित. ९ श्री= (लक्ष्मी), कीर्ति, अनुभाव (प्रभाव), सद्गुण, यांस मोठें स्थान. १० कल्याण आहे हेतु जिजमध्यें. ११ पसरी. १२ स—अपत्य. गोपति, मुलासहित नंदावर. १३ प्रसन्न मनानें. १४ प्रीति. १५ न-अन्य- शोभा. १६ कलियुगास= कलिमहात्मास. १७ पाहण्यास योग्य. १८ मुलगे. १९ लागलाच. २० फार. २१ स्त्रिया. २२ सत्— उदार. २३ गोठ्यांत. २४ गौळ्यांच्या मुलांसारिखे. २५ नादयुक्त. २६ सुंदर. २७ तीन किंवा चार पावलें. २८ (अंग) पिळवटणें. २९ चिखलानें.

घेउनियां उत्संगीं[*] ॥ स्तन पाजी सांवरूनि या हृत्संगीं; ॥
मंदस्मितरदनश्री- ॥ वदन विलोकील तीहि सुखसदनश्री. ॥ १५ ॥
हर्षविति जननि, करीं ॥ अवलंबुनि[1] वत्सपुच्छ[2] ते जननिकरीं[3]. ॥
चालति, बहु खेळ, गडी ॥ गोपांचे, दाविती; असे खेळगडी. ॥ १६ ॥
माता देखतिच पळ, ॥ व्यग्रत्वें[4] पळति केलिपर[5] अति चपळ. ॥
निजगृह, सुतरक्षण, हीं ॥ न शकति दोन्ही; न दोंत इतर क्षण ही. ॥ १७ ॥
मन बहुधा लेंकांहीं ॥ जननीचें सुखाविलें; न धालें कांहीं? ॥
बहु आवडि रुचि राहे; ॥ अमृतीं लाधे तयांहुनी रुचिरा[6] हे. ॥ १८ ॥
हरिलीला आबाळ[7] ॥ व्रज पाहे नित्यकृत्यही, आबाळ[8]. ॥
संस्कारें करि कामें ॥ तनु; कृष्णीं मन सुखी विशोक रिकामें. ॥ १९ ॥
हरिलीलारसिक थवे ॥ गोपींचे; प्रेमरीति मज कशि कथवे? ॥
न पळ भजे मन शयन; ॥ प्रीतिपुरःसर अगार[9] जेमन[10] शय[11] न. ॥ २० ॥
गीतें[12] ये मृग वळणी, ॥ लीलेनें मोहिल्या तशाचि गवळणी. ॥
प्रथम समान सत्यांचें ॥ नकळत हरिलेंचि सरस मानस त्यांचें. ॥ २१ ॥
जो त्रिभुवनराजपती ॥ ब्रह्मेशानादि[13] ज्या सुरवरा[14] जपती, ॥
गोपकिशोरसखा[15] तो ॥ होउनि, चोरूनि कृष्ण गोरस खातो ! ॥ २२ ॥
चोरुनि गोरस खातो, ॥ परि दे गोपींस तोष थोर सखा तो. ॥
गोपवधूजननिकडे ॥ गाऱ्हाणे येति घेउनी जन निकडे[16]. ॥ २३ ॥
गाऱ्हाणीहि परि सती[17], ॥ कोप करीना तऱ्ही सुताउपरि सती. ॥
अविनय[18] अनय[19] न वाटे; ॥ ये स्मित वदनीं; दयामृत नयनवाटे. ॥ २४ ॥
विश्वोदर[20] तो भाट- ॥ श्रुति[21], केला गोपवाळकीं बोभाट; ॥
हा मृदशन[22] करितो कीं; ॥ हें परिसुनि, कोप माय ते करि तोकीं. ॥ २५ ॥
मन शीतळ मउ गारे- ॥ परि; हरिवरि कर न कोपपरम उगारे. ॥
न सजो खोडि कराया ॥ पुनरपि, ह्मणवुनि दटावि खोडिकरा या. ॥ २६ ॥

---

१ धरून. २ वासराचें शेपूट. ३ जनसमूहांत. ४ चपलत्वें. ५ क्रीडापर. ६ मधुर. ७ बाळांपासून (वृद्धांपर्यंत). ८ विपत्ति. ९ घर. १० जेवण. ११ हात. १२ गायनानें. १३ ब्रह्मेशअनादि. १४ देवश्रेष्ठास. १५ गवळ्यांच्या मुलांचा सखा. १६ निकडीनें. १७ ऐकितें. १८ द्वांडगेपणा. १९ अपराध. २० विश्व आहे उदर ज्याचें. २१ वेद आहेत स्तुतिपाठक ज्याचे. २२ मृत्— अशन, मृत्तिकाभक्षण. * मांडीवर.

दुसऱ्यास सुखनिधानें,[1] ॥ कृष्ण, तथा वासुदेव, हीं अभिधानें.[2] ॥ ४ ॥
शुचिगुणकृत्यनुरूपें[3] ॥ तव पुत्राचीं अनंत नामें; रूपें ॥
मज इतरांसहि अकळें.[4] ॥ हा सुत देयिल तुह्मासि कुशळें सकळें. ॥ ५ ॥
हा, साधुजनें त्रास ॥ त्याजिला, जोडुनि; तुझ्याहि निज नेत्रास ॥
निववील; तोका मखरों[5] ॥ श्रीच्या[6] जप; हो[7] अभीष्ट[8] तो काम खरा. ॥ ६ ॥
सुत नारायणसम हा, ॥ श्रीकीर्त्यनुभावसद्गुणा वास महा.[9] ॥
हे भाग्यखनि, जतन या ॥ नंदा! जीवापरीस कारिं निज तनया." ॥ ७ ॥
भावुकहेतुं[10] कवि खरी ॥ वाणी बोले असी सकौतुक; विखरी[11] ॥
आशीर्वचनेंसुमनें ॥ जातां सापत्यगो[12]पतीवरि सुमनें.[13] ॥ ८ ॥
लागति रांगायाला, ॥ करिति चरित्रें कवीश्वरां गायाला, ॥
ते दोघे भाउ; रति[14] ॥ व्रजनयनां देति नान्यशोभा[15] उरति. ॥ ९ ॥
करिति उदार कलीला[16] ॥ नाशाया प्रेक्षणीय[17] दारक[18] लीला. ॥
हरिति मदभ्रम हेला[19] — ॥ मात्रें; सुख पावती अदभ्र[20] महेला[21]. ॥ १० ॥
हळुहळु रांगति; लाजे ॥ श्री मनिं; देते मुनीश्वरां गतिला जे, ॥
ते सदुदारें[22] करीती ॥ लीला गोष्ठांत[23] गोपदारकरीती.[24] ॥ ११ ॥
लघु, मंजुलसीं जितकीं ॥ लेवविलीं भूषणें मधुर सिंजितें[25] कीं: ॥
ऐकुनि कुतुक मनीं या ॥ जननीच्या, देति करुनि गति कमनीया[26]. ॥ १२ ॥
गमन त्रिचतुरपद,[27] कीं ॥ भूषवितो भूमि नवरि सुचतुर पदकीं. ॥
लघु गति करित मुरडणे[28] ॥ जननिकडे जनभयें सुचकित मुरडणे. ॥ १३ ॥
तनु भरिती जंबाळें[29]; ॥ गळां बळें घालिती मिठी जैं बाळें, ॥
दाटे पान्हा थानीं; ॥ सेवावा आग्रहें जगन्नाथांनीं. ॥ १४ ॥

---

१ सुखसंग्रह. २ नांवें. ३ शुचि—गुण—कृति- अनुरूपें, शुद्ध गुण व कृति या अन्वयें. ४ अपूर्व. ५ रमणस्थानास. ६ लक्ष्मीच्या. ७ होवो. ८ इच्छित. ९ श्री= (लक्ष्मी), कीर्ति, अनुभाव (प्रभाव), सद्गुण, यांस मोठें स्थान. १० कल्याण आहे हेतु जिजमध्यें. ११ पसरी. १२ स—अपत्य. गोपति, मुलासहित नंदावर. १३ प्रसन्न मनानें. १४ प्रीति. १५ न-अन्य- शोभा. १६ कलियुगास= कलिमहात्मास. १७ पाहण्यास योग्य. १८ मुलगे. १९ लागलाच. २० फार. २१ स्त्रिया. २२ सत्— उदार. २३ गोठ्यांत. २४ गौळ्यांच्या मुलांसारिखे. २५ नादयुक्त. २६ सुंदर. २७ तीन किंवा चार पावलें. २८ (अंग) पिळवटणें. २९ चिखलानें.

घेउनियां उत्संगीं* ॥ स्तन पाजी सांवळ्लानि या त्द्वत्संगीं; ॥
मंदस्मितरदनश्री- ॥ वदन विलोकील तीहि सुखसदनश्री. ॥ १५ ॥
हर्षविति जननि, करीं ॥ अवलंबुनि[1] वत्सपुच्छ[2] ते जननिकरीं.[3] ॥
चालति, बहु खेळ, गडी ॥ गोपांचे, दाविती; असे खेळगडी. ॥ १६ ॥
माता देखतिच पळ, ॥ व्यग्रत्वें[4] पळति केलिपर[5] अति चपळ. ॥
निजगृह, सुतरक्षण, हीं ॥ न शकति दोन्ही; न दोंत इतर क्षण हीं. ॥ १७ ॥
मन बहुधा लेंकांहीं ॥ जननीचें सुखाविलें; न धालें कांहीं? ॥
बहु आवडि रुचि राहे; ॥ अमृतीं लाधे तयांहुनी रुचिरा[6] हे. ॥ १८ ॥
हरिलीला आवाळ ॥ व्रज पाहे नित्यकृत्यही, आबाळ[7]. ॥
संस्कारें करि कामें ॥ तनु; कृष्णीं मन सुखी विशोक रिकामें. ॥ १९ ॥
हरिलीलारसिक थवे ॥ गोपींचे; प्रेमरीति मज कशि कथवे? ॥
न पळ भजे मन शयन; ॥ प्रीतिपुरःसर अगार[9] जेमन[10] शये[11] न. ॥ २० ॥
गीतें[12] ये मृग वळणी, ॥ लीलेनें मोहिल्या तशाचि गवळणी. ॥
प्रथम समान सत्यांचें ॥ नकळत हरिलेंचि सरस मानस त्यांचें. ॥ २१ ॥
जो त्रिभुवनराजपती ॥ ब्रह्मेशानादि[13] ज्या सुरवरा[14] जपती, ॥
गोपकिशोरसखा[15] तो ॥ होउनि, चोरूनि कृष्ण गोरस खातो ! ॥ २२ ॥
चोरुनि गोरस खातो, ॥ परि दे गोपींस तोष थोर सखा तो. ॥
गोपवधूजननिकडे ॥ गाऱ्हांणे येति घेउनी जन निकडे[16]. ॥ २३ ॥
गाऱ्हाणीहि परि सती[17], ॥ कोप करीना तऱ्ही सुताउपरि सती. ॥
अविनय[18] अनयें[19] न वाटे; ॥ ये स्मित वदनीं; दयामृत नयनवाटे. ॥ २४ ॥
विश्वोदर[20] तो भाट- ॥ श्रुति[21], केला गोपवाळकीं बोभाट; ॥
हा मृदशन[22] करितो कीं; ॥ हें परिसुनि, कोप माय ते करि तोकीं. ॥ २५ ॥
मन शीतळ मउ गारे- ॥ परि; हरिवरि कर न कोपपरम उगारे. ॥
न सजो खोडि कराया ॥ पुनरपि, ह्मणवुनि दटावि खोडिकरा या. ॥ २६ ॥

---

१ धरून. २ वासराचें शेपूट. ३ जनसमूहांत. ४ चपलत्वें. ५ क्रीडापर. ६ मधुर. ७ बाळांपासून (वृद्धांपर्यंत). ८ विपत्ति. ९ घर. १० जेवण. ११ हात. १२ गायनानें. १३ ब्रह्मेशानादि. १४ देवश्रेष्ठास. १५ गवळ्यांच्या मुलांचा सखा. १६ निकडीनें. १७ ऐकिते. १८ द्वाडपणा. १९ अपराध. २० विश्व आहे उदर ज्याचें. २१ वेद आहेत स्तुतिपाठक ज्याचे. २२ मृत्— अशन, मृत्तिकाभक्षण. * मांडीवर.

फार यशोदा दापी[1]; ॥ "पयें[2] नलगे," जरि ह्मणे, शिशो, दादा पी;" ॥
"रुते साय नखांसी;" ॥ "भरविलिया मानुनी रसायन खासी ?" ॥ २७ ॥
सुखकर कर धरुनि करें ॥ हरिवरि वरिवरि बरीच कोपे निकरें[3]. ॥
ओढी राम कड, कडे ॥ दयाब्धिच्या उतरली अशीच कडकडे. ॥ २८ ॥
गोपीमुख शीतकर[4] ॥ क्षणमात्रें भासला मना तापकर[5]. ॥
हरिनयनाब्जें[6] कुमुदें ॥ विपरीतचि कोपभीतियोगें समुदें[7]. ॥ २९ ॥
चित्तीं बहु धाक मनें ॥ श्रीच्या धरिलाचि, काय बहुधा कर्मनें[9] ! ॥
माय ह्मणे, "कातरते ॥ दाविसि; माती निशेविली[10] कां तर ते? ॥ ३० ॥
तूं अरवाळ[11] कसा रे ? ॥ राम भला; आणिखीहि बाळक सारे. ॥
मन धाके, वळपृथुकीं[12] ॥ कथिलें; होईल उदर केवळ पृथु[13] कीं." ॥ ३१ ॥
कृष्ण ह्मणे, "जननि, वळ- ॥ प्रमुखांचे[14] बोल अनृतभाजनें[15] निवळ. ॥
सारे वाचाळ टिका ॥ लाविति या दोषसंभवाचा लटिका. ॥ ३२ ॥
म्या केलें न मृद्दन[16]; ॥ स्वांतीं[17] गणिशील वचन सत्यास्पद न. ॥
साच ह्मणुनि तव लोक- ॥ प्रोक्तीं[18] विश्वास, तरि वदन अवलोक." ॥ ३३ ॥
माय वदे, "बा, पाहूं;" ॥ लागे विधिच्या[19] ह्मणावया बापा "हूं!" ॥
ब्रह्मांडें सुखवासी ॥ ज्यामाजि, प्रभु अनंत तो मुख वासी[20]. ॥ ३४ ॥
त्या सुकृतें[21] नदिस लेंकीं ॥ विश्व, मुखीं, अर्पितां नयन, दिसलें कीं. ॥
करि तो प्रभु, "आ," ज्याला ॥ श्रुति विश्व ह्मणे शिवाचिया आज्याला. ॥ ३५ ॥
ब्रह्मांडाच्या रचने ॥ पाहे; तों ते[22] मनासि साचारच ने. ॥
गेलींच अनादि सलें[23]; ॥ व्रज आपण सुतहि दिव्यनयना दिसलें. ॥ ३६ ॥
विश्वात्मा अटकळला[24], ॥ चित्तांतुचि पुत्र तेथ जगपट कळला. ॥
पाहुनि सुखमुख वळली; ॥ तों माया वैष्णवी क्षणांत कवळली. ॥ ३७ ॥
श्रुतिशास्त्रें परें[25] महिमा ॥ गाती यत्कीर्ति, ताप हरि, परम हिमा[26] ॥
ज्यास्तव वनीं जतन यति ॥ योग करिति, मानि त्यासहि निज तनय ती! ॥ ३८ ॥

---

१ दटावी. २ दूध. ३ कडाक्यानें. ४ चंद्र. ५ सूर्य. ६ कृष्णाचे डोळे हींच कमळें. ७ सर्व. ८ सुंदरें. ९ भित्रेपणास. १० भक्षिली. ११ अचाट. १२ बळराम व मुलगे. यांहीं. १३ मोठें. १४ बलरामादिकांचे. १५ असत्यपात्र. १६ मृत्- अदन, मृत्तिकाभक्षण १७ मनांत. १८ लोकांनीं सांगितलेल्यांत. १९ ब्रह्मदेवाच्या. २० पसरी. २१ पुण्यनदीस= यशोदेस. २२ रचना. २३ महद्दुःखें. २४ समजला. २५ श्रेष्ठ. २६ शीतल.

द्रोणा[1]भिद वसु[2] देव ॥ ब्रह्मवरें नंद पावला वसुदेव ॥
जनक; न हरिलीला जे ॥ पावे जिस मुक्ति तीहि वरिली लाजे. ॥ ३९ ॥

इति श्रीमत्कृष्णविजयेऽष्टमोध्यायः ॥ ८ ॥

नंदवधू लोकार्या, ॥ दासीजन सर्व गुंतला गृहकार्या, ॥
यास्तव दधिमथन सती ॥ करि आपण एकदा विमळगुण[3]वसती. ॥ १ ॥
सुवसन[4] रुचिरें[5] मणी या ॥ सुभगेवरि[6]; सहज देहरुचि[7] रमणीया; ॥
तेजें अगदी शाला[8] ॥ भरली; नादें हि गाय जगदीशाला[9]. ॥ २ ॥
न गणी श्रम हो दधिला ॥ मथितां, कीं गाय सद्गुणमहोदधिला[10]. ॥
सुतचरितीं बहुत रती[11] ॥ ज्याच्या लेशें भवासि जन बहु तरती. ॥ ३ ॥
आपण रविगुण[12] ओढी, ॥ त्हदया संसारतिमिररविगुणओढी[13]. ॥
गाय मुखें हरिलीला, ॥ तीणें न रुचाति दुजीं सुखें हरिलीला. ॥ ४ ॥
सुतमूर्ति त्हदयसदनीं[14], ॥ नयनीं प्रेमाश्रु, घर्मकणें[15] गुण वदनीं. ॥
पान्हा थानीं, गानीं[16] ॥ रुचि, दधिमथनीं गृहीं प्रकाश नगांनीं[17]. ॥ ५ ॥
तो येवूनि रवीला ॥ धरि, सूज्ञीं सर्व अर्थ ज्या निरवीला. ॥
तृप्त उदार कथांनीं ॥ ज्याच्या जन, तो सतृष्ण दारक[18] थांनीं! ॥ ६ ॥
घे उत्संगावरि[19] ती, ॥ हरविधि[20] यच्चरणधूलीसंगा वरिती. ॥
पी स्नेहस्तन्यांसी[21], ॥ नमिति जया जोडुनि स्वहस्त न्यासी[22]. ॥ ७ ॥
तृप्त न होतां पानें[23] ॥ सुत टाकी, पय[24] उते अहो तापानें[25]. ॥
म्हणवुनि जाय लवकरी; ॥ परम सुखामाजि विघ्न अर्थलेव[26] करी! ॥ ८ ॥
तुच्छार्थपरागमनीं[27] ॥ स्वत्यागें धरि रमेश बहु राग मनीं. ॥
दधिपात्र शिलापुत्रें[28] ॥ फोडी. करिजेल काय तशिला पुत्रें? ॥ ९ ॥

---

१ द्रोण या नावांचा. २ देवांची एक जात. ३ निर्मळ गुणांचें स्थान. ४ उत्तम वस्त्र. ५ सुंदर. ६ सौभाग्यवतीवर. ७ शरीराची शोभा. ८ गृह. ९ कृष्णाला. १० सद्गुणसमुद्रास. ११ प्रीति. १२ रवीची दोरी. १३ संसाररूपी अंधाराविषयीं सूर्याचा गुण आहे ज्याच्या ठिकाणीं त्याची ओढी (=आकर्षण.) १४ त्हदयस्थानीं. १५ घामाचे बिंदु. १६ गायनीं. १७ अलंकारांनीं. १८ मुलगा. १९ कडेवर. २० शिव आणि ब्रह्मा. २१ स्नेहयुक्त दुधास. २२ न्यास करणारे= सन्यासी इत्यादि. २३ पिण्यानें. २४ दूध. २५ फार विस्तव जहाल्यानें. २६ किंचित्- अर्थ. २७ तुच्छ- अर्थपर- आगमनीं, किंचित् फायद्यासाठीं गेल्यावरून. २८ दगडानें.

कोप करी [1]सुरमणि, कीं ॥ तृप्ति न होतां त्यजी धरेवरि; मणिकीं ॥
ह्मणवुनि हा [2]उपळाला ॥ घालुनि [3]सदनांत रामभाउ पळाला. ॥१०॥
जाउनि [4]भवनीं तातें ॥ विधिच्या [5]भक्षूनियां हि नवनीतातें, ॥
वांटियलें [6]प्लवंगांतें; ॥ चरित मना! भवपयोनिधिप्लव गा तें. ॥ ११ ॥
माय न धरि [7]आँग मनीं, ॥ पाहे दधिपात्रभंग जर्हि आगमनीं; ॥
परम सरूप, डेरा हे ॥ देखुनि, हांसे; सुखांतांचि पडे, [8]राहे. ॥ १२ ॥
देखे जरि खापरिया ॥ डेऱ्याच्या, पावलीच हरिखीं, परि यां ॥
स्वसुता खोडिकराला ॥ पाहे, [9]सद्वृंदें ज्यासि जोडि कराला. ॥ १३ ॥
शोधी जों [10]सुतपा हे ॥ सदनांत, [11]उलूखलांघ्रिवरि सुत पाहे. ॥
गेली देखायासी, ॥ तों गोरस मर्कटांसि दे खायासी. ॥ १४ ॥
" धरिन, " म्हणे सहसा, धी ॥ ज्या नवळें करुनि तपहि दुःसह साधी; ॥
देव हठा केवि वळे ॥ [12]प्रणतिविणें? [13]श्रमसमूह ठाके विवळे. ॥ १५ ॥
मागुनि मंदगति [14]शयें ॥ [15]यष्टि धरुनि ये विलोकितीच अतिशयें. ॥
दृष्टि करुनि विभु [16]तरला, ॥ उखळापासूनि चौर्यभीत उतरला. ॥ १६ ॥
कृष्ण पळे, तों पाठी ॥ माता धांवे, धरूनि हातीं काठी. ॥
[17]मंथरगति परि गांठी; ॥ होतें तीच्यांचि पुण्य पुष्कळ गांठी. ॥ १७ ॥
प्रेमें मति [18]विनटावी ॥ ज्याच्या चरणीं, तयासि माय दटावी! ॥
ज्यासि यमादिक भीती, ॥ माते पासूनि तो धरि प्रभु भीति! ॥ १८ ॥
पावे सुततनु कंपा; ॥ वारी गोपीस तत्क्षणीं [19]अनुकंपा. ॥
पुत्र न हो[20] बहु कष्टी, ॥ म्हणवुनियां टाकिली करींची यष्टी. ॥ १९ ॥
जीव म्हणाति, "वा धांवें," ॥ त्यासि म्हणे ते, "उलूखलीं बांधावें". ॥
बहुवश दासां; गावें ॥ हरिचरित, प्रेमळां सदा सांगावें. ॥ २० ॥
मुनि नमिति सदा मानें, ॥ उखळीं बांधी जगत्पतिस [21]दामानें. ॥

---

१ देवश्रेष्ठ. २ दगडास. ३. घरांत. ४ ब्रह्मदेवाच्या. ५ वानरांस. ६ भव-पयस्-निधि- प्लवग, संसाररूपी सागरामधील नौका. ७ अपराध. ८ आनंदास. ९ सत्-वृंद, साधुसमूह. १० सु- तपस्, चांगलें आहे तप जीचें. ११ उलूखल- अंघ्रि, उखळाच्या मुळावर. १२ नमनाशिवाय. १३ श्रम- समूह= फारच श्रम जहाले आहेत जीस. १४ हातानें. १५ काठी. १६ चपल. १७ मंदगति. १८ नम्र व्हावी. १९ दया. २० होवो. २१ दाव्यानें.

परि तें न पुरे दावें. ॥ अनंतरूपीं विचित्र काय वदावें.? ॥ २१ ॥
दुसरें गोवी दामीं; ॥ " बांधेन, " म्हणे वळेंचि गोविंदा मी. ॥
तेंही जालें ऊन[1] ॥ द्व्यंगुल[2], मग तीसरेंहि ये घेऊन. ॥ २२ ॥
तिसरें प्रथमाचिपरी ॥ स्पष्ट दिसे द्व्यंगुलोन[3]; नुमजेचि परी. ॥
देखुनि हांसति गोपी, ॥ माया दिसतांहि तत्व तें संगोपी[4]. ॥ २३ ॥
करितां आग्रह, ठकवी, ॥ निष्फळाचि करी तिचा समग्र हठ, कवी[5]; ॥
कीं "वळ दावीं सारी ॥ मज;" तो पहिल्यासमान दावीं सारी. ॥ २४ ॥
निजसूनुस[6] भागे या ॥ गृहदामीं बांधितां सुरसभागेया[7]. ॥
चरिता दावुनि, दामीं ॥ गुंते; कीं " भक्त्यधीन[8] मात्र सदा मी." ॥ २५ ॥
दामें त्या बांधावें ॥ यमपाशेंही न यत्नतां[9] बाधावें. ॥
प्रभु निजतंत्र[10], परि ॥ हरी भक्ताधीन; स्वगौरवासि[11] परिहरी[12]. ॥ २६ ॥
पुत्र स्वात्मा जाया ॥ चतुरास्य[13] महेश[14] दुग्धसागरजा[15] या ॥
गोपीला लज्जित, कीं ॥ त्यांला गमलीं उणीं स्वभाग्यें जितकीं. ॥ २७ ॥
क्षीरधिचा जामाता ॥ बांधुनि गुंते; स्वगेहकाजा[16] माता, ॥
असतां वत्सचि उखळीं ॥ यमलार्जुन[17] अंतरीं रिघोनी उखळी. ॥ २८ ॥
नारद शापें नगते[18] ॥ शत वर्षें पावले धनदसुत[19]; मग ते ॥
पाठविले अलकेला[20] ॥ सदनुग्रह[21] दिव्यविग्रहासह[22] केला. ॥ २९ ॥

इति कृष्णविजयेनवमोध्यायः ॥ ९ ॥

नगपतनरव[23] नितांत[24] ॥ व्याकुळ करि तो व्रजस्थ नरवनितांत[25]. ॥
क्षितिसहि[26] कांपवि; पोता[27] ॥ गोपांचा मानि तेधवां पविपाता[28]. ॥ १ ॥
यमलार्जुनतरु पडले, ॥ पाहुनि म्हणती, "कसे नगेंद्र[29] उपडले?" ॥
गोप सनंद[30] भ्रमती ॥ जवळि पतनहेतु नेणती दभ्रमती[31] ॥ २ ॥

---

१ उणें. २ द्वि- अंगुल, दोन आंगळें. ३ द्वि—अंगुल—ऊन, दोन बोटें उणें. ४ गुप्त ठेवी ५ चतुर (कृष्ण). ६ सुतास, पुत्रास. ७ देवांच्या सभेनें गाण्यास योग्य अशा ("निजसूनुस"). ८ भक्ति- अधीन, भक्ताच्या स्वाधीन. ९ यत्-नतां, ज्याच्या भक्तांस. १० स्वतंत्र. ११ आपल्या गुरुत्वास= जडपणास. १२ हरण करी, आवरी. १३ ब्रह्मदेव. १४ शिव. १५ लक्ष्मी. १६ घरांतील कामास. १७ यमल, अर्जुन= वृक्षविशेष. १८ सर्पपणास. १९ कुबेरपुत्र. २० अलकापुरीस. २१ सत्- अनुग्रह= सत्कृपा. २२ देवांच्या सारिखा देह अशासह. २३ वृक्षपतनाचा नाद. २४ अत्यंत. २५ स्त्रीपुरुषांत. २६ पृथ्वीस. २७ स्वामी. २८ वज्रपतनास. २९ वृक्षेंद्र. ३० नंदासहित. ३१ अल्पमती.

तों शिशु वदति शयातें[१] ॥ दावुनि, पाहोनि भीति तदतिशयातें[२]; ॥
“न पहा कां पतनाचा ॥ हेतु, खरा कृष्ण, काय कांपत नाचा? ॥ ३ ॥
शिरला या दोंमाजी, ॥ उखळ अडकलें निबद्ध जें हो माजीं[३]. ॥
ओढी तोंचि निखळले ॥ मूलासह वृक्ष हे, क्षणांत उखळले. ॥ ४ ॥
दिव्य पुरुष तव दोनी ॥ यांतूनि प्रकटलेहि मुदित[४]; वदोनी ॥
यासीं वंदुनि वडिला- ॥ परि गेले;” हा मुलीं उदंत[५] निवडिला. ॥ ५ ॥
तार्किक जन तो, “लटिके ॥ बाळ,” म्हणे; तन्मनीं कसा बोल टिके? ॥
संदिग्ध कितिक यास ॥ त्याजिति, न घेति न करीतिहि किति कयास[६]. ॥ ६ ॥
करुनि भजन कवि ॥ मुक्त प्राज्य[७] जयाचें, तयास जनक विमुक्त ॥
क्षिप्र[८] करी; हरितात[९] ॥ प्रमाण, कीं विश्वबंध कर हरितात[१०]. ॥ ७ ॥
नयना काना चावि[११] ती ॥ बहु; गावविताहि गोपिका नाचविती. ॥
बहुमत आज्ञा पितया ॥ विधिच्या जे, स्त्री-जसेंचि आज्ञापि तया. ॥ ८ ॥
गोपींची प्रेमलता[१२] ॥ फळली कैवल्य; धन्य ती प्रेमलता. ॥
तें वस्तु महा गायी ॥ गोपीला सुलभ फुकट, न महागायी. ॥ ९ ॥
व्रज*वीथी सुरसरिते ॥ हासति; सत्यादिलोक जन्हि सुरस, रिते; ॥
श्रीशंभुललामहित[१३] ॥ प्रभु जेथें प्रेमळासि भुलला महित[१४]! ॥ १० ॥
कृष्ण बृहद्वनवासी, ॥ चरितांसी वाढतां सदैव नवासी, ॥
वल्लवां[१५] लोकांसि, कवी ॥ उपनंद स्थविर[१६], बुद्धि ऐसी सिकवीः— ॥ ११ ॥
“येथें शिशुनाशक[१७] ते ॥ जाले उत्पात सर्व निधना[१८] शकते; ॥
केलें दीनसंमवन[१९], ॥ श्रीशें भय भंगुनि स्वलोकसम[२०] वन. ॥ १२ ॥
न दिसे जों नयनाशी ॥ उत्पात दुजा, न आमुचा नय[२१] नाशी, ॥
वृंदावन आटोपा[२२]; ॥ दुष्ट भयें पावतें स्वमन आटोपा[२३].” ॥ १३ ॥
या बोधीं आवडिला ॥ धरुनी, नंदादि मानिती त्या वडिला. ॥
श्रीवृंदावन- वसती ॥ केली; होती करीत भूमि नवस ती! ॥ १४ ॥

---

१ हातास. २ तत्- अतिशयानें. ३ कंबरेंत. ४ आनंदित. ५ वृत्तांत. ६ श्रम. ७ पुष्कळ. ८ लवकर. ९ हरीचा बाप. १० हरण करितात. ११ तेज. १२ प्रेमरूप वल्ली. १३ सांबाच्या तिलकास हित. १४ पूज्य. १५ गौळ्यांस. १६ वृद्ध. १७ बाळघातक. १८ मरणास. १९ दीनांचें उत्तम रक्षण. २० वैकुंठासारिखें; (“स्वलोकसम वन केलें” इत्यर्थः) २१ न्याय, नीति, यश. २२ व्यापा; त्यांत जाऊन रहा. २३ क्षोभा. * गोकुळांतील गल्ल्या.

तेथें चित्त मग वसे ॥ बळकृष्णाचें; प्रमोदें[1] उत्तम गैवसे[2]. ॥
खेळति नानारीती; ॥ देखति लीला समुन्मना[3] नारी ती. ॥ १५ ॥
चारी तोकांसहित ॥ प्रभु वत्सें, यत्पद त्रिलोकांस हित; ॥
करि ती शुद्ध वसुमती[4], ॥ चुंबी चरणांबुजीं[5] सुहृद्धव[6] सुमती. ॥ १६ ॥
देखुनि सर्वमुनिधना[7], ॥ वत्साकृति[8] धरुनि, तेथ ये रिपु, निधना[9]. ॥
तें हरि बंधुस कळवी, ॥ माया यदनुग्रहेंचि[10] विश्व सकळ वी. ॥ १७ ॥
त्यांस[11] किती पाठ कला? ॥ सावध असतांहि गोपरूपा ठकला. ॥
मग करिल कसें? पडिला ॥ प्रभुहस्तीं; धरि पदासहित सेपडिला. ॥ १८ ॥
फिरवि तया आनिधनें[12]; ॥ स्वतनुवरुनि उतरि निजाहिता ज्ञानिधनें[13]. ॥
कंसहितकृदनुगारी[14] ॥ व्यसुसे[15] कपित्थीं[16] फळार्थ अजितें[17] झुगारी. ॥ १९ ॥
असुर कपित्थांसहित ॥ व्यसु वसुधेवरि[18] गळे पळें कंसहित; ॥
दैत्यजिघांसुमनातें[19] ॥ हर्षवि; सुर वर्षती तदा सुमनांतें. ॥ २० ॥
विश्वेप[20] वत्सप गवळी ॥ जाला हो! वासुरें रमारंग वळी! ॥
चारी गवता रानीं, ॥ तारी लोकांसि जो सदवतारांनीं[21]. ॥ २१
उदकप्रांता[22] नेलीं ॥ बळकृष्णीं[23] वासुरें उनीं तानेलीं[24], ॥
इतरांही गोपांनीं; ॥ कीं वत्सांमाजि तृप्ति जागो पानीं[25]. ॥ २२ ॥
पाजुनियां वत्स, पसे ॥ भरुनि पिती पय[26] परप्रभू[27] वत्सपसे[28]; ॥
तों नामें बक, साच ॥ त्रिदशारी[29], तेथ देखिला बकसांच[30]. ॥ २३॥
न गमे बाळांशि खरा, ॥ मानिं मानिति वज्रकृत[31] पर्वतशिखरा. ॥
तो झडपि समग्रांसी; ॥ कृष्णा, अहिलों[32] खगेश्वरसम[33], ग्रासी. ॥ २४ ॥

---

१ आनंद. २ सांपडे. ३ चलितचेतसा= आनंदित आहेत मनें ज्यांचीं. ४ भूमि. ५ चरण-कमलांनीं. ६ प्रसन्न नवरा. ७ सर्व मुनींच्या धनास= कृष्णास. ८ वासराचें रूप. ९ मरणास= मारावें ह्मणून; किंवा, मरावें ह्मणून. १० ज्याच्या कृपेनें. ११ रिपु. १२ मरे-पर्यंत. १३ ज्ञानी- धन, ज्ञानी जनांचें धन, कृष्ण. १४ कंस- हितकृत्- अनुग- अरि, कंसाचें हित करणाऱ्या चाकराचा शत्रु. १५ वि-असु, प्राणरहित. १६ वृक्षविशेष. १७ कृष्ण. १८ जमिनीवर. १९ दैत्यघातकाच्या (=कृष्णाच्या) मनातें. २० विश्वाचा स्वामी. २१ सत्-अवतारांनीं. २२ उदकस्थळीं. २३ बळराम व कृष्ण यांहीं. २४ ताहानेलेलीं. २५ पिण्यांनीं. २६ पाणी. २७ श्रेष्ठ प्रभु. २८ वासरें पाळणाऱ्या (गोपा) सारिखे. २९ देवशत्रु. ३० बक पक्ष्यासारिखा. ३१ वज्रानें फोडलेल्या पर्वताचें शिखर. ३२ सर्पास. ३३ गरुडासारिखा.

मूर्ति गळां ते [1]जाची, ॥ जे खनि अनलादि[2]काखिलातेजाची. ॥
गिळितां वळ [3]भाउ जळे ॥ कंठीं, तों तत्क्षणीं प्रवळ [4]भा उजळे. ॥ २५ ॥
शीघ्र वकी[5]भाउ, गळीं ॥ जाळी म्हणवूनि, पद्म[6]नाभा उगळी. ॥
ये हनना तुंडानें; ॥ धरिला चंचूसि शूर[7]नातुंडानें. ॥ २६ ॥
वत्सप अद्भुत करणी ॥ पाहति ती सहज मारितां ह[8]र्तक रणीं. ॥
चिरि हरि जेवि ल[9]व्हा ॥ या; काम सफळ साधुजनमनांतिल व्हाया. ॥ २७ ॥
करिती देव स्तुतिला, ॥ वंदुनि जीला श्रुती वदे वस्तु तिला. ॥
मूर्ति मन नयन मोही; ॥ स्तव करि वळ मानसीं सविनय, " नमो ," ही. ॥ २८ ॥
स्फुरणें आलीं गाया, ॥ गुण-मित्रें कडकडोनि आलिंगाया ॥
रामादि; कळेवर तें ॥ चाले कीं याचि जी[10]वनंकळेवरतें. ॥ २९ ॥
जाति, नमुनि पद, काया ॥ वोवाळुनि वरुनि साधुल्ह[11]त्पदका या, ॥
गातचि सुर निजलोकां; ॥ चित्तीं कीं म्हणाति, "आजवरि निजलों कां ?" ॥ ३० ॥
निजजीवन दासां जे ॥ हरिलीला, कथिति ते [12]जननदा सांजे. ॥
"पावविला [13]परें मसणा," ॥ म्हणति, " व्रजही [14]महेश्वरें परम सणा." ॥ ३१ ॥
" न भुकेजा गा; तानें, ॥ हरुनि भवा, हरियश व्रजा गातां नें. ॥
करितां उच्चाराशी ॥ वाढति हर्षाचियाचि उच्चा राशी. ॥ ३२ ॥
याचे घात कितेकीं ॥ केले, मेले परंतु घातकि ते कीं. ॥
जोडुनि पापा, मरते ॥ जाले त्यजुनि त्रपा रुपा [15]पामर ते. ॥ ३३ ॥
[16]प्रतिहतिस द्वि[17]जवाचा ॥ न पवे, जैसा विरोध [18]सद्वि[19]जवाचा. ॥
गर्ग [20]मनुष्यतनु [21]भवें ॥ स्पष्टचि; आला तदु[22]क्तिचा सद[23]नुभव." ॥ ३४ ॥
नंदादिक कृष्ण मुखें ॥ गाती, जाती स्वयें भयें [24]कृष्णमुखें. ॥
हरिलीलाभि[25]नव- सुधा ॥ पीती; त्यांला न विष्णुलोक न व[26]सुधा. ॥ ३५ ॥

---

१ जाच करी. २ अनल (अग्नि) इत्यादिकांच्या सारिख्या अखिल तेजाची. ३ कृष्ण. ४ प्रभा, कांति. ५ बकासुर. ६ कृष्णास. ७ कृष्णानें. शूर=कृष्णाचा आजा; "शूराच्या धरिलि चंचु नातुंडानें," असाहि दुसरा एक पाठ आहे. ८ घातक. ९ तृणविशेष. १० जीव चालविणारी कळा कृष्ण त्यावर. ११ साधूंच्या ह्रदयांवरील पदकास. १२ जनन= (जन्म) देणारास=नंदास. १३ शत्रु. १४ कृष्णानें. १५ मूर्ख. १६ हननास. १७ ब्राह्मणाचें वचन. १८ सत्-वी, सु पक्षी= गरुड. १९ वेगाचा. २० मनुष्याचें शरीर आहे ज्यास. २१ सांब. २२ तत्-उक्तीचा. २३ सत्-अनुभव. २४ काळतोंडीं. २५ हरीची लीला हीच कोणी एक अभिनव= ( नूतन ) सुधा (= अमृत). २६ त्याला वसुधा विष्णु लोक नाहीं असें नाहीं= त्यांला वसुधा विष्णु लोक होय.

इति कृष्णविजये दशमोध्याय:

हरि शिशु शृंगारांनीं ॥ भूषिततनु[1], वाजवूनि शृंगा, रानीं ॥
जाया, चरित निज सुरीं ॥ गाया, मित्रें खुणावि सर्व निजसुरीं[2]. ॥ १ ॥
करिती अर्भक[3] लीला, ॥ ज्या गातां हरिति पापगर्भकलीला[4]. ॥
शुक गातो रसिकांनीं ॥ सेवाया योग्य सुरस तो रसिं कानीं. ॥ २ ॥
करुनि तप रमा नंदा- ॥ सम न सुखी; हाचि पात्र परमानंदा. ॥
नाथ सुरांचा करितो, ॥ चारुनि रानांत वासुरां, चाकरि तो! ॥ ३ ॥
नंद पिताचि; परि जनीं ॥ गोपांचें भाग्य हें न विष्णुपरिजनीं[5]; ॥
कीं करितो रवि हरण ॥ प्रणततमाचें[6], तयासवेंचि विहरण[7]. ॥ ४ ॥
तों आला अजगरसा ॥ रूपानें असुर, कीं करिल अजग[8] रसा[9]. ॥
अघ[10] अघभाजन[11], "घास[12] ॥ ज्वलना मज," हा म्हणे, "तसा जन घास." ॥५॥
धरुनि क्षोभा, उसणें ॥ घ्याया, तर्पावया बकी भाउ सणें, ॥
पसरी अघ, सारा हे ॥ गिळितां व्यापुनि नभासहि[13], घसा, राहे. ॥ ६ ॥
त्या हरिदासां परवा ॥ काय? न जाणोनि, जाणुनी साप, रवा[14] ॥
करुनीं, शिरति परगडी[15]; ॥ हरि न शिरे तों रदीं[16], न निष्कृप[17] रगडी. ॥ ७ ॥
जाणे अज गरजावें ॥ जों कीं," न पुढें, विशाळ अजगर ! जावें," ॥
तों शिरलें जग, राया, ॥ त्यालें जें विश्वरक्षका जगरा या. ॥ ८ ॥
स्मरतां अज[18], गरल[19] टिकें ॥ काळव्याळीं[20] न; तेथ अजगर लटिके. ॥
संकल्प अनिश[21] माया- ॥ वळें धरुनि ये पतंग दहनीं[22] शमाया[23]. ॥ ९ ॥
करुणेचा उदरांशी[24] ॥ स्वमनिं म्हणे," अजगराचिया उदराशी[25] ॥
वश जाले दास गडी; ॥ जाळिल कीं या पतंग वृंदा[26] सगडी. ॥ १० ॥
वत्स किशोर, तदशन[27] ॥ क्रूरें केलेंचि, उग्रमुख शितदशन[28]; ॥
हे[29] जशि पर्वत शिखरें ॥ अग्रें दिसती विशाळ सर्व तशि, खरें. ॥ ११ ॥

---

१ भूषित आहे तनु ज्याची. २ आपल्या सुरानें. ३ मुलें. ४ पापाचा गर्भ आहे ज्यांत अशा कलीला. ५ विष्णुसेवकीं. ६ भक्तांच्या अज्ञानरूपी अंधाराचें. ७ केली= क्रीडा. ८ निर्मनुष्य ९ पृथ्वी. १० अघासुर. ११ पापपात्र. १२ गवत. १३ आकाशास. १४ नादास. १५ कृष्णगडी. १६ दांतीं. १७ निर्दय. १८ चंदना=कृष्णा. १९ विष. २० काळसर्पी. २१ नेहमी. २२ अग्नीवर. २३ मराया, शांत व्हाया. २४ सागर. २५ पोटास. २६ पतंग समूहास. २७ तत्- अशन, त्यांचें जेवण. २८ तीक्ष्ण आहेत दांत ज्याचे. २९ दांत.

मराठी ग्रंथ ...

माझ्या हे मज नामीं ॥ गातीं; या माय बाप हेम[1] जना मी. ॥
'त्यजुं, निज जीवा, तूतें ॥ परि,' म्हणति, 'न पळभरि स्वजीवातूतें[2],' ॥ १२ ॥
माराया अहि तातें ॥ विधिच्या मनिं युक्ति धरिलि जे अहितातें; ॥
हरिमय हा भुजग तिला ॥ नेणे, कीं न फिरवी महाभुज[3] गतिला. ॥ १३ ॥
जाय तशा दरदांत[4] ॥ द्विषदास्यांताचि[5] सुरक्तशादरदांत[6]. ॥
असुरघनीं रवि लपला ॥ देखुनि सुरगण उदश्रुनीर[7] विलपला[8]. ॥ १४ ॥
कोंडे वायु; गळाला ॥ हरि; धरि झष गुंतला गतायु[9] गळाला. ॥
करि बहु तळमळ; काय ॥ प्रयत्न? कांपवि धरित्रितळ[10] मळकाय[11]. ॥ १५ ॥
दाटे बहु वायु गळां, ॥ रोधी, तों पतन जाहलें दृग्युगळा[12]. ॥
भक्ताच्या अज[13] गरजे ॥ गुंते, दे मुक्ति, लाधला अजगर जे. ॥ १६ ॥
मेले पशु गोप वन- ॥ ज्वलनीं[14] मृगसे क्षणांत; मग तो पवन ॥
राहेल कसा उगला? ॥ व्याळगळां[15] काळकाळबाळक[16] फुगला. ॥ १७ ॥
भ्याला कीं हरिस रणीं ॥ भेदुनियां ब्रम्हरंध्र तो करि सरणी; ॥
जाला ही असुराहित ॥ त्रिदशमुनिजनेष्ट[17] पावला असुर हित. ॥ १८ ॥
मारुनि असुर, हितातें ॥ करि, उठवी दृष्टिनेंचि असुरहितातें[18]; ॥
त्या सकळां सह, साची ॥ करुनि कृपा, घे मुखांतुनी सहसाची[19]. ॥ १९ ॥
अहिच्या जें तेज निघे ॥ देहांतुनि शुद्धसत्वमय तें जनिं घे ॥
मोक्षदपद[20] सुखसदन ॥ त्रिभुवनतापोपशांतिकर[21] शशिवदनें[22]. ॥ २० ॥
स्तुति करिती सुर; सकळा ॥ अर्पिति ते गायनादिका सुरस कळा; ॥
बहु मीनलें[23] नभवाद्यें, ॥ भरिति रवें[24] हें सनाथ नलिनभवाद्यें[25]. ॥ २१ ॥
तो बकसोदर[26] तरला ॥ जीणें, ते हरिदया नसो दर तरला[27]. ॥

---

१ सुवर्ण. २ आपली सजीव करणारी वल्ली. ३ कृष्ण. ४ भयंकरांत. ५ द्विषत्-आस्यांत, शत्रूच्या तोंडांत. ६ फार तांबडे व हिरवे असे दांत आहेत ज्यांस अशा ("द्विषदास्यांतचि"). ७ उत- अश्रु- नीर, आसवें गाळणारा. ८ रडला, आक्रंदला. ९ आयुष्यहीन. १० पृथ्वीचा तळ. ११ मलीन आहे काय ( =शरीर ) ज्याचा. १२ दृक्- युगळा, दोनी नेत्रांस. १३ कृष्ण. १४ दावाग्नींत. १५ सर्पाच्या गळ्यांत. १६ काळाचाहि काळ असें बाळक. १७ देव आणि मुनी यांनां इष्ट= कृष्ण. १८ मेलेल्यांस. १९ एकाएकीं. २० मोक्ष देणारे आहेत पद ज्याचे. २१ त्रिभुवनाच्या तापाची उपशांति करणारा. २२ शशि ( =चंद्र ) सारिखें आहे तोंड ज्याचें. २३ एकत्र जहाली. २४ गोंगाटानें. २५ नलिन-भव- आद्य, कमलोद्भवाच्या ( ब्रह्मदेवाच्या ) आद्यानें= कृष्णानें. २६ बकासुराचा बंधु. २७ कांपणारी.

पशुपशुपावन[1] चारू[2] ॥ स्वयश करू वत्स विश्व[3]पावन चारू. ॥ २२ ॥
तरले पतित रजाचे ॥ रतिनें[4], पद पूत[5] सदय अतितर जाचे, ॥
धरूनि कृपा, वनचरसा ॥ हिंडे; केली समस्त पावनच रसा[6].॥ २३ ॥
बम्हभवेनभगा[7] जे ॥ गाती, तद्वाक्यसद्रवें[8] नभ गाजे. ॥
माधवमधु पिकला हो; ॥ महिमामाकंद[9], मोद कविपिक लाहो. ॥ २४ ॥
दाऊं महिमा नेला ॥ वाद्यरवांहीं; सुरोत्तमाहि मानेला ॥
लववी, विस्मित जनिं त्या ॥ चरितें होवूनि दूरुनी निज जनित्यां[10]. ॥ २५ ॥
भजदघपरिहार[11] पती ॥ श्रीचा करि; भये[12] उदग्र परि हारपती. ॥
सिंह कसा कलभांहीं[13] ॥ जिंकावा? प्रलयवन्हि[14] वा शलभांहीं[15]? ॥ २६ ॥
वृंदाविपिनीं[16] सुकलें ॥ जें अजगरचर्म, जीवनातें मुकलें, ॥
क्रीडोचित[17] गह्वरसें[18]; ॥ खेळति गोपाळ हरिपदप्रह्वरसें[19]. ॥ २७ ॥
अघ मारुनि वांचवि या ॥ पशुपशुपां कृष्ण वत्सरीं पांचविया; ॥
कथिती हायन[20] सावा, ॥ तैं व्रजिं कीं अहि, जनांत हाय[21] नसावा. ॥ २८ ॥
“निर्दयमानस; हाय! ॥ व्याळ न तो; काळ तत्समान सहाय[22]; ॥
न तया गिरि पृथु[23] कवळ;” प्रकट करिति नंदसूनुचें[24] पृथुक[25] बळ ॥ २९ ॥
अर्थ न वत्सर हा या ॥ विदित जना, नित्य बाळ वत्स रहाया ॥
येती परि; बोभाट ॥ व्रजिं नाहीं ते अघारिचे[26] तों भाट[27]. ॥ ३० ॥
हा संशयपरिहार ॥ प्रकटीं*, प्रेमाश्रुबिंदुचे परि हार; ॥
तेंचि बेरं वद, नामीं ॥ करिं हरिच्या रंग, विनवितों वदना! मी. ॥ ३१ ॥

इतिश्री कृष्णविजये एकादशोध्यायः ॥ १२ ॥

केली भजदरिरक्षा[28]; ॥ कासारोला[29], करूनियां बरि रक्षा[30], ॥

---

१ पशु व गोप यांचें संरक्षण= कृष्ण. २ सुंदर. ३ विश्वाची मुक्ति= कृष्ण. ४ प्रीतीनें. ५ पवित्र. ६ पृथ्वी. ७ ब्रह्म– भव– ईन– भग, ब्रह्मा व शिव यांच्या स्वामीच्या ( कृष्णाच्या ) भाग्यास. ८ तत्– वाक्य– सत्– रवें. ९ महिमारूपी आंबा. १० कृष्णा. ११ भजत्– अघ– परिहार, भक्तांच्या पातकाचा नाश. १२ “भव” असाहि पाठ आहे. १३ छाव्यांनीं. १४ प्रलय कालचा अग्नि. १५ टोळांनीं. १६ वृंदावनीं. १७ क्रीडा उचित. १८ गुहेसारिखें. १९ हरिपदीं नम्र. २० वर्ष. २१ शोकदर्शक. २२ बरोबरीचा. २३ मोठा. २४ कृष्णाचें. २५ सुलें. २६ कृष्णाचे. २७ स्तुतिपाठक. २८ भजत्-अरि- रक्षा, भक्तांच्या शत्रूची राख (अघासुराची). २९ सरोवराला. ३० संरक्षण. * प्रकट करितों.

ने वत्सप वत्स, लता[1] ॥ देवांची, जे शरीरिणी वत्सलता. ॥ १ ॥
कृष्ण म्हणे, "जळ पाजा ॥ आपुलिया वासुरांचिया कळपा, जा; ॥
चरतिल कोमल यवसा[2], ॥ हें स्थान ह्मणे, 'स्मरों नको मलय, वसा.' ॥ २ ॥
रमलें माजें मन, या ॥ पुलिनीं वैसों सुखें करूं जेमन[3], या. ॥
मृदु सिकतेवरि[4] केली[5] ॥ मांडूं," आज्ञा असी तयां वरि केली. ॥ ३ ॥
पाहुनियां पुलिनें[6] गणीं ॥ बाळांच्या सुख; तृषाहि आपुलि न गणी; ॥
पाजुनि जळ नव, यवसीं ॥ सोडिति, जीं वासुरें प्रियें अवयवसीं[7]. ॥ ४ ॥
सोडुनियां दधिभक्त[8]- ॥ प्रभृति[9] सदनें दयासुखोदधिभक्त[10] ॥
जेविति त्या पुलिनींच; ॥ त्रिदशां[11] वाटे सुधाहि आपुली नीच. ॥ ५ ॥
मध्यें अहिपतिशयनें[12] ॥ बसतां, तीं लेंकुरें सुविकसितनयनें[13] ॥
हर्षप्रहसितवदनें[14] ॥ बसति, जसीं पद्मकर्णिकेचीं[15] छदनें[16]. ॥ ६ ॥
त्यांच्या सरसा लीला; ॥ किति करिती पात्र पत्रकरसालीला[17], ॥
किति जेविति वरदगडी[18] ॥ कुसुमफळीं[19] शिक्थपल्लवांकुरदगडीं[20]. ॥ ७ ॥
कृष्णसखे रुचिरमती[21], ॥ दाविति अन्योन्यभोज्यगत[22] रुचि; रमती. ॥
सेचिति[23] अन्नरस हित ॥ प्रिय हासति हासविति सुरेश्वरसहित[24]. ॥ ८ ॥
देखति ते सुर लीला, ॥ खोवी उदरांबरामधें[25] मुरलीला. ॥
डाव्या तो काखेला ॥ धरि शृंग सवेत्र[26], दावि तोकां खेला. ॥ ९ ॥
वामीं[27] विधिजनक[28] बळ- ॥ भ्राता[29] घे करिं दधिप्लुतोदनकवळ[30]. ॥
ठाव लवणशाकेला[31] ॥ अंगुलिसंधी[32] करांतचि तशा केला. ॥ १० ॥
श्रुतिशास्त्रनयज्ञाचा[33] ॥ गुरु, भोक्ता मुख्य साधुजनयज्ञाचा, ॥

---

१ देवांची वल्ली= कल्पवल्ली. शरीरिणी वत्सलता,= साकार वत्सलता = कृष्ण. २ गवतास. ३ जेवण. ४ वाळूवर. ५ क्रीडा. ६ वाळवंट. ७ अवयवांसारिखीं. ८ दह्यानें युक्त असा भात. ९ इत्यादि. १० दया—सुख—उदधि—भक्त=कृष्णाचे भक्त. ११ देवां. १२ शेषशायीनें= कृष्णानें. १३ प्रकाशवंत आहेत नयनें ज्यांचीं. १४ हर्षानें हास्ययुक्त आहेत वदनें ज्याचीं. १५ कमलांतील बर्तुळाचीं. १६ पत्रें, पाखळ्या. १७ पानें, हात, साली, यांस. १८ कृष्णसखे. १९ फुलें, व फळें. यांवर. २० शिक्थ (=मधाची पोळी), पल्लव- अंकूर- दगड यांवर. २१ उत्तम आहे मति ज्यांची. २२ एकमेकाच्या अन्नांत असलेली. २३ सिंपिती. २४ कृष्ण. २५ उदर- अंबर (वस्त्र)= पोटावरचें वस्त्र. २६ काठी सहित. २७ डाव्या (हातीं). २८ ब्रह्मपिता. २९ बळरामाचा बंधु. ३० दधि- प्लुत- ओदन- कवळ, दह्यानें भिजलेल्या भाताचा घांस. ३१ लोणच्याला. ३२ दोन बोटांमधील जागा. ३३ वेद, शास्त्र, आणि न्याय, हीं जाणणारा.

जेवी; शिशु हासवितो, ॥ जो ब्रंम्हांडाच्चिया समूहास वितो! ॥ ११ ॥
त्या बाळचरित्रास ॥ प्रेक्षुनि[1], सुर तोष धरिति, तदरि[2] त्रास; ॥
गाति; वनेचर[3]विभवां ॥ लाभ, न हा शक्रमुनिविरिंचिरविभवां[4]. ॥ १२ ॥
जेविति शिशु हरिसहित ॥ स्वादु[5] शिळें अन्नही सुधेपरिस हित. ॥
धरुनी तृणलोभ वनीं ॥ पशु शिरति, भयेंहि वत्सपमनोभवनीं[6]. ॥ १३ ॥
गोप ससाध्वस[7], खाया ॥ विसरति; जाणे भया असाध्वसखा[8] या. ॥
सांगे कीं, "सह[9] सारे ॥ वैसा, मी वत्स आणितों सहसा[10] रे." ॥ १४ ॥
त्या गोपकिशोरांशी ॥ अभय असें दे दयाबळयशोराशी[11]. ॥
ध्यावा जो धीरांनीं, ॥ सकवळकर[12] तो स्ववत्स शोधी रानीं. ॥ १५ ॥
महिमांतरदोहद[13] या ॥ विधिला; कीं वत्सगोपसंदोह[14], दया ॥
करुनी, वांचविला जे ॥ अघहरलीला[15], तिला सुधाचवि लाजे. ॥ १६ ॥
व्रजगोरसचोर हरी[16] ॥ जनक; सुत विधिहि[17] वत्स सकिशोर[18] हरी. ॥
या पहिल्या चालीला ॥ चालवि. संसार हरि भल्याचा लीला. ॥ १७ ॥
वत्स वनांत न दिसती, ॥ मागें मुरडे दयासुधाबुंनदिसती[19]. ॥
शिशुवृंदहि[20] विधि हरि; तें ॥ दिसलें ज्ञानाचिया महानिधि हरितें. ॥ १८ ॥
योजी साक्षी[21], प्रमद ॥ स्वसुता; जेणें शमेलहि क्षिप्र मद; ॥
शोकेंही न करपती ॥ गो गोपी, करि असें सुरप्रकरपती[22]. ॥ १९ ॥
स्वपदींचि, विभु, लवाया ॥ विधिला आश्चर्य दाखवुनि भुलवाया, ॥
भगवान् स्वप्रद[23] विष्णु ॥ क्षणमात्रें सर्व जाहला प्रभविष्णु[24]. ॥ २० ॥
आपण वत्स पहा, कीं, ॥ आपण होऊनि त्यांसि वत्सप[25] हाकी. ॥
वर्णिल कोण शहाणा? ॥ आपण काठी करीं पदीं हि वहाणा! ॥ २१ ॥

---

१ पाहून. २ तत्- अरि, हेवांचे शत्रु= दैत्य (त्रास= भय धरिती). ३ वन्य मनुष्यास झालेले= गोप. ४ इंद्र, मुनि, ब्रह्मा, सूर्य, आणि शिव यांस. ५ गोड. ६ गोपांच्या मनोरूपी घरीं. ७ सभय. ८ असाधु- असखा, दुर्जनाचा शत्रु= कृष्ण. ९ एकत्र. १० लागलाच. ११ दया, बळ आणि यश यांचा राशी= कृष्ण. १२ घास आहे हातीं ज्याच्या. १३ महिमा-अंतर- दोहद, महिम्याच्या अंतराविषयीं डोहळा. १४ वासरें व गोप याचा समूह. १५ पातकाचा नाश करणारी लीला. १६ कृष्ण. १७ ब्रह्मा. १८ मुलांसकट. १९ दयारूपी उदकनदीरूप कृष्ण. २० मुलांचा समूह. २१ [सर्व] साक्षी= कृष्ण. २२ देवसमूहपति=कृष्ण. २३ स्वतंत्रतेजस्वी. २४ वाढणारा= बहुरूपी. २५ गोप.

सारी पहिलीच परी [1]; ॥ ईश्वर न करील काय? हें मात्र परी ॥
वारूं न शके तो, कीं ॥ जननीची स्नेहवृद्धि मोह न तो [2]कीं. ॥ २२ ॥
जाय रमावर सांजे; ॥ व्रज भावी, भेट ते शतावरसां जे. ॥
तोष न तो कां माता-॥ मानिं? जरि भेटाति जुन्याचि तोकां माता. ॥ २३ ॥
गो गोपी गोप रमा- ॥ वरगुरु सम; सिद्धि काय सांगो परमा? ॥
आला वत्सर हाता, ॥ जाला होऊनि गोप वत्स रहाता! ॥ २४ ॥

इति श्रीकृष्णविजयये द्वादशोध्यायः ॥ १२ ॥

हें जाल्यावर, साच्या ॥ न्यून निशा[4] असति पांच सा वरसांच्या. ॥
वत्स सबळ बाळक[*] हा ॥ चारि व्रजानिकट[5], सर्वखळपाळकहा[6]. ॥ १ ॥
तेव्हां धेनु चरती, ॥ गोवर्धनपर्वतावरी संचरती; ॥
तेथुनि दृष्टिस त्यांच्या ॥ वत्स दिसति, सुकृत बहु अदृष्टि सत्यांच्या. ॥२॥
चावूं विसरति घांसा[7], ॥ चाविलियाही गळां न उतरति घांसा; ॥
हंबरती, दयमाना ॥ पाहति वत्सांसि ऊचलुनि वर माना. ॥ ३ ॥
एकिपुढें एकि, कडे ॥ लंघिति, धांवति, करूनि भय एकिकडे; ॥
पाहुनि, आटोपाया ॥ गोप न जाले समर्थ, आटोपा[8] या. ॥ ४ ॥
वत्सांच्या मनिं ओढा[9], ॥ न दिसे दृष्टीस दगड, तरु वनिं ओढा; ॥
गोवर्धनगिरिमधुनीं ॥ जाती सुखसिंधुलागिं त्या प्रेमधुनी[10]. ॥ ५ ॥
आल्या कळपापासीं, ॥ क्षय ज्याच्या पदरजें सकळ पापासीं. ॥
बहु वत्सावर माया ॥ करिती, त्या दुग्धसिंधुचा वरमाया[11]. ॥ ६ ॥
हंबरती प्रेमानें, ॥ चाटिति वत्सांसि, पाजिती बहुमानें, ॥
वत्सवती; परि माया ॥ बहु त्या प्रेमा, नसे जनीं उपमा या. ॥ ७ ॥
न तिळमृदू राग मनीं, ॥ गोप तिहीं श्रमविले विदूरागमनीं[12]. ॥
लेश नुरे, परि तो या ॥ प्रेमानें वर्षती सुतो[13]परि तोया[14]. ॥ ८ ॥
प्रेमभरें वाहूनी, ॥ ऊचलुनी धरिति पोटशीं[15] बाहूंनीं. ॥
हुंगिति बाळकटाळू; ॥ म्हणती, "त्वदरिष्ट[16] विश्वपाळक टाळू." ॥ ९ ॥

१ तऱ्हा. २ पूर्वीपेक्षां आतां आपआपल्या बाळकांवर स्नेह वृद्धि व मोह हीं आयांच्या ठायीं ज्यास्त जहालीं हें मात्र तो वारूं न शके इत्यर्थः. ३ कृष्ण. ४ रात्रि. ५ गोकुळाजवळ. ६ सर्व खळपाळकांचें हनन करणारा= कृष्ण. ७ गवतास. ८ आवेशास. ९ ओढ. १० प्रेमाच्या नद्या. ११ विहिणी. १२ दूर येऊन. १३ बाळकांवर. १४ पाण्यास. १५ पोटाशीं. १६ त्वत्- अरिष्ट.

* बलराम व बालकें यांसहित.

करिती माये तात; ॥ प्रेक्षाया वदनचंद्रमा येतात; ॥
जाउनि दूर, मुरडती; ॥ न शकाति पुत्रांविण क्षण क*मूं, रडती. ॥ १० ॥
हे आधीं रामा या ॥ कळली नाहींच वर्ष[1] वीरा माया. ॥
प्रेमा लक्षि प्रबळ ॥ व्रजतोकीं निज मनांतिल क्षिप्र बळ[2]. ॥ ११ ॥
"जो प्रेमा जातो कीं ॥ हरिविण कोठें, न तोहि माजा तोकीं;" ॥
"न दुजी रामा यावी ॥ माया, मायेश[3] हा खरा मायावी;" ॥ १२ ॥
चिंतुनि हें राम घडी- ॥ भरि, ह्रदयीं ज्ञानदृष्टिला मग उघडी. ॥
पाहे पशु पशुप रमा- ॥ पति; पावे प्रीति तेधवां बळ परमा. ॥ १३ ॥
पुसतां, हरि, हेतूतें ॥ कथि, "लीला जाहली विदित हे तूतें." ॥
हा अभिनव देवाचा ॥ प्रश्नोत्तरवाद एक न वदे वाचा. ॥ १४ ॥
वर्षें स्व[4]त्रुटिकाळें ॥ आला [5]विधि नेउनी सवत्सें बाळें. ॥
पहिल्यापरि विभुला या ॥ देखुनि, तत्काळ लागलाचि भुलाया. ॥ १५ ॥
द्रुहिण[6] म्हणे मनिं, "हरिला ॥ नकळत पशुतोकसंघ[7] म्यां वनिं हरिला. ॥
माया जानिं जे माजी, ॥ त्या तल्पीं[8] असति सर्वहि निजेमाजी. ॥ १६ ॥
उरउनि अमृततनु[9], रवी ॥ एकहि भगणांतरीं[10] प्रकाशित नुरवी; ॥
त्यापरि वर्जुनि हरिला, ॥ म्यां शिशुपशुगण, विमोह सर्जुनि[11], हरिला. ॥ १७ ॥
येथें हा तो[12] कांहीं ॥ अर्थ नसे; वेष्टिलाचि हो[13] तोकांहीं. ॥
करितो रानीं केली,[14] ॥ पहिली जसि गोपवासुरांनीं केली." ॥ १८ ॥
नेणोनि, असा ध्याया ॥ बैसे; परि गति कळेचि न असाध्या या. ॥
जाला शोध न; वेधा ॥ लागे मन; पावलाचि बोध न वेधा[15]. ॥ १९ ॥
दिसती हीं सत्य जुनी, ॥ कीं नव? न कळेचि हें, भ्रमास त्यजुनी. ॥
[16]कुतुकें अन्यायाला ॥ करुनि, भुले; गति सुचे न अन्या याला. ॥ २० ॥
करि निगम, "नमो;" हा ॥ या परि मायेश्वर तदीय मन मोहाया, ॥
माया दावि; भुले कीं ॥ स्वकृतें; निर्दय कदा न हो[17] विभु लेकीं. ॥ २१ ॥
श्रेष्ठीं जो कां मा[18]ये ॥ योजी, तो दोष त्याचिया कामा ये. ॥

---

१ एक वर्ष पर्यंत. २ बलराम. ३ माया-ईश. ४ आपल्या त्रुटिकाळें. त्रुटिकाळ ह्मणजे ऱ्हस्व-स्वर उच्चारण्यास जो वेळ लागतो त्याचा एक चतुर्थांश. ५ ब्रह्मा. ६ ब्रह्मा. ७ पशु व मुलें यांचा समूह. ८ बिछान्यावर. ९ चंद्र. १० नक्षत्रीं. ११ पसरून. १२ तर. १३ कृष्ण. १४ क्रीडा. १५ ब्रह्मा. १६ कौतुकानें. १७ कृष्ण. १८ कपटास. * या 'क्र' अक्षरावरून 'ण' दीर्घ वाचावयाचा नाहीं.

रवितेजा जन अर्ची[1]; ॥ न पवे[2] खद्योतगत[3] संभाजन[4] अर्ची[5]. ॥ २२ ॥
सकळविभुललामा[6] तें ॥ कळलें कीं, "ठकवितांचि भुलला मातें." ॥
निजरूपीं निजवि, भवा ॥ वारुनि, दासासि दावि तो निज विभवा[7]. ॥ २३ ॥
विधि पाहे सहसा जे ॥ पशु शिशु जो ज्या विभूषणासह साजे. ॥
ते ते प्रभुहरिसारे ॥ सर्वगुणें भक्तमोहकरिहरि[8] सारे. ॥ २४ ॥
तो अद्भुत महिमा, यां[9] ॥ निश्चळ करि; देखवे न धामहि; माया ॥
हरि हरि, कीं नाभिं याला ॥ मुर्छा आलीच; शक्तिहीन भियाला. ॥ २५ ॥
श्रुति-[10] भाजन, कवि, मानी ॥ हा सावध होय विश्वजनक विमानीं. ॥
नेत्र उघाडि आठ; विना[*] ॥ स्वदुरित[11] मोहासि बीज तो आठविना. ॥ २६ ॥
तो न शके कवळाया ॥ निजमाया ज्या करब्ज धृतकवळा[12] या. ॥
देखे भव्य यशोधी ॥ जो शिशु पशु त्या वनांत अव्यय[13] शोधी. ॥ २७ ॥
शीघ्र जसा रवि, माना ॥ सोडुनि, उतरे नभींच सार विमाना; ॥
कांचनदंडासम हा ॥पडला; समजे दयाचि दंडास महा. ॥ २८ ॥
वाहे स्वशिरः-कमळें ॥ चरणीं, अभुषेकुनी स्वलोचनकमळें[14], ॥
करि सत्यप[15] दीनमनें ॥ वारंवार स्वजन्मदपदीं[16] नमनें. ॥ २९ ॥

इति श्रीमत्कृष्णविजयेत्रयोदशोध्यायः ॥ १३ ॥

माथां पादरजातें ॥ घे, स्मरती साधुसंघ[17] सादर[18] जातें; ॥
जोडुनियां हस्त, वन ॥ प्रभवोद्भवें[19] करि दयांबुवाहस्तवन[20]. ॥ १ ॥
"तनुरुचिजितजलदघटा[21], ॥ गुंजाशिखिपिच्छभूषणा[22], कनकपटा, ॥
स्तविन तुला वनमाला ॥ श्रृंगकवलवेणुवेत्रधर गोपाला. ॥ २ ॥
नमन तुला भवशमना-[23] ॥ खंडलमुख- देववंदिता भवशमना[24], ॥

---

१ पूजी. २ पावे, लाभे. ३ खद्योताचें आंगचें. ४ पूजन. ५ तेज. ६ सर्व प्रभूच्या तिलकास=कृष्णास. ७ पराक्रमास. ८ भक्तांच्या मोहरूपी गजाविषयीं सिंह. ९ ब्रह्मयास. १० वेदपूज्य. ११ आपल्या पातकाशिवाय. १२ करकमळीं भाताचें कवळ घेतलें आहे ज्याणें. १३ निर्नाश=कृष्ण. १४ निजनेत्रोदकें. १५ ब्रह्मा. १६ कृष्णपदीं. १७ साधुसमूह. १८ आदरपूर्वक. १९ वनप्रभव- उद्भव=कमलज=ब्रह्मा. २० दयारूपी पाण्याच्या मेघाची (कृष्णाची) स्तुति. २१ शरिराच्या कांतीनें जिंकिलें आहे मेघसमूहास ज्याचा. २२ गुंजा आणि मयूरपिच्छें हीं भूषणें आहेत ज्याचीं. २३ भव शमन आखंडल- मुख्य- देव- वंदित= शिव, यम, इंद्र इत्यादि देवांहीं वंदिलें आहे ज्यांस. २४ संसारनाशका. * परंतु.

स्वचरण[1]निरतमुनिधना, ॥ लीलाकृतविश्वसंभवावन[2]निधना! ॥ ३ ॥
धन्य म्हणो वर देशा ॥ या श्रीवृंदावना किती वरदेशा,[3] ॥
हिंडति पद कमनीया-[4] ॥ कृति जेथें! यद्रजोंश[5] पदक मनीं या. ॥ ४ ॥
होय[6], सरूप यो जननी, ॥ या; तवनाभ्यमृतसद्ध्रदपयोजननी[7] ॥
मी जरि, तरि यवसाचें ॥ या वनिच्या भाग्य हें सदवयव साचें. ॥ ५ ॥
श्रुतिशास्त्रनयज्ञांहीं ॥ रचितांही तृप्ति वा तुज न यज्ञांहीं. ॥
गोगोपीस्तनपानें ॥ त्वां धरिली तृप्ति तत्सुतें जनपानें[8]. ॥ ६ ॥
करुणेचा उदधी न ॥ त्वत्सम, सर्वेश तूं स्वजनहृदधीन[9]. ॥
हा कामहि मागाया ॥ दे मति जन्मांतरीं हि महिमा गाया." ॥ ७ ॥
विगतमंदाज्ञान[10] मनें ॥ विनवुनि, घेऊनि गुरुपदाज्ञा नमनें ॥
करुनि पिता, मह[11] सत्य ॥ स्वांतीं[12] धरि, मग वरी पितामह सत्य. ॥ ८ ॥
होय पिता[13] महनादिला[14]; ॥ तृप्ति[15] करीं परि मनें पितामह न दिला. ॥
गेला सत्यप[16] दास, ॥ श्रीहरिच्या मनिं धरूनि सत्य पदास. ॥ ९ ॥
तें कुतुक मज न कथवे; ॥ वत्सांचे तो स्वयें जगज्जनक थवे, ॥
पुलिनीं दारक[17] थारे ॥ तेथें ने; करि असी उदार कथा रे. ॥ १० ॥
शिशु म्हणति सकळ," पहा! ॥ न विलंब, करूनियां गतिस, कळपा हा ॥
घेउनि आला, हरिला[18] ॥ धाक, अहो आमुची दया बहु हरिला. ॥ ११ ॥
ये हरि; सहित[19] पहात, ॥ ग्रास धरुनि, बैसलों; करिति तप हात. ॥
चिंति तुजे मन वाटे; ॥ तुज वांचुनि विषसमान जेमन[20] वाटे. ॥ १२ ॥
शीघ्र प्रत्यागमनें[21] ॥ केला त्वद्विरहसंज्वरत्याग[22] मनें. ॥
एक कवलभक्षण ही ॥ घडलें न; विलंबला घनाभ[23] क्षणही. ॥ १३ ॥

---

१ तुझ्या चरणीं रत असलेल्या मुनीच्या धना! २ लीलेनेंच केली आहे विश्वाची उत्पत्ति, रक्षण, आणि नाश हीं ज्याणें. ३ वरद ईश. ४ सुंदराकृति. ५ ज्याच्या रजाचा अंश. ६ होईं. ७ तव-नाभि-अमृत-सत्-ह्रद-पयस्- जननी, तुझी नाभिच अमृताचा चांगला डोह, त्यांतील उदकांत जन्म जहालें ज्यास. ८ लोकांतूनें. ९ स्वजन- हृत्- अधीन १० गेलें आहे मद आणि अज्ञान ज्यापासून. ११ उत्सव. १२ अंतःकरणीं. "स्वांतें देहें हि वरि पितामह सत्य," असाहि एक दुसरा पाठ आहे. सत्य=सत्यलोक. १३ "होय पिता"= प्याला. १४ उत्सवनदीला. १५ तृप्तीच्या हातीं १६ ब्रह्मा. १७ बाळ=गोप. १८ हरण केला. १९ एकत्र. २० जेवण. २१ परत येण्यानें. २२ तुझा विरह हाच कोणी एक मोठा ज्वर त्याचा त्याग. "सद्विरहसंज्वर त्याग," असाहि एक दुसरा पाठ आहे. २३ मेघासारिखा.

ये जेवूं, स्वस्थानीं ॥ वैस;" असा प्रार्थिला तिहीं स्वथांनीं. ॥
हांसे मनिं हरि, खाया ॥ लागे दधिभक्त[1], तन्मनें हरिखाया[2]. ॥ १४ ॥
करुनी भोजनपानें[3], ॥ वत्सासह बाळसंघ तो जनपानें, ॥
अजगर दावुनि, सांजे ॥ नेला वसतीस[4], लब्ध बहुदिवसां जे. ॥ १५ ॥
"अजगर खाऊं[5] ग्रासी ॥ आम्हां; मग त्या हरी सखा उग्रासी ॥
आजि वधी;" तोकांनीं ॥ कथिलें हें वृत्त; लोक घे तो कानीं. ॥ १६ ॥

इति श्रीकृष्णविजये चतुर्दशोऽध्यायः

या चरितोपरि साव्या ॥ वर्षीच्या कृष्णसत्कथा परिसाव्या. ॥
येथें नित्य नावि रती[6]; ॥ याविण विषयांत होय सत्य न विरती[7]. ॥ १ ॥
हरिबळसह[8] शिशु वृंदा ॥ विपिनीं चारिति महासुखें पशुवृंदा. ॥
यांची शोभा नगना ॥ योग्य, नुरवि मन्मथाचिया भान मना. ॥ २ ॥
रक्षिति हें वन माळी ॥ ऋतु सादर सर्वही; धणी वनमाळी[9]. ॥
पाहुनि पदवि[10], भुलावी ॥ कां न श्री, जीस[11] नित्य पद विभु लावी? ॥ ३ ॥
जेथें वेणु[12] पिकाचा ॥ ध्वनि, दोहद[13] कृष्णपादरेणुपिकाचा[14], ॥
त्या वृंदावनमहिला[15] ॥ वाखाणिति आदरें त्रिदशजनमाहिला[16]! ॥ ४ ॥
त्या सुभगा अवनितळीं[17], ॥ गुंजन्मधुपांबुजें[18] उदंड वनिं तळीं, ॥
तेथिल गंध[19] वहाया ॥ पदिं ये, हरि दे निदेशें[20] गंधवहा[21] या. ॥ ५ ॥
वैकुंठांत रमे न, ॥ क्रीडा करि या वनीं नितांत[22] रमेन[23]. ॥
देव समग्र जपाया ॥ सादर ज्या, तो स्तवी निजाग्रजपाया[24]. ॥ ६ ॥
"आर्या[25] सुरनुतपद[26], या ॥ क्षितिवरि[27] आलासि करुनि बहु न तप, दया. ॥
अर्चिति पादप[28], दास, ॥ प्रणत, फळसुमीं[29] सुधाप्रपादपदास[30]. ॥ ७ ॥
होउनियां भ्रमरहित, ॥ त्वद्यश[31] शमलघ्न[32] गाति हे भ्रमर हित. ॥

---

१ दहिंभात. २ आनंदण्यास. 'लागता' हें क्रियापद अध्याहृत घ्यावयाचें. ३ खाणिपिणीं. ४ घरीं. ५ खाण्यासाठीं. ६ प्रेमा. ७ विरक्तता. ८ कृष्ण आणि बळराम यांसह. ९ कृष्ण. ऋतुरूपी माळी आदर पूर्वक सर्व वन रक्षिती. १० मार्ग. ११ ज्या पदवीस (मार्गास). १२ वेणुरूपी कोकिळेचा. १३ डोहाळा. १४ कृष्णपदाच्या रजःकणाच्या समृद्धीचा. १५ वृंदावन भूमीला. १६ देवांगना. १७ पृथ्वीवर. १८ गुंजारव करणारे मधुप आहेत ज्यांत अशीं कमळें. १९ सुवास. २० स्थळ. २१ वाऱ्यास. २२ अत्यंत. २३ रमा-ईन=कृष्ण. २४ बळरामाच्या पायांस. २५ हे श्रेष्ठा. २६ देवानीं नमिलें आहे पदाला ज्याच्या. २७ पृथ्वीवर. २८ वृक्ष. २९ फळ पुष्पांनीं. ३० अमृताच्या पोईनें देणाऱ्या. ३१ तुझें यश. ३२ पापनाशक.

धृतनरतनु[1] वरदास[2] ॥ त्यजिति न पदपद्मनिरत[3] मुनिवर, दास. ॥ ८ ॥
नाचाति मयूर; सकळा ॥ अर्पिति तुझिया पदीं स्वनृत्यरसकळा. ॥
त्वद्दर्शनमोदास[4] ॥ खांत दिलें; करिति तूज न "नमो" दास? ॥ ९ ॥
करिती न व्योहारा,[5] ॥ स्मराति न पति, सुत, तनूहि, नव्याहारा[6]; ॥
पाहाति गोपींसम या ॥ सादर हरिणी तुला त्यजुनि दरसमया.[7] ॥ १० ॥
त्वत्प्रिय दक्ष करीती ॥ सूक्तें[8] पिक; हेचि धर्मरक्षकरीती.[9] ॥
स्वगृहागतपूज्य,[10] कृती ॥ हर्षविती विद्यमान[11] अर्थें सुकृती.[12] ॥ ११ ॥
हे पद मुनिराजगति- ॥ प्रद, जीव समस्त जीवनें या जगती. ॥
खग,[13] मृग, अग,[14] नग,[15] जगती,[16] ॥ धन्यचि कीं सकळ दाविताति गजगती." ॥ १२॥
वर्णित आला पाया ॥ ऐसा, वेदांसि उचित आलापाया; ॥
यद्गुण बळ भद्रांचें,[17] ॥ जो तो यश गाय देव वळभद्राचें. ॥ १३ ॥
श्रुतिविश्रमदा[18] ल्याली ॥ पद्मपरागांगराग[19] समदाल्याली,[20] ॥
सेवुनि सुमधु[22] रानीं, ॥ गाय; हरिहि तीसवें स्वरीं मधुरानीं.[21] ॥ १४ ॥
गात, कूजित[23] हंसहि तें ॥ नेणे, जें दाविलें स्वयें हं सांहितें.[24] ॥
वनिं ठकला पिक, लाजे ॥ नृत्य करुनि दाखवी कलापि[25] कला जे. ॥ १५ ॥
जातां दूर चराया, ॥ घनगंभीर[26] स्वयेंचि दूरचरा[27] या ॥
पशुकळपा पाचारी; ॥ तृणचराहि द्रवति, न खळ पापाचारी. ॥ १६ ॥
प्राकृत जन भागतसे, ॥ भागति खेळोनि वहु महाभाग[28] तसे. ॥
श्रीपति बळपद रगडी; ॥ हरिचे सेविति गतत्रितापदर[29] गडी. ॥ १७ ॥
श्रुति-नुतपादप[30] हा; या- ॥ स्तव, छाये योग्य वरदपाद[31] पहाया? ॥
श्रुतिमूर्ति सदानानें[32] जे ॥ ते मूळीं श्रीकुचांतहि सदा न निजे. ॥ १८ ॥

---

१ धरिलें आहे नराचें शरीर ज्याणें. २ दयालास. ३ पदकमलीं रत. ४ तुझ्या दर्शनापासून जहालेल्या आनंदास. ५ क्रीडेला. ६ नव्या आहारास. ७ भयसमया. ८ उत्तम ध्वनि. ९ आपआपलें कर्त्तव्य करणाराची रीति. १० आपल्या घरीं आलेले (अतिथि) पूज्य आहेत ज्यांस. ११ असलेल्या द्रव्यें (=सामग्रीनें). १२ सु(चांगली) कृति आहे ज्यांची. १३ पक्षी. १४ वृक्ष. १५ पर्वत. १६ जग. १७ कल्याणाचें. १८ कानांस विश्रांति देणारी. १९ पद्म-पराग-अंगराग=कमलांतील भुग्याची उटी. २० समद अलि-आलि, मदानें युक्त अशी भ्रमरांची पंक्ति. २१ फुलांतील मद. २२ गोड अशा ("स्वरीं"). २३ शब्द. २४ मुनिहितें=कृष्णें. २५ मयूर. २६ घनासारिखा गंभीर. २७ दूर जाणाऱ्या. २८ महा-भाग्यवान्=कृष्ण, आणि बळ. २९ तीन हीतापांचें भय गेलें आहे ज्यापासून. ३० वेदांनीं नमिलेला वृक्ष. ३१ कृष्णचरण. ३२ सत् आननीं=साधूंच्या मुखीं.

विश्वाच्या[1] नगरा जे ॥ पल्लव शयनार्थ[2] देति ते नग राजे, ॥
जे गोप शयनरचिते ॥ योगिमनोरथ विशुद्ध मूर्त नराचि ते. ॥ १९ ॥
गोप सुशीला मांडी, ॥ निजतां सुकृतांबुधी[3], उशीला मांडी[4]; ॥
किति सेविति भव्यजनी[5] ॥ नवविटपांच्या[6] सरोजनाभ[7] व्यजनीं[8]. ॥ २० ॥
किति गाती चरितगति; ॥ प्रेमाश्रु न तद्विलोचनांतरिं तगती. ॥
सुखसारसमधुपानीं ॥ देहस्मृति सोडिलीचि शिशुमधुपांनीं. ॥ २१ ॥
त्या मोक्षश्रीदा[9] मा- ॥ नाथा[10] सबळास[11] तत्सखा श्रीदामा ॥
विनवि स्मितसुभगमुख[12], ॥ प्रार्थितिही तोक कृष्णसुबळप्रमुख[13]. ॥ ९२ ॥
"येथुनि जातां (लव न ॥ श्रम कीं) आहे समीप बहु तालवन[14]. ॥
तेथ फळें बहुसुरभी[15]; ॥ हो येतो गंध, दे परंतु असुर भी[16]. ॥ २३ ॥
धेनुक अभिधान[17] खर, ॥ स्वरूप[18] तज्ज्ञातिवर्गीहि समान खरें[19]. ॥
खगपशुगणमनुजगती[20] ॥ तेथ नसे; जाति ते कदापि न जगती. ॥ २४ ॥
फळगंधें दरवळतें[21] ॥ वन, मन हें आमुचेंहि सादरें[22] वळतें. ॥
जाले लोभित दशन[23], ॥ घ्राण, रसज्ञा[24] करावयासि तद्दशन[25]." ॥ २५ ॥
अमृतफळासि फळे हा ॥ सुरवृक्ष[26] अनंत; नुरवि तुच्छफळेहा[27]. ॥
नेले कांतारा[28] हे ॥ शिशु, जेथें असुर धार्मिकांता[29] राहे. ॥ २६ ॥
जेविं *करी, तालागा[30] ॥ वळ कांपवि; असुर ये करीता लागा; ॥
वीर्यें गाढ; वधावे ॥ शिशु या कामें सकोप गाढव धांवे. ॥ २७ ॥
कोपें कांपत, नर वा ॥ सुर नेणत, ऐकतांचि फळपतनरवा[31], ॥
येउनि; वीरास भया ॥ लातेच्या दुष्ट दाखवी रासभ[32] या. ॥ २८ ॥

---

१ कृष्णास. २ बिछान्यासाठीं. ३ कृष्ण. ४ ठेवी. ५ महाजन्मे. ६ वनवृक्षांच्या. ७ कृष्ण. ८ वाऱ्यांनीं. ९ मोक्ष आणि लक्ष्मी यांस देणारा. १० लक्ष्मीनाथास. ११ बळराम आहे संगतीं ज्याच्या. १२ हास्यानें सुशोभित आहे मुख ज्याचें. १३ कृष्ण (नंदसुत नव्हे, पण दुसरा एक गोप), आणि सुबळ हे आहेत मुख्य ज्यांत. १४ तालवृक्षांचें वन. १५ फार आहे सुवास ज्यांस. १६ भय. १७ नांव १८ गाढवाची आकृति. १९ तीव्र. २० पक्षी, जनावरें, किंवा माणूस यांची गति. २१ भरून जातें. २२ आदर पूर्वक. २३ दांत. २४ जिव्हा. २५ त्याचें भक्षण. २६ कल्पतरू. २७ हलक्या फळाची इच्छा. २८ अरण्यास. २९ धार्मिकांचा अंत करण्यासाठीं. ३० ताल वृक्षास. ३१ फळ पडलें त्याच्या शब्दास. ३२ गाढव. "ये दावी रासभ या अतुलाखिलबल बलप्रवीरास भया," असा या उत्तरार्धी दुसरा एक पाठ आहे. * हत्ती.

कोप धरीला ताळें ॥ बळभुज[1]करिकंपितें; करी लाताळें; ॥
कीं गर्दभ रानींचा. ॥ काय अमृतपात्र पातकभरा नीचा? ॥ २९ ॥
जो हा गाढव यातें, ॥ दुर्मति वारांगनानुगा[2] ढवयातें, ॥
बळ सज्जनपदक बळी ॥ चरणीं, सुखवावयासि जनपदें[3], कवळी. ॥ ३० ॥
तो अतिउग्र गर[4]गर ॥ प्रभुनें खळ फिरविला धरूनि गरगर. ॥
त्याजिला लौकर ताळीं; ॥ नभ गर्जे त्दृष्ट देवकृ[5]तकरताळीं. ॥ ३१ ॥
गर्दभतृण राजानें ॥ विश्वाच्या क्षेपितांचि, तृण[6]राज्यानें, ॥
पडतां ताळ जवळिला ॥ कांपविला; त्या द्रुमेंहि अन्य कवळिला. ॥ ३२ ॥
तोही चुरला ताल- ॥ द्रुम[7]; एवं[8] त्या वनीं न उरला ताल[9]. ॥
वृक्ष न जगती, पवन ॥ क्षोभें भंगी, तसेंचि जगतीप[10] वन. ॥ ३३ ॥
तों तज्ज्ञाति[11] मिरासी ॥ आले भांडावयासि; त्या तिमिरासी ॥
बळ हरि हिमभानु[12] रवी ॥ स्वजनकुमुद[13]नलिनसुखदकरभा नुरवी. ॥ ३४ ॥
करुनि खर परासु[14], मनीं ॥ सुखविति सुर; तेहि करिति मुदिरा[15] सुमनीं. ॥
वाद्यें बहु वाजविती, ॥ जयजयशब्देंकरूनि नभ गाजविती. ॥ ३५ ॥
करुनि परासु खरा[16]शी, ॥ देति जना भक्ति; तत्परा सुखराशी[17]. ॥
व्रजिं नमितां पद, वडिला ॥ लोकां जो निजवियोग[18]ताप, दवडिला. ॥ ३६ ॥
एके दिवसीं वृंदा- ॥ विपिनीं[19] रामाविणें[20] हरी गोवृंदा[21] ॥
चारि; निदाघातप[*] या ॥ सकळां करि तृषित; पीति यमुनेंत पया[22]. ॥ ३७ ॥
विषजल पशुपांनीं[23] या ॥ सेवियलें, पीति त्याचि पशु पानीया[22]. ॥
प्राणी जो जो धाला, ॥ जाला तो प्रेत, पावतां रोधाला[24]. ॥ ३८ ॥
पाहुनि मृत सकळ, वळे ॥ करुणामृतघन जगन्निवास कळवळे. ॥

---

१ बळरामाच्या भुजरूपी गजानें कांपविलेला अशानें. २ वारांगनेच्या (=कलावंतिनीच्या) चाकरास. ३ देश. ४ विषालाहि विष अशा. ५. देवांनीं पिटलेल्या हातांच्या टाळ्यांनीं हृष्ट =संतुष्ट. ६ वृक्षविशेषें. ७ तालवृक्ष. ८ या प्रकारें. ९ बेत. १० जगत्पति. ११ तत्-ज्ञाति =त्याच्या जातीचे लोक. १२ चंद्र. १३ आपल्या भक्तरूपी कुमुदांस आणि नलिनांस सुख देणारी अशी प्रभा आहे ज्यांच्या किरणांची. "कुमुदें," हीं चंद्रविकासितें, व "नलिनें" हीं सूर्यविकासितें कमळें होत. १४ प्राणरहित. १५ मेघास. १६ गाढवास. १७ सुखाचा राशी. १८ आपल्या विरहापासून झालेल्या तापास. १९ वनीं. २० बळरामा खेरीज. २१ गाईच्या समुदायास. २२ पाण्यास. २३ गोळ्यांनीं. २४ तीराला. * ग्रीष्म ऋतूंतील सूर्य.

दृष्टिसुधावृष्टि[1] हरी ॥ करि, जे[2] पाळी करूनियां सृष्टि, हरी. ॥ ३९ ॥
उठती जेविं सकाळीं; ॥ हरि दासांचें हरीच साध्वस[3] काळीं. ॥
कोण विषास विचारी? ॥ पावे आपणचि नाश तें अविचारी. ॥ ४० ॥
दुसरा वांचविता न, ॥ प्रेमा; हरिनयन- अमृत- वर्षवितान[4] ॥
शिरिं, ह्मणुनि असु परतले; ॥ हें जाणूनि विभुपदांताचि पशुप रतले. ॥ ४१ ॥

इति श्रीकृष्णविजये पंचदशोध्यायः ॥ १५ ॥

मुनिसर्वस्वा[5] दुहिता ॥ रवि[6]ची वाटे कराvi सुस्वादु[7] हिता, ॥
कीं काळिय सापानें ॥ दे दूषित जन मरों न सहसा पानें[8]. ॥ १ ॥
ऱ्हद[9] विषसागर लाळीं[10] ॥ अहिच्या धरि, भी कृशानु[11] ज्या गरलाळीं[12]. ॥
जळ-विष सरमिसळ सळे, ॥ जन पाहुनि जें कढे सदेव सळसळे. ॥ २ ॥
जरि गेला खग *वरणे ॥ मरणाची सरणि[13] तत्क्षणीं मग वरणें. ॥
जऱ्हि जव थोर पळतिल ॥ द्विज[14], तरि वाफेकरूनि होरपळातिल. ॥ ३ ॥
मारुत[15] डोहावरिला ॥ स्थिर चर त्याला न सांपडो;—'हा!' वरिला. ॥
त्यांतिल सविषवनलवीं ॥ प्राणासि हरावया उशिर लव न लवी. ॥ ४ ॥
भीति खचर[16] वाफांस, ॥ ब्रध्नसुता[17]चा गळां न बरवा फांस. ॥
जाली इच्छा पीडा ॥ हरणीं श्रीमन्मयूरापिच्छापीडा[18]. ॥ ५ ॥
ऱ्हदत्हृदयांत निखारा ॥ यमुनेच्या त्या सुदुःसहा कुविखारा[19] ॥
काढाया कास[20] कसी; ॥ दावि पहा सदयता स्वलोकांस कसी! ॥ ६ ॥
भवताप कविस दाही[21] ॥ न, तसा जरिही कदंब[22] निकट सदाही, ॥
तरि विष भय दावीना, ॥ अमृतकराला शिरोनिलयदा[23] वीना. ॥ ७ ॥
लावी पद झाडा या ॥ हरि, त्या अहिचा समूळ मद झाडाया. ॥
चढला प्रभु तरुशिखरीं; ॥ घडलीं होतीं महातपें तरुशि खरीं. ॥ ८ ॥
जेथें सकुतुक रतलें ॥ श्रीमन, त्या विजयि विश्ववर्ण्य करतलें ॥

---

१ दृष्टिरूपी अमृतवर्षाव. २ दृष्टि. ३ भय. ४ कृष्णाचे डोळे हेंच अमृताचा वर्षाव करणारें एक छत्र. ५ मुनिजनाचें सर्वस्व असा जो कृष्ण त्याला. ६ यमुना. ७ गोड. 'सापानें' ही करणी तृतीया आहे. ८ पिऊन. ९ डोह. १० लाळ, फेस. ११ अग्नि. १२ विषाला. १३ मार्ग. १४ पक्षी. १५ वायु. 'लवी'=लावी. याचा कर्ता 'काळिया' (अध्याहृत.) १६ पक्षी. १७ यमाचा. १८ श्रीमत् मयूर-पिच्छ-आपीड=मयूरपिच्छाचा तुरा आहे ज्यास. १९ दुष्टसर्पास. २० घाली. २१ दाह करी. २२ वृक्षविशेष. २३ शिर दिलेंहे होतें स्थान ज्याणें 'अमृत करा' (अमृत होतें हातीं ज्याच्या) 'वीना' (गरूडास). पूर्वी समुद्रमथनानंतर गरूड अमृताचा घट घेऊन जात असतां कदंब वृक्षावर बसल्याची कथा आहे, तिला याचा संबंध आहे असें दिसतें. * वरून.

ताडि भुज विभु जगाचा; ॥ टाकि उडी, मर्द[1] हरावया भुजगाचा[2]. ॥ ९ ॥
जळ धांवे शतधनु तें, ॥ त्या डोहीं टाकितां उडी विबुधनुतें[3]. ॥
प्रकटाति बहुतर लहरी; ॥ करि करिवरसा ऱ्हदासि वहु तरल[4] हरी. ॥ १० ॥
"गोगोप पिपासू[5] न ॥ व्यसु[6] केले म्या, न दोष मजपासून, " ॥
प्रभु भुजदंडाहत[7] तें ॥ जळऐसें विनवि काय शब्दें विततें! ॥ ११ ॥
नाग अदांत रवासी ॥ ऐकुनि या, धांवला ऱ्हदांतर्वासी[8]; ॥
भवनाभिभवा[9] मानी[10], ॥ प्रकट करी कोप, गरलविभवा[11] मानी[12]. ॥ १२ ॥
निरदनिभ[13], सुकुमार, ॥ श्रीवत्सांकित, सुवर्णवसन[14], कुमार, ॥
मृदुपद, सुस्मितवदन[15] ॥ प्रेक्षाया[16] योग्य; अतुळसद्गुणसदन[17]. ॥ १३
मूर्तीलाहि अशीला ॥ पाहे, तत्केलि[18] या रूचें न अशीलीं[19]. ॥
मर्मीं चावे दांतीं, ॥ वेष्टी; महिमा कळे जिचा वेदांतीं! ॥ १४ ॥
न दिसे नयनीं चेष्टा[20]; ॥ हरिची भासे दशा जसी नीचेष्टा[21]. ॥
नांहिं समानसहाय[22], ॥ प्रियसख ह्मणती सशोकमानस[23] "हाय[24]!" ॥ १५ ॥
वेष्टी कृष्णा गुरुला ॥ स्वशरीरें सर्प, जेविं कृष्णागुरुलीं[25]. ॥
शोकऱ्हदां[26] मोहाहि[27] ॥ कवळी श्रीकांतमित्रसंदोहाहि[28]. ॥ १६ ॥
प्रिय आत्मा, वत्स, तरी ॥ न स्मरती धेनु; सर्व वृष वत्सतरी[29] ॥
फोडिति हंबरडा; या ॥ हरिचा लागे सुत्दृत्कदंब[30] रडाया. ॥ १७ ॥
नीरजनाभ[31]यदा ते ॥ स्थिति दावी तेधवां जना भयदाते[32], ॥
त्रिविधोत्पात[33] प्रकट ॥ क्षणमात्रें होति; नाश कळविति निकट[34]. ॥ १८ ॥
नंदादिक बहु धाकीं[35] ॥ पडले हरिनाश भाविती बहुधा कीं. ॥
"रामा-वांचुनि दावा[36] ॥ गेला; करिती सुरारि[37] यासह दावा[38]. ॥ १९ ॥
यमलोक गमे व्रज हा;" ॥ तेथ ह्मणे बाळगोपगोपीव्रजे[39] "हा[24]!" ॥

---

१ गर्व. २ काळियाचा. ३ देवपूजितें श्रीकृष्णें. ४ चंचल. ५ तृषित. ६ वि असु=गतप्राण ७ कृष्णहस्तानें पसरलेलें. "काय"= जसें काय. ८ डोहवासी. ९ कृष्णपराभवास. १० मनांत आणी. ११ विषाच्या पराक्रमास. १२ गर्विष्ट. १३ मेघासारिखा. १४ पीतांबर. १५ हास्यवदन. १६ पहाण्यास. १७ अतुल सद्गुणाचें स्थान. १८ त्याचें चरित्र=खेळ. १९ दुष्टाला. २० चांचल्य. २१ नीच कालियाचे इच्छेप्रमाणें. २२ बरोबरीचा मित्र ( बळराम ). २३ खेदयुक्त आहेत मनें ज्यांचीं. २४ इतिखेदे. २५ चंदनाला. २६ शोकरूपी डोहांत. २७ मोहसर्प. २८ समुहास सुध्दा. २९ पाड्या. ३० मित्रसमुदाय. ३१ कमळनाभ. ३२ भयंकर. ३३ तीनप्रकारचीं दुश्चिन्हें. ३४ जवळ. ३५ भयांत. ३६ वनाला. ३७ राक्षस. 'यासह'=यासीं. ३८ द्वेष. ३९ समुदाय.

न पहाती ओकासी[१], ॥ त्यजिति जसे लोक ओकिल्या ओकासी. ॥ २० ॥
जाती शोधित रानीं; ॥ भय धरिलें बहु बळाहुनी[२] इतरांनीं. ॥
वारीना वनगमनीं; ॥ जाणे अनुजप्रभाव[३], हासे स्वमनीं. ॥ २१ ॥
धैर्यें सहसा ढळलीं; ॥ शोधित जातां, पथीं पदें आढळलीं. ॥
जीं सेवि अनादिसती, ॥ चिन्हें पद्मांकुशादि नयना दिसती. ॥ २२ ॥
जें हरिचें पद वीतें[४] ॥ अर्थचतुष्टय, तदंकिता[५] पदवीतें[६] ॥
धरुनी, यामुनतट ते ॥ पावुनियां, जाहले सकळ जन तटें[७] ते. ॥ २३ ॥
जाउनि देखति अहितें, ॥ जेणें हरि वेष्टिला ऱ्हदीं अति अहितें.[८] ॥
गोपहि पडले शवसे[९]; ॥ कोणाच्या मनिं न धीर धड लेश वसे. ॥ २४ ॥
बुडवी शोकनदीन[१०] ॥ व्यालावृतदेहहरिविलोकनदीन[११] ॥
व्याकुळ जन थोर; पळे ॥ स्मृति; शोकाग्नींकरूनि बहु होरपळे. ॥ २५ ॥
करुनि विलापा रडती ॥ गायींपरि, धाय मोकलुनि, आरडती. ॥
दुःख अनंत यशोदे; ॥ ह्मणे, "परिष्वंग[१२] अमृतशीत[१३] शिशो, दे." ॥ २६ ॥
गोपी स्मरती हसित, ॥ प्रेक्षण[१४], सौल्हद, विनोद, वाक्य, विलसित. ॥
देह परम रसरसित, ॥ प्रियशोकाग्नी करील जाणो भसित. ॥ २७ ॥
त्या डोहांत शिराया, ॥ जाले नंदादि सर्व सिद्ध मराया; ॥
परि ते सकळ बळानें[१५] ॥ वारियले सांत्वनादि-युक्तिबळानें. ॥ २८ ॥
कृष्णास सकळ कळलें ॥ कीं, "गोकुळ मन्निमित्त बहु कळकळलें." ॥
तेथ घटिद्वय उगला ॥ होता, मग भुजंगभोगबंधनिं[१६] फुगला. ॥ २९ ॥
प्रभु वपु जोंजों फुगवी, ॥ तोंतों तो नाग भोगवेढे उगवी. ॥
वाढे गोपकुलगडी; ॥ तनुभंगभयें भुजंग बंध उलगडी. ॥ ३० ॥
सोडी ह्मणुनि न उलला; ॥ परि नेणे हरिस. गरळमदें भुलला. ॥
ऊचलुनी स्वफण[१७] फणी[१८] ॥ कोपे, विषवन्हिहलो[१९] वमोनि, फणफणी. ॥ ३१ ॥

---

१ घराला. २ बळरामाहून. ३ कृष्णपराक्रम. ४ प्राप्तकरितें. ५ त्या चिन्हानें युक्त. ६ मार्गाला. ७थांबते. ८ दुष्टानें, शत्रूनें. ९ प्रेता सारिखे. १० शोकसमुद्र. ११ व्याल-आवृत-देह-हरि-विलोकन दीन, सर्पानें वेष्टित आहे शरीर ज्याचें अशा हरीच्या अवलोकनानें दीन. 'जन' हें 'बुडवी' यानें कर्म. १२ आलिंगन. १३ अमृता प्रमाणें शीतल. १४ पाहणें. १५ बलरामानें. १६ सर्प देहाचे बंध आपल्या आंगासभोंवती होते त्याच्या आंत. १७ फणा. १८ सर्प. १९ विषाग्नीस.

उपमा तन्नयना[1], कीं ॥ मंडकभाजन[2]; गळे गरळ बहु नाकीं. ॥
फूत्कार करि उदंड; ॥ व्याळ न तो, काय कोपला यमदंड! ॥ ३२ ॥
ओष्ठप्रांतें[3] जिभांनीं ॥ चाटी, विषवन्हिकीलखड्गनिभांनीं[4]. ॥
हरि दाखवि धीटपणें, ॥ गरुडाचें जेविं पन्नगवधीं[5], टपणें. ॥ ३३ ॥
अन्योन्य वधीं टपती; ॥ भ्रमणक्षतशक्तिनागशिरिं[6] धीटपती ॥
चढला बहु लवलाहें; ॥ वसतां गुरुरूप मस्तकीं लवला हें*. ॥ ३४ ॥
मृदु रक्त[7] सहज चरण; ॥ व्याळशिरोमणिखड्यावरी[8] सहचरण[9]; ॥
धरिति अरुणता[10] तळवे ॥ ज्यां श्रीकरपल्लवासि बहु नातळवे. ॥ ३५ ॥
स्वामी भवनाचा, या ॥ अहिशिरिं लागे कळाप्रभव नाचाया. ॥
सहजाचि सुर साहित्या ॥ नृत्याच्या कारिति सर्व सुरसांहीं[11] त्या. ॥ ३६ ॥
घेउनि आतोद्यां[12], या ॥ प्रभुपायीं देवगण गुणा तो ध्याया, ॥
कांतांसह[13] आला, पी ॥ स्मितकांत्यमृतासि[14], वाजवी, आलापी. ॥ ३७ ॥
म्हणती, "कुजना, चावें ॥ निजाधरां[15]; हे समर्थ भुज, नाचावें." ॥
वर्षति कुसुमें अमर, ॥ श्रीपतिचरणांबुजीं स्वयें जे भ्रमर. ॥ ३८ ॥
कृष्ण महानट नाशी ॥ विषवळ, करि विश्वधाम[16] हा नटनाशी[17] ॥
हरि, जैसा शर्फटांचा[18] ॥ हाणोनि करी मदप्रणाशीं[19] फटांचा. ॥ ३९ ॥
तो यदुकुळजनु[20] ठेंची, ॥ 'शिरतों वरि,' जें ह्मणे; फिरोन नुठेची. ॥
पूर वमे रुधिराचा[21]; ॥ पदवज्रा काय होय मेरु धिराचा? ॥ ४० ॥
नागशिरें शंभरही ॥ ठेंची; करि नम्र पंक्ति विश्वंभर ही. ॥
मूर्छेस्तव अचळ, बळ· ॥ क्षीण; शरीरीं उरों दिली न चळवळ. ॥ ४१ ॥
प्रभुवर नागवि; सरला ॥ मदसंचय; सर्व गर्व नाग विसरला. ॥
होउनि विमद, मनें हा ॥ जाय शरण माधवा अधमदमनेहा[22]. ॥ ४२ ॥

---

१ तत्-नयना. २ मांडे भाजण्याचें पात्र. ३ ओंठावरचा जागा. ४ विषाग्नीच्या ज्वाला आणि खड्गें यांसारिख्यांनीं. ५ सर्पवधीं. ६ भ्रमणानें क्षीण आहे शक्ति ज्याची अशा सर्पाच्या शिरीं. ७ तांबडें. ८ सर्पाचें शीर हेंच मणि आणि खडा, त्यावर. ९ चालणें. १० तांबडेपणा. ११ चांगल्या रसांनीं. १२ वाद्यांस. १३ वायकांसह. १४ स्मित-कांति-अमृतासि, हास्य शोभेच्या अमृतास. १५ आपले ओठ. १६ कृष्ण. १७ नृत्यासी. १८ खुरांच्या टांचा. 'जैसा'=जेव्हां. १९ गर्वनाश. "फटांचा"=फडांचा. २० यदुकुळीं जन्म आहे ज्यास=कृष्ण. २१ रक्ताचा. २२ अधमाचें दमन करण्या विषयीं "ईहा" (=इच्छा) आहे ज्यास, अशा- (कृष्णास).

* "हें"= "गुरुरूप" याचें दर्शक.

पाहुनि सापदरातें, ॥ पाहुनियां विकळसा, पदरातें ॥
तद्वनिता[1] पसरीती. ॥ शरणागतिमाजि शुद्ध तापसरीती. ॥ ४३ ॥
स्त्रीजन सापत्य वन- ॥ प्रभवाक्षा[2] सदयमानसा पत्यवन[3] ॥
प्रार्थी, वंदुनि भाव- ॥ स्तवनें, जेणें घडे भयांत निभाव. ॥ ४४ ॥
"खळदमना सकळेना,[4] ॥ तूं प्रभु हें प्राकृता जनास कळेना. ॥
न धरा जी आगें[5] मनीं; ॥ केलें दीनासि धन्य या आगमनीं. ॥ ४५ ॥
केली शिक्षा; माया ॥ दीनावरी बहु तुझी अशि; क्षामा[6] या ॥
द्या जी! असुदानँ[7] ; मन ॥ प्रसन्न हो, करुं सदा तवपदा नमन." ॥ ४६ ॥
स्त्रीजन बहु विनवि, लया ॥ कीं पति पावोनि कांति जावि न विलया. ॥
आपुलि हा वर दासी ॥ मागति, आली दया महावरदासी. ॥ ४७ ॥
त्यजुनि मृतनिभा,[8] उतरे ॥ हरि; वासुकिचाहि मोहजळ भाउ[9] तरे. ॥
जाणोनि हरादीनां[10] ॥ स्तवि आहि, "मज रक्ष मृतिजनिहरा[11] दीना. ॥ ४८ ॥
अतिदुःसह जात्या[12] गा! ॥ अहि, या कोपा अधीन सहजा*; त्यागा ॥
मी तों न क्षम, जनका ॥ विश्वाच्या, सापराध मानु मज नका." ॥ ४९ ॥
कृष्ण स्वस्था नागा ॥ सांगे, "सकुटुंब जा निजस्थाना गा; ॥
खगपतिभय आगामीं[13] ॥ तूज न; केली क्षमा तुझ्या आगा मी. ॥ ५० ॥
परमाप्त गणिल विनता- ॥ नंदनें[14] मत्पादलांछितां[15] तुज विनतां[16]. ॥
वस निःशंक रमणकीं,[17] ॥ मत्पादांभोजभृंग[18] पक्षिरमणें[19] कीं. ॥ ५१ ॥
जा ऱ्हदओकामधुनी; ॥ पुरवू गोमर्त्यखगमनःकाम[20] धुनी[21]. ॥
पळ न लविं प्रस्थानां[22]; ॥ सोडीं या देवधेनुविप्रस्थाना. ॥ ५२ ॥
जें शासन तुज, गाया ॥ †संध्यायुगळीं स्मरेल जो, भुजगा, या ॥

---

१त्याच्या बायका. २कमलनेत्रास. ३पति-अवन, नवऱ्याचें संरक्षण. ४ सकळ-ईन=हे सर्वांच्या प्रभो. ५ अपराध. ६ अशक्तास. ७ प्राणदान. ८ प्रेतवतास. ९ कालिया. १० हर-आदि-ईन, सांबादिकांच्या प्रभूस. ११ जन्ममरण हरण करणारास. १२ जातीनें. "जात्या." हा संस्कृता प्रमाणें तृतीया होय. 'त्यागा'=त्यागाला (त्याग करण्याला). १३ गेल्यावर. १४गरुड १५ माझ्या पायांच्या चिन्हानें युक्त. १६ नम्रास. १७ रमणुकीनें. १८ माझ्या चरणकमलींचे भ्रमर. १९ गरुड. २० गाई, माणसें, पक्षी, यांच्या मनांची इच्छा. २१ नदी. २२ निघण्यास.
* सह जा= (आह्मां अहिं-) बरोबर उत्पन्न जहालेल्या. 'सहजा' हें 'कोपा' याचें विशेषण.
† सूर्योदय आणि अस्तमान या दोन्ही वेळीं.

माझ्या दासा दर हो ॥ न तुह्मापासुनि; मत्पदा सादर हो." ॥ ५३ ॥
आज्ञापि विभु जगाचा ॥ ऐसा, भ्रम मद हरूनि या भुजगाचा. ॥
त्या शुभकाळिं यशोधी ॥ प्रभु पूजुनि, निजमनासि काळिय शोधी.[1] ॥ ५४ ॥
शुचिमानस मुद्राशी,[2] ॥ प्रभुसि नमुनि, जाय सहजन समुद्राशी; ॥
अमृतनिभा सवित्याची ॥ होय सुता; कीर्ति विश्वभासवित्याची! ॥ ५५ ॥

इति श्री कृष्णविजये षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥

नागांतक गरुड बळी, ॥ त्याला निजरक्षणार्थ देति अहि वळी. ॥
काळिय त्यास न मानी, ॥ भक्षि बळीं अन्यदत्तही अभिमानी. ॥ १ ॥
जंगम[3] विषतरु डासी ॥ युद्धीं हा काळिय प्रबळ गरुडासी. ॥
नाग भगवदंशा या ॥ चुकला नाहींच उग्रजव दंशाया. ॥ २ ॥
झडपोनि उडवि पक्षा[4]- ॥ निळवेगें त्या, खगेंद्र गरुड, विपक्षा[5]. ॥
वातानें तृण सुकलें, ॥ तेवि पडे येथ; मरण ह्मणवुनि चुकलें. ॥ ३ ॥
मृत्यु कदा न घडो, हा ॥ ह्मणवुनि ये शरण, करुनियां अघ[6], डोहा. ॥
अहिस तशा, पतगा[7] या ॥ जो मुनिचा कळवि दैव शाप तगाया. ॥ ४ ॥
पूर्वीं येथिल मीनां ॥ हरि[8]; सौभरि मुनि निवारि, परि सोडीना; ॥
पतिशोकाकुलदीनां[9] ॥ वारिचरां[10] अभय, शापही दे वीनां[11]. ॥ ५ ॥
"मृताचि पडो हा, ( माजी ॥ वाचा हे सत्य ), खगेंप[12] डोहामाजी, ॥
येउनि जरि[13] दाविल या- ॥ वरिही अत्रत्य[14] जळचराच्या विलया." ॥ ६ ॥
अपराधीही जगला ॥ गरुडापासोनि नाग यास्तव तगला; ॥
हरिपदसारसमुद्रा[15]- ॥ श्री होतां जाय सपरिवार समुद्रा. ॥ ७ ॥
जैसाचि किरणमाळी[16], ॥ डोहांतुनियां निघे तसा वनमाळी[17]. ॥
जनलोचन[18]नलिनातें ॥ विकसित करि शोकघन[19]तमोमलिनातें. ॥ ८ ॥

---

१ शुद्ध करी. २ मुत्–राशि, आनंदाचा राशि. ३ चालणारा. 'जंगम विषतरु' हें 'काळिय' याचें विशेषण. ४ पक्ष-अनिल- वेग, पंखाच्या वाऱ्याच्या वेगानें. ५ शत्रूस. ६ पातक. ७ पक्ष्यास, गरुडास. ८ हरण करी ( "मीन=" मत्स्य). ९ पतीच्या शोकानें व्याकूळ व दीन. १० जलचरांस. ११ वि–ईना, पक्षिपतीस=गरुडास. १२ गरुड. १३ जर. १४ येथील. १५ हरीच्या चरणकमलाच्या मुद्रेची शोभा. "हरिपदसारसमुद्राशिरिं इ०," असाहि एक दुसरा पाठ आहे; आणि हा पाठ वर लिहिल्या पेक्षां बरा दिसतो. १६ सूर्य. १७ कृष्ण. १८ जनांचे डोळे हींच कमळें. १९ शोक रूपी मेघासंबंधी अंधःकारानें मलीन अशांस.

उरवी शोक न कांहीं ॥ दिव्यस्र[1]ग्गंधवस्त्रमाणिकनकांहीं. ॥
मंडित रामानु[2]जनी ॥ तापतमोहर शशी खरा मानुं जनीं. ॥ ९ ॥
कृष्णाचीं प्रिय मित्रें ॥ प्रथम गळां घालिती मिठी सुपवित्रें; ॥
धरिति कडकडोनि भुजीं. ॥ यांच्या भाग्यां-असीं त्रिलोकीं न दुजीं ॥ १० ॥
धरि ह्रदयींच यशोदा ॥ सुर[3]वरदा नंद, रोहिणीहि, यशोदा. ॥
गोपी सर्व सदि[4]ष्टा ॥ आलिंगिति या स्तनोपपीड[5]संदिष्टा. ॥ ११ ॥
भेटे भावास बळ ॥ प्रेमानें जाणता प्र[6]भावा सबळ. ॥
हांसे सानंद मनें, ॥ कीं केला धन्य बंधु [7]कालिय दमनें. ॥ १२ ॥
व्रजलोकां सकळांतें ॥ मूर्तप्राणा[8]प्तिलाभ हा विकळांतें. ॥
गो वृष वत्स द्रुमही ॥ सुख[9]निर्भर; सर्व पावली मोद मही. ॥ १३ ॥
द्विज वदति, "तुला नंदा, ॥ जाला सुतलाभ पात्र अतुलां[10]नंदा. ॥
तूं कांच[11]नगोदानें ॥ तीर्थीं पुत्रोदयार्थ दे मोदानें." ॥ १४ ॥
सविधि तयां तो दानें ॥ दे गोस्वर्णादि पूजुनी मोदानें. ॥
नमि किंकरसा नंद ॥ द्विजवृंदा, जोडुनि स्वकर सानंद. ॥ १५ ॥
पुरुषोत्तम हा भागा ॥ आला जिस सुतपणें असि म[12]हाभागा, ॥
आलिंगी सूनुस ती ॥ [13]करुणा तन्मुखसु[14]धापिपासु नुसती. ॥ १६ ॥
अंकीं बैसवि मोक्ष- ॥ प्रद हा, करि तच्छिरींचि [15]अश्रुविमोक्ष; ॥
सुपयो[16]वाहस्तन या- ॥ वरि सोडिति, सुखद लागतां हस्त, न[17]यां. ॥ १७ ॥
जाली होती रजनी; ॥ धरिलें तें वसनिला नदीतिर जनीं; ॥
तों पेटे शुष्कवनीं ॥ वन्हि, जसा दोष तापकर दुष्कवनीं. ॥ १८ ॥
प्रळयाग्निसम ग्रासी ॥ वन, दे लोकांसि त्या भय समग्रांसी; ॥
करि दव भस्म यदा, वी ॥ ज्वाला स्वाहा[18]सुवल्लभ स्म[19]यें दावी. ॥ १९ ॥

---

१ दिव्यस्रक् (मालिका=तुरा), गंध, वस्त्र, मणि, सुवर्ण (अलंकार) यांहीं. २ राम-अनुजनि, रामाचा धाकटा बंधु=कृष्ण. ३ यश आणि सुख देणाऱ्या दयाळू कृष्णास. ४ चांगलें आहे इच्छिलें ज्यांनीं. ५ स्तनांला उपपीडा (उत्तेजन) देणाऱ्या सन्मित्रास. ६ पराक्रमास. ७ बलराम हा शेषाचा अवतार ह्मणून. ८ मूर्तिमान् प्राणलाभ. ९ सुखानें भरलेले. १० अतुल-आनंदा. ११ सुवर्ण आणि गाई यांचीं दानें. १२ महाभाग्यवान्. १३ सदय. १४ त्याचें मुख हेंच अमृत तद्विषयीं तृषित. १५ अश्रु साडणें. १६ चांगलें दूध आहे ज्यांत असे स्तन. १७ नया. १८ स्वाहेचा नवरा= अग्नि. १९ गर्व.

ज्याचें स्मरण हरीतें ॥ भवभय, गेले तयाचि शरण हरीतें. ॥
पाहुनि लोकविकळते, ॥ [1]जनरक्षेची तयांत दाखवि काळ ते. ॥ २० ॥
जाळिल सर्वां सहित ॥ प्रभुकृष्ण-दया-पयो[2]दे सर्वांस हित; ॥
निज जन रक्षायास ॥ ज्वलना पी, दे करूं न रक्षा यास. ॥ २१ ॥
ऐसा तो जय[3]शाली ॥ वनमाळी सधृदंबुरुहको[4]शाली ॥
ये सदनास सकाळीं, ॥ घालुनियां सर्व आप्तवर्ग सुकाळीं. ॥ २२ ॥

इति श्रीकृष्णविजये सप्तदशोध्यायः ॥

गुण हरि-बळ-देवाचे ॥ वर्णाया, तद्दयांचि बळ दे वाचे. ॥
करिती बाळक लीला ॥ वृंदावनिं, त्याचि होति काळ कलीला. ॥ १ ॥
वाजविती मुरलीला, ॥ गाती, नाचति; विलोकिती सुर लीला. ॥
गडि होउनि निर्वाणि- ॥ प्रददेवांस [6]प्रशंसिती गीर्वाणि. ॥ २ ॥
त्या [8]शुद्धसुकृतजलधि- ॥ प्रभुमित्रांत प्रलंब-नामक [9]मळधी ॥
ये गोप[10]छद्मानें; ॥ खळ ओळखिला मनीं रमासद्मा[11]नें; ॥ ३ ॥
द्वेष मनीं पर वाहे, ॥ जगदीश्वर हा धरीच ना परवा हे. ॥
मांडी खेळ; याला ॥ वंचाया लागलाचि खेळायाला. ॥ ४ ॥
कृष्ण ह्मणे, "पारिसा रे, ॥ दो ठायीं होउनी असेपरि सारे ॥
खेळों येथूनि वडा- ॥ पर्यंत. प[12]राजितें वहावें निव[13]डा." ॥ ५ ॥
जाले शिशु दो भागीं, ॥ प्रभु केले राम कृष्ण सुमहाभागीं. ॥
होउनि घोडा, वा[14]ला ॥ वाहे त्या, लावि यास जो डावाला. ॥ ६ ॥
ऐसी करिती क्रीडा, ॥ तें सुख पाहोनि मुक्तिहि धरी व्रीडा[15]. ॥
[16]भवगदविपदगदगदा- ॥ धरबळ हांसोनि, हसवितीहि गदगदा. ॥ ७ ॥
श्रीदामा, वृषभ, असे ॥ संवगडि तिकडे, गणांत ज्या राम असे. ॥
हे विजयासि लहाती, ॥ तैं पृष्ठीं माधवादि त्यांसि वहाती. ॥ ८ ॥

---

१ जनरक्षणाची. २ मेघ. ३ यशस्वी. ४ सत्-हृत्. अंबुरुह-कोश-अलि, साधूंचें हृदय हेंच कोणी एक कमल त्यांतील कोशांतील अलि (=भ्रमर). ५ मोक्ष देणाऱ्या देवांस(=बलराम आणि कृष्ण.) ६ स्तवन करिती. ७ देव. ८ शुद्ध सुकृताचे समुद्रच असे जे प्रभूचे मित्र त्यांत. ९ मत्सरबुद्धि. १० गोपवेषें. ११ लक्ष्मीसदनें= कृष्णें. १२ पराजय जहालेल्यानें. १३ अजिंकणारास. १४ वाला= बाला. १५ लज्जा. १६ भव-गद-विपत्-अगद-गदाधर-बळ, संसाररूपी रोगास आणि विपत्तीस-औषध असे कृष्ण आणि बळराम.

त्या बाळांपरि भूत[1]- ॥ प्रभवहि खेळांत जाहला परिभूत[*]. ॥
लागे त्या श्रीदा[2] मा- ॥ नाथा पृष्ठींच वाहणें श्रीदामा. ॥ ९ ॥
जो प्रिय सात्वतऋषभा[3] ॥ वाहे तो भद्रसेन पृष्ठीं वृषभा. ॥
असुर सबळ देवातें ॥ घे जनिं पृष्ठीं प्रलंब बळदेवातें. ॥ १० ॥
असुर पराजित वाहे ॥ रामा, नेणति हरीविणें कितवा हे. ॥
आला बळ हातातें ॥ स्वांतांत ह्मणे, "करीन" खळ, "घातातें." ॥ ११ ॥
क्षुधित श्वा[4] चिरें[5] सरस- ॥ क्रव्येच्छू[6] लोहगोळकाचि रस-रस[7] ॥
करित्या[8] घे तो कवळ ॥ स्वांर्त; तसा यास रोहिणी-तोक-बळें[9]. ॥ १२ ॥
त्या सुरवर्यां[10] देहि- ॥ ध्येयीं[11] घेउनि, वटागमर्यादेहीं[12] ॥
लंघुन, घोटकरीन[13] ॥ क्षिप्र पळे कीं, "तदस्र[14] घोट करीन[15]." ॥ १३ ॥
स्वमतें नकळत हरिला, ॥ चोरें निधिसा, बळ प्रलंबें हरिलें[16]. ॥
जऱ्हि काढी पळ, वेची ॥ बळभर[17] बळभर[18]; खळा न वहु पळवेची. ॥ १४ ॥
प्रकटि खरा रूपा, पी ॥ जें गगनाला, असें शरीरू[19] पापी. ॥
लाजे काजळ कांया[20]; ॥ गिरि उपमा मूर्तपातका जळका या. ॥ १५ ॥
जेविं तमोनग[21] नीच ॥ स्वर्णालंकार-धर भरे गगनींच, ॥
सतडिन्मेघोपरी[22] ॥ चंद्र जसा, राम शोभला त्याचिपरी. ॥ १६ ॥
ऐसें जगदभिरामा[23] ॥ उडवुनि जेव्हां प्रलंब ने नभिं रामा; ॥
करूनि निरीक्षणें[24] काय- ॥ क्रौर्यातें,[25] बळहि भय धरी क्षण काय[26]! ॥ १७ ॥
बळ त्या शत्रुशिरासी ॥ निज मुष्टीनें, न लावितां उशिरासी, ॥
फोडि, जसा शिखरीला[27] ॥ वज्रें हरि[28]; काय भूतळीं विखरीलीं[29]. ॥ १८ ॥
मारुनि खळ देवातें, ॥ गोपातें, सुखवि; तोहि बळदेवातें. ॥

---

१ भुतांची (=जगाची) उत्पत्ति आहे ज्यापासून. २ संपत्ति देणाऱ्या (मानाथा= लक्ष्मी-पतीस). ३ यादवपतीस. ४ कुत्रा. ५ फार दिवस. ६ मधुर मासा विषयीं इच्छा आहे जास. ७ रसरस करणारास. (अतितप्तास). ८ आपला मृत्यु. ९ बळराम. १० सुरश्रेष्ठास. ११ मानवांनीं ध्यान करण्यास योग्य जाचें. १२ वटवृक्षमर्यादेस. १३ अश्व आणि हत्ती यांचा श्रेष्ठ (वेगाविषयीं व शक्तीविषयीं). १४ त्याचें रक्त. १५ पिऊन टाकीन. १६ नेला. १७ त्याचें सर्व बळ. हें 'वेची' याचें कर्म. १८ बळरामाचें वजन. १९ दूष्ट. २० शरीराला. २१ अंधाराचा पर्वत. २२ स-तडित्-मेघ= विजेसकट जो मेघ त्यावर. २३ जगत्- अभिराम- जगाचा मूर्तिमंत हर्ष. २४ अवलोकन. २५ शरीराच्या क्रूरपणाला. २६ जसा कांहीं धरितोच असा भासला. २७ पर्वताला. २८ इंद्र. २९ विदारून पाडिला. * पराजित.

मराठी ग्रंथ संग्रहालय

गाजविति समस्त वनें ॥ जयजयनादें पयोधर[1]सम स्तवनें. ॥ १९ ॥
देव-निव[2]ह रामाला ॥ दिव्य सुमाच्या निजाहित[3]हरा माला ॥
अर्पिति, कीं हरसाच ॥ द्युति[4]कीर्तिबळें अमर्त्य[5]रिपुहर साच. ॥ २० ॥
आलिंगुनि बळभद्र ॥ प्रियसख वदती, "तुझ्या भुजीं बळ भद्र[6] ॥
वर्धिष्णु[7] महाबाहो[8], ॥ राहो; ऐसाचि विजय सुमहा[9] वांहो[10]." ॥ २१ ॥

इति श्रीमत्कृष्णविजयेष्टादशोध्यायः ॥ १८ ॥

गोपशिशूंचा विसर[11] ॥ क्रीडा करि, तों पडे पशूंचा विसर; ॥
नव यवसीं[12] ज्यांसि रती[13], ॥ मुंजारण्यात[14] गोधनें त्या शिरती. ॥ १ ॥
भ्याले बाळक सारे ॥ ह्मणती, "आला स्वघातकाळ कसा रे!" ॥
हुडकिति, धांवति मागें ॥ कष्टें, निजगोधनासि पावति मागें[15]. ॥ २ ॥
तृषिताशिशुमुखें सुकलीं, ॥ वळलीं निज गोधनें वनीं जीं चुकलीं. ॥
हरिशब्दें हंबरती, ॥ गोधन-सेना[2] स्वरें भरी अंबर[16] ती. ॥ ३ ॥
कठिन फिराया गहन[17]; ॥ ग्रासकरा[18]या अशांत आला दहन[19]; ॥
त्या पवमान[20] सहाय; ॥ त्रस्त पशुप[21] ह्मणति मृदुल-मानस, "हाय[22]!" ॥ ४ ॥
ह्मणती गोप, "हरि! लया[23] ॥ पावतसों; तुजाविणे दुजा न हरिल या. ॥
आला कीं अंत[24], रति- ॥ प्रद[25] पद रामा, तुझे अहा अंतरती! ॥ ५ ॥
हा[26] आज न रक्षा[27] हो[28] ॥ शरणागत दीनदासजन; रक्षा हो. ॥
वांचेल कवण वा? हा! ॥ कल्पांताग्नीस पाडि ठक वणवा हा." ॥ ६ ॥
मुंजवनानलदर[29] हा ॥ जाणोनि ह्मणे, "उगे," दयाजलद[30], रहा; ॥
झांका रे नयनां; हीं ॥ रक्षितसें गोधनें, तुह्मां भय नाहीं." ॥ ७ ॥
झांकी जन नेत्रास; ॥ क्षणमात्रें तो लया अजन[31] ने त्रास[32]. ॥
पी भगवान् कृष्णपथा[33]; ॥ न विनाशति लागले[34] भले कृष्णपथा[35]. ॥ ८ ॥

---

१ मेघासारिखे. २ समुदाय. ३निज-अहित-हर=स्वशत्रु नाशकास. किंवा 'निज'= आपल्या (देवांच्या). ४तेज. ५अमर्त्य (=मनुष्य)- रिपु-हर=दैत्यहर. ६ कल्याण. ७ वृद्धिंगत. ८ हे पराक्रमी. ९ उत्तम आनंदाला. १० वोलावो. ११ समुदाय. १२ गवतांत. १३ प्रीति. १४ मुंज गवताच्या रानांत. १५ माग लाऊन. १६ आकाश. १७ अरण्य. १८ खाण्यास. १९ वणवा. २०वारा. २१ गोप. २२खेद. २३नाशाला, २४ मरण. २५ प्रियकर. २६हे आह्मी दासजन. २७राख. २८ हांवी. २९ मुंजवन अनल-दर= मुंजवनांतील वणव्याचें भय. ३० कृष्ण. ३१ जन्मराहत=कृष्ण. ३२ भय. ३३ अग्नीला. ३४ लागलेले. ३५ भगवद्भक्तीला.

काळ भयानक दापी[1] ॥ न हरिजना; विषय दे भया न कदापी. ॥
घे घनवात कवि तुळे,[2] ॥ हरिच्या स्मरणीं भवादि घातक वितुळे. ॥ ९ ॥
उघडुनियां नयनातें ॥ भांडीरवटा[3]प्रती निजानयनातें[4] ॥
जाणुनि, हासति चित्रें[5] ॥ मित्रें; जालीं तटस्थ; भासति चित्रें. ॥ १० ॥
ताप हरि[6] अमृतगुरुचि[7] ॥ क्षणभरि; तापघ्न तरि हरि अमृतगुरुचि[8]. ॥
त्याचा, तत्[9]पा, दास ॥ प्राप्त कसा होय, सेविता पादास? ॥ ११ ॥
रक्षुनियां हा निकर,[10] ॥ स्वविरहताप व्रजावळीहानिकर,[11] ॥
जाउनि सांजे, हरिला; ॥ जीवनदत्वें[12] घनत्व[13] साजे[14] हरिला. ॥ १२ ॥
सांगति तों शिशु[15] भवनीं,[16] ॥ "बळकृष्णीं आजि नाशिलें अशुभ[17] वनीं;— ॥
न तसा यम, रावण वा[18], ॥ एक असा असुर, आणि दुसरा वणवा. ॥ १३ ॥
हा निरवधिबळ[19] देव ॥ प्रवर[20] पळामाजि असुर वधि बळदेव. ॥
कृष्णें जीवनदानें ॥ वांचविले दहनिं सर्व जीव नदानें." ॥ १४ ॥
ऐसा निज तोकांनीं ॥ कथिला वृत्तांत; ऐकुनी तो कानीं. ॥
देवप्रवर वसुमती-[21] ॥ वरि, हें समजाति सदार[22] वल्लव[23] सुमती[24]. ॥ १५ ॥

इति श्रीमत्कृष्णविजये एकोनविंशतिमोऽध्यायः ॥ १९ ॥

बळकृष्ण उदारमती ॥ घनकाळींही वनांतचि सदा रमती. ॥
होतां वृष्टि उभविती ॥ वृक्षकोडी[25]; गुहांत सुख अनुभविति. ॥ १ ॥
हरिनें धेनु वळाव्या ॥ शब्दें, त्या जवळुनी न दूर ढळाव्या. ॥
त्या स्रवती बृहदूधें[26] ॥ ऐकुनियां वेणुरव सुखावह दूधें. ॥ २ ॥
वदनीं शशिरुचिरांनीं[27] ॥ प्रभु घेती कंदमूळफळरुचि रानीं. ॥
सेविति दधिभात शिळा, ॥ गोपांसह तें करूनियां ताट शिळा. ॥ ३.

इति श्रीकृष्णविजये विंशतिमोऽध्यायः ॥ २० ॥

---

१ दडावी. २ उपमेला ३ वटविशेष. जेथें पूर्वी खेळत होते तेथें. ४ निज-आनयन-आपल्या आणण्याला. ५ चमत्कारिक. ६ हरणकरी. ७ अमृत-गु-रुचि=अमृत वर्षाव करणारीं किरणें ज्याचीं त्या चंद्राची प्रभा. ८ अमृत-गुरु=मोक्षप्रद. ९तत्=पा त्या कारणाच्या स्वामीस-चंद्रास. १० समुदाय. ११ व्रज-अबळा-हानिकर, गोकुळांतील स्त्रीयांस हानि करणारा असा (विरह-ताप). १२ जीवरूपी जीवन (पाणी)देई म्हणून. १३ मेघता. १४शोभे. १५ मुलगे. १६ घरांत. १७ भय. १८ अथवा. १९ निर-अवधि-बळ, अमर्याद बळ ज्याचें. २० देवश्रेष्ठ. २१ पृथ्वीवर. २२ सकलत्र. २३ गौळी. २४ सु मती=सुबुद्धि. २५ वृक्षांच्या डहाळ्या. २६ बृहत्-ऊधें=मोठ्या कासेनें. २७ शशि-रुचिर- चंद्रवतु सुंदर मुखांनीं.

होतां शरदागम[1], जे ॥ दावि वनश्री[2] नटोनि वरदा[3] गमजे[4], ॥
ते कां पाहे नाका- ॥ धीशवनीं[5]? वर्णितांहि वाहे[6] नाका. ॥ १ ॥
जो[7] बहु दे कुतुक; मळें- ॥ रहित जळें[8], विकसितें करी ऋतु कमळें; ॥
तीं चषकेंचि[9] मधुरसें[10] ॥ भरि; सेवुनि गाति मधुप[11] फार मधुरसें[12]. ॥ २ ॥
शीतसुरभिसुख[13] रानीं ॥ मारुत[14], अलिंनीं[15] विनादितीं[16] मुखरांनीं[17]. ॥
फळदळकुसुमें[18] ऋतु जीं ॥ साजि[19] विपिनें[20] म्हणाति, "लघु[21] वनें मेरु! तुजीं." ॥३॥
अद्भुत परिमळे[22] याचा; ॥ विभव[23] उणा चंदनाढ्य[24] पारि मलयाचा[25]. ॥
कीं तेथें अहि[26] तगती[27]; ॥ येथें नाहींच सर्वथा अहितगति[28]. ॥ ४ ॥
कुसुमितवनमधुपानीं[29] ॥ मदमत्तांनीं अनेकखगमधुपांनीं ॥
अद्रि[30], सरोवर, सरितां[31], ॥ नादित. राखे न ठावें[32] गीतरस[33] रितां[34]. ॥ ५ ॥
सबळ[35] कमळनाभ[36] वनीं ॥ त्या रत; लीलोत्कं[37] गोपललना भवनीं. ॥
ने चाराया सुरभी[38], ॥ जो भगवान् विश्वपावन[39] यशें सुरभी[40]. ॥ ६ ॥
वाजवि माधव मुरली, ॥ विश्वमनोवृत्ति ऐकतां रवें[41] भुरली[42]. ॥
व्रजयुवति भुलति, काया ॥ स्तंभ पडे; कल्पवृक्ष विभु[43], लतिका[44] या. ॥ ७ ॥
नटपतिसम जगदर्ह[45] ॥ श्रुतियुगलीं[46] कर्णिकार, धरि शिरिं बर्ह[47], ॥
स्वर्णवसन[48], वनमाला; ॥ वाजवि वेणू; सवें सख्यांचा पाळा. ॥ ८ ॥
हृद्यविलोकन[49], कपट- ॥ प्राकृत[50], कृतिमृग्य[51], विधिगुरू[52], कनकपट[53], ॥
तो व्रजराज नटपती ॥ देखाया सर्व गोपिकाजन टपती. ॥ ९ ॥

---

१ शरत्, आगम=शरदृतूचें येणें. २ अरण्यशोभा. ३ कृष्णाला. ४ढौल, हावभाव. ५ नाक-अधीश- वन= नंदनवनांत. ६ मुरडी. ७ ऋतु. ८ पाणें. ९ पात्रें. १० मधुरसानें. ११ मधु-प= मधु पिणारे, भ्रमर. १२ गोड. १३ शीतळ सुवासापासून सुख आहे ज्याच्या असा ('मारुत'). १४वायु, १५ भ्रमरांनीं. १६ नादभरितीं. हें 'रानीं' याचें विशेषण. १७शब्दकरांनीं. १८फळें, पत्रें, आणि पुष्पें इहींकरून. १९ शोभवी. २० अरण्यें. 'म्हणती' याचा कर्त्ता 'तीं' (अध्याहृत). २१ लहान. २२ सुगंध. २३भाग्य. २४ चंदनानें भरलेला. २५मलयाद्रीचा. २६ सर्प. २७वसतात २८ अहिताची (शत्रूची) गति. २९ प्रफुल्लितवनांतील मधुपान करून मदमत्त झालेले जे अनेक आकाशांत गमन करणारे भ्रमर यांहींकरून. ३० पर्वत. ३१ नदी. ३२ ठिकाण. ३३ गायनरस. ३४ रिकामा. ३५ बळरामासहित. ३६ कृष्ण. ३७ लीलेविषयीं उत्कंठित. ३८ गाई. ३९विश्वपवित्र. ४० कामधेनु, कल्पवृक्ष. ४१ शब्द. ४२भाळी. ४३ प्रभु. ४४ वल्लि. ४५ जगत्पूज्य. ४६ दोन्ही कानांत. 'कर्णिकार'= अलंकार विशेष; कणियार. ४७ मयूरपुच्छ. ४८ सुवर्णकांतीचें आहे वस्त्र ज्याला. किंवा पीतांबर, 'धरि' याचें कर्म. ४९ मनोहर पाहणें. ५० कपटानें प्राकृत=सगुण. ५१मानवांनीं शोधण्यास योग्य. ५२ब्रह्मदेवाचा बाप. ५३पीतवासा.

वेणु मधुरतर[1] वाजे ॥ वनिं; मोहे युवति, पी तदमृतरवा[2] जे. ॥
हृदयसरीं[3] मदनकरी[4] ॥ धृतिनलिनोत्धृतिस[5] उशिर उन्मद[6] न करी. ॥ १० ॥
वृंदावनिं तारी ती ॥ वर्णिति हरि वेणुचीच वनिता रीती. ॥
गाउनि देवास, "रहा ॥ विरहा," म्हणती, "उगा;" क्रमिति वासर हा. ॥ ११॥

इतिश्रीमत्कृष्णविजये एकविंशोध्यायः ॥ २१ ॥

हेमंतीं सुकुमारी[7] ॥ कात्यायन्यर्चनव्रतासि[8] कुमारी ॥
करिती, कृष्ण निजपती ॥ हो[9] या कामें[10]; सतीस[11] पूजुनि, जपती[12]. ॥ १ ॥
यमुनेच्याचि शुभवनीं[13] ॥ न्हाती, जों सुप्त[14] गोप गो शिशु भवनीं[15]. ॥
मूर्ति रुचिर[16] सिकतेची[17] ॥ अर्चिति[18]: मनिं हरिचिया रुचि[19] रसिकतेची[20]. ॥२॥
त्या सुनियमपर[21] मास ॥ व्रत करिती, चिंतुनी सतत परमास[22]. ॥
म्हणती, "अभिनव[23] राहो ॥ प्रेम जननि! हरि यशः-सुरभि[24] नवरा[25] हो." ॥ ३॥
त्या युवतिजनिं[26], सकाळीं ॥ स्नानें करितां, क्रमूनि[27] रजनिस, काळीं[28] ॥
जाणुनि भक्ति, वरद[22] ये ॥ ससख[29]; तयांवरि करी विमुक्तिवरें[22] दये. ॥ ३ ॥
खेळति जळिं; हरिसिच या ॥ गाति; आशांतचि तटींचिया हरि[30] सिचया[31]. ॥
समधिष्ठुनि[32] नीप[33], गडी ॥ हांसवि; हांसे स्वयें फिरवुनी पगडी. ॥ ५ ॥
हरि तत्धृदया; गेया[34] ॥ लीला करि; त्यां म्हणे, वरद, "या गे या; ॥
घ्या सुमुखि, सपदि[35] वसन[36], ॥ प्रकटी जों रूप नाम रसप[37] दिवस न. ॥ ६ ॥
यमुनेचा सहवास ॥ त्यागा, घ्या एकएक वा[38] सह[39] *वास. ॥
नर्म[40] न हें, अनृताहि[41] मी ॥ न वदें, व्रत-कर्शिता[42] तुम्ही प्रसृत[43] हिमीं."[44] ॥ ७॥

---

१ फार मधुर. २ तत्- अमृत- रव=तिच्या ( वेणूच्या ) अमृततुल्य ध्वनीस. ३ हृदयरूपी सरोवरीं. ४ मदनरूपी हत्ती. ५ धृति-नलिन- उत्- हृति=धैर्यरूपी कमळणीच्या वरउपडुनकाढण्यास. ६ मदोन्मत्त. ७ अत्यंत तरुण. ८ कात्यायनि- अर्चन-व्रत=पा[illegible]च्या पूजेच्या व्रताला. ९ होवो. १० इच्छेनें. ११ पार्वतीस. १२ 'जपती'=जप करिती. १३ पवित्र उदकांत. १४ निद्रिस्त. १५ घरीं. १६ सुंदर. १७ वाळूची. १८ पूजिती. १९ आवड. २० शृंगाराची. २१ नियमाविषयीं तत्पर. २२ कृष्णास. २३ फार. २४ कीर्तीविषयीं सुरभि (=कामधेनु). २५ होवो. २६ स्त्रीलोकांत. २७ घालऊन. २८ योग्यकाळीं. २९ गड्यांसहित. ३० हरणकरी. ३१ वस्त्रांस. ३२ चढून. ३३ वृक्षविशेष. ३४ गाण्यास योग्य. ३५ सपदि=लौकर. ३६ वस्त्र. ३७ रस-प=रस ( पाणी ) आकर्षण करून घेणारा= सूर्य. ३८ अथवा. ३९ एकत्र. ४० थट्टा. ४१ खोटें. ४२ व्रतानें कृश झालेल्या. ४३ पसरलेल्या. ४४ थंडींत. * वस्त्र.

ऐकुनि यापरि हास- ॥ प्रेमव्रीडाकुळाबळा[1] परिहास, ॥
निघति, न वसति; हिंवाळा[2] ॥ बहु; त्या उठती, जळीं न बसतिहि बाळा[3]. ॥८॥
प्रभुसि म्हणति धन्या या, ॥ "न करीं, वसनें हरूनि, हरि, अन्याया. ॥
जाणों, तुज, सानंद[4] ॥ व्रज मानी; श्लाघ्य[5] तूं बहु जसा नंद. ॥ ९ ॥
तूं प्रिय, सदयहि, मानें ॥ श्रेष्ठहि; कांपे जळांत ह्रदय हिमानें. ॥
अबळांस वसनदानें ॥ रक्षावें त्वां दयामृतरसनंदानें[6]. ॥ १० ॥
हे श्यामा! रमणीया! ॥ त्वदुदित[7] करूं, दासिका तुझ्या रमणी या. ॥
धर्मज्ञा, दे वास[8]; ॥ स्पष्ट; न देतां, कथूं धरादेवास[9]." ॥ ११ ॥
देव वदे प्रमदांसी[10], ॥ "वचनातें करितसां जरी ममदासी, ॥
सत्वर कूलासि[11]च या; ॥ मागुनियां घ्या मनोनुकूला[12] सिचया." ॥ १२ ॥
वेधी हरिहि मन; दिला ॥ वचनाला मान, धैर्य हरि हिम; नदिला ॥
सोडिति; कांपति; लाजे ॥ त्यजिति; नको ते धरावि कां पतिलों[13] जे? ॥ १३. ॥
नुरवि मनीं पापासी ॥ जो हरि, तत्पादपूतनीपापासीं[14] ॥
येती सुदति[15], शयांनीं[16] ॥ स्मरगृह झांकुनि, तटासि मुदतिशयांनीं[17]. ॥ १४ ॥
निर्मळ भाव सतींचा ॥ देखे हरि सुकृतसुगुण*भावसतींचा; ॥
प्रीत परात्पर महितें[18] ॥ स्कंध-निहितवस्त्रें[19] तो वदे परम हितें[20]. ॥ १५ ॥
वदतो सस्मित लपनें[21], ॥ "तीर्थी[22] केलीं व्रतीं विवसन[23] स्नपनें[24]; ॥
करूनि अशा परमागा[25] ॥ देवाच्या, मागतीं कशा वर मागा[26]? ॥ १६ ॥
हो[27] व्याकुळ न मन; करा[28] ॥ जोडुनि, अंजलि शिरीं धरा; नमन करा. ॥
येणें पाप सरेल, ॥ व्रतफळसंसिद्धिची कृपा पसरेल." ॥ १७ ॥

---

१ व्रीडा- आकुळ- अबळा= हास्य प्रेमाच्या लज्जेनें व्याकुळ अशा बायका. 'परिहास'=थट्टा. २ थंडी. ३ स्त्रिया. ४ आनंदानें. ५ स्तुत्य. ६ दयारूपी अमृतरसाचा नद. ७ त्वत्-उदित, तूं सांगितलेलें. ८ वस्त्र. ९ राजाला=नंदाला. १० स्त्रियांला. ११ तीराला. १२ मन-अनुकूल, मनास आवडेल त्या. १३ कृष्णाला. १४ त्याच्या पायानें पवित्र जहालेल्या कदंब वृक्षाजवळ. १५ स्त्रिया. १६ हातांनीं. १७ मुत्- अतिशयांनीं= फार आनंदानें. १८ पूजित. १९ स्कंधीं वस्त्र आहे धरिलें जाणें. २० मनासारिखें. २१ तोंडानें २२ यमुनेच्या तीर्थोदकीं. २३ निर्वस्त्र=नागव्यानें. २४ स्नानें. २५ मोठ्या अपराधास. २६ मागतां. २७ होवो. २८ हस्तास. * पुण्य, सद्गुण, आणि कांति (=सौंदर्य ) यांचीं रहाण्याचीं स्थळें; हें पद, "सतींचा" याचें विशेषण आहे.

“चुकलों वाटेला,” जे ॥ व्रतविच्युति[1] ते खरीच वाटे; लाजे ॥
विसरुनि, नमिति हरिस; त्या ॥ जाणाति कीं हेचि[2] सर्व दोष हरि[3] सत्या[4]. ॥ १८ ॥
सर्वजगद्भावन[5] ती ॥ स्त्रींची सकरुण[6] विलोकि सद्भावनति[7]. ॥
स्वाधिगमायासवती[8] ॥ गौरवि; कीं श्रीसही गमाया सवती. ॥ १९ ॥
रक्तसितासितहरितें[9] ॥ वस्त्रें, नेसुनि सकाम[10] विलसित[11], हरितें ॥
पाहति, निरुपमनिर्यती[12]; ॥ चिंतिति यच्चरण- देवतरु[13] मनिं यती[14]. ॥ २० ॥
जे मनिं, दे वर ते हा[15]; ॥ “सत्वरचि,” म्हणे “पुरेल,” देव, “रतेहा[16]. ॥
येत्या रजनीमाजी ॥ संगति पावाल सादर[17] जनीं माजीं.” ॥ २१ ॥
करि कुतुका[18] मदनारि-[19] ॥ प्रियगुण; तोषवि समस्त-कामद[20] नारी. ॥
हरिविण गणिति व्रज न ॥ प्रियतम; वचनें परंतु करिति व्रजन*. ॥ २२ ॥
वारुनि महागायी[21] ॥ स्त्रीकामाची, सदिष्टतम[22] हा गायी[23]. ॥
चारित गेला वृंदा-[24] ॥ विपिनाहुनि दूर सबळ[25] हरि गोवृंदा[26]. ॥ २३ ॥
तारी दीन गजा[27], ती ॥ सुखमूर्ति[28] स्तवि पदोपदीं नगजाति[29]. ॥
न करिति अन्यायासीं ॥ उपकृतिची जोडि; कीं न अन्या यासीं. ॥ २४ ॥
स्वसुखाची संवगायी ॥ करित वनीं, गोपवृंदवासव[30] गायी ॥
ने यमुने यदुप रमा-[31] ॥ पति; कीं करणार यज्विमद[32] तदुपरमा[33]. ॥ २५ ॥
करिति नमन दीसलिला[34], ॥ पीति सगोधन[35] सुधोपम[36] नदीसलिला[37] ॥
सोडिति पशु तदुपवनीं[38], ॥ वसति तटीं; सुखद जें सुरभिमृदुपवनीं[39]. ॥ २६ ॥

इति श्रीकृष्णविजये द्वाविंशोऽध्यायः ॥ २२ ॥

---

१ व्रतभंग. २ कृष्ण. ३ हरण करितो. ४ स्त्रिया. ५ सर्वजगाची उत्पत्ति ज्यापासुन तो= कृष्ण. ६ कृपाळू (कृष्ण). ७ सद्भावयुक्त नमस्कार. ८ स्व-अधिगम- आयासवती= आपण (कृष्णानें) प्राप्त व्हावें याविषयीं प्रयत्न करणाऱ्या. ९ तांबडीं, शुभ्र, काळीं, आणि हिरवीं. १० कामातुर. ११ सुंदर. १२ ज्यांच्या सुदैवास उपमा नाहीं अशा. १३ कल्पतरू. १४ सन्यासी १५ जे वर (मिळावे असें त्यांच्या मनीं होतें) ते हा (कृष्ण) दे. १६ सुरताची इच्छा. १७ आदरयुक्त. १८ कौतुकास. १९ सांबास प्रिय आहेत गुण ज्याचे. २० स[illegible]च्छा पूर्ण करणारा. २१ कमतायी, इच्छा. २२ सज्जनास अत्यंत प्रिय. २३ गायन करी. २४ वृंदावनापासून. २५ बळरामासकट. २६ गाईंच्या कळपास. २७ गजेंद्रास. २८ सुखदेणारी मूर्ति (प्रभुची). २९ वृक्षजाति. हा ‘स्तवि’-चा कर्ता. ‘अन्यायासीं’=अन्य-आयासीं, (स्तवनाशिवाय) दुसऱ्या आयासांनीं- ‘यासीं’= कृष्णास. ३० गोपसमूहाचा इंद्र=कृष्ण. ३१ कृष्ण. ३२ यज्ञ करणारे जे (ऋषि) त्यांचा गर्व. ३३ तत्- उपरमा= त्यांच्या गर्वाच्या नाशास. ३४ हर्षास पडलेलीस (यमुनेस). ३५ गाईंच्या समवेत. ३६ अमृततुल्य. ३७ नदीच्या पाण्यास. ३८ त्याच्या जवळच्या रानांत. ३९ सुवास आणि मृदु वारे यांहीं. * गमन.

गोपांच्या भूक वेळा[1] ॥ लागे. मग विनविले स्वयंभू[2] केवळा.[3] ॥
येति दयोदधिभक्त[4] ॥ प्रातःकाळीं, न आणितां दधिभक्त.[5] ॥ १
निजजन[4] अन्नपर[6] महा, ॥ जाणे, द्विजदार[7] सुप्रसन्न परम, हा.[8] ॥
क्षुद्बाधा[9] सकळवेळा[10] ॥ मित्रांच्या; ये दयांबुधीस[11] कळवळा. ॥ २ ॥
हरि जो दासत्रासे,[12] ॥ प्रभु धाडी गोप ते तदा सत्रास.[13] ॥
चिंतुनि नाकजय,[14] जनीं ॥ जवळि सुरांच्याचि[15] निरत[16] सुद्विज[17] यजनीं![18] ॥ ३ ॥
सांगे तो, "यजन मुनी ॥ कारिति सुरांचें; तदंघ्रि[19] तोयज नमुनी, ॥
आर्याच्यां[20]- मागोनि, ॥ मन्नाम कथूनि, अन्न घ्या मागोनी. ॥ ४ ॥
निजलोकास त्राते[21] ॥ करिती 'आंगिरसनामका सत्रा[22] ते. ॥
जवळि सदा सवशाला[23] ॥ आहे;" कथि त्या जना पदास वशाला. ॥ ५ ॥
गेले तोकेंमृग[24] जळा ॥ धांवुनि विषयेच्छु[25] विप्रलोकमृगजळा.[26] ॥
न हरी ताप सभा[27] जी, ॥ त्याची बरवी दुरूनि तापसभा[28] जी! ॥ ६ ॥
ते मूक[29] बधिर[30] अंध; ॥ श्रीशा[31] अमृतप्रदा[32] न अर्पिति अंध[33] . ॥
आले परतोनीच. ॥ श्रुत-महिमा[34] द्विजसमूह, पर[35] तो नीच. ॥ ७ ॥
"होउनि सन्नत[36] यांचा[37] ॥ साध्वीजन[38]; वृत्ति सुप्रसन्न[39] तयाच्या. ॥
भेटीचा मनिं काम,[40] ॥ स्वन्न[41] समर्पिल सुबुद्धिधाम[42] निकाम.[43] ॥ ८ ॥
'आलों रामासहित' ॥ श्रवणें वाटेल विप्ररामांस[44] हित. ॥
धृतिच्या[45] आया; सरिता[46] ॥ करुणेच्या[47]; नकरितील आयास रिता[47]." ॥ ९ ॥
नाशक जो अशिवांचा,[48] ॥ त्याची ऐकोन गोप ते अशि वाचा, ॥

---

१ समुदायास २ बळराम आणि कृष्ण. ३ अन्नासाठीं. ४ कृणभक्त ( गोप ). ५ दहींभात. ६ अन्नेच्छु. ७ ऋषिपत्न्या. ८ कृष्ण. ९ भुकेपासून पीडा. १० सर्व समुदायास. ११ कृष्णास. १२ दासांचीं भयें. १३ यज्ञाजवळ. १४ स्वर्गप्राप्ति. १५ देवांच्या. १६ तत्पर. १७ ते ब्राह्मण. १८ यज्ञ करण्याविषयीं. १९ तत्-अंघ्रि-तोय-ज= तत्पादकमल. २० बळराम दादाच्या मागून= आधीं बळरामाचें नांव सांगून मग माझें सांगा. २१ तारणारे. २२ यज्ञास. २३ यज्ञशाळा. २४ बाळ ( गोप )- रूपी मृग. २५ "विप्र-लोक" याचें विशेषण. २६ ब्राह्मण समुदाय हाच "मृगजळ." २७ समुदाय. २८ तपस्व्याचा कांति. २९ मुके. 'ते'=ऋषि ३० बहिरे. ३१ प्रभूस. ३२मोक्षदेणाऱ्यास. ३३अन्न. 'आले' याचा कर्त्ता 'गोप' (अध्याहृत). ३४गाजलेला आहे महिमा ज्यांचा. ३५ परंतु. ३६ अतिनम्र. ३७ मागा, प्रार्था. ३८ पतिव्रता- (ऋषिपत्नी) समुदाय. ३९ दयाळू. ४० इच्छा. ४१ सु- अन्न. ४२ सद्बुद्धीचें गृह, ( तो जन ). ४३ स्वेच्छेनें. ४४ ऋषिस्त्रियांस.४५ धैर्याच्या. ४६ नद्या. ४७ रिकामा, निर्फळ. ४८ संकटाचा.

त्याच्या स्वपदीं[1] नमनें, ॥ पत्नीशाळेंत करिति मुदधीन[2] मनें. ॥ १० ॥
ह्मणती, "देवि! भुकेले, ॥ आले श्रुत रामकृष्ण जे विभु[3] केले. ॥
अन्नें द्या अशना[4] या ॥ सानुचरा[5] प्रभुंस; शांतवा अशनाया[6]. ॥ ११ ॥
मतिस विभू दे वसति[7] ॥ स्वपदिं नताच्या[8], तयास भूदेवसती[9], ॥
सुखनिर्भर[10], परिसोनी ॥ होती, पावोनि अधन[11] ज्यापरि सोनीं. ॥ १२ ॥
त्यजिति तदा सवशाला, ॥ हरिला देखावया स्वदासवशाला[12]. ॥
त्या प्रभुभक्तिरुचिरसें[13] ॥ निघती घेउनि चतुर्विधान्न[14] रुचिरसें[15]. ॥ १३ ॥
न रुचे धाम निकाम; ॥ प्राशावी श्रीशनखसुधा[16] मनिं काम ॥
बहु बहु वासर; हातीं ॥ वेळा, मग भिउनि कां धवास रहाती? ॥ १४ ॥
गुरु बांधव पति तानीं ॥ बाळें या जरि निवारिल्या *पतितांनीं, ॥
सरितां[17] पारावारा[18] ॥ जाति; सुदुर्धरचि जेंवि पारा, वारा. ॥ १५ ॥
लंघुनियां बंधुकडे[19] ॥ गेल्या प्रेमापगा[20] स्वसुखसिंधुकडे[21]; ॥
कोण्ही परि वाराया, ॥ न शकति सोडूनि जाति परिवारा[22] या. ॥ १६ ॥
यमुनोपवनीं[23] महिला[24] ॥ शोभवि, त्या पाहती मुनींच्या महिला[25]. ॥
अद्भुतरूप मन हरी, ॥ सर्वामृतफलद सुरतरूपम[26] न हरी. ॥ १७ ॥
श्याम[27] भुवनवनमाळी[28] ॥ पल्लवशिखिपिच्छधातुंनीं[29], वनमाळी, ॥
कनकांबर[30] नटला. जे ॥ शोभा याची, तिला मदननट लाजे. ॥ १८ ॥
मुख रुचिर[31] सदलकांहीं[32]; ॥ नयनतुळे[33] ये न तामरसदल[34] कांहीं. ॥
श्रवणीं[35] उत्पल[36] विलसे[37]; ॥ ताप न तेजें स्मितामृत[38] न पळविलसे. ॥ १९ ॥

---

१ कृष्णपदीं. २ आनंदाच्या अधीन. ३ प्रभु. ४ जेवण्यासाठीं. ५ ससेवकास. ६ भूक. ७ ठाव. ८ नम्राच्या, सेवकाच्या ('मतिस'). ९ ब्राह्मणस्त्रिया. १० सुखानें भरलेल्या. ११ दरिद्री. १२ स्वसेवकांच्या स्वाधीन. १३ ईश्वर- भक्तीची जी गोडी तिच्या रसानें. १४ च्यार प्रकारचें अन्न; खाद्य, लेह्य, चोष्य, आणि पेय. १५ गोड असें. १६ कृष्णनखाचें अमृत. १७ नद्या, १८ समुद्रास. १९ आप्तलोकरूपी पर्वताचे कडे. २० प्रेमनद्या. २१ निज-सुख-समुद्रा जवळ. २२ आप्तजन- समूह. २३ यमुनेवरीलअरण्यांत. २४ भूमीला. २५ स्त्रिया. २६ कल्पतरूची उपमा देण्यास योग्य. २७ कृष्णवर्ण. २८ जगरूपी वनांतील माळी. २९ वृक्ष-पल्लव, मयूरपिच्छ आणि अलंकार यांहीं ('नटला'). ३० पीतांबरधारी. ३१ सुंदर. ३२ सत्-अलकांहीं- चांगल्या केसांनीं. ३३ नेत्रोपमेस. ३४ कमलपत्र. ३५ कर्णीं. ३६ कमळ. ३७ शोभे. ३८ हास्यामृत. * गुरु, बांधव, पति, तानींबाळें, या पतितांनीं (पाप्यांनीं) निवारिल्या (प्रतिबंधित केल्या) तरि.

सुहृ[1]दंसीं भुज, गाभा ॥ नीलद्युति[2]चा, तया महाभुजगा[3]भा, ॥
ठेवुनि हरि शोकमळा ॥ त्या द[4]क्षें फिरवि देववर तो कमळा. ॥ २० ॥
पाहुनि सुभं[5]ग असा, या ॥ म[6]धुपी इच्छिति प[7]दांबुजींच असाया. ॥
त्द्दयीं आणुनि काम- ॥ प्र[8]दमूर्तिस, भेटती सुबुद्धि निकाम. ॥ २१ ॥
चेतोह[9]रसुखकाय- ॥ ब्रह्मप्रेक्षणज बोलवे सुख काय? ॥
न धरी चलन व[10]पुं, तळ्या ॥ अमृताच्या पिउनि, दिसति अभिनव पुतळ्या. ॥२२॥
बोले हरि, "या हो या; ॥ आलां माझ्याहि मोदे[11] त्द्दया होया[12]. ॥
बरवें केलें येणें, ॥ मज देखायासि मन भुकेलें येणें. ॥ २३ ॥
मी आत्माप्रिय समजे ॥ ऐसें ज्यांला,- सु[13]शील, सक्रि[14]य, स[15]म जे, ॥
तेचि कुशल साच; र[16]ती ॥ धरुनी मद्भक्ति मत्फला आचरती. ॥ २४ ॥
देह-प्राण-मन-मति- ॥ स्व[17]जन-स्त्री-सुत-धनादि हीं प्रिय गमती ॥
संप[18]र्कास्तव लोकां ॥ ज्यां[19]च्या, प्रिय कोण त्याविणे अ[20]वलोकां? ॥ २५ ॥
जा, सेवा स[21]र्व; वाटे ॥ प्रेक्षिति[22] भो[23]गार्थि देव वा[24]सव वाटे. ॥
संपवितिल स[25]त्रास ॥ स्वर्गेच्छु पती; तुह्मासह न सत्रास." ॥ २६ ॥
ऐकुनियां असि वाणी, ॥ लागे त्द्दयां स्त्रियांचिया असिवा[26]णी. ॥
ह्मणति, "असें न वद, मना ॥ प[27]रुष गमे दीनवत्सला, भ[28]वदमना. ॥ २७ ॥
रक्षीं निज नि[29]गमांतें; ॥ आम्हा करवे न येथुनि जनिं ग[30]मांतें. ॥
विरहज्वरद[31]ढकालिल- ॥ स्वांतातें सदय पाय काय ढकालिल? ॥ २८ ॥
दासी प्राप्ता सहसा ॥ टाकुनि, म्हणतोसि काय आप्तांस 'हसा'? ॥
करिं वाचा सत्य जुनी; ॥ आलों स्व[32]जनत्रपाभयास त्यजुनी. ॥ २९ ॥

---

१ मित्रस्कंधीं. २नीलकांतीचा. ३महा-भुजग-आभ=महासर्पासारिखा. (सर्पांगा सारिखे भुज असणे ही शोभा मानितात. ) ४ उजव्या ( हातानें ). ५ सुंदर. ६ ऋषिपत्न्या. ७ पदकमळीं च. ८ इच्छित देणाऱ्या मूर्तीस. ९ चित्तास हरण करणारा आणि सुखानें भरलेला काय आहे ज्याचा असें जें ब्रह्म ( कृष्ण ) त्यास पाहिल्या वरून जहालेलें. १० शरीर. ११ आनंद १२ होण्यासाठीं. १३ सुस्वभावी १४ चांगली आहे क्रिया ज्यांची. १५ सर्वसमान. १६ प्रीति. १७ शरीर, प्राण, मन, स्वमति, स्वजन, स्त्री, सुत, धन, अदिकरून. १८ सहवासासाठी. १९"देहप्राण" इत्यादिकांच्या. २०अवलोकितां. २१यज्ञास. २२पाहती. २३स्वभागेच्छू. २४इंद्र. २५ सभय; त्रासलेले. 'तुह्मासह'= तुह्मां-शीं- बरावर. २६ वज्रासारिखी. २७ कठोर. २८ हे संसारदमना! २९ अभयवचनातें. ३० जाणें. ३१ विरहरूपी ज्वरानें फार गढूळ जहालें आहे अंतःकरण ज्यानें त्यास. ३२ आप्तांची लज्जा व भय.

पतिपितृजन[1]हीनां-ही ॥ आश्रय देणार सर्व जनही नाहीं; ॥
आम्ही तरि हरि! काय ॥ स्वगति किजे,[2] जीव जरि न परिहरि[3] काय? ॥ ३० ॥
तुलसीदाम[4] तुडविलें, ॥ निर्माल्य पदें अनादरेंहि उडविलें, ॥
धरुं दासि शिरावरि तें; ॥ तापाकुल[5] मन तया सुशिशिरां[6] वरितें." ॥ ३१ ॥
बोले दीनप[7] हा, ती ॥ काकुळती परिसुनी, "पदीं न पहाती, ॥
अघदृष्टि[8] पतितनयन[9]; ॥ स्तवितिल जे अन्य लोकहि, पति- तनय* न. ॥ ३२ ॥
तूम्ही सुकृतनदि[10] सती; ॥ अनुमोदिति हे पहा अमरजन[11], दिसती ॥
संतत[12] बहुधा माजा ॥ ध्यास असोंद्या मनांसि वहु; धाम्मा जा. ॥ ३३ ॥
स्वसुखा, स्नेहाला वा, ॥ न समृद्धी अंगसंग दे हा; लावा ॥
मद्रूपीं मन; या हो; ॥ पावा लौकरि सुखाब्धिधाम नद्यां[13] हो." ॥ ३४ ॥
अत्युत्सव वाटाया ॥ पत्यादिजनासि, जाति सववाटां[14] या. ॥
न मनुनि अपरा[15], धव दे ॥ प्रिय आलिंगन; गणूनि अपराध वदे. ॥ ३५ ॥
रत निज महिला[16] भजनीं ॥ हरिच्या, येणें गतभ्रम[17]हि लाभ जनीं ॥
मानुनि मुनि अतितर, ते ॥ जाले अनुतप्त[18] भवनदीपति[19] तरते. ॥ ३६ ॥
पति जाउं न दे, हातें ॥ धरि एका स्त्रीस, ते त्यजुन देहातें, ॥
पावे परं[20] माप तिला ॥ चैतन्यें[21]; दे स्वरूप परमा[22] पतिला. ॥ ३७ ॥
"जाउं न दीजे वाया[23] ॥ सिक्थ[24]," कथुनि हें, दयानंदी[25] जेवाया ॥
लागे बल्लवविसरा[26]- ॥ सह; जे न तदीयपादपल्लव विसरा[27]. ॥ ३८ ॥
कौतुक गाढें[28] करि; तो, ॥ त्या अन्नें, उदरें धरि जगा, ढेंकरितों. ॥
प्रेमें वहु धाला[29]; हे ॥ तृप्ति असी अन्यथा न बहुधां[30] लाहे[31]. ॥ ३९ ॥
तापवि वाडवमतितें[32] ॥ निजकर्म- मदाख्य[33] विष दुवाड; वमति तें. ॥
वर्णिति गुरुसम जाया, ॥ कीं या हेतु स्वलाभ गुरु समजाया. ॥ ४० ॥

---

१ पति आणि पितृजन यांपासून भ्रष्ट जहालेल्यांस. २ करावी. ३ सोडी, त्यजी. ४ माळा. ५ तापानें व्याकुळ. ६ अति शीतळ. ७ अनाथनाथ ( कृष्ण ). ८ निंदारूपी दृष्टि ज्यांची. ९ पापचक्षु. १० पुण्यनदी. ११ देव. १२ नेहमी. १३ हे नद्यांनो. १४ यज्ञाच्या समोरच्या वाटांनीं. १५ दुसऱ्या अशा. १६ स्त्रिया. १७गेला आहे भ्रम ज्यांचा. १८पश्चात्तापानें तापलेले. १९संसारसागर. २०श्रेष्ठ. 'माप'=लक्ष्मीपति, कृष्ण. २१ज्ञानयोगें. २२श्रेष्ठास. २३व्यर्थ. २४सित (भाताचें). २५कृष्ण. २६ गौळिसमूहासकट. २७ जे तदीयपादपल्लव ते न विसरा. २८ मोठें 'धरि'=जरि धरी तरिही. २९तृप्त झाला. ३० बहुत प्रकारें करून. ३१ पावे. ३२ ब्राह्मणमतीला. ३३ मदच (गर्व) आहे नाम ज्यास. * 'पति' आणि 'तनय' स्तवितील इतकेंच नव्हे परंतु इतर जनही इ०

"हरिची रति[1]दा रजनी- ॥ दिवस अधिक भक्ति सद्विर[2]ति दा[3]रजनीं. ॥
आपण त[4]द्रहित महा- ॥ सुज्ञानी;" ह्मणति, "वंचलों[5] स्वहित[6]महा." ॥ ४१ ॥
"भगवान् हरि, यदु[7]पकृति ॥ स्वजनमुखें सूचवी असी [8]यदुप [9]कृती; ॥
कर्ममदा[10]सव[11]पानें, ॥ नेणों न भजों दिल्यापदास वपानें. ॥ ४२ ॥
आम्ही अ[12]बुध न्याया- ॥ [13]चार्य जरी; स्त्रीहि सुमति बहु धन्या या. ॥
निज दृष्टि [14]असीम धुरा ॥ पी, या हरिगुणसुधानदी असि मधुरा. ॥ ४३ ॥
शास्त्र पढोनि अशास्त्री ॥ आम्ही; परि धन्य, कीं जयांसि अशा स्त्री. ॥
नेणों धर्म; ठकविते ॥ माया; भुललों; अभक्त, कर्मठ[15] कवि ते. ॥ ४४ ॥
कुल, विद्याभ्यास, कळा, ॥ व्रत,दीक्षा[16], कर्मकुशळता, या सकळा ॥
लागो आग; मनाला ॥ भक्ति न; हरिच्याहि विमुख आगमनाला. ॥ ४५ ॥
हरिली मति मायेनें; ॥ कर्मपथीं दीन हे भ्रमति [17]मायेनें; ॥
तारावें, स[18]दयाला ॥ हरि! शरणागत असों तुला सदयाला. ॥ ४६ ॥
घे न महाजन कानें, ॥ ऐसा अपराध परम हा जनकानें ॥
क्षमिजेचि; असी माया ॥ दीनें तुझी! साधु गातिल असीमा या." ॥ ४७ ॥
स्मरुनी निज पापातें, ॥ प्रार्थिति हरिला, धरूनि अनुतापातें. ॥
मुनि[19]मानसहंसाचें ॥ दर्शन घेती; न भय मनीं कंसाचें. ॥ ४८ ॥

इति श्रीमत्कृष्णविजयेत्रयोविंशोध्यायः ॥ २३ ॥

जो मुनिलोकां म[20]दंहा ॥ तारी सद्वृंद[21]- सेव्यपद [22]कामद हा, ॥
नरतनु हरि; या, गवळी, ॥ कळली, जे सिद्ध करिति हरि[23]यागबळी. ॥ १ ॥
जाणे, परि सानंदा, ॥ वृद्धा गोपांत जो नवासा, नंदा ॥
प्रार्थुनि, दास[24]भ्रमहा ॥ पुसतो कीं, "आज कोण हो संभ्र[25]म हा? ॥ २ ॥

---

१ प्रियकर. २ सद्भाव. ३ निजस्त्रियांच्या ठायीं. ४ त्या "सद्विरति-' 'रहित. ५ फसलों. ६ स्वहितोत्साहास. ७ यत्-उपकृति (जो उपकार). ८ यादवपालक. ९ कुशल. १० कर्म, आणि गर्व हेंच कोणी एक आसव ( मद्य ), त्याच्या पिण्यानें. ११ मांसानें= गर्वानें, मस्तीमुळें. १२ मूर्ख. १३ न्यायानें चालण्यास सांगणारे. १४ अमर्याद. १५ केवळ कर्ममार्गानें चालणारे. १६ यज्ञयागादि. १७भ्रमानें. १८सत्-अय=साधूंचें कल्याणच असा जो तूं तुजला. १९कृष्णाचें. २० गर्व हनन करणारा. २१ सत्-वृंद- सेव्य-पद=साधु-समूहानें सेवन करण्यास योग्य आहे पद ज्याचें. २२ इच्छा पूर्ण करणारा. २३ इंद्रयागा करितां बळी. २४ दासाचा भ्रम घालविणारा. २५ उत्साह, तयारी.

मी तों बाळ; परि सेवा[1] ॥ कां करितां, हें तुम्ही दयाळ परिसवा." ॥
लीलामानवदेहा[2] ॥ नंद क्रतुदेवताफळादि[3] वदे हा. ॥ ३ ॥
सुरपतियाग[4] रहाया ॥ युक्ति वदे वेदशास्त्रसागर हा या; ॥
मानेसाहि त्यांतें; ॥ गोद्विजमख[5] करवि, लावि साहित्यातें. ॥ ४ ॥
टाकुनियां जंभारि,[6] ॥ तद्यज्ञार्थ प्रकल्पितीं[7] संभारीं ॥
गोद्विजमख तैं करवी ॥ अखिलेश्वर[8] शक्रगर्वतिमिरैकरवी.[9] ॥ ५ ॥
अन्नांबरहेमानें[10] ॥ केले संतुष्ट विप्रवर हे मानें; ॥
होमाच्या अवसानीं[11] ॥ पूजुनि गायींस तर्पिती यवसांनीं.[12] ॥ ६ ॥
पूजिति सांग[13] नगा, (ती ॥ रीति मुखाचीच!) गोप सांगनें[14] गाती. ॥
हरि बळें[15] साप्त[16] अहार्य- ॥ प्रदक्षिणा[17] करिति सपशुवृंद[18] सहार्य.[19] ॥ ७ ॥
बहु विश्वास गमाया, ॥ लोकांला कृष्ण दाखवी मग माया:— ॥
रूपांतरं[20] विभु[21] धरि तो. ॥ पावनलीला[22] करूनि जगदु-द्धरितो. ॥ ८ ॥
धरुनि बृहद्वपुशि,[23] खरा ॥ गिरिसाचि वसे, अधिष्ठुनी[24] नग शिखरा.[25] ॥
त्यांसि म्हणे "परिसा, रे! ॥ वाटतसां इष्ट अवयवांपरि सारे. ॥ ९ ॥
कथितों सर्वांशि खरी ॥ वाणी; गोवर्धन स्वयें मी शिखरी.[26] ॥
शुचि[27] भावें बाळक हो, ॥ दर्शन दिधलें तुम्हांसि गोपाळक हो." ॥ १० ॥
तोषवुनि पशुप,[28] हरि[29] ॥ श्रीचा सेवी समस्त मग उपहार. ॥
श्रीवास,[29] हित कराया, ॥ जोडी आपणहि गोपसहित करा या. ॥ ११ ॥
सिंधु[30] अगाध रसाचा ॥ कुतुकाच्या हरि; नमी अगा! धरें[31] साचा. ॥
"धरुनी भाव नमा, गा," ॥ देव म्हणे, "यास वर निजावन[32] मागा. ॥ १२ ॥
तोषवि नयन मन; करा ॥ जोडुनि याला, धरा विनय, नमन करा. ॥

---

१ यज्ञास. २ लीलेनें मानवदेह धारण केलेल्यास. ३ यज्ञाची देवता व फळ इत्यादि. ४ इंद्रयाग. ५ गाई व ब्राह्मण यांकरितां यज्ञ. ६ इंद्र. ७ त्याच्या यज्ञासाठीं योजिलेल्या तयारींत. ८ अविनाश. ९ इंद्रगर्व हाच कोणीएक अंधार त्यास महान् सूर्यच. १० अन्न, वस्त्र, आणि सुवर्ण यांहीं. ११ शेवटीं. १२ गवतांनीं. १३ 'सांग'=यथाविधि. १४ सदार, बाइकांसह. १५ बळराम. १६ स-आप्त = आप्तांसकट. १७ पर्वतप्रदक्षिणा. १८ गाईंच्या समुदायासह. १९ वडिलां सहवर्तमान्. २० अन्य रूप. २१ प्रभु. २२ पवित्र क्रीडा. २३ मोठें देह. २४ चढून, (हें क्रियापद सकर्मक आहे). २५ पर्वतशिखरास. २६ पर्वत. २७ पवित्र. २८ गोप. २९ रमापति. ३० सागर. ३१ पर्वत. हें 'नमी' याचें कर्म. ३२ निजरक्षण.

होय जना दर[1]कारी ॥ हिंसक, त्या मूढ जे अनादरकारी. ॥ १३ ॥
वंदा हो, गोत्रातें[2]; ॥ देइल कल्याण आमुच्या गोत्रातें[3]. ॥
हा प्रभु गोवर्धन[4] हो, ॥ गोवृद्धि करू; यथार्थ गोवर्धन[5] हो[6]." ॥ १४॥
करवी याग असा; या ॥ जाय जनासह मग, स्थळास असाया. ॥
त्याच्याचि पदीं नमना ॥ करितों, स्थिति देउ दीनसख[7] दीन मना. ॥ १५ ॥

इति श्रीकृष्णविजये चतुर्विंशोऽध्यायः ॥ २४ ॥

मद[8]भाजन कोपाया ॥ इंद्र, करी[9] हरि अमर्ष[10]जनकोपाया; ॥
भंगी काम खरा, हे ॥ गोष्टि कळे देव[11]नायका, मख राहे. ॥ १ ॥
मखभंगें शतकोटि- ॥ प्र[12]हरण गणि गोप[13]मंतुच्या शत कोटी. ॥
त्वद्दायें न सा[14]मावेचि ॥ क्रोध;अदंडा नया स[15]सामा वेची. ॥ २ ॥
जडले अंगा रचिते ॥ ताप, न डोळे, रुड[16]ग्निअंगारचि ते; ॥
श्वासोच्छ्वासाहि भाते; ॥ त्याचीच न सोसवे तयासाहि भा[17] ते! ॥ ३ ॥
कोपें चोळूनि करा, ॥ वाहे कल्पांतकर[18]पयोधरनिकरा. ॥
सांगे, "जाऊनि, करा ॥ नंद-व्रज नाम[19]शेष; जाऊ निकरा[20]. ॥ ४ ॥
सुज्ञ बरा, न टवाळा[21]; ॥ त्या कृष्णा भजति गोप रानट बाळा. ॥
कां साहेल? नयज्ञा[22] ॥ ईशा[22] मजसहित करिति हेलन[23] यज्ञा. ॥ ५ ॥
व्रज[24] न जगो, पानीया[25] ॥ वर्षा; केलें अनिष्ट गोपांनीं या. ॥
क्षण न तगो धन; दावा[26] ॥ उगवा; दृष्टिस पुन्हा न गोधन दावा[27]. ॥ ६ ॥
लाविति मज पद वडिला, ॥ कीं नाहीं श्रीमदावलेप[28] दवडिला. ॥
ऐसा दंडके[29] राजा ॥ साहेल कसा? निघाचि, दंड करा जा. ॥ ७ ॥

---

१ भिवविणारा. 'त्या'=गोवर्धनदेवतेला. २ पर्वतातें. ३ कुळांतें. ४ पर्वताचें नांव. ५ गाईस वाढविणारा. ६ होवो. ७ अनाथाचा मित्र. ८ गर्वपात्र, गर्वानें भरलेला. हें ("इंद्र" याचें विशेषण.) ९ याचा कर्ता "हरि" आणि "अमर्षजनकोपाया" हें कर्म. १० राग उत्पन्न करण्याचा उपाय. ११ इंद्रास. १२ वज्रशस्त्री (इंद्र). १३ गवळ्यांच्या अपराधांच्या. १४ मावे. १५ सामासहित. 'वेची'= सोडी. १६ रुट्- अग्नि- अंगार= क्रोधरूपी अग्नीचे निखारे. १७ तेज. १८ कल्पांत करणारे असे जे मेघसमूह त्यांस. १९ नाम मात्र शेष रहावें ज्याचें असें ("नंदव्रज")करा=अगदी नाश करावा. २० अनर्थास, नाशास. २१ निंदा करणारा. २२ न्याय जाणणारा, व देवश्रेष्ठ असा जो मी त्या मजसह. २३ निंदा. २४ गोकुळ. २५ पाण्यास. २६ डावा द्वेष. २७ दाखवा. २८ संपत्तीपासून जहालेला जो मद व गर्व तो. २९ अपराध.

मी ऐरावतनागा[1]· ॥ रूढाचि येतोंहि; उद्धरा[2] वतना गा[3]." ॥
निश्चित बोले, "खपती[4] ॥ गोप, करा तें," असेंचि तो लेखपती[5]. ॥ ८ ॥
सोडिति जल, दगड, दया; ॥ पाडिति गृह, वृक्ष, अशनि[6] जलद[7] गर्दद[8] या.
भासति ते दगड गडी ॥ काळांत उग्र; मेघवृंदें[9] गडगडी. ॥ ९ ॥
वर्षति बहुतर[10] वारि[11]; ॥ घनकाळकरीं[12] विजाचि बहु तरवारि; ॥
धन्वी[13] शरधारी[14]; ती ॥ युद्धाची भासलीच बहुधा[15] रीति. ॥ १० ॥
शब्द भयंकर; कानीं ॥ शूळ उठे, वर्षतां महाकरकांनीं[16]; ॥
अचळा[17] हाले; खांचा ॥ पडती; संक्षोभ होय हा लेखांचा[18]. ॥ ११ ॥
मनिं इंद्र वदे," वांचा ॥ खळ[19] हो, अपराध करुनि गुरुदेवांचा! ॥
कृष्णनराश्रित[20] राना ॥ गिरिलाहि[21] पुजूनि, कां भयासि तरांनां? ॥ १२ ॥
भीति अपारासि तानीं ॥ बाळें पावति सुनिष्कृपा[22] रसितांनीं[23]; ॥
दुःसह तो काळ; पति- ॥ क्रोडीं[24] . स्त्री, घेउनी स्वतोका[25], लपती. ॥ १३ ॥
करुं पाहाति घात बळें, ॥ काळपयोदावहप्रलयवातवळें[26]. ॥
न घडे धारण[27]; धारा[28] ॥ स्थूला[29], उपमेसि होय धारण[30] धारा[31]! ॥ १४ ॥
कांपे अत्यासारा[32]· ॥ निलपातें पशुपलोक[33] नृत्यासारा[34]. ॥
स्थळ उन्नत[35] खळगे हा ॥ पूर भरी; न उरवी जलद खळ गेहा[36]. ॥ १५ ॥
देहीं वत्साशिरा[37] या ॥ गायी झांकूनि, कृष्णचरणिं शिराया, ॥
येती; कांपति तानीं ॥ बाळें; करुणा कराvि कां पतितांनीं[38]! ॥ १६ ॥
आबालस्थविर[39] हिता ॥ गति नेणाति एक कृ[40] नाथविरहिता; ॥

---

१ ऐरावत नामा हत्तीवर बसलेला. २ राखा. ३ अगा! ४ मरती. ५ देवांचा स्वामी (इंद्र). ६ वज्र. ७ मेघ. ८ कडाख्यानें. ९ मेघसमूह. १० फारच. ११ पाणी. १२ मेघरूपी काळाचे हातीं. १३ इंद्रधनुष्य पडलें असे म्हणून. १४ पाण्याच्या धारांनीं हेच कोणी बाण त्यांस धारण करणारे. १५ बहुत प्रकारांनीं. १६ मोठ्या गारांनीं. १७ पृथ्वी. १८ देवांचा. १९ दुष्ट हो! २० कृष्ण मानवाचा आश्रय केला आहे ज्यांणीं असे जे तुम्ही. २१ पर्वतास. २२ अत्युग्र. २३ मेघगर्जनांनीं. २४ पोटीं. २५ आपआपल्या मुलांस. २६ काळ-पयोद-आवह-प्रलय-वात-बळें=काळासारिख्या मेघांस आणणारीं प्रलय वायूंचीं बळें (समुदाय). २७ धरणें (सहन करणें). २८ मेघाच्या. २९ मोठ्या. ३० खांब. ३१ लहान. ३२ अति-आसार-अनिल-पातें=अत्यंत वृष्टि व वादळ यांच्या पडण्यानें. ३३ गवळी. ३४ नाचासारिखा. ३५ उंच. ३६ घरांत. ३७ वासरांच्या डोक्यांस. ३८ पडलेल्यांनीं, (पातक्यांनीं), मेघांनीं इ०. ३९ बाळापासून वृद्धा पर्यंत. ४० "गतिचें" विशेषण.

वरिती सादर[1] तरणी[2] ॥ हरिपदयुगलीच[3], भरवसा दरतरणीं[4]. ॥ १७ ॥
प्रार्थिति दीन जगाया ॥ कीं, "पाळक तूं दयानदीन[5] जगा या; ॥
सुमहाभागा[6]! रानीं ॥ मरतों गा वज्रसन्निभा[7] गारांनीं." ॥ १८ ॥
क्रोधवशतम[8] न्यूनें[9] ॥ मानें जो होय, त्याचि शतमन्यूनें[10] ॥
केलें हें, सकळ कळे; ॥ रक्षाया दीन बंधु[11] यांस कळकळे. ॥ १९ ॥
"श्रम जाले, खायाचा ॥ कीं न दिला भाग. काय लेखा[12] याचा? ॥
श्रीमदतम[13] हानीचं; ॥ त्रिदशपतित्वींचि[14] मत्ततम[15] हा[16] नीच. ॥ २० ॥
स्मयघन[17] वारावा; हे ॥ मद तों वरि, जों न दंडवारा[18] वाहे. ॥
तरि कटाक्ष, मला जे ॥ नत; अळसें हाचि एकटा[19] क्षेमे[20] लाजे?" ॥ २१ ॥
हें मनि आणि, खरा हो[21] ॥ व्रजजनविश्वास[22], बिरुदं[23] आणिख राहो. ॥
गोवर्धन हरि हातें ॥ एकें धरि; भय समस्तही हरि हा[24] तें. ॥ २२ ॥
उकरुनि[25] मूलासहित, ॥ छत्राका[26] बाळ धरि तसा, श्रमरहित ॥
लीलेनेंचि धरातें[27] ॥ उचली; काय प्रयास विश्वंधरातें[28]? ॥ २३ ॥
सांगे नंदास महा- ॥ पूरुष, मात्रादि[29] गोपवृंदा समहा, ॥
"या; धाका[30] मनि वारा[31]; ॥ पर्वतगर्तीं[32] शिरा, निकाम[33] निवारा[34]. ॥ २४ ॥
गिरिच्या[35], कां, पतनाचा ॥ धाक धरुनि, वृष्टिमाजि[36] कांपत नाचा[37]? ॥
गोपावनिपा[38], तनया ॥ सत्य गणीं; मत्करा[39]हुनि निपात[40] न या. ॥ २५ ॥
कर सोडिल नग[41], मोहें ॥ चित्ताला तुमचिया कदा न गमो हें. ॥ इति वा. ॥ २५ ॥
घन-पवनासिहि[42] न भिजे[43]; ॥ तुमचें हाले न लोम, येथें न भिजे; ॥

---

१ आदरानें. २ नौका. ३ कृष्णपदें. ४ भयापासून तरण्याविषयीं. ५ दया- नदी-ईन=
दयासागर. ६ हे महा समर्था. ७ वज्रासारिख्या. ८ क्रोधाच्या फार स्वाधीन. ९ अपमानानें.
१० इंद्रानें ११ कृष्ण. १२ बिशाद, किंम्मत. १३ संपत्ती पासून जो गर्व तोच कोणीएक
अंधार. १४ इंद्रत्वानें १५ फार माजलेला. १६ इंद्र. १७ गर्वरूपी पर्जन्य. अथवा गर्व आणि
पर्जन्य. १८ दंडरूपी वारा. १९ योग्य ('लाजे'= लाजण्यास.) २० आणिलें. २१ होवो.
२२ गोकुळींच्या लोकांनीं आपल्यावर ठेवलेला भरवसा. २३ नांव, प्रतिज्ञा. २४ कृष्ण.
२५ निखळून. २६ अळंब्यास. २७ पर्वतास. २८ विश्वाला धरणाऱ्यास. २९ आई वगैरे आनं-
दित गोपसमूहास. ३० भयास. ('मनि'=मनांतून). ३१ घालवा. ३२ पर्वताच्या दरींत. ३३ स्वेच्छ.
३४ वाऱ्याविरहित. ३५ पर्वताच्या ३६ पर्जन्यांत. ३७ नाचतां. ३८ गोप=अवनिपा हे गो-
कुळपते! ३९ माझ्या हातांतून. ४० पडणें. ३५ पर्वतास. ४१ पर्वत. ४२ पर्जन्यानें तुमचें
लोम (केश) भिजणार नाहीं. व तें लोम वाऱ्यानें हालणारहि नाहीं. ४३ भ्यावें.

गोधनसह[1] या, हो! या; ॥ स्थळ केलें स्वास्थ्य[2] शीघ्र त्वदया होया[3]." ॥ २६ ॥
धांवुनि जन, खळगा जो, ॥ त्यांत शिरति; सर्व म्हणति, "घन[4] खळ गाजो. ॥
ऐसाचि सबळबाहो[5] ॥ कृष्णा! दीनावनक्षम[6] सबळ[7], बा, हो." ॥ २७ ॥
न प्रभु भागे; हातें ॥ गिरि धरि; धारण[8] जसा उभा गेहांतें[9]. ॥
पाहति वदन[10] टकटका ॥ जन; मोहि सुरांचियाहि[11] नरनट[12] कटका[13]. ॥ २८
नगा[14] धरि सप्ताह[15], रितें[16] ॥ दावी वांछित करूनि दृप्ता[17] हरितें[18]; ॥
मानिं जो कां मदें[19], हातें[20] ॥ तिमिरहि[21] हरिरवि[22] हरी स्वकामदुहा[23] तें. ॥ २९ ॥
सादर[24] न स्तानिं तानीं[25]; ॥ केलें उद्विग्न मनहि न स्तनितांनीं[26]. ॥
घातकि पातकि[27] ते कीं ॥ गणुनि, त्यजिलेहि पक्ष्मपात कितेकीं; ॥ ३० ॥
पीतां श्रीमुख[28] खाणीं[29] ॥ पाणी न स्मरति; उघडली सुखखाणी[30]; ॥
लक्ष्मीचा अनघ[31] टिका ॥ सप्ताह उभा; गणी मनीं जन घटिका. ॥ ३१ ॥ ॥
केवळ त्या न नगाचा ॥ केला उद्धार[32], या जडाहि जगाचा. ॥
केवळ गिरिचें[33] न उतरी, ॥ हरिमदभरही[34] मुकुंद भवसिंधुतरी[35]. ॥ ३२ ॥
"वृष्टि कशास? न वारि[36] ॥ त्यजा," असें मेघ पाकशासन[45] वारी[37]. ॥
कीं यांचा[38] सर्व हरी[39], ॥ दावुनि योगानुभाव[40], मदगर्व[41] हरी. ॥ ३३ ॥
उभले[42] मेघ सरे[43] हो; ॥ गर्वनगीं[44] हरि चढे भ्रमें, घसरे हो! ॥

---

१ गाईसहवर्तमान. २ स्वस्थता. ३ व्हावया. ४ मेघ. ५ शक्तिमान आहेत बाहू ज्याचे. (हें कृष्णाला संबोधन आहे). ६ दीन-अवन-क्षम, अनाथाचें रक्षण करण्यास योग्य. ७ बळरामासहित. ८ खांब. ९ घरातें. १० तोंड. ११ देवांच्या. १२ नराचें सोंग घेतलें आहे ज्याणें (कृष्ण). १३ समूहास. "नरनट कटका," याच्या बरोबरीचा "कनकपट कटका" असाहि मुळचा दुसरा एक पाठ आहे. १४ पर्वत. १५ सात दिवस. १६ रिकामें, निरर्थक. १७ गर्विष्ठा. १८ इंद्रास. १९ गर्व. २० हातानें (गोवर्धन पर्वत धरून). २१ अज्ञानरूपी अंधार. २२ कृष्णरूपी सूर्य. २३ निजांची (भक्तांची) इच्छा पूर्ण करणारा (कृष्ण). २४ आदरपूर्वक. २५ लहान मुलें. (कृष्णाच्या हाताकडेसच पाहत राहिलीं असा अर्थ). २६ मेघगर्जनांनीं. २७ पक्ष्मपात. (डोळ्यांचीं पातीं झांकणें)=अस्खलित दृष्टीनें पाहत राहिले. २८ कृष्णाचें तोंड. २९ खाणें पिणें. ३० सुखाची खाण. ३१ निर्मळ (कृष्ण). ३२ वर धरणें. ३३ पर्वतच. ३४ इंद्राचें गर्वरूपी ओझें (उतरी). ३५ संसारसागरीं नौका (कृष्ण). ३६ पाणी. (पाऊस पाडूं नका असा भावार्थ). ३७ सांगे; आज्ञा करी. ३८ इंद्राचा. ३९ कृष्ण. ४० योगाचा(=अमानुष शक्तीचा) पराक्रम. ४१ अवसान व अभिमान. ४२ थांबले. ४३ पावसाच्या वृष्टीस. ४४ गर्वरूपी पर्वतावर. ४५ इंद्र.

उरविल गर्व [1]तामिं [2]रवी ॥ केंवि? [3]पविपुढेंहि धैर्य पर्वत मिरवी? ॥ ३४ ॥
देव वदे, "हो! सरला ॥ घन[4]; तटिनीचा[5]हि पूरही ओसरला[6]; ॥
टाकूनि निघा त्रास[7], ॥ स्त्रीसुत घेऊनि गोधना, पात्रास." ॥ ३५ ॥
परिसुनियां जन सारे[8] ॥ म्हणती, "क्षणमात्र येथ आज नसा रे! ॥
सर्वहि बाहेर चला; ॥ कृष्णाच्या फार भार बाहे[9] रचला[10]." ॥ ३६ ॥
लोक निघे सर्व तसा, ॥ इंद्र मदाहि गर्व, उतरि [11]हरि पर्वतसा. ॥
[12]मुदित यशोदादि-[13]सती ॥ जाल्या; उपमा न त्या [14]प्रमोदा दिसती. ॥ ३७ ॥
भेटति जन यास[15] महा ॥ प्रेमें; मानी [16]तदीय मन यासम [17]हा. ॥
आशीर्वादहि [18]तातें ॥ दिधले त्या, दे यदीय[19] पाद हितातें. ॥ ३८ ॥
सुर वाजविति नगारे; ॥ यश गाति, दुजांसि[20] म्हणति मुनिजन[21], "गा रे." ॥
हसति [22]अमृतघनगारे, ॥ "[23]हरिगुण [24]तापत्रयघ्न सेविं [25]नगारे!" ॥ ३९ ॥
वांछिति न [26]सुधाचमना, ॥ माने स्वर्गापरीस [27]वसुधाच मना. ॥
विश्वाचाहि धणि [28]वरी ॥ [29]नरता; पाजी जनासि अमृत [30]धणिवरी. ॥ ४० ॥
पहिला [31]घन [32]तोयाचा; ॥ मग पुष्पांचा प्रमोद[33]घन तो [34]यांचा. ॥
गाति अदीन[35]भगा जे ॥ सुर, त्या गंभीर [36]सुनिनदीं [37]नभ गाजे. ॥ ४१ ॥
पावे मन [38]मोदास; ॥ स्तवन करुनि, म्हणति सर्वहि "नमो" दास. ॥
सुख तें [39]पर्व तदा [40]वी; ॥ प्रभु बहु वात्सल्य, धरुनि पर्वत, दावी. ॥ ४२ ॥
येतां [41]भाउ [42]कलीला, ॥ [43]तत्स्वतमोग्रंथि, करूनि भा, [44]उकलीला; ॥
कीं हे [45]भाउक लीला ॥ गाउनि, जन [46]नामशेष [47]भाउ [48]कलीला. ॥ ४३ ॥ ॥

---

१ अंधाराच्या ठायीं. २ सूर्य. ३ वज्रापुढें. ४ पाऊस. ५ नदीचा. ६ काढला. ७ भय ८ सर्व. ९ बाहूला (हाताला). १० केला (जहाला). ११ कृष्ण. १२ आनंदित. १३ स्त्रिया. १४ आनंदास (उत्साहास.) १५ कृष्णास. १६ जनाचें. १७ अनुपम असा अर्थ. १८ नंदानें. १९ ज्याचें (कृष्णाचें). २० दुसऱ्यांस. २१ ऋषिजन. २२ पाणी, मेघ, व गारा, यांस. २३ कृष्णगुण. २४ तीन तापांतें नासून टाकणारे. २५ हे इंद्रा. २६ अमृतपानास. २७ पृथ्वीच. २८ स्वीकारी. २९ मनुष्यपणा. ३० तृप्ति होईपर्यंत. ३१ पर्जन्य. ३२ उदकाचा. ३३ आनंद आहे फार ज्यांत. ३४ देवांचा. ३५ कृष्णभाग्यास. ३६ सुस्वरांनीं. ३७ आकाश. ३८ आनंदास. ३९ सण. ४० उत्पन्न करी. ४१ इंद्र. ४२ तंद्र्यास. ४३ तत्- स्व- तमस्- ग्रंथि=त्याचा अज्ञानांधाराचा बंध. ४४ सोडिला, मोकळा केला. ४५ भक्त, भावी. ४६ नाम मात्र शेष राहिलें आहे ज्याचें ४७ मानवें. ४८ कलियुगाला.

वि[1]मद करी अगद[2]मना ॥ जो प्रभु, [3]तद्यश [4]भवार्तिचें [5]अगद मना. ॥
स्वर्ग [6]निपट [7]अधर; [8]धरा ॥ [9]यच्चरणें उच्च; भज तयाचि [10]धरंधरा. ॥ ४४ ॥
[11]अंबुधरा, [12]मारा मा- ॥ [13]प ति लाजवि, त्या [14]मनोभिरामा [15]रामा ॥
भेटति; [16]जलदवरा [15]या ॥ टाकुनि, आल्या विजा, [17]अमृतद वराया! ॥ ४५ ॥
गोपनदेवानंद ॥ प्रेमभरें जेवि वासुदेवा नंद ॥
भेटति सवपुरुहाया ॥ पदिंआलिंगोनरामभवपुरुहाया. ॥४६ ॥
रक्षुनि जन, [18]घन [19]वळहा ॥ याचा हरि गर्व, उरवि [20]अनघ न बळ हा; ॥
प्रकटूनि यश, [21]स्वीयां ॥ [22]गोष्ठां घेऊनि ये प्रभु यशस्वी या. ॥ ४७ ॥
वेष्टुनि [23]जयशालीला, ॥ सेविति जन [24]कामधेनुपयशा लीला; ॥
सत्य [25]मुकुंद [26]सुरभि ती; ॥ वत्स भजक गोप; इतर [27]असुर सुर भि[28]ती. ॥४८॥

इति श्रीमत्कृष्णविजये पंचविंशोध्यायः ॥ २५ ॥

आसें सवळें [29]मु निवित्तें ॥ [30]बक्यसुनाशाद्रिधारणांतें [31]वित्तें ॥
कर्मे केलीं; हो तीं ॥ आठविती, सर्व गोप विस्मित होती. ॥ १ ॥
वदला जें काय कवी ॥ [32]गर्ग, व्रजनाथ[33] तें तयां आयकवी, ॥
कीं, "नारायणसम [34]या ॥ सांगे," हे गोप करिति तोंचि [35]हा या समया. ॥ २॥

इति श्रीकृष्णविजये षड्विंशोध्यायः ॥ २६ ॥

[36]विक्रम पाहुनि [37]सुरभी, ॥ निज-[38]संतति-रक्षणें सुखावे [39]सुरभी. ॥
ये ती पदनमनातें; ॥ [40]यावांचुनि अन्य सुखद [41]पदें न मनातें. ॥ १ ॥
[42]अपराधी ये, [43]कांतीं ॥ श्रीच्या जाणुनि [44]दयास्थिती, एकांतीं. ॥

---

१ गर्वहीन. २ इंद्रास. ३ त्याचें यश. ४ संसारसंबंधी दुःखाचें. ५ औषध. ६ अगदी. ७ खालीं. ८ मृत्युलोक. ९ ज्याच्या पादप्रसादें करून. १०गोवर्धनधारी कृष्णास. ११ मेघास. (श्यामवर्णानें). १२ कामदेवास. १३ लक्ष्मीपति (कृष्ण). १४ मनास आनंदकारक.१५ स्त्रिया. १६मेघास. १७ मोक्षदेणारा. (कृष्ण) १८ मेघ. १९ इंद्र. २० निर्मळ ( कृष्ण ). २१ आपल्या. २२ गोकुळास. २३ यशस्वियास. २४ कामधेनूच्या दुधा सारिख्या. २५कृष्ण. २६ कामधेनु २७ जे भजक नसतील ते देव व दैत्य. २८भीतात. २९ऋषींचें वतन (कृष्ण) त्याणें. ३०बकि-असु-नाश,-अद्रि-धारण,- अंतें= पूतनेचे प्राण घेणें यापासून आरंभ होऊन गोवर्धन पर्वत. धरणें येथपर्यंत. ३१प्रसिद्ध. ३२ ज्ञानी गर्ग ऋषि. ३३ नंद. ३४ कृष्णास. ३५ आश्चर्य. ३६ पराक्रम ३७ कामधेनु. ३८ गोरक्षणें. ३९ ज्ञानी. ४० कृष्णपदावांचून. ४१ स्थळ. ४२ इंद्र. ४३ कृष्णीं. ४४ दयेला स्थान.

रविनिभ[1]मुकुटशिर कवी ॥ पादिं ठेवि, तयांत [2]रज [3]भयघ्न शिरकवी. ॥ २ ॥
वंदी [4]हरि-वाह, तसे ॥ चरण, श्री ज्यां कुचांचिवरि वाहतसे. ॥
[5]शेषमळासि [6]उरकवी, ॥ लावुनि [7]पदपूतभूतळासि उर, कवी. ॥ ३ ॥
जरि नाशी [8]तम, उरवी ॥ गुहेंत; करि ताप ही; न शीत [9]मउ रवी;॥
रज [10]लब्ध [11]शतमखा जें, ॥ उत्तम, [12]अमृतकर, न परवश [13]तमखाजें. ॥ ४ ॥
[14]प्रणतीं सुमृदु, [15]दरें हरी ॥ जो, प्रभुवर्य [16]क्षमी [17]त्रिजगदुदर हरी; ॥
जरिहि [18]अतिक्रम, नि[19]वळे, ॥ वंदी जेव्हां पदांसि शक्र, मनिं वळे.[20] ॥ ५ ॥
"दे भाग्यमद भ्रम हा; ॥ केला अपराध तो न मम [21]दभ्रें, [22]महा." ॥
ऐसें [23]हरि विनवि पदा ॥ प्रभुच्या, जो वंदितांचि उरवि न [24]विपदा. ॥ ६ ॥
वंदुनियां, स्तवन करी ॥ शक्र असें, रोष [25]विभु जयास्तव न करी. ॥
दंड कसा? [26]चव दावी ॥ करुणेची; तेचि एक साच वदावी. ॥ ७ ॥
"तव [27]चरण-सरोजांचा ॥ ध्यास न [28]मच्चित्तें [29]लवहि विसरो; ज्यांचा ॥
[30]भ्रमतम [31]रज कण वेची, ॥ [32]वाणि न करि [33]सत्प्रियतम रज [34]कणवेची. ॥८॥
सेवी शंभु [35]वनें धणी- ॥ [36]वरि पायांचें तुझ्याचि, तूं [37]भुवनधणी. ॥
[38]विश्ववरा! कामातें ॥ वश जालों; [39]श्रैष्ठ्यमद बरा का [40]मातें? ॥ ९ ॥
[41]लघुता यश [42]गौर विते; ॥ [43]त्वत्पादनता [44]श्रुती [45]अनिश गौरविते; ॥
ते गणिली [46]अध मानें; ॥ केला हितघात म्यां महा अधमानें! ॥ १० ॥
फार असावधसाच ॥ प्रभु! मी कीं आपुला असा वध साच, ॥

---

१ सूर्याप्रमाणें लखलखीत मुकुट आहे ज्यावर असें मस्तक. २ मृत्तिकेचे कण. ३ भयातें नाशणारे. ४ इंद्र. ५ राहिलेल्या मळास [अज्ञानास]. ६ संपवी. ७ कृष्णपदानें पवित्र जहालेल्या भूमीस. ८ अंधार. ९ मृदु. १० सांपडलेलें. ११ इंद्रास. १२ चंद्र; शीतल; मोक्षपद. १३ अंधाराचें खाजें. [हा समास संस्कृत भाषेच्या नियमाप्रमाणें नाहीं. एक शब्द "तम," सं० असून, 'खाजें' हा प्राकृत आहे.) १४शरणागतीं. १५भय. १६क्षमाकरणारा. १७ त्रैलोक्य उदरांत आहे ज्याच्या असा. १८आज्ञेचें उल्लंघन,अपराध. १९क्रोधरहित जहाला. २०सदय जहाला. २१ क्षुल्लक. २२ मोठा. २३ इंद्र. २४विपत्ति. २५ प्रभु, कृष्ण. २६ गोडी. २७ चरणरूपी कमळांचा. २८ चित्त. २९ किंचितहि. ३० भ्रमरूपी अंधार, किंवा भ्रम आणि अज्ञान. हें पद "वेची" या क्रियापदाचें कर्म आहे. ३१ रजोगुण. हें हि पद 'वेची" याचें कर्म आहे. ३२ उणीव. ३३ साधूंस अत्यंत प्रिय असा जो रजःकण. ३४ करूणेची. ३५ उदक. ३६ पोटभर. ३७ जगाचा स्वामी. ३८ हे विश्वश्रेष्ठा! ३९ थोरपणाविषयीं गर्व. ४० मजला. ४१ लहानपण. ४२ शुभ्र, निर्मळ. ४३ तुझ्या शरणागतास. ४४ वेद. ४५ नेहमीं. ४६ नीच.

सावध परि[1]वारा; ॥ तुं गुरुवर, पाळिसी स्व परिवारा या. ॥ ११ ॥
वा यापरिच पशातें ॥ जोडीं, सेवूनि पा[2]देपरिचयशातें. ॥
या [3]विभवा सतरावा ॥ तूं दाविसि, लोक कीं [4]भवांस तरावा. ॥ १२ ॥
[5]स्वपर तरावे दास ॥ स्वयशें, हें विदित [6]परतरा वेदास. ॥
तूं शुचि[7]सत्व रसिकते ॥ देसि, तरिच बुद्धि भक्ति सत्वर शिकेत. ॥ १३ ॥
[8]त्रिभुवनकल्पद्रो! हें ॥ वहु पाप त्व[10]ज्जनीं अन[11]ल्पद्रोहें. ॥
तूंचि [12]रसदयागातें ॥ [13]अर्ह, श्रुतिशत असेंचि [14]सदया! गातें. ॥ १४ ॥
तूं प्रभु वहुल क्षमि[15]ता; ॥ मत्कृत-अपराधकोटि [16]वहुलक्षमिता; ॥
दीन[17]पा! [18]दासस्वामी! ॥ शरणागत होय तूज [19]दासस्वा मी. ॥ १५ ॥
[20]प्रभुपदराजीवाचा ॥ स्पर्शी, प्रिय शिष्य [21]बुधे वरा जी[22]वांचा, ॥
परि नखराजी वाचा ॥ स्तवुं न शके; गुण उणा खरा जीवाचा. ॥ १६ ॥
नि[23]जपदपद्मपरागा- ॥ सकेंद्रालीचिया, [24]श्रिधवा [25]परा या! ॥
टाकूनि सकृपा! रागा, ॥ [26]अनुपूर्वी धरि मनीं न [27]शक्रपरागा.” ॥ १७ ॥
“सुख [28]मजपासाव [29]धरे ॥ होणार; स्वमानिं [30]नाकपा! सावध रे! ॥
लववि न [31]माने स्तंभ[32]; ॥ श्री[33]मदमत्ताहि मला न माने स्तंभ[34]; ॥ १८ ॥
कीं श्रीमदमत्त नुरे[35]; ॥ त्यासि गिळी काळ सं[36]भ्रमद [37]मत्तनु रे! ॥
हरितों श्रीमद हो तों ॥ सरे, स्मरे मज; मग [38]स्वकामद होतों. ॥ १९ ॥
स्तंभ[39], कशास? नमा जें, ॥ जा स्वपदा, भज विशंक, [40]शासन माजें.” ॥
सदय [41]अनुग्र हरी ती ॥ आपुलि सांगे अशी [42]अनुग्रहरीति. ॥ २० ॥

---

१ सेवकास. २ पदप्राप्तिसुखें. ३ पराक्रमास. ४ संसारसागरास. ५ आपल्याविषयीं तत्पर. ६ श्रेष्ठाला. ७ पवित्र आहे सत्व ज्याचें. ८ गोडी. ९ हे त्रिभुवनाच्या कल्पवृक्षा! १० तुझ्या जनीं=माझ्या ठायीं. ११ मोठ्या किंवा मोठ्याच्या द्रोहानें. १२ मेघयज्ञातें. १३ योग्य. १४ हे दयाळो! १५ क्षमा करणारा. १६ बहु लक्षांनीं मोजलेली. १७ हे अनाथनाथा! १८ हे भक्तप्रभो! १९ भक्तांचें द्रव्य असा जो तूं तुज. २० प्रभूच्या चरणकमलाचा. २१ बुद्धिमान. २२ बृहस्पतीचा. 'नखराजी'= (तुझी) नख पंक्तीहि. २३ आपल्या चरण कमलाच्या परागांत. ह्मणजे रजांमध्यें आसक्त असा जो इंद्ररूपी अलि, ह्मणजे भ्रमर, त्याच्या. २४ हे लक्ष्मीपते! २५ हे श्रेष्ठा! २६ पुर्वीप्रमाणें. २७ इंद्राच्या (माझ्या) महान् अपराधास. २८ माझ्यापासून. २९ पृथ्वीला. ३० हे स्वर्गपते! (इंद्रा!) ३१ मानेला. ३२ खांब. ३३ संपत्तीच्या योगें माजलेला. ३४ मूर्ख, गर्विष्ठ. ३५ न उरे. ३६ भ्रमविणारा. ३७ मच्छरीररूपी. ३८ इच्छा पुरविणारा. ३९ गर्व. ४० आज्ञा ४१ कोमल. ४२ उपदेशरीति.

जो [1]विमळयशःसुरभी, ॥ ज्या पासुनि पावती [2]असाधु असुर भी,[3] ॥
काळ महा [4]भयासुर भी, ॥ प्रार्थी त्याला नमूनि भावें [5]सुरभी; ॥ २१ ॥
"कृष्णा! तुज वर दासी ॥ मागतसें भुवनपाळका [6]वरदासी. ॥
सर्व भितों [7]हरिवाहा; ॥ तूं गोविप्रामरेंद्र हो, हरि! [9]वाहा. ॥ २२ ॥
कोण महा[10]नलगेहा- ॥ श्रय करि? कुळधर्मकाम हा नलगे, हा! ॥
गोक्षिति-[11]देवास वधी; ॥ वहु निष्ठुर फार भीति दे [12]वासवधी. ॥ २३ ॥
अभिषेकाच्या [13]विधिला ॥ आलें, पुसुनी [14]त्वदीय पुत्रा [15]विधिला. ॥
क्षिति[16]भर- [17]विग्रह [18]सारा ॥ हरिता तूं शुद्ध सत्व[19]विग्रह, [20]सारा!" ॥ २४ ॥
विनवि असा धेनु; तिला ॥ वश होय [21]सभक्तिलाचि साधे [22]नुतिला. ॥
[23]स्वरसवरक्षीरांनीं ॥ अभिषेकी, जो स्ववंश रक्षी रानीं. ॥ २५ ॥
[24]हरिखनदी [25]पानीया ॥ वर्षे, [26]निजमुकुटरत्नदीपांनीं [27]या ॥
[28]नाथपदा [29]नीरांजी, ॥ घे माथां [30]तीर्थसत्पदा [31]नीरा [32]जी. ॥ २६ ॥
नमुनि पदें, [33]वासव दे ॥ [34]सद्रत्नाकल्प वासुदेवास, वदे, ॥
"गोविंद," असें नामीं; ॥ अर्थ [35]गवादींद्र तूं, प्रभु! असेनां, मी. ॥ २७ ॥
तुंबर नारद, याचें ॥ गाती [36]दोषघ्न यश [37]उदारदयाचें. ॥
गमति सुर समस्त वनीं ॥ [38]प्रभुपादांभोजवंभरसम स्तवनीं. ॥ २८ ॥
करिति [39]मनोरम [40]लास्या ॥ [41]निर्जरललना कलावती [42]कमलास्या. ॥
वृष्टि [43]रसदसुमनांची, ॥ जाली सुखसंपदाचि [44]सदसुमनाची. ॥ २९ ॥

---

१ निर्मळ यशातें कामधेनूप्रमाणें देणारा. २ दुष्ट. ३ भय. ४ भयंकर. ५ कामधेनु; (इंद्र स्तुति करून थांबे तोंपर्यंत कामधेनु त्याच ठिकाणीं होती असें वाटतें). ६ वर देणारा असा जो तूं तुजपासीं. ७ इंद्रास. ८ गाई, ब्राह्मण, आणि देव यांचा इंद्र. ९ पाळण कर. १० मोठ्या अग्नीच्या घराचा आश्रय. ११ गाई आणि ब्राह्मणास. १२ इंद्रमति. १३ मार्ग, संस्कार. १४ तुझ्या. १५ ब्रह्मदेवास. १६ पृथ्वीचा भार. १७ तंटा. १८ सर्व. १९ सत्वच आहे देह ज्याचें. २० हे मूलतत्वा! २१ भक्तिमान्; (हें "नुतिला" याचें विशेषण). २२नमनास. २३आपल्या रसभरित श्रेष्ठ दुधांनीं. २४ आनंदाची नदी. २५ पाण्यास. २६ आपल्या मुकुटांतील रत्नरूपी दीपांनीं. २७ कृष्णास. २८ कृष्णपदा. २९ ओंवाळी. ३० तीर्थाचें शुद्ध स्थान. ३१ पाणी. ३२ कामधेनु. ३३इंद्र. ३४ शुद्ध रत्नाचे अलंकार. ३५गाई आदिकरून जनाचा इंद्र. ३६दोषांचा नाश करणारे. ३७उदार आहे दया ज्याची अशाचें. ३८ कृष्णाच्या पादरूपी कमलाचे भ्रमर जसे. ३९मनास रमविणाऱ्या. ४०नृत्यास. ४१देवांगना. ४२कमलाप्रमाणें सुंदर मुखें ज्यांचीं अशा. ४३ मधुर पुष्पांची. ४४ सत-असु-मन=सज्जानाचे प्राण व मन यांची.

सावध परि, वाराया; ॥ तुं गुरुवर, पाळिसी स्व परिवारा[1] या. ॥ ११ ॥
बा यापरिच यशातें ॥ जोडीं, सेवूनि पादेपरिचयशातें[2]. ॥
या विभवा[3] सतरावा ॥ तूं दाविसि, लोक कीं भवास[4] तरावा. ॥ १२ ॥
स्वपर[5] तरावे दास ॥ स्वयशें, हें विदित परतरा[6] वेदास. ॥
तूं शुचिसत्व[7] रसिकते[8] ॥ देसि, तरिच बुद्धि भक्ति सत्वर शिकेत. ॥ १३ ॥
त्रिभुवनकल्पद्रो[9]! हें ॥ बहु पाप त्वज्जनीं[10] अनल्पद्रोहें[11]. ॥
तूंचि रसदयागातें[12] ॥ अर्ह[13], श्रुतिशत असेंचि सदया[14]! गातें. ॥ १४ ॥
तूं प्रभु बहुल क्षमिता[15]; ॥ मत्कृत-अपराधकोटि बहुलक्षमिता[16]; ॥
दीनप[17]! दासस्वामी[18]! ॥ शरणागत होय तूज दासस्वा[19] मी. ॥ १५ ॥
प्रभुपदराजीवाचा[20] ॥ स्पर्श, प्रिय शिष्य बुध[21] वरा जीवाचा[22], ॥
परि नखराजी वाचा ॥ स्तवुं न शके; गुण उणा खरा जीवाचा. ॥ १६ ॥
निजपदपद्मपरागा-[23] ॥ सक्तेंद्रालीचिया, श्रिसद्म[24] परा[25] गा! ॥
टाकूनि सकप! रागा, ॥ अनुपूर्वी[26] धरिं मनीं न शक्रपरागा[27]." ॥ १७ ॥
"सुख मजपासाव[28] धरे[29] ॥ होणार; स्वमानिं नाकपा[30]! सावध रे! ॥
लवविं न माने[31] स्तंभ[32]; ॥ श्रीमदमत्ताहि[33] मला न माने स्तंभ[34]; ॥ १८ ॥
कीं श्रीमदमत्त नुरे[35]; ॥ त्यासि गिळी काळ संभ्रमद[36] मत्तनु[37] रे! ॥
हरितों श्रीमद हो तों ॥ सरे, स्मरे मज; मग सर्वकामद[38] होतों. ॥ १९ ॥
स्तंभ[39], कशास? नमा जें, ॥ जा स्वपदा, भज विशंक, शासन[40] माजें." ॥
सदय अनुग्र[41] हरी ती ॥ आपुलि सांगे अशी अनुग्रहरीति[42]. ॥ २० ॥

---

१ सेवकास. २ पदप्राप्तिसुखें. ३ पराक्रमास. ४ संसारसागरास. ५ आपल्याविषयीं तत्पर. ६ श्रेष्ठाला. ७ पवित्र आहे सत्व ज्याचें. ८ गोडी. ९ हे त्रिभुवनाच्या कल्पवृक्षा ! १० तुझ्या जनीं=माझ्या ठायीं. ११ मोठ्या किंवा मोठ्याच्या द्रोहानें. १२ मेघयज्ञातें. १३ योग्य. १४ हे दयालो ! १५ क्षमा करणारा. १६ बहु लक्षांनीं मोजलेली. १७ हे अनाथनाथा! १८ हे भक्तप्रभो ! १९ भक्तांचें द्रव्य असा जो तूं तुज. २० प्रभूच्या चरणकमलाचा. २१ बुद्धिमान. २२ बृहस्पतीचा. 'नखराजी'= (तुझी) नख पंक्तीहि. २३ आपल्या चरण कमलाच्या परागांत. ह्मणजे रजांमध्यें आसक्त असा जो इंद्ररूपी अलि, ह्मणजे भ्रमर, त्याच्या. २४ हे लक्ष्मीपते ! २५ हे श्रेष्ठ ! २६ पुर्वीप्रमाणें. २७ इंद्राच्या (माझ्या) महान् अपराधास. २८ माझ्यापासून. २९ पृथ्वीला. ३० हे स्वर्गपते! (इंद्रा!) ३१ मानेला. ३२ खांब. ३३ संपत्तीच्या योगें माजलेला. ३४ मूर्ख, गर्विष्ठ. ३५ न उरे. ३६ भ्रमविणारा. ३७ मच्छरीररूपी. ३८ इच्छा पुरविणारा. ३९ गर्व. ४० आज्ञा ४१ कोमल. ४२ उपदेशरीति.

जो विमळयशः[1]सुरभी, ॥ ज्या पासुनि पावती असाधु[2] असुर भी,[3] ॥
काळ महा भयासुर[4] भी, ॥ प्रार्थी त्याला नमूनि भावें सुरभी[5]; ॥ २१ ॥
"कृष्णा! तुज वर दासी ॥ मागतसें भुवनपाळका वरदासी[6]. ॥
सर्व भितों हरिवाहा[7]; ॥ तूं गोविप्रामरेंद्र[8] हो, हरि! वाहा[9]. ॥ २२ ॥
कोण महानलगेहा[10]- ॥ श्रय करि? कुळधर्मकाम हा नलगे, हा! ॥
गोक्षिति-[11]देवास वधी; ॥ वहु निष्ठुर फार भीति दे वासवधी[12]. ॥ २३ ॥
अभिषेकाच्या विधिला[13] ॥ आलें, पुसुनी त्वदीय[14] पुत्रा विधिला[15]. ॥
क्षितिभर[16]- विग्रह[17] सारा[18] ॥ हरिता तूं शुद्ध सत्वविग्रह[19], सारा[20]!" ॥ २४ ॥
विनवि असा धेनु; तिला ॥ वश होय सभक्तिला[21]चि साधे नुतिला[22]. ॥
स्वरसवरक्षीरांनीं[23] ॥ अभिषेकी, जो स्ववंश रक्षी रानीं. ॥ २५ ॥
हरिखनदी[24] पानीया[25] ॥ वर्षे, निजमुकुटरत्नदीपांनीं[26] या[27] ॥
नाथपदा[28] नीरांजी[29], ॥ घे माथां तीर्थसत्पदा[30] नीरा[31] जी.[32] ॥ २६ ॥
नमुनि पदें, वासव[33] दे ॥ सद्रत्नाकल्प[34] वासुदेवास, वदे, ॥
"गोविंद," असें नामीं; ॥ अर्थ गवादींद्र[35] तूं, प्रभु! असेनां, मी. ॥ २७ ॥
तुंबर नारद, याचें ॥ गाती दोषघ्न[36] यश उदारदयाचें[37]. ॥
गमति सुर समस्त वनीं ॥ प्रभुपादांभोजवंभरसम[38] स्तवनीं. ॥ २८ ॥
करिति मनोरम[39] लास्या[40] ॥ निर्जरललना[41] कलावती कमलास्या[42]. ॥
वृष्टि रसदसुमनांची[43], ॥ जाली सुखसंपदाचि सदसुमनाची[44]. ॥ २९ ॥

---

१ निर्मळ यशातें कामधेनूप्रमाणें देणारा. २ दुष्ट. ३ भय. ४ भयंकर. ५ कामधेनु; (इंद्र स्तुति करून थांबे तोंपर्यंत कामधेनु त्याच ठिकाणीं होती असें वाटतें). ६ वर देणारा असा जो तूं तुजपासीं. ७ इंद्रास. ८ गाई, ब्राह्मण, आणि देव यांचा इंद्र. ९ पाळण कर. १० मोठ्या अग्नीच्या घराचा आश्रय. ११ गाई आणि ब्राह्मणास. १२ इंद्रमति. १३ मार्ग, संस्कार. १४ तुझ्या. १५ ब्रह्मदेवास. १६ पृथ्वीचा भार. १७ तंटा. १८ सर्व. १९ सत्वच आहे देह ज्याचें. २० हे मूलतत्वा! २१ भक्तिमान्; (हें "नुतिला" याचें विशेषण). २२नमनास. २३आपल्या रसभरित श्रेष्ठ दुधांनीं. २४ आनंदाची नदी. २५ पाण्यास. २६ आपल्या मुकुटांतील रत्नरूपी दीपांनीं. २७ कृष्णास. २८ कृष्णपदा. २९ ओवाळी. ३० तीर्थाचें शुद्ध स्थान. ३१ पाणी. ३२ कामधेनु. ३३इंद्र. ३४ शुद्ध रत्नाचे अलंकार. ३५गाई आदिकरून जनाचा इंद्र. ३६दोषांचा नाश करणारें. ३७उदार आहे दया ज्याची अशाचें. ३८ कृष्णाच्या पादरूपी कमलाचे भ्रमर जसे. ३९मनास रमविणाऱ्या. ४०नृत्यास. ४१देवांगना. ४२कमलाप्रमाणें सुंदर मुखें ज्यांचीं अशा. ४३ मधुर पुष्पांची. ४४ सत-असु-मन=सज्जानाचे प्राण व मन यांची.

तैं अतिशय दुध वाहे ॥ गायींचें; भू निवे, वश यदुधवा[1] हे[2];
स्रवती द्रुम[3] मधु रानीं ॥ पूर्ण रसांनीं सपत्रसुम[4] मधुरांनीं[5]. ॥ ३० ॥
त्या तत्तदुदधिमधुनी[6] ॥ आल्या वाहतचि घृतपयोदधिमधुंनीं[7]. ॥
नैकरसप्रसव[8] धुनीं; ॥ कीं सेवावेंचि सर्वरसंधिस[9] वधुंनीं[10]. ॥ ३१ ॥
हे वसुधा बुधरमणी[11] ॥ त्यजिति न; कीं धरिति धर[12] सुधांबुधरमणी[13]. ॥
हे तरु[14] गुरु[15] सुरतरुचे[16]; ॥ तांचित्तांतें[17] न नंदनीं[18] सुरत रुचे. ॥ ३२ ॥
क्रूर[19] जांत्या[20] सत्वें[21]; ॥ जाला निर्वैरभाव[22] ज्या त्या सत्वें[23]! ॥
सन्मतिलाभ[22] व्याला[24] ॥ व्याघ्रा! जीवौघें[25] पावला भव्याला[26]. ॥ ३३ ॥
अभिषेकुनि वरदास[27] ॥ श्रीगोगोकुलपतीस[28] सुरवरदास[29], ॥
गोविंदाज्ञासुमनां[30] ॥ धरुनि शिरीं, स्वर्ग करि सनाथ[31] सुसुमना[32]. ॥ ३४ ॥

इति श्रीमत्कृष्णविजयेसप्तविंशोध्यायः ॥ २७ ॥

एकादश्युपवासा[33] ॥ करि, पूजी व्रजपति[34] त्रिविष्टपवासा[35]. ॥
बहुरात्रीं अपगेलां[36], ॥ साधाया द्वादशी, व्रजाधिप[34] गेला. ॥ १ ॥
स्नान करी, अरुणाचा ॥ उदय न जों; असुरभृत्य[37] तों वरुणाचा ॥
निजवेळेंत[38] हरि[39]; खला- ॥ हित- हरिजनक[40] न कळे, मनांत हरिखला[41]. ॥ २ ॥
नेला जेथें वरुण ॥ व्रजपति. हा उगवला प्रथम कीं अरुणे[42]; ॥

---

१ कृष्ण पतीस. २ पृथ्वी. ३ वृक्ष. ४ पत्रें, पुष्पें, यांहीं युक्त. ५ गोड असे जे तिहीं, (हें "रसांचें" विशेषण). ६ तत्-तत्-उदधि- मधुनी=त्यांच्या त्याच्या (आपापल्या) समुद्रांतून. ७ तूप, दूध, दहीं, व मद यांहीं. ८ अनेक रसांतें प्रसवणाऱ्या. ९ सर्व रसांच्या कोशास. १० स्त्रियांनीं. ११ देवांगना. १२ पर्वत. १३ अमृताच्या मेघांतील श्रेष्ठ. १४ वृक्ष. १५ बाप (श्रेष्ठ). १६ कल्पवृक्षांचे. १७ देवांगनांच्या मनांस. १८ नंदनवनांत. १९ "सत्वें" याचें वाच्य. २० जातीनें (स्वभावानें). २१ प्राणी, जनावरें. २२ मित्रत्वाची बुद्धि. २३ साधुत्वें. २४ सर्पांस. २५ जीवसमूह. २६ कल्याणास. २७ कृष्णास. २८ लक्ष्मी, पृथ्वी व गोकुल यांच्या स्वामीस (कृष्णास). २९ इंद्र हा सेवक. ३० गोविंदाची आज्ञा हेंच कोणी एक पुष्प, त्यास. ३१ स्वामी आहे ज्यास. ३२ सु-सु-मनस्=फार चांगलें मन जहालें आहे ज्याचें, फार चांगल्या मनाचा, संतुष्ट. ३३ एकादशीच्या उपवासास. ३४ नंद. ३५ त्रिविष्टप (स्वर्ग) आहे वास ज्याचा अशा देवास. ३६ नदीस. ३७ राक्षससेवक. ३८ आपल्या प्रदेशांत. ३९ नेई. ४० दुष्टांचा शत्रु असा जो त्या कृष्णाचा बाप. ४१ आनंदला. ४२ ही उत्प्रेक्षा आहे; नंद हाच कोणी एक अरुण; आणि त्याच्या मागून येणारा जो कृष्ण तोच कोणी एक हंस म्हणजे सूर्य, इ०

शीघ्र[1] तमोघ्न[2] सकरुण[3] ॥ प्रकटेल हि लोकबंधु[4]हंस न तरुण[5] ॥ ३ ॥
गिळिला नंद[6] नदीनें, ॥ मग गोपजनें तदीय[7] नंदन दीनें[8] ॥
प्रार्थियला हरि तात- ॥ प्रिय; ज्याचे पाय भवभया[9] हरितात. ॥ ४ ॥
स्वाभयदं[10] यशोधर[11] हा ॥ कृष्ण म्हणे सदय, "मी करिन शोध, रहा ॥
स्वस्थ; धरा विश्वास," ॥ स्वमुखें कथि हें प्रमाण जो विश्वासें[12]. ॥ ५
जो सकरुण भव नाशी, ॥ गेला जगदीश[13] तो वरुणभवनाशी[14]. ॥
निजवैभवकलशातें[15] ॥ पाहुनि, पावे जलाधिप[16] सकल शातें[17]. ॥ ६ ॥
पसरुनि पदरा, जीवीं ॥ प्रार्थावीं, त्या मुकुंदपदराजीवीं[18] ॥
दिधली भेटि परम; हां[19] ॥ धन्य सुकृतसिंधु. पावलाहि पर महां[20]. ॥ ७ ॥
वंदी प्रभुपदनालिनें, ॥ जीं न त्यजिलीं लवार्धमात्र सदलिनें[21]; ॥
होती निर्मळ; मलिनें ॥ स्मरतां ज्यांतें, निजेंत भ्यावें कलिनें. ॥ ८ ॥
पूजी हरिपद, काशी- ॥ पतिमुखें[22] जपती जया महापदकाशी. ॥
तेजें नगर विराजे, ॥ ऐसे लेवावि विभूसि नग रविराजे[23]. ॥ ९ ॥
वरुण वदे, पद नमुनी, ॥ "शिवति प्रत्यक्ष जें सुखास्पद[24] न मुनी, ॥
तें कामद[25] गा राया! ॥ आलें, (वर्णील कोण?), मदगारा या. ॥ १० ॥
जालों पावन मी, न ॥ स्तवनीं पटु परि, भवत्कृपावनमीन[26]. ॥
मुनिजनसर्वस्वा! मी ॥ सफळ जनन पावलोंचि सर्वस्वामी! ॥ ११ ॥
हा तात तुझा कृष्णा- ॥ नीरांतु[27]नि, न कळतां, मदनुगें कृष्णा! ॥

---

१ लवकर. २ अज्ञानरूपी अंधकारास हनन करणारा. ३ दयावान्. ४ लोकबांधव (लोकांचें हित कर्ता=कृष्ण) हा सूर्य. ५ 'न तरुण'=बाळ सूर्य. ६ नंदाचा ७ मुलगा- ८ हें "जनें" याचें विशेषण. ९ संसारभयास १० स्व अभयद= आपल्या जनास अभय देणारा. ११ यशस्वी. १२ लोकांस १३ कृष्ण. १४ वरुणाच्या घरीं. १५ आपल्या वैभवाच्या ठेव्यास (कृष्णास.) १६ वरुण. १७ सुखें. १८ कृष्णाच्या पदरूपी कमलांनीं. १९ वरुण २० 'परमहा'=श्रेष्ठ उत्सवानें. २१ सत्-अलिनें=साधुरूपी भ्रमरानें. २२ शिवादि. २३ सूर्यच असे ('नग'= भूषणें). २४ सुखस्थान. २५ ज्या पदाचा स्पर्श मुनींलाहि होत नाहीं तें कामद (इच्छा पूर्ण करणारें) पद मदगारा (मत् अगारा=माझ्या घरास) आलें. 'मदगारा' हें 'आलें' याचें अधिकरण. किंवा 'आलें' या चें अधिकरण आणि 'वर्णील' याचें कर्म, असें एकदम कारितां येईल. मग मात्र हा उत्तरार्ध असा लिहिला पाहिजे;—तें कामद गा राया!॥ आलें, वर्णील कोण, मदगारा या? २६ तुझी कृपा हेंच वन (=उदक) त्यांतला मीन (=मासा); ह्म० कृपा नसेल तर मरेन हा भाव. 'मुनिजनसर्वस्वा' =मुनिजनप्रिया. २७ यमुना नदीच्या उदकांतून. 'मदनुगें'=माझ्या चाकरानें.

आणियला नंद; मना ॥ भय दे अपराध, थोर हा खळदमना ! ॥ १२ ॥
भय दे[1] आंग मनातें, ॥ परि कारण हें तुझ्याहि आगमनातें; ॥
चुकला तो मूढ; कलि- ॥ [2]ध्वांतार्का! पदनता मज न तूं ढकलीं. ॥ १३ ॥
न्यावा हा निजतात; ॥ प्रभु! तव- पद- सांवलींत जे निजतात, ॥
त्यांतें नुठवि न खवळी, ॥ जो द्विपरा[3]र्धांत काळ उरविनखवळी. ॥ १४ ॥
हे फुलली, पालवली, ॥ फळली, वैकुंठवल्लि सरूपा! लवली; ॥
देउनि वैभव, नीचं[4] ॥ प्रभु! केला धन्य, येउनी भवनींच. ॥ १५ ॥
गंगाख्यां[5] धाम रसा ॥ जें, या वंदन तुझ्याचि पदतामरसा. ॥
मायामानवदेहें ॥ क्षमिजे हा," वरुण निरभिमान वदे हें. ॥ १६ ॥
मग तातासह, साची ॥ करुणा करुनि, व्रजासि ये सहसाचि. ॥
आणी नंदन वासा- ॥ प्रति; गोपांला गमे स्वनंद नवासा. ॥ १७ ॥
ऐश्वर्य भुवनपतिचें, ॥ निजपुत्राचें महत्वाहि भुवनपतिचें[6] ॥
गोपां सहसा नंद ॥ प्रकट करी, विस्मयाहि सह सानंद. ॥ १८ ॥
पहिलें ईश्वरसा[7] च ॥ प्रभु भासे त्यांसि आजि ईश्वर सांच. ॥
ह्मणती जन मनिं, "जगती- ॥ धर पावविल व्रजाहि सूक्ष्म निजगति. ॥ १९ ॥
[8]जड सुरतरु पूरवितो ॥ स्वाश्रित[9]तृष्णा, त्वदिष्टं[10] - सलिलपूर वितो ॥
चिंतामणिहि; तदधिप[11] ॥ प्रभु न कसा करिल भक्तजनहित दधिप[12] ? ॥ २० ॥
[13]ब्रह्म-ह्रदीं मज्जन ते ॥ करिती, कीं हरि ह्मणे, "घडो मज्जनते[14];" ॥
श्रुति[15] संस्तुत आपण हा ॥ वैकुंठीं शांतिचा उघडि आपण[16] हा! ॥ २१ ॥

इति श्रीमत्कृष्णविजये ऽष्टाविंशोध्यायः ॥ २८ ॥

---

१ अपराध. २ कलिरूप (=दोषरूप) ध्वांताच्या (=तमाच्या) सूर्या! ३ द्वि-परार्ध-अंत = कल्पांतीचा. ४ हे प्रभो! वैभव देऊन हा नीच (=मला) अपण धन्य केला. ५ गंगाख्या (गंगा हें नाम आहे ज्यास अशा) रसा (=उदकास)=गंगेला जें धाम (=स्थान) त्या या तुझ्याचि पदतामरसा (=पदकमलास) वंदन (असो). ६ जगत्पतीचें. 'भुवनपतिचें ऐश्वर्य' =वरुणाचें ऐश्वर्य. ७ प्रथमतः इश्वरासारखा दिसे, पण आतां खरोखरच ईश्वर असा दिसला. ८ अचेतन. ९ आपल्या आश्रितांची तृष्णा. १० मनांत इच्छिलेलें तेंच जणु उदक त्याचे पूर. ११ तत्-अधिप =त्यांचा राजा, श्रेष्ठ. १२ दधिभक्षक. १३ ब्रम्हसुखाच्या डोहीं. 'मज्जन'=स्नान. १४ माझ्याभक्तांस. १५ वेदस्तुत. १६ दुकान.

## ॥ अथ रासक्रीडा प्रारंभः ॥

लेशहि शरदमळ[१] न, [२]भा ॥ [३]धवली अमृतांशु[४]चीहि, शरद[५]मळनभा; ॥
[६]अंबर [७]सितरुचि, रजनी- ॥ [८]विलासिनी धरि, [९]भमौक्तिकें [१०]रुचिरं, जनीं. ॥ १ ॥
मंगल सुतिलक [११]अलिकीं ॥ [१२]कुमुदाक्षीं भरि सुरम्य कज्जल [१३]अलि कीं. ॥
[१४]चंद्रमुखी ते हरिला ॥ रुचली; श्रीकांत योगिपति [१५]परि [१६]हरिला. ॥ २ ॥
[१७]प्राचीमुख चंद्र करी ॥ [१८]स्वोदयरागें [१९]करीं [२०]अरुण मोदकरीं. ॥
ये [२१]प्रिय बहुदिवसां, जे ॥ [२२]दयिता, तद्वदन कुंकुमें भरि सांजे! ॥ ३ ॥
कुंकुमपिंजरितरमा- ॥ [२३]मुखनिभशशिमंडळीं दिसे [२४]द्युति [२४]परमा. ॥
पाहुनि वनहि धवळलें, ॥ हरिमन गायासि मधुर बहुविध वळलें. ॥ ४ ॥
ऐकति [२५]युवतिमृगी तें, ॥ तों [२६]तत्धृदयांत संचरे [२७]स्मर [२८]गीतें; ॥
[२९]वनवसुधा वेगानें ॥ पावति, हरि जेथ घेति धांवे [२८]गानें. ॥ ५ ॥
हरिनें बहु[३०]शुभगानीं ॥ हरिलें मन; टाकिलें [३१]सदन [३२]सुभगांनीं. ॥
लज्जा भय न पळ टिके; ॥ व्यवहार त्यागवी [३३]गुरुजनप लटिके. ॥ ६ ॥
काढित असतां धारा, ॥ टाकुनि, अनुसरति युवति जग[३४]दाधारा. ॥
तापवितां दुध [३५]मिणकीं, ॥ त्यजिति; अमृत पाजितो बहु [३६]विबुधमणि [३७]कीं. ॥७॥
चुल्लीवरिच करपती ॥ अन्नें, गांठिति [३८]वधु [३९]प्रमोदकरपति. ॥
पडतां ध्वनि तो कानीं, ॥ स्तन काढुनि, जाति, चोखितां तो[४०]कांनीं. ॥ ८ ॥
करितां वाढप, रि[४१]चवी ॥ [४२]करपात्र; [४३]स्वगुरुभयाहि बाढ, परि, चवी ॥

---

१ शर-द-, मळ= मेघसंबंधी मळ. २ तेज, कांति. ३ शुभ्र करी. ४ अमृत-अंशु, चंद्राची.
५शरत्-अमळ-नभा, शरदृतूच्या स्वच्छ आकाशास. ६आकाश; व रूपकासाठीं वस्त्रअसें घ्या-
वयाचें. ७ शुभ्रकांतीचें. ८ रात्र हीच विलासकरणारी एक स्त्री. ९ नक्षत्ररूपी मोत्यें.
१० सुंदर ११ ललाटीं. १२ कुमुदरूपी नेत्रांत. १३ भ्रमर. १४ चंद्रच आहे मुख जीचें.
१५लक्ष्मीकांत जरी होता, व जरी योगिपति होता, तरी हि भुलविला. १६ भुलविला. १७ पूर्व-
दिशेचेंमुख. १८स्व-उदय रागें=आपल्या उदयाच्याकांतीनें. १९('मोदकर'=आनंदकर) किरणां-
नीं. २० तांबडें. २१ प्राणनाथ २२ स्त्री. २३ कुंकुमानें लेपलेल्या लक्ष्मीच्या मुखासारिखा जो
चंद्र त्यावर. २४ परम कांती. २५ स्त्रीरूपीहरिणी. २६ तत्-हृदयांत. २७ कामदेव. २८गाय-
नानें. २९ जागा. ३० श्रेष्ठगायनांनीं ३१ घर. ३२ स्त्रियांनीं ३३ श्रेष्ठजनस्वामी ३४ जगत्-
आधारा=कृष्णास. ३५ डेऱ्यांत. ३६ देवश्रेष्ठ. ३७ 'कीं'= 'त्यजिति' याचें कारण. ३८ स्त्रिया.
३९ आनंददायक पति. ४० मुलांनीं. ४१ ठेवी. ४२हातांतील भांडें. ४३आप्तश्रेष्ठांचें भय जरी
'बाढ' (=थोर) होतें तरिही.

आणियला नंद; मना ॥ भय दे अपराध, थोर हा खळदमना ! ॥ १२ ॥
भय दे आं[१]ग मनातें, ॥ परि कारण हें तुझ्याहि आगमनातें; ॥
चुकला तो मूढ; कलि- ॥ ध्वांतार्का[२]! पदनता मज न तूं ढकलीं. ॥ १३ ॥
न्यावा हा निजतात; ॥ प्रभु! तव- पद- सांवलींत जे निजतात, ॥
त्यांतें नुठवि न खवळी, ॥ जो द्विपरार्धांत[३] काळ उरविनखवळी. ॥ १४ ॥
हे फुलली, पालवली, ॥ फळली, वैकुंठवल्लि सद्रूपा! लवली; ॥
देउनि वैभव, नीचं[४] ॥ प्रभु! केला धन्य, येउनी भवनींच. ॥ १५ ॥
गंगाख्यां[५] धाम रसा ॥ जें, या वंदन तुझ्याचि पदतामरसा. ॥
मायामानवदेहें ॥ क्षमिजे हा," वरुण निरभिमान वदे हें. ॥ १६ ॥
मग तातासह, साची ॥ करुणा करुनि, व्रजासि ये सहसाचि. ॥
आणी नंदन वासा- ॥ प्रति; गोपांला गमे स्वनंद नवासा. ॥ १७ ॥
ऐश्वर्य भुवनपतिचें, ॥ निजपुत्राचें महत्वहि भुवनपतिचें[६] ॥
गोपां सहसा नंद ॥ प्रकट करी, विस्मयाहि सह सानंद. ॥ १८ ॥
पहिलें ईश्वरसा च ॥ प्रभु भासे त्यांसि आजि ईश्वर साँच. ॥
ह्मणती जन मनिं, "जगती- ॥ धर पावविल व्रजाहि सूक्ष्म निजगति. ॥ १९ ॥
जड[८] सुरतरु पुरवितो ॥ स्वाश्रित[९]तृष्णा, त्वदिष्टं[१०] - सलिलपूर वितो ॥
चिंतामणिहि; तदधिप[११] ॥ प्रभु न कसा करिल भक्तजनहित दधिप[१२]? ॥ २० ॥
ब्रह्म[१३]ह्रदीं मज्जन ते ॥ करिती, कीं हरि ह्मणे, "घडो मज्जनते[१४];" ॥
श्रुति[१५] संस्तुत आपण हा ॥ वैकुंठीं शांतिचा उघडि आपण[१६] हा! ॥ २१ ॥

इति श्रीमत्कृष्णविजये ऽष्टाविंशोऽध्यायः ॥ २८ ॥

---

१ अपराध. २ कलिरूप (=दोषरूप) ध्वांताच्या (=तमाच्या) सूर्या! ३ द्वि-परार्ध-अंत = कल्पांतीचा. ४ हे प्रभो! वैभव देऊन हा नीच (=मला) अपण धन्य केला. ५ गंगाख्या (गंगा हें नाम आहे ज्यास अशा) रसा (=उदकास)=गंगेला जें धाम (=स्थान) त्या या तुझ्याचि पदतामरसा (=पदकमलास) वंदन (असो). ६ जगत्पतीचें. 'भुवनपतिचें ऐश्वर्य' =वरुणाचें ऐश्वर्य. ७ प्रथमतां इश्वरासारखा दिसे, पण आतां खरोखरच ईश्वर असा दिसला. ८ अचेतन. ९ आपल्या आश्रितांची तृष्णा. १० मनांत इच्छिलेलें तेंच जणु उदक त्याचे पूर. ११ तत्-अधिप =त्यांचा राजा, श्रेष्ठ. १२ दधिभक्षक. १३ ब्रम्हसुखाच्या डोहीं. 'मज्जन'=स्नान. १४ माझ्याभक्तांस. १५ वेदस्तुत. १६ दुकान.

## ॥ अथ रासक्रीडा प्रारंभः ॥

लेशहि शरदमळ[1] न, भा[2] ॥ धवली[3] अमृतांशुचीहि[4], शरदमळनभा[5]; ॥
अंबर[6] सितरुचि[7], रजनी- ॥ विलासिनी[8] धरि, भमौक्तिकें[9] रुचिरं[10], जनीं. ॥ १ ॥
मंगल सुतिलक अलिकीं[11] ॥ कुमुदाक्षीं[12] भरि सुरम्य कज्जल अलि[13] कीं. ॥
चंद्रमुखी[14] ते हरिला ॥ रुचली; श्रीकांत योगिपति परि[15] हरिला[16]. ॥ २ ॥
प्राचीमुख[17] चंद्र करी ॥ स्वोदयरागें[18] करीं[19] अरुण[20] मोदकरीं. ॥
ये प्रिय[21] बहुदिवसां, जे ॥ दयिता[22], तद्वदन कुंकुमें भरि सांजे! ॥ ३ ॥
कुंकुमपिंजरितरमा- ॥ मुखनिभ[23]शशिमंडळीं दिसे द्युति[24] परमा[24]. ॥
पाहुनि वनहि धवळेलें, ॥ हरिमन गायासि मधुर बहुविध वळलें. ॥ ४ ॥
ऐकति युवतिमृगी[25] तें, ॥ तों तद्धृदयांत[26] संचरे स्मर[27] गीतें[28]; ॥
वनवसुधा[29] वेगानें ॥ पावति, हरि जेथ घेति धांवे गानें[28]. ॥ ५ ॥
हरिनें बहुशुंभगानीं[30] ॥ हरिलें मन; टाकिलें सदन[31] सुभगांनीं[32]. ॥
लज्जा भय न पळ टिके; ॥ व्यवहार त्यागवी गुरुजनप[33] लटिके. ॥ ६ ॥
काढित असतां धारा, ॥ टाकुनि, अनुसरति युवति जगदाधारा[34]. ॥
तापावितां दुध माणकीं[35], ॥ त्यजिति; अमृत पाजितो बहु विबुधमाणि[36] कीं[37]. ॥७॥
चुल्लीवरिच करपती ॥ अन्नें, गांठिति वधु[38] प्रमोदकरपाति[39]. ॥
पडतां ध्वनि तो कानीं, ॥ स्तन काढुनि, जाति, चोखितां तोकांनीं[40]. ॥ ८ ॥
करितां वाढप, रि चवी[41] ॥ करपात्र[42]; स्वगुरुभयाहि[43] वाढ, परि, चवी ॥

---

१ शर-द-, मळ= मेघसंबंधी मळ. २ तेज, कांति. ३ शुभ्र करी. ४ अमृत-अंशु, चंद्राची. ५शरत्-अमळ-नभा, शरदृतूच्या स्वच्छ आकाशास. ६आकाश; व रूपकासाठीं वस्त्रअसें घ्यावयाचें. ७ शुभ्रकांतीचें. ८ रात्र हीच विलासकरणारी एक स्त्री. ९ नक्षत्ररूपी मोत्यें. १० सुंदर ११ ललाटीं. १२ कुमुदरूपी नेत्रांत. १३ भ्रमर. १४ चंद्रच आहे मुख जीचें. १५लक्ष्मीकांत जरी होता, व जरी योगिपति होता, तरी हि भुलविला. १६ भुलविला. १७ पूर्वदिशेचें मुख. १८स्व-उदय रागें=आपल्या उदयाच्याकांतीनें. १९('मोदकर'=आनंदकर) किरणांनीं. २० तांबडें. २१ प्राणनाथ २२ स्त्री. २३ कुंकुमानें लेपलेल्या लक्ष्मीच्या मुखासारिखा जो चंद्र त्यावर. २४ परम कांती. २५ स्त्रीरूपीहरिणी. २६ तत्-हृदयांत. २७ कामदेव. २८गायनानें. २९ जागा. ३० श्रेष्ठगायनांनीं ३१ घर. ३२ स्त्रियांनीं ३३ श्रेष्ठजनस्वामी ३४ जगत्-आधारा=कृष्णास. ३५ डेर्‍यांत. ३६ देवश्रेष्ठ. ३७ 'कीं'= 'त्यजिति' याचें कारण. ३८ स्त्रिया. ३९ आनंददायक पति. ४० मुलांनीं. ४१ ठेवी. ४२हातांतील भांडें. ४३आप्तश्रेष्ठांचें भय जरी 'बाढ' (=थोर) होतें तरिही.

घेतां गान[१]सुधेची, ॥ त्यजिले व्यवहार. हे असार[२] सुधेचि[३]. ॥ ९ ॥
न रुचे पतिसेवा यां. ॥ वाटति हे मानिले स्वपतिसे वायां. ॥
भेटाया निजपतितें ॥ गेल्या; फळलें सदैव[४]ही मनिं जपति तें. ॥ १० ॥
हरिचा स्वांतां[५] टकळा ; ॥ भोजन करितांहि, ढकालिती ताट; कळा- ॥
[६]गानाख्या दूति सत्या ॥ खोळंबविती क्षणार्ध न वधू तिस त्या. ॥ ११ ॥
स्त्री संपविति न उटिला, ॥ उठती न्हातां न देह धुतला, उटिला[७]. ॥
सांवरली हि न कुटिला- ॥ [८]लकसंहति; लाविलें न कुंकुम निटिलीं[९]. ॥ १२ ॥
कोण्ही कुशला, केला ॥ [१०]अंजित दृक्[११]प्रांत लावुनी शलाके[१२]ला, ॥
तो त्यजिति; वेणु सुचवी ॥ कीं, "याहुनि कृष्णरंग[१३] देइल सुचवी[१४]." ॥ १३ ॥
भूषण उत्तम नाकीं, ॥ तें कानीं धरिति; हरि अनंत मना कीं. ॥
कानाचें ये नाका; ॥ वस्त्राच्या धारणीं असें येनां कां? ॥ १४ ॥
पांघुरल्या लुगड्याला ॥ ऐशाही मानल्या दयालु गड्याला. ॥
प्रेमें सरसा[१५], जरि या ॥ व्यत्यस्तांबरविभूषणा[१६], साजरिया. ॥ १५ ॥
त्यजिति अपत्या[१७]; दिसती ॥ अनिवार्या; मानिती न पत्यादि[१८] सती. ॥
जातीच परमहेला[१९] ॥ करुनी, जैशा विटांप्रति[२०] परमहेला[२१]. ॥ १६ ॥
गोप खरे श्रमहेला- ॥ पात्रचि; गेल्या त्यजूनि उचित महेला. ॥
कीं हरिविषयीं न चले ॥ वारण हे तर्क मतिस नाहीं सुचले. ॥ १७ ॥
गोप दुरासद[२२] नीच ॥ स्त्री रोधिति ज्या सुदुर्धरा सदनींच, ॥
त्या, ध्यानद्वारासी ॥ उघडुनियां, पावल्या स्वमुद्वारासी[२३]. ॥ १८ ॥
करिति गळाटा; काया ॥ रोधिति; पडती पती गळां टाकाया. ॥
स्त्रीमत काय, "चिरा हे, ॥ भाजा, खा;" कीं गृहांत कायचि राहे. ॥ १९ ॥

---

१ गायनामृताची. २ व्यर्थ. ३ खरोखरच. ४ नेहमीं. ५ मनास. ६ 'कळा' (=कळावान्, मधुर) गायन या नामाची जो दूति. ७उटणें लाविलेला. ८कुटिल-अलक-संहति, वक्रकेशसमूह. ९ ललाटास. १० पिंजारित. ११ दृष्टीचा प्रांत, ह्मणजे कडा, स्थान. १२ अंजन लावण्याची काडी. १३ काळा रंग १४सु-चवि=उत्तमकांति आहे ज्याची= कृष्ण. १५ प्रेमरूपी रसानें भरलेल्या. १६ व्यत्यस्त- अंबर-विभूषण=अव्यवस्थित, अंबर ( वस्त्र ) व भूषणें आहेत ज्यांचीं. १७ मुलांस. १८ पति आदि. १९ हेलना. २० जाराकडे. २१ परस्त्रिया. २२ हट्टी. २३ स्व-मुद्-वार=आपल्या आनंदाचा समूह, कृष्ण.

पावलिया[1] सदया या[2] ; ॥ पाहूनि म्हणे असद्दुरासद[3], "या, या; ॥
रात्रि महाभागा[4]! या ॥ वनिं कां हो? कोण काम हा भागाया! ॥ २० ॥
मी प्रिय करिन सकळ; वा ॥ आहे कीं जन अहो असाध्वस[5]? कळवा. ॥
निवसा[6] घरिं; घोरांनीं[7] ॥ रात्रिं फिरावें; शिवेच्छु[8] न रिघो रानीं. ॥ २१ ॥
शोधित असतील पति- ॥ प्रभृति[9] स्वजन; त्यजूनि असंती[10] लपती. ॥
उचित तुम्हां कुलजांचें ॥ अकपट गुरुभजन[11], कीं विमळ कुल ज्यांचें. ॥२२॥
जे सुषमा[12] हे रानीं, ॥ चंद्रकरांनीं[13] सुधास्वमाहेरांनीं[14], ॥
देखिलि? जा; ताप वनीं ॥ शमला कीं सर्व सूर्यदुहितोपवनीं[15]? ॥ २३ ॥
वत्सतनयदुहितांची[16] ॥ भूक न हरितांचि, पातलां दुहितांची[17]. ॥
समजावा; निलयाला[18] ॥ जा; जें हें कृत्य, धर्म वानिल[19] याला. ॥ २४ ॥
मजचि पहाया येणें ॥ स्नेहें हें जरि, सुखी असें मी येणें. ॥
जाणतसें प्रेमा, जें ॥ सुखदर्शन वांछितें सदा हें माजें. ॥ २५ ॥
पतितद्बांधवसेवा[20] ॥ हा स्त्रीचा मुख्य धर्म, यातें सेवा. ॥
बाळातें पोसावें; ॥ हित भेषज[21] लागतां कटुहि सोसावें. ॥ २६ ॥
अगुण[22] सगुण[23] पति तातें ॥ दिधला त्यजिजे न; टाकिजे पतितातें[24]. ॥
कीं जारीं सुख न सती[25] ॥ वांछिति; दोन्हीहि लोक तेणें नसती. ॥ २७ ॥
माझ्याठायीं भाव[26], ॥ श्रवणें कीं दर्शनें विगतपरिभाव[27], ॥
जेंवि निरूढचि[28] होतो, ॥ ध्यानें संकीर्तनें, न संगें हो तो[29]. ॥ २८ ॥
यास्तव चिंतितजावें[30]; ॥ तेणें साधेल सर्व चिंतित; जावें." ॥
निष्ठुरता क्षण दावी ॥ हरि असि; अद्भुत खरांशुभा[31] क्षणदा[32] वी. ॥ २९ ॥
स्त्रीजन विप्रियवाणी[33] ॥ परिसे बहु यापरी नवि प्रियवाणी[34]. ॥

---

१ कृष्णाकडेस. २ स्त्रिया. ३ असत्-दुर-आसद=खलांस जो दुर्लभ=कृष्ण. ४ भ-साध्वस=निर्भय. ५ राहा. ६ हे भाग्यवंत स्त्रियांनों. ७ भयंकरांनीं. ८ कल्याणाची इच्छा करणारा. ९ नवरा इत्यादि आप्तजन. १० छिनाल. ११ वडिलांची सेवा. १२ शोभा. १३ चंद्रकिरणांनीं. १४ अमृताचीं माहेरें (स्थानें); "चंद्रकरांनीं" याचें विशेषण. १५ यमुनेच्या वाऱ्यांनीं. १६ वासरें, मुलगे, लेंकी, यांची. १७ दूध काढित असतांच. १८ घरीं. १९ स्तुति करील. २० नवरा व त्याचे आप्त यांची सेवा. २१ औषध. २२ द्वाड. २३ गुणवान्. २४ पातकी. २५ पतिव्रता. २६ विश्वास, भक्ति. २७ आनंदित. २८ दृढ. २९ भाव. ३० ध्यान करीत असावें. ३१ फार तीक्ष्ण अशा किरणांची कांति म्हणजे ताप. (कृष्णानें असा उपदेश करितांच गोपींस फार असह्यता प्राप्त झाली, इ०). ३२ रात्र. ३३ प्रीतिविरहित अशी. ३४ कृष्णवाक्य.

आशेच्या पारिभावें[1] ॥ खिन्न मनें; हरिपदें स्मरति परि[2] भावें. ॥ ३० ॥
भ्याल्या मदनदवाला[3]; ॥ धांवति सेवावया पदनद[4] बाला[5]; ॥
तो बहु-दुस्तर वाटे ॥ मध्यें यां धर्मनर्म[6] रोधचि[7] वाटे[8]. ॥ ३१ ॥
पंकांत[9] इभी[10] रुतती, ॥ ते व्याकुळ जाहलीच तसि भीरुतती[11]. ॥
चरणांगुष्ठें[12] महिला[13] ॥ खणिति; शिरायासि काय दुःखित महिला[14]! ॥ ३२ ॥
अबळांचा[15] धीर गळे, ॥ सांजन[16]नयनांतुनी जसें नीर; गळे[17] ॥
दाटति; ओष्ठ[18] हि सुकले ॥ उष्ण श्वासें; स्तन स्वशोभे मुकले. ॥ ३३ ॥
केलें रामांवर[19] जें ॥ क्षण औदासिन्य[20] सदयरामावरजें[21], ॥
तें दे बहु भी[22]; रुसती ॥ स्वजीवनीं[23], न जगजीवनीं[24] भीरु[25] सती. ॥ ३४ ॥
अभिलषित[26]- सुरत, रुसवे ॥ न; मना लावी नवी नतसुरतरु[27] सवे[28], ॥
शब्द उदासीन; मनें ॥ भ्याल्या त्या; करिति हरिस दासी नमनें. ॥ ३६ ॥
प्रणय- क्रोध- वशमती[29] ॥ सुदंती[30] वदती, विलोकुनी धव[31], शमती[32]. ॥
"क्रूर, विभो! न वदावें; ॥ दग्धांतें[33] काय जाळिसी नव-दावें[34]? ॥ ३६ ॥
साहेना आंग[35] मन ॥ स्मरेषुची[36]; तवपदांबुजीं[37] आगमन ॥
टाकुनि सर्व विषय, मा- ॥ पति[38]! केलें; वदसि जें असह्य[39] विष यमा. ॥३७॥
हरि! मान[40] सखे दासी; ॥ लोटीं विरहाग्निमाजि न सखेदांसी[41]. ॥
जें देवां वांचवितें ॥ दे न, अधरिंचेंचि[42] अमृत देवा! चवि तें. ॥ ३८ ॥

---

१ खंडनानें. २ परंतु; ( आशापरिभावें मनें खिन्न, परंतु, इ० ). ३ कामरूपी वणव्याला. ४ कृष्णपदरूपी नदास. ५ स्त्रिया. ६ कृष्णानें धर्माच्या संबंधानें केलेली थट्टा. ७ बांध. ८ भासे. ९ चिखलांत. १० हस्तिनी. ११ भित्र्यांचा (स्त्रियांचा) समूह. १२ पायांच्या आंगठ्यानें. १३ पृथ्वीला. ही उत्प्रेक्षा आहे. १४ स्त्रिया. १५ स्त्रियांचा. १६ अंजन (काजळ इ० आहे ज्यामध्यें अशा डोळ्यांतून ). १७ पाणी. १८ ओंठ. १९ स्त्रियांवर. २० उदासीनपणा; अवकृपा. २१ सदय-राम-अवरज = बळरामाच्या कृपाळू बंधूनें = कृष्णानें. २२ भय. २३ आपल्या जीवावर. २४ कृष्णावर. २५ भ्यालेल्या ( स्त्रिया ). २६ इच्छिलें आहे सुरत ज्यांनीं. हें "न रुसवे" याचें कारण आहे. २७ शरणागतांचा कल्पवृक्ष, (कृष्ण). २८ सवई (विप्रिय बोलणें ही). २९ स्तुति व राग यांच्या स्वाधीन केल्या आहेत मति ज्यांनीं. ३० सुंदर ( सुंदर दंताच्या). ३१ कृष्ण. ३२ सुखी होती. ३३ आधींच जळालेल्यास. ३४ अपूर्व किंवा नव्या वणव्यानें. ३५ अग्नि ( ताप ). ३६ कामरूपी बाणाची. ३७ तुझ्या पदकमळीं. ३८ हे लक्ष्मीपते! ३९ सोसण्यास कठीण. ४० समज. ४१ आम्हा दुःखितांस. ४२ चुंबनांतील.

मुनि पंचतपा[१], दासी ॥ याही पंचेषुतप्त[२], नतें[३] पादासी. ॥
तूं पुरुषोत्तम हातें ॥ धरिं, निववीं जें प्रतप्त[४] चित्त महा तें. ॥ ३९ ॥
न जरी आवडि, लांचें ॥ त्वद्भजनाच्या[५], करूं भजन वडिलांचें. ॥
या विण, गेहीं न सवे ॥ लागे; कैंची क्रिया? उगेही नसवे. ॥ ४० ॥
'वचन करा गे! जावें' ॥ ह्मणसी हें न मनि[६] मन; न रागें जावें[७]. ॥
कीं बहुवर्स[८] खेद वसे ॥ पति- पुत्रीं; होति तापद[९] सखे! दवसे[१०]. ॥ ४१ ॥
शिंपिलिया तरुबुड, तें ॥ दळ-फळकुसुमांत[११] जळ मिळे, कीं बुडतें? ॥
कथिला तो धर्म; पण ॥ स्वचरणीं अर्पितां, खरें धर्मपण[१२]. ॥ ४२ ॥
आत्माप्रिय, नित्य धणी ॥ तूं; पावति कुशल[१३] तव पदींच सुखधणी[१४]. ॥
त्वदधररसपानाशा[१५] ॥ बहु दिवसांची, न योग्य, सरूपा! नाशा. ॥ ४३ ॥
कल्पतरू! पाहसि तें ॥ कलगीतें[१६] कामकांतरूपा[१७]! हसितें[१८] ॥
होय समुत्सव[१९]; दमन ॥ स्मराग्निचें[२०] यांत तर्कि दाह वद मन. ॥ ४४ ॥
कामदहनिं[२१] कापूर ॥ स्त्री होति; तयां सुखावह निको[२२] पूर ॥
अधरसुधांचा[२३] वाहो; ॥ तुमचा अवळासमूह[२४] वांचावा हो. ॥ ४५ ॥
मन हरिलें कलगीतें; ॥ दासी करितों तुझ्या पदीं सलगीतें; ॥
तुज, विरहदहनशमनीं[२५], ॥ ध्यानें पावोंचि, तूंचि कीं अनिशीं[२६] मनीं. ॥ ४६ ॥
सर्वस्वें[२७] जो सवदा ॥ साधिति साधू, रमाहृदब्जोत्सवदा[२८] ! ॥
ज्या पासुनि, तवचरणा ॥ शिवलों, वनेजन[२९], सख्या ! सुभद्राचरणा[३०] ! ॥४७॥
विटलों ओका[३१] रीती ॥ भवदन्याची[३२] रुचे न, ओकारी ती[३३]. ॥

---

१ पांच आहेत तप ज्यांस. २ पंच- इषु तप्त= कामानें तापलेल्या. ३ शरण. ४ फार संतापलेलें. ५ तुझ्या भजनरूपी लांचानें; (=स्वीकार करिशील तर इ०). ६ मान्य करितें (मन). ७ (आपण) रागें भरूं नये. ८ फार. ९ ताप देणारे. १० दावाग्नीसारिखे. ११ पानें, फळें, व पुष्पें, यांत. १२ धार्मिकत्व. १३ चतुर. १४ सुखाची समृद्धि. १५ त्वत्- अधर- रस- पान- आशा= तुझें अधरामृत पिण्याची इच्छा. १६ मंजुळ गायनानें. १७ कामदेवाप्रमाणें सुंदर आहे रूप ज्याचें त्या तूं ! १८ हास्यानें. १९ महान् उत्साह, आनंद. २० कामरूपी अग्नीचें. २१ कामाग्नींत. २२ चांगला. २३ अधरामृतांचा. २४ श्वासमूह. २५ विरहरूपी. अग्नि प्राप्त जहाल्यास तो विझवावयास. २६ नेहमीं. २७ आपलें सर्व देऊन. २८ हे रमेच्या हृदयकमळास आनंद देणाऱ्या! २९ आह्मी अरण्यांतील जन. ३० उत्तम कल्याणरूप आहे आचरण ज्याचें अशा तूं. ३१ घरास. ३२ भवत्- अन्य= तूं खेरीज करून दुसऱ्या कोणाचे आचरण. ३३ रीति.

पिक[1]गुण काय जि![2] भेकीं? ॥ कांजीं[3] अमृताधिका[4]हि काय जिभे कीं?[5] ॥४८॥
करिती दैवत[6] पाहों[7] ॥ श्रीपद[8] या एकदा सदैव तपा हो ! ॥
अशि ती ही वरि तुळसी, ॥ सह पदधूळी धरूं शिरीं निस्तुळसी[9]. ॥ ४९ ॥
तूं सुरपादं[10]प राया ! ॥ दासींतें दे स्वहास्य, पाद[11]परा या[12]. ॥
तव वदन[13]स्मित[14] रुचिर ॥ प्रेक्षु[15]नि, मानें कामतप्त आहों[16] सुचिर. ॥ ५० ॥
श्रीमुख वेष्टित अलकीं[17], ॥ अलिकुल[18]परिवृत सुधांशुबिंब[19], कमल,[20] कीं! ॥
कुंडल[21]रुचि गं[22]डांतीं; ॥ अधरिं अमृत; वांचकीं विरह[23]गंडांतीं. ॥ ५१ ॥
हरि तापसमूह[24] सितें ॥ हसितेसह[25]वर्तमान जें पाहसिं तें.[26] ॥
विश्वंभर भुज, गाजे ॥ यश देवसभेंत, लाजविति भुजगा जे.[27] ॥ ५२ ॥
मुत्[28]प्रभवक्षम नादे ॥ जेथें[29] श्री हें प्रमोद[30] वक्ष[31] मना दे. ॥
वाटे अंबट कीं तें ॥ अमृताहि! हें रूप गोड या वटकींतें. ॥ ५३ ॥
ऐसी कोण, हरि ![32] सती ॥ त्रिजगीं, जे मधुर वेणुगीत[33] पारिसती, ॥
पाहे तुजहि, रमेना[34] ! ॥ त्रिभुवन[35]रुचिरा ! व्रत त्यजून, रमेना ?॥ ५४ ॥
खग, मृग, सनग[36]जग, रति- ॥ प्रद[37]-रूपें मोहती; न कां तुज ग[38]रती ? ॥
तूं विश्वंभर साच; ॥ प्रसन्न हो; न तरि, देह हा भरसा[39]च. ॥ ५५ ॥
तप्तस्तनता पसरे; ॥ कर[40]कंज न ठेवितां, न हा ताप सरे. ॥
दु[41]र्वह देह; ठकवणें ॥ ना[42]तःपर; सह्य होति हे हठ कवणें? ॥ ५६ ॥
त्वद्ययीं रामा[43] निशितें[44] ॥ कामशरें विद्ध[45] सुंदरा; मानिशि तें ॥

---

१ कोकिलेचा गुण. २ बेडकाच्या अंगीं. ३ पेज; "कांजीं" हा शब्द या ठिकाणीं स्त्रीलिंगीं आहे. ४ अमृतापेक्षां अधिक. ५ किंवा. ६ देव. ७ पाहावयास. ८ लक्ष्मीचींस्थानें अशा ज्या या तुळसी. ९ निरुपम अशी. १० कल्पवृक्ष. ११ पायांच्या ठायीं तल्लीन. १२ आम्ही. १३ किंचित हास्य. १४ सुंदर. १५ पाहून. १६फार दिवस पर्यंत. १७केसांनीं. १८ भ्रमरांनीं वेष्टिलेलें, (अलक हेच भ्रमर). १९ चंद्रबिंब. २० किंवा. २१ कुंडलांची शोभा. २२ कानसुलावर. २३ विरहरूपी अपमृत्यूंत. २४ पांढरे, शुभ्र. २५ हास्यासह २६तूं हांसत पाहतोस, तें तुझें पाहणें तापसमूह हरी. हास्यास शुभ्ररंग असतो असें मानितात. २७ भुज. २८ आनंद उत्पन्न करण्यास योग्य. २९ लक्ष्मी. ३० आनंद, उत्साह. ३१ छाती ३२ स्त्री. ३३ ऐकिते. ३४ रमा-ईन, हे रमेशा ! ३५ त्रिजगीं सुंदर. ३६ पक्षी, सावजें, व वृक्ष. आणि इतर जग. ३७ प्रियकर. ३८ "मोहती" हें क्रियापद पुनः लावावें. ३९ ओझ्यासारिखाच. ४० हस्तकमल. ४१ जड. ४२ या नंतर नको. ४३ स्त्रिया. ४४ तीक्ष्ण अशा (कामशरें). ४५ जखमी.

करिं; तव[१]सन्मुख रानीं ॥ बडबड केली यथेष्ट या मुख[२]रांनीं." ॥ ५७ ॥
चिंती भ[३]व्य सु[४]रमणी ॥ कीं, "जरि मत्संग दुर्लभ, व्य[५]सु [६]रमणी ॥
होतिल;" यास्तव नातें ॥ [७]श्रीचें दे, सफळ करुनियां स्तवनातें. ॥ ५८ ॥
इच्छिति पदरज सु[८]रता, ॥ गोपी करिती सुखें तयासह सुरता! ॥
चंद्र अ[९]र्जुन, तारा ज्या ॥ भासति; दावी चरित्र जन ताराया. ॥ ५९ ॥
गज जैसा [१०]स्ववशांला, ॥ गोपींला रमवि हरि वनीं [११]स्ववशांला. ॥
[१२]लज्जापर मा[१३] केली; ॥ लक्ष्मीऐसीच होय प[१४]रमा केली.[१५] ॥ ६० ॥
मानी आपुलि नीच ॥ ज्यो[१६]त्स्ना पूर्णें[१७]दु ही, अशा [१८]पुलिनींच ॥
कृष्णे[१९]च्या, देव रमे; ॥ स्मरतां विस्मय रमा मना दे, वरमे. ॥ ६१ ॥
धृतकु[२०]मुदामोदरसा- ॥ निल तेथें करि विलास दामोदरसा; ॥
जाला भीत रवीची ॥ क[२१]न्या लंघुनि; तिच्याहि भीतर [२२]वीची. ॥ ६२ ॥
"देऊं कां मी न रसा ॥ भक्तांतें?" ह्मणुनि देव, [२३]कामी नरसा, ॥
ख्याती प्र[२४]मदा मनिं जें, ॥ आलिंगन, दे सुखें मुखें दा[२५]में निजें. ॥६३ ॥
"मृदुता न कुसु[२६]मदामीं, ॥ कठिनीं, जरि तरि न लेशही श्रम [२७]दामीं. ॥
प्रेमें वत्थ सदा मी," ॥ देव म्हणे गोपिकांसि; दे रस दामीं ॥ ६५ ॥
तों सौभग[२८]र्वमानीं ॥ त्या स्त्री मळतां, न साधु[२९]कामद मानी. ॥
येणें सुखहानीच; ॥ प्रभुहि विटे; फार मानमद हा नीच. ॥ ६५ ॥
पावे अं[३०]तर्धान ॥ प्रभु हा स[३१]द्भक्तवृंदहर्षनिधान; ॥
कीं कुमति न सोसवती; ॥ श्री[३२]चा केल्याहि, हें परि नसो, सवती. ॥ ६६ ॥

इति श्रीमत्कृष्णविजये रासक्रीडायां प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥ २९ ॥

---

१ तुझ्यासमोर. २ वाचाळांनीं. ३ कल्याण. ४ कृष्ण. ५ वि- असु, गतप्राण.
६ स्त्रिया. ७ स्त्रीचें. ८ देवसमूह. ९ कृष्ण. १० करिणींला. ११ आपल्या स्वाधीन जहालेल्या
अशा ज्या त्यांस. १२लज्जाभरित. १३लक्ष्मी १४महान्. १५ क्रीडा. १६चांदणें. १७ पूर्णचंद्र.
१८तटावर. (पूर्णेंदूच्या चांदण्यापेक्षांहि शुभ्र होतें असा भावार्थ). १९यमुनेच्या. २०धृत- कुमुद-
आमोद- रस-अनिल, कमळांचा सुवास व रस धारिला आहे ज्याणें असा वायु. २१ यमुना.
२२ लाटा ('भीत' जहाल्या) २३ कामातुर. २४ स्त्रिया (गोपी). २५ चुंबन.
२६फुलांच्याहारीं. २७दाव्यांच्या अंगीं. (यशोदेनें दाव्यांनीं बांधिलें, तेव्हां तीं फुलांच्या हारांहून
मृदु होतींइ०). २८ आपल्या भाग्याच्या गर्वानें व मानानें. २९ साधूंची इच्छा पूर्ण करणारा
(कृष्ण). ३०गुप्त (जहाला). ३१ भक्तसमूहाच्या आनंदाचें भांडार. ३२ लक्ष्मीच्या.

क्रीडे स्त्रींसह; साहे ॥ गर्व न; सुखमूर्ति विरहद[1] सहसा[2] हे; ॥
यन्मय[3] चर अग जग[4]; जी- ॥ वनिं शोधिति, जेवि यूथनाथ[5] गज[6] गजी[7]. ॥ १ ॥
त्वद्दया देववि लास[8] ॥ स्वविरहहस्तेंचि[9] वासुदेव विलास; ॥
स्मरति चरित्रें[10] सुकृति- ॥ ध्येया[11]; करिती तदात्मिका[12] तदनुकृति[13]. ॥ २ ॥
विरहें दग्धवपु[14] सती ॥ अश्वत्थादिद्रुमासि[15] माधव पुसती. ॥
गृह न स्मरती; रानीं ॥ फिरती, उन्मत्तशा, क्षत शरीरांनीं. ॥ ३ ॥
“जो वधि अलिचिकुर[16] वकां[17] ॥ देखियला काय चित्तचोर[18] कुरवकां[19] ! ॥
तूं तरि सांग, अशोकां[20]! ॥ हे गोपीमंडळी करावि अशोकां[21]. ॥ ४ ॥
हे पुन्नागा ! नागा ! ॥ सांग, करी विमद जो महात्मा नागां[22]; ॥
भ्यालों कंपकरां[23] या ॥ कामशरा, कृष्ण सांग, चंपकराया ! ॥ ५ ॥
तूं तरि सदये तुळसी ! ॥ वद हरिचरणप्रिये[24] ! (रमेसीं तुळसी[25]). ॥
जरि अवलोकन, कपटा[26]- ॥ कर कोठें सांग, भूललों कनकपटा[27]!” ॥ ६ ॥
प्रार्थुनियां मालतिला, ॥ पुसती त्या कांतिनिर्जिततमाल[28] तिला ॥
गोपी, “श्रीमल्लीला[29]- ॥ निधि कोठें?” हें विचारिती मल्लीला[30]. ॥ ७ ॥
“निष्ठुर[31] जे, असु[32] जाती; ॥ सुमृदु तुम्ही जातियूथिके ! असु[33] जाती ॥
ऐसें त्वद्दया वाटे; ॥ गेला कीं तो नभवसुहृद[34] या वाटे ? ॥ ८ ॥
जलदश्यामा[35], कंदा ॥ मोदाच्या[36], देखिलें तुवां माकंदा[37] ? ॥
यश संपादा दानीं ॥ प्राणांच्या; हे कि जे[38] कृपा दादांनीं[39]. ॥ ९ ॥

---

१ वियोग करणारी. २ एकाएकीं. ३ जेणेंकरून युक्त. ४ चराचर सृष्टि. ५ करिणींचा पति. ६ हस्ती. ७ हत्तिणी. ८ बुरका. ९ आपल्या विरहरूपी हातानें. १० मागें केलेल्या कृत्याच्या योगानें. ११ कुशलांचा ध्यान करण्याचा विषय (कृष्ण). १२ गोपी. १३ तत्-अनुकृति, कृष्णानें केलेल्या चरित्रांचें पुनर्दर्शन (= सोंग आणणें इ०). १४ जळालें आहे शरीर ज्यांचें. १५ पिंपळ इत्यादि वृक्षांस. १६ कंटकादिकांनीं फाटलेल्या. १७ राक्षसविशेष. १८ कृष्ण. १९ वृक्षविशेष. २० वृक्षविशेष. २१ शोकरहित. २२ कालियास. २३ कांपविणाऱ्या (कामरूपी बाणास). २४ कृष्णचरणास प्रिय अशी जी तूं. २५ तुलना पावतेस. २६ कपटखाणि. २७ पीतांबरधारि कृष्णास. २८ निजकांतीनें जिंकिलें आहे तमालास ज्याणें. २९ श्रीमत्लीला- निधि, महान लीलेचें कोठार (कृष्ण). ३० वृक्षविशेष. ३१ एथपर्यंत संबोधिलेले वृक्ष कठोर; आतां तुह्मी तरि हे जाई! जुई! सांगा, इ०. ३२ असो. (याचा कर्ता “जाती”). ३३ प्राण (आमचे). ३४ शिवाचा मित्र. ३५ मेघःश्यामा, कृष्णास. ३६ आनंदाच्या मुळास (कृष्णास). ३७ आंबा. ३८ करावी. ३९ आपण.

तूज नतां[1] पनसा[2] ! हे ॥ स्त्रीसंहति[3]; हरिवियोगताप न साहे. ॥
सदया ! पाव, (दवार्ता[4] ॥ हरिणीशा;) करुनियां कृपा, वद वार्ता. ॥ १० ॥
व्याळविदारक[5] सारे[6] ॥ न कथां हे अनस[7]! कोविदार! कसा रे ? ॥
तुज जंबुद्रो[8] ! हातें ॥ वंदुनि पुसतों अघाकृतद्रोहातें[9]. ॥ ११ ॥
सद्गतिदायक[10] दावा, ॥ सांगा भेटेल गोपराय[11] कदा वो[12]. ॥
यमुनातटतापस[13] ! रे, ॥ न कसे उपकृति[14] करा ? न हा ताप सरे. ॥ १२ ॥
रे, रे, साधो ! अर्का[15] ! ॥ जाणसि तरि सांग खळतमाच्या अर्का[16]. ॥
वद हृत्साक्षी[17] बकुळा[18] ! ॥ वरिल अलींच्या[19] भला, कसा क्षीब[20], कुळा? ॥ १३ ॥
टाकुनि युवतिकदंबा[21] ॥ गेला, तो देखिला न काय कदंबा ? ॥
आणी वनिं पाजाया ॥ अधरामृत, टाकि कितव नी[illegible][22] ! जाया. ॥ १४ ॥
त्वां केलें तप महि[23]! तें ॥ तें नेणों, कीं[24] पुलकि[25][illegible] हरिपदें[26] महितें[27]. ॥
वद, तूं सतीवरा[28], हें ॥ सुख त्रिविक्रमपदें[29] किं आदिवराहें[30] ? ॥ १५ ॥
वद हरिणिसखि! प्रभु, जा ॥ दयितेच्या[31] ठेउनी निजांसिं[32] स्वभुजा, ॥
गेला याचि पथानें; ॥ कीं तीचीं कुंकुमें सुचर्चित[33] थानें ? ॥ १६ ॥
आलिंगनसहवासें ॥ हरिचें कुंदसुमदाम[34] दुःसह[35] वासें ॥
आम्हां हेंच सुचवितें, ॥ लाधलि तवदृष्टि दर्शनामृतचवितें." ॥ १७ ॥
सफळ तरू लवले, या[36] ॥ भाविति, हरिपादधूळिचें लव[37] लेया. ॥
आलिंगित लतिकांहीं[38] ॥ त्यांसहि पुसती, मनोज्ञ[39] बोलति कांहीं. ॥ १८ ॥

---

१ शरणागत. २ हे पणसा! ३ स्त्रीसमूह. ४ वणव्यानें भाजलेल्या. ५ सर्प-(=कालिया) मर्दन करणारा. ६ सर्व. ७ वृक्षविशेष. ८ हे जांबुळीच्या वृक्षा ! ९ अघासुरेंही अकृतद्रोह ( यशस्वीपणें द्रोहविरहित ) अशा; " अपाकृत द्रोहातें, " असाहि दुसरा पाठ आहे. १० मोक्ष देणारा (कृष्ण). ११ कृष्ण. १२ कीं १३ यमुनेच्या तटावरील तपस्वी. १४ उपकार. १५ वृक्षविशेष. १६ दुष्टजनरूपी अंधाराच्या सूर्यास (कृष्णास). १७ लोकहृदयांतील विचार पाहणारा (कृष्ण). १८ ओवळीचा वृक्ष. १९ भ्रमरांच्या. २० मत्त. अलींच्या कुळाला भला वरील; क्षीब कसा वरील ? (भ्रमरसमूह क्षीब म्हणजे रसातें न उत्पन्न करणारा वरित नाहीं ; तुझावर भ्रमरकूळ दिसतें आहे; तेव्हां तुझी क्षीब नाहीं; वास्तव कृष्ण कोठें आहे ? हें सांगा, असा भावार्थ). २१ स्त्रीसमूहास. २२ वृक्षविशेष. २३ हे पृथ्वि! २४ कारण कीं. २५ रोमांच उभारे ज्याचे. २६ कृष्णचरणांनें. २७ पूजितानें (पदानें). २८ कृष्णास. २९ कृष्णपदें. ३० वराह अवतारें. ३१ स्त्रियेच्या. ३२ निज-अंसिं=आपल्या खांद्यावर. (दयितेच्या अंसि, स्वभुजाला; व निजांसीं, दयितेच्या भुजाला असा अन्वय). ३३ सुशोभित. ३४ कुंदीच्या फुलांचा हार. ३५ उग्र; (सवतीनें आलिंगन देतां कृष्णांगीं तें दाम होतें ह्मणून). ३६ गोपी. ३७ अंश. ३८ वल्लींनीं वेष्टित असलेल्या वृक्षांस. ३९ सुरस.

क्रीडे स्त्रीसह; साहे ॥ गर्व न; सुखमूर्ति विरहद[1] सहसा[2] हे; ॥
यन्मय[3] चर अग जग[4]; जी- ॥ वनिं शोधिति, जेवि यूथनाथ[5] गज[6] गजी[7]. ॥ १ ॥
त्द्दया देववि लास[8] ॥ स्वविरहहस्तेंचि[9] वासुदेव विलास; ॥
स्मरति चरित्रें[10] सुकृति- ॥ [11]ध्येया; करिती तदात्मिका[12] तदनुकृति[13]. ॥ २ ॥
विरहें दग्धवपु[14] सती ॥ अश्वत्थादिद्रुमासि[15] माधव पुसती. ॥
गृह न स्मरती; रानीं ॥ फिरती, उन्मत्तशा, क्षत शरीरांनीं. ॥ ३ ॥
“जो वधि अलिचिकुर[16] बका[17] ॥ देखियला काय चित्तचोर[18] कुरवका[19] !॥
तूं तरि सांग, अशोका[20]! ॥ हे गोपीमंडळी करावि अशोका[21]. ॥ ४ ॥
हे पुन्नागा ! नागा ! ॥ सांग, करी विमद जो महात्मा नागा[22]; ॥
भ्यालों कंपकरा[23] या ॥ कामशरा, कृष्ण सांग, चंपकराया ! ॥ ५ ॥
तूं तरि सदये तुळसी ! ॥ वद [24]हरिचरणप्रिये ! (रमेसीं तुळसी[25]). ॥
जरि अवलोकन, कपटा[26]- ॥ कर कोठें सांग, भूललों कनकपटा[27]!” ॥ ६ ॥
प्रार्थुनियां मालतिला, ॥ पुसती त्या कांतिनिर्जिततमाल[28] तिला ॥
गोपी, “श्रीमल्लीला[29]- ॥ निधि कोठें?” हें विचारिती मल्लीला[30]. ॥ ७ ॥
“निष्ठुर[31] जे, असु[32] जाती; ॥ सुमृदु तुम्ही जातियूथिके ! असु[33] जाती ॥
ऐसें त्द्दया वाटे; ॥ गेला कीं तो नभवसुत्हृद[34] या वाटे ? ॥ ८ ॥
जलदश्यामा[35], कंदा ॥ मोदाच्या[36], देखिलें तुवां माकंदा[37] ? ॥
यश संपादा दानीं ॥ प्राणांच्या; हे कि जे[38] कृपा दादांनीं[39]. ॥ ९ ॥

---

१ वियोग करणारा. २ एकाएकीं. ३ जेणेंकरून युक्त. ४ चराचर सृष्टि. ५ करिणींचा पति. ६ हस्ती. ७ हत्तिणी. ८ खुरका. ९ आपल्या विरहरूपी हातानें. १० मागें केलेल्या कृत्याच्या योगानें. ११ कुशलांचा ध्यान करण्याचा विषय (कृष्ण). १२ गोपी. १३ तत्-अनुकृति, कृष्णानें केलेल्या चरित्रांचें पुनर्दर्शन (= सोंग आणणें इ०). १४ जळालें आहे शरीर ज्यांचें. १५ पिंपळ इत्यादि वृक्षांस. १६ कंटकादिकांनीं फाटलेल्या. १७ राक्षस विशेष. १८ कृष्ण. १९ वृक्षविशेष. २० वृक्षविशेष. २१ शोकरहित. २२ कालियास. २३ कांपविणाऱ्या (कामरूपी बाणास). २४ कृष्णचरणास प्रिय अशी जी तूं. २५ तुलना पावतेस. २६ कपटखानि. २७ पीतांबरधारि कृष्णास. २८ निजकांतीनें जिंकिलें आहे तमालास ज्याणें. २९ श्रीमत्लीला- निधि, महान लीलेचें कोठार (कृष्ण). ३० वृक्षविशेष. ३१ एथपर्यंत संबोधिलेले वृक्ष कठोर; आतां तुह्मी तरि हे जाई! जुई! सांगा, इ०. ३२ असो. (याचा कर्ता “जाती”). ३३ प्राण (आमचे). ३४ शिवाचा मित्र. ३५ मेघःश्यामा, कृष्णास. ३६ आनंदाच्या मुळास ( कृष्णास ). ३७ आंबा. ३८ करावी. ३९ आपण.

तूज नतां[1] पनसा[2] ! हे ॥ स्त्रीसंहति[3]; हरिवियोगताप न साहे. ॥
सदया ! पाव, (दवार्ता[4] ॥ हरिणीशा;) करुनियां कृपा, वद वार्ता. ॥ १० ॥
व्याळविदारक[5] सारे[6] ॥ न कथां हे अनस! कोविदार! कसा रे ? ॥
तुज जंबुद्रो[8] ! हातें ॥ वंदुनि पुसतों अघाकृतद्रोहातें[9]. ॥ ११ ॥
सद्गतिदायक[10] दावा, ॥ सांगा भेटेल गोपराय[11] कदा वा[12]. ॥
यमुनातटतापस[13] ! रे, ॥ न कसे उपकृति[14] करा ? न हा ताप सरे. ॥ १२ ॥
रे, रे, साधो ! अर्का[15] ! ॥ जाणसि तरि सांग खळतमाच्या अर्का[16]. ॥
वद हृत्साक्षी[17] बकुळा[18] ! ॥ वरिल अलींच्या[19] भला, कसा क्षीव[20], कुळा? ॥ १३ ॥
टाकुनि युवतिकदंबा[21] ॥ गेला, तो देखिला न काय कदंबा ? ॥
आणी वनिं पाजाया ॥ अधरामृत, टाकि कितव न[illegible][22] ! जाया. ॥ १४ ॥
त्वां केलें तप महि[23]! तें ॥ तें नेणों, कीं[24] पुलकि[25]तां[26] हरिपदें[27] महितें. ॥
वद, तूं सतीवरा[28], हें ॥ सुख त्रिविक्रमपदें[29] किं आदिवराहें[30] ? ॥ १५ ॥
वद हरिणिसखि! प्रभु, जा ॥ दयितेच्या[31] ठेउनी निजांसिं[32] स्वभुजा, ॥
गेला याचि पथानें; ॥ कीं तीचीं कुंकुमें सुचर्चित[33] थानें ? ॥ १६ ॥
आलिंगनसहवासें ॥ हरिचें कुंदसुमदाम[34] दुःसह[35] वासें ॥
आम्हां हेंच सुचवितें, ॥ लाधलि तवदृष्टि दर्शनामृतचवितें." ॥ १७ ॥
सफळ तरू लवले, या[36] ॥ भाविति, हरिपादधूळिचें लव[37] लेया. ॥
आलिंगित लतिकाहीं[38] ॥ त्यांसहि पुसती, मनोज्ञ[39] बोलति कांहीं. ॥ १८ ॥

---

१ शरणागत. २ हे पणसा! ३ स्त्रीसमूह. ४ वणव्यानें भाजलेल्या. ५ सर्प-(=कालिया) मर्दन करणारा. ६ सर्व. ७ वृक्षविशेष. ८ हे जांबुळीच्या वृक्षा ! ९ अघासुरेंही अकृतद्रोह (यशस्वीपणें द्रोहविरहित) अशा; " अपाकृत द्रोहातें, " असाहि दुसरा पाठ आहे. १० मोक्ष देणारा (कृष्ण). ११ कृष्ण. १२ कीं १३ यमुनेच्या तटावरील तपस्वी. १४ उपकार. १५ वृक्षविशेष. १६ दुष्टजनरूपी अंधाराच्या सूर्यास (कृष्णास). १७ लोकहृदयांतील विचार पाहणारा (कृष्ण). १८ ओवळीचा वृक्ष. १९ भ्रमरांच्या. २० मत्त. अलींच्या कुळाला भला वरील; क्षीव कसा वरील ? (भ्रमरसमूह क्षीव म्हणजे रसानें न उत्पन्न करणारा वरित नाहीं ; तुम्हावर भ्रमरकूळ दिसतें आहे; तेव्हां तुम्ही क्षीब नाहीं; वास्तव कृष्ण कोठें आहे? हें सांगा, असा भावार्थ). २१ स्त्री-समूहास. २२ वृक्षविशेष. २३ हे पृथ्वि! २४ कारण कीं. २५ रोमांच उभारे जीचे. २६ कृष्णच-रणांनें. २७ पूजितानें (पदानें). २८ कृष्णास. २९ कृष्णपदें. ३० वराह अवतारें. ३१ स्त्रियेच्या. ३२ निज-अंसिं=आपल्या खांद्यावर. (दयितेच्या अंसि, स्वभुजाला; व निजांसीं, दयितेच्या भुजाला असा अन्वय). ३३ सुशोभित. ३४ कुंदीच्या फुलांचा हार. ३५ उग्र; (सवतीनें आलिंगन देतां कृष्णांगीं तें दाम होतें म्हणून). ३६ गोपी. ३७ अंश. ३८ वल्लींनीं वेष्टित असलेल्या वृक्षांस. ३९ सुरस.

दुःखें निजतनु कारा[१] ॥ वाटे; मग पूतनावधाद्यनुकारा[२] ॥
करिती वाचा काय[३]; ॥ स्वांतीं[४] त्यां धाक या भवांचा[५] काय? ॥ १९ ॥
करुनी चरितानुकृती,[२] ॥ शोधिति जो भवतमक्षयीं[६] भानु कृती,[७] ॥
सुखधन, गावे लीला- ॥ गुण ज्याचे, पुसति तो नगां[८] वेलींला. ॥२०॥
वृंदावनिं ताप दया- ॥ [९]निधिविरहें[१०] धरिति गोपवनिता; पद या ॥
प्रभुचें भुवनादिसतीं[११] ॥ प्रिय, तन्मुद्रा रजांत[१२] नयनां दिसतीं. ॥ २१ ॥
ते, साधुमनोमठसे[१३] ॥ दिसती लोचनचकोर पदसोम,[१४] ठसे; ॥
जे बहुमंडित[१५] लक्ष्मी- ॥ नयनाब्जरवि[१६] ध्वजाद्यखंडितलक्ष्मीं[१७]. ॥ २२ ॥
त्या धुंडिति पदवीतें,[१८] ॥ तों देखति जें सुसंपदा पद वीतें. ॥
(जी परमकृपा दानीं ॥ स्वसुखाच्या) दृष्टि वेधिल्या पादांनीं. ॥ २३ ॥
पदजळज[१९] वळखि जायां[२०] ॥ जे ते; तों हेतु होय जवळि खिजाया,[२१] ॥
कीं दिसति तयासहितें ॥ युवतिपदें[२२]; न गमतीच मनिं त्यांस हितें. ॥ २४ ॥
"अगइ ! विलासवतीनें[२३] ॥ प्रेमगुणीं[२४] कृष्ण गोविला[२५] सवतीनें ! ॥
सर्वस्वा हरि; लाजे ॥ दे आम्हा, गेलि घेउनी हरिला जे." ॥ २५ ॥
पावति तापा; "उलतें ॥ उर; जाणों वज्र सवतिचें पाउल तें ! ॥
तीचें अतुलतप,[२६] नसे ॥ संशय, जीचे पदांक[२७] तेहि तपनसे[२८] !" ॥ २६ ॥
द्वेषें होय तडफडा; ॥ म्हणती, "चिंताब्धिची[२९] अलभ्य तड[३०]; फडा ॥
जसि निधिवरि[३१] सापिणिची, ॥ संगति हरिसीं तसीच या पापिणिची! ॥२७॥
न लवूनि पळ, विलास ॥ त्यागवुनी, हरि ! जिणें वनीं पळविलास,[३२] ॥
असि कोण कृत-व्रत[३३] ती ॥ शृंगारसुरद्रुमींहि[३४] चढली व्रतती[३५] ? ॥ २८ ॥

---

१ बंदीखाना. २ पूतना वध अनुकार, पूतनेचा वध इत्यादि कृष्णचरित्राच्या पुनर्दर्शनास. ३ शरीर. ४ अंतःकरणों. ५ संसाराचा. ६ संसाररूपी अंधाराचा सूर्य. ७ चतुर. ८ वृक्षांस. ९ दयासमुद्राच्या ( कृष्णाच्या ) विरहानें. १० गवळणी. ११ पृथ्वींतील इत्यादि साधूंस. १२ धुळींत. १३ साधूंच्या मनांचे मठ (विश्रांतीचीं स्थानें.) १४ नेत्ररूपी चकोरपक्ष्यांचे पदरूपी चंद्र. १५ सुशोभित. १६ लक्ष्मीचे डोळे हींच कमळें त्यांचा सूर्य. १७ ध्वजादिकरून अखंडित(सर्व) चिन्हांनीं. १८मार्गास. १९चरणकमळ. २०स्त्री. २१रोषाया. २२स्त्रीचीं पाउलें. २३विलास करणाऱ्या स्त्रीनें. २४प्रेमरूपी दोरांनीं. २५बांधिला. २६निरुपम. २७ पदचिन्हें. २८ सूर्यासारिखे. २९ चिंतासमुद्राचा, ३० किनारा. ३१ द्रव्यावर. ३२ पळविला गेलास; (हा कर्मणि प्रयोग). ३३ व्रत केलेली. ३४ शृंगार रसाचा कल्पवृक्षच असा जो तूं, हे कृष्णा ! त्यावर. ३५ वल्ली.

ये श्रांत[1] तडागाला, ॥ जीवन दे; हा न दे, खचित डागाला. ॥
कर्मविपाका[2] सारें ॥ हें तापविलें सुधाकृपाकासारें[3]. ॥ २९ ॥
जे प्रीतिस ये कांता[4], ॥ घेउनि गेला मुकुंद तिस एकांता; ॥
करुणा न सये[5] कांता[6], ॥ रानीं त्यजितां वधूततिस[7] ये कांता[8] ! ॥ ३० ॥
स्कंध[9] अनुभवि भुजांचें ॥ स्पर्शसुख, तिचा[10] प्रदानें[11] करि विभु[12] जांचें; ॥
कीं नियंता[13] पदराजी[14] ॥ एकिकडे; दे मनास तापदरा[15] जी.[16] ॥ ३१ ॥
ईश्वरपदसारस[17] ती ॥ जाली आराधिती निगमसार[18] सती; ॥
कीं नेली एकांता ॥ ते; अस्मत्स्मृति[19] मनांतहि न ये कांतों[20] ! ॥ ३२ ॥
गतिजितबालकरेणु[21] ॥ श्रीशपदांभोज[22]- भक्तपालक- रेणु[23] ॥
हे धन्य; विधिभवानी[24]- ॥ पतिलक्ष्मी वाहती शिरोंबुभवांनीं[25]. ॥ ३३ ॥
सिद्धी परमा दे, वी, ॥ जे जननी, हें त्रिविष्टप[26] रमादेवी, ॥
ते हा ताप सराया ॥ वरि रज हें, प्रिय शिवादि- तापसराया[27]. ॥ ३४ ॥
हे पीयूषघन[28]; तगे ॥ ताप न; होती विनष्टविपदघ[29] नत[30] गे ! ॥
स्व विधि[31] कसा गरल[32] वसे ? ॥ तीचे पद गमति अमृतसागरलवसे[33]. ॥ ३५ ॥
भाग्यास न माप तिच्या; ॥ अस्मत्सर्वस्व[34] त्या हरुनि, मापतिच्या[35] ॥
अधरांचा[36] परम पिते ॥ रस एकांतीं; स्मरे न सख्य किमपि[37] ते. ॥ ३६ ॥
अमृतांत विषलवास[38] ॥ स्थिति; कीं सन्मंडळीं[39] महाखळवास[40]; ॥
सुमदामांत[41] विखारे[42] ॥ किंवा वरमाणिकांत[43] वसति निखारे ! ॥ ३७ ॥
तैसें सादर[44] जांत ॥ स्वसुखसमृद्धी मुकुंदपादरजांत, ॥

---

१ एकादा थकलेला मनुष्य. २ कर्मांच्या परिणामा. ३ सुधाच अशी कृपा ज्यांत अशा सरोवरें. ४ गोपी. ५ सखे! ६ कृष्णास. ७ स्त्रीसमूहास. ८ सुंदर ( कृष्णास ). ९ खांद. १० ( स्कंध ). ११ देणें. १२ ( भुज्यांचें ). १३ नियमित. १४ पदमालिका. (" आहे" या क्रियापदाचा अध्याहार करावा ). १५ तापभय. १६ ( राजी ). १७ ईश्वराचें चरणकमल. १८ वेदसार. १९ आमची आठवण. २० पतीस. (कृष्णास). २१ गतिविषयीं जिंकिलें आहे लहान हत्तीस ज्याणें. २२ कृष्णपदकमल. २३ रजःकण. २४ ब्रह्मा, शिव, आणि लक्ष्मी २५ शिरोरूपी कमळांनीं. २६ गज. २७ सांबादि महान् तपस्वी लोकांस. २८ अमृताचे मेघ. २९ नष्ट जाहाली आहे विपत्ति व पातक ज्याचें. ३० शरणागत. ३१ दैव. ३२ विष ३३ अमृताचे लहानसे समुद्र. ३४ आमचें सर्व धन. ३५ रमापतीच्या(कृष्णाच्या). ३६ ओठाचा. ३७ किं-अपि, अगदींहि. ३८ विषांशास. ३९ साधूंच्या मंडळींत. ४० महान् दुष्टाचा सहवास ४१ फुलांच्या हारांत. ४२ सर्प. ४३ श्रेष्ठ रत्नांत. ४४ आदर पूर्वक.

त्यांत पहा ! आली हो ॥ तत्पदधूली[1] सुदुःसहा[2], आली[3] ! हो!" ॥ ३८ ॥
वर्णिति वदनिं[4] श्रेणी[5] ॥ कृष्णपदांची, विमुक्तिपदनिश्रेणी[6]. ॥
"चंदननिधिनीं[7] अहितें[8] ॥ त्यजिलें; कीं न जवळी पदें तीं अहितें[9]! ॥३९॥
भूमीतें नांतळवे[10], ॥ यवसाग्रीं[11] विद्ध[12] अपटु[13] गमनीं[14] तळवे; ॥
यास्तव त्या सुभगेला[15] ॥ स्वस्कंधीं[16] बैसवूनि वल्लभ[17] गेला!" ॥ ४० ॥
ऐसें तर्कविखें[18] बळी[19] ॥ हृदयांत शिरोन बहुत तापवि, खवळी. ॥
जळति मनीं कोपानें, ॥ कीं केलीं तच्छिरें[20] तिणें सोपानें[21]. ॥ ४१ ॥
"या तरूचीं अतिशयितें ॥ प्रेमें कुसुमेंहि[22] वेंचिलीं निज दयितें[23]; ॥
येथें प्रमदा[24] मानें ॥ भूषविली[25] स्वकररचितसुमदामानें[26]; ॥ ४२ ॥
कीं पादाग्रेंचि[27] पहा ॥ दिसती हरिचीं; प्रियानुकूल[28] सकंप[29] हा! ॥
आपणचि फुलां वेंची; ॥ आवडतीच्या गुणांप्रति[30] भुलावेंची!" ॥ ४३ ॥
जानुयुगीं[31] बसकेला ॥ चिन्हें जाणूनि, ह्मणति, "हा[32] वश केला; ॥
वेणि तिची घातलि ही! ॥ या भाळीं[33] विधि[34] असा कसा घात लिही? ॥ ४४॥
असि करुनि कृपा, सुमनें[35] ॥ लेवविलीं तदधरासवपिपासुमनें[36], ॥
नंदसुतें शोभविलें; ॥ सवतीनें हें कसें हृदय लोभविलें! ॥ ४५
हीं चिन्हें कथिति, जसीं ॥ सूचक[37] नेत्रें, मुकुंद रमला तिजसीं; ॥
पाजुनि अधरासव ती, ॥ भुलवुनि या, भोगिती[38] नगधरा[39] सवती!" ॥ ४६ ॥
[40]एवं गोपी विकळा[41] ॥ विमनस्का[42] धुंडिती हरीतें सकळा. ॥

---

१ त्या स्त्रियेच्या पायांचे रजःकण. २ सहनकरण्यास फार कठीण. ३ हे सख्यानो! ४ मुखांनीं. ५ मालिका. ६ मोक्षपदास चढून जाण्याची शिडी, निसण. ७ चंदनवृक्षांनीं व द्रव्यांनीं. ८ सर्पांनीं. ९ त्या गोपींचीं न आवडणारीं अशीं पाउलें. १० चालवेना. ११ तृणाच्या अग्रांनीं. १२ टोंचलेले. १३ अकुशल (=गैरमाहिती). १४ चालण्यांस. १५ स्त्रीला. १६ आपल्या खांद्यावर. १७ पति. १८ विचाररूपी-विषें. १९ बलवान्. २० तत्-शिरें. २१ पायऱ्या. २२ फुलेंहि. २३ निजपतीनें. २४ स्त्री. २५ शोभविली. २६ आपल्या हातानें गुंतलेल्या फुलांच्या हारानें. २७ पायांचीं अग्रें, शेवटें. २८ प्रियांस अनुकूल. २९ सदय. ३० गुणरूपी दोरीस. ३१ दोन्ही जांगांवर, मांडीवर. ३२ कृष्ण. ३३ या (आमच्या) कपाळीं. ३४ ब्रह्मा. ३५ फुलें. ३६ तत् - अधर-आसव-पिपासु मनें, तिचें अधरासव (=मद्य) पिण्याविषयीं तृषित अशा मनानें. ३७ चाहाडखोराच्या नयनाप्रमाणें. ३८ भोगित्ये. ३९ गोवर्धनधरा. ४० याप्रकारें करून. ४१ कळारहित. ४२ निराश.

मराठी ग्रंथ संग्रहालय

मनिं भरलें [1]प्रेमपिसें ॥ स्त्रीमंडळ तें वनांत हिंडे कपिसें[2]. ॥ ४७ ॥
दुर्लभ हरिपदयुगली[3] ॥ पाउनि, तेही मनांत गोपी फुगली. ॥
कीं "बहुतापरि, सकळा ॥ स्त्रींत वरी जाणतें तयांपरिस[4] कळा." ॥ ४८ ॥
घेउनि वल्लभ गेला ॥ जीस, असा गर्व होय त्या सुभगेला[5]; ॥
हे बुद्धि कुडी[6] आली[7] ॥ व्रजशापाचीच, गर्व न उडी घाली. ॥४९॥
पति लक्ष्मीचा लीला[8]- ॥ नर त्यास म्हणे, "अशक्त मी चालीला; ॥
न घडे हा श्रम; जाणें* ॥ तेथें न्यावें, न एकही क्रम[9] जाणें[10]." ॥ ५० ॥
हांसे कृष्ण; मग मनीं ॥ श्रीकांत म्हणे तिला, "बहु श्रम गमनीं; ॥
स्पर्शसुखा दासाचा ॥ योग्य करीं तरि बसोनि खांदा साचा." ॥ ५१ ॥
मानी स्त्रीजित[11] कामी[12], ॥ कीं, "वर्ते वर्तवीं हरी जितका मीं;" ॥
या मतिस न सोपा हे ॥ जाणे; स्कंधीं चढोनि बैसों पाहे. ॥ ५२ ॥
श्रुतिनुत[13] ऐसा, याला ॥ नेणे; स्कंधींहि जाय बैसायाला ॥
जों ते रामा[14], लवला; ॥ अंतर्हित[15] होय दीपसा मालवला[16]. ॥ ५३ ॥
"कंठीं हार विलासीं ॥ अहा! प्रमादें[17] करूनि हारविलासी[18]! ॥
चंद्र न हा [19]रवि लासी[20]; ॥ करिल [21]उरीं स्मरशर[22] प्रहार[23] विलासी[24]! ॥ ५४ ॥
करिंचा निधि[25] हारविला ॥ तेणें जो ताप, लाजविल हा रविला[26]!" ॥
करि बहु हारावा[27] हे ॥ स्व उरावरि अश्रुच्याचि हारा वाहे! ॥ ५५ ॥
करि फार विलापा हे; ॥ हरिविरहीं हिमकरांत[28] रविला पाहे. ॥
गेला जो धव[29] नीति-॥ भ्रंशें, ॥ न पवे[30] तदीय शोध वनीं ती. ॥ ५६ ॥
"चंद्र न भागे, लासी ॥ त्वदया; कां प्राणवल्लभा! गेलासी? ॥
धांवुनि दे [31]खेव; दये ॥ करिं; मृत्यु घडेल, जरि न देखें; वद ये. ॥ ५७॥

---

१प्रेम(ममता)रूपी वेड. एक शब्द संस्कृत व दुसरा प्राकृत अशांच्या समासाचें हें एक उदाहरण होय. अथवा 'प्रेम' आणि 'पिसें' अशीं दोन पदें वेगवेगळीं लिहून 'पिसें' हें 'मंडळ' याचें विशेषण करावें. २ वानरांसारिखें. 3 जोडी. ४ त्यापेक्षां. "बहुतांपरि" = अनेकप्रकारें. ५ स्त्रीस, दुष्ट ६ वाईट. ७ सखी. ८ लीलेनें मनुष्य झालेला. ९ पाउल. १० जाणतें. ११ स्त्रीनें जिंकिलेला. १२कामाधीन. 13 वेदांनीं नमिलें आहे ज्यास. १४ स्त्री. १५ गुप्त. १६ विझाला. १७ गर्वानें. १८ माझ्याकडून गमावला गेलास. १९ सूर्य. २० भाजी. २१ हृदयीं. २२ कामरूपी बाण. २3 घाव. २४ विलास करणारा. २५ द्रव्य. २६ सूर्याला. २७ हा! आरावा, खेदशब्दास २८ चंद्राच्या ठायीं. २९ पति. 3० लाहे. 3१ आलिंगन. *जाणें असेल तिकडे मला न्यावें, पण माझ्यानें तर स्वतः चालवत नाहीं.

आचरलें आगा[1] मी ॥ दुर्मति; नेणेंचि ताप हा आगामी[2]! ॥
या मानसखेदासी ॥ वारीं; टांकीं वनांत न सखे! दासी". ॥ ५८ ॥
करि नैकं[3] विलाप वनीं, ॥ तो ध्वनि गोपींस आयकविला पवनीं[4]. ॥
भेटति तीस झडकरी, ॥ जीवरि हरिविरहवान्हिमेघ[5] झड करी. ॥ ५९ ॥
आळ विटविलासाचा[6] ॥ ज्यावरि, आत्मा हरी विटविला साचा, ॥
वृत्त कथी फार, जिणें ॥ गणिलें कमळासुपतिविणें[7] भार[8] जिणें[9]. ॥ ६० ॥
सुखधाम[10] गवळणीस ॥ त्यागी; आल्या समस्त मग वळणीस[11]. ॥
होय उदासीन मनें[12] ॥ जेणें, तें स्मरुनि, करिति दासी नमन. ॥ ६१॥
धुंडिति[13] पुनरपि, नाकी[14] ॥ वांछिति यच्चरणरेणुला[15] सापिनाकी[16]. ॥
त्यांला[17] विधु[18] रुचि[19] दिवटी ॥ दाविल कसि? वृक्षमूलतम[20] जिस निवटी[21]. ॥ ६२ ॥
म्हणती, "दाट नग[22] वसे; ॥ छायातीरांत कृष्णवाट न गवसे[23]! ॥
न शमे तापहि;" त्याया ॥ पदरज, जाती स्थळासि त्या पहिल्या, या[24] ॥ ६३ ॥
चेष्टा- वचन- मनें.हीं[25] ॥ त्या तन्मय[26] सर्व; अन्य उद्यम[27] नाहीं. ॥
नंद[28]कुलभवनदीपा ॥ गाती, पुलिनीं[29] बसोनि, शर्मनदीपा[30]. ॥ ६४ ॥

इति रासक्रीडायां द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥३०॥

"व्रज[31] उत्कृष्ट[32] तव जनि-[33] ॥ स्तव हरि! कीं, श्री[34] वसे सदा मुदित[35] जनीं; ॥

---

१ अपराधास. २ येणारा. ३ अनेक. ४ वायूंनीं. ५ कृष्णाचा विरह हाच कोणी एक अग्नीचा पर्जन्य. ६ ज्यारकर्मीं विलासाचा. ७ लक्ष्मीच्या प्राणपतीशिवाय. ८ ओझें. ९ जगणें. १० सुखाचें घर, (कृष्ण). ११ नम्रतेस. १२ या शब्दांतील "न" हें अक्षर पादांतस्थ असल्यामुळें दीर्घ जाणावें. व आर्या छंदांतील पहिल्या चरणास पाद असें मानून तदंतस्थ अक्षर ऱ्हस्व असल्यास, त्याच्या मात्रा दोन मानाव्या, हा नियम मोरोपंतांनीं आपल्या ग्रंथांत स्वीकारिल्याचें हें एक उदाहरण आहे. १३ "त्यास" याचा अध्याहार करून, या क्रियापदाचें कर्म करावें. १४ देव. १५ ज्याच्या पायांच्या रजःकणास. १६ सोवासहित. १७ गोपींस १८ चंद्र. १९ निजकांतिरूपी मशाल. २० झाडांच्या मूळांजवळचा अंधार. २१ काढून टाकी, नाशी. २२ वृक्ष; (एकाच वृक्षाविषयीं बोलतांत असें नव्हे, परंतु एकवचनी नामाविषयीं बोलून तज्जातीय अनेक व्यक्तींचा बोध या ठिकाणीं केला आहे. या वचनास जात्येकवचन असें म्हणतात.) २३ सांपडे. २४ गोपी. २५ हलनचलन, बोलणें, आणि मन यांहीं. २६ कृष्णमय. २७ उद्योग २८ गोकुलरूपी घरांतील दिवाच, असा जो (कृष्ण) त्यास. २९ तटीं ३० कल्याण समुद्रास (कृष्णास). ३१ गोकुळ. ३२ सुखी. ३३ जन्मासाठीं) तूं जन्मास आलास म्हणून). ३४ लक्ष्मी. ३५ आनंदित.

प्राण त्वदर्थ[1] दासी ॥ धरुनि, हुडकितो दिशांत; दावि पदासी! ॥ १ ॥
शरदंबु[2]जगर्भरुची ॥ चोरी[3] तुझिदृष्टि जे सुखवरद[4]गुरुची, ॥
तीणें फुकटा दासी ॥ मारिसि; हा वध न काय या प्रमदांसी[5]? ॥ २ ॥
विषजळ[6], दाव[7], वृष[8], घनें[9]-॥ श्वसनाशनि अन्यभय, मयात्मजं[10], अघं[11],न ॥
बाधों दिधलें, सदया! संप्रति[12] दुःखांत गोपिका कां वद या. ॥ ३ ॥
गोपीकुक्षींतून[13] ॥ प्रकट जहालासि विश्वसाक्षी तूं न; ॥
जगदवना[14] उदय जनीं ॥ यदुवंशीं तुज सख्या ! विनवि कमळजनी[15]. ॥ ४ ॥
यदुपति ! भवभीत[16] मनीं ॥ जे, तव पदं वरिति साधु तद्भयशमनीं; ॥
जें पटु धरि करिं कमळा[17], ॥ वरदा ठेवीं शिरीं तया करकमळा[18]. ॥ ५ ॥
वीरा ! व्रजार्ति-शमना[19] ! ॥ करिसी गतगर्व[20] तूं स्मितें स्वजनमना; ॥
दासी न विरहदावीं[21] ॥ टाकिं, सख्या ! भेटि दे; मुखांबुजें[22] दावीं ! ॥ ६ ॥
हरि नम्राच्या शमला[23], ॥ पशुं[24]पाठें फिरे, जयांत नांदे कमळा[25], ॥
जें नुरवि फणिमदमळा[26], ॥ काम मथीं, ठेवुनी कुचीं पदकमळा[27]. ॥ ७ ॥
सत्प्रियवाक्या वाणी[28] ॥ जींत न, असि सुनयना ! तुझि मधुर[29] वाणी[30], ॥
तीणें दासी मोहा[31]-॥ कुळ विरहीं; अधर-अमृत[32] पाजिं; शमो हा[33]. ॥ ८ ॥
'तप्तांतें वांचवितें ॥ तव सुकथामृत[34],' कवींद्र वर्णिति चवितें. ॥
'अघें[35], मदें[36], हरि; सुख करितें ॥ श्रवणें,' ते बहुद[37] कथिति जे बहु हरि! तें ॥९॥
प्रेमनिरीक्षण[38], हसित[39], ॥ ध्यानीं सुख जें, प्रिया ! विहार विलसित[40], ॥

---

१ तुझ्यासाठीं. २शरदृतूंतील कमलगर्भाची शोभा. ३हरण करी;(त्या-प्रमाणें सुंदर इ०). ४सुख आणि वर देणारे जे कोणी असतील त्यांत श्रेष्ठ असा जो तूं तुझी. ५ स्त्रियांस. ६ विषयुक्त पाणी; (यमुनेच्या डोहांतील). ७ वणवा. ८ बैलाचें रूप घेऊन आलेला राक्षस. ९ मेघ, वारा आणि वज्र. १० मयासुराचा मुलगा. ११ अघासुर. १२ तूं न. १३ यशोदेच्या उदरांतून १४ जगत्-अवना =लोककल्याणार्थ. १५ कमलोद्भव. १६ संसारास भ्यालेले. १७ लक्ष्मी. १८ हस्तरूपी कमळास. १९ गोकुळांतील दुःखशमन करणाऱ्या ! २० नम्र. २१ वियोग-रूपी वणव्यांत. २२ मुखकमळ. २३ पातकास. २४ गाईमागुन. २५ लक्ष्मी. २६ कालियाच गर्वरूपी मळ. २७ चरणकमलास. २८ उणवि. २९ गोड. ३० वचन. ३१ मोहानें व्यथित झालेल्या. ३२ चुंबनामृत; ( हा शब्द सामासीक आहे ह्मणून संधिनियमानें अधरामृत असा लिहावयाचा; पण समास असताहि संधि न करितां अशीं असंगित पदें मोरोपंतांनीं घेतल्याचें हें एक उदाहरण होय ). ३३ मोह. ३४ तुझें गोड चरित्र हेंच कोणी एक अमृत. ३५ पातक. ३६ गर्व. ३७ दयाळ. ३८ प्रेमानें ( प्रीतिनें ) पहाणें. ३९ हास्य. ४०सुंदर.

एकांत विनोद, मना ॥ जडले, खवळिति; करीं कपटिया ! शमना. ॥ १० ॥
पशु चारित फिरसि वनीं, ॥ कांता[1] हे कळवळे सदा तव[2] भवनीं[3]. ॥
तृणकणिसअंकुरांनीं, ॥ कीं, दुखतिल कमळ मृदुल तवपद रानीं ॥ ११ ॥
धूळीधूसर[4]अलकीं ॥ वेष्टित समधुपपराग[5] फुल्ल कमळ कीं ! ॥
सांजे घडि घडि वदना ॥ दावुनि, वीरा ! मनांत अर्पिसि मदना ! ॥ १२ ॥
पुरवि मनोरथ नमनें, ॥ श्रीसहि[6] जो पूज्य भूविभूषण[7]हि, मनें ॥
ध्यावा संकटतरणा, ॥ ठेवीं स्तनिं त्या प्रिया स्व[8]निजचरणा. ॥ १३ ॥
वाढवि सुरता, नुरवी ॥ शोका, दे स्वरितें[9] वेणुला रुचि बरवी, ॥
अन्य सुखेच्छा न जना ॥ स्मरवी, स्वाधररसासि[10] दे त्यां[11] अजना[12] ! ॥ १४ ॥
फिरसि वनिं दिसां[13], युगसी[14] ॥ त्रुटि[15] होय तुला न देखतां; जैं दिससी, ॥
कुटिलकचवदनपानीं[16],॥ पातीं करिं ह्मणुनि[17] मन विधिस[18] जड[19] मानी. ॥ १५ ॥
त्यजुनि स्वजनसुतपती, ॥ आलों निशि[20] निकट तव सुगीतहृतमती[21]; ॥
इंगित[22] जाणसिहि; अति ॥ प्रभु षंठ[23] तूं; त्यजिल अन्य पूरुष युवती[24]? ॥ १६ ॥
श्रीगृहें[25], विशाळ उर, स- ॥ प्रेम[26] स्मित[27], दृष्टि, मुख विलोकुनि सुरस, ॥
तव विजन[28] नर्म[29] खवळी ॥ स्मर[30]; सुरतेच्छा उठे; मना भ्रम कवळी! ॥ १७ ॥
व्रजजन-दुःखासि[31] हरी ॥ तुझी अभिव्यक्ति[32] सर्व कुशलनिधिलहरी[33]. ॥
तव वांछागद[34] मनिं या; ॥ लव[35] तरि दे स्वार्तिहर[36] अगद[37] करुनीयां. ॥ १८ ॥
जें तव पदकमळ तया, ॥ कठिण कुचीं हळुच ठेवुं सखया सभया[38]. ॥
तेणें फिरसि वनिं, कडे, ॥ खुपति, ह्मणुनि जीवना ! सुबुद्धि गडबडे. ” ॥ १९ ॥

---

१ स्त्रिया, (जात्येकवचन). २ (कांता). ३ घरीं. ४ धूळीनें व काळ्या केसांनीं. ५ भ्रमरांनीं व पुष्परजांनीं युक्त. ६ लक्ष्मीस. ७ पृथ्वीचें भूषण. ८ या पदांत "स्व" याचा कांहीं उपयोग नाहीं; अशाप्रकारें हा एकाक्षरी शब्दयाचग्रंथांत बहुतेक ठिकाणीं आढळेल ९ स्वरांनेंयुक्त अशा. १० आपल्या अधरामृतास. ११ (स्वाधररसास). १२ हे जननरहिता! १३ दिवसाला १४ युगासारिखा. १५ निमिष. १६ वक्र केश व वदन तद्रूप रसपान आह्मी करितों तेव्हां. १७ डोळ्यांचीं पातीं हालतात तितक्यानेंच कांहींवेळ दृष्टि चालत होते ह्मणून इ० १८ ब्रह्मदेवास. १९ मूर्ख. २० रात्रीं २१ उत्तम गायनानें हरिल्या आहेत मति ज्यांच्या. २२ तात्पर्य २३ लबाड. २४ तरुण स्त्रिया. २५ लक्ष्मीचें स्थान. २६ प्रीतिपुरःसर. २७ हास्य. २८ एकांतींचें. २९ विनोदें. ३० काम. ३१ गोकुळांतील लोकांच्या दुःखास. ३२ मूर्ति. ३३ कौशल्यसागराची लाट. ३४ इच्छारूपी रोग. ३५ किंचित. ३६ स्व-आर्ति-हर. आमच्या व्याधीस हरणारें. ३७ औषध. ३८ (आह्मी).

ऐवं[1] बहु आळविती ॥ गोपी गुण गाउनी गळे वाळविती ॥
तामरसाक्षी[2] वसती, ॥ रडति, पडति, विकळमानसा[3] क्षीबसती[4] ! ॥ २० ॥

इति रासक्रीडायां तृतीयोऽध्यायः ॥३ ॥३१॥

त्या युवतिसभे[5] टकळा[6] ॥ पतिचा; न सुचे मनांत तिस भेटकळा. ॥
जाल्या हिंपुटि[7] ; कार्या[8] ॥ सावरिति न; हरिदयाचि तदसु[9] टिकाया! ॥ १ ॥
वृंदावनिं रमणीया ॥ विरहदवें[10] करपल्या उदाररमणी[11] या. ॥
करुणामृतघन[12] निववी, ॥ दर्शनमात्रेंचि त्या समस्तांहि जिववी. ॥ २ ॥
विरहोष्णांत[13] करपल्या ॥ युवतिकुमुदिनी[14] विकासकांति[15] हरपल्या. ॥
तत्परिपाळक[16] रजनी- ॥ पतिसा[17] उगवे मुकुंद अमृतकर[18] जनीं. ॥ ३ ॥
पाहे वदनाला जे दृष्टि, ॥ ह्मणायासि रुचिर[19] मदना लाजे, ॥
ऐसा सुखदेह, सितें,[20] ॥ ताप निवारुनियां, कुशल[21] दे हसितें[22]. ॥ ४ ॥
प्राणांविण अचळ, बळ- ॥ क्षीणेंद्रियगण[23], तसा करि न चळवळ[24] ; ॥
ती विरहीं जवळ वळे ॥ शक्तिप्रदें[25] तोंचि युवतिवर्ग[26] वळवळे ॥ ५ ॥
त्यांत प्रकटे सहसा ; ॥ धांवति, पाहुनि वरास्यजलजा[27] सहसा[28]. ॥
अमृतकर[29] सतारक[30] हो ॥ तो स्वचकोरसुविवेकरसतारक[31] हो. ॥ ६ ॥
कोणी धरि कर-कमळा, ॥ स्वीकारी जो अनंत सुखकर कमळा[32]; ॥
घे प्रमदावाहांतें[33] ॥ स्वांसीं[34], जा साधुमन सदा बाहातें[35]. ॥ ७ ॥
एकि ह्मणे, “तांबूलें[36] ॥ प्राशुनि, व्हावें उरीं गुणें तांबूलें[37].” ॥
एकि धरी पदकमला, ॥ “कुचीं”; ह्मणे, “हेंचि आवडे पदक मला.” ॥ ८ ॥

---

१ या प्रकारें करून. २ तामरस-अक्षिन्, कमलनेत्री. ३ व्याकुळ आहेत मनें ज्यांचीं.
४ षठ (= कृष्ण)स्त्रिया. ५ युवतिसमूहास. ६ ध्यास. ७ श्रमयुक्त. ८ देहें. ९ तत् असु,=
त्यांचे प्राण. १० विरहरूपी वणव्यानें. ११ उदार रत्नें. १२ करुणारूपी अमृताचा मेघ
(कृष्ण). १३ विरह उष्णांत. १४ स्त्रीरूपी कमळणी. १५ प्रफुल्लित तेज. १६ त्यांचें
परिपाळण करणारा. १७ चंद्रासारिखा. १८ मोक्षप्रद. १९ सुंदर. २० शुभ्र ( हास्य ).
२१ कल्याण. २२ हास्यानें २३ बळानें क्षीण अशीं इंद्रियें. २४ हलनचलन. २५ शक्ति देणारा(कृष्ण)
२६ स्त्रीसमूह २७ पतीच्या मुखकमळास. २८ हास्यानेंयुक्त अशा. २९ चंद्र. ३० नक्षत्रांनीं
युक्त. ३१ आपल्या चकोरांस विवेकरूपी रसानें (अमृतानें) तारणारा. ३२ लक्ष्मी. ३३ स्त्रि-
यांच्या बाहूंनें. ३४ स्व-अंसीं, आपल्या स्कंधावर. ३५ बोलावितें. ३६ विडा. ३७ तांबडें.

एकि करी कोप, तिला ॥ प्रीत्या[१]लि ह्मणे जरी, "छळुं नको पतिला." ॥
चावुनि ओष्ठ, कटाक्षीं ॥ ताडी; शिरलीच काय बद्धकटाक्षीं[२]! ॥ ९ ॥
एकि परम सा[३]र सती ॥ अनिमिषें[४] नयनें मुकुंदमुख[५]सारस ती ॥
पी बहु, जेवि अधासी ; ॥ तृप्ति नसे जसि पदाब्जलुब्ध[६] बुधासी! ॥ १० ॥
एकी नयनांवाटे[७] ॥ ने श्रीकांता[८] हृदब्जशयना[९] वाटे! ॥
पावाले शर्म[१०] विपुल, कीं ॥ नेत्रें झांकी, तनूहि सारी पुलकीं[११]. ॥ ११ ॥
पावुनि, मुमुक्षु[१२] निवती ॥ ब्रह्मज्ञानेंचि, तेवि हरिला, युवती. ॥
गोपींस बहू शोभे, ॥ परमा[१३]शक्तीस हर जसा ; मन लोभे. ॥ १२ ॥
यमुनापुलिनिं[१४] मुकुंद[१५]- ॥ प्रभृतिकुसुमसुरभिवायु जेथ, मुकुंद[१६] ॥
स्त्री ने चांदणियांत ॥ क्षीरधिनें[१७] दिधलिया स्व आंदणियांत. ॥ १३ ॥
बसविति हरि सव्यानीं ॥ कृतासनीं हृदयपंकजीं भव्यांनीं; ॥
जो ध्यावा साधूंनीं, ॥ बहु बहुजन्मीं महासुकृत[१८] साधूनीं! ॥ १४ ॥
निज अंकीं[१९]वर पाया ॥ घेती, तत्स्पर्श[२०]सुखसुधा वरपाया[२१]. ॥
करजलजांसि[२२] उरोजीं[२३] ॥ ठेविति, देती न ताप लेश उरों जीं. ॥ १५ ॥
त्या प्रणयक्रोधवती[२४] ॥ संमर्दन करिति हळुच चरणीं युवती[२५]; ॥
धृतरोमांचवपु[२६] सती ॥ जनवृत्ता[२७]परिच वृत्त अभिनव[२८] पुसती. ॥ १६ ॥
"एक भजति, जे भजनीं ॥ रत त्यांतें; एक अभजकां[२९]प्रतिहि जनीं; ॥
एक न भजती उभयां[३०]; ॥ सख्या जना वद हरी! निवडुनी शुभ[३१] या." ॥१७॥
जाचें अकृतज्ञपण[३२] ॥ स्थापिति तें त्यांकडे[३३] तदुक्तेंचि, पण[३४] ॥
साक्षी तत्त्व[३५]सखा, तें ॥ जाणे, जें दुःख युवति- बुद्धिस खातें. ॥ १८ ॥

---

१ प्रीतिरूपी सखि. २ वैरत्वीं. ३ श्रेष्ठ. ४ पातें न हालवितां. ५ कृष्णाचें मुखकमल. ६ (कृष्णाच्या) पदकमलीं लुब्ध जहालेल्या ज्ञान्यास. ७ डोळ्यानें खुणाऊन. ८ कृष्णास ९ हृदयकमळीं निद्रा करण्या साठीं. १० कल्याण, सुख. ११ रोमांचांनीं. १२ मोक्षेच्छु १३ पार्वतीस. १४ यमुनेच्या तीरावर. १५ मुकुंदइत्यादि पुष्पांच्या सुगंधानें युक्त असावायु. १६ कृष्ण. १७ क्षीरसागरानें. १८ पुण्य. १९ मांडीवर. २० त्याच्या (पायांच्या) स्पर्शापासून जहालेलें जें तेज तेंच कोणी एक अमृत. २१ अधासीपणानें पिण्यास. २२ हस्तकमलांस. २३ स्तनीं. २४ नम्रता व तसाच क्रोधहि यांहीं युक्त. २५ स्त्रिया. २६ धरिले आहेत रोमांच वपूनीं (शरीरांनीं) ज्यांच्या २७ सर्व लोकांस सामान्य असें वर्तमान २८ नवीन. २९ आपली भक्ति न करणारास. ३० आपली भक्ति करणारा व न करणारा. ३१ या तिहींतून चांगलें. ३२ अपकारीपण. ३३ कृष्णाकडे. ३४ परंतु. ३५ (या पदांत "स्व" याचा कांहीं उपयोग नाहीं झालें असता चालेल.)

कृष्ण ह्मणे, "परिसा, जे ॥ भजति परस्पर, न रीति ते वरि साजे[१]; ॥
कीं स्वार्थचि तें भजन, ॥ स्नेह, सुकृतही न ते विधृतदंभ[२] जन. ॥ १९ ॥
ज्यास न भजनापेक्षा[३], ॥ वनभवनीं[४] तुल्य चंद्रिकारूपेक्षा[५] ॥
ज्यांची, सदय पितर ते; ॥ तध्दृदयीं स्नेहधर्मही सतत रते. ॥ २० ॥
उभयासाहि न भजति जे ॥ पुसिले ते सांगणें तुह्मांसि मज ति[६] जे ॥
'आत्मारामज्ञानी[७] ॥ एक तयामाजि', वर्णिलें तज्ज्ञानीं[८]; ॥ २१ ॥
कीं आप्तकाम[९] दुसरे; ॥ किंवा अकृतज्ञ; मूढ ऐसे तिसरे; ॥
स्वगुरुद्रोही चरम[१०], ॥ स्वांतीं[११] जे सर्वदाहि निष्ठुर परम. ॥ २२ ॥
सदय- परम- [१२]कोटींत, ॥ श्रुतिचा जो ख्यात[१३], तो चरमकोटींत." ॥
गणुनि हळुच हसती, तें ॥ जाणुनि, बोले दयैकगेह[१४] सतीतें; ॥ २३ ॥
"ऐका सखयानों हें ॥ यांत, परी, एकही स्वयें मी नोहें. ॥
न भजें भजकाला गे ॥ तरिहि मजकडे न दोषगंध[१५] हि लागे. ॥ २४ ॥
जाणति गुज स्थविर[१६] हें ॥ सतत ध्यान- प्रवृत्ति होते विरहें; ॥
निर्धन पावे [१७]निधितें; ॥ मग चित्तौत्सुक्य[१८] हरपतां निरवधि[१९] तें. ॥ २५ ॥
लोकश्रुति[२०] स्वजनेता[२१] ॥ टाकुनि जालां तुह्मी समस्तमज नेता[२२]; ॥
हो प्रीति अ[१९]सीमा, जी ॥ हे मद्विरहें, सुबुद्धिच असी माजी. ॥ २६ ॥
स्नेह करा गे! जावें; ॥ मनिचा मी कठिन, हें न रागे जावें ॥
आळ वृथा आली हो ॥ निष्ठुरतेची; न हे खरी आली[२३]! हो. ॥ २७ ॥
दे प्रेमालाप[२४] [२५]रती; ॥ टांकीं मी यापुढें सुधेला[२६] परती! ॥
गुप्त जवळि कां नसणें ॥ जरि तर्पावे तृषार्त हे कान सणें. ॥ २८ ॥
तोडुनियां गृहवेड्यां[२७], ॥ आलां, झालां, न देखतां मज, वेड्या. ॥
न फिटे हें स्नेह- रिण; ॥ प्रिया तुम्ही मधुरगीतवश[२८] मी हरिण. ॥ २९ ॥

---

१ शोभे. २ दंभरहित. ३ दुसऱ्यानें आपलें भजन करावें अशी इच्छा. ४ अरण्यांत किंवा घरांत. ५ चांदणें जसें वनभवनीं तुल्य तसेंच पहाणें ( ज्यांचें ) ६ तिसरे. ७ आत्मज्ञानी. ८ तत्-ज्ञ=तें ( तत्व ) जाणणाऱ्यांनीं. ९ स्वार्थी. १० शेवटचे. ११ अंतःकरणीं. १२ भागांत. १३ गायिलेला, श्रुतीनें(वेदानें). १४ दया-एक-गेह, दयेचें मुख्य-स्थान ( कृष्ण ). १५ दोषाचा वास, कण-सुद्धां. १६ ज्ञानवृद्ध. १७ द्रव्यातें. १८ चित्त-औत्सुक्य=चित्ताची उत्सुकता. १९ अमर्याद. २० लोकांचे कर्ण. २१ आप्तजनसमूह. २२ नम्र २३ हे सखयानो! २४ प्रेमयुक्त आलाप. २५ प्रीति. २६ अमृताला. २७ एक शब्द संस्कृत आणि एक प्राकृत अशांचा समास मोरोपंत केव्हां केव्हां करितात त्याचें हें उदाहरण होय. २८ गोड गायनास वश.

एकि करी कोप, तिला ॥ प्रीत्यालि[1] ह्मणे जरी, "छळूं नको पतिला." ॥
चावुनि ओष्ठ, कटाक्षीं ॥ ताडी; शिरलीच काय वद्ध[2]कटाक्षीं! ॥ ९ ॥
एकि परम सार[3] सती ॥ अनिमिषें[4] नयनें मुकुंदमुख[5]सारस ती ॥
पी बहु, जेवि अधासी ; ॥ तृप्ति नसे जसि पदाब्जलुब्ध[6] बुधासी! ॥ १० ॥
एकी नयनांवाटे[7] ॥ ने श्रीकांता[8] त्हदब्जशयना[9] वाटे ! ॥
पावलि शर्म[10] विपुल, कीं ॥ नेत्रें झांकी, तनूहि सारी पुलकीं[11]. ॥ ११ ॥
पावुनि, मुमुक्षु[12] निवती ॥ ब्रह्मज्ञानेंचि, तेवि हरिला, युवती. ॥
गोपींस बहू शोभे, ॥ परमाशक्तीस[13] हर जसा ; मन लोभे. ॥ १२ ॥
यमुनापुलिनीं[14] मुकुंद[15]- ॥ प्रभृतिकुसुमसुरभिवायु जेथ, मुकुंदें[16] ॥
स्त्री ने चांदणियांत ॥ क्षीरधिनें[17] दिधलिया स्व आंदणियांत. ॥ १३ ॥
बसविति हरि सख्यानीं ॥ कृतासनीं त्हृदयपंकजीं भव्यांनीं; ॥
जो ध्यावा साधूंनीं, ॥ बहु बहुजन्मीं महासुकृत[18] साधूनीं! ॥ १४ ॥
निज अंकींवर[19] पाया ॥ घेती, तत्स्पर्शसुख[20]सुधा वरपाया[21]. ॥
करजलजांसि[22] उरोजीं[23] ॥ ठेविति, देती न ताप लेश उरों जीं. ॥ १५ ॥
त्या प्रणयक्रोधवती[24] ॥ संमर्दन करिति हळुच चरणीं युवती[25]; ॥
धृतरोमांचवपु[26] सती ॥ जनवृत्तापरिच[27] वृत्त अभिनव[28] पुसती. ॥ १६ ॥
"एक भजति, जे भजनीं ॥ रत त्यांतें; एक अभजकां[29]प्रतिहि जनीं; ॥
एक न भजती उभयां[30]; ॥ सख्या जना वद हरी! निवडुनी शुभ[31] या." ॥१७॥
जाचें अकृतज्ञपण[32] ॥ स्थापिति तें त्याकडे[33] तदुक्तेंचि, पण[34] ॥
साक्षी तत्स्वसखा[35], तें ॥ जाणे, जें दुःख युवति- वृद्धिस खातें. ॥ १८ ॥

---

१ प्रीतिरूपी सखि. २ वैरत्वीं. ३ श्रेष्ठ. ४ पातें न हालवितां. ५ कृष्णाचें मुखकमल. ६ (कृष्णाच्या) पदकमलीं लुब्ध जहालेल्या ज्ञान्यास. ७ डोळ्यानें खुणाऊन. ८ कृष्णास ९ त्हृदयकमळीं निद्रा करण्या साठीं. १० कल्याण, सुख. ११ रोमांचांनीं. १२ मोक्षेच्छु १३ पार्वतीस. १४ यमुनेच्या तीरावर. १५ मुकुंदइत्यादि पुष्पांच्या सुगंधानें युक्त असा वायु. १६ कृष्ण. १७ क्षीरसागरानें. १८ पुण्य. १९ मांडीवर. २० त्याच्या (पायांच्या) स्पर्शापासून जहालेलें जें तेज तेंच कोणी एक अमृत. २१ अधाशीपणानें पिण्यास. २२ हस्तकमलास. २३ स्तनीं. २४ नम्रता व तसाच क्रोधहि यांहीं युक्त. २५ स्त्रिया. २६ धरिले आहेत रोमांच वपूनीं (शरीरांनीं) ज्यांच्या २७ सर्व लोकांस सामान्य असें वर्तमान २८ नवीन. २९ आपली भक्ति न करणारास. ३० आपली भक्ति करणारा व न करणारा. ३१ यांतून चांगलें. ३२ अपकारीपण. ३३ कृष्णाकडे. ३४ परंतु. ३५ (या पद्यांत "स्व" याचा कांहीं उपयोग नाहीं झालें असतां चालेल.)

कृष्ण ह्मणे, "परिसा, जे ॥ भजति परस्पर, न रीति ते वरि साजे[1]; ॥
कीं स्वार्थचि तें भजन, ॥ स्नेह, सुकृतही न ते विधृतदंभ[2] जन. ॥ १९ ॥
ज्यास न भजनापेक्षा[3], ॥ वनभवनीं[4] तुल्य चंद्रिकारूपेक्षा[5] ॥
ज्यांची, सदय पितर ते; ॥ तत्धृदयीं स्नेहधर्महीं सतत रते. ॥ २० ॥
उभयासाहि न भजति जे ॥ पुसिले ते सांगणें तुह्मांसि मज ति[6] जे ॥
'आत्मारामज्ञानी[7] ॥ एक तयामाजि', वर्णिलें तज्ज्ञानीं[8]; ॥ २१ ॥
कीं आप्तकाम[9] दुसरे; ॥ किंवा अकृतज्ञ; मूढ ऐसे तिसरे; ॥
स्वगुरुद्रोही चरम[10], ॥ स्वांतीं[11] जे सर्वदाहि निष्ठुर परम. ॥ २२ ॥
सदय- परम- [12]कोटींत, ॥ श्रुतिचा जो ख्यात[13], तो चरमकोटींत." ॥
गणुनि हळुच हसती, तें ॥ जाणुनि, बोले दयैकगेह[14] सतींतें; ॥ २३ ॥
"ऐका सखयानो हें ॥ यांत, परी, एकही स्वयें मी नोहें. ॥
न भजें भजकाला गे ॥ तरिहि मजकडे न दोषगंध[15] हि लागे. ॥ २४ ॥
जाणति गुज स्थविर[16] हें ॥ सतत ध्यान- प्रवृत्ति होते विरहें; ॥
निर्धन पावे [17]निधितें; ॥ मग चित्तौत्सुक्य[18] हरपतां निरवधि[19] तें. ॥ २५ ॥
लोकश्रुति[20] स्वजनता[21] ॥ टाकुनि जालां तुह्मी समस्तमज नता[22]; ॥
हो प्रीति असीमा[19], जी ॥ हे मद्विरहें, सुबुद्धिच असी माजी. ॥ २६ ॥
स्नेह करा गे! जावें; ॥ मनिंचा मी कठिन, हें न रागेजावें ॥
आळ वृथा आली हो ॥ निष्ठुरतेची; न हे खरी आली[23]! हो. ॥ २७ ॥
दे प्रेमालाप[24] रती[25]; ॥ टांकीं मी यापुढें सुधेला[26] परती! ॥
गुप्त जवळि कां नसणें ॥ जरि तर्पावे तृषार्त हे कान सणें. ॥ २८ ॥
तोडुनियां गृहवेड्या[27], ॥ आलां, झालां, न देखतां मज, वेड्या. ॥
न फिटे हें स्नेह- रिण; ॥ प्रिया तुम्ही मधुरगीतवश[28] मी हरिण. ॥ २९ ॥

---

१ शोभे. २ दंभरहित. ३ दुसऱ्यानें आपलें भजन करावें अशी इच्छा. ४ अरण्यांत किंवा घरांत. ५ चांदणें जसें वनभवनीं तुल्य तसेंच पहाणें ( ज्यांचें ) ६ तिसरे. ७ आत्मज्ञानी. ८ तत्-ज्ञ=तें ( तत्व ) जाणणाऱ्यांनीं. ९ स्वार्थी. १० शेवटचे. ११ अंतःकरणीं. १२ भागांत. १३ गायिलेला, श्रुतीनें (वेदानें). १४ दया-एक-गेह, दयेचें मुख्यस्थान ( कृष्ण ). १५ दोषाचा वास, कण-सुध्दां. १६ ज्ञानवृद्ध. १७ द्रव्यातें. १८ चित्त-औत्सुक्य=चित्ताची उत्सुकता. १९ अमर्याद. २० लोकांचे कर्ण. २१ आप्तजनसमूह. २२ नम्र २३ हे सखयांनो! २४ प्रेमयुक्त आलाप. २५ प्रीति. २६ अमृताला. २७ एक शब्द संस्कृत आणि एक प्राकृत अशांचा समास मोरोपंत केव्हां केव्हां करितात त्याचें हें उदाहरण होय. २८ गोड गायनास वश.

मन्मानसा[1] नचकळे ॥ भवदुपकारामृताब्धिमाजि[2] वुचकळे.[3] ॥
न घडे ऋणपरिहार ॥ प्रीतिचि दे हें महा जयापरि हार! ॥ ३० ॥
उपकृतिसागरतरणीं[4] ॥ सखिहो! तुमची सुशीलता[5] वर[6] तरणी;[7] ॥
स्वप्रत्युपकृति[8] होडी; ॥ मज ठांवी शक्ति; गति इची बहु थोडी!" ॥ ३१ ॥
हे अजित पराभूती[9] ॥ दावी भक्तां परंतु न परां[10] भू[11]ती; ॥
शरणागति वहु मानी; ॥ बसवी निजकिंकरी[12] प्रसादविमानीं.[13] ॥ ३२ ॥

इतिश्रीरासक्रीडायां चतुर्थोऽध्यायः ॥ ४५ ॥ ३२ ॥

मग तेथें हरि रास- ॥ क्रीडा करि चेतवूनि अशरीरास.[14] ॥
वेष्टिति कनकदुकूला[15] ॥ मंडलरूपें प्रिया स्त्रिया अनुकूला. ॥ १ ॥
वहु[16] जाला घडिमाजी ॥ दोघी दोघांत; म्हणाति," आवडि माजी ॥
पतिला, कीं आपलिया- ॥ जवळी; गोपी अशाचि परि व्यापलिया. ॥ २ ॥
क्षितिचा तो हार; मणी ॥ मारकत[17] श्यामकांति[18] हरि हा; रमणी ॥
गौरी-[19] स्वर्ण- मणिगणीं, ॥ भुजगुणसुषुमा[20] मनोहरा कोण गणी? ॥ ३ ॥
वाहु समर्पी विभुजा ॥ स्त्रीचा स्कंधीं, स्वयेंहि मग तेविं भुजा, ॥
अतुल सुखां द्यायाच्या ॥ सुरतरुचा[21] व्रत तिसीचें[22] खांद्या याच्या! ॥४ ॥
भास्वरें[23] देवविमानें ॥ व्योमीं[24] दाटति, अनेक सूर्यसमानें; ॥
वाटे तीं न खयानें;[25] ॥ तें मिष केलें चि पद्मिनीसखयानें![26] ॥ ५ ॥
वाजति दुंदुभि; केली[27] ॥ पाहुनि, सुमवृष्टि[28] निर्जरीं[29] नभिं[30] केली; ॥
सस्त्रीक स्ववासी[31] ॥ जन आला; इष्टलाभ हा सर्वांसि. ॥६ ॥
गाती हरिचीं अमलें[32] ॥ सांगन[33] गंधर्वपति यशें दृततशमलें.[34] ॥

---

१ मत्-मानसा, माझ्या मनास. २ भवत्-उपकार-अमृताब्धि-माजि-=तुमच्या उपकाररूपी अमृत सागरांत. ३ ( याचा कर्ता " मानस". ) ४ उपकाररूपी समुद्र तरून जाण्याविषयीं ५ चांगला स्वभाव. ६ श्रेष्ठ. ७ नौका. ८ मी जो उलट उपकार करीन तो. ९ पराजय १० श्रेष्ठ. ११ अद्भुत शक्ति. १२ आपल्या दासी ( गोपी ). १३ प्रसादरूपी विमानांत. १४ कामास. १५ कनक ( पीत ) आहे दुकूल ( वस्त्र ) ज्याचें, अशा कृष्णास. १६ अनेकरूपी. १७ मरकत रत्नासारिखा. १८ कृष्णवर्ण. १९ गौर आणि सुवर्ण वर्णाच्या द्वय स्त्रिया हेच मणि, त्यांच्या समूहांत. २० बाहुरूपी दोरीची शोभा. २१ कल्पवृक्षाच्या. २२ वल्लीसमान. २३ तेजोमय. २४ आकाशीं. २५ आकाशवहानें ( विमानें ). २६ सूर्यानें. २७ क्रीडा. २८ पुष्पवृष्टि. २९ देवांनीं. ३० आकाशीं. ३१ स्वर्गवासी. ३२ निर्मळ. ३३ स्त्रियांसह. ३४पातक हरणारीं.

नादें नभ तें कोंदे; ॥ त्यांतहि निजगीत विभु[1] तयां ऐकोंदे! ॥ ७ ॥
सुरजन सविनय[2] नाचे ॥ हरिचा; सकळेष्टही पुरवि नयनांचें; ॥
म्हणति,“ नको पात्यांची ॥ क्रिया; रुसे आजिवरि सकोपा[3] त्यांची! ॥८ ॥
हरिसह त्या कमलास्या[4] ॥ करिती पुलिनीं सतत मनोरस लास्या[5] ॥
किंकिणि- नूपुर- वलय- ॥ व्रातांचा[6] लावि वृत्तिलागिं ख[7] लय[8]. ॥ ९ ॥
कृष्णतनुघनानीकीं[9] ॥ स्त्री चपळा[10] भाविल्या बुधमनांनीं[11]; कीं ॥
गर्जित गीत; तुषार ॥ स्वेद[12] हि चातक मयूर सज्जनवार[13]. ॥ १० ॥
जें त्यानृत्यें गीतें ॥ हर्ष, न वदवति विलासकृत्यें गीतें[14]. ॥
वेणुपरिस तानांहीं[15] ॥ स्त्रींच्या न भुले, असा परिसता[16] नाहीं. ॥ ११ ॥
दे भगवान् स्वर; सकळा[17] ॥ गाती बहुविध[18] अमिश्रितस्वर[19] सकळा; ॥
त्या विश्वगुरुवराली-[20] ॥ गानाची स्तुति करील कोण निराळी? ॥ १२ ॥
आइकतां गीतगती, ॥ देहादि स्मृति न अंतरंगीं[21] तगती ॥
विधिगुरुही[22] तो मानी; ॥ डोलावें कां न सुरशिरस्तोमांनीं[23]? ॥ १३ ॥
त्या परमोदारासीं[24] ॥ नटतां पावति सती प्रमोदा रासीं; ॥
जे श्रांता[25] स्कंधाला ॥ धरि, तत्स्पर्शें तिचा निजात्मा[26] धाला[27]. ॥ १४ ॥
उत्पलसौरभ[28] जा ये, ॥ तो स्वांसीं[29] हुंगितांचि बल्लवजाये[30], ॥
हरिभुज निववी रासीं[31], ॥ जे भागे गात नटत यदुवीरासीं[32]. ॥ १५ ॥
जो योगा यागाला ॥ दुर्लभ, त्या गाल मिळवुनीयां गाला ॥
घे यदुराजविडा जे, ॥ ते स्त्री श्रीच्या[33] मनास लाजवि डाजे[34]. ॥ १६ ॥
तंतननाथाथानीं[35] ॥ श्रांता[36] हरिकर सरोज[37] तप्ता थानीं ॥
ठेवुनि, युवति निवे; कीं ॥ हें छत्रचि सुखद सेविलें स[38] विवेकीं. ॥ १७ ॥

---

१ कृष्ण. २ नम्रतेनें. ३ क्रोधयुक्त (क्रिया). देवांस डोळ्यांचीं पातीं नाहींत. ४ कमलवदना. ५ नृत्या. ६ समुदायाचा. ७ नाद. ८ लक्ष. ९ कृष्ण-तनु-घन-अनीक, कृष्णाचीं जीं (त्या वेळेस धारण केलेलीं) अनेक देहें तोच मेघ, त्यांच्या समूहांत. १० विजा. ११ देवांच्या मनांनीं. १२ घर्म. १३ सज्जनांचा समूह. १४ वाणितें. १५ उंच स्वरांनीं. १६ ऐकणारा. १७ कळेनें. १८ बहुत प्रकारांनीं. १९ भिन्न भिन्न स्वरांनीं. २० कृष्णसख्यांचें गायन. २१ मनीं. २२ ब्रह्मदेवाचा बाप (कृष्ण) २३ देवांच्या मस्तकसमूहांनीं. २४ परम-उदारासीं, कृष्णासीं २५ दमलेली. २६ अंतरात्मा. २७ संतुष्ट झाला. २८ कमलाचा सुवास. २९ स्व-अंसीं आपल्या खांद्यावर. ३० गोपीला. ३१ रासक्रीडेंत. ३२ कृष्णासीं. ३३ लक्ष्मीच्या. ३४ डाग देई ३५ गायनांतील स्वरविशेष. ३६ थकलेली. ३७ कृष्णाचें हस्तकमल. ३८ विवेक्यांनीं.

लाजुनियां, श्री लपती ॥ जाली; कीं गोपिकावश श्रील[1] पती; ॥
करि फार रमा नवला ॥ कीं केवळ वनचरींस वर[2] मानवला. ॥ १८ ॥
करि सुगुणश्रीशाला[3] ॥ गोपी जो, त्या दयाकरा श्रीशाला[4] ॥
गाती, या नाचविती. ॥ भुलवी अत्यंत गगनयानां[5] छवि[6] ती. ॥ १९ ॥
गोपी सकळा श्रीशा[7] ॥ तितकें होणें पडे रमाया श्रीशा[8]. ॥
मुदितमना[9] नारी ती ॥ रति रासीं[10] पावल्याचि नानारीती. ॥ २० ॥
युवतिसभे[11] हा रतिला ॥ दे, सांपडला रमासुधाहार[12] तिला ॥
जो कर वरि अनघा[13] मा[14] ॥ पुसि सुरतश्रांतगोपिकाननघामा[15]! ॥ २१ ॥
जलकेली[16] वनकेली ॥ करुनि स्त्रीमंडळी सुपावन[17] केली. ॥
विझवी कामज्वलन[18] ॥ प्रभु परि झालें न चरमधातुस्खलन[19]. ॥ २२ ॥
विश्वात्मा विश्वपती ॥ पावन चरितें करी, जया मुनि जपती. ॥
भक्तेच्छा[20] हरि पुरवी ॥ विषयिजनाज्ञानदोषतिमिररिपुरवि[21]. ॥ २३ ॥
बहुदीर्घा अमृतकर-[22] ॥ द्युति धवलशरन्निशा, तयांत सुखकर ॥
प्रभु गोपींतें रमवी; ॥ कामज्वरदाह[23] अंगसंगें शमवी. ॥ २४ ॥
आणिक एकहि माया ॥ हरिची दावी असा व्रजीं[24] माहिमा या; ॥
मानिति सदनिं जसे जे ॥ नित्यव्यवहार युवतिसीं[25] निजसेजे[26]. ॥ २५ ॥
त्यांसि ह्मणे हरि, "जा, गे, ॥ जों नाहीं जाहले स्वजन घरिं जागे. ॥
दे सुखधाम[27] निरोपा, ॥ तोषवि, तरुचाचि होय तन्मनिं[28] रोपा. ॥ २६ ॥
जाति पहांटे जाया, ॥ गोपांच्या, धरुनि वसतिवाटे[29], जाया[30]. ॥
सोडीना मन पाय ॥ प्रभुचे; कीं सौख्यधाम ते अनपाय[31]. ॥ २७ ॥

इतिश्रीरामकृष्णविजये रासक्रीडायां पंचमोऽध्याय: ॥ ५ ॥ ईतिरासक्रीडा समाप्ता.

---

१ आपलें (लक्ष्मीचें) पाणिग्रहण करणारा. २ नवरा. ३ सद्गुण व शोभा यांचीं स्थानें. ४ रमापतीला. ५ देवांच्या विमानास. ६ शोभा. ७ लक्ष्मीसमान. ८ कृष्णास. ९ आनंदित आहेत मनें ज्यांचीं. १० रासक्रीडेंत. ११ स्त्रीसमूहास. १२ रमेचा अमृताचा घोट. १३ निर्मळ. १४ लक्ष्मी. १५ सुरतानें श्रमलेल्या गोपिकांच्या तोंडावरील घाम. १६ उदकांतील क्रीडा. १७ पवित्र. १८ कामरूपी अग्नि. १९ पतन. २० भक्त-इच्छा. २१ विषयी लोकांचें अज्ञान व दोष हाच अंधार त्याचा शत्रु सूर्य. २२ अमृतकर-द्युति-धवल-शरत्-निशा, चंद्रकांतीनें शुभ्र अशी जी शरदृतूंतील रात्र. २३ कामरूपी ज्वराचा दाह (उष्मा). २४ गोकुळांत. २५ स्त्रियेसीं. २६ आप आपल्या बिछान्यावर. २७ सुखाचें स्थान (कृष्ण). २८ गोपींच्या मनांत. २९ घराच्या मार्गास. ३० स्त्रिया. ३१ ज्यापासून अपाय होणें नाहीं.

गोपांसह सा[1]नंद ॥ व्रजपति तो अंबिकावनाला नंद ॥
गेला; सां[2]ब- शिवाला ॥ पूजी विध्युक्त[3], जो हरी अशिवाला[4]. ॥ १ ॥
पशुपतिला[5] अंबेला[6] ॥ वाहाति गोपाल भक्तिपूर्वक वेला; ॥
विप्रांला मोदानें[7] ॥ देती स्वर्णांबरान्नसह[8] गोदानें. ॥ २ ॥
सेवुनियां नीरासी[9] ॥ निजाति अधिष्टुंनि[10] सरस्वती- तीरासी; ॥
तों रात्रीं ये जवळी ॥ क्षुधिताजगर[11], व्रजाधिपाला[12] कवळी. ॥ ३ ॥
आक्रोशें हरितात[13] ॥ खसुता वाहे, यदंघ्रि[14] भय हरितात. ॥
"ये कृष्णा! सापायां[15] ॥ मज रक्षीं; ग्रासितो, वधीं सापा या." ॥ ४ ॥
गोप महा उग्रासी ॥ ताडिति बहु उल्मुकीं[16], तथापि ग्रासी. ॥
सद्विभवा[17] सापा या ॥ मग लावी शीघ्र पीतवासा[18] पाया. ॥ ५ ॥
जळलें अशुभ[19] व्यांला[20]- ॥ कृतिसह, पावोनि पदरजा भव्याला; ॥
दावी तेज स्वीयां[21] ॥ चरणाचें अहिस[22] देव तेजस्वी यां[22]. ॥ ६ ॥
हरि दग्ध करी राशी ॥ पापाच्या; तत्क्षणींच सुशरीरासी ॥
विद्याधरपति[23] पावे; ॥ त्या तेजें गोपवृंददृष्टि[24] दिपावे. ॥ ७ ॥
श्रीचतुराननतातें[25] ॥ पुसिलें वृत्त[26] स्वपादनलिनेंनतातें[27]. ॥
मुनिसर्वस्वा[28] चरणा ॥ नमुनि कथी तो सुदर्शन[29] स्वाचरणा[30]:— ॥ ८ ॥
"श्रीरूपें[31] दर्पित[32] मी ॥ विद्याधर; मज मदीय[33] मद अर्पि तमीं[34]; ॥
हिंडें लोक विमानीं ॥ बैसुनि न विरूप[35] आंगिरस[36] कवि[37] मानीं[38]. ॥ ९ ॥
खळ निस्त्रप[39] हा साधी ॥ अघं[40], योजुनि त्याचिया स्वउपहासा[41] धी[42]. ॥

---

१ आनंदी. २ पार्वती सहवर्तमान. ३ विधियुक्त. ४ अकल्याणास. ५ शिवास. ६ पार्वतीस. ७ आनंदानें. ८ सुवर्ण, वस्त्र, अन्न, इतक्यांसह. ९ पाण्याला. १० व्यापून. ११ क्षुधित-अजगर, भुकेलेला अजगर, (सर्प) १२ नंदाला. १३ नंद. १४ यत्-अंघ्रि, ज्याचे चरण १५ अपायांत सांपडलेल्यास. १६ कोलितांनीं. १७ भाग्यवानास. १८ पीत (पिवळें) आहे वास (वस्त्र) ज्याचें तो (कृष्ण). १९ पाप. २० सर्पशरीरासह (हें "अशुभाचें" विशेषण आहे). २१ आपल्या. २२सर्पास. २३"विद्याधर" ही देवांत एक जाति आहे; त्याचा हा राजा असे. २४ गोपसमूहाची दृष्टि. २५ ब्रह्मदेवाच्या पित्यानें=कृष्णानें. २६ वर्णन. २७ आपल्या चरण कमलीं नम्र असा जो (विद्याधरपति) त्यास. २८ मुनींचें सर्व धनच असा जो चरण त्यास. २९ हें त्या विद्याधरपतीचें नाव. ३० स्व-आचरणा. ३१ संपत्ति व सौंदर्य यांहीं ३२ गर्विष्ट. ३३ माझा. ३४ अज्ञानांत. ३५ कुरूप. ३६ हें एका ऋषीचें नाव. ३७ ज्ञानी. ३८ यात्रा कर्त्ता "मी". ३९ निर्लज्ज. ४० पातक. ४१ या शब्दांत "स्व" याचा कांहीं उपयोग नाहीं. ४२ बुद्धि.

हे श्रीकर! अजगर ते ॥ वसले क्रोधाख्य[1], पावलों अजगरते[2]. ॥ १० ॥
सुतपोधन[3] शापा या ॥ अंत कथिति तव दयैकघनशा[4] पाया; ॥
मद[5] मळ सहसा धूते ॥ ज्यांची शापोक्तिंही[6] सदय साधू ते! ॥ ११ ॥
भवशमना[7] देवास ॥ प्रार्थितसें, निजपदीं मना दे वास. ॥
नाशिति[8] अवलेपा[9] या, ॥ तुजिया ज्ञाते ह्मणोनि लवले पाया. ॥ १२ ॥
वारी[10] पन्नगतेतें[11] ॥ जें तव पादांबुज[12], प्रपन्नगते[13]! तें ॥
न बहु; भवभ्रम[14] राहे ॥ न, स्मरतां; शक्ति विदित सद्भ्रमरा[15] हे." ॥ १३
आज्ञा, पद वंदुनि, घे ॥ सुदर्शन; व्योमपथिं[16], जसा इंदु[17], निघे; ॥
अद्भुत गुण हरिचे ते ॥ जाणुनि, नंदादि होति विस्मितचेते[18]. ॥ १४ ॥
केली यात्रा सारी; ॥ हरि दे गोपांसि विस्मया त्रासारि[19]. ॥
आले घोषां[20]; गाती ॥ नंदाची [21]मुक्ति; ऐकती सुभगा ती. ॥१५॥
एका समयीं रातीं ॥ गाती गोपीगणांत असुहृदराति[22] ॥
जे बळकृष्ण भ्राते, ॥ वर्णें जिंकिति सितासितां[23] अभ्रा ते. ॥ १६ ॥
स्मरबांधवतारांनीं[24] ॥ धवल निशामुख; सुगंध भवता रानीं ॥
कोलाहल मधुपांनीं ॥ मत्तांनीं कुमुद- मल्लिकामधुपानीं[25]. ॥ १७ ॥
सन्मुनिमानसहंसीं[26] ॥ बळगोविंदीं समस्तदेववतंसीं[27], ॥
आरंभियलें [28]असीं ॥ गायन, ठेवूनि गाल डाव्या असीं.[29] ॥ १८ ॥
गाणें त्या दोघांचें ॥ [30]श्रीसच्चित्सुखरसाचिया ओघांचें ॥
देहस्मृति[31] योषांची[32] ॥ हरि, तद्यश[33] जेवि वासना दोषांची. १९ ॥

---

१ क्रोधनामें. २ सर्पता. ३ सु तपस्-धन, उत्तम तपच आहे धन ज्याचें. ४ दयेचा मुख्य मेघ अशा. ५ गर्व रूपी मळ. ६ शापवचनहि. ७ संसार नाश करणारा. ८ याचा कर्त्ता "पाय." ९ गर्वास. १० दूर करी. ११ सर्पपणास. १२ चरणकमल. १३ हे शरणागतास गति देणाऱ्या! १४संसारसंबंधी भ्रम. १५साधुरूपी भ्रमरास. १६ आकाशमार्गीं. १७चंद्र. १८ विस्मित आहेत चित्तें ज्यांचीं असे. १९ भयाचा शत्रु. (हें "हरि" याचें विशेषण आहे) २० गोकुळास. २१ मोकळीक. २२ असुहृद्-अराति=दुष्टांचे शत्रु. २३ शुभ्र व काळें अभ्र-(अनुक्रमें, बळराम व कृष्ण हे जिंकिति.)२४ कामजनक तारांनीं. २५ कमळ आणि मल्लिका या फुलांचेंमधु पिऊन मत्त जालेल्यांनीं. २६ साधु व मुनी यांच्या मनोरूपी मानस सरोवरांत हंसाप्रमाणें असणारे जे त्यांनीं. २७सर्व देवांचे तुरे असे जे त्यांणीं. २८रात्रीच्या आरंभीं.२९ खांद्यावर. ३० ज्ञानसुख हाच कोणी एक रस त्याच्या. ३१ शरीरस्मरण. ३२ तरुण स्त्रियांची. ३३ त्या दोघां ओघांचें यश (हें पद "हरी" या अध्याहृत क्रियापदाचा कर्ता आहे.)

करिती आलापा हे ॥ धनदानुग[1] शंखचूड[2] आला, पाहे ॥
स्त्रीरत्नें; हा कामी ॥ धृष्ट[3] "न नेऊं," म्हणे, "स्वगेहा," कां, "मी!" ॥२०॥
न गणी देवा; घाला ॥ घाली; या गृष्टि[4] भीति त्या वाघाला. ॥
जिकडे उत्तर हरिता,[5] ॥ तिकडे गोपीजनासि जाला हरिता. ॥ २१ ॥
साग्रज[6] हरि हा, कानीं ॥ लागुनियां, विनविला वधूहाकांनीं,[7] ॥
कीं, "रक्षी निज आली;[8] गातां, कसि दीनबंधुला निज आली?" ॥ २२ ॥
शत्रुतमोरवि[9] शाल-[10] ॥ द्रुम घेउनि धांवले किशोर[11] विशाल.[12] ॥
अभयप्रद हाकेला ॥ देती[13] स्त्रीभीतिपात्र[14] खळ हा केला. ॥ २३ ॥
त्रिभुवनपालक[15] रानीं ॥ आले, कवळूनि उग्र शाल करांनीं; ॥
जों आटोपा[16] पाहे ॥ तों काळचि वाटले मनीं पापा[17] हे. ॥ २४ ॥
दुर्मति तदमत्रास[18] ॥ व्यापी त्या गुह्यकास परम त्रासे.[19] ॥
सोडुनि गोपी रानीं, ॥ शीघ्र पळे गांठि घालितां वीरांनीं. ॥ २५ ॥
स्त्री रक्षी बळ शाली[20] ॥ गांठी चोरासि कृष्णजी बळशाली.[21] ॥
तोडि करेंचि शिरोमणि[22] ॥ दे रामा; तुष्टि धरिति फारशि रमणी.[23] ॥ २६ ॥
हरितां युवति सपत्नें[24] ॥ गुह्यकनीचें, वधूनि तो लघुयत्नें, ॥
बळें[25] तच्चूडारत्नें[26] ॥ भूषविला, लोक निज यशींहि, प्रत्नें.[27] ॥ २७ ॥

इति श्रीमत्कृष्णविजये चतुस्त्रिंशोऽध्यायः ॥ ३४ ॥

रात्रौ हरिसीं रमती, ॥ दिवसा, गोपी, वियोगदुःखें श्रमती; ॥
गाती लीला सुमती; ॥ युगदीर्घ[28] दिनासि परम कष्टें गमती.[29] ॥ १ ॥

---

१ धनद-अनुग, कुबेराचा सेवक. २ हें त्या सेवकाचें नांव. ३ दांडगा. ४ गोपीरूपी लहानगायी. ५ दिशा. ६ स-अग्रज (वडील भाऊ), बळरामासहित. ७ स्त्रियांच्या हाकांनीं. ८सखी. ९शत्रुरूपी अंधाराचा सूर्य. १०शालनामक वृक्ष. ११मुलगे. १२हें 'द्रुम'याचें विशेषण. १३ "भिऊं नका" अशी हाक. १४पहिल्यानें स्त्रियांस जी भीति प्राप्त जहाली होती तिचें पात्र, नंतर, हा खळ केला; म्हणजे त्यांस निर्भय करून त्यास सभय केलें. १५ रामकृष्ण. १६ वेगास. १७ पाप्यास. १८ तत्-अमत्रास, त्यागुह्यकरूपी पात्रास. १९ भय. २० शालवृक्ष हातांत धरिला आहे ज्याणें. २१ बळाचें स्थान. २२ शिरोरूपी मणि. २३ स्त्रिया. २४ शत्रूनें. २५ बळराम. २६ शिरोरत्नें. २७ आदिपुरुषें (कृष्णें) २८युगाप्रमाणें लांब वाटणारा. २९ फार कंटाळ्यानें घालविती.

गात वसति वृजिनारी[1]- ॥ प्रभु लीलांतें स्छळस्छळीं व्रजिं[2] नारी[3]; ॥
करिती काळक्रमणा, ॥ आळवुनी[4] वेणुगानपटु[5] हृद्रमणा[6]. ॥ २ ॥
नयना सुख दे वेश; ॥ त्रिभंग[7]ललिताकृती सुमुख देवेश[8] ॥
वर्णिति भास्वर[9]; जाती ॥ ताप, अशा वेणुच्या शुभा[10] स्वरजाति. ॥ ३ ॥
अतिसुखदा[11] या दासी ॥ गाति, कथा; स्मरति नंददाया[12]दासी. ॥
स्थिरचर मोहुनि, उरली ॥ शक्ति जिची, वर्णिती मनःप्रिय मुरली. ॥४ ॥

इतिपंचात्रिंशः ॥ ३५ ॥

व्रजजननयनें कुमुदें[13] ॥ विकसवि, विरहार्क[14]दुःख नाशुनि, समुदें[15] ॥
यदुचंद्र सदा सांजे[16] ॥ उगवे, दे स्मितसुधा[17]; प्रिया दासां जे. ॥ १ ॥
नामें असुर[18]“ अरिष्ट ” ॥ प्रभुवरि ये एकवेळ मूर्त[19] अरिष्ट; ॥
हरि गौरव शैलांचें[20] ॥ ऐसें धरि रूप दुष्ट तो बैलाचें. ॥ २ ॥
व्रज कांपवि वृषं[21]; भाचा ॥ कंसाचा भी न काळ त्या वृषभाचा[22]. ॥
वप्रासि[23] उकरि, शृंगें ॥ विंध्यगिरीचीं हि लज्जितें करि शृंगें[24]. ॥ ३ ॥
शब्दें भय दे; हगत ॥ स्वल्प खणित भूसि[25], दावि बळ देहगत[26]. ॥
ककुदाश्रितजीमुत[27] ॥ स्तब्धाक्ष[28], पदोपदीं विसर्जी[29] मूत. ॥ ४ ॥
उचलूनि अतुच्छातें[30] ॥ धरितो, अभ्रंलिहा[31], निजा पुच्छातें. ॥
गोगोपीचे गळती ॥ गर्भ, रवें ज्याचिया, भयें पशु पळती. ॥ ५ ॥
भ्याला व्रज या वाहे ॥ हरिला कीं, “रक्षि जे स्वजनता[32] वा हे.” ॥
कृष्ण बलीवर्दा[33] या ॥ दापी[34], इच्छा करी वळी मर्दाया. ॥ ६ ॥

---

१वृजिन-अरि-प्रभु-लीलांतें, पातकाचा शत्रु असा जो प्रभु, त्याच्या लीलांतें. २गोकुलीं. ३ स्त्रिया. ४ मधुर शब्दें प्रार्थून. ५ वेणूवर गायन करण्यांत कुशल असा ६ मनोरंजका (कृष्णास). ७ तीन ठिकाणीं (गातांना) अंग वांकविल्यामुळें सुंदर आहे आकृति ज्याची, असा. ८ देवश्रेष्ठ. ९ सुंदर. १० चांगल्या. ११ अत्यंतसुख देणाऱ्यास. १२ नंदाच्या मुलास. १३ गोकुळांतील जनाचीं नेत्रें हींच कमळें. १४ विरहरूपी सूर्यापासून जहालेलें दुःख; (कुमुदें हीं चंद्रविकासितें कमळें असतात). १५ सर्व. १६ संध्याकाळीं. १७ हास्यरूपी अमृत. १८ राक्षस १९ मूर्तिमान. २० पर्वताचें. २१ बैल. २२बैलाचा. २३उंचवट्यास, डोंगरीस. २४ शिखरें. २५ भूमीस. २६शरीरांत असलेलें. २७ककुत्-आश्रित जीमुत. (मानेवरच्या) कोळाने आश्रित आहेत मेघ ज्याच्या. २८ स्तब्धनेत्री. २९टांकी. ३० मोठ्यास, भयंकरास. ३१ आकाशास लागलेल्या. ३२ स्वजनसमुह. ३३ बैलास. ३४ भिववी.

निजसुहृदंसीं[1] वाहे ॥ ठेवुनि, त्या चंद्रकावतंसी[2] वाहे[3]. ॥
क्रोधें वृषहि फुफाटे, ॥ ज्याच्या खुरकुट्टनें धरातळ[4] फाटे. ॥ ७ ॥
योजी शृंगां, "राहा," ॥ शूळा जीं म्हणति; मूर्तशृंगा[5] राहा ॥
वृष जाय विदाराया ॥ विश्वाख्या मोक्षदा प्रियोदारा[6] या. ॥ ८ ॥
धांवे उद्दामोक्षा[7] ॥ शृंगें हाणावया स्वशुद्धा मोक्षा; ॥
धरि शृंगें हरि हा तीं ॥ ज्या श्रीच्या पाणिपंकजां वरि हातीं. ॥ ९ ॥
शृंगें धरुनि ढकलिला ॥ मागें अठरा पदेंहि; तो दृढ कलिला ॥
ये उठुनिहि घामेला; ॥ जन भावी, 'वांचला, जरि मघा मेला!' ॥ १० ॥
ये कोपें खवळोनी, ॥ तों श्रीशें[9] तद्विषाणयुगं[10] कवळोनी, ॥
पाडुनि तो पादानें, ॥ आक्रमिला[11] खळ जगत्रयोपादानें[12]. ॥ ११ ॥
जेवि पटा[13] ओल्याला, ॥ पिळितां रक्तांगरंग[14], वृष तो ल्याला; ॥
तच्छृंगें तो कुटिला; ॥ घातक निजगुणचि होय अंतीं कुटिलां[15]. ॥ १२
वधिला कनकपटानें[16] ॥ वृष, जेणें त्रासिले स्वजन कपटानें. ॥
वर्षति सुर कुसुमांनीं[17] ॥ वाद्य- स्तुति- गीत- नाद उठति विमानीं. ॥ १३ ॥
संहारूनि अरिष्ट ॥ व्रज रक्षी विश्वपाळ सर्व-वरिष्ट. ॥
स्त्रीनयनतृषा[18] रातीं ॥ भेटुनियां, हरि सहाग्रजें[19] वृषारातीं[20]. ॥ १४ ॥
वृषमथनोपरि[21], नातें[22] ॥ हरिच्या श्री नारदें परोपरि नातें ॥
कथिलें कंसा; नंदें ॥ रक्षित बळकृष्ण शौरिसुत[23] सानंदें[24]. ॥ १५ ॥
स्वरसपिपासूच[25] कसा ॥ मुनि घात करील शौरिचा[26] सूचकसा[27] ? ॥
सांगे भोजपतीतें[28]; ॥ यास्तव कीं देवकार्य हो[29] जपती तें. ॥ १६ ॥
वधिले जे तत्पुरुष[30], ॥ प्रकट करि रहस्य[31] सर्व तें सत्पुरुष[32]. ॥

---

१ आपल्या मित्रांच्या खांद्यावर. २ मयूरपिच्छावरील चिन्हें आहेत वतंसीं म्हणजे तुऱ्यांत ज्याच्या तो. ३ बोलावी. ४ भूमीची सपाटी. ५ कृष्णास. ६ प्रिय आणि उदार अशास. ७ उद्दाम उक्षा, दांडगा बैल. ८ करकमळांस. ९ कृष्णानें. १० त्याचीं दोनहि शिंगें. ११ घाला घातला. १२ जगत्रय-उपादान, त्रैलोक्याचें कारण. १३ वस्त्रास. १४ तांबड्या रंगाची कांति. १५ दुष्टास. १६ पीतांबरधारी कृष्णानें. १७ फुलांनीं. १८ स्त्रियांच्या डोळ्यांची तहान (इच्छा). १९ सह-अग्रज, बळरामासहित. २० वृषासुराचा शत्रु. २१ वृषासुराच्या मथना (मर्दना) नंतर. २२ नातवानें. २३ वसुदेवाचे मुलगे. २४ आनंदयुक्त ( नंदानें ). २५ निज रसाविषयीं ( भक्तीविषयीं ) तृषित. २६ वसुदेवाचा. २७ चहाडखोरासारिखा. २८ कंसास. २९ होवो. ३० कंसाचे पुरुष ( राक्षस इ० ). ३१ गुह्य. ३२ नारद.

दे वहु संतापा जी ॥ प्रभुचरितसुधाहि[१] कीं असंतो[२] पाजी. ॥ १७ ॥
हे वार्ता तो धमनी[३] ॥ पेटवि कंसाचिया शिखी[४]-क्रोध मनीं. ॥
शौरिवधा[५] तरवारी ॥ घेत्या[६], मुनि, युक्ति कथुनि लघुतर[७], वारी. ॥ १८ ॥
कीं "तात-वधा कानें ॥ परिसुनि, बळकृष्ण[८] पळति तव धाकानें; ॥
ह्मणवूनि तदसु[९] देवा[१०]! ॥ रक्षावे; वद्ध मात्र करिं वसुदेवा." ॥ १९ !
हतबुद्धिच[११] हा[१२] डाया[१३] ॥ साधाया, मानवे मुनिचंहाडा[१४] या. ॥
गेला सांगोनि गंडो[१५] ॥ साधूंचा वांधवोनि शौरी निगडीं[१६]. ॥ २० ॥
यत्नद्रुम[१७] अवकेशी[१८] ॥ जाले, परि धाडि कंस दानव[१९] केशी. ॥
कीं मारवितो भाचे, ॥ विलास हे जीविताचियें[२०] लोभाचे. ॥ २१ ॥
धाडुनि हरिरिपु[२१] केशी, ॥ मल्लामात्यादिकांहि[२२] मग न चुकेशी ॥
युक्ति कथी बाहूनी[२३], ॥ वाराया आत्ममृत्यु त्या बाहूंनीं! ॥ २२ ॥
इतरां ठेविति जे ठी[२४] ॥ वहुवळ चाणूरमुष्टिकाभिध[२५] जेठी, ॥
त्यां बोधि, "असा रंगीं[२६] ॥ सिद्धचि; व्हा सिंह शौरिसुतसारंगीं[२७]. ॥ २३ ॥
रे, वीर महामात्र[२८]! ॥ द्वारीं रंगाचिया परम हा मात्र ॥
तूंहि कुवलयापीड[२९] ॥ स्थाप सबळहंस[३०] हरि कुवलयापीड[३१]." ॥ २४ ॥
रिपुवधयुक्ती[३२] सुचवी; ॥ कार्मुकमख[३३] मल्लरंग मंचांहि[३४] सुचवि. ॥
आणवि मग अक्रूरा; ॥ गोष्टी सांगे तया स्वयें अक्रूरा[३५]. ॥ २५ ॥
'तूज अशा साधूंनीं ॥ साधावें यश, सुहृद्यशा[३६] साधूनी[३७]; ॥

---

१ कृष्णचरित्ररूपी अमृत. २ दुर्जनास (कंसास). ३ फुकणी. ४ क्रोधरूपी अग्नि. ५ वसुदेवास मारण्याकरितां. ६ घेणाऱ्या (कंसास). ७ थोडकीच ('युक्ती'चें विशेषण). ८ बळराम व कृष्ण. ९ तत-असू, वसुदेवाचे प्राण. १० हे राजा! ११ बुद्धिहीन. १२ कंस. १३ द्वेषास. १४नारदास. १५नारद. १६बिड्यांनीं. १७यत्नरूपी वृक्ष. १८निर्फल. १९केशीनामक दैत्य. २० जीवाच्या. २१कृष्णशत्रु. २२मल्ल-आमात्यादिकांसहि. २३ बोलावून. २४ "जेठी" या पदाचे दोन भाग केले असतां 'जे' आणि 'ठी' असे होतात; त्यांतून जेठी ह्मणविणाऱ्या इतरांस 'ठी' इतका भाग ठेवणारे, ह्मणजे इतर सर्व 'जेठी' अर्धे जेठी असें मानणारे (च्याणूर इ०). २५ चाणूर, मुष्टिका, हीं नावें आहेत ज्यांस. २६मल्लांगणीं. २७वसुदेवाच्या पुत्ररूपी मृगांविषयीं. २८हे महाता! २९ हत्तीविशेष ३० बळरामासहित "हंस"=कृष्ण. ३१ कुवलय-अपीड, कमलाचा तुरा आहे ज्यास असा = कृष्ण. ३२ कृष्णवधाची युक्ति. ३३ धनुर्याग. ३४ बसण्याचीं उंच स्थानें. ३५ क्रूर नव्हे असा जोतो त्यास. ३६ सुहृत-यश= आप्तांच्या कीर्तीस. ३७ संपादून.

गुरुबळ[1] सुत्राम्यातें[2], ॥ स्वगत[3] गणियलें अदीर्घसूत्रा[4]! म्या[5] तें. ॥ २६ ॥
माजा तूं हित[6] साच, ॥ स्वर्गेशा[7] विष्णु, साधु! तूंहि तसाच. ॥
शौरि[8]र्तनुज आणिं, खरे ॥ मन्मृत्यू; आप्त मज नसे आणिख रे.! ॥ २७ ॥
नंदहि आणावा; हें ॥ कळतां, भीतां मदर्थ आणा वाहें; ॥
कीं, 'करि नृप हा यागा ॥ धनुराख्यां[9], द्या उपायनं[10], पहा, या, गा!' ॥ २८ ॥
मारू शत्रुस हां[11]; या- ॥ परि तद्वधयोग[12]; मल्ल मजहि सहायां[13]; ॥
या दहना[14] मारुत[15] हो; ॥ शिशु[16] तृण ते; मज न सज्जना! मारुत हो. ॥ २९ ॥
वसुदेवादि तदिष्ट[17], ॥ स्वपिता देवकहि, वधिन मी हतदिष्ट[18]. ॥
जैसी स्त्री नवि, भूमी, ॥ भोगिन, निष्कंटका[19] करून, विभू[20]! मी. ॥ ३० ॥
प्रिय मी सासुरयातें[21] ॥ मगधपतीतें; भिती सदा सुरे[22] यातें. ॥
द्विविदसखा, शंबर वा, ॥ बाण, नरक[23], मित्रभाव यांसीं बरवा. ॥ ३१ ॥
पुरमखतृष्णा[24] नयनां ॥ उपजवुनि, करीं सरामकृष्णानयना[25]. ॥
तुज बहु नय[26] पाठ; बळा[27] ॥ अनुजयुता[28] आणिं, जा, सख्या! पाठबळा!" ॥ ३२ ॥
अक्रूर ह्मणे, "होतें ॥ होणार; चुके न शाहणपणें हो! तें. ॥
जरि विधि[29] करं[30] दे वांचे; ॥ फळति मनोरथहि देवनरदेवांचे[31]." ॥ ३३ ॥
तो मानवदेवांचा[32] ॥ निरोप घे, जाय, अहित न वदे वाचा. ॥
तत्व कथूनि खळा या ॥ काय, सजे धर्मसेतु जो निखळाया ? ॥ ३४ ॥
इतिश्रीमत्कृष्णवि० ॥ ३६ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥
कंसा जो भाकेशी ॥ दे, धरि हरिघातपापलोभा केशी[33], ॥
तो तनु घे अश्वांची[34] ॥ ये यदुसिंहावरी[35] पिसाच श्वांचि[36]. ॥ १ ॥
धरि अद्भुत हयदेहा[37], ॥ भूमि खुरांनीं खणी, व्रजा[38] भय दे हा. ॥

---

१ बृहस्पतीचें बळ. २ इंद्रातें. ३ मजजवळ आहे असें. ४ हे चपळा ! ५ बळ. ६ मित्र. ७ इंद्रास. ८ वसुदेवपुत्र. ९ धनुः-आख्या-यागा, धनुर्यागा. १० नजराणा, करभार. ११ मी. १२ त्याच्या वधाची संधि. १३ मदतीस. १४ अग्नीस. १५ वारा. १६ मुलगे. १७ तत्-इष्ट, त्यांचे मित्र १८ दैवहीन १९ शत्रुरहित. २० हे प्रभो ! अथवा, 'मी' याच्या बरोबर घेतलें तरी बरेंच. २१ सासऱ्यातें. २२ देव. २३ द्विविद, शंबर, बाण, नरक, हीं दैत्यांचीं नावें आहेत. २४ पुरांत होणाऱ्या यज्ञास पाहण्याची तृषा. २५सराम, कृष्ण, आनयन= बळरामास हित कृष्णास आणणें २६ न्याय. २७बळरामास. २८ धाकट्या बंधू-(कृष्णा) सहित. २९दैव. ३० हात. ३१देव व राजेलोक यांचे. ३२ राजाचा. ३३ राक्षसविशेष. ३४ घोड्याचो. ३५ कृष्णरूपी सिंहावर. ३६ कुत्राच. ३७ घोड्याच्या शरीरास. ३८ गोकुळास.

वर्णाया योग्य कशा ॥ होति, जयाच्या सटा[1] सुराभ्रांस[2] कशा[3]? ॥ २ ॥
बहु दीर्घ सटा याच्या; ॥ पाठि विमानाचियाहि घसटायाच्या. ॥
जैसा वेग मनाचा ॥ तैसाचि; उणा न बोलवे गमनाचा. ॥ ३. ॥
दे त्रास जनां, हींसे[4]; ॥ ते होती बधिरें[5], कर्ण यां नाहींसे.॥
असुरा हयवेषाची[6] ॥ व्याकुळ गोकुळ करी क्षणें हेषांचि[7]. ॥ ४॥
धांवे हुडकित; वार्हा[8] ॥ या बाहे हरि तदंतकरें[9] कितवां[10]; हा ॥
गर्जे,जेवि हरि[11] हरी[12], ॥ खवळे, शब्दें जरि स्वगर्व हरि[13] हरी[14]. ॥ ५ ॥
धांवुनि घोटकें[15], राया ॥ विश्वाच्या, ये समीप घोट कराया. ॥
कीं हा राहू नीच ॥ ग्रासूं ये विधुंस[16] जपत राहूनीच. ॥ ६ ॥
कुंकुम ज्याला थां[17]नीं ॥ त्या श्रीच्या मुद्रिता उरा लाथांनीं ॥
ताडाया हा वा[18]जी॥ झाडी पद; तों प्रहार जों व्हावा, जी, ॥ ७ ॥
तों चकरुनि, देव हया[19] ॥ धरि त्या चरणींच सज्जन-सुखावह[20]; या[21] ॥
फिरवुनि गरगर तुरगा ॥ उडवि धनुःशत जसा खगेश्वरें[22] उरगा[23]. ॥ ८ ॥
दगड जसा गोफणिचा, ॥ पक्षिपें[24] तिक्षित भोगें[25] कीं तो फणिचा[26] ॥
दूर उडविला साचा;॥ दावी महिमा हरी भुजविलासाचा[27]. ॥ ९ ॥
संज्ञे-सह[28] तो, डाया[29]॥ धरुनि, पुन्हा ये रमांधवा[30] तोडाया. ॥
वाटे साचा विलया[31] ॥ नेइल, काळस्वरूपसा चाविल, या[32]. ॥ १० ॥
दानवहयमुखविवरा[33]- ॥ माजि शिरवि, जो प्रपन्न[34] जन सुखवि वरा, ॥
स्वभुजा सव्या[35], लपती ॥ ज्याच्या देखोनि कांतिस व्यालपति[36]. ॥ ११ ॥
गुण ज्याचा वेदांतें ॥ प्रिय बहु, तो बाहु, दुष्ट चावे दांतें; ॥
शिवतां तप्तायांतें[37] ॥ गळति, तसे रद[38]; सुदुःख दृप्ता[39] यांतें. ॥ १२ ॥

---

१ मानेवरचे अयाळ. २ देवांस व अभ्रांस. ३ चाबूक. ४ किंकाळे ५ बहिरे. ६ घोड्याचा वेष घेतला आहे ज्याणें त्याची. ७ किंकाळी. ८ घोड्यास. ९ त्याचा ( घोड्याचा ) अंत करणारा (कृष्ण). १० दुर्जनास. ११ सिंहासारिखा. १२ हा घोडा. १३ कृष्ण. १४ हरण करी. १५ घोडा. १६ चंद्रास. १७ ज्याला श्रीच्या थानांनीं कुंकुम त्या मुद्रिता उरा लाथांनीं, ताडाया; असा अन्वय. १८ घोडा. १९ घोड्यास. २० सज्जनास सुखद (कृष्ण). २१ "तुरगा" याचें दर्शक. २२ गरुड. २३ सर्पास. २४ गरुडानें फेकलेला. २५शरीर (सर्पाचें.) २६सर्पाचा. २७बाहुप्रतापाचा. २८सावध होऊन. २९द्वेष्यास. ३०कृष्णास. ३१अंतास. ३२कृष्णास. ३३ घोड्याचें रूप घेतलेला दैत्य त्याचें तोंड तेंच कोणीएक विवर त्यांत,(स्वभुजा शिरवि इ०). ३४ शरणागत. ३५उजव्या. ३६सर्पश्रेष्ठ ३७तप्त-अया, तापलेल्या लोखंडास. ३८दांत. ३९गर्विष्ठास.

जाइल जो खंडाया ॥ मंदमती परम तप्तलोखंडा, या- ॥
परि, डसतां वरदां[1], हें ॥ सद्य[2] घडे; गळति दंत भूवर[3] दाहें[4]. ॥ १३ ॥
वाढे भामय[5] समहा- ॥ मणिभुज[6] देहीं उपेक्षितामयसम[7] हा; ॥
मग असदसुरविरोधी,[8] ॥ वायुसि निर्गम[9] न, मार्ग न उरवि, रोधी. ॥ १४ ॥
ज्यापरि मीनं[10] गळाला ॥ हा तेवि, समर्थ विक्रमी[11]; न गळाला, ॥
हें उचित अनाचरणा[12] ॥ फिरवी, झाडी, विशाळ नयना, चरणा. ॥ १५ ॥
सोडी हा लेंड गळन्[13]- ॥ मूत्र, परी यासि मरण आलें डेंगळ[14]; ॥
कीं याला विभु[15], ज्याला ॥ चिंतिति योगी, अशाहि लावि भुजाला. ॥ १६ ॥
कर्माच्या परिपाकें[16] ॥ कर्कटिकाफळ[17] उले जयापरि पाकें[18], ॥
हयदेह[19] तसा उलला; ॥ भासे रक्तार्द्रपळस[20] जैसा फुलला ! ॥ १७ ॥
सहज हरुनि गळवाहे,[21] ॥ काढुनि घे असुहि[22] विश्वमंगळ[23], वा ! हे. ॥
कीर्त्यमृतपिपासु[24] मनीं, ॥ सुरे[25] पूजिति या क्षतार्द्रपापा[26] सुमनीं[27]. ॥ १८ ॥
असि करि बहुवार[28] दया ॥ दासावरि जो, पहावया नारद या ॥
प्रभुला, ये एकांतीं; ॥ प्रेमा याचा अपार लक्ष्मीकांतीं[29]. ॥ १९ ॥
स्तवुनि म्हणे, "हाकेशी ॥ ज्याच्या भीती सुधांधसांहि[30], हा केशी ॥
अंता नेला वाजी ! ॥ यापरिच यशांत कविमनें लावा जी ! ॥ २० ॥
भूसुरखेद[31]क्षपणीं ॥ हे तव भुज याचि सारिखे दक्ष[31]पणीं ! ॥
वधिं त्या मूढां[32]; सळिती ॥ साधु श्रुतिसेतु[33] खळचमू[34] ढासळिती. ॥ २१ ॥
तूं सदवनपर[35], वांचे ॥ कंस कसा? मारिसी दिसीं परवांचे ॥
कमलारंगा[36] ! माजी दृष्टि ॥ निवविसील मल्लरंगामाजी[37]. ॥ २२ ॥

---

१ कृष्णास. २ त्वरित. ३ जमिनीवर. ४ उष्णतेनें. ५ तेजोमय. ६ महामण्यानें युक्त अशा सर्पासारिखा भुज. ७ उपेक्षित-आमय-सम, उपेक्षा केलेल्या रोगासारिखा. ८ असत्-असुर-विरोधी, दुष्ट दैत्यांचा द्वेषी ( कृष्ण ). ९ गम्य. १० मासा. ११ पराक्रमी. १२ दुराचाऱ्यास. १३ मुतरा. १४ मोठें १५ प्रभु. १६ परिणामानें. १७ फळविशेष. १८ पक्वतेनें. १९ घोड्याचें शरीर. २० रक्तेंकरून आर्द्र ( भिजलेला ) असा पळसाचा वृक्ष. २१ गळ्यांतील बाहा (बाहु) २२ प्राणहि. २३ कृष्ण. २४ कीर्तिरूपी अमृताविषयीं तृषित. २५ देव. २६ क्षतांनीं आर्द्र ( भिजलेला ) असा जो पातकी त्यास. २७ फुलांनीं. २८ पुष्कळवेळ. २९ कृष्णीं. ३० सुधा अंधस्, अमृतच आहे अन्न ज्यांचें ते ( देव ). ३१ ब्राह्मणांचा खेद घालविण्याविषयीं, जो चलाखी तींत. ३२ कंसास. ३३ वेदरूपीसेतु. ३४ दुष्टसमूह. ३५ सत्-अवन-पर, साधूंच्या रक्षणाविषयीं तत्पर. ३६ हे रमापते ! ३७ मल्लांच्या सभेंत.

मग वध पंचजनाचा[1] ॥ यवननरकमुरमुखामरारिजनाचा[2] ॥
देखेन; तदुपरि भव- ॥ भ्रमहर[3] कल्पद्रुहरण[4] शक्रपरिभवें.[5] ॥ २३ ॥
बहु तन्ववलग्नाचें[6] ॥ स्त्रीरत्नाचें हि कुतुक नव लग्नाचें. ॥
मग उत्धरिसिल नृग[7] ती ॥ पाहेन द्वारकेंत लीला नृगती[8] ! ॥ २४ ॥
सुश्रीमंत कराया, ॥ स्त्रीरत्नासह मणि स्यमंतक[9] राया! ॥
येइल, ते आळ सरे, ॥ स्मरतां यश, कीर्तनीं, हरिल आळस रे ! ॥ २५ ॥
मृतपुत्रोपादानें[10] ॥ विप्रें[11] सुखविजेल विष्टपोपादानें.[12] ॥
पिडिल जगा, तव सोंगा ॥ घेउनि, पौंड्रक[13], तदंत[14] गात वसों गा ! ॥ २६ ॥
मग जळतां काशिपुरी, ॥ तव शक्ति कळेल सर्व लोकांशि पुरी. ॥
तुज भगवद्वेद्यातें ॥ गातिल कवि, मारिता मखीं[15] चैद्यातें.[16] ॥ २७ ॥
हरि ! दंतवक्रनिधना[17] ॥ करिसिल तूं शंकरादिसर्वमुनिधना[18] ! ॥
श्रीद्वारकेंत वसतां, ॥ चरितें गाईन, ऐकवीन तव संतां.[19] ॥ २८ ॥
वीर धनंजय[20], साच ॥ द्वेषहविप्राशनीं[21] धनंजयसाच[22]; ॥
तूंहि समीरण[23] या गा ॥ सारथि, पाहेन दास मी रणयागीं.[24] ॥ २९ ॥
हरिलें महिमानस[25] तां, ॥ कवि जगति न, हा प्रसिध्द महिमा नसतां.[26] ॥
आतां कां मन करणें[27] ॥ न वळवि? भजकांस अन्य काम न करणें.” ॥ ३० ॥
अंशु[28] वना रदनांचे[29] ॥ प्रभुच्या धवळिति; नमूनि नारद नाचे; ॥
कीं न तसा दास; कळा ॥ हे हरिची; पात्र सुप्रसादा सकळा. ॥ ३१ ॥
चिंतित वदना रदन-[30] ॥ द्युति सुभगा[31] जाय, परि मनें, नारद न. ॥
रिझवि[32] रमावल्लभ[33] या; ॥ सूचकतेच्या[34] मुनी धरि न वल्हे[35] भया. ॥ ३२ ॥

---

१ राक्षस विशेष. २ यवन, नरक, मुर इत्यादि जे देवांचे शत्रु त्यांचा. ३ संसारभ्रमाचें हरणकरणारें. ४ कल्पतरूचें हरण. ५ इंद्राचा पराजय. ६ तनु-अवलग्न, बारीक आहे कंबर ज्याची असें जें स्त्रीरत्न त्याचें (कुतुक). ७ नृगराजा. ८ हे मनुष्यगते ! ९ मण्याचें नांव. १० मेलेल्या पुत्राच्या हेतूनें, (मृतपुत्र आणित्यानें.) ११ सांदीपन गुरू. १२ विष्टपास (भुवनास) कारण असा जो तूं त्या त्वां. १३ दैत्यविशेष. १४ त्याचें मरण. १५ यज्ञामध्यें. १६ राक्षसविशेष. १७ दंतवक्राचें मरण. १८ शंकरादि सर्वमुनींचें धन असा जो तूं. १९ साधूंस. २० अर्जुन. २१ शत्रुरूपी होमान्न प्राशन करण्या विषयीं. २२ अग्नीसारिखाच. २३ वायु. २४ युद्धरूपी यज्ञास. २५ जनांचें मन. २६ त्वां. २७ इंद्रियें. २८ किरणें. २९दांतांचे. ३० दंतशोभा. ३१ स्वच्छ. ३२ आनंदवी. ३३ कृष्ण. ३४ चहाडपणाच्या. ३५ वालभरहि.

सेवित चिद्रसवर्षि[1]- ॥ प्रभुगुण गेल्यावरि स्वपुत्रभवर्षि[2], ॥
ये चारित पशु भवन[3] ॥ श्रीचें[4] पदिं; काय हो करि तप शुभ वन! ॥ ३३॥
फलसुमपल्लवजाती[5] ॥ घेती, चारीत धेनु वल्लव[6] जाती. ॥
पर्वत-सानूंत[7] नसे ॥ भय, होति विनोद मानसा नूतनसे! ॥ ३४ ॥
हरिसह कौतुककरीती[8] ॥ एक असा खेळ तोषहेतु[9] करिती; ॥
किति जाले हो ! पाळ[10], ॥ स्वांगें किति मेष[11], चोर किति गोपाळ ॥ ३५ ॥
चोरिति ते मेषांतें, ॥ जे घेते तस्करांचिया[12] वेषांतें. ॥
हासविति विनोदानें ॥ सगुणब्रम्हासि[13] गोप हे मोदानें[14]. ॥ ३६ ॥
त्यजुनि भयास, मयाचा[15] ॥ सुत ये व्योमाख्य[16] विघ्न[17] या समयाचा; ॥
घे वल्लववेष[18] हरि- ॥ प्रियसख[19] जे ते समस्त तो मेष हरी. ॥ ३७ ॥
चोरी ज्या, त्यास दरी ॥ मध्यें घाली नगांचिया[20] हा सदरी[21]; ॥
मुख झांकि घनें[22] उपळें[23]; ॥ पुनरपि ये तो दुजासि अघ[24] नेउं पळें. ॥ ३८ ॥
हरि पशुपा[25], चपळा या ॥ न सुचे, उरतांहि चार पांच, पळाया; ॥
हरि एवंच[26] करांनीं ॥ प्रभुच्या मरणार साधुवंचक[27] रानीं. ॥ ३९ ॥
साक्षी चिन्मय[28] भूतें ॥ धरि, याविण गति नसे क्वचिन् मयभूतें[29]. ॥
कोठें खळ पळविल या ॥ कृष्णधना, ज्याचिया नको पळ विलया? ॥ ४० ॥
कृष्ण धरी व्योमातें[30]; ॥ व्यापी, वाढोनि, तो अरि, व्योमातें[31]; ॥
जरि हा बहुबळ[32] कटकीं[33] ॥ असुरांच्या, तरि मधुघ्नभुज[34] वळकट कीं. ॥ ४१ ॥
काळ[35]- विलोकित वांचे, ॥ न परि तगति जीव हरिपुढें कितवांचे[36]. ॥
पावे अनसु[37] टकेला[38], ॥ काळाधीशेंहि[39], सुकविजन, सुटकेला. ॥ ४२ ॥

---

१ आनंदरसाचा वर्षावकरणारे असे प्रभूचे गुण. २ स्व-पुत्र-भव-ऋषि, ब्रह्मदेवापासून जहालेला ऋषी ( नारद ). ३ घर. ४ लक्ष्मीचें. ५ फळें, पुष्पें, पालवी यांच्या जाति. ६ गवळी. ७ कड्यांवर. ८ कौतुकाची रीति आहे ज्यांत. ९ आनंदजनक. १० अजापाळक. ११ बकरे. १२ चोरांच्या. १३ सावतार ब्रह्मास ( कृष्णास ). १४ आनंदानें. १५ मयासुराचा. १६ "व्योम" या नांवाचा. १७ "विघ्न" हा शब्द संसकृतांत पुल्लिंगी आहे. १८ गवळ्याचा वेष. १९ कृष्णास प्रिय असे गडे. २० पर्वताच्या. २१ सत्-अरि, सज्जनाचा शत्रु. २२ मोठ्या. २३ दगडानें. २४ पापरूपी. २५ गोपांस. २६ यासाठीं. २७ ठकविणारातें. २८ ज्ञानमय (कृष्ण). २९ मय-भू मयासुराचा मुलगा. ३० व्योमासुरास ३१ आकाशास. ३२ फारबळवान्. ३३ सैन्यांत= समुहांत. ३४ मधु दैत्यास मारणाऱ्या कृष्णाचे भुज. ३५ काळानें (टोकारून) पाहिलेला. ३६ दुष्टाचे. ३७ अन्-असु= गतप्राण. ३८ टकटक पाहण्यास. ३९ काळश्रेष्ठें (कृष्णें).

खळवधकाम करी, ती ॥ पशु[1]मृतिची दावि बाळकां मखरीति[2]. ॥
शिवसेव्यपदांबु[3] कलि- ॥ त्रासद[4] त्यां[5] तोषें[6] दे दिविषदां बुकली[7]! ॥ ४३ ॥
जो साधुजनीं श्वा[8] स- ॥ द्वेष्टा[9] तो मारिला विगतनिःश्वास[10]. ॥
ज्या स्वपदीं विश्वास ॥ प्रभु तारी त्यांसि, करि सुखी विश्वास. ॥ ४४ ॥
उघडुनि गुहापिधान[11], ॥ श्रीपति घे दुर्लभ स्वभक्तनिधान[12]. ॥
ह्मणत, "नमस्ते[13]" नाचे ॥ सुरजन, वर्णूनि भुज यमस्तेना[14]चे. ॥ ४५ ॥
त्या दासां गडियांचें[15] ॥ स्तोत्र[16] रुचे बहु भवाब्धिसांगडियाचें[17]. ॥
निवती असु[18] खेवेंचि[19] ॥ ब्रह्माच्या; प्राप्ति सर्व असुखें वेंची. ॥ ४६
जातां याला, "गे! हा," ॥ ह्मणति सखी, " प्राणनाथ आला गेहीं[20] ; ॥
न ह्मणों[21] कां वो? बोळा[22] ॥ विरहें कां? कांतपादुका वोवाळा. ॥ ४७ ॥
आलों मुनिसीं[23] समते[24]; ॥ त्यां आह्मां दिननिशाव्यवस्था सम;ते ॥
आश्रित सत्यानंदा[25]- ॥ तें; आह्मीं टाकिला सकळ गृहधंदा. ॥ ४८ ॥
निंदास्तवनीं समता ॥ त्यांपरि आह्मां; नसे अहंता, ममता; ॥
ते नित्य सुखी लोकीं; ॥ आह्मीच कशा निमग्न[26] होतों शोकीं? ॥ ४९ ॥
ते मुरली हे वाजे, ॥ धरि हरिदंतच्छदामृतीं[27] हेवा जे; ॥
वंशभवा[28] खरि; असुनी ॥ विपक्षे[29], हित कथि; ह्मणे, 'पुजा हरि असुनीं[30].'"॥५०॥
ऐसें बहु नवसांनीं ॥ गोपी पाहति हरीस रव्यवसानीं[31], ॥
ज्यांला शिवशिव ! सानीं[32] ॥ कल्पशतें[33] दाविलीं विरहदिवसांनीं[34]. ॥ ५१ ॥

॥ ॥ ॥ इतिश्री कृष्ण विज० ॥ ३७ ॥ ॥ ॥

---

१ पशुमरणाची. २ यज्ञरीति. ३ ज्याच्या पायांचें उदक सांबानें सेवन करण्यास योग्य तो. ४ कलियुगास भय देणारा. ५ त्या देवांस. ६ संतोष. ७बुकलणारा. ८कुत्रा. ९सज्जनांचा द्वेष करणारा. १० श्वासोच्छ्वसन गेलें आहे ज्यापासून. ११ गुहेचें तोंड. १२आपले भक्त हाच कोणीएक द्रव्याचा ठेवा १३ नमःते, तुला नमस्कार. १४ यमाचा चोर; काळास नेणारा. १५ सख्यांचें. १६ स्तुति. १७ संसाररूपी सागरांत नौका समूहच असे जे हे गोप; ( हें " दासां गडियांचें " या पदाचें विशेषण आहे). १८ प्राण. १९ आलिंगनानेंच. २० घरास. २१ ह्मणतां. २२ वाळतां २३ ऋषींशीं. २४ बरोबरीला. २५ सत्य आनंद, खरोखर आनंदरूपी ( कृष्ण ). २६ बुडलेल्या. २७ हरि-दंतच्छद-अमृतीं, कृष्णाच्या अधरामृतीं. २८ वेळूपासून जहालेली. (परंतु अलंकारासाठीं "सत्कुलोत्पन्न" असा अर्थ करावा). २९ शत्रु (हरीच्या अधरामृतीं हेवा धरी ह्मणून). ३०प्राणांहीं. ३१रवि-अवसानीं, सूर्यास्तीं. ३२लहानशीं(कल्पशतें).३३कल्प=ब्रह्मदेवाचा एक दिवस; मानवांचीं ४३२००००००वर्षें ह्मणजे एक कल्प. ३४ विरहाचे दिवस.

केशिविनाश[1] सकाळ[2] ॥ स्वभुजें करि देव दाससाध्वसकाळ[3]; ॥
मग भेटे नारद या, ॥ (व्योमवधें[4] त्यावरी करि अपार दया;) ॥ १ ॥
त्याचि गुरुपदा सांजे ॥ अक्रूर नमी; वरी सकृप[5] दासां जें. ॥
मूर्तपरमनोरथ[6] वा, ॥ वृष्णिमनाचाचि[7] ये प्रभुसमोर थवा! ॥ २ ॥
राशि तपाचा राया[8]! ॥ आला अक्रूर हरिस पाचाराया[9]; ॥
प्रेषी स्वपतिस कीं[10] या ॥ श्रीमथुरा मूळ[11] सात्विकौघ[12] सकाया[13]. ॥ ३ ॥
अक्रूर रथावरुनी ॥ व्रजासि[14] येतां सुरस्तुतपथा[15]-वरुनी, ॥
चिंति मनांत नतरति[16]- ॥ प्रद ऐसें, ज्याविणे जनांत न तरती. ॥ ४ ॥
"कंसाचें आगं[17] मनीं ॥ नाठवि हा; गोकुळाचिया आगमनीं ॥
सुमहा भागवतन[18] मी ॥ पाहेन," ह्मणे; नृपाहि[19] भागवंत[20] नमी. ॥ ५ ॥
"आणाया शिशु[21] भाचे ॥ मज पाठवि, लाभ फार यासि[22]! शुभाचे ॥
ते पाहिन पाय महा- ॥ सुखनिधिचे[23]; मजवरी करि कृपा यम[24] हा! ॥ ६॥
काय मला पदरींचें ॥ सुकृत[25], कळेनाचि; कलिमलापदरीचें[26] ॥
चिद्रसदा[27] चरणाचें ॥ दर्शन! हें फळ तरी सदाचरणाचें. ॥ ७ ॥
विषयीं मन बावरतें[28] ॥ प्रेमें स्त्री- पुत्र- वित्त- विभवावरतें[29], ॥
त्या तुज हरिभेटि कसी ॥ रे अक्रूरा? न तज्जनसभे टिकसी! ॥ ८ ॥
दुर्लभ तत्सुगमाचें[30] ॥ दर्शन मज, शूद्रसंभवा[31] निगमाचें[32] ॥
उच्चारण जेंवि; कसे ॥ पद नयनां दिसति, या तमीं[33] जें विकसे[34]? ॥ ९ ॥
उत्साहें स्वमनींच्या, ॥ वाटे भेटेल मज सुरोत्तम[35] नीचा[36]. ॥

---

१ केशी दैत्याचा वध. २ प्रातः काळीं. ३ दासांच्या भयाचा काळ. ४ व्योमासुराच्या वधानें. ५ दयाळू (पद). ६ शत्रूचा ( कंसाचा ) मूर्त्तिमान् मनोरथ. ( हा अक्रूरावर उत्प्रेक्षा आहे ). ७ यादवांच्या मनांचा. ८ हे राजा. ९ बोलाविण्याला. १० किंवा. ११ आमंत्रण. १२ सात्विक भावाचाओघच. १३ मूर्त्तिमान्. १४ गोकुळास. १५ देवांनीं स्तुति केली आहे ज्याची अशा मार्गास. १६ शरणागतास प्रियकर ( कृष्ण ). १७ अपराध. १८ सु-महा-भाग-वतन, भाग्यवंत ( साधु ) जे त्यांचें वतनच असा जो कृष्ण. १९ कंसालाहि. २० अक्रूर. २१ मुलगे, लहान. २२ मला. २३ महा सुखाच्या ठेव्याची. २४ कंस. २५ पुण्य. २६ कलिमल-आपत्-अरि, पातक व विपत्ति यांचा शत्रु( कृष्ण ) त्याचें. २७ आनंदरस देणाऱ्या ( चरणाचें ). २८ निमग्न असतें. २९ पराक्रम. ३० त्या सुलभाचें. ३१ शूद्रापासून जहालेल्यास. ३२ वेदांचें. ३३ अंधारांत. 'जें'='पद.' येथें लिंगांतर जहालें आहे. ३४ झळके. ३५ सुर-उत्तम, देवश्रेष्ठ. ३६ हें " मज " याचें विशेषण.

सरिता[1] हरिती रासी, ॥ लागे तृण त्यांत एक तरि तीरासी. ॥ १० ॥
सरलीं सारीं दुरितें[2], ॥ जन्म सफळ आज; दुःख गेलें दुरि तें; ॥
जीं ध्याति मुनिजनमनें ॥ हरिपदनलिनांसि[3] करिल शिर निज नमनें. ॥ ११ ॥
पूजिति विधि[4] सुर ज्यातें, ॥ सेविति सात्वत[5] रमा मुनी सुरजातें[6]; ॥
पशुमागें पदनलिनें[7] ॥ फिरति वनीं, गोप्युरोजकुंकुममलिनें[8]. ॥ १२ ॥
भुलली ज्याच्या रुचितें[9] ॥ श्रीभ्रमरी[10], हरिमुखांबुरुह[11] चारुचि[12] तें! ॥
या दृष्टिस उजविलसे[13] ॥ शकुन हरिणपंक्तिमाजि[14]; या उजवि लसे[15]. ॥ १३ ॥
जालासे अज[16] नरसा[17] ॥ रक्षाया, स्वपद दावुनि, स्वजन रसा[18]. ॥
स्वनयनयुग[19] रुचिरतमीं[20] ॥ जडतां, मानीन सफळ त्या रुचिरतें[21] मी. ॥ १४ ॥
करिती महि, मानवतें[22] ॥ धरुनि, सुखी; दाविती स्वमहिमा नव[23] ते. ॥
पाहुनि भाउ[24], तरेन; ॥ त्यजुनि रथा, धरुं पदा शुभा[25], उतरेन. ॥ १५ ॥
सारसभव[26] हर[27] पाया ॥ ज्या चिंतिति त्या नमीन, भव[28] हरपाया[29]. ॥
कुंकुम मांथानींचें[30] ॥ ज्या, कर तो पाविजेल माथां नीचें[31]. ॥ १६ ॥
प्रणतांचा[32] दर[33] वारी, ॥ भूप्रद[34] बळि जांत सोडि सादर[35] वारि[36], ॥
भजकजनवनवसंत[37] ॥ प्रभुकर[38] वर[39] वरति नव नव संत! ॥ १७ ॥
जातों कंसाकडुन, ॥ स्वांतीं[40] वाटेन यदुवतंसा[41] कडुन; ॥
कीं क्षेत्रज्ञा[42] त्याला ॥ तत्व[43] कळे सर्व ईश्वरा[42] ज्ञात्याला. ॥ १८ ॥
मनिं आलिंगन मा[44] जें ॥ इच्छी, तें राहवील लिंग[45] न माजें. ॥
करिल पवित्र वपु[46]; निवे ॥ चकोरसंताप जो क्षुदुद्भव[47] पुनिवे[48]. ॥ १९ ॥

---

१ नद्या. २ पातक. ३ कृष्णाच्या चरणकमलास. ४ ब्रह्मदेव. ५ यादव. १२ उत्तम असा जो रजःकण. ७ चरणकमलें. ८ गोपि-उरोज-कुंकुम-मलिन, गोपींच्या स्तनावरील कुंकुमानें माखलेलीं. ९ शोभेतें. १० लक्ष्मीरूपी भ्रमरी. ११ कृष्णाचें मुखकमल. १२ सुंदर. १३ कृतकृत्य करील असे. १४ हरिणाच्या मालिकेंत. १५ ('पंक्ति') शोभे, धावे. १६ जन्म नाहीं ज्याला १७ मनुष्यासारिखा १८ पृथ्वी. १९ निजनेत्रद्वय. २० अत्यंत सुंदर असा जो कृष्ण त्याच्या ठायीं. २१ शोभेंत निमग्न. २२ मनुष्यपणास. २३ नूतन. २४ बळराम. २५ मंगळ. २६ कमलोद्भव (ब्रह्मा). २७ शिव. २८ संसार. २९ घालवाया. ३० लक्ष्मीच्या स्तनींचें. (एकपद संस्कृत व दुसरें प्राकृत, अशांच्या समासाचें हें एक उदाहरण आहे). ३१ म्यां. ३२ शरणागतांचा. ३३ भय. ३४ पृथ्वी दान करणारा. ३५ आदरानें. ३६ पाणी. ३७ भक्तजनरूपी वनांतील वसंतऋतु. ३८ कृष्णहस्त. ३९ श्रेष्ठ. ४० अंतःकरणीं. ४१ यादवांचा तुरा (कृष्ण). ४२ आत्म्याला (कृष्णास). ४३ तात्पर्य (माझ्यायेण्याचें इ०). ४४ लक्ष्मी ४५ दोष. ४६ शरीर. ४७ क्षुत्-उद्भव, भुकेची उत्पत्ति. ४८ पौर्णिमेस.

ज्यास विबुध[1] भजतात ॥ ब्रह्मादि प्रभु ह्मणेल तो मज "तात!" ॥
ईश्वरकृतसन्मान- ॥ प्राप्ति- फळ तदन्य- जंतुंच्या[2] जन्मा न. ॥ २० ॥
प्रिय, अप्रिय; हित, अहित; ॥ प्रभु या भावें करूनियां जरि रहित; ॥
सुरतरुसा[3] निजभजकां ॥ सत्फळ दे; विषम होय यास्तव मज कां? ॥ २१ ॥
राम भगवदग्रजनी[4] ॥ देइल आलिंगनें सुख, समग्र जनीं; ॥
सदनीं[5] मज धरुनि करीं ॥ नेइल, सत्कार करिल निजजननिकरीं[6]!" ॥ २२ ॥
ऐसें चिंतित[7] काया ॥ विसरे; नकळेचि मार्ग तो तितका[8] या; ॥
पावे अस्तास रवी[9]; ॥ व्रजाहि[10] हा[11]; मार्गदैर्घ्य[12] चिंता[13] सरवी. ॥ २३ ॥
तों पाहे, अवनितळीं[14] ॥ अमृताचीं भवदवार्तजगदवनिं[15] तळीं, ॥
कृष्णपदें ज्ञानिहितें,[16] ॥ ज्यांतील रजें[17] हराद्रिचूडानिहितें[18]? ॥ २४ ॥
ज्यांहींच धरित्रि[19] दिवा-[20] ॥ रात्रि विभूषित[21], मनांत न धरि त्रिदिवा[22]; ॥
ज्यां पविपद्मयवांचे[23] ॥ अंकें[24],न यन्नतजनाघसंचय[25] वांचे. ॥ २५ ॥
आठांही भावांचा ॥ अक्रूर निवास[26] सात्विकां भावांचा ॥
वंदुनि माथां, घोळी ॥ तीर्थपदरजांत तनु, करी आंघोळी. ॥ २६ ॥
रोवी साधू[27] लीला- ॥ नर[28]तीर्थपदाचिया असा धूलीला; ॥
फळले कृष्णवसंतें[29] ॥ मनिं लावियले मनोरथद्रुम[30] संतें[31]. ॥ २७ ॥
न श्रुत[32] मोहस्थांनीं[33] ॥ जे ते बळकृष्ण धेनुदोहस्थांनीं[34] ॥
देखियले भागवतें ॥ सहजें[35] नतें; अन्यथा न कां भागवतें[36]? ॥ २८ ॥

---

१ देव. २प्राण्याच्या (मनुष्याखेरीज इ०). ३कल्पवृक्षासारिखा. ४ भगवत्-अग्रजनी, कृष्णाचा वडीलबंधु. ५ घरांत. ६ आपल्या आप्तसमूहांत. ७ शरीर. ८ वर सांगितलेलें बोलत चालला तितका.९ सूर्य १० गोकुळास. ११अक्रूर (पावे). १२ रस्त्याची लांबी. १३ वर सांगितलेलें चिंतन, मनन. हा 'सरवी' याचा कर्ता. १४ जमिनीवर. १५संसाररूपी वणव्यानें दुःखित जनांच्या संरक्षणाविषयीं.१६ज्ञान्यांस हितकारक. १७कण. १८हर-आदि-चूडा-निहितें,सांबादिकांनीं अपल्या शिरावर धारण केलेलीं. १९ पृथ्वी. २० रात्रंदिवस. २१ सुशोभित. २२स्वर्गास. २३ वज्र, कमळ व यव ( आंगठ्याच्या खालच्या अंगानें असलेलें एक चिन्ह ) यांचे. २४ चिन्हें २५ ज्याच्या शरणागतांचा पापसमूह. २६ शरीर. २७ अक्रूर. २८ लीलेनें मनुष्य जहालेल्या कृष्णाच्या निर्मळ चरणाच्या. २९कृष्णरूपी वसंतऋतूनें. ३०मनोरथरूपी वृक्ष. ३१ अक्रुरानें. ३२ ऐकिलेले. ३३मोहांत पडलेल्यांनीं. ३४दूध काढण्याच्या ठिकाणीं. ३५बंधू. ३६ त्यांस पाहून श्रमरहित जहाला; त्यांस जर न पाहता,तर तो तसाच श्रमलेला राहिला नसता काय? इ०.

श्रीमृगमद[1]कापुर ते ॥ निवविति गुण[2]परिमळें स्वभजका पुरते; ॥
नित्यनव[3]श्रीनिलयें, ॥ सद[4]लिहितें, दिव्य पुंडरीककु[5]वलयें. ॥ २९ ॥
श्वेत[6]श्यामल लीला ॥ [7]निधि, जे दिसती न दृष्टिला मळलीला, ॥
यमुना[8]सुरसरिदोघ ॥ व्रजा [9]प्रयागासि आणिती [10]सरि दोघे[11]. ॥ ३० ॥
वर्णे [12]सरसा रूप्या ॥ पाचूच्या धरिति [13]धरणिधर [14]सारूप्या; ॥.
असितां[15] पीतां[16] चेलां[17] ॥ ल्याले; सौंदर्य न वदवे वाचेला. ॥ ३१ ॥
भय ज्याचें रिपु[18]कटकीं ॥ [19]प्रलंब भुजदंड पीन[20] शोभति कटकीं[21]; ॥
असुरांचें उर गाजे ॥ यत्स्मरणें[22], वर्ण्य[23] करिकरां[24] उरगां[25] जे. ॥ ३२ ॥
लोकत्रय[26]नेत्यांचीं, ॥ श्रीकेलि[27]गृहेंचि वदननयनें, त्यांचीं; ॥
त्याचि कृपाकासारीं[28] ॥ जनिं अमृतें भजकचंचरीकां[29] सारीं[30]. ॥ ३३ ॥
अवलोकन- गेह[31] ;वसे ॥ तेथ कृपा; पुरवितां न भागे हवसे; ॥
विश्वघटाचें निवणें[32] ॥ प्रेक्षण तें; सहज जेथ तप्तें[33] [34]निवणें. ॥ ३४ ॥
श्रीम[35]द्वदनेंदु, सरें[36] ॥ स्मितामृताचीं[37]; तुळे[38] नवचनें दुसरें; ॥
[39]सन्मानसयादां तीं ॥ पोषिति सितपद्मखगसमुदया[40] दांतीं ॥ ३५ ॥
सुमतुळसीहार[41] गळां ॥ चित्तभ्रमरी विमोहिती बारगळां[42]; ॥
सेवुनि त्या सुपरिमळा[43], ॥ देवांचा इच्छिती न त्या उपरि मळा[44] ! ॥ ३६ ॥
मृगमदस[45]त्तिलकांहीं ॥ उरविला न मद[46] शशिमनां[47]तिल कांहीं; ॥

---

१ बळकृष्णरूपी कस्तुरी व कापुर. २ आपल्या गुणरूपी सुवासानें. ३ नित्य नूतन अशा कांतिचीं स्थानें. ४ सत्-अलि-हितें=साधुरूपी भ्रमरांस हितकारक. ५ शुभ्र, व श्याम कमलें; ( अनुक्रमें. बलराम व कृष्ण ) ६ शुभ्र व काळे. ७ लीलेचे समुद्र. ८ यमुना-सरसरित्-ओघ, यमुना व भागीरथि यांचे ओघच ( कृष्ण बळराम ). ९ गोकुळास व प्रयागास. १० बरोबरी. ११ दोघे. १२ सुंदर १३ बळकृष्ण. १४ वर्णसाम्यतेस. १५ काळ्या. १६ पिवळ्या. १७ वस्त्रास १८ शत्रुसैन्यांत १९ लांब. २० पुष्ट. २१ कडघ्यांनीं. २२ ज्या बाहूंच्या स्मरणानें. २३ वर्णायास योग्य. २४ हत्तीच्या सोंडीस. २५ सर्पांस. २६ लोकत्रय-नेता, त्रैलोक्याच्या प्रभूंचीं. २७ शोभा, लक्ष्मी, यांच्या क्रीडेचीं स्थानें. २८ कृपेच्या तळ्यांत. २९ भक्तरूपी भ्रमरांस. ३० सर्व. ३१ घर. ३२ घट ठेवण्याकरितां गवताचें वेटाळें. ३३ तापलेल्यानें. ३४ शांत व्हावें. ३५ त्यांचीं वदनें हेच कोणी चंद्र. ३६ तळीं. ३७ हास्यरूपी अमृताचीं. ३८ तुळणेला. ३९ सत्-मानस-यादा, साधूंचीं मनें हींच जलचरें, त्यांस. ४० शुभ्रकमलांवरील भ्रमरसमूहास ४१ फुलें व तुळसी यांचा हार. ४२ उनाड फिरणाऱ्या. ४३ सुवासास. ४४ इंद्रभुवनींचें नंदनवन. ४५ कस्तुरीच्या सुंदर तिलकांनीं. ४६ गर्व. ४७ चंद्राच्या मनांतील.

स्तविजे चंद्र ? न काय ॥ स्वांगें जो निववि नंद[1]नंदन काय[2]? ॥ ३७ ॥
हरि पापदरा[3], जिवीं[4] ॥ ध्यातां यद्रज[5], अशा सुपदराजीवीं[6] ॥
ध्यावे निशिदिनि[7] शांतें[8] ॥ ध्वजवज्राद्यंक[9] शंकरादि-निशांतें[10]. ॥ ३८ ॥
शुभ वासरिं दोघांतें ॥ प्रेक्षुनियां[11] त्या दयैकसरिदोघांतें[12], ॥
उतरे यानावरुनी[13], ॥ वस्त्रादि स्रस्त[14] जें तया नावरुनी[15]. ॥ ३९ ॥
पद सुखनिधिकल्लोळ[16]; ॥ प्रेमसखा[17] सूचवी तया कीं लोळ[18] ॥
हा[19] स्नानीं, पानिं; वरा ॥ उपदेश क्षय पळांत तापा निवरा[20] ! ॥ ४० ॥
दे परिरंभण[21] गा तें ॥ जें दुर्लभ इंदिरेस[22] त्या भणगातें[23]; ॥
जाला आपण साचा ॥ रोमांचित[24] सुरगुरु[25] सखा पणसाचा[26]. ॥ ४१ ॥
त्या सरूपा, दासाचें आलिंगन सुखद, तीर्थपादा[27] साचें ! ॥
दाटून गळा, याचे ॥ नेत्रांतुनि अश्रुबिंदु न गळायाचे ? ४२ ॥
राम तया धरि वत्सीं[28], ॥ चिरदृष्टी[29] धेनु[30] जसि दयाकरि वत्सीं. ॥
मिळला दीन उरा या ॥ प्रभुच्या, वर्षोपळचि[31] र्‍हदीं[32] न उराया[33]. ॥ ४३ ॥
तो दास खरा मानें ॥ तोषविला वडिल दीनसख[34] रामानें; ॥
भक्त सुखाकर[35] केला, भेद नसे सर्वतोमुखा[36] करकेला[37] ! ॥ ४४ ॥
दाखविती तोक[38] रिती, ॥ पूजुनि गुरुसा[39] कृतार्थ[40] बहु तो करिती. ॥
प्रेमा सज्जनिं[41] त्यांनीं ॥ आत्मगत[42] प्रगटिला जगज्जनित्यांनीं[43]. ॥ ४५ ॥
गेह[44] सदा नंदाचें ॥ वैकुंठ; स्थान तें सदानंदाचें[45]. ॥

---

१ कृष्ण. २ देह. ३ पापभयास. ४ मर्त्यांनीं. ५ ज्याचा रजःकण. ६ सुंदर चरणकमलीं. ७ रात्रंदिवस. ८ सुखानें, आनंदानें. ९ ध्वज, वज्र आदिकरून चिन्हें. १० भुवनानें. ११ पाहुनियां. १२ दया-एक-सरित् ओघ, दयारूपी महानदीच्या ओघांतें. १३ वहाना-वरून. १४ विगलित. १५ न-आवरून. १६ सुखाच्या समुद्राची लहरी. १७ प्रेमरूपी मित्र. १८ उतावीळ. १९ अक्रूर. २० कठिणा ( तापास ). २१ आलिंगन. २२ लक्ष्मीस. २३ भिकाऱ्यास ( अक्रूरास ). २४ रोमांचांनीं भरलेला. २५ देवश्रेष्ठ. २६ ( अंगावर कांटा उठला ह्मणून.) २७ कृष्णास. २८ ह्रदयीं. २९ पुष्कळवेळांनीं पाहिलेल्या ३० गाई. ३१ गार. ३२ डोहांत ३३ डोहीं गार पडली तर जशी वितुळते तसा हा प्रभू ह्रदयीं चिकटला आणि एकरूप जहाला ३४ अनाथमित्र. ३५ सुख-आकर, सुखाची खाण. ३६ सर्वतस्-मुख, सर्व बाजूंनीं मुखें आहेत ज्यास= ईश्वर. ३७ मारेला. ३८ मुलांची रीति ( " रीति " असा हा शब्द आहे; पंतांनीं येथें 'रिती' असें लिहिलें आहे.) ३९ बापासारिखा. ४० तृप्त. ४१ अक्रूरीं. ४२ आपल्या अंगाचा. ४३ जगाच्या उत्पन्नकर्त्यांनीं. ४४ घर. ४५ सत्-आनंद, साधूंचा आनंदरूपी जो कृष्ण त्याचें.

स्थैर्य [1]अदभ्र मनासी; ॥ भगवद्[2]भागवतसंगम भ्रम नाशी. ॥ ४६ ॥
वि[3]श्रम हा नंदानें ॥ जेवविला भागवत म[4]हानंदानें. ॥
पुसिलें स्वसु[5]हृद्वृत्त ॥ स्वांतीं[6] नाणून कंसकृत उद्[7]वृत्त. ॥ ४७ ॥
" मृति[8]दायक सापाची ॥ छाया भे[9]कां [10]अंवीसहि कसापाची; ॥
ज्या कंस विभू[11] तगणें ॥ कैसें त्या वृष्णिभोजसंभू[12]तगणें ? ॥ ४८ ॥
कोणनृपा पातेजे[13] ॥ जो वधि भगिनि[14]प्रजा अ[15]पापा ते जे? ॥
निद्रालाभ [16]व्यसुचे ॥ या डोळे न वारितां मला भव्य सुचे." ॥ ४९ ॥
नंदाची असि कानें ॥ सेवुनियां सत्य[17]वाक्सुधा रसि[18]कानें, ॥
त्यजिला दान[19]पतीनें ॥ श्रम; वश ज्याला जगन्नि[20]दान [21]पतीनं ॥ ५० ॥
॥ ॥ ॥ इतिश्रीमत्कृष्णविजयेअष्टात्रिंशः ॥ ३८ ॥ ॥

कंसें जो धावडिला, ॥ प्रेमें [22]हे त्या विशु[23]द्धबोधा वाडिला ॥
[24]पर्यंकीं निजवीती; ॥ ज्यांचे, भे[25]वनें अनेक, पद निज, वीती! ॥ १ ॥
कृष्ण ह्मणे, "हो तात! ॥ स्वजनक-ज[26]ननीस कष्ट वहु होतात; ॥
देतो नृ[27]प जो नीच ॥ श्रम, ते मीच स्वयेंच उपजोनीच. ॥ २ ॥
[28]उद्भव हाहा! काय? ॥ स्वा[29]प्तां श्रम देतसे महा हा का[30]यं! ॥
अ[31]शुभाचा हा नि[32]करें ॥ स्वजनां; सर्वांस नुपजती! हानि[33]कर. ॥ ३ ॥
न म[34]नीं अध मामातें, ॥ स्पर्शो वंधु[35]घ्नभाव अधमा मातें. ॥
यदुकुळ[36]गदनृपजागा ॥ मद[37]पथ्यें; दोष माजिया उ[38]पजा गा. ॥ ४ ॥

---

१ मोठें ( हें ' स्थैर्य ' याचें विशेषण ). २ कृष्णाचा व अक्रूराचा संयोग. ३ श्रमरहित जहालेला, किंवा श्रमरहित होई अशा रीतीनें. ४ मोठ्या आनंदानें. ५ स्व-सुहृत्-वृत्त, आपल्या आप्तांचें वर्तमान. ६ अंतःकरणांत ७ मसलत, कृत्रीम. ८ मारक. ९ बेडकास. १० मेल्यास. ११ राजा. १२ वृष्णि, आणि भोज यांपासून जहालेल्या लोकसमूहानें. 13 विश्वासिजे. १४ बहिणीची संतति. १५निष्पाप. १६ वि-असु, प्राणरहित. १७ सत्य भाषणरूपी अमृत. १८ हें ' कानें ' याचें विशेषण. १९ अक्रुरानें. २० जगत्-निदान, जगाचा उत्पन्न करिता. २१ मानानें, अब्रूनें. २२ बळकृष्ण. २३ अत्यंत शुद्ध आहे बोध ज्याचा त्यास. २४ पलंगावर. २५ जगें. ('वीती' या क्रियापदाचें कर्म.) २६ आमच्या आईबापांस. २७ कंस. २८ जन्म. २९ स्व-आप्तां. ३० शरीर. ३१ अकल्याणाचा. ३२ समूह. ३३ हानि करणारीं मुलें. ३४मान, समज. ३५ बंधुघ्नता. (आपले बंधु कंसानें मारिले त्याचा दोषी मीच इ०) ३६ यादवांच्या कुळाचा रोगच असा जो कंस तो. ३७ मी हेंच कोणी एक अपथ्य, तेणेंकरून. ३८ जन्मा.

मति वधकामा[1] म्याचि ॥ स्वप्रभवें[2] केलि घातका मांम्याची[3]; ॥
येतों ना उदराशी, ॥ गुरु[4] खेदाचा न देखते उदराशि[5]. ॥ ५ ॥
तव दर्शन, बा ! पांचा ॥ प्राणां सुख; लाभ हा जननिवापांचा; ॥
नामाचि भेद जिभे दे; ॥ तुमचें आत्मैक्य तें कसें अजि ! भेदे? ॥ ६ ॥
ताता ! सांग मनाचें ॥ इच्छित, कारण मला तवागमनाचें[6]; ॥
ऐकावा तो कानीं ॥ सारा वृत्तांत तेथिला लोकांनीं." ॥ ७ ॥
धृतवारिरुडर्यंकीं[7] ॥ स्वकरीं चुरितां स्वभक्तपद[8] पर्यंकीं[9], ॥
पुसिलें कोमलं[10] तातें ॥ विधिच्या[11]; फळ भक्ति दे, न सोमलतो[12], तें. ॥ ८ ॥
ते सुभग[13], "वदा" ज्ञाते ॥ बंधु[14] ह्मणति; तो करी भगवदाज्ञा[15] ते. ॥
सांगे सहस्त्रशीर्षा ॥ पुरुषा[16] स्वागमनहेतु[17] कंसचिकीर्षा.[18] ॥ ९ ॥
ऐकुनि, महानुभावां[19] ॥ हांसें ये फार रामकृष्णां भावां. ॥
कीं तो पामर[20] दीन ॥ स्वबळेंचि ह्मणे, 'त्रिलोकपा[21] मर्दीन[22]'! ॥ १० ॥
मग भोजवतंसाची[23], ॥ आज्ञा नंदासि कथिति हे, कंसाची; ॥
कीं "अक्रूर बहाया[24] ॥ आला, मथुरेंत चापयाग[25] पहाया." ॥ ११ ॥
"घेउनि गोरस जावें, ॥ करितो नृप चाप याग थोर; सजावें; ॥
अक्रूर बहायाला ॥ आला; जाऊं समस्तहि पहायाला. ॥ १२ ॥
[26]व्रजरक्षाधिकृतातें ॥ केली आज्ञा असीच माधवतातें[27] ॥
तो घोष[28] करि असा, "रे! ॥ मथुरे जायासि सर्व सिद्ध असा रे." ॥ १३ ॥
परिसुनि हा हाकारा[29], ॥ व्रज जाला गोपिकांसि हाहा ! कारा[30]. ॥

---

१ वधातें इच्छिणारी. २ माझ्या उत्पत्तीनें. ३ मामाची. 'माम्या,' 'काक्या,' 'दाद्या,' 'बाब्या' अशीं सामान्यरूपें क्वचित् करितात; अथवा नाहीं ह्मटलें तरी चालेल. ४ आईबापें. ५ समुद्र. ६ तव-आगमनाचें, तुझ्या येण्याचें. ७ धृत वारिरुट्-आरि अंक, धरिलीं आहेत कमळ, चक्र, हीं चिन्हें ज्यांनीं अशा ( स्वकरीं ). ८ अक्रुराचे चरण. ९ पलंगीं. १० मंजु स्वरानें. ११ ब्रह्मदेवाच्या. १२ चंद्रवल्लि. ( कल्पवृक्षाच्या सारिखे गुण असतात जींत अशी एक.) १३ भाग्यवान्. १४ बळकृष्ण. १५ भगवत्-आज्ञा, ईश्वराची आज्ञा; हें पद "करी" या क्रियापदाचें कर्म आहे. आज्ञा करी= आज्ञा मानी. १६ कृष्णास. १७ आपल्या येण्याचें कारण. १८ कंसाची इच्छा. १९ महान् आहे अधिकार ज्यांचा. २० मूर्ख, ( कंस ). २१ त्रैलोक्यपाळांस. २२ मर्दीन. २३ भोजकुळाचा किरिट ( कंस ). २४ बोलवाया. २५ धनुर्याग २६ व्रज-रक्षा-अधिकृत= गोकुळ राखण्याचा अधिकारी. २७ नंदानें. २८ प्रसिद्धि. २९. दवंडी. ३० बंदिखाना.

हा वृत्तांत हरि वळा, ॥ 'आला अक्रूर न्यावयासि हरिबळा[1].' ॥ १४ ॥
गोष्टि नव्या परिसे जे ॥ ते स्त्री गणि तापल्या तव्यापरि सेजे. ॥
होय तनू निज लाहे[2]; ॥ मूर्छे वांचूनि कोणती निज लाहे[3] ? ॥ १५ ॥
तो दुःसह रायाचा ॥ न, यमाचा दूत जीवन[4] हरायाचा. ॥
स्त्रीमनिं बहु धाक सिरे;॥ ह्मणति, विधे[5]! लिहिलि हानि बहुधा[6] कसि रे?"॥१६॥
" धरि नामा दुसरी, ती ॥ लोपुनि[7] अक्रूर कपटर्मा[8]दुसरीति; ॥
अथवा जन न क्रूर ॥ त्रिजगांत दुजा ह्मणोनि हा अक्रूर[9] ! " ॥ १७ ॥
" चोर, न साव; धरा हा, ॥ निश्चय निजधन हरील, सावध राहा; ॥
कीं अरुप दरवडा[10] जी ! ॥ घालुनि, मनिं सर्वताप[11]पदरव डाजी." ॥ १८ ॥
" गळती कुंतळे[12] पटे[13] हो; ॥ अक्रूरा स्त्री ह्मणति, " तुजें तळपट[14] हो; ॥
हरिसी कामसणा[15] स- ॥ द्रेष्ट्या[16] ! गेलासि तूं न कां मसणास ? " ॥ १९ ॥
" मनिं कोपहि लेकांहीं ॥ नंदाच्या धरियला, न पहिलें कांहीं ॥
सख्य स्मरति; न वसती ॥ आह्मांहुनि सुंदरी [17]पुरींत नव सती? ॥ २० ॥
हे दोघे भाउ दया ॥ करितिल; यांची मुखेंदु[18]शोभा उदया ॥
मनिं आणिल रतिपां[19]; तीं ॥ त्या स्त्रींचीं कां लवीं न विसरति पातीं? ॥ २१ ॥
स्फुरतां भुज वामाक्षि[20], ॥ प्रमुदित[21] असतील सर्व पुरवामाक्षी[22]! ॥
समयीं गोदोहांचे[23] ॥ स्वप्नहि[24] सूचक सुलभ-[25]संदोहाचे! ॥ २२ ॥
भाग्यें लक्ष्मीसम या ॥ स्वोभयकुळ[26]मंदिरींचिया मणि-समया[27], ॥
ज्या हरिमुख पाहतिल ॥ [28]स्तंभें चित्राकृती तशा राहतिल. ॥ २३ ॥
ज्याचे सुविलास गळा ॥ धरितिल, हरि मोहतील महिला[29] सगळा ॥
त्याग कसा करवेल ॥ स्त्रींचा यां[30] ? सोडि न तरुचा कर वेल. ॥२४॥

---

१ कृष्ण व बळराम यांस. २ लाही. ३ पावे. ४ जीव. ५ हे ब्रह्मदेवा! ६ बहुत प्रकारांनीं ७ लपवून. ८ कपटाच्या पेटीची साम्यता. ९ नास्ति क्रूरतरो यस्मात्= ज्याहून दुसरा एखादा अधिक क्रूर नाहीं. या सर्व 'अक्रूर' या नामाच्या अर्थाविषयीं उत्प्रेक्षा किंवा कल्पना होत. १० घाला. ११ सर्वांस ताप देणारा शब्द. १२ केश. १३ वस्त्र. १४ होवो. १५ इच्छा पुरविणाऱ्यास. १६ हे दुर्जना! १७ मथुरेंत. १८ मुखरूपी चंद्राची कांति. १९ कामास. २० डावा डोळा. २१ आनंदित. २२ मथुरेंतील स्त्रिया. २३ धार काढण्याच्या. २४ ( हा शब्द पुल्लिंगी आहे ). २५ उत्तम लाभांचा समूह. ( या पदाचा संबंध " स्वप्न" याकडे. ) २६ स्वउभय-कुळ-मंदिरींचिया. २७ रत्नखचित समया. २८ गतसंज्ञतेनें= देहभान जाऊन. २९ स्त्रिया. ३० कृष्णास.

हा जन[1] रानट; काय! ॥ स्त्री त्या चतुरा हरी बरा नटकाय[2]. ॥
मिळतां नयनां नयन, ॥ व्रजपत्यनधीन[3] पुत्रनयनानयन[4]. ॥ २५ ॥
अस्मत्प्रेमा[5] अळणी, ॥ कीं आह्मीं वनचरी[6] प्रसिद्ध गवळणी; ॥
प्रेमा त्यांचा[7] लवणें[8] ॥ युक्तचि, लागेल माधवा चालवणें. ॥ २६ ॥
प्रिय न वदावे, दार[9] - ॥ प्राणहर, प्रकट अदय, दावेदार[10]; ॥
हे[11] सजती[12] तडक, रिती[13] ॥ दाखविति नवीच; गोप तांतड करिती. ॥ २७ ॥
अंध-निजस्छविर-हित, ॥ दोष असाहा; जन व्रजस्छ विरहित ॥
न जगेचि असें; तरुणी ॥ न देखिजे डोळसीं खळीं निष्करुणीं? ॥ २८ ॥
वेष प्रिय सावांचे[14]; ॥ रिपु चोरचि हे; वधूजनें[15] कसा वांचे? ॥
मानाचि कापलि; केला ॥ घात खरा, दाखवूनि आपलिकेला[16]. ॥ २९ ॥
राक्षस, मानव, धव[17] ते ॥ नव्हति; इतरथा[18] स्वदार[19] यां न वधवते. ॥
कीं कंसपुरा रिपु[20]से ॥ प्राणधना नेति, कांहिं न मुरारि[21] पुसे! ॥ ३० ॥
अक्रूरासह साची ॥ जायाची सिद्धता कसी सहसाचि ॥
केली? आह्मां तारा! ॥ न निघे हा; नंद विचळला ह्मातारा. ॥ ३१ ॥
न ह्मणे बाायिल[22] याला ॥ कीं, 'ठेवा रामकृष्ण' बाइ! 'लयाला ॥
व्रज जातो हा;' नीति ॥ त्यजिलि; यशोदेसि लाभ जी हानी ती. ॥ ३२ ॥
जरि त्वदया त्रासाची[23] ॥ झळ[24] झोंबति, राहतीच यात्रा साची. ॥
हें निघणें तों, डास ॥ व्याळ[25] न घे; विघ्न दाविना तोंडास[26]! ॥ ३४ ॥
मेघेसखी[27] देवी जे ॥ ती पडती, परि न मति विधी[28] दे वीजे; ॥
जरि एखादा मरता, ॥ तरि ह्मणता नंद 'विघ्न[29] जाला, परता.' ॥ ३३ ॥
जाउं न द्यावा हा, या ॥ पथिं लावूं अश्रुच्या नद्या वाहाया; ॥

---

१आह्मी. २ नटशरीरी. ३ व्रजपति-न-अधीन, नंदाच्या हातीं नाहीं. ४ पुत्र- नयन-आ-नयन, पुत्रांस नेणें व आणणें. ५ आमची प्रीति. ६ वनांतफिरणाऱ्या, राहणाऱ्या. ७ मथुरें-तील स्त्रियांचा. ८ मिठानें. ९ स्त्रियांचे प्राण हरण करणारे. १० द्वेषी. ११ रामकृष्ण. १२ तयार होती. १३ संस्कृतांत हा शब्द रीति, असा आहे. १४ प्रमाणिकांचे. १५ स्त्रीजन. १६ मैत्रीला. १७ पति. १८ नाहीं तर. १९ स्वस्त्रिया. (हा शब्द पुल्लिंगी आहे). २० शत्रूंसा-रिखे. २१ कृष्ण. २२ यशोदा २३ भयाची. २४ ज्वाला. २५ सर्प- २६ हे निघून जाण्यापू-र्वींच आह्मांस सर्पदंश होऊन आह्मी कां मरत नाहीं; अथवा दुसरें एकादें विघ्न येऊन या जा-णारांस अपशकुन कां होत नाहीं? इ० २७ वीज. २८ दैव. २९ हा शब्द पुल्लिंगी आहे.

दृढ कास धरूं धिराची; ॥ घालुं वरी आण हरिस गॅल[1]-रुधिराची. ॥ ३५ ॥
भय न धरा लेश; पथीं ॥ वारूं; हरिपाय काय चाले शपथीं.? ॥
माथा पाय नमुं, रडों; ॥ मग तरिहि म्हणेल कृष्ण काय न 'मुरडों'[2]? ॥ ३६ ॥
गुरुपितृपतिसुतऱ्हीतें[3] ॥ भूषण म्हणती कुलस्त्रियांस, तऱ्ही, तें ॥
दूषण; कीं अंत रति- ॥ [4]पदपद- विरहें; ईणें सुखें अंतरती. ॥ ३७ ॥
हरि गेल्यावरि, साचें ॥ होइल भावंड वडिल पळ वरिसाचें[5]. ॥
सरल्या जरि तेल टिके ॥ दीपार्चीं[6], ह्मणति बोल[7] तरि ते लटिके. ॥ ३८ ॥
व्रज विषपाथोराशी[8] ॥ होइल; विधु[9] करिल आंतपां[10] थोराशी; ॥
तापजनक[11] वणवा गे ॥ मारुत[12], जीवंत मग जन कवण वागे? ॥ ३९ ॥
मागावें सखि! तपतां[13], ॥ 'देवा! देऊं नको मृतीस[14], खितपतां[15]; ' ॥
भाविल[16] विरहानल[17] गे ॥ क्षणक्षणीं मृत्यु; ज्या उशिर हा नलगे. ॥ ४० ॥
सुखकर परि हा रास[18], ॥ स्मरतां, भाजील देह; परिहारास[19] ॥
नेणें; त्या गेहिं वसा, ॥ जो करिल हरीविणें कसा गे हिंवसा[20]? " ॥ ४१ ॥
ऐसी चिंता ज्या त्या ॥ स्त्री जागोजाग करिति भीरु जात्या[21]; ॥
अश्रुजळें जंबाला[22] ॥ करिति, पहाती व्रजीं न अवलंबाला[23]. ॥ ४२ ॥
वदनीं हारावा[24] हे ॥ स्त्रीसंहति[25], तदुर[26] अश्रुहारा[27], वाहे; ॥
प्रियविरह नको; मळकीं ॥ जालीं वहु आननें[28] मनें कोमळ कीं. ॥ ४३ ॥
" साधुनिया कां बुकेसी[29] ॥ स्त्रीवृंदें? रडवितोसि उकसाबुकसी? ॥
अक्रूरा! हाहा! रे, ॥ तूजपुढें[30] अंतकहि खरा हा हारे. ॥ ४४ ॥
तुजि सुखधामा[31]! नवली[32] ॥ कसि फिरलि, जिला जगत्रयी मानवली? ॥
जालें खर[33] मृदु धातें[34] ॥ मन जेणें त्या विषत्व जेंवि दुधातें. " ॥ ४५ ॥

---

१ गळ्याच्या रक्ताची. २ परतून जाउया. ३ लज्जेस. ४ कृष्णचरणविरहें. 'इणें'=या लज्जेनें. ५ वर्षाचें. (वर्षाहून पळ लांब दिसेल). ६ दीपतेज. ७ 'तेलावांचून दिपार्चि न टिके' हे शब्द. ८ विषसमुद्र. ९ चंद्र. १० तापास. ११ ताप उत्पन्न करणारा. १२ वायु. १३ ताप प्राप्त जहाला असतां. १४ मरणास. १५ दुःखानें झुरत असतांहि. १६ वाटेल; मानला जाईल; सिद्ध होईल. १७ विरहरूपी अग्नि. १८ रासक्रीडा. १९ निवारण २० हिंवा (=वर्फा) सारिखा- २१ स्वभावत: २२ चिखलास. २३ स्थानास, आधारास. २४ हा-आरावा='हा !' या दुःखदर्शक शब्दास. २५ स्त्री-समूह. २६ तत्-उर २७ अश्रूंचा हार. २८ तोंडें २९ मारिसी ३० यमहि. ३१ सुखाचें स्थान. ३२ स्वभाव ( पालटला. ) ३३ तीक्ष्ण. ३४ तृप्त होतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय

विरह जळा यादासी[1] ॥ हा; तापें लागल्या जळाया दासी; ॥
जें नाहीं तेज चितें[2] ॥ तें दावी शीतमृदु[3]हि जी सेजा[4]चि ते. ॥ ४६ ॥
ओष्ठांतें वाळविती ॥ श्वासें; हरिला परोपरी आळविती;- ॥
करिती रोदन[5] दीना, ॥ कीं पी अक्रूरघटज[6] मोदनदीना[7]. ॥ ४७ ॥
तापसमुदयास[8] विता[9] ॥ पावे अक्रूरमित्र उदया सविता[10], ॥
भंगुनि आशे, वधिला ॥ स्त्रीजन; कीं हरि तदेकसुखशेवधि[11]लो. ॥ ४८ ॥
प्राणचि हरि रामांचे[12] ॥ देह द्विविधौघमूर्त[13] हरिरामाचे[14]; ॥
धरि मथुरापंथ[15] हा कीं ॥ श्वफल्कसुतसूत[16]; विभु[17] ह्मणे, “ रथ हाकीं. ” ॥ ४९ ॥
रथीं वाहुनि चालविलें ॥ मूर्तव्रजभाग्य[18] तें, जया पालविलें[19] ॥
मथुरा[20]श्रीनें पदरें, ॥ अक्रूरें निर्मळें विगततापदरें[21]. ॥ ५० ॥
पाहुनि नाथरथरया[22], ॥ कांपति विरहें व्रजांगना[23] थरथर या. ॥
आत्मा यांचा हरि तो, ॥ त्यातें कीं कंसदूत[24] देखत हरितो. ॥ ५१ ॥
“ जाउनि तो रथ परतो ” ॥ स्त्रीमनिं हें; कर[25] न दे मनोरथ परें[26] तो; ॥
भ्रमती चिंतावर्ता[27]- ॥ माजि, ह्मणे न हरि ‘ न भय, चिंता; व र्ता[28]. ॥ ५२ ॥
मागेंमागें दीना ॥ चालति; कीं आगमावधि[29] निवेदीना[30] . ॥
श्रमहि दिला हो पीनीं[31] ॥ वक्षोजीं[32], परि न मानिला गोपींनीं. ॥ ५३ ॥
करुणाब्धि[33] परिवृढ[34] वळे, ॥ कीं गोपीप्रेममंदरें[35] मनिं ढवळे. ॥
रंजवि मानस यांचें, ॥ सादर पाहोनि सबहुमान सख्यांचें[36]. ॥ ५४ ॥
दूतमुखें सामातें[37] ॥ करि, “ येइन; कीं प्रिया बहु असा मातें; ॥
प्रेम धरा, गे! जावें ॥ सदनातें; मजवरी न रागें जावें. ” ॥ ५५ ॥

---

१ जलचरास. २ स्मशानभुमीतें. ३ थंड व मृदु. ४ बिछाना इ० ५ रडणें. ६ अक्रूर-रूपी अगस्ति. ७ मोद-नदीन, आनंदसागरास (कृष्णास.) ८ अनेक तापांस. ९ उत्पन्न कर्ता. १० सूर्य. ११ तत्-एक-सुख-शेवधि, त्यांचा (गोपींचा) सुखनिधि (=कृष्ण ). १२ स्त्रियांचें. १३ द्वि-विध-ओघ, दोन मूर्तिमंत देह. १४ कृष्ण व बळराम यांचे. १५ मथुरेचा मार्ग. १६ अक्रूर हा सारथी. १७ प्रभु. १८ गोकुळाचें मूर्तिमान् भाग्य. १९ खुणेनें बोलाविलें. २० मथुरारूपी लक्ष्मीनें. २१ गेला आहे ताप व भय ज्यापासून. २२ नाथ-रथ-रय, कृष्णरथाच्या वेगास. २३ गोपि. २४ अक्रूर. २५ हस्त. मनोरथ हात देतो=पूर्ण होतो. २६ परंतु. २७ चिंता आवर्त=चिंतारूपी चक्रांत. २८ रहा ( स्वस्थ. ) २९ येण्याची मर्यादा. ३० सांगेना. ३१ स्थूल. ३२ स्तनीं. ३३ करुणासमुद्र. ३४ प्रभु. ३५ गोपिप्रेमरूपी मंदराचलानें. ३६ सख्यांचें. ३७ शांति, समजूत.

सांत्वुनि गेल्यावरि, त्या ॥ स्त्री धैर्यस्थैर्यलेश[1] जाल्या वरित्या. ॥
तनु ठाकलि, यान[2]; मनें ॥ हळु चालाया रथा करिति या नमनें. ॥ ५६ ॥
प्रार्थिति रथकेतूतें[3] ॥ "विलोकितां दूर दृष्टि न थके तूतें; ॥
दिसतां दूर नादि, सरे ॥ तृष्णेचा क्षोभ; धीर धरु मन, दिस रे!" ॥ ५७ ॥
गोपजनवधू[4] लीला- ॥ नरतनुहरिरथसमुत्थनवधूलीला[5] ॥
पीति; मन रमे; घाली ॥ त्या चातक- ताति- मुखांत[6] ते मेघाली[7]. ॥ ५८ ॥
हरिरथपादरजातें[8] ॥ पाहत होत्या दुरूनि सादर ज्यांतें, ॥
तींहीं त्यांसि न दिसतीं; ॥ मग दुस्तर देखती स्वदुःखनादि सती. ॥ ५९ ॥
व्यग्र न हो स्वाधीनें[9] ॥ गोपीजन, ह्मणुनि करुनि तत्स्वाधीनें[10] ॥
निज चरितें, हरि मथुरा- ॥ पथ धरि; तद्रुचि[11] वधूत्हृदय हरि मधुरा[12]. ॥ ६० ॥
लभ्य अनंत तपानें ॥ जें[16] कृष्णयशोमृतैकसंततपानें[13], ॥
प्रियाविरहाग्नींत[14], गणें[15] ॥ गोपींच्या, दोखिलेंचि कांहीं तगणें[16]. ॥ ६१ ॥
मग जगदीश क्रमुनी ॥ पथ, अक्रूरास मज्जनीं[17], शक्र मुनी ॥
ज्या नत[18] लाख, विभु वनीं[19] ॥ यमुनेच्या वें स्वरूप दाखवि भुवनीं[20]. ॥ ६२ ॥
'होइल हानि खळा[21], या ॥ बाळापासूनि केविं?' हा निखळाया ॥
शंकाशंकु[22] अशेष[23], ॥ प्रकटी स्वाकार[24] ज्यास मंचक शेष. ॥ ६३ ॥
त्रिभुवनभासक[25] लेश ॥ स्वजनमनीं धाक नुरवि[26] हा सकलेश[27]; ॥
दावि पद समस्त वनीं, ॥ ज्याच्या ब्रह्मादि निरत[28] परम स्तवनीं. ॥ ६४ ॥

इति श्रीमत्कृष्णविजये एकोनचत्वारिंशोऽध्यायः ॥ ३९ ॥

तो अघमर्षणसमयीं[29] ॥ अक्रूर बुडे ह्रदीं[30] निजानंदमयीं[31]. ॥

---

१ धीर व स्थीरता यांचा फार थोडा अंश. २ गमन. ३ रथाच्या ध्वजातें. ४ गोपस्त्रिया. ५ लीला-नर-तनु-हरि-रथ समुत्थ-नव-धूलीला, लीलेनें मानव जहालेला जो हरि, त्याच्या रथ खालून उठणारी जी नवी धूळ, तिजला. ६ चातकसमुहाच्या तोंडांत. ७ मेघपंक्ति. ८ कृष्ण-रथाच्या चक्राखालून निघणारे रजःकण. ९ स्व-आधीनें, आपण हाच कोणी एक आधि (मानसीक दुःख). १० त्यांच्या (गोपींच्या) स्वाधीन. ११ तत्-रुचि, कृष्णवैभव. १२ 'तद्रुचि' याचें विशेषण. १३ कृष्ण-यशस्-अमृत-एक-संतत-पानें, कृष्णाचें यश हेंच कोणी एक अमृत, त्याच्या श्रेष्ठ व नित्य पिण्यानें. १४ कृष्णविरहरूपी अग्नींत. १५ समुहानें. १६ जीवन. १७ स्नानांच्या वेळीं. १८ शरण. १९ अरण्यांत. २० उदकीं. २१ कंसास. २२ शंकारूपि खिळा. २३ समूळ. २४ स्व-आकार, स्वरूप. २५ त्रैलोक्य प्रकाशक. २६ नउरवि. २७ सकल ईश सर्वश्रेष्ठ. २८ तत्पर. २९ पापविनाशक विधिविशेष. ३० डोहीं. ३१ आपल्या आनंदानें भरलेला, ध्यांत.

प्रेक्षि सदाराध्यातें,[१] ॥ स्तवि भावें विश्व ज्या उदारा ध्यातें. ॥ १ ॥
तें शेषांकावरिलें[२] ॥ दावुनि निजरूप मागुतीं आवरिलें. ॥
मनिं अक्रूर समजला, ॥ "दे अलिस[३] पदाब्जिंचा[४] विभू रस मजला." ॥ २ ॥

इति चत्वारिंशोऽध्यायः ॥ ४० ॥

मग यमुनाडोहातें ॥ त्यजि, विभुच्या शीघ्र कंस नाडो हातें ॥
ह्मणवुनि; उत्साहानें ॥ मथुरेस बळा[५] सुवर्णवासा[६] हा ने. ॥ १ ॥
यमुनोपवनीं[७] टिकले ॥ तीचे पाटीरकस्तुरीचे[८] टिकले[९]. ॥
सद्भ्रमरा[१०] यश वास ॥ प्रिय ज्याचें; तादितरांस[११] काय शवास! ॥ २ ॥
" होतां कंसांतें,[१२] " वन- ॥ प्रभवाक्ष[१३] ह्मणे, " करूनि गुरुसांतवन,[१४] ॥
तव सदना मज कार्या- ॥ नंतर येणे असे खरें भजकार्या[१५]. ॥ ३ ॥
अक्रूरा! जा गेहीं[१६] ; ॥ संकल्प स्वांतरीं[१७] बरा जागे हीं[१८]. ॥
न्यावें या यानींही[१९]; ॥ विस्मृति तूझी मदाशयां[२०] या नाहीं. " ॥ ४ ॥
सुमहाभोगें[२१]- वतन तें ॥ साधूंचें नाभि शिरें सुभागवत[२२] नतें[२३]; ॥
पावुनि भव्य[२४], वसाया ॥ जाय पुरीं, करुनि या शुभव्यवसाया[२५]. ॥ ५ ॥
सत्धृदयांबुजग[२६] दिन- ॥ व्ययसमयीं[२७] शकट[२८] उतरवि त्रिजगदिन[२९]. ॥
गोपबळांसह[३०] मग, ती ॥ मथुरा पाहों निघे गजेंद्रसमगति[३१]. ॥ ६ ॥
जींत कनकनगरीति[३२] ॥ प्रासाद[३३] अनेकविध[३४] असी नगरी ती. ॥
कांचनसन्मणिखचितें[३५] ॥ भवनें[३६]; वैभव जगत्रयीं अणिखचि[३७] तें. ॥ ७ ॥
ते यदुवासव[३८] तीतें ॥ पाहाति अमरावतीचिया सवतीतें; ॥

---

१ सत्-आराध्य, ( कृष्ण ). २ शेषाच्या मांडीवरील. ३ भ्रमरास. ४ चरण कमळींचा. ५ बळरामास. ६ कृष्णास. ७ यमुनें जवळच्या वनांत. ८ चंदन व कस्तुरीचे; ( अनुक्रमें बळराम व कृष्ण ). ९ टिळे. १० सज्जनरूपी भ्रमरास ११ सद्भ्रमराशिवाय जे इतर ते या वासाविषयीं शववत् ( प्रेतासमान ) ; त्यांस काय! १२ कंसमरण. १३ कमलनेत्र ( कृष्ण ). १४ आइबापांस समजावून. १५ हे भक्तश्रेष्ठा ! १६ घरास. १७ माझ्या ध्यानांत. १८ तुझ्या घरीं येण्याचा. १९ वाहनासहि. २० मत्-आशया, माझ्या मनास. २१ कृष्ण. २२ अक्रूर. २३ नम्र, वांकविलेलें; ( हें 'शिरें' याचें विशेषण. ) २४ व्हावयाचें ; भविष्य-कथन. २५ ( कृष्णास आणण्याच्या ) शुभ कृत्यास. २६ साधुत्हृदयरूपी कमळांत असणारा ( कृष्ण) २७ अस्तमानीं. २८ गाडा. २९ त्रिजगत्-इन, त्रैलोक्यपति. ३० गोप आणि बळराम यांसह; किंवा गोपसमूहासह. ३१ गजश्रेष्ठाच्या सारिखी आहे गति ज्याची. ३२ मेरूसारिखे. ३३ वाडे. ३४ पुष्कळ प्रकारचे. ३५ सुवर्ण व श्रेष्ठ रत्नें यांहीं खचित. ३६ घरें. ३७ निराळें. ३८ यादव कुळांतले इंद्र ( बळकृष्ण ).

पुरयौवत[१] अभिरामा[२] ॥ कृष्णा सादर[३] विलोकि त्या अभिरामा[४]. ॥ ८ ॥
रुचि[५]-अवलोकनिं वळघे[६] ॥ सदनशिरीं, लाभ युवतिलोक, निवळ घे. ॥
ते क्षुधित चकोर सदा ॥ प्रभुचंद्रा ह्मणति, "पद पळ टिको रसदा!" ॥ ९ ॥
त्यजिल्या महिला[८] भानें ॥ तनुच्या; भुलल्या अनंतसुखलाभानें; ॥
विसरति भवना; वेधी ॥ नयनें मुख; लिगटलीच भवनावे[९] [१०]धी. ॥ १० ॥
ह्मणती, " पाय कवळिती ॥ ज्याचे उरिं गोपि, लोकनायक वाळिती! ॥
नंदपशु[११] सुतनु[११] रवि ते ॥ हे गे बळकृष्ण दुःखतिमिर[१२] नुरविते!" ॥ ११ ॥
प्रभुवरि सुमलाज्यांतें[१३] ॥ वर्षति पुरयुवति, हर्ष गमला ज्यांतें; ॥
द्विजसमुदाय नहाती ॥ या अमृतीं; घेउनी उपायन[१४] हातीं. ॥ १२ ॥
पूजिति साधु वसुमती[१५]- ॥ सुर सादर पैर[१६] लोक सोत्सव[१७] सुमती. ॥
वर्णिति गोपी लपनीं[१८] ॥ देखति ज्या जागरींहि हरिला सपनीं. ॥ १३ ॥
नाशी तम रज[१९] कानें ॥ पीतां यद्यशसुतीर्थतम[२०], रजकानें[२१] ॥
तो महिचा न धणिवर[२२] ॥ श्रीचा गणिला, न पाहिला हि धणिवर. ॥ १४ ॥
भेटे हरि, परि टाचें[२३] ॥ पुण्य खळा कंसकिंकरा[२४] परिटाचें. ॥
मोक्षदें[२५] याचकरीती[२६] ॥ मागति वस्त्रें; प्रभू दयाच करीती! ॥ १५ ॥
परि अर्पिं न रजक पटें[२७], ॥ प्रकट वदे शब्द, ज्यांत तम रज कपट. ॥
शुभसामग्री[२८] वेची ॥ ह्मणुनि, हरि करी छिदा[२९] खलग्रीवेची[३०]. ॥ १६ ॥
तापहर न तापविता, ॥ ( रक्षी हरिकर दयाकर[३१] नता[३२] ), पविता[३३] ॥
धरि जरि जितनीरज[३४]; कीं ॥ खर[३५] पर[३६] भावानुरूप कुजनीं रजकीं. ॥ १७ ॥
पडतांचि रजकमाथा[३७], ॥ पळती तदनुग[३८] भिवूनि या उन्माथा[३९]. ॥

---

१ पुरस्त्रीसमूह. २ सुंदरास. ३ आदरपूर्वक. ४ बळराम आहे जवळ ज्याच्या. ५ कांति. ६ चढे. ७ हे अष्टरस देणाऱ्या! ८ स्त्रिया. ९ संसारनौकेस (कृष्णास). १० बुद्धि. ११ नंदाचे प्राण असे हे सुशरीरी सूर्य. १२ दुःखरूपी अंधार. १३ पुष्पें व लाह्या. १४ नजराणा. १५ ब्राह्मण. १६ पुरांतील. १७ स-उत्सव=आनंदानें. १८ भाषणीं. १९ तमोगुण. व रजोगुण. २० ज्याचें यशोरूपी महा तीर्थ. २१ परिटानें. २२ स्वामिश्रेष्ठ. २३ लहान, थोडें. २४ कंस सेवकाचें. २५ बळकृष्ण. २६ भिक्षुकासारिखें. २७ वस्त्रें. २८ पुण्यसामाग्रि. २९ छेदन. ३० दुष्टाच्या गळ्याची. ३१ दया-आकर (=दयेची खाण) ; किंवा दया-कर (=दया करणारा). ३२ शरणागतास. ३३ वज्रता. ३४ जिंकिलें आहे कमल ज्याणें ( स्वसौंदर्यें ). ३५ उग्र. ३६ कृष्ण. ३७ परिटाचें शिर ( हा समास, एक पद सं० व दुसरें म० अशा दोन पदांचा केला आहे). ३८ तत्-अनु-ग, त्याच्या मागन जाणारे, त्याचे सेवक. ३९ हननास.

जातां टाकुनि [१]वासें, ॥ स[२]वेळें स्वीकारिलीं त्रिलोकनिवासें. ॥ १८ ॥

स्वीकारिति शि[३]शु पगडी, ॥ अंगडि, सेला, विजार ते प[४]शुप गडी. ॥

धरुनी शोका, पडतें ॥ जालें धूळींत टाकिलें कापड तें. ॥ १९ ॥

सर्वस्वें निष्कपटी ॥ अ[५]र्चित वि[६]भु जे जगत्रयीं, निष्क[७]पटीं ॥

मंडितकाय [८]विशेषें[९] ॥ केले मग भक्त-तंतुवा[१०]यांविशेषें. ॥ २० ॥

दासा, देव व[११]रद[१२], या ॥ दे सारूप्यादि, करुनि, मुक्ति, वर दया. ॥

तरला वा[१२]यके रीती ॥ असि; यास्तव साधु पदक पाय करीती. ॥ २१ ॥

माळाकार सु[१३]दामा ॥ करिपूजन सा[१४]नुगा, समर्पि सुदा[१५]मा ॥

वारि तरी जीव सती ॥ हरिची पदभक्ति, सन्म[१६]ना जी व[१७]सती, ॥ २२ ॥

॥ ॥ इति श्रीमत्कृष्णविजये एकचत्वारिंशोऽध्यायः ॥ ४१ ॥ ॥

देवकि [१८]कुक्षि क[१९]कुब्[२०]जा ॥ मित्रां, [२१]नलिनी नमी सकौतुक कु[२२]ब्जा; ॥

देहीं वक्रा, सरळी ॥ मनिं; तीसीं रुचलि गोपशक्रा[२३]सें रळी[२४]. ॥ १ ॥

काथि परि[२५]पाटी; राज्या ॥ द्यायाला नेत होति पा[२६]टीरा ज्या, ॥

तेणें दे उटि काया, ॥ कीं हरि पादिं पद मनास देउ टिकाया. ॥ २ ॥

प्रपदा[२७]वरि ठेवि पदा ॥ तीच्या हरि, य[२८]न्नतोपरि तुटे विपदा; ॥

सुरतरुसंदोह[२९]नुतें ॥ उ[३०]जरि क[३१]राग्रेंचि, ऊचलुनि तो हनुतें. ॥ ३ ॥

जाली व[३२]रतनु, सरली ॥ कु[३३]दशा, कीं स्वर्द्रु[३४]सेवना अनुसरली. ॥

तीं ठायीं लवलीला ॥ दावी हरि भजनसु[३५]कृतवरलवलीला. ॥ ४ ॥

क्षिति[३६]च्या ठायीं दुसरी ॥ न तसि; मुखाची तिच्या करि न इंदु[३७] स[३८]री. ॥

रूपा करि आवा[३९]सें ॥ ब्रह्मपिता, निजकरेंचि भरि आ[४०]वांस. ॥ ५ ॥

---

१ वस्त्रें. २ बळरामासह. ३ मुलें. ४ गौळी, गोप. ५ सुशोभित. ६ प्रभु. ७ निष्क-पट= अलंकार, व वस्त्रें यांहीं. ८ अलंकृत आहेत देह ज्यांने. ९ वि-शेषें=शेषरहित, सर्वांगभर. १० कोणी एक साळवी जातीच्या भक्तानें. ११ वर देणारा. १२ तो साळवी. १३ नामविशेष. १४ सेवकांसह ( कृष्णास ). १५ पुष्पांच्या उत्तम माला. १६ साधूंच्या मनास. १७ स्थान. १८ दे- वकीची कूस. १९ दिशा; ( येथें पूर्वदिशा घ्यावी ). २० सूर्यास. २१ कमळणी. २२ स्त्रीविशेष २३ गोपेंद्रास (=कृष्णास). २४ लाड, प्रीति. २५ नित्यक्रम. २६ चंदनास २७ आंगठ्याच्या शेवटावर. २८ ज्याच्या शरणागतावर. २९ कल्पतरुसमुहानें नमिलें आहे ज्यास. ३० सरळ करी. ३१ बोटांनेंच. ३२ श्रेष्ठ आहे शरीर जीचें. ३३ वाईट स्थिति. ३४ स्वर्-द्रु-सेवन, कल्प तरूचा सेवाविषय (कृष्ण) त्यास. ३५ भजनाच्यापुण्याचा जो श्रेष्ठ अंश, त्याची लीला. ३६ पृथ्वीवर. ३७ चंद्र. ३८ बरोबरी. ३९ स्थान. ४० अंगसौंदर्यास.

विभुचा धरुनि पदर ती, ॥ मागे प्रमदोत्तमा[1] नमूनि पद, रति. ॥
स्मरें[2] सूचवि भोग मना;॥"स्वगृहासि," ह्मणे,"करा अजि विभो ! गमना."॥ ६ ॥
नेउं गृहा सेला जे ॥ ओढि, न ते,[3] परि हरीच हांसे, लाजे. ॥
"सहँ[4] गोपां दादासी ॥ न गणुनि वरिये बळेंचि पादा दासी! ॥ ७ ॥
आप्तजनँ[5]स्वाधी न ॥ ध्वंसीं तों मी शुभांगि[6]! न स्वाधीन. ॥
तन्मानसँ[7]कृत्स्नेहा ॥ पुरवुनि येईन; करिन असकृत्स्नेहा[8]." ॥ ८ ॥
जडलि घनां[9] या विजशी; ॥ तसि समं[10]जाविसि करी मना यावि जशी; ॥
प्रीतिाचि तो वेडि कसी ॥सोडवि हरि, जी करांसि झोंबे डिकसी[11]? ॥ ९ ॥
[12]स्वसुर-धराजनि-रोपा, ॥ दे सामें[13] तीस, विबुधराज[14], निरोपा. ॥
करि, तारित नतें[15], गमना;॥स्त्रीच्या, ज्या निरखितां, निघे न तग मना. ॥ १० ॥
त्रिभुवननायक[16] बरवा ॥ दिसतां, न स्मरति वसनँ[17], काय, कंवर, वा[18]. ॥
स्त्री चित्राकृति वरिती; ॥ हरिमूर्ति मनोहरा खरी क्षितिवरि ती. ॥ ११ ॥
पुसुनि जना विबुधनुतें[19] ॥ स्थान, निरखिलें[20] महेंद्रधनुसम[21] धनु तें. ॥
जें अर्चितें[22], भोजपति- ॥ प्रियें[23], भट[24] भलत्यासि देति न शिवों, जपती; ॥ १२ ॥
तें घेतां, धन्ववन- ॥ स्थित[25] भट वहु रुक्ष[26] जेवि मरुधन्ववँन[27]; ॥
ह्मणति, " शिवुन कोदंडा ॥ मरणे जरि, हरि! तरी भिवुं नको दंडा." ॥ १३ ॥
जरि भुंकिति भटकुतरे[28], ॥ धनुरिक्षुजिघृक्षुपुरुषगजमद[29] नुतरे[30] ; ॥
सोडुनि ओझें पावे ॥ लघुपण तें उरगिं गरुड जैं झेपावे. ॥ १४ ॥

---

१ अत्यंत प्रेदम २ काम. ३ तो; ( ' लाजे ' या अध्याहृत क्रियापदाचा कर्ता. ) ४ हें विशेषण आहे; ' बरोबर असलेल्या '( गोपा इ० ). ५ आप्तजनांची मानसीक व्यथा, दुःख ६ हे सुंदरांगी ! ७ तत्-मानस- कृत्स्न-ईहा, त्यांच्या मनांतील सर्व इच्छा. ८ नित्यस्नेहास ९ मेघास. १० समजूत. ११ डिकासारिखी. १२ स्व-सुरधरा-जनि-रोपा, स्वभक्ताचा, देवांच्या पृथ्वीवर (स्वर्गी) जहालेला बाळवृक्ष=स्वभक्तांचाबाळकल्पवृक्ष १३ समजुतीनें. १४ देवस्वामि. १५ शरणागत. १६ त्रिभुवनपति. १७ वस्त्र. १८ अथवा- १९ देवांनीं नमिलें आहे ज्यास, त्याणें. २० पाहिलें. २१ इंद्रधनुष्यासमान. २२ पुजलेलें २३ कंसास आवडणारें. २४ (रक्षक) वीर. २५ धनु-अवन-स्थित, धनुष्याच्या संरक्षणार्थ राहिलेले. २६ क्रूर, निर्दय, अनार्द्र. २७ मरु-धन्व-वन, मारवाड व धनु ( जळरहित एक दुसरा प्रदेश ) यांतील वनासारिखे. २८ वीररूपी कुतरे. २९ धनुः-इक्षु-जिघृक्षु-पुरुष-गज-मद, धनुष्यरूपी उंसाविषयीं भुकेलेल्या पुरुषरूपी ( कृष्णरूपी) हत्तीचा मद. 'जिघृक्षु' च्या ठिकाणीं 'जिघृत्सु' असाहि एक दुसरा पाठ आहे. ३० न उतरे.

न गणुनि वारण[1] साच, ॥ प्रभु घे सज्जुनि, उसास वारणसाच; ॥
ओढुनि चापलतेतें[2], ॥ मोडी; साहति न वीर चापलतेतें[3]. ॥ १५ ॥
भवतरुमोड[4] करपवी, ॥ चित्र[5] न करि धनुलतेस मोड करपवि[6]; ॥
सुरदुष्कर[7] दुःसह जें ॥ तें जो दावी स्ववीर्य[8] कुतुकें सहजें. ॥ १६ ॥
भटजन[9] धाके, तुकडे ॥ होतां धनु; धूमपूर्वधा केतुंकडे[10] ॥
धांवे. आयुध राहे ॥ धरुनि पथिं; ह्मणे, "न यांस आयु, धरा हे!" ॥ १७ ॥
वेदमता पाखंडा, ॥ तेंवि प्रभु दाविती प्रतापा; खंडां[11] ॥
धनुच्या घेऊनि करें, ॥ मारिति वीरांसि, मुक्ति देऊं निकरें[12]. ॥ १८ ॥
"गमन मानें जरि, पुसा रे! ॥ पतिचें[13] प्रस्थान[14]," ह्मणति; निजरिपु[15] सारे
वधुनि, भुवनहेतु[16] कडे[17] ॥ निघती, धनुचे मग त्यजुनि हे तुकडे. ॥ १९ ॥
जाले नृपबळ[18] हरिते ॥ ऐसे त्रिजगत्पती सरूप बळ हरि ते. ॥
हांसे आलेख्यां[19] ती ॥ नगरी, असि विभु करूनि आले ख्याती. ॥ २० ॥
करि शयना शकटाळी[20]- ॥ प्रति येउनि; रात्रि दुरितनाशक[21] टाळी[22]. ॥
जींत[23], "नृपा! मरशील," ॥ स्वप्न ह्मणति, परि गणी न पामरशील[24], ॥ २१ ॥
शोभा परमा रंगीं[25] ॥ आणवि तो शत्रुमति-नृप-रमारंगीं[26]. ॥
लोक वरिति मंच; रवि[27] ॥ प्रकटे, तों तेथ मल्लवर[28] संचरवी. ॥ २२ ॥
शिक्षित[29] जे ठीक, रणीं ॥ बाहूंची दाविणार जेठी करणी, ॥
ते चाणुरादि. सले[30] ॥ त्हदयीं हरि; परि बलाढय लोकां दिसले! ॥ २३ ॥
मिळती आटोकाट[31], ॥ "स्वदृष्टिचा," ह्मणति लोक, "आटो काट[32]; ॥
पाहों हरिवळलीला, ॥ चातक घनपंक्तिला[33] जसे वळलीला[34]." ॥ २४ ॥
गर्जति भेरी[35], घनसे ॥ मल्लहि; सामंत[36] किति उभे; रीग नसे; ॥
वरमंचीं[37] नृप हा या ॥ जेठींचें बैसला नियुद्ध[38] पहाया. ॥ २५ ॥

---

१ हत्ती. २ धनुष्याच्या दोरीस. ३ चपळपणास. ४ संसाररूपी वृक्षाचा अंकुर. ५ आश्चर्य. ६ हस्तांत आहे वज्र ज्याच्या. ७ देवांनीं करण्यासहि अशक्य. ८ सशौर्य. ९ वीरसमूह. १० ध्वजाकडे. ११ तुकड्यास. १२ समूहानें (=एकदम). १३ कंसाचें. १४ निघणें ( स्वर्गास ). १५ शत्रु. १६ जगाचीं कारणें. १७ एक बाजूस. १८ कंससैन्य. १९ चित्रास. २० गाड्यांच्या रांगेंत. २१ पापनाश करणारा. २२ घालवी. २३ शोभेंत. २४ मूर्ख आहे स्वभाव ज्याचा. २५ सभेंत. २६ कृष्णीं. २७ कृष्ण. २८ मल्लश्रेष्ठ. २९ शिकाविलेले. ३० ठुसठुसे. ३१ सर्व. ३२ इच्छा. ३३ मेघपंक्तीला. ३४ जवळ आलेलीस. ३५ नगारे. ३६ एक मेकास चिकटून. ३७ वर-मंचीं, उच्च स्थानीं. ३८ द्वंद्वयुद्ध.

ने तो स्वोपायन[१], "मी ॥ नंद," असें कथुनि साप्त[२] तो पाय नमी. ॥
वार्षिककर भूधव[३] घे; ॥ मंचीं बैसवि सनाथ[४] वल्लव[५] अवघे. ॥ २६ ॥
त्यजि कंसा धीर; 'चला' ॥ प्राणांहि ह्मणे; असा महाधी[६] रचला. ॥
हृदया जरि कातरते ॥ चिंतावापी[७], न दावि परि कातरते[८]. ॥ २७ ॥

॥ ॥ इतिश्रीमत्कृष्ण० ४२ ॥ ॥

धरुनि मनीं रिपुरोषा[९], ॥ आइकतां मल्लतालदुंदुभिघोषां[१०], ॥
बळ हरि, निजगुण[११] दोषा- ॥ वरि, तैसे जाति; हर्षविति पुरयोषा[१२]. ॥ १ ॥
रंगद्वारानिकटीं[१३], ॥ ज्याच्या अलि[१४] मत्त[१५] दानधारांनिं[१६] कटीं[१७], ॥
होता मदनाग[१८]; मनीं ॥ जाणे हरि त्यासि हेतु 'मदनागमनीं[१९].' ॥ २ ॥
भवरोगमहामात्रा[२०] ॥ प्रभुची मूर्तिहि रुचेचि न महामात्रा[२१]; ॥
प्रेरि[२२] हरिवरि करीना[२३] ॥ गतायु[२४] खळ तो; विवेक लेश करीना. ॥ ३ ॥
मग बळसिंधु[२५] परिकरा[२६] ॥ बांधी, अलकांहि उचलुनी उपरि[२७] करा. ॥
कृष्ण ह्मणे, "कोपरता[२८] ॥ काढीं, आधोरणा[२९]! गजा; हो परता. ॥ ४ ॥
गोचर हो[३०] यमहाता ॥ तुमचा आत्मा; न दूर होय, महाता! ॥
आला बळसिंधु;रहा ॥ आर्यासन्मुख[३१], न काढि खळ सिंधुरे[३२] हा." ॥ ५ ॥
ये समरा शित[३३] दंतीं ॥ गज; हरि मन धरि सुवीर्यराशि[३४] तद्दंतीं[३५]. ॥
धांउनि येउनि जवळी, ॥ शुंडादंडें निजांतका[३६] द्विप[३२] कवळी. ॥ ६
दाटति सुरयुवतिगळे[३७]; ॥ करिहस्तांतुनि[३८] तदश्रुबिंदुसह[३९] गळे. ॥
चूर्णचि करिता डिखळा- ॥ परि; कोपवि, मुष्टिनेंचि हरि ताडि खळा. ॥ ७ ॥

---

१ स्व-उपायन, आपण आणलेला नजराणा. २स-आप्त. ३ पृथ्वीपति, (कंस). ४ नंदासहित. ५ गवळी. ६ महा-आधी= मोठें मनोदुःख. ७ चितारूपी नदी. ८ भयभीतपणा. ९ शत्रुक्रोधास. १० मल्ल-ताल-दुंदुभि (नगारा) यांच्या गर्जनेस. ११ त्यांचे गुण. १२ पुरस्त्रिया. १३ सभेच्या दरवाज्याजवळ. १४ भ्रमर. १५ माजलेले. १६ दान-धारांनीं, गंडस्थळापासून वाहणाऱ्या मदाच्या धारांनीं. १७ गंडस्थळीं. १८ या नांवाचा हत्ती. १९ मत्-न-आगमनीं, मी न यावें आशा साठीं. २० संसाररूपी रोगावर महा मात्रा. २१ महातास. २२ पाठवी, घाली. २३ करी-ईन, गजश्रेष्ठास. २४ आयुष्यहीन. २५ बळसागर. २६ कंबरपट्टा. २७ वर. २८ क्रोधी. २९ हे महाता! ३० होवो. ३१ थोरासमोर. ३२ हत्ती. ३३ तीक्ष्ण. ३४ उत्तम शौर्याचा राशि. ३५ तन्मरणीं. ३६ निज-अंतका, आपल्या काळास. ३७ देवांगनांचे गळे. ३८ हत्तीच्या सोंडींतून. ३९ इकडे हा गळे; तिकडे (देवांगनांच्या डोळ्यांतून) अश्रु गळति (बंद होती).

जन करिति नवल, पाला ॥ तेंवि रगडितां, पदांत सजव[1] लपाला. ॥
भी सुरपुंगवसेना[2]; ॥ गज करि वहु यत्न, परि हरी गवसेना[3]. ॥ ८
शुंडाग्रें[4] तो गिवशी[5] ॥ गज, ज्यातें न शकती धरूं योगि वशी[6]; ॥
तों करुनि बळ, हठ, कडे ॥ ये; ज्या जिंकिति न निर्मुनि कलह ठकडे[7]. ॥ ९ ॥
ओढी हा सेप[8] शुभें ॥ हस्तें; सुर[9] होति विवश[10] हासें; पशु[11] भें[12] ॥
धरि; शत हस्त खरखरा ॥ ने, अहिसे[13] जसा खगाधिप[14] प्रखर खरा[15]. ॥ १० ।
पार्श्वीं[16] एके वळतो, ॥ तों इतरीं[17] हरि; गज श्रमे केवळ तो. ॥
पाहे न वपुच्छाया[18]; ॥ खेळे शिशु[19] काय धरुनि नव[20] पुच्छा या! ॥ ११ ॥
पुच्छ त्यजी; मग जाला ॥ सन्मुख, ताडी करें निकाम[21] गजाला. ॥
कौतुक दावि पळांत[22]; ॥ द्विप धांवे, गांठिलाचि भावि पळांत! ॥ १२
पळतां सहसा पडला ॥ हरि; गज मानी 'भला स्वरिपु[23] सांपडला'! ॥
ताडी वरदा[24], घातीं[25] ॥ तो चुकवी सांपडेचि न रदाघातीं[26]. ॥ १३ ॥
झणझणलें सशिर[27] कले- ॥ वर[28] रद[29] भूमींत, चुकुनि हरिस, शिरकले. ॥
मदमत्त असा पडतो ॥ तोंडघसीं. ह्यासि सज्जन न सांपडतो. ॥ १४ ॥
केला सोद्यम[30] हातीं[31] ॥ माथा थोपटुनि तो सकोप महातीं, ॥
धांवडिला अंतकसा[32]; ॥ पारि गज हरिचा करील हा अंत कसा? ॥ १५ ॥
न धरी हरि खेद[33] मनीं, ॥ मुग्धा[34] भीती, सुरौघ[35] हरिखे[36] दमनीं[37]. ॥
कवळुनि, जितमुर[38], गाळी ॥ द्विप तो मल मूत्र, करें[39] असा मुरगाळी. ॥ १६ ॥
पाडी अवनी[40]नर हा ॥ हरि गज कीं, "तापलासि; निज, नीव, रहा." ॥
पतित[41] शिरोपरि[42] चरणें ॥ आक्रमिला[43], ज्याचिया तराति परिचरणें[44]. ॥ १७ ॥

---

१ वेगानें. २ देवेंद्राची सेना; किंवा 'सुरपुंगव=कृष्ण, त्याची सेना, ( बरोबर आलेले गवळी इ० ) ३ सांपडेना. ४ सोंडीच्या शेवटानें. ५ खुपसी; टोंची. ६ वश करणारे. ७ ठक लोक ८ शेंपूड. ९ देव. १० खुष. ११ हत्ती. १२ भय. १३ सर्पास. १४ गरुड. १५ 'अहिस' याचें विशेषण. १६ बाजूस. १७ दुसऱ्या ( बाजूस ). १८ शरीराची छाया ( कृष्णाच्या ). १९ बाळ. २० नवा, लहान ( बाळ ). २१ इच्छेस आलें तेवढें. २२ पळण्यामध्यें ( पळून ). २३ स्वशत्रु. २४ कृष्णास. २५ मारते वेळीं. २६ रद-आघात, दांताच्या झपाट्यांत. २७ डोक्यास. ह. २८ शरीर. २९ दांत. ३० स-उद्यम, उद्योगसहित, चपळ, हुषार. ३१ 'हातें' असाहि आणखि एक पाठ आहे. ३२ यमासारिखा. ३३ भय. ३४ अज्ञानी ( स्त्रिया ). ३५ देवसमूह. ३६ आनंद पावे. ३७ निवारणीं. ३८ जिंकिलें आहे मुरासुरास ज्याणें, तो. ३९ सोंड. ४० जमिनीवर. ४१ पडलेला. ४२ डोक्यावर. ४३ (त्यावर) हल्ला केला; चढला. ४४ सेवेनें, भजनें.

दर्शन[1] तदंतो[2] वलया- ॥ लंकृतहस्तें[3] हरूनि, दंतावल[4] या ॥
दंडें सुमहामात्र[4] ॥ प्रभुनें वधिला; प्रयास न महा मात्रें[5]. ॥ १८ ॥
हो न कुवलयां[6] पीडा, ॥ ह्मणुनि वधी हरि गजा **कुवलयां[7]पीडा**. ॥
कीं तत्संगीं[8] केली[9] ॥ न वरि; दलितंतनु[10] धरा[11] तदंगीं[12] केली. ॥ १९ ॥
ऐसा असदंतकर[13], ॥ द्विपास्रमदबिंदुचित्रतनु[14], दंतकरें[15], ॥
शोणित[16] जंबाल, हरी ॥ करि, करिमथनीं[17], बळांबुनिधि[18], बाल- हरी[19]. ॥ २० ॥
रामहि हरिसम दांत ॥ स्वीकरि, दुष्टांत अशनि[20] जो समदांत[21]. ॥
गोपांसह सारंगीं[22] ॥ सिंह, तसे देव शिराति सहसा रंगीं.[23] ॥ २१ ॥
जरिहि चिदेकरसद[24] हा ॥ पाहति मल्लादि तेथ लोकरसें[25] दहा. ॥
धरि नृपमति काळजिला, ॥ वाटति ते रामकृष्ण निजकाळ जिलीं[26]. ॥ २२ ॥
न रुचे नीचांशि शुची[27]; ॥ विप्रमुखां[28] प्रीति देवकीच्या शिशुची; ॥
सुख होय बहु भल्याला; ॥ जो तो स्तंभादि[29] भूषणें शुंभ[30] ल्याला. ॥ २३ ॥
सुरुचिकराचि[31] दोघांचें ॥ जन वर्णिति चरित शुचिकर[32] चिदोघांचें[33]; ॥
निजयदु[34] गोकुळ-हीं; न ॥ प्रेम असे जेथ लेश[35] तो कुळहीन. ॥ २४ ॥
**चाणूर** वदे वाचा, " ॥ ऐका हो **रामकृष्ण**! नरदेवांचा[36] ॥
काम[37] नियुद्ध[38] पहाया; ॥ कारणहि तुह्मांसि येथ हेंच वहाया. ॥ २५ ॥

---

१ दांत. २ तत्-अंता, त्याला मारण्यासाठीं. ३ वलय-अलंकृत- हस्तें, आंगठीनें सुशोभित अशा हातानें. ४ या नावांचा महात. ५ किंचित. ६ भुगोलास. ७ हें त्या हत्तीचें नाव. ८ त्याबरोबर. ९ क्रीडा. १०पिष्टशरीरी. ११पृथ्वी. १२ त्याच्या अवयवांनीं. १३असत्-अंत-कर, दुष्टां चा संहार करणारा. १४ द्विप-अस्र-मदबिंदु-चित्र-तनु, हत्तीच्या रक्ताच्या व मदाच्या बिंदूंनीं इंगित आहे ' तनु ' ह्मणजे शरीर ज्याचें असा. १५ दांत आहे हातांत ज्याच्या असा. १६ रक्ताचा चिखल. १७ गजमर्दनीं. १८ बळाचा समुद्र. १९ बालसिंह. २० वज्र. २१ गर्विष्ट ( हें " दुष्टांत " याचें विशेषण ). २२ हत्तीवर; किंवा हरणावर. २३ सभेंत. २४ चित्-एक-रस-द, ज्ञान रस देणारा. २५ दहा रस याप्रमाणें वर्णिले आहेत;–

" रौद्रोद्भुतश्च श्रृंगारो हास्यं वीरो दया तथा ॥
भयानकश्च बीभत्सः शांतः सप्रेम भक्तिकः"॥

रौद्र, अद्भुत शृंगार, हास्य, वीर, दया, भयानक, बीभत्स, शांत, आणि प्रेम. २६ मतीला. २७ कांति. २८ विप्र, (ब्राह्मण) आदिकरून लोकांस. २९ स्तब्धता. ३० निर्मळ. ३१ फार सुंदर. ३२ प्रियकर. ३३ चित्-ओघांचें, ज्ञानाचे ओघच असे जे ( बळराम व कृष्ण ) त्यांचें ३४ आपले यादव. ३५ किंचितहि. ३६ कंसाचा. ३७ इच्छा. ३८ द्वंद्वयुद्ध.

राजाज्ञा जन [१]नीति- ॥ ज्ञाते पूजिति; सदा [२]प्रजाजननी ती. ॥
तूझी हरिबळ [३]कटकीं ॥ गोपांच्या भुजरणीं महा बळकट कीं." ॥ २६ ॥
कृष्ण ह्मणे, "धन्या या ॥ नृपप्रसादा नसे निषेध[४] न्याया; ॥
तुष्ट धरापाळक[५] हो[६]; ॥ खेळों तुल्यासवें[८]; असों बाळक हो." ॥ २७ ॥
**चाणूर** ह्मणे, "बळें[९] हा ॥ क्रीडो या मुष्टिकासवें परबळहा[१०]; ॥
दिसतां जरि बाळकसे, ॥ लोकप्रख्यातशक्ति[११] तरि; बाळ कसे? ॥ २८ ॥
त्यजुनि भय, व्रीडा, या ॥ आह्मां दोघांजणासह क्रीडाया; ॥
मजसीं तूं हरि! भीड; ॥ द्विप[१२] वधिला दशशतेभबळ[१३] तरि भीड!" ॥ २९ ॥

॥ इति श्रीमत्कृष्णविजये त्रिचत्वारिंशोऽध्यायः ॥ ४३ ॥

नीतिविरुद्धा लोकीं ॥ नृपरीति विनिंदिली[१४] नियुद्धालोकीं[१५], ॥
"नेणेचि विकळ[१६] भाचे, ॥ विक्रम[१७] गणि तुल्य मत्तगजकलभाचे[१८]! ॥ १ ॥
लागो न ढका यांला; ॥ मल्लांला वश न होत दृढकायांला[१९]. ॥
रगडवि जळजां[२०] उपळें[२१] ॥ यां खळ;" वदतात, "सतिळ[२२] जळ[२३] जाउं पळें." ॥ २ ॥
न नया[२४] मान सभा जे ॥ दे, जातां तेथ, साधुमानस[२५] भाजे. ॥
"हानिच, अन्या याला[२६] ॥ सिद्धि न; करितो नृपाळ अन्यायाला. ॥ ३ ॥
वदना घर्मकणवहा[२७] ॥ यांच्या निरखि[२८] न, परंतु धर्म कणवे[२९] हा. ॥
अहह! नृपा सुकुमार-[३०] ॥ प्रकृति नियुद्धश्रमें पिपासु[३१] कुमार." ॥ ४ ॥
जनभाव सकळ कळती ॥ प्रभुला, कीं निजजयार्थ बहु कळकळती; ॥
क्रीडारस संपविला. ॥ **चाणूर** क्षीणशक्ति-[३२] गति कंपविला. ॥ ५ ॥
कळला हरि दुःसहसा; ॥ [३३]मुष्टियुगें ताडि भगवदुर[३४] खळ सहसा. ॥

---

१ नीति जाणणारे. २ प्रजेची आई. ४ समुहांत. ५ नकार. ६ कंस. ७ होवो. ८ आमच्या बरोबरीच्या संगतीं. ९ बळराम. १० शत्रुबळनाशक. ११ लोकांत प्रसिद्ध आहे शक्ति ज्यांची, असे. १२ हत्ती. १३ दश-शत-इभ-बळ, सहस्र हत्तींच्या बळाचा. १४ फार दोषिली. १५ नियुद्ध आलोक, द्वंद्वयुद्ध पाहतांना. १६ कलाहीन. १७ पराक्रम. १८ माजलेल्या बाळहत्तीचें. १९ दृढ ( बळकट ) आहेत देह ज्यांचे अशा ( मल्लांला ). २० कमलांस. २१ दगडानें. २२ तिलांजलिसह. २३ पाणी. 'सतिल पाणी जावो ' = तो मरो. २४ न्यायास. २५ साधूंचें मन. २६ कंसाला. २७ घामाचे कण ( थेंब ) आहेत ज्यावर अशा ( वदना ). २८ पाहे. २९ दया. ३० अत्यंत कोमळ आहेत देह ज्यांचे असे. ३१ तृषित. ३२ क्षीण आहे शक्तीची गति ज्याच्या. ३३ दोन मुष्टींनीं. ३४ भगवत्-उर, कृष्णहृदय.

भासे लोकां पवि[1] भू- ॥ धरिं[2] पडला; परि वरी न तो कांप विभू[3]. ॥ ६ ॥
सज्जन ज्यास बुक्यांनीं ॥ पूजिति, हाणी तया उरास बुक्यांनीं! ॥
त्याचि भुजांसि तदैवें[4] ॥ प्रभुनें चाणूर कवळिला हतदैवें[5]; ॥ ७ ॥
विनतासुत[6] सापातें, ॥ चाणूरा फिरवि गरगर तसा; पातें ॥
जों नयनीं न लवेचि, ॥ द्वेषिपतंगायु[7] हरिबलानल[8] वेंचि. ॥ ८ ॥
आफळि भूवरि हातें; ॥ कौतुक दावी जनासि हरि अरिहा[9] तें; ॥
इंद्रध्वजसा[10] पडला; ॥ वांचे अहि[11] काय खगपतिस[12] सांपडला? ॥ ९ ॥
मुष्टिकमद[13] या रामें ॥ हरिला सहजात साधुहृदयारामें[14]; ॥
वधिला रंगांत[15] तळें[16]; ॥ भरिलें रक्तें तदंगभंगांत[17] तळें. ॥ १० ॥
काळपदोत्तरकूट[18] ॥ क्रूर तसा उसळला बळावर[19] कूट[20]; ॥
विंध्यधराधरकूट- ॥ प्रतिभट[21] ये निकट; मूर्त[22] दुर्धर कूट[23]. ॥ ११ ॥
कूटअचळ तोडावा, ॥ हें मनिं येतांचि, रामभुज तो डावा ॥
कृतमुष्टि मिरवि पविता, ॥ रिपु त्द्दन्नयनीं वळेंचि तिमिर विपविता. ॥ १२ ॥
शल तो शलक हरीनें ॥ वधिले कुतुकें, गजेंद्र जेवि हरीनें[24]. ॥
उरले मल्ल न तगती, ॥ पळति, न जाणोनि देवदेव-नतगति[25]. ॥ १३ ॥
जयिं बळदेव हरि खला- ॥ ग्रेसर[26] वधलब्धविजय, लोक हरिखेला[27]; ॥
प्रभुभुजविक्रमसूर्यें[28] ॥ अरितम[29] गिळिलें, ह्मणोनि गर्जति तूर्यें[30]. ॥ १४ ॥
जे गोप-सखे दास ॥ क्रीडति त्यांसीं, मुरारिस[31] सखेदास[31] ॥
अति दुःसह; तो सेना- ॥ मल्लवलक्षय[32] समक्ष बहु सोसेना. ॥ १५ ॥

---

१ वज्र. २ कृष्णीं. ३ कृष्ण. ४ तत्-एव, त्याच. ५ दैवहीन. ६ गरुड. ७ शत्रु-रूपी पतंगाचें आयुष्य. ८ कृष्णबळ हेंच अग्नि. ९ अरि-हा, शत्रूस मारणारा. १० इंद्राच्याध्वजा सारिखा. ११ सर्प. १२ गरुडास. १३ मुष्टिकाचा गर्व. १४ साधु-हृदय- आराम, साधूंच्या हृदयास आल्हादकारक असा जो (बळराम) त्याणें. १५ सभेंत. १६ हाताच्या तळव्यानें. १७ त्याचें-मर्दन करितें वेळेस. १८ काळ-पद-उत्तर-कूट, ' काळ ' या पदाच्या मागून ' कूट ' हें पद जोडिल्या असतां जो शब्द होतो त्याचा जो अर्थ तसा; ह्मणजे ' काळकूट ' =विष. १९ बळरामावर २० या नांवाचा मल्ल. २१ विंध्य -धराधर - कूट-प्रतिभट, विंध्याद्रीच्या शिखरा एवढा उंच व शूर. २२ मूर्तिमान्. २३ कपट. २४ सिंहानें. २५ देवश्रेष्ठ व शरणागतांची गतिच-(कृष्ण) २६ खल - अग्रेसर - वध - लब्ध - विजय, दुष्टांतील मुख्यांस मारण्याकडून जय मिळालें आहे ज्यांस. २७ आनंदला २८ प्रभुभुजाच्या पराक्रम रूपी सूर्यानें. २९ शत्रुरूपी अंधार. ३० वाद्यें. ३१ खेदयुक्त असुरास (कंसास). ३२ सेना व मल्ल यांच्या समुहाचा क्षय

वध कारितिल हें मनिं भें[1], ॥ परि नेत्रें फिरवि तप्ततर[2]हेमानिभें; ॥
तूर्यें वारूनि करें, ॥ बोले तो लेखरिपु[3] शरारु[4] निकरें[5]. ॥ १६ ॥
"उद्वृत्तांचि[6] हे कपिसे[6] ॥ वसुदेवात्मज[7] अनादृतविवेक[8] पिसे; ॥
घाला बाहिर, नगरीं ॥ न वसोत क्षणहि; इष्ट सन्निधि[9] न गरीं[10]. ॥ १७ ॥
जालें पुष्कळ जवळी ॥ द्रव्य ह्मणुनि फार माजले खळ गवळी. ॥
व्यसनें[11] करुनि वांचविलें, ॥ वित्त[12] हरा तें असेल जें सांचविलें.॥ १८ ॥
बांधा नंदा निबरा[13], ॥ गोपांनीं मानिला सुमंदानें वरा. ॥
योग्य न मोकळिकेला ॥ दुर्मति हा; या खळेंचि हो कळि[14] केला. ॥ १९ ॥
आझुनि कां न वधा रे ॥ शौरिस[15]? खड्गाचिया धुवा नव धारे.॥
वधुनि, करा हित साची ॥ आज्ञा हे, मुख्य शत्रु, बाहि[16] तसाचि." ॥ २० ॥
कंसा दुष्टा कुपितां[17] ॥ वाटे वसुदेव शत्रु सुपिता कुपिता[18]. ॥
न शिवति संत तमा[19] जे, ॥ त्यांसि ह्मणे, "हेचि अहितें[20] संतत माजे." ॥ २१
गुरुलंघन हानि, सरे ॥ आयु[21] जिणें; नृप पदांहुनी हा निसरे. ॥
होइल विपरीत मतें ॥ भद्र[22] कसें? ज्ञान दाखवि, परी तम[23] तें. ॥ २२ ॥
दुरुदितें[24] नायकवेचि ॥ क्षांतिधनकण[25] त्रिलोकनायकें[26] वेची; ॥
हरिसाचें[27] टिके, वळघे[28] ॥ मंचीं; कीं कोप चित्त हटि केवळ घे. ॥ २३ ॥
ह्मणती, "मर, पड!," ताळी ॥ वाहुनि, सुरें[29], कंस जैं असी[30] पडताळी[31]. ॥
"कोण ह्मणे मातुळ त्या ॥ व्याघ्रवृकासींहि[32] न जगदधमा[33] तुळत्या[34]?" ॥ २४ ॥
केसरिमथना[35] गजसा ॥ हरिवरि ये कंस; खगवरीं[36] नाग[37] जसा. ॥
धरिला, परि अव[38] रिता[39] ॥ पडला; कीं विमुख[40] विधि[41] धृतिस[42] आवरिता.॥ २५ ॥

---

१ भय. २ तप्ततर-हेम-निभें, फार तापलेल्या सुवर्णासारिखीं ( नेत्रें ). ३ देवशत्रु
४ पापी. ५ अनर्थानें. ६ उन्मत्त, उद्धत, वानरांसारिखे. ७ वसुदेवाचे मुलगे. ८ विवे-
काचा अनादर केला (=टाकिला) आहे ज्यांणीं. ९ जवळपणा; सान्निध्य. १० विषीं. ११ पातक
१२ द्रव्य. १३ उग्रास, वृद्धास. १४ कज्जा. १५ वसुदेवास. १६ बापहि ( उग्रसेनसुद्धा वधूनइ० ).
१७ कोपिष्टास. १८ दुष्ट बाप (चांगला असतांहि वाईट वाटे इ०). १९ अज्ञानास. २० शत्रु. २१
आयुष्य. २२ कल्याण. २३ अज्ञान. २४ दुर्-उदित, दुर्भाषण. २५ क्षमारूपी द्रव्याचा कण.
२६ कृष्ण. २७ सिंहासारिखा. २८ चढे. २९ देव. ३० तरवार. ३१ हातांत तयार धरी; हा
लवी. ३२ वाघ, व लांडगा यांसीं. ३३ लोकांत पातकी. ३४ तुलना पावणाऱ्यास. ३५ सिंहवध
करण्यासाठीं. ३६ गरुडावर. ३७ सर्प. ३८ अवसान. ३९ रिकामा. ४० प्रतिकूल. ४१ देव
४२ धैर्यास.

खड्गवरा[1] नागविया ॥ धरुनि उभा, परि हरी खळा नागवि या. ॥
कवळुनि केश, वनींच्या ॥ तरुपरि रंगांत लोटि केशव नीचा. ॥ २६ ॥
धरुनि रिपू ढकलीला ॥ न उठे, जो पतित[2] कंस मूढ कलीला[3]. ॥
वरि पडला शतकोटि- ॥ ब्रह्मांडाश्रय[4], नगीं[5] जसा शतकोटि[6]. ॥ २७ ॥
हरिभारें असुजाती[7] ॥ दडपे, रंगांत तत्क्षणीं असु[8] जाती. ॥
विक्रम तो ढिग जाला ॥ क्षितिवरि त्या सिंह जेविं ओढि गजाला. ॥ २८ ॥
खळ वधितां हा हेती[9]- ॥ विण, शब्द उठे जनाननीं[10] "हाहेति.[11]" ॥
ह्मणती, "मावळि[12] याला ॥ रविला, अस्ताद्रिकृष्ण[13], मावळियाला[14]." ॥ २९ ॥
धाकें अशनीं[15], शयनीं[16], ॥ पानीं[17], यानीं[18], वनीं, जनीं, मनीं, नयनीं, ॥
हरि पाहे परें[19]; मरणीं ॥ होय हरिच; वरि अरींहि[20] गति परम रणीं! ॥ ३० ॥
कंकाद्यष्ट अनुजनीं[21] ॥ निरखुनि रंगीं व्यसु[22] स्वबंधुतनु[23] जनीं, ॥
अनृण्यार्थ[24], उसळिती ॥ असिअहि[25], रिपुरक्त[26] जे, धरुनि हउस, पिती. ॥ ३१ ॥
फेडाया स्नेहरिण ॥ भ्रात्याचें धांवले चि, परि ते हरिण; ॥
यदुसिंहें[27] बळभद्रें ॥ देखिलिया, केविं तगति असु, बळ, भद्रें[28]? ॥ ३२ ॥
उठले समरा[29]; मांजे ॥ कलह; न जाणति कृतांतसम रामा जे. ॥
बळदहनीं[30] शलभांनीं[31] ॥ पडिजेलें त्या विनष्टकौशलभानीं[32]. ॥ ३३ ॥
सानुज[33] कंस खपविला ॥ जेणें, त्यां[34] स्तवि, न त्या, शचीसखें[35], पविला[36]; ॥
घेउनि आशु[37], भवादि[38] ॥ त्रिदश[39] करिति पुष्पवृष्टिला शुभवादी[40]. ॥ ३४ ॥
अवकाश गगनिं रसितीं[41] ॥ स्वर्भेरीच्या[42] उरेचि न मग निरसितीं[43]; ॥

---

१ खड्गश्रेष्ठास. २ पडलेला, पातकी. ३ कडजाला. ४ शतकोटी ब्रह्मांडांचा आश्रय (कृष्ण). ५ पर्वतावर ६ वज्र. ७ अ-सुजाति, सु नाहीं जाति ज्याची, दुर्जन्मा. ८ प्राण. ९ शस्त्राविण. १० जनआननीं, लोकांच्या तोंडीं. ११ हा-हा- इति, हा! हा! याप्रकारचा. १२ मावळे असें करी. 13 कृष्णरूपी अस्ताचल. १४ मावळ्यास. १५ खाण्यांत, १६ निजेंत; १७ पिण्यांत, पितेवेळीं. १८ गमनीं. १९ शत्रु (कंस). २० शत्रुहि. २१ कंकइत्यादि आठ धाकटे बंधु. २२ वि-असु, गतप्राण. २३ आपल्या बंधूंचें शरीर. २४ उपकाररूपी ऋण फेडण्या करितां. २५ तरवार-रूपी सर्प २६ शत्रूचें रक्त. २७ कृष्णें. २८ प्राण, सामर्थ्य, व कल्याण, हीं. २९ युद्धास. ३० बळरामरूपी अग्नींत. ३१ टोळांनीं. ३२ नष्ट जाहालें आहे कौशल व भान ज्यांचें असे जे त्यांनीं. ३३ बंधूंसह. ३४ कृष्णास. ३५ इंद्र. ३६ वज्रास. ३७ लौकर. ३८ सांबादि ३९ देव.' ४० शुभ बोलणारे. ४१ नादांनीं. ४२ स्वर्गीच्या नगाऱ्याच्या. ४३ फेकलेल्यांनीं. ('रसितीं' याचें विशेषण )

संसृतिचीं[1] वरदेयशें[2] ॥ गाती गंधर्व तद्वधूससमुदय[3] शें.[4] ॥ ३५ ॥
भोजेंद्ररसावरजा[5] ॥ मारी साग्रजजगत्पती[6] सावरजा[7]; ॥
करिति चिर[8] विलापा त- ॥ दार[9]; ह्मणति, "जाहलाचि रविला पात[10]! ॥ ३६ ॥
मन जरि नाका[11] जाया ॥ उत्कंठित, यार सोडिना कां जाया? ॥
त्यजुनि स्त्री वसु[12] जाणें ॥ केलें कां कठिन करुनि जीव सुजाणें? ॥ ३७ ॥
हें अघ[13] बहुविध; 'वांचा,' ॥ प्राण ह्मणति, घात करिति बहु विधवांचा; ॥
जाचिति हे हितरिपुसे[14]; ॥ आह्मा मृत्यु न, जरि स्तवूंहि तरि, पुसे! ॥ ३८॥
छाया कसि तग तरुची ॥ धरिल तरुविगें? पुरीसहित विगतरुचि[15] ॥
जालें तुजवांचोनी; ॥ अवलंबावा[16] विलापभुज[17] वांचोनी! ॥ ३९ ॥
स्त्री, जैशा अपरिचिर्ता,[18] ॥ त्यजिल्या; शय्येचि[19] होति याउपरि चितां[20]! ॥
मृत्यु गमे रुसवा. हे ॥ भीरुमती[21] केवि शोकमेरुत[22] वाहे? ॥ ४० ॥
न सुखकर क्षण भूतें[23] ॥ जालासि, न पावलींच रक्षण भूतें[24]; ॥
सुकृततरुफळदशेतें[25] ॥ भोगिसि; बीजानुरूपचि फळद शेतें! ॥ ४१ ॥
प्रस्थानीं[26] धव[27] पुसती, ॥ सांत्विति; हीं स्मरति तूज न स्ववपु[28] सती. ॥
नेले भाउचि; तगती ॥ न तदसु[29]; हे स्त्रीस वल्लभा! उचित गति!" ॥ ४२ ॥
"हानि असीमा[30] मीचि"; ॥ "व्यथा हरूं" हरि ह्मणे, "असी मामीची;" ॥
योजुति सामा, वळणी ॥ आणी त्या विकळमानसा[31] मावळणी. ॥ ४३ ॥
मृतसंस्कार करविती ॥ सद्गतिनलिनि[32]–प्रबोधकारकरवि तो ॥
आप्तसदाचा[33]; राशी ॥ करुणेचा, त्यजिल कां सदाचाराशी[34]? ॥ ४४ ॥
पितरांच्या भवनिगडा-[35] ॥ सह तोडी देव दीनबांधव निगडा[36]; ॥

---

१ संसाराचीं. २ कृष्णयशें ३ स्वस्त्रीयांसह. ४ शेंकडो. ५ भोज-इंद्र-रसावर-जा, भोजकुळाचा राजा उग्रसेन त्याच्या पुत्रास (कंसास). ६ स. अग्रज=बळरामासह. ७ बंधूंसह; ( 'भोजेंद्ररसावरजा' याचें विशेषण). ८ फार वेळ पर्यंत. ९ तत् दार, त्याची बायको; किंवा बायका. १० पतन. ११ स्वर्गास. १२ द्रव्य, संपत्ति. १३ पातक. १४ हितशत्रु; हित सांगून नाश करणारे. १५ तेजोहीन १६ आश्रय करावा. १७ शोकाचा भुज. १८ अनोळखी. १९ बिछानें. २० स्मशानभूमि. २१ भ्यालेली मति. २२ शोकरूपी मेरुपर्वतास. २३ पृथ्वीतें. २४ प्राणी, प्रजा. २५ पुण्यरूपी वृक्षाचें फळच अशी अवस्था. २६ बाहेर जातांना. २७ नवरे. २८ आपलें शरीर. २९ त्यांचे प्राण. ३० अमर्याद. ३१ कलाहीन आहेत मानसें ज्याचीं. ३२ सद्गतिरूपी कमळणीस जागी करणारा सूर्य. ३३ आप्तसमुहाचा ( संस्कार ) ३४ सत् आचारासी. ३५ संसाररूपी बिड्यांसह. ३६ बिड्या.

खड्गवरा[1] नागविया ॥ धरुनि उभा, परि हरी खळा नागवि या. ॥
कवळुनि केश, वनींच्या ॥ तरुपरि रंगांत लोटि केशव नीचा. ॥ २६ ॥
वरुनि रिपू ढकलीला ॥ न उठे, जो पतित[2] कंस मूढ कलीला[3]. ॥
वरि पडला शतकोटि- ॥ ब्रह्मांडाश्रय[4], नगीं[5] जसा शतकोटि[6]. ॥ २७ ॥
हरिभारें असुजाती[7] ॥ दडपे, रंगांत तत्क्षणीं असु[8] जाती. ॥
विक्रम तो ढिग जाला ॥ क्षितिवरि त्या सिंह जेविं ओढि गजाला. ॥ २८ ॥
खळ वधितां हा हेती[9]- ॥ विण, शब्द उठे जनाननीं[10] "हाहेति.[11] " ॥
ह्मणती, "मावेळि[12] याला ॥ रविला, अस्ताद्रिकृष्ण[13], मावळियाला[14]." ॥ २९ ॥
धाकें अशनीं[15], शयनीं[16], ॥ पानीं[17], यानीं[18], वनीं, जनीं, मनीं, नयनीं, ॥
हरि पाहे परें[19]; मरणीं ॥ होय हरिच; वरि अरीहि[20] गति परम रणीं! ॥ ३० ॥
कंकाद्यष्ट अनुजनीं[21] ॥ निरखुनि रंगीं व्यसु[22] स्वबंधुतनु[23] जनीं, ॥
अनृण्यार्थ[24], उसपिती ॥ आसिअहि[25], रिपुरक्त[26] जे, धरुनि हउस, पिती. ॥ ३१ ॥
फेडाया स्नेहरिण ॥ भ्रात्याचें धांवले चि, परि ते हरिण; ॥
यदुसिंहें[27] बळभद्रें ॥ देखिलिया, केविं तगति असु, बळ, भद्रें[28]? ॥ ३२ ॥
उठले समरा[29]; मांजे ॥ कलह; न जाणति कृतांतसम रामा जे. ॥
बळदहनीं[30] शलभांनीं[31] ॥ पडिजेलें त्या विनष्टकौशलभानीं[32]. ॥ ३३ ॥
सानुज[33] कंस खपविला ॥ जेणें, त्यां[34] स्तवि, न त्या, शचीसखें[35], पविला[36]; ॥
घेउनि आशु[37], भवादि[38] ॥ त्रिदश[39] करिति पुष्पवृष्टिला शुभवादी[40]. ॥ ३४ ॥
अवकाश गगनिं रसितीं[41] ॥ स्वर्भेरींच्या[42] उरेचि न मग निरसितीं[43]; ॥

---

१ खड्गश्रेष्ठास. २ पडलेला, पातकी. ३ कडजाला. ४ शतकोटी ब्रह्मांडांचा आश्रय (कृष्ण). ५ पर्वतावर ६ वज्र. ७ अ-सुजाति, सु नाहीं जाति ज्याची, दुर्जन्मा. ८ प्राण. ९ शस्त्राविण. १० जनआननीं, लोकांच्या तोंडीं. ११ हा-हा- इति, हा! हा! याप्रकारचा. १२ मावळे असें करी. १३ कृष्णरूपी अस्ताचल. १४ मावळ्यास. १५ खाण्यांत, १६ निजेंत; १७ पिण्यांत, पितेवेळीं. १८ गमनीं. १९ शत्रु (कंस). २० शत्रुहि. २१ कंकइत्यादि आठ धाकटे बंधु. २२ वि-असु, गतप्राण. २३ आपल्या बंधूचें शरीर. २४ उपकाररूपी ऋण फेडण्या करितां. २५ तरवार-रूपी सर्प २६ शत्रूचें रक्त. २७ कृष्णें. २८ प्राण, सामर्थ्य, व कल्याण, हीं. २९ युद्धास. ३० बळरामरूपी अग्नींत. ३१ टोळांनीं. ३२ नष्ट जाहालें आहे कौशल व भान ज्यांचें असे जे त्यांनीं. ३३ बंधूंसह. ३४ कृष्णास. ३५ इंद्र. ३६ वज्रास. ३७ लौकर. ३८ सांबादि ३९ देव.' ४० शुभ बोलणारे. ४१ नादांनीं. ४२ स्वर्गींच्या नगाऱ्याच्या. ४३ फेकलेल्यांनीं. ('रसितीं' याचें विशेषण)

संसृतिचीं[१] वरदेयशें[२] ॥ गाती गंधर्व तद्बधूससमुदय[३] शें[४]. ॥ ३५ ॥
भोजेंद्ररसावरजा[५] ॥ मारी साग्रजजगत्पती[६] सावरजा[७]; ॥
करिति चिर[८] विलापा त- ॥ द्दार[९]; ह्मणति, "जाहलाचि रविला पात[१०]! ॥ ३६ ॥
मन जरि नाका[११] जाया ॥ उत्कंठित, यार सोडिना कां जाया? ॥
त्यजुनि स्त्री वसु[१२] जाणें ॥ केलें कां कठिन करुनि जीव सुजाणें? ॥ ३७ ॥
हें अघ[१३] बहुविध; 'वांचा,' ॥ प्राण ह्मणति, घात करिति बहु विधवांचा; ॥
जाचिति हे हितरिपुसे[१४]; ॥ आह्मा मृत्यु न, जरि स्तवूंहि तरि, पुसे! ॥ ३८॥
छाया कसि तग तरुची ॥ धरिल तरुविगें? पुरीसहित विगतरुचि[१५] ॥
जालीं तुजवांचोनी; ॥ अवलंबावा[१६] विलापभुज[१७] वांचोनी! ॥ ३९ ॥
स्त्री, जैशा अपरिचिता[१८], ॥ त्यजिल्या; शय्योंचि[१९] होति याउपरि चिता[२०]! ॥
मृत्यु गमे रुसवा. हे ॥ भीरुमती[२१] केवि शोकमेरुस[२२] वाहे? ॥ ४० ॥
न सुखकर क्षण[२३] भूतें ॥ जालासि, न पावलींच रक्षण भूतें[२४]; ॥
सुकृततरुफळदशेतें[२५] ॥ भोगिसि; बीजानुरूपचि फळद शेतें! ॥ ४१ ॥
प्रस्थानीं[२६] धव[२७] पुसती, ॥ सांविति; हीं स्मरति तूज न स्ववपु[२८] सती. ॥
नेले भाउचि; तगती ॥ न तदसु[२९]; हे स्त्रीस वल्लभा! उचित गति!" ॥ ४२ ॥
"हानि असीमा[३०] मीचि" ; ॥ "व्यथा हरूं" हरि ह्मणे, "असी मामीची;" ॥
योजुनि सामा, वळणी ॥ आणी त्या विकळमानसा[३१] मावळणी. ॥ ४३ ॥
मृतसंस्कार करविती ॥ सद्गतिनलिनि[३२]-प्रवोधकारकरवि तो ॥
आप्तसदाचा[३३]; राशी ॥ करुणेचा, त्यजिल कां सदाचाराशी[३४]? ॥ ४४ ॥
पितरांच्या भवनिगडा-[३५] ॥ सह तोडी देव दीनबांधव निगडा[३६]; ॥

---

१ संसाराचीं. २ कृष्णयशें ३ स्वस्त्रीयांसह. ४ शेकडो. ५ भोज-इंद्र-रसावर-जा,भोजकुळाचा राजा उग्रसेन त्याच्या पुत्रास(कंसास). ६ स· अग्रज=बळरामासह. ७ बंधूंसह; ('भोजेंद्ररसावरजा' याचें विशेषण). ८ फार वेळ पर्यंत. ९ तत् दार, त्याची बायको; किंवा बायका- १० पतन. ११ स्वर्गास. १२ द्रव्य, संपत्ति. १३ पातक. १४ हितशत्रु; हित सांगून नाश करणारे. १५ तेजोहीन १६ आश्रय करावा. १७ शोकाचा भुज. १८ अनोळखी. १९ बिछानें. २० स्मशानभूमि. २१ भ्यालेली मति. २२ शोकरूपी मेरुपर्वतास. २३ प्रथमतें. २४ प्राणी, प्रजा. २५ पुण्यरूपी वृक्षाचें फळच अशी अवस्था. २६ बाहेर जातांना. २७ नवरे. २८ आपलें शरीर. २९ त्यांचे प्राण. ३० अमर्याद. ३१ कलाहीन आहेत मानसें ज्याचीं. ३२ सद्गतिरूपी कमळणीस जागी करणारा सूर्य. ३३ आप्तसमुहाचा (संस्कार) ३४ सत् आचारासी. ३५ संसाररूपी बिड्यांसह. ३६ बिड्या.

पुत्र चिदुदधी[1] नमने ॥ करिति गुरुपदीं[2] लवोनि मुदधीन[3] मनें. ॥ ४५ ॥
'यन्मायां[4] विश्व रची ॥ ते हे, न स्वसुत मनुज, जगदीश्वरचि, ॥
ऐसें जाणुनि पितरें ॥ भेटति, न स्वांत होय शंकित भितरें. ॥ ४६ ॥
कळवी संयुगलीला-[5] ॥ तत्व ह्मणुनि जोडिति[6] स्वकरयुगलीला.[7] ॥
श्रम न मनांमधिल टिके. ॥ तम[8] हरितिल न, तरि दिव्यधामधि[9] लटिके. ॥ ४७ ॥

॥ ॥ इतिश्रीमत्कृ० चतुश्चत्वारिंश० ॥ ४४ ॥ ॥

स्वार्थीतोटाकाविजे ॥ होऊं देती नह्मणति तोटांकविजे ॥
निजपरहितसाधूनी ॥ स्वस्छतरिनानिर्भिलेजनसिाधूनी ॥ १ ॥
"न मुतमुखरुचिद[10], धिग मी!" ॥ कृष्ण ह्मणे "नाडिलेचि गुरु चिदधिगमीं[11]."
हा योग्य नसे उमज ॥ क्षण, याचें पुत्र ह्मणुनि, मन सेउ मज. ॥ २ ॥
तात सदार[12] समीहा[13] ॥ हेचि धरूं इच्छितो; सदा रस मी हा ! ॥
पुत्रप्रेमाचि शुभ[14] तें ॥ दुर्लभ लोकीं जसें सुरभिचें[15] दुभतें. ॥ ३ ॥
वंदिल माथां बातें[16] ॥ ज्ञान; स्मरतां यदूत्तमा, 'थांबा'[17], तें ॥
न ह्मणत, सन्नत[18] यातें[19] ॥ होइल हें[20] वशचि, मी प्रसन्न तयातें." ॥ ४ ॥
करुनि वीचार असा, या ॥ पितरीं, मायेसि करि निदेशा[21] असाया; ॥
कीं, "पुत्रप्रेमातें ॥ धरुनी, सेवुत सुखांबुधी[22] ते मातें." ॥ ५ ॥
दुःखशमन मायेनें[23], ॥ पितरांचें, करुनि विवशमन मायेनें[24], ॥
बोले मोहकरीती; ॥ ते शब्द मुदब्दें[25], हरिति मोह, करीती. ॥ ६ ॥
"हे अंब! अहो तात! ॥ क्लेश असे या मनास बहु होतात; ॥
येउनि भवदुदरातें[26] ॥ सुख न दिलें लेश हरुनि शत्रुदरातें[27]. ॥ ७ ॥
चिंता या वाळविला[28] ॥ पाळूनि तुह्मी स्वदेहतरु[29] वाळविला. ॥

---

१ चित्-उदधि, ज्ञानसागर. २ वडिलांच्या पायीं. ३ मुत्- अधीन आनंदाच्या स्वाधीन. (' मनें' याचें विशेषण. ) ४ ज्यांची माया: ५ युद्धलीलेचें तत्व, कारण. ६ याचा कर्ता ' पितरें.' ७ दोनहि हातास. ८ अज्ञान. ९ दिव्यधामकोश. १० पुत्रसुखाची रुचि देणारा. ११ चित्- अधिगमीं, चिद्प्राप्तिविषयीं. १२ स्त्रीसह. १३ सम्-ईहा, सुबुद्धि. १४ कल्याण. १५ कामधेनूचें. १६ वसुदेवास. १७ मजला. १८ नम्र. १९ वसुदेवातें २० ज्ञान. २१ आज्ञा. २२ सुखसागरास २३ ममतेनें, भक्तीनें. २४ मोहानें. २५ मुत्-अब्द, सुखाचे मेघ. २६ भवत्-उदरानें, तुझ्या कुसीस. २७ शत्रुभयास, २८ लांकूड इ० पोखरणारे एक प्रकारचे प्राणी. २९ निजदेहरूपी झाड.

पाश गळां तो कांचे; ॥ वध अनुभविले सुदुर्बळा[1] तोकांचे[2]! ॥ ८ ॥
नाहीं आबाल[3] पण, ॥ स्वसुताचें पाहिलें नसतां बाळपण; ॥
अमृत जयांत अनुभवी[4] ॥ सुरदुर्लभ[5] पावती कृतार्थजनु[6] भवी[7]. ॥ ९ ॥
आह्मीं दैवहतांनीं ॥ निजपितृगृहवास[8] बहुसुखावह, तानीं ॥
ज्यांत सुरभवन[9] वसुंधा[10] ॥ गणिति, न तो पाहिला, जयांत नव सुधा[11]. ॥ १० ॥
सकळार्थदकृतिकाय-[12] ॥ प्रदपितरांची फिटेल उपकृति[13] काय? ॥
ज्याला चिंतुनि गमजे[14] ॥ त्यजिति विषयिकामपूरकस्वरगम[15] जे. ॥ ११ ॥
शुश्रूष[16], भला, भजनीं ॥ रत पितरांच्या, तयासि शुभ लाभ[17] जनीं. ॥
ऋण न फिटे परिसाचें, ॥ हेम[18] कसें होय हो! अनृण[19] परि, सांचें[20]? ॥ १२ ॥
पुत्र समर्थ[21] न देहें वित्तें[22] ॥ पितरांसि जीविकेसि न दे, हें ॥
अघ[23], त्या ने अध[24]; मांसें[25] ॥ स्वीयचि[26] खाणे पडे पुढें अधमास. ॥ १३ ॥
हें कंसा राज्याचें ॥ करणें, भय मानि लोक सारा ज्याचें; ॥
सुहृदांच्या[27] अंतरतें[28] ॥ भूपें पडलें, क्षमा करा, अंतर तें. ॥ १४ ॥
पोष्यजनासि[29] न पोषी, ॥ जीवंतहि तो असोनियां शव[30] दोषी. ॥
आह्मां घडलें कांहीं ॥ न भजन; दिधलें न सुख उघड लेंकांहीं." ॥ १५ ॥
तीं परम गभीर हितें ॥ प्रभुवागमृतें[31] पिऊनि मग भीरहितें[32] ॥
त्हृदयें, डिंभ[33] द्रवती ॥ मानुनि, दोघें विभूक्ति[34] असि भद्रवती[35]. ॥ १६ ॥
वाटति कायज[36]; नातें ॥ हें मोहक ठाउकें न काय जनातें? ॥
अंकीं[37] स्थापुनि, शिशिरीं[38] ॥ वर्षति नेत्रोदकीं स्वसुखराशिशिरीं[39]. ॥ १७ ॥

---

१ बळहीनाचे. २ मुलांचें. ३ विपत्ति. ४ अनुभव आलेला ( 'भवी' याचें विशेषण. ) ५ देवांसहि अलभ्य. ६ कृतकृत्य आहे जन्म ज्याचें ७ संसारांत अस-लेले प्राणी. ८ आपल्या आईबापांच्या घरीं राहणें. ९ देवलोक. १० पृथ्वी. ११ अमृत. १२ सकळार्थदकृति काय-प्रद-पितरांची, सर्व अर्थ देणारी कृति आहे ज्याची असा जो देह, तो देह देणारीं जी पितरें, त्यांची ( उपकृति ). १३ उपकार. १४ हावभाव, डौल. १५ विषयी-काम-पूरक-स्वर्-अगम, विषयी लोकांची इच्छा पुरविणारे कल्पतरु. १६ सेवा करणारा. १७ कल्याणाचा लाभ. १८ सुवर्ण. १९ ऋण न फेडलेलें. २० मुक्त. २१ द्रव्यवान्, शक्तिमान् २२ द्रव्यानें. २३ पातक. २४ खालीं, अधोगतीस. २५ मांस. २६ आपलेंच. २७ आप्तांच्या. २८ अंत-रतें, नाशाविषयीं रत, तत्पर असा जो 'भूप' त्याच्या योगानें इ० २९ पाळण करण्यास योग्य. ३० प्रेत. ३१ प्रभुवाक्-अमृतें, कृष्णाचीं वचनें हींच अमृतें. ३२ निर्भय. ३३ मुलगे. ३४ विभु-उक्ति, कृष्णाचें वचन. नी ३५ कल्याणकारक, शुभ; योग्य. ३६ तनु-ज, मुलगे असे. ३७ मांडीवर. ३८ शीतल अशा. ३९ आपल्या सुखाचे राशि असे जे बळ-कृष्ण त्यांच्या शिरावर.

जननीजनक[1]मनीं या ॥ भरल्या सुखसिंधु[2]मूर्ति जनकमनीया[3]. ॥
तनुजयुग[4] अमृतसर[5] तें; ॥ तापत्रय जाहलेंचि देखत सरतें. ॥ १८ ॥
पूज्य सदा जो बाला[6], ॥ करि यदुनृप उग्रसेन आजोबाला. ॥
"करुं पद भजना तूतें ॥ उचित" ह्मणे हरि, "अभीष्ट[7] मज नातूतें. ॥ १९ ॥
मी तव किंकर[8]; भारा ॥ वाहिन; देतील नमुनि सुर करभारा; ॥
योग्य विमानवरा[9] जे, ॥ ते भजतिल; मग न केविं मानवराजे[10]?" ॥ २० ॥
मग आणवि वरदेश[11] ॥ स्वजना, ज्यां नृपभयें दिला परदेश; ॥
त्यांस वदे, वसुधा[12], "मी ॥ तुमचा," दे द्रव्य, वसवि, देव सुधामीं[13]. ॥ २१ ॥
अमृतरससुखें[14] दुभले[15] ॥ स्वजनचकोरीं[16] बळाच्युतमुखेंदु[17] भले; ॥
ताप न लेश तशांचे ॥ उरति कुभूपातपें[18] दिले शतशांचें. ॥ २२ ॥
हरि रीती दावि नवी; ॥ प्रांजलि[19] साग्रज[20] सबाष्प[21] नंदा विनवी, ॥
कीं तो वा पहिला; जे ॥ वत्सलता, तीस शौरि वापहि लाजे? ॥ २३ ॥
"करुणासरिदोघानीं[22] ॥ तात! तुह्मीं वृद्धभाव परि, दोघांनीं ॥
आधि[23] अजी! वाहूनी, ॥ प्रिय केलें रक्षुनि स्वजीवाहूनि. ॥ २४ ॥
स्वमुखें बोलाल न तें ॥ रक्षण, पोषप्रकार तो, लालन तें, ॥
नित्यनिरवधिक[24] तो कीं ॥ प्रेमा, आत्म्यापरीसाहि अधिक तोकीं[25]! ॥ २५ ॥
रक्षाक्षम[26] निज जन; कीं ॥ नृपभीतें[27] त्यागिलेहि जननीजनकीं. ॥
आह्मां बाळां अवनी[28]- ॥ वरि पितर तुह्मी च पोषणीं पटु[29] अवनीं[30]. ॥ २६ ॥
तुमची दृष्टि नवि सर ॥ प्रेमघनांची[31], तिचा पडेल न विसर. ॥
अमृताचें अनवें[32] सरें[33] ॥ त्वद्गृह[34] या; यानें[35] तेथ मज अनवसर[36]. ॥ २७ ॥

---

१ आईबापांच्या मनांत. २ सुखसागराच्या मुर्त्ति. ३ जनांत सुंदर. ४ दोन मुलगे. ५ अमृताचें तळें. ६ बापाला, (वसुदेवाला). ७ इच्छित. ८ दास. ९ श्रेष्ठ विमानास. १० भूप ११ वरद-ईश, कृष्ण. १२ पृथ्वी, जमीन. १३ उत्तम घरांत. १४ अमृत रसासमान सुखें. १५ प्रसवले, देते जहाले. १६ आप्तलोकरूपी चकोरांस. १७ बळराम व कृष्ण यांचीं मुखें हेच चंद्र. १८ कु- भुप-आतपें, कंसरूपी सूर्यानें. १९ हात जोडून. २० स-अग्रज, बळरामासह. २१ डोळ्यांत अश्रु आले आहेत असा. २२ करूणा-सरित्-ओघांनीं, करूणा रूपीनद्यांच्या ओघांनीं. २३ मनोश्रम, कष्ट. २४ नेहमीं व अमर्याद. २५ बाळकीं. २६ रक्षण करण्यास योग्य. २७ कंसास भ्यालेल्या. २८ पृथ्वीवर. २९ कुशल. ३० रक्षणीं. ३१ प्रेम-(प्रीति-) रूपी मेघानीं. ३२ फार दिवसांचें. ३३ तळें. ३४ स्वत्-गृह, तुझें घर. ३५ गमन. ३६ अकाळचें, अनियमित.

कसें चित्त दुखविलें ॥ सुहृदांचें; म्या न तें यथेष्ट[1] सुखविलें. ॥
इष्टरसद[2] या लोकां ॥ होइन, तुमच्याहि पात्र सदयालोकां.[3] ॥ २८ ॥
न करिं विलंबा बा! जे ॥ मत्प्राणा[4] ते न धरु मंदवा[5] बाजे.[6] ॥
पद-मुदुदधि[7] देखाया ॥ येइन; मागेन साय, दधि; दे खाया! ॥ २९ ॥
'मेला, मारक राजा; ॥ निज गोवत्सांसि आकुमार[8] करा, जा,' ॥
ह्मणतो राम, 'जतन या; हेंचि मनीं याचि, द्या वरा मज तनया.' ॥ ३०
एसी सांत्वनवाणी[9] ॥ हरि बोले, जींत मधुरतेसि न वाणी.[10] ॥
भोजकुलकलंकारी[11] ॥ स्वपित्यासह बल्लवांसिहि[12] अलंकारी. ॥ ३१ ॥
जें कां कांसें, पितळ ॥ स्वच्छ तयांचीं सुरम्य[13] पात्रें नितळ, ॥
कांति जयांवरि झळके ॥ ऐसीं दे बहु; न ज्यांत गोरस[14] कळके. ॥ ३२ ॥
नंद, "स्वसुखा[15] या मी ॥ पुसों," ह्मणे ये परंतु न मुखा "यामी;[16]" ॥
वाट फुटे कसि? रोधी ॥ वाणी ते शोकबाष्परुद्धासरोधी.[17] ॥ ३३ ॥
देतां परिरंभ[18], गळे ॥ दाटति; नेत्रांतुनींहि अंभुदंभ[19] गळे. ॥
नंदादि अनघ[20] राशी ॥ दुःखाचे वरिति; जाय न मन घराशी! ॥ ३४ ॥
[21]कृष्णसुखनिधी राहे; ॥ विरहें धरिती न गोप मनिं धीरा हे. ॥
होय अपाय नवा; हे ॥ [22]असिधारा वाट काय! पाय न वाहे. ॥ ३५ ॥
न धरावा विश्वास ॥ स्त्रीचा हें टाउकें असे विश्वास; ॥
कीं मथुरेनें, जवळी ॥ येतां सर्वस्व हरुनि ठकविले गवळी. ॥ ३६ ॥
स्वस्थानींचनगमनीं ॥ देवेंदिधला न तर्किलाच्चि नगमनीं ॥
होयमहाउत्सवघे ॥ ज्याचा तो तेविगोप भासति अवघे. ॥ ३७ ॥
पुत्रविरह वेहळ[23] हळ[24] ॥ स्वांतें[25] विदारी; करी व्रजेश[26] हळहळ. ॥

---

१ यथा-इष्ट, मनासारिखें. २ इच्छित सुख देणारे. ३ सदय-आलोकां, सदय अशा अव-
लोकनांस. ४ ममप्राणरूपी असो जी. ५ मत्-अंबा माझीआई. ६ मंचकास; 'बाजेस धरणें'
ह्मणजे विरहानें अस्वस्थ होऊन बिछान्यावर पडून राहणें. ७ मुत्-उदधि. आनंदसागर.
८ मुळांपासून किंवा सहित. ९ समजाविसीचीं वचनें. १० उणें, ऊनत्व. ११ भोज-कुल-कलंक-
अरि, भोजकुलांतील कलंकच (डाग) असा जो कंस त्याचा शत्रु. १२ गवळ्यांस. १३ सुंदर.
१४ दुभतें. १५ कृष्णास. १६ सं० जातों. १७ शोकाश्रूंनीं रोधिलेली आहे मान किंवा गळा
ज्याचा. १८ आलिंगन. १९ अमुत्-अंभ, दुःखाश्रु. २० न-अघ, निर्मळ, पापरहित. २१ कृष्णरू-
पी सुखाचें भांडार. २२ तरवारीची धार. २३फार मोठा.२४ नांगर.२५अंतःकरण. २६ नंद.

तो तेथुनि जावासा ॥ समय नव्हे, पावला परि [1]निजावासा. ॥ ३८ ॥
[2]शौरी [3]गर्गाकरवीं ॥ द्वि[4]जातिसंस्कार आत्म[5]जांचे करवी; ॥
कथिलीं जीं वेदानें, ॥ तीं सत्पात्रीं समस्तही दे दानें. ॥ ३९ ॥
सांदीपिनि[6]भवनीं ब[7]टु ॥ प्रभु वसती ( ब्रह्मचर्य ते [8]भव निवटू; ) ॥
सर्व[9]ज्ञानखनि गदा- ॥ [10]ग्रज [11]साग्रज घे;- दुजा न गुरु[12]मुखोनिगदा? ॥ ४० ॥
अद्भुत अभ्यास; कला, ॥ विद्या, शिकले भजोनि सभ्या, सकला; ॥
दोघे भाउ करीती ॥ कौतुक; दाविति जनास [13]भावुकरीती. ॥ ४१ ॥
प्रभुमत कीं, ‘ [14]महि माजे, ॥ प्रिय[15]सत्यहितोक्ति साधुनि[16]गमहि माजे ॥
सांगति; आचरण तरी ॥ करूं; तरो जन धरूनि गुरुचरण[17]तरी. ’ ॥ ४२ ॥
[18]प्रणत [19]शुचि सदा सत्वें ॥ भजति, धरुनि गुरुपदीं रुचिस, दासत्वें; ॥
ह्मणुनि अवंती[20]वासी ॥ दे ज्ञान, कृतार्थ जें करी [21]जीवांसी. ॥ ४३ ॥
गुरुसि गमे [22]धात्याची ॥ विश्वाच्या अद्भुताचि [23]मेधा [22]त्याची. ॥
न बहुत अभ्यास, कळा, ॥ दिवसांतचि धरिति, त्या अलभ्या सकळा. ॥ ४४ ॥
विनविति [24]विप्रा ज्ञाते, ॥ द्याया गुरुदक्षिणा, [25]कोवि. [26]प्राज्ञा ते ॥
स्वस्त्री; ब्राह्मण तीतें ॥ सांगे जें शिष्य आपणा ह्मणती तें. ॥ ४५ ॥
“अतुळ [27]प्रतिभा, उमज, ॥ [28]द्युति यांची; [29]ईशसे गमति भाउ मज; ॥
जरि [30]नरबाळवपु, ॥ सती! प्रभु हे, ” ब्राह्मण ह्मणे, “ [31]स्वअभिमत पुसती. ॥
ईश्वर हे; महिम्यातें ॥ जाणोनि, [32]अनर्घ्य रत्न हेमहि[33] म्या तें ॥
कांहीं न [34]छात्रांसी ॥ मागितलें; कीं मनास इच्छा त्रासी. ॥ ४७ ॥
[35]त्वद्वांछा ब्राह्मणि! जे ॥ कळली; ‘द्या सिंधु[36]मग्नपुत्रा’ ह्मणिजे. ॥

---

१ स्वस्थानास, गृहास. २ वसुदेव. ३ गर्गमुनीच्या हातांनीं. ४ ब्राह्मणसंस्कार, व्रतबंध. ५ मुलांचें. ६ सांदीपिनि नामक गुरूच्या घरीं. ७ ब्रह्मचारी. ८ संसार. ९ सर्व ज्ञानाची खाण, १० कृष्ण. ११ बळरामासह. १२ गुरुमुखापासून उपदेशास. १३ भक्तरीति. १४ पृथ्वीलोक. १५ प्रिय, सत्य, आणि हितकारक असीं वचनें. १६ साधु आणि वेद. १७ गुरुचरणरूपी नौका. १८ नम्र. १९ शुद्ध. २० सांदीपिनि. २१ संसारी जनास. (हें एक वचन आहे; परंतु अनेकार्थींच उपयो-गिलें आहे; यास “ जात्येकवचन ” असें ह्मणतात ). २२ धारण करणाऱ्याची ( कृष्णाची ). २३ बुद्धि. २४ सांदीपिनीस. २५ चतुर; हें “ ज्ञाते ” ( = कृष्ण व बळराम ) यानें विशेषण आहे. २६ बुद्धिमान् (“स्वस्त्री-”चें विशेषण). २७ स्मरण. २८ कांति २९ ईश्वरासमान. 30 मानवी मुलांचीं शरीरें आहेत ज्यांस, असे. 31 इष्ट, आवडलेलें. 32 अमोल्य. 33 सुवर्णहि. 34 शिष्यांकडे. ३५ तुझी इच्छा. 36 समुद्रांत बुडलल्या मुलास.

त्याचा महिमा गाया, ॥ लोकीं हें योग्य अ[1]सुगम हि मागाया. ॥ ४८ ॥
[2]स्वव्रत यामागें न ॥ [3]क्षत, परि 'सुत द्या' असें तयां मागेन. ॥
करुनि विचार असा या ॥ [4]अर्थी वरि बहुत काळ कीर्ति असाया. " ॥ ४९ ॥
नोहे [5]लुंब्रा, ह्मणतो ॥ परि हें निज [6]कल्पतरुस सुब्राह्मण तो. ॥
" [7]सागरत्दत पंडित हो ॥ सुत द्या; तुमच्या यशें [8]भुवन [9]मंडितें हो.[10] " ॥
ज्या [11]सकृपा ध्यायाला ॥ सादर मुनि, नमुनि तो [12]उपाध्यायाला, ॥
[13]साग्रज विप्रस्थानां- ॥ पासुनि करि [14]भवतमोरवि [15]प्रस्थाना. ॥ ५१ ॥
जाय सुरथ वेगानें ॥ प्रभुचा; हर्षें [16]महीसुरथवे [17]गानें ॥
ऐकविती, दासांचे ॥ ज्याच्या मनिं [18]हरियशोमृत सदा सांचे. ॥ ५२ ॥
कृष्णरथाचा कानीं ॥ ध्वनि शिरतां, हरि [19]भवव्यथा चाकांनीं; ॥
पूर्ण [20]सुधाकर साचा ॥ लाजविला; [21]मृतिस याचि धाक रसाचा. ॥ ५३ ॥
[22]गुरुसुतरक्षे [23]त्राते ॥ गेले देव [24]प्रभासक [25]क्षेत्रीं ते; ॥
सागर धाउनि [26]वेळा- ॥ स्थितविभुचरणां नमी, न लाउनि वेळा. ॥ ५४ ॥
[27]मंजुळवर्णवयांतें ॥ पाहे डोळेभरुनि [28]अर्णव यां तें ॥ .
" [29]भवसागरनावा हे ॥ पाय, " ह्मणे, [30]रत्नभूषणमना वाहे. ॥ ५५ ॥
[31]शौरिभव [32]नदीपातें ॥ ह्मणती, " दे [33]विप्रकुळभवनदीपातें; ॥
रत्नाकर [34]परं तूं, न ॥ स्वीकारुनि देसि रत्न जें परतून." ॥ ५६ ॥
सिंधु ह्मणे, " [35]हा ! [36]तनया ॥ [37]विप्रांच्या सत्य लाविला हात न; या ॥
हरुनी [38]ब्रह्मस्वा, मी ॥ कैसा [39]भवदंघ्रिपूजनार्ह स्वामी! ॥ ५७ ॥

---

१ दुर्लभ. २ आपलें व्रत, नियम ( न मागण्याचा. ) ३ भग्न, मोडलेलें. ४ याचनेवर. ५ मुखस्तुति करणारा. ६ कल्पवृक्ष. ७ समुद्रानें हरण केलेला. ८ जग. ९ सुशोभित. १० होवो. ११ दयाळ्यास. १२ गुरूस. १३ वडील बंधूसह. १४ संसाररूपी अंधाराविषयीं सूर्य. १५ गमनास. १६ ब्राह्मणाचे थवे. १७ गायनें. १८ हरियश हेंच अमृत. १९ संसारसंबंधी व्यथा. २० चंद्र. २१ मृत्यूस. २२ गुरु-सुत-रक्षा, गुरूच्या पुत्राच्या रक्षणासाठीं. २३ तारणारे. २४ नांव. २५ स्थळास. २६ किनाऱ्यावर असलेल्या प्रभुचरणांस. २७ मंजुल-वर्ण-वय, सुंदर आणि योग्य आहेत वर्ण ( कांति ) वयें ज्यांचीं असे जे त्यांस. २८ समुद्र. २९ संसाररूपी समुद्रांतील नौका. ३० रत्नें, भूषणें, व मन यांस. ३१ वसुदेवापासून जहालेले ( बाळकृष्ण ). ३२ समुद्रास. ३३ ब्राह्मणकुलरूपी घरांतील दिव्यास ( गुरुपुत्रास ). ३४ परंतु. ३५ इति आश्चर्यें. ३६ मुलास. ३७ ब्राह्मणाच्या. ३८ ब्राह्मणाच्या धनास. ३९ भवत्-अंघ्रिपुजन-अर्ह-तुझ्या चरणाग्रांची पुजा करण्यास योग्य.

मज्जळेंवासी[1] जो गा, ॥ पंचजनासुरचि[2] या कुकर्माजोगा; ॥
तूही सर्वज्ञानीं[3], ॥ शोधावें; हें कळेल सर्व ज्ञानीं." ॥ ५७ ॥
मग शोधुनि उदराशी[4] ॥ विभु पंचजना वधी, चिरी उदराशी[5]! ॥
त्या यत्नातेंही न ॥ प्रभुच्या करि सफल; कीं द्विजसुतें[6] हीन. ॥ ५९ ॥
तो करि पंचजनाचा ॥ वध, जो हरि संहरी प्रपंच जनाचा. ॥
शंख तदंग[7] हरुनि घे ॥ सिंधू- बाहेर भक्तकल्पतरु[8] निघे. ॥ ६० ॥
गेले संयमनीतें[9], ॥ साधाया कार्य जें स्वकीयमनीं तें. ॥
वाजवि तेथ हरि दरा[10], ॥ जो भजकभवाचिया[11] समूळ हरि दरा[12]. ॥ ६१ ॥
प्रभुच्या सहसा दरजा[13] ॥ नादा यम सेवि, प्रीति मुनि सादर[14] जा. ॥
जाय विनतें[15] सामोरा; ॥ उत्सव जलदागमीं[16] हि न तसा मोरा. ॥ ६२ ॥
अवलोकीना शमन[17] ॥ स्वांगा[18], कीं भूललेंचि कीनाशमन[19]. ॥
हा[17] बहु सात्विक, भांव[20] ॥ यां पाहुनि, वशवि होय सात्विक भावा[21]. ॥ ६३ ॥
प्रभुचे पाय मनाचे ॥ प्रिय गुरु वंदनि, सत्तपा[22] यम नाचे. ॥
सर्वस्व निवेदी; न ॥ ज्ञाता शठ[23] होय, शठचि; न निवे दीन. ॥ ६४ ॥
चरितें, नरकायास-[24] ॥ प्रशमार्थ, करावयास, नरकायास[25] ॥
धरिते सद्ध्येय[26] महा- ॥ पुरुष, पुजी श्रेष्ठ साधुमध्यें यम हा. ॥ ६५ ॥
"करिजे आज्ञा; पाया ॥ नत[27] जन हा; योग्य होय आज्ञापाया. ॥
कांहीं सेवा याला ॥ सांगा जी! मन सकाम[28] सेवामाला." ॥ ६६ ॥
प्रार्थित माजानि[29] यमें, ॥ बोले, "आज्ञेंत वससि माज्या नियमें; ॥
येणें आर्यास[30] मज ॥ त्वन्निकट[31] स्वगुरुच्याचि कार्या समज. ॥ ६७ ॥
तूं उग्रनय[32] न; दीनीं ॥ निजकर्में मग्न[33] विप्रतनय[34] नदीनीं[35] ॥

---

१ माझ्या उदकांत राहाणारा. २ 'पंचजन' या नांवाचा राक्षस. ३ सर्व जाणणारे. ४ समुद्र. ५ पोटास. ६ ब्राह्मणपुत्रेंकरून. ७ तत्-अंग, त्याच्या अंगीं असलेला. ८ भक्तांचा कल्पवृक्ष. ९ यमपुरीस. १० शंखास. ११ भक्तांच्या संसाराच्या. १२ भयास. १३ शंखापासून जहालेल्या १४ आदरपूर्वक. १५ नम्रहोत्साता. १६ मेघआला असताहि. १७ यम. १८ स्व-अंगा, आपल्या अंगास. १९ त्याचें (यमाचें) मन. २० बळ कृष्णास. २१ प्रेम, शौर्य, आश्चर्य, इत्यादि अष्टभवांस. २२ सत्-तपस्, उत्तम आहे तप ज्याचें असा. २३ ठक. २४ नरकवासांतील श्रम निवारण करण्याकरितां. २५ मानवी शरीरास. २६ सत्-ध्येय, साधूंनी ध्यान करण्यास योग्य जो त्यास. २७ शरण. २८ सेच्छ, उत्सुक. २९ रमापति, कृष्ण. ३० श्रेष्ठास. ३१ तुझ्याजवळ. ३२ उग्र आहे न्याय ज्याचा असा, जुलमी. ३३ बुडलेला. ३४ ब्राह्मणाचा पुत्र. ३५ नदी-इन, समुद्रांत.

त्या, सखया! दे; शिकवी ॥ जो आह्मां ज्ञान, तो तया देशिक[1] वी. ॥ ६८ ॥
सुत गुरुवर्या देसी, ॥ तरि तूं प्रभु पाळिता स्वमर्यादेसी. " ॥
भाव असा जाणविला, ॥ यमधर्में[2] शीघ्र तोंचि शिशु[3] आणविला. ॥ ६९ ॥
त्रिजगत्पालक वेळसा[4] ॥ करुनि असा, रक्षि बाळ काळकवळसा[5]. ॥
हें, उपदेश, कराया ॥ लोकां; दे पुत्र यदुप[6] देशिकराया[7]. ॥ ७० ॥
आलिंगुनि वत्स तिघे, ॥ विप्र ह्मणे स्त्रीस, " सुत यथावत्[8] सति! घे. ॥
या पसरिति पदरा जे ॥ स्वरगादिहि[9], त्या प्रजांत हरिपद राजे. ॥ ७१ ॥
ज्यांचा सन्मनु[10] जपणें, ॥ अवतरले ईश[11] तेचि हे मनुजपणें[12]. ॥
निजजन विपदवसादा[13] ॥ वेभातां, देति दुरितवनदव[14] सादा[15]." ॥ ७२ ॥
हर्षे तो कवि[16] तरणि- ॥ प्रभवपुरानीतनैजतोकवितरणीं[17]. ॥
विनवी आणिख; रीति ॥ प्रभुची कपिलेसि[18] उगिव आणि खरी ती. ॥ ७३ ॥
तो गतलोभ[19], " वश मला ॥ मन आहे," मुनि ह्मणे, " मनोभव[20] शमला; ॥
हेचि पुरे देशिकता[21] ॥ तुमची; मणिहुनि न मोद[22] बहु दे सिकता[23]. ॥ ७४ ॥
ज्यां गुरुराजे, पण जे ॥ ज्ञानी, तैसेचि बाप, आजे, पणजे, ॥
त्यांहिं दिली रसिकांनीं[24] ॥ शिष्यांनीं दक्षिणा श्रुत[25] न असि कानीं. ॥ ७५ ॥
कीर्तिस वीरमणी[26] हो! ॥ तुमच्या लज्जित पयोधिची[27] रमणी[28] हो[29]; ॥
लाजो रात्रिधव[30], लता ॥ देवांची, दुग्धराशिचीहि धवलता[31]. ॥ ७६ ॥
तरतिल लोक छंदें ॥ तुमच्या; भजतिल भवत्धृतदोक[32] छंदें[33]; ॥
नतचित्त[34] नभोगुरु[35] जे ॥ रक्षुत भवद्गुणागद[36], न भोगु रुजे[37]. " ॥ ७७ ॥
करुनि बहु पवाड[38]; वदे ॥ आशी[39], आज्ञा तयां सरूप वाडव[40] दे. ॥

---

१ गुरु. २ यमानें. ३ मुलगा. ४ फेरा. ५ काळाच्या तोंडांतील ग्रासासारिखा. ६ कृष्ण. ७ गुरुराजास. ८ होते तसे. ९ स्वर्-अग-आदि, कल्पवृक्षादि. १० सन्मंत्र. ११ ईश्वर. १२ मनुष्यपणें. १३ विपत्-अवसादा, विपत्ति क्षीण करण्या करितां=हरण करण्या करितां. १४ दुरित-वन-दव, पातकरूपी वनांतील दावाग्नि. १५ हाकेला. १६ सांदीपिनी. १७ तरणि-प्रभव-पुर-आनीत-नैज-तोक-वितरण. सूर्यापासून उत्पत्ति ज्याची (यम) त्याच्या नगराहून आणिलेल्या आपल्या पुत्राच्या दानानें. १८ कामधेनूस. १९ गेला आहे लोभ ज्यापासून, निर्लोभी. २० इच्छा. २१ गुरुपणा. २२ आनंद. २३ वाळू. २४ भक्तांनीं. २५ ऐकिलो. २६ हे वीरश्रेष्ठांनो. २७ क्षीरसागराची. २८ स्त्री. २९ होवो. ३० चंद्र. ३१ शुभ्रपणा. ३२ भवत्-हृत्-ओक, तुमचीं हृदये हींच घरें. ३३ गीतें. ३४ नम्र आहे चित्त ज्याचें त्यास. ३५ नभस्-गुरु, आकाशाहून मोठे. ३६ भवत्-गुण-अगद, तुमचे गुण हींच औषधें. "अगद" हा शब्द पुल्लिंगी आहे. ३७ रोगास. ३८ स्तुति. ३९ आशीर्वाद. ४० ब्राह्मण.

वंदुनि आले मथुरे; ॥ लोक ह्मणति, " मूर्त[1] हे निजानंदथु[2] रे! " ॥ ७८ ॥

॥ ॥ इति श्रीमत्कृष्णविजये पंचचत्वारिंशोऽध्यायः ॥ ४५ ॥ ॥

व्रज आनंदावासा[3] ॥ करुनि विचार, स्वभक्त नंदावासा[4] ॥
पाठवि; जो उद्धव[5] दे, ॥ उद्धव, देवप्रियाप्त[6], हितशुद्ध वदे. ॥ १ ॥
" बहु पाहति वाट, कळा- ॥ हीन व्रजनयन[7], नित्यहि नवा टकळा[8] ॥
घालुनि मजवरि; साचा ॥ क्षण देतो दुःख भोग ज्यां वरिसाचा[9]. ॥ २ ॥
भोगिति दुःख-कदंबा[10] ॥ नंदपिता वृद्ध शुद्धबुद्धि मदंबा[11]. ॥
वाटे व्रज ओस, कळा- ॥ हीन जना ताप देतसे ओ! सकळा. ॥ ३ ॥
जें दवें[12] करि न वनीं, तें ॥ विरहें[13]; मनें केविं सोसितिल नवनीतें[14]? ॥
गुरुजन[15] तो हवि[16], घर तें ॥ कुंडाचि; दहनीं कठोर लोहें[17] विघरतें[18]! ॥ ४ ॥
शृंगारांबुजसरसी[19] ॥ गोपवधूमंडळी[20] वसे मजसरसी[21]. ॥
हरिच्या सेजारा ती ॥ पावलि मृगि, तिस चितांचि[22] सेजा रातीं[23]! ॥ ५ ॥
तीव्र मनोगदें[24]; वांचे ॥ कोण? तृण प्राण ते वियोगदवाचें[25]. ॥
मज जोडुनि कर, ' पावें,' ॥ ह्मणति, 'किती विरहपावकीं[26] करपावें? ' ॥ ६ ॥
स्व तनु[27] जन निवासासु[28] ॥ प्रिय[29] सुत हि न मानुनी जननि वा[30] सासु, ॥
मिळति नद्या[31] वाहात ॥ स्वपतिस मज; म्या कसा न द्यावा हात? ॥ ७ ॥
गोपी सारखि जे ते; ॥ छळहि न मानुनि मनीं असार खिजे[32] ते; ॥
' तवपद या लोभ जनीं ॥ वाढवि,' ह्मणती, ' वसों दयाळो! भजनीं. ' ॥ ८ ॥
पसरिल तरि कर पेजे, ॥ चातकरसना[33] तृषेंकरुनि करपे जे? ॥

---

१ मूर्तिमंत. २ निज-आनंदथु, आमचा आनंद. ३ आनंदावा असा. ४ गोकुळास. ५ उत्साह, आनंद. ६ देव-प्रिय-आप्त, कृष्णास प्रिय आणि आप्त. ७ गोकुळांतील जनाचे डोळे. ८ अत्यंत मोठी आळ ( पाहण्याची इच्छा ). ९ वर्षाचा. १० दुःखसमुदायास ११ माझी आई. १२ दावाग्नि. १३ याचें क्रियापद "करी" हें अध्याहृत आहे. दव जें वनीं न करी, तें विरह ( घरीं ) करी, असा अन्वय. १४ लोण्यासारिखीं. हें "मनें" याचें विशेषण आहे. १५ आईबापें. १६ होमद्रव्य. १७ लोखंड. १८ वितुळतें. १९ शृंगाररूपी कमळें आहेत ज्यांत अशा तळ्यासारिखी. २० गोपींचा समुदाय. २१ मजजवळ. २२ स्मशान. २३ रात्रीं. २४ मनाचा रोग. २५ वियोगरूपी वणव्याचें. २६ विरहरूपी अग्नींत. २७ शरीर. २८ निवास-असु, घरें आणि प्राण. २९ हें, "तनु," " जन," "निवासासु," " सुत," "जननि," "सासु," यांचें विशेषण आहे. ३० अथवा. ३१ गोपीरूपी नद्या. ३२ रुसे. ३३ चातकाची जिव्हा.

तेवि मदितरनर[1] मति- ॥ प्रति न, स्वमींहि वाटति वर[2] न, रमती. ॥ ९ ॥
मी जीवन[3], मीन[4] सती; ॥ प्राण कुशल उद्धवा! स्वधामीं[5] नसती. ॥
प्रथमहि मन घाबरवी ॥ दिनविरहहि[6]; तद्गती न अनघा[7]! बरवी. ॥ १० ॥
होइल संगम[8] नाशा ॥ यास्तव; पावति न कीं मदागमनाशा[9]. ॥
मत्प्रियं[10] तो जन वाटे[11] ॥ देखतचि असेल अकृतभोजन[12] वाटे! ॥ ११ ॥
यास्तव जा, पितरांतें ॥ समजावीं, गोपिकादिकां इतरांतें. ॥
जाणसि साम, निरोपें ॥ स्वसुखाचीं लावि त्यांचिया मनिं रोपें[13]. ॥ १२ ।
घेऊनि निरोपवनें[14], ॥ आज्ञारूपेंहि शीघ्रगति हो पवनें[15]; ॥
रथगगनीं[16] वेंघ[17]; न ते ॥ व्रजाटवी[18] विरहदवें[19] गिळो; घे घनते[20]. " ॥ १३ ॥
उद्धवनामसदभ्र[21], ॥ प्रभुसंदेशाख्यअमृत[22] ज्यांत अदभ्र[23], ॥
त्या व्रजजनकेकींतें[24] ॥ भेटों जाय; प्रमोदउं[25] शके कीं तें[26]. ॥ १४ ॥
रवि बहुधा मावळला ॥ लाजे; कीं साधु[27] नंदधामा[28] वळला. ॥
आपण तापद[29] वारि-[30] ॥ प्रदास; तो लोकशांततापद[31] वारी. ॥ १५ ॥
पाहुनि सहसा, नंदें ॥ पूजियला साधु युवतिसह[32] सानंदें[33]; ॥
त्या सुघना[34] चातक वा ॥ मोर भजे हा; दिसे मनाचा तकवा[35]. ॥ १६ ॥
वाढवि पायस खाया; ॥ पुसिला कुशली[36], चुरूनि पाय, सखा[37] या. ॥
धैर्याचा नगहि[38], वर[39] ॥ व्रजभूंचा[40], परि तया धरे[41] न गहिवर. ॥ १७ ॥
नंद वदे, " सांग, मन[42] ॥ स्मरतें आह्मां ? घडेल कृष्णागमन[43] ? ॥

---

१ मत्-इतर-नर, माझ्या शिवाय दुसरा पुरुष. २ नवरा. ३ पाणी. ४ मत्स्य. ५ आपल्या घरीं. ६ एक दिवसाचा वियोगहि. ७ हे निष्पापा! ८ संयोग, भेट. ९ मत्- आगमन-आशा= माझ्या येण्याची आशा. १० मला प्रिय. 'सत्प्रिय' असाहि पाठआहे. ११ मार्गास. १२ उपोषित, उपवासी. १३ लहान झाडें; ( हा शब्द या ठिकाणीं नपुसक लिंगीं उपयोगिला आहे ). १४ निरोपरूपी उदकें. १५ वायुनें (आज्ञारूपी ). १६ रथरूपी आकाशांत. १७ चढ. १८ गोकुळरूपी अरण्य. १९ वियोगरूपी वणवा. २० मेघपणाला. २१ उद्धवरूपी उत्तम मेघ. २२ कृष्णाची आज्ञा या नांमेंकरून अमृत ( उदक ). २३ फार. २४ गोकुळवासी जनरूपी मोरांस. २५ आनंदवायास. २६ अभ्र. २७ उद्धव. २८ नंदगृहास. २९ ताप देणारा. ३० वारि-प्रदास = उदक देणाऱ्यास ( उद्धवास ). ३१ लोकांच्या शांततेचें स्थान ( उद्धव ). " वारी ' = त्यजी; सोडून जाई. याचा कर्ता " तो "= सूर्य, आणि कर्म "लोकशांततापद." ३२ स्त्री-सहवर्तमान. ३३ आनंदभरितें. ३४ उत्तम मेघास. ३५ दृढता, शक्ति. ३६ सुखरूप. ३७ कृष्ण. ३८ पर्वत ३९ पति. ४० गोकुळाचा. ४१ धरवे. ४२ कृष्णाचें मन. ४३ कृष्णाचें येणें.

पाहों मुख[1]राजीवा ? ॥ अमृताचा लाभ तो बहु खरा जीवा. ॥ १८ ॥
दा[2]वादिक मृत्युचि तें ॥ कृष्ण निवारी भुजें सदुपकृ*त्युचितें; ॥
त्या वीर्या, त्या तिथिला, ॥ स्मरतां होते क्रिया समस्तां शिथिला[3] ! ॥ १९ ॥
त्या प्रथमावस्था[4]नीं, ॥ दुष्टां[5]ची ओळखोनि माव[6] स्थानीं[7] ॥
ज्यां[8], खळसंहाति[9] केली, ॥ स्मरतां कुंठित करी मनोगति केली[10]. ॥ २० ॥
त्यजिलीं यदुकु[11]ळतिलकीं ॥ विरहदवें तीं स्थळें गमति उलतिल कीं. ॥
रोदन शुकपिकरव[12] तें; ॥ ह्रदय चिरे कृष्ण[13]पदवियोगकरवतें. ॥ २१
कर्में काय करवती ! ॥ निष्ठुर बळहरिवियोग काय[14] करवती[15]. ॥
श्रम ज्यांहीं हरपावे[16], ॥ भ्रम ते देताति हे मनोहर पावे ! ॥ २२ ॥
बोल खरे गर्गांचे[17] ॥ 'अवतरले ईश्वर त्रिदशवर्गांचे[18]'; ॥
भयहर भूस्वर्गांचे[19]; ॥ गेयगुणंचि[20] रामकृष्ण हे भर्गांचे[21]. ॥ २३ ॥
कृष्णा रामा, नवलें[22] ॥ चरितें, जनमन दयाऽकरा[23] मानवलें. ॥
केलें यश शुद्ध रणीं ॥ खळदमनीं[24], सप्तदिन नगसमुद्धरणीं[25]. ॥ २४ ॥
पडली चरमा[26] माजे ॥ दृष्टिस गति, वरि सहानुचर[27] मामा[28] जे. ॥
न क्षम[29] नर परम रणा, ॥ पावे न इतरकरें[30]हि सुरपरें[31] मरणा ! ॥ २५ ॥
जे बहुधा मायावी[32] ॥ खळ, ज्यांची भीति जिष्णुधामा[33] यावी; ॥

---

१ मुखकमल. २ वणवा इत्यादि, ( १७ व्याअध्यायांत सांगितलेला ). ३ सैल, ढिली. ४ प्रथम-अवस्थान, पहिल्या स्थितींत, बाळपणांत. ५ दुर्जनाची. ६ कपट. ७ बसलेल्या ठिकाणीं. ८ हें " स्थानीं " याचें संबंधी सर्वनाम आहे. ९ दुष्टाचा नाश. १० क्रीडा. ११ कृष्णें. १२ कीर आणि कोकिळा यांचा जो शब्द ( गायन ), तें आतां 'रोदन' ह्मणजे रडें असें वाटतें इ० १३कृष्णचरणाचा विरह हाच कोणी एक करवत, तेणें करून.१४देह.१५ कापतो. १६ घालवावे. १७गर्गऋषीचे.१८देवांचे.१९ पृथ्वीरूपी स्वर्गाचे. २०गाण्यास योग्य आहेत गुण ज्यांचे असे. "भर्गाचे हे ( बळकृष्ण ) गेयगुण आहेत " ह्मणजे भर्गानें ( सांबानें ) ज्यांचे गुण गाण्यास योग्य असे. २१ सांबाचे. २२ " चरितें " याचें विशेषण. २३ दया-आकरा, दयानिधीस ( 'कृष्णा', व 'रामा' याचें प्रत्येकीं विशेषण. ) २४ दुष्टमर्दनीं. २५ पर्वताच्या (गोवर्धनाच्या) 'समुद्धरणा' विषयीं = उचलून धरण्याविषयीं. २६ शेवटींची ( गति ) = मरण. २७ सह-अनुचर, सहपरिवार. २८ कंस. २९ योग्य. ३० दुसऱ्याच्या हातानें. ३१ देव-शत्रु, कंस. ३२ कपटी. ३३ इंद्रलोकास

* सत्-उपकृति-उचितें=साधूंवर, किंवा चांगले, उपकार करण्यास योग्य अशा ( भुजें ).

तेही जाले शलभ[१] ॥ ज्वलनीं[२] कृष्णीं, वळींहि[३] सिंहीं कलभ[४]." ॥ २६[५] ॥

होय यशोदा विकळा,[६] ॥ प्रेमाश्रु तदीक्षणांबुजीं[७] दावि कळा; ॥

पुत्रोदार-कथांनीं[८] ॥ ये पान्हा कंचुकीविदारक[९] थानीं. ॥ २८ ॥

त्यांचा उद्भव[१०] दे हा ॥ प्रेमा; विसरे मुहूर्त उद्धव देहा. ॥

स्वमनिं ह्मणे, " या लाभें, ॥ संसृतिचें[११] सर्वथा नसे यांला भें.[१२] " ॥ २९ ॥

सुख उद्धवपिक[१३] लाहे; ॥ कृष्णप्रेमाम्र[१४] गोकुळीं पिकला; हे ॥

सत्संगमें[१५] मधु; रवें[१६] दे ॥ सुभजनकामासि[१७] बळ, असें मधुर वदे;– ॥ ३० ॥

" धन्य तुह्मी; परिसा, जे ॥ सुतभावें प्रीति ईश्वरीं[१८] परि साजे; ॥

विश्वगुरुजगज्जनकीं[१९] ॥ लाजविले या सुभक्तिनें सज्जन कीं. ॥ ३१ ॥

यांच्या चरणस्मरणीं ॥ जो जन वसवी मन क्षण स्थिर मरणीं, ॥

होतो मुद्राशि,[२०] शुचि[२१]; ॥ ( त्यांहीं क्रीडार्थ धरिलि मुद्रा[२२] शिशुंची[२३]! ) ॥ ३२॥

साधुपरित्रात्याच्या[२४] ॥ गातां, आकर्णितां[२५] चरित्रा त्याच्या, ॥

जालीं तत्पर करणें[२६]; ॥ काय तुह्माला असे अतःपर करणें? ॥ ३३ ॥

मातेला जनित्याला[२७] ॥ सत्वर भेटेल वत्सला[२८]; जनिं त्याला ॥

क्षणमात्र नसे विसर; ॥ प्रिय मानस,[२९] हंस कां मग न सेवि, सरं[३०]? ॥ ३४

मारुनि कंसा राज्या, ॥ तुजसीं गोष्टी स्वयें वदे सारा[३१] ज्या, ॥

करिलचि त्या सत्या गा, ॥ धैर्य नसे वत्सलास त्यास त्यागा[३२]. " ॥ ३५ ॥

---

१ टोळ. २ कृष्णरूपी अग्नींत. ३ बळरामरूपी सिंहीं. ४ हत्तीचा छावा. ५ सविसाव्या आर्येपुढें सत्ताविसाव्या आर्येत दुसऱ्या चरणांतील कांहीं शब्द आह्मांस सांपडले नाहींत; ह्मणून आहे तेवढीच आर्या खालीं लिहिली आहे;–

* * *

" ऐसीं पुत्रचरित्रें ॥ वर्णी विकिलें

तीं ये फार गहिंवर; ॥ स्रवति जळें लोचनें अपार महिवर." ॥ २७ ॥

६ कळाहीन. ७ तत्-ईक्षण-अंबुजीं, तिच्या नेत्रकमळांत. ८ पुत्रांच्या उदार (सुखकारक) कथां-
नीं. ९ चोळी फाडणारा. १० आनंद. ११ संसाराचें. १२ भय. १३ उद्धव हाच कोकिलपक्षी.
१४ कृष्णप्रेमा हाच कोणी एक आंबा, ( गोकुळरूपी बागेंत पिकलेला ). १५ साधूंचे संयोग.
१६ शब्द. १७ उत्तम भजनाच्या इच्छेस. १८ "सुतभावें प्रीति (आहे) परि, ईश्वरीं साजे" इ०
असा अन्वय. १९ विश्वगुरु-जगत्-जनकीं, ब्रह्मदेव व जगत् यांचा जो बाप ( कृष्ण ) त्याच्या
ठायींच्या भक्तीनें लाजविले इ०. २० मुत्-राशि = आनंदाचा राशि. २१ पवित्र. २२ आकृति. २३
मुलांची. २४ साधु-परित्राता, साधूंचें संरक्षण करणाऱ्याच्या. २५ ऐकतां. २६ इंद्रियें. २७ बापाला. २८
'मातेला' आणि 'जनित्याला' यांचें विशेषण. २९ सरोवराचें नांव (हें 'सर' याचें विशेषण). ३०
सरोवर, तळें. ३१ श्रेष्ठ; ( हें 'गोष्टी' याचें विशेषण ). ३२ त्याग करण्यास, ( तुमचा ).

दे सुख[1]संदोह, गळे ।। त्यांचे हातीं धरूनि तो; मोह [2]गळे; ।।
तत्व असें आयकवी ।। श्रीउद्धव बुद्धवस्तु[3] बुधराय[4] [5]कवी. ।। ३६ ।।
सत्संगक्षण दे तें ।। सुख अद्भुत; कोण आठवि क्षणदे[6]तें? ।।
परमामृतखनि[7] शांत- ।। प्रेमरस पितांचि, दाखवि मुख निशांत[8]. ।। ३७ ।।
व्रजयुवतिजन[9] रहाटे ।। दधिमथनीं; कृष्णचरित गाय पहाटे. ।।
प्रेमोद्दीपनं[10] गानीं ।। करिति, हरिति तम[11]हि, जेविं दीप, नगांनीं[12]. ।। ३८ ।।
तें हरि तम[13] हो दधिचें ।। मथन; यश जयांत सुचरितमहोदधिचें[14]. ।।
गाती डुलत, नुरवि[15] तें ।। प्रेम श्रम; फिरविती मृदुलतनु[16] रवितें. ।। ३९ ।।
बाष्पें[17] कंठ निरुद्ध[18], ।। स्वर गद्गद[19], परि न गीतरीति विरुद्ध[20]. ।।
स्वसुखाचे कोंब, रवे[21] ।। प्रेमसुधेचेचि, वर्ण ते हो बरवे! ।। ४० ।।
भानुकृशानु[22] उगवता ।। जाला, जाळुनि तमा[23] जुन्या मउ गवता; ।।
लागे धूर वळकट, ।। स्वच्छांबर[24] यामुळेंचि होय मळकट! ।। ४१ ।।
स्त्रीजन ते, जेविं [25]रवी, ।। रथ देखति जो तम स्वतेजें विरवी; ।।
त्या कांचनमणिखचितें[26] ।। आश्चर्य दिलें व्रजेक्षणीं[27] [28]अणिखाचि तें. ।। ४२ ।।
ह्मणती बल्लवमहिला[29], ।। "जो अस्मत्प्राणपश्यतोहर[30] पहिला, ।।
तो अक्रूर, कुनर[31] पी ।। व्रजजीवन[32], पातला असेल पुनरपि. ।। ४३ ।।
त्या कंसा अधमास, ।। व्रजयुवतींचा करूनियां वध, मास, ।।
श्राद्धीं पिंड कराया, ।। नेणार असेल तृप्तिदायक[33] राया. ।। ४४ ।।
स्वामी नृप शूरहि, ततू[34]- ।। प्रिय करि [35]मागेंहि साधु अक्रूर हित. ।।

---

१ सुखसमूह. २ नाशपावे. ३बुद्ध वस्तु, जाणिलें आहे तत्व ज्याणें, असा. ४ज्ञानिश्रेष्ठ. ५चतुर. ६ रात्रीस. ७ परम-अमृत- खनि. ८ सकाळ (निशा-अंत), पहाट. ९ गोकुळांतील स्त्रीजन. १० प्रेम-उद्-दीपन, प्रेमाचें (प्रीतीचें) उत्तेजन. ११ अंधार. १२ अलंकारानीं. १३ अज्ञान. १४ सुचरित-महा-उदधि, उत्तम चरित्रांचा समुद्र (कृष्ण). १५ न उरवी. १६ कोमलांगी. १७ नेत्रोदकें. १८ प्रतिबद्ध, भरलेला. १९ सद्गदित. २० उलटी, छंदाचा भंग आहे जींत. २१ गोळे. २२ सूर्यरूपी अग्नि. २३ तमोरूपी वाळलेल्या गवतास. २४ स्वच्छ आकाशास. २५ सूर्य. २६ सुवर्ण व रत्नें यांहीं जडलेला. २७ गोकुळजनाच्या नेत्रास. २८ वेगळेंच, फार. २९ गोपस्त्रिया. ३० अस्मत्-प्राण-पश्यतोहर, आमच्या प्राणांस (= कृष्णास) (आमच्या समक्ष!) चोरणारा ३१ दुष्ट मनुष्य. ३२ गोकुळाचें "जीवन"=जीवरूपी उदक. ३३ तृप्ति देणारा (अक्रूर). 'राया' हें 'कंसा' चें विशेषण. ३४ त्याला आवडता (अक्रूर). ३५ मेला तरीहि.

त्यजुनि अशाहि जिवलगा, ॥ कंसा! गेलासि हें तुजेंहि नवल गा! ” ॥ ४५॥
वदति असें; तों सुरसा- ॥ पुष्कर[1]मालाधर स्मिता[2]नन सुरसा[3] ॥
पाहे भगवद[4]नुग या ॥ अंतर्धृतविष्णु[5]चरणयुवतितनुगया. ॥ ४६ ॥

॥ ॥ इति श्रीमत्कृष्णविजये षट्चत्वारिंशोऽध्यायः ॥ ४६ ॥ ॥

दृगा[6]तिथि उद्धव यांहीं ॥ केला कृष्णोपभुक्त[7]शुद्धवयांहीं; ॥
जेंवि विशद[8] यज्ञांहीं ॥ निर्मळ मोक्षेच्छु[9] नीच सदय ज्ञानी. ॥ १ ॥
ह्मणति त्द्तनयन रमणी, ॥ “ हा अच्युतवेष[10] भूप[11] कोण नरमणि[12]? ” ॥
देववधूप्रतिमा[13]शा ॥ वेष्टिति त्याला, जशा मधूप्रति माशा. ॥ २ ॥
ते गोपस्त्री- जनता[14] ॥ जाली हरिदासचरणसरसीजनता[15]; ॥
मग एकांतीं बसका ॥ केली, प्रकटावया निजा[16]शय अ[17]सका. ॥ ३ ॥
रा[18]सीं हरिच्या तूर्यें[19], ॥ स्त्रीरत्नें ज्यांत कोटिभरि चातूर्यें, ॥
हा महिमा जीवा[19]चा; ॥ तदुक्तिरससिंधुमग्न[20] माजी वाचा. ॥ ४ ॥
सप्रेमा कोपांचे ॥ बोल वदति फार दार[21] ते गोपांचे; ॥
“ जाणों यदुपाळा[22]चा ॥ सेवक तूं उग्रसेनसुतकाळाचा[22]. ॥ ५ ॥
पाठविलेंसे, स्मरणा ॥ धरुनि, तुला येथ निजपितृप्रिय[23]करणा;॥
जो अ[24]पवर्गद मुनिंहीं ॥ स्वस्नेहा[25]धीन, करण[26]वर्ग दमुनिही. ॥ ६
आठविजे काय दुजें ॥ या घोषीं,[27] त्यजुनि जननिर्जनका[28] यदुजें[29]? ॥

---

१सुरसा-पुष्कर-माला,-धर=पुष्करांच्या सुरस माला धारण करणारा.२स्मित-आनन, हा-
स्यमुख ३ देवासारिखा. ४ भगवत्-अनुग, ईश्वराचा दास.५अंतर्-धृत-विष्णु-चरण-युवति-तनु-
गया, ध्यानीं आहेत कृष्णाचे चरण धरिलेले ज्यांनीं अशा गोपिरूपी ‘ गया ’=गंगा. ६ दृ-
क्-अतिथि, ‘ दृष्टीचा अतिथि (केला) ’= कृपादृष्टि केली, असें वाटतें. ७ कृष्ण-उपभुक्त- शुद्ध-
वय, कृष्णानें उपभोगिलीं ह्मणून शुद्ध आहेत वयें ज्यांचीं. ८ पवित्र. ९ मोक्ष इच्छिणारा. १०
कृष्णाचा वेष आहे ज्याकडेस. ११ राजा. १२ पुरुषश्रेष्ठ. १३ देवांगनांच्या आकृतीं समान;
‘वेष्टिति’ या क्रियापदास ‘ रमणी ’ ( गोपी ) हा अध्याहृत कर्ता घ्यावा. १४ गोपीसमूह.१५
हरि-दास-चरण-सरसीज-नता, साधूच्या ( अक्रुराच्या ) चरणकमलीं लीन. १६ निज-आश
य, आपला अभिप्राय.१७ सर्व. १८ रासक्रीडेंत. १९ नादाचा. २० तत्-उक्ति-रस-सिंधु-
मग्न, तच्छब्दरूपी क्षीरसागरांत निमग्न. २१ स्त्रिया; (हा शब्द पुल्लिंगी आहे ). २२ कंसारि,
कृष्ण. २३ आपल्या बापास प्रिय असलेलें करण्यासाठीं. २४ मोक्ष देणारा. २५ आपल्या स्ने
हाच्या स्वाधीन. २६ इंद्रियसमूह. २७ गोकुळीं. २८ आईबापास. २९ कृष्णानें. * बाई.

इतरीं कार्यापुरती ॥ मैत्री; संस्कार ते मनीं मग नुरती. ॥ ७ ॥
पुरुष रस[1]-पिपासु मनीं, ॥ स्त्रीठायीं सख्य; जेविं मधुपा[2] सुमनीं[3]. ॥
त्यजिजे आंगणिं[4], कानीं ॥ ऐकुनि चाटूहि[5], हृतधना[6] गणिकांनीं[7]. ॥ ८ ॥
जेथ कृपा सत्य, जिती[8] ॥ प्रजा तया; गतबळा[9] नृपास त्यजिती. ॥
जो विद्या दे, शिकते ॥ जे शिष्य सुविद्य[10], सोडिती देशिक[11] ते. ॥ ९ ॥
धरि पदतोयजें[12], मान ॥ प्रत्यह[13] करि जो, असाहि तो यजमान[14], ॥
टाकिति †ऋत्विज, यजनीं[15] ॥ होतां निजदक्षिणोदशीतशय[16] जनीं. ॥ १० ॥
खग[17]ही त्यजिति अगातें[18] ॥ विफळातें, स्मरति तदुपकृत[19] न अगा! तें. ॥
दातृगृहांत[20] अतिथि जे, ॥ तन्मनही यावदशनमात्र[21] अति थिजे[22]. ॥ ११ ॥
दग्धवना[23] मृग विटती; ॥ भोगुनि टाकी अतृप्त[24] जी स्त्री विटें[25] ती. " ॥
ऐसें बहुतचि वदती, ॥ निर्लज्जा रडति, कृष्णपदरति[26] सुदती[27]. ॥ १२ ॥
तों व्रजवामान्यतमा[28], ॥ कळवाया भाव उद्धवा मान्यतमा[29], ॥
बोलतसे मधुपासीं; ॥ तो रस नाहीं सुधाकरा विधुपासीं[30]:— ॥ १३ ॥
" स्नेह मनीं आठविला, ॥ ह्मणुनि मधुपदूत वल्लभें[31] पाठविला, " ॥
कल्पुनि ऐसीच वदे ॥ मधुपा[32] अन्योक्ति; सुधा[33] न तसी चव दे*;— ॥ १४ ॥
' इच्छा कायशि ? वांया ॥ मधुपा ! धांवसि, धरून पाय, शिवाया; ॥
विदित अससि कितवाचा[34] ॥ बंधू तूं; वदसि मधुर सचकित[35] वाचा. ॥ १५ ॥

---

१ शृंगाररसाविषयीं तृषित. २ भ्रमरास. ३ पुष्पीं. ४ द्वारापुढच्या जाग्यांत. ५ प्रियकर आणि गोड अशीं खोटीं भाषणें. ६ हरण केलें आहे धन ज्यापासून अशाला, ७ कलावंतिनींनीं. ८ जीवंत. ९ गेलें आहे बळ ज्यापासून, निर्बळ. १० चांगले विद्वान ( जहाले ह्मणजे ). ११ गुरु. १२ चरणकमल. १३ दररोज. १४ यज्ञ करणारा. १५ यज्ञीं. १६ निजदक्षिणा-उद-शीत=आपल्या दक्षणेच्या उदकानें थंड आहेत हात ज्यांचे. १७ पक्षी. १८ वृक्षास. १९ त्याणें ( वृक्षानें ) केलेले उपकार. २० दात्याच्या घरीं. २१ यावत् -अशनमात्र, जों पर्यंत जेवण असेल तोंपर्यंत मात्र. २२ एकाठिकाणीं राहे. २३ जळलेल्या अरण्यास. २४ तृप्त न जहालेली. २५ जार. २६ कृष्णचरणीं प्रीति आहे ज्यांस. २७ सुंदर आहेत दंत ज्यांचे; सुंदर. २८ व्रज-वामा-अन्यतमा, गोपिकांतून कोणी एक स्त्री. २९ मान्यश्रेष्ठ ( उद्धवाचें विशेषण ). ३० सुधा-कर- ( किंवा, आकर- ) विधु, अमृतप्रसवणारीं किरणें आहेत ज्याचीं; किंवा अमृताची खाणच असा जो चंद्र, त्याजवळ. ३१ पतीनें. ३२ मधुपा -अन्योक्ति, मधुपासीं संबोधून पण अक्रुरास उद्देशून बोललेली वाणी. ३३ अमृत. ३४ शठाचा, ठकाचा. ३५ आश्चर्यकारक

† उपाध्या, यज्ञकाम चालविणारा. * या अर्धांत " क्ति- सुधा " हा ज गण नसल्यामुळें हें अर्ध सदोष आहे. " सुधा " याच्या बदली " अमृत " असें वाचल्यास बरोबर जमेल.

वनमाळा[1] सवतीच्या ॥ भरली कुचकुंकुमें विलासवतीच्या[2], ॥
तें त्वज्जीवन[3]; मिसियां[4] ॥ पिवळ्या कीं निस्त्रपा[5]! पदासि नमिसि या? ॥ १६
स्वाधरमधु[6] पाजी जी ॥ आवडती, त्या शठांस[7] मधुपा! 'जी! जी!' ॥
समजावीं मानवती[8] ॥ त्या कितवा! तुज तयास ज्या मानवती. ॥ १७ ॥
जेवि रसपिपासुमनें[9] ॥ तूं चुंबुनि टाकितोसि मधुपा! सुमनें[10]; ॥
त्यजिलें आह्मांहि तसें, ॥ भुलवुनि अधरामृतें; ह्मणों त्या हितसें[11]? ॥ १८ ॥
मन मोहुनि टाकि तव॥ स्वामी, ऐसा प्रसिद्ध रे हा कितव[12]; ॥
कसि चरण शिवे कमळा[13] ॥ याचे? तीचा कसा धरि विवेक मळा[14]? ॥ १९ ॥
कळलें पिउनि भुललि तें ॥ अनृतकथामृत[15] तदाननेंचि[16] सुललितें[17]; ॥
नेणुनि भाव, सुरा[18] ॥ ती पी; न धरि विवेक, जशि विभावसु[19] राती.[20] ॥ २० ॥
कंसाचा रिपु[21], राणा[22] ॥ वृष्णींचा[23], श्रेष्ठ, कामचारि[24], पुराणा[25], ॥
गासी येथ तशास ॥ भ्रमरा ! इतरा जनासमीप कशास ? ॥ २१ ॥
येथुनि मधुपा ! जावें; ॥ हरिसखियांतें[26] स्वगीतमधु[27] पाजावें; ॥
करितिल भवदिष्ट[28]; गदा- ॥ ग्रज[29] त्यांच्या हरि निरंतर उरोजंगदा[30]. ॥ २२ ॥
ज्या स्त्री लोकत्रितयां[31]- ॥ माजि दुरापा[32], न त्या अरे पत्रि* ! तया; ॥
भ्रूयुग[33] कनकपटाचें[34] ॥ नाचे बहु-रुचिर[35], हसित[36] गृह कपटाचें ! ॥ २३ ॥
करुनि महा तप, दासी ॥ श्री[37] लावि रजोर्थ[38] मात्र हात पदासी; ॥
तेथें काय कदें[39] वना- ॥ लयदारांचा[40] ! न कामसायक[41] दवना[42]. ॥ २४ ॥

---

१ कृष्णाच्या अंगावरची माळ. २ विलास करणाऱ्या, ( 'सवतीच्या'). ३ तुझें अन्न. ४ मिशा. ५ हे निर्लज्जा! ६ आपलें अधरामृत. ७ ठकास ( कृष्णास ). ८ स्त्रिया. " जी! जी, " ह्मणून समजाविसी कर. ९ रसाविषयीं तृषित अशा मनानें. १० पुष्पें. ११ हितकरणारा असें ह्मणावें? १२ ठक. १३ लक्ष्मी. १४ मळास ( 'धरि' या क्रियेचें कर्म ). १५ खोट्या कथा हें च अमृत. १६ कृष्णमुखानें. १७ सुंदर ( 'आननें' याचें विशेषण). १८ मद्य. १९ सूर्य. २० रात्र. २१ शत्रु. २२ राजा. २३ यादवांचा. २४ स्वेच्छ. २५ आद्य, जुनाट. २६ कृष्णप्रिय स्त्रियांतें. २७ तुझें गायनहेंच मधु. २८ भवत्-इष्ट. तुझें इच्छित. २९ कृष्ण. ३० उरस्-ज-गद. स्तनज व्याधी. ३१ त्रैलोक्यांत. ३२ दुर्लभ. ३३ दोनहि भिंवया. ३४ पीतांबरधारी कृष्णाचें. ३५ फार सुंदर. ३६ हास्य. ३७ लक्ष्मी. ३८ रजस्-अर्थ=चरणरजःकणासाठीं. ३९ पदार्थ, किंमत, बिशाद. ४० वन-आलय-दार. अरण्यवासी गवळ्यांच्या बायकांचा. ४१ काम-बाण; (आह्मी जे त्यास मारूं ते). ४२ बेलासारिखी एक विष्णुप्रिय वनस्पतिविशेष.

* हे पक्ष्या, भ्रमरा !

तदपि दया जरि कृपणां[१]- ॥ वरि करिसिल, ‘उचित उत्तमश्लोकपणा[२],’ ॥
ऐसेंचि कळिव, राजा ॥ कितवांचा जो, तयाप्रति अळिवरा[३] ! जा. २५ ॥
कां चरणां शिवशि ? वहा ॥ न शिरीं पाय; प्रणाम भर शिवशिव ! हा. ॥
तन्मुखरस चाटूनी ॥ आलासि; कळे, वळे न मन चाटूंनीं[४]. ॥ २६॥
करुनी खोलँशि[५] कविता, ॥ जाला तो कितव[६] तूज बोल शिकविता; ॥
तें आह्मां सकळ कळे; ॥ आठवुनि मुकुंद या जनासँ[७], कळकळे! ॥ २७ ॥
हें सुख दावि; श्वासें ॥ ओठ करपले, रडों सदा विश्वासें, ॥
तळमळ दिनिंनिशिं[८], वांचे ॥ न व्रज[९], होतिल विलास सदनिं शिवांचे[१०]. ॥२८॥
ज्याकरितां निजपतितें, ॥ तोकें[११] जगद्द्वयहि[१२], ज्या सुमुनि जपती, तें[१३], ॥
त्यजुनी ध्यास[१४], त्यजित्या ॥ जालों; त्या वाटलों मृतां[१५] सत्य जित्यां[१६]. ॥ २९ ॥
त्या अजितस्वांतातें[१७] ॥ काय भजोनी ? भजों हित स्वांतातें[१८] ; ॥
सख्य पुन्हा फुटकळ, तें ॥ फळ कळलें; अन्न बहु शितें[१९] अटकळतें[२०]. ॥ ३० ॥
रावण ज्या वोवाळी ॥ स्वमुकुटमणिदीपकीं[२१] असा जो वाळी[२२], ॥
त्यास वधी लुब्धकसा[२३]; ॥ सेवावा व्यर्थ परनिधनलुब्ध[२४] कसा ? ॥ ३१ ॥
आपण तों स्त्रीजित, कीं ॥ सीतावश[२५]; करि तदीय[२६] वाक्यें जितकीं. ॥
वरि तन्वर्पण[२७], खींजे, ॥ बहुत विटंबी तसीहि शूर्पणखी[२८] जे. ॥ ३२ ॥
दाता, शूर, मृदु बळी[२९]; ॥ ज्याच्या कीर्तीपुढें सुधा[३०]चि दुबळी, ॥
छळिला तो, करि पूजे ॥ सर्वस्वें तरि; न देति शोक रिपू जे ! ३३ ॥
वर्णी महिमा, गेहीं[३१] ॥ जाउनि त्याच्या; त्रिपादें[३२] महि[३३] मागे हा[३४]. ॥
देतां, सर्व हरि[३४] हरी; ॥ बांधुनि घाली रसातळींच[३५] हरिहरि ! ॥ ३४॥

---

१ आह्मां गरिबांवर. २ उत्तम पवित्रता. ३ हे भ्रमरश्रेष्ठा! ४ मिथ्या व गोड भाषणांनीं. ५ गूढ अशी. ६ लबाड, ठक. ७ आह्मांस. ८ रात्रंदिवस. ९ गोकुळ. १० कोल्ह्यांचे. (विलास) होतील= घरें ओसाड पडतील. ११ मुलें. १२ इह लोक व परलोक. १३ जगद्द्वयहि. १४ मुलांबाळाचा इ० १५ मेलेल्या. १६ जीवंत. १७ अजित (जिंकिलेलें नाहीं ) अंतःकरण ज्याचें. १८ स्व-अंत, आपल्या मरणास. १९ (भाताच्या) एकच शितानें. २० समजतें. २१ आपल्या मुकुटांतील मणिरूपी दीपकांनीं. २२ वानरविशेष. २३ पारध्या सारिखा. २४ दुसऱ्याच्या मरणाविषयीं तत्पर. २५ सीतेनें वश केलेला. २६ सीतेचीं. २७ तनु-अर्पण देहाचें अर्पण. २८ रावणभगिनी. २९ राक्षसविशेष. ३० अमृताची गोडी. ३१ घरास. ३२ तीन पावलां एवढी. ३३ पृथ्वी. ३४ कृष्ण. ३५ पृथ्वीच्या खालीं.

ऐसा भोजपरिपु[1] रे; ॥ तत्सख्यामाजि[2] बहुत चोज[3], परि पुरे. ॥
म्हणसी जरि "कां गातां," ॥ भजिजेतें कंज[4] बांधि तरि कां गा तां[5]? ॥ ३५ ॥
जाणों[6] व्यर्गलतेतें ॥ कृष्णकथेच्या, खणी त्रिवर्गलतेतें[7]; ॥
परि हरिभृत्या[8]! गाया ॥ रसनो[9] रत, न क्षमां[10] सकृतु[11] त्यागाया. ॥ ३६ ॥
कृष्णानुचरित[12] लीला ॥ तें कर्णामृत धुतें कुपंककलीला[13]; ॥
तीची जे कीं कणिका[14] ॥ लाजे साध्वीस[15] त्या सुधाख्या[16] गणिका[17]. ॥ ३७ ॥
तीचे सेवन-कर्ति[18]ते ॥ द्वंद्ववियोगासि[19] पावती लोकरि ते; ॥
ह्मणुनचि होति विनष्ट[20], ॥ त्यजिति गृह कुटुंब दीन ज्यांत सुकष्ट[21]. ॥ ३८ ॥
आपणही बहु दीन ॥ भ्रमण करिति सर्वभोगसौख्यविहीन[22], ॥
ऐसे बहुत विहंग[23] ॥ प्राणार्थहि भीक मागतात असंग[24]. ॥ ३९ ॥
कृष्णकथासवकाणिका[25] ॥ मोहितसे चतुरमानसा[26]! जसि गणिका. ॥
न धरि तयाउपरें[27] मती; ॥ लोकव्यवहृति[28]रुचि क्रिया उपरमती[29]. ॥ ४० ॥
सकुटुंब सदन सुटतें; ॥ श्रुति*, लज्जा, स्नेह, लोकबंधन तुटतें; ॥
मान लवं[30] जनांत नुरे; ॥ स्मरे स्वपूर्व-प्रियाहि[31] न मना तनु[32] रे. ॥ ४१ ॥
गेले कामांतूनि ॥ छंदें या बहुत जन फुका[33] मातूनि[34]; ॥
मग हाता पसरीती ॥ उदरार्थ[35]; पडे गळांचि तापसरीति[36]. ॥ ४२ ॥
हें जाणत गोपी तों ॥ जाणूं; कीं जीव हा क्षण तगो, पीतों ॥
हें परमामृत[37] कानीं; ॥ मानियलें व्रजजनींहि या मृतकांनीं[38]. ॥ ४३ ॥

---

१ कंसशत्रु. २ त्याच्या मैत्रींत. ३ गुह्य, सुख. ४ कमळ. ५ त्वां. ६ सहायातें, आधारातें,
७ मोह, कर्म, आणि संपत्ति यांच्या गणरूपी बळींतें. ८ हे कृष्णसेवका! ९ जिव्हा. १० योग्य
शक्तिमान्. ११ एकदाहि. १२ कृष्णाच्या अनुकृत लीला = कृष्णानें जीं चरितें केलीं तींच
(आह्मीं) करून दाखविलेलीं. १३ दुष्ट पातक आणि कलह यांस. १४ कण, अंश. १५
पतिव्रतेस (कणिकेस). १६सुधा-आख्या, अमृत नामक. १७ वेश्या विशेष. १८ उपभोक्ते.
१९ कलहाच्या वियोगास (पावती) = कलहापासून मुक्त होतात. २० सर्वत्यक्त. २१ फार
कष्ट. २२ सर्व भोग आणि सुख यांविरहित जहालेले. २३ पक्षी. २४ संगहीन, एकटे. २५
कृष्णाची कथा हेंच कोणी एक मद्य, त्याचा अंश. २६ हे शहाण्या! २७ त्यावर. २८ लोक-
संबंधी कामें. २९ नाश पावतात. ३० किंचितहि. ३१ पूर्वी आपणास प्रिय असलेली (तनु)-
३२ शरीर. ३३ फुकट. ३४ गुंग होऊन. ३५ पोटासाठीं. ३६ तपस्व्याची चालचलणूक. ३७
श्रेष्ठ (कथारूपी) अमृत. ३८ मेलेल्यांनीं. *वार्ता.

गेला ओकित[1] वमना ॥ आम्हां, वार्ताचि ते असो; कितवमना[2]; ॥
याची काय रुचि[3]? रहा ॥ उगला आतां; नकोचि काय रुचिर हा. ॥ ४४ ॥
मृगयु[4] जसा गाय महा ॥ मधुर, गमे साधुमानसा! गा यम हो[5]; ॥
मांससतृष्ण[6] वधू तें ॥ करि कपट कळे न शुद्ध कृष्ण वधूंतें[7]. ॥ ४५ ॥
तो[8] खाया पळ[9], उर तें ॥ भेदि शरें[10]; आयु[11] काय मग पळ उरतें!॥
होय गति भ्रमरा! हे; ॥ प्राण मधुर गीत हाहि न भ्रम राहे. ॥ ४६ ॥
हरिणीस न पाप, शुचि[12]; ॥ परि आम्ही त्या वनेचरी[13] वा पशुचि, ॥
त्या याही[14] भीरुंचे[15]; तें ॥ दृग्युगही[16] समें[17]; न गीत दे भी[18], रुचतें. ॥ ४७ ॥
‘न पडो भव्यां[19] धामीं[20] ॥ तोटा त्याच्या’, ह्मणे, ‘शुभं[21],’ व्याधा मी; ॥
कीं हरिणी माराया ॥ उशिर न लावी[22]; दया न ये माराया[23]. ॥ ४८ ॥
भुलवी विश्वा, सोंगा ॥ घेउनि; आम्ही तयास विश्वासों[24] गा; ॥
जाणों सुखजनक[25] खवे ॥ तच्छब्द[26]; त्यागबुद्धि सहज न करवे. ॥ ४९ ॥
गणितां तद्वच[27], नखें[28] रे! ॥ करिति कुचीं शिवुनि तीव्र रतिपतिनखरे[29]; ॥
अनुभवुनि स्वमन खरे[30], ॥ ‘हरिपरिस[31]’ ह्मणे, ‘दुराग्रही[32] कवि न खरे[33].’ ॥५०॥
स्मर करि अर्हा[34] पीडा, ॥ कीं भूतें[35]; न बोल बर्हि-बर्हापीडा[36]. ॥

---

१ ओकीस. २ कृष्णाचें विशेषण. हा प्रथमा आहे, संबोधनी नव्हे. ३ गोडी, शोभा ४ पारधी. ५ कृष्ण. ६ मांसाविषयीं आशाभरित. ७ आम्हांस. ८ पारधी. ९ मांस. १० बाणानें. ११ आयुष्य. १२ शुद्ध, पवित्र. १३ वनांत फिरणाऱ्या; असा समास प्राकृतांत बहुधा येत नाहीं, परंतु ‘वने’ या सप्तमीचा लोप होऊन ‘वनचरी’ असा येत असतो. १४ आह्मी. १५ भितऱ्या. १६ दोनही डोळे. १७ (‘कुरंगनेत्री’ असें स्त्रियांस ह्मणतात ह्मणून ‘सम’ असें ह्मटलें आहे.) १८ भय. १९ कल्याणास. २० घरीं. २१ कल्याण, इष्ट. २२ याचा कर्ता ‘व्याध.’ २३ कृष्णास. २४ विश्वास ठेवीत होतों. २५ सुख उत्पन्न करणारे (खवे = तुकडे, गोळे.) २६ कृष्णाचे शब्द. २७ कृष्णाचें वचन (गणितां=मनास आणलें असतां). २८ नखें. २९ कामाचे नखरे=उत्तेजनें. ३० दाहास, (कामापासून होणाऱ्या). ३१ कृष्णापेक्षां. ३२ अशक्य असेल तरीहि ग्रहण करणारे. ३३ सत्य. सर्वांचा अर्थः— त्याचें वचन मनास आणिलें तर नखें (आह्मास) स्पर्श करून कुचीं कामाचे नखरे (= नखांनीं केलेलीं कांहीं कृत्यें) करीत असत; मग (त्या कामापासून जाहलेल्या) दाहास अनुभविल्या (=सहन केल्या) नंतर आमचें मन असें ह्मणे कीं- “होण्यास अशक्य अशा गोष्टीहि स्वीकारणारे असे जरी कवि असतात तरी त्याणीं, या कामदाहापासून किती दुःख होतें, असें जें वर्णन केलें आहे, तें अगदी अपूर्ण; पण कृष्णानें आपल्या स्पर्शानें, तें दुःख किती होतें, तें प्रत्यक्ष दाखविलें.” ३४ योग्य; (स्मर = काम). ३५ पिशाच. काम पीडा करी हें योग्यच आहे; कां कीं तें कोणी एक भूतच होय. ३६ बर्हि-बर्हापीड, मयूरपिच्छाचा तुरा आहे ज्यास = कृष्ण.

भीरुसि[1] होय झडपणी; ॥ करिती ब्रह्म[2]ग्रहादि काय धडपणीं? ॥ ५१ ॥
तूं चिरजीव[3]; दव[4]वार्ता ॥ वृष्टि तसी, मधुकर[5]! दुजी वद वार्ता; ॥
कीं[6] झांकुनि मुख राहें; ॥ किति कथिलें परि न ऐकसी मुखरा[7]! हें. ॥ ५२ ॥
न ई[8]छापुन राग मना- ॥ माजि भ्रमरा! किमर्थ पुनरा[9]गमना ॥
केलें? तुज पाठविलें, ॥ प्रिय सखया! काय केशवें[10] आठविलें? ॥ ५३ ॥
आगमन तव पुन्हा, या ॥ निववाया, विरहदहनग[11]तवपु न्हाया, ॥
प्रिय-संदेशा[12]मृत कीं ॥ द्याया? जावें न काळदेशा[13] मृतकीं[14]. ॥ ५४ ॥
त्वद्दयेप्सित[15] कुशालिवरा[16] ॥ मागें तूं पारितोषिकार्ह[17] अळिवरा[18]! ॥
तत्संगम[19] तों लंबा- ॥ लोलदलाग्रांबु[20]बिंदुसख रोलंबा[21]! ॥ ५५ ॥
जा वेड्या! नव घडतें ॥ प्रेम त्रुटितें[22] ? न जडे, पडे अवघड तें; ॥
हेंहि असो, हरिशील[23] ॥ द्वंद्व[24]; त्यागासहिष्णु[25]हि न हरिशील[26]. ॥ ५६ ॥
न वदें फार कथकसा[27]; ॥ अस्म[28]न्नयनोचित प्रकार कथ कसा. ॥
किति सुकुमारा! खणिशी ॥ नग[29] नखरें? सहचि ते रमा[31] राखणिशी[30]! ॥ ५७
यश रोलंबा ! गा जें ॥ बहु ह्मणती [31]श्री हरिप्रिया[32] ; बा! गाजें. ॥
नांदे तदु[33]रोधामीं, ॥ साहेन तिसीं पळार्ध न विरोधा मी. ॥ ५८ ॥
ऐसें वहु संकट, कीं; ॥ निधिपरि[34] वरि वेढिला फणींच्या[35] कटकीं[36]; ॥
तदुरोवा[37]सवतीतें ॥ माने न विपक्षज[38]न नवा सवतीतें. ॥ ५९ ॥
करुनी गुरुकुलवासा[39] ॥ आला कीं विजित चंचकों[21]! कुळवासा[40]? ॥

---

१ भ्यालेल्यास. २ ब्रह्मराक्षसादि. ३ अमर, कालांतापर्यंत जगणारा. ४ वणव्यानें त्रासलेल्यास. ५ हे भ्रमरा. ६ किंवा. ७ हे वडबड्या. ८ धरून. ९ पुनः येण्यास. १० कृष्णें. ११ विरहरूपी अग्नींत पडले आहेत देह ज्यांचे. १२ कृष्णाची आज्ञाहेंच अमृत. १३ मृत्युस्थळाला. १४ मेलेल्यांनीं (आह्मीं). १५ मनोभीष्ट. १६ कल्याणदायकांच्या श्रेष्ठास-कडे. १७ बक्षिसास योग्य. १८ हे भ्रमरश्रेष्ठा. १९ कृष्णाची संगति. २० लंबा-लोल- दल-अग्र-अंबु बिंदु-सख, कडू भोंपळ्याच्या हालणाऱ्या अशा पानावरील पाण्याचा जो बिंदु त्याचा सखा. २१ हे भ्रमरा! २२ तुटलेलें. २३ हरण करिसील. २४ कज्जा. २५ त्याग-असहिष्णु, त्याग करणेंहें सहन होत नाहीं ज्याला. २६ हरीचा स्वभाव. २७ गोष्टी सांगणाऱ्यासारिखा. २८ आमच्या नयनास योग्य असा. २९ वृक्ष. ३० राखणारी तसी. ३१ लक्ष्मी. ३२ कृष्णास आवडणारी. ३३ कृष्णाच्या वक्षस्थळीं. ३४ द्रव्याच्या ठेवी सारिखा. ३५ सर्पांच्या. ३६ वर्तुळांनीं, घेऱ्यांनीं, वेटाळ्यांनीं. ३७ कृष्णवक्षस्थळीं वास करणारीस. ३८ शत्रुजन. ३९ गुरूच्या घरीं राहणें. ४० आपल्या कुटुंबाच्या स्थळास.

मथुरेंतचि वनमाळी ॥ आहे कीं आर्यपुत्र[1] जनवनेंमाळी[2]? ॥ ६०
केंव्हां तरि वदतो रे ॥ या दासींची कथा प्रियंवद[3] तो रे ? ॥
तूं साधु अली[4] कानीं ॥ पडली तरि सांग, फटिव न अलीकांनीं[5]. ॥ ६१ ॥
जो स्वर्द्रुमगुरु[6] सुरभी- ॥ नाथ[7] श्रीकृष्णबाहु सदगुरुसुरभी,[8] ॥
तो केंव्हां निववील, ॥ छत्रत्व धरूनि, किंकरी[9] जिववील " ॥ ६२ ॥
इत्यादि व्रजवनिता-[10] ॥ सूक्तिसुधा तन्मुखामृतद्युतिजनिता[11]; ॥
उद्धव सुचकोर तिला ॥ सेवुनि, पावे महा रसिक[12] तो रतिला[13]. ॥ ६३ ॥
वक्तृवरा[14] जीवाचा[15] ॥ शिष्य, मधुप कृष्णचरणराजीवाचा[16]. ॥
बोले या वामांतें[17] ॥ कीं, " भवदवधानलेश[18] यावा मातें. ॥ ६४ ॥
धन्य तुह्मी; कवि भुवनीं[19] ॥ गाति यशा, 'सेविलां[20] त्रिलोकविभु[21] वनीं;' ॥
बहु-सुकृतीं[22] बहुजननीं[23] ॥ साधे हरिभक्ति सर्वमंगळजननी[24]. ॥ ६५ ॥
बहु वरव्यांपरि[25] चरणीं ॥ हरिच्या भक्ति प्रवर्तविलि परिचरणीं[26], ॥
त्यजुनि पतिकुलगुरुभया; ॥ मुनिवर्यांलाहि[27] नव्हति सिद्धि सुलभ या. ॥ ६६ ॥
तुमचें प्रेम न मापीं ॥ सांठे, मोजील कोण त्या? मन मापीं[28]. ॥
जालों कृतकृत्य, हिमीं ॥ तप्त निवालों तसाचि, हरिभृत्याहि[29] मी. ॥ ६७ ॥
मानस आनंदेशा ॥ [30]सूक्ति जयांत प्रियाचिया[31] संदेशा[32] ॥
त्या घेउनि आलों मी, ॥ ऐका; ताप न टिकेल एका लोमीं[33]. ॥ ६८ ॥
प्रीति धवाचि[34] कदा त्या ॥ न उणि ह्मणा, मजहि सत्य वाचिकदात्या[35]. ॥
संदेशसुधाधारा[36] ॥ प्या हे, स्वांतीं[37] धरूनि विबुधाधारा[38]. ॥ ६९ ॥
'प्रेमामृतभरितांला[39] ॥ त्द्दयसखींला तुह्मां सुकृतसरितांला[40], ॥

---

१ राजपुत्र. २ जनरूपी अरण्यांतील माळी. ३ गोडबोल्या. ४ भ्रमर. ५ लबाड्यांनीं. ६ कल्पवृक्षांचा गुरु ( श्रेष्ठ ). ७ कामधेनूचा स्वामी. ८ सत्-अगुरु-सुरभी, उत्तम चंदनाचा सुवास. ९ दासी. १० गोपींचें सुबोल हेंच अमृत. ११ त्यांच्या मुखरूपी चंद्रापासून उत्पन्न जाहलेली ( सुधा ). अमृतद्युति = अमृतांशु = चंद्र. १२ भक्त, आसक्त. १३ सुखाला. १४ वक्तृत्व करणारांत श्रेष्ठ अशा. १५ बृहस्पतीचा. १६ कृष्णचरण कमळाचा. १७ स्त्रियांतें. १८ भवत्-अवधान-लेश, तुमचें किंचित लक्ष. १९ जगीं. २० आराधिला. २१ त्रैलोक्यप्रभु. २२ फार पुण्यांनीं. २३ फार जन्मीं. २४ सर्व कल्याणाची आईच. २५ साध्वींसारिख्या. २६ सेवेंत. २७ ऋषिश्रेष्ठांस. २८ रमाधवीं. २९ हरिदास. ३० सु-उक्ति. ३१ कृष्णाच्या. ३२ निरोपास. ३३ केशीं. ३४ पतीची. ३५ वर्तमान देणाऱ्यास ("सत्य ह्मणा"). ३६ निरोपरूपी अमृताची धार. ३७ मनांत. ३८ विबुध-आधारा, देवांच्या आधारास (कृष्णास). ३९ प्रेमरूपी अमृतानें ( अमृत = पाणी ) भरलेल्यांस. ४० पुण्यनद्यांस.

त्रिजगदुपादानासीं[1] ॥ मजसीं न वियोग कृतकृपोदानासीं[2]. ॥ ७० ॥
खानिलशिखिजलभू[3] तीं ॥ हेतुत्वें वसति जसिं चराचर-भूतीं[4]; ॥
मी तेविं मनोसुमती-[5] ॥ करणगुणानुगत जाणतो, जो सुमती[6]. ॥ ७१ ॥
भेद नगाँ[7] हेमा[8], या[9] ॥ विश्वास[10] मजहि तसा, उगा हे मायां; ॥
मी ज्ञानघन[11] सती हो! ॥ आत्मा स्वगतादि[12] भेद लव नसती हो. ॥ ७२ ॥
अहिस[13] न जरि हार वितो,[14] ॥ भासे तत्सत्यता[15]; न परि हारवितो[16]; ॥
नसुनि विलोकावि; वर्ता, ॥ जाणा मजमाजि तेविं लोकविवर्ता[17]. ॥ ७३ ॥
शोण[18] रुचि[19] स्फटिकाची, ॥ दावि जपापुष्प[20] भाव तो लटिकाची, ॥
तसि माया स्वच्छा या ॥ आत्म्या लावी अनेकता स्वच्छाया[21]. ॥ ७४ ॥
नियमा[22] मन; घावरिया ॥ वृत्ती न करा; असाहि अनघा[23] वरिया. ॥
मदुदितयोगांत[24] रती ॥ नावें[25], इणें साधु मद्वियोगा तरती. ॥ ७५ ॥
स्छिति माने दूर सती! ॥ कीं प्रेमाचा विटोंचि नेंदू[26] रस ती. ॥
मत्ध्यान बहु घडावें, ॥ स्वसुखनिधिद्वार आपणचि उघडावें. ॥ ७६ ॥
दूर प्रियजन[27] वसती. ॥ देखाया करिति नित्य नवस नव[28] सती; ॥
सहवासीं त्यासम न, ॥ प्रेम धरुनियां, भजे सदा त्यांस मन. ॥ ७७ ॥
मी सुखधाम जपावा, ॥ ध्यावा, गावा, पथें अशा मज पावा. ॥
सुखनिधिला गिवसाल[29] ॥ स्वपदीं, भेटोनि शांतिलागिं, वसाल. ॥ ७८ ॥
न रति घडो जारासीं[30] ॥ मजसिं ह्मणुनि, धव निरोधिती[31] ज्या रासीं[32] ॥
अर्पुनि निजमानस[33] त्या ॥ विरहीं मज, पावल्या मुनिसमान[34] सत्या, " ॥ ७९ ॥

---

२ केलें आहे कृपेचें दान ज्याणें,
१ त्रि जगत्-उपादान, त्रैलोक्याचें कारण ( कृष्णासीं ). ३ ख-अनिल-शिखी-जल-भू, आकाश, वायु, अग्नि, उदक, आणि
( हें १ चें विशेषण ). ४ स्थावर जंगम अशा भूतीं. ५ मनस्-असु-मति-करण-गुण - अनुगत. ६
पृथ्वी हीं पंचतत्वें. ४ स्थावर जंगम अशा भूतीं. ५ मनस्-असु-मति-करण-गुण - अनुगत. ६
पृथ्वी हीं पंचतत्वें. ४ स्थावर जंगम अशा भूतीं. १० भ्रम. ११ ज्ञानाचा पर्जन्य. १२आपल्या
बुद्धिमान्. ७ अलंकारास. ८ सुवर्णास. ९ जगास. १० भ्रम. ११ ज्ञानाचा पर्जन्य. १२आपल्या
मधील. १३ सर्पास. १४उत्पन्न करितो. १५ त्याचाखरेपणा. १६ त्यागिला किंवा विसरला जा-
तो. १७ लोकरूपी विवर्त. विवर्त =भ्रम; जसें, दोराच्या ठिकाणीं भ्रमानें सर्पता मानणें यास
' विवर्त ' असें ह्मणतात. मीच आहें जेथें, तेथें लोकांचा भास मानणें याला ' लोकविवर्त ' अ-
सें ह्मणावें. १८ तांबडी. १९ कांति. २० जास्वंदीचें फूल. २१ आपली छाया, भ्रम. २२ आक
लनकरा. आकर्षा. २३ निर्दोषी. २४ मत् - उदित-योगांत, मी सांगितलेल्या योगांत. ( रति=
प्रीति ). २५ नौका. २६ नदेऊ. २७ पतिजन. २८ नवा. २९ पावाल. ३० छिनालासीं. ३१
अटकाविती. ३२ रासक्रीडेंत. ३३ आपलें मन. ३४ मुनी पावतात तशा.

प्रियतम[1] जो हरि, त्याचा ॥ संदेशाख्य[2]प्रसाद भवहर[3]त्याचा ॥
ऐकुनि, वरतनु[4] रागें ॥ वदति स्वांतांत पूर्ण परि अनुरागें[5]:— ॥ ८० ॥
"वधिला कंस अरा[6] ती, ॥ उद्धरिली ज्ञातित्वद्गता[7]चि अरा[8] ती; ॥
द्विडिभा[9]चा अंकुश तें ॥ करि बरवें; हरिसिं[10] काय रिपुरंकु[11]शतें? ॥ ८१ ॥
धन सन्मान समुदित[12] ॥ ज्ञातिस देऊनि, करुनि मानस मुदित[13], ॥
त्यांसह उद्धवजि! वसे ॥ हरि कीं, अन्योन्य लब्धउद्धव[14] जिवसे? ॥ ८२ ॥
पुसतो हरि दासां गा ॥ उद्धवजी! कीं यथार्थचि वदा सांगा. ॥
श्रुतिरति[15] पुरवा; माया ॥ पतिचि असे काय, भजति पुरवामा[16] या? ॥ ८ ॥
कृष्ण रमविला; सकळा ॥ जाणति त्या तन्ममोरमविलास[17]- कळा? ॥
पुसणें हें काय? शतें ॥ जन्मांच्या ये न, करुनि हेका*, यश तें. ॥ ८४ ॥
सुहृदंबुज[18]रवि दग्धा[19] ॥ निजविरहाग्नीं[20]त या जना अविदग्धा[21], ॥
आठवितो गोष्ठींच्या[22] ॥ केव्हां तरि काय अवसरीं[23] गोष्टींच्या? ॥ ८५ ॥
तूं यदुवीरासरसा[24] ॥ वससि, पुसें ह्मणुनि; आठवी रासरसा[25],—॥
कीं हरि जाला रमता ॥ नाचत, गात, प्रिया जया फार मता[26]? ॥ ८६ ॥
जाले जेवण व्याला[27] ॥ स्वविरहशोका तयाच, जे वणव्याला, ॥
हे जन शुष्क अरण्य; ॥ प्रभुकरुणाघन करील शांत शरण्य[28]? ॥ ८७ ॥
न धरुनि परवा, टोळें ॥ कंसें छळिलें उदंड, पर वाटोळें ॥
जालें यादवपातें[29]; ॥ वश यास्तव सर्व आप्त यादव पातें[30]? ॥ ८८ ॥
नृपवरकन्या[31] वरिल; ॥ प्रेम कसें हो तगेल वन्यांवरिल[32]? ॥
या मायादावातें[33] ॥ काय अधिक फळ वदोनियां? दावा तें. ॥ ८९

---

१ अत्यंत प्रिय. २ 'निरोप' हेंच आहे नाम ज्यास. ३ संसार हरण करणाऱ्याचा. ४ सुंदर आहेत शरीरें ज्यांचीं. ५ प्रीतीनें. ६ शत्रु. ७ आप्तांच्या त्हृदयांत गेलेली. ८ धार, भग्न. ९ द्विट्-इभाचा, शत्रुरूपी हत्तीचा. १० कृष्णरूपी सिंहास. ११ शत्रुरूपी शेकडों हरिणांनीं. १२ उदय जहाला आहे जीचा अशा. १३ आनंदित. १४ सांपडला आहे उद्धव (उत्साह) ज्यांस. १५ कर्णांची इच्छा. १६ नगरवासी स्त्रिया. १७ कृष्णाच्या मनास आराम देणारा असा विलास. १८ आप्तांच्या हृदयकमळाचा सूर्य. १९ जळालेल्या. २० आपला विरह हाच अग्नि त्यांत. २१ मूर्खांस. २२ गोठ्यांतील. २३ वेळीं. २४ जवळ. २५ रासक्रीडेंतील रसास. २६ मान्य. २७ (स्वविरहरूपी) सर्पास. २८ पालन करणारा. २९ यादवांच्या पतनानें; किंवा, कृष्णाच्या योगानें. ३० स्वामीतें. ३१ श्रेष्ठ राज्यांच्या कन्या. ३२ अरण्यांत राहणाऱ्यां वरिल. ३३ मायारूपी दावाग्नीतें. * आग्रह.

आह्मा रानींच्यांनीं ॥ काय तया लाभ ईश्वरा नीचांनीं? ॥
नृपकन्याही न वरा,[1] ॥ तो आत्माराम भूतिचा[2] कीं नवरा. ॥ ९० ॥
'सुख नैराश्यापरतें[3] ॥ नाहिं,' ह्मणे पिंगलाख्य[4]वेश्या, पर तें ॥
न घडे देखा; परिस ॥ स्वर्णत्वप्रदहि[5] तें न दे खापरिस. ॥ ९१ ॥
कोण सये! कांताच्या[6] ॥ वार्ता सोडूं शकेल एकांताच्या? ॥
इच्छीना हरि, पर ती ॥ श्री, पद सोडुनि, न होय पळभरि परती. ॥ ९२ ॥
दुःख न होतें[8] विसरीं; ॥ दवदाह जसा तटीं, न हो तेंवि सरीं.[7] ॥
न स्वमतिस दावि मुख ॥ श्रीपतिचा विसर. कां सति! सदा विमुख? ॥ ९३ ॥
स्मृति नुठवी मनिं यमुना, ॥ तरि काय क्षण मुकुंदकाम नियमुंना?[9] ॥
नामें रूपें कृष्णा ॥ स्मरवि, ठकवि, शुक्ति[10] जेवि रूपें[11], कृष्णा.[12] ॥ ९४ ॥
जेथ वधी संदरींतें,[13] ॥ तेंतें स्छळ मोहितेंचि धीसं[14] दरींतें ॥
होय क्षोभ वनातें ॥ विलोकितां, करि जयांस तो भवनांतें.[15] ॥ ९५ ॥
शुचित्वदया[16] गाईंतें ॥ पाहों जेव्हां हरिप्रिया, गाँई*! तें ॥
वाटे आला पीत- ॥ द्युतिवसन,[17] स्मरसमूह[18] आलापीत. ॥ ९६ ॥
हें सर्वहि आठव दे; ॥ मन मतिसीं तद्गुण प्रहर आठ वदे; ॥
जेंतेंही स्मरवीतें, ॥ स्मरण हरीचें सुदुःसह स्मर वीतें.[19] ॥ ९७ ॥
असति उमटलीं पदंकें[20] ॥ श्रीधरणीच्या उरस्छळींचीं पदकें, ॥
नयनांतें लोभविती, ॥ शोभविती भूमितळ, मन क्षोभविती. ॥ ९८ ॥
स्मितगतें[21] ईक्षणें[22] ललितें[23] ॥ मधुरोक्तें पाहुनि स्वबुद्धि भुलति तें. ॥
न शकों विसरा विसरें[24] ॥ स्वसुखांचा, चातकीं न विसरावि सरें[25]. ॥ ९९ ॥
विरहांबुधि[26] करिल गट[27] ॥ व्रजासि; तव-शोक-वाडवचि[28] करि लगट. ॥
'निजजनजीवित राहो' ॥ हें दान वदान्यनाथ[29] जी! वितरा[30] हो. ॥ १०० ॥

---

१ सुंदर, श्रेष्ठ. २ ऐश्वर्याचा. ३ निराशेहून. ४ पिंगला या नावांची एक कलावती. ५ सुवर्णपणा देणारा. ६ पतीच्या. ७ तळ्यांत. ८ 'विसराचें' विशेषण. ९ नियमांत ठेवणार नाहीं. १० शिंपा. ११ रौप्य. १२ यमुना. १३ सत्-अरींतें. १४ बुद्धीस. १५ घरें. १६ निष्कपटी, भोळ्या. १७ पीतांबरधारी. १८ कामसमूह. १९ या क्रियापदाचा कर्त्ता 'स्मरण'. २० पाउलें. २१ हास्य आहे ज्यांत. २२ पहाणें. २३ सुंदरें. २४ समूह. २५ पावसाची. २६ विरहरूपी समुद्र. २७ "गट करणें" = खाऊन टाकणें. २८ वडवाग्नि. २९ दयाळूंत श्रेष्ठ. ३० पसरा. *अगाई.

शोकांबुधि तीव्र, तरे ॥ न व्रज; तूं रक्ष महदुपकृतिव्रत[1] रे! ॥
जो निकट उभा नुतरी, ॥ बंधु कसा? न निववी, अमृतभानु[2] तरी?" ॥ १०१
वारिवहाभा[3] गात्यां ॥ जाल्या ऐसें सती महाभागा[4] त्या. ॥
प्रियसंदेशींअगदीं[5] ॥ आधिव्याधि शमले, परि न ते अगदीं. ॥ २ ॥
तो प्रियकर मित्राचा ॥ पूजिति, नलिनी[6] जशा स्वकर मित्राचा[7]. ॥
प्लवग[8] समीहित[9] सीते, ॥ मानी हरिदास मंडळीहि तसी ते. ॥ ३ ॥
त्यजि आत्मारामहि, ने ॥ तो उद्धव काळ गोकुळीं सा महिने; ॥
करि सत्सहवास, वदे, ॥ सेवी यश. सुख तसें न यदुवासंव[10] दे. ॥ ४ ॥
लावि दयाळकथांनीं ॥ भजनीं मन, माय जेवि बाळक थानीं. ॥
बहु सुख दे वासर[11]; ते ॥ जाले क्षण, चिंतितांचि देवा, सरते. ॥ ५ ॥
गोपींचें कृष्णीं तें ॥ प्रेम जसें, सर्वथा नसे वृष्णींतें[12]; ॥
सर्वांहि शुद्ध वरीती ॥ ब्रह्म सगुण, गाय तेचि उद्धव रीति. ॥ ६ ॥
"गोपी सकळ जनु जनीं ॥ आत्माधिक इष्ट ज्यांसि शौरितनुजानि; ॥
भक्त मुमुक्षु ज्ञानीं ॥ काय अधिक यासि पूजिजे सुज्ञांनीं? ॥ ७ ॥
वांछिति ज्या प्रेम्यातें ॥ साधु सकळ, येथ देखिलेंसे म्यां तें; ॥
जरि गोपवधू, तरि ते ॥ सिद्धि असे; यासि अन्य अवधूत रिते. ॥ ८ ॥
'हें ब्राह्मणजननींच[13] ॥ प्रेम शुचित्वें घडे, इतर जन नीच,' ॥
ह्मणतां अन्यायाची ॥ जोडि असे; योग्यताचि अन्या याची. ॥ ९ ॥
यन्मन बाळक थांनीं ॥ लावियलें सदयविश्वपाळकथांनीं, ॥
त्यास अशा सन्मानीं ॥ काय? अधिक विप्र विप्रवर मानी. ॥ ११० ॥
हेतु महत्वा चरण ॥ प्रसाद हरिचा; तयास जात्याचरण[14] ॥
ज्ञानहि न हेतु; भजन ॥ प्रभुचें केवळ तदिच्छु सर्व शुभ जन. ॥ ११ ॥
युवति सदा रानींच्या, ॥ व्यभिचारपराहि, गोपदारा, नीचा; ॥
या कोठें, अजितरती ॥ कोठें? भजतां न जाणते अजि! तरती. ॥ १२ ॥
बोध न लेश वसे, जे ॥ दीर्घस्वापार्थ[15] पहुडले शवसेजे[16]. ॥

१ मोठे उपकार करणें हेंच आहे व्रत ज्याचें. २ चंद्र. ३ वारिवह-आभ, घनःश्यामास. ४ भाग्यवती. ५ प्रियाचें निरोप हींच औषधें, त्यांनीं. ६ कमळणी. ७ सूर्याचा ( कर = किरण.) ८ वानर (मारुती). ९ फार इष्ट. १० यादवेंद्र. ११ दिवस. १२ यादवांतें. १३ ब्राह्मणजन्मींच. १४ जाति-आचरण. १५ मोठ्या निजेसाठीं. १६ प्रेताच्या बिछान्यावर.

त्याहि अजीवां चवितें ॥ नेणतयां, अमृत कीं अजी वांचवितें! ॥ १३ ॥
जड न चुके; [1]शवरक्षा ॥ होतांही उठवि अमृत; "केशव [2]रक्षा ॥
न करी कां जी, भजनीं?" ॥ कथि हें [3]श्रुतिचीच भाविकां जीभ जनीं. ॥
श्री स्त्रीही परि रंभा- ॥ द्यमरवधू[4] सुंदरीच बहु परिरंभा[5] ॥
नेणाति ही लव ज्या, यां[7] ॥ [6]रासीं त्या पावल्याचि बल्लवजाया. ॥ १५ ॥
यांचें भाग्य बहुचि; तें ॥ वानाया दशशताननेंहि[8] न उचितें. ॥
शक्ति नसे, वानावें ॥ किति? गावुनि परि करावि सेवा नावें. ॥ १६ ॥
कृष्णकृपा होउ, घडो ॥ प्रार्थित, हें सदय देव पाहों उघडो. ॥
वाटे मज लाभ लता ॥ गुल्मतृणोद्भवहि[9] येथ मजला भलता. ॥ १७ ॥
जन्म असें मम नीच ॥ [10]क्षुद्र घडो हरि; सुखी असेन मनींच ॥
साधुकृपाहि लहानीं ॥ दिसते; हें जाणता न पाहिल हानी. ॥ १८ ॥
इच्छीं अवर [11]जनुस, तें ॥ यास्तव कीं पदसरोजभवरज[12] नुसतें ॥
गोपींचें असुलभ, या ॥ माथां ठेवूनि पाय, हरिल कुलभया[13]. ॥ १९ ॥
जरि [14]अनुकंपा दीनं-[15] ॥ स्वर्द्रुम हरि करिल, हेंचि संपादीन; ॥
गोपींचें पायतण ॥ स्पर्शी, व्हावें करूनि सदुपाय[16] तण[17]. ॥ १२० ॥
ज्याचें दुस्त्यज नातें, ॥ त्यजित्याजाल्या तृणापरि स्वजनांतें; ॥
धर्मालाही नमनें ॥ केलीं; गणिलेंहि मृत्युलाही न मनें. ॥ २१ ॥
जें श्रुतिशतपद[18] वीची* ॥ स्वसुखांबुधिची[19], मुकुंदनिजपदवीची, ॥
जरि परिभवहि, वरिलि; हे ॥ [20]पुण्यर्धी चित्रगुप्त न वहिवरि लिहे. ॥ २२ ॥
ज्याची सतत अपचिती[21] ॥ श्री करि, तपली तदर्थ तीव्र तपचि ती; ॥
जें मुनिदैवत, शाला ॥ शांतीची, ख्याति भू [22]सदैव तशाला. ॥ २३ ॥
स्कंदपिता[23] पाथांनीं[24] ॥ ज्याच्या विषदाह शमवि; तापा, थानीं ॥
ठेवुनि त्या हरिचरणा, ॥ विज्ञविति गोपी, करूनियां परिचरणा[25]. ॥ २४ ॥

---

१ प्रेताची राख. २ पालन. ३ वेदाची. ४ रंभादि-अमर-वधू, रंभादि देवांगना. ५ आ-लिंगनास. ५ "बल्लवजायाचें" दर्शक. ६ रासक्रीडेंत. ७ गोपी. ८ शेषानें. ९ गुल्मापासून व तृणापासून जाहलेली. १० हलकें. ११ नीच जन्मास. १२ पदकमलांपासून जहालेले रजः-कण. १३ कुलाच्या भयास. १४ दया. १५ दीनाचा कल्पतरू. १६ सत्-उपाय. १७ तृण. १८ वेदशतांचें स्थान. १९ सुख-अंबुधिची = स्वसुखसमुद्राची. २० पुण्यवृद्धि. २१ पूजा. २२ सर्वदा. २३ शिव. २४ उदकांनीं २५ सेवनातें. * लाट, लहरी.

गोपींच्या पायाला ॥ नमन; नसे भेद शार्ङ्गचापा[1] याला. ॥
भजती हरिसख्यातें; ॥ प्रेमें गाती, स्मरोनि हरिस, ख्यातें[2]. ॥ २५ ॥
केलें हतरिपुंनीं[3], तें ॥ गाउनि सच्चरित सौख्यकारि, पुनीतें[4] ॥
भुवनें करिती, न मनें[5]; ॥ असोत यां नित्य जन्मभरि तीं नमनें." ॥ २६ ॥
ऐसें तो उद्धव या ॥ गोपींतें गाय साधुतम शुद्धवया; ॥
स्मरशरजा[6] मनिं घाया ॥ करुनि, बेंर विनवि गंतुकाम[7] निघाया. ॥ २७ ॥
नाहीं मनिं जावासा ॥ प्रिय उद्धव माधवासम निजा वासा[8], ॥
जाय तरि; असा नंद- ॥ प्रभृतिजन वदे कृतांजलि असानंद[9]. ॥ २८ ॥
"अस्मन्मानसवृत्ती ॥ हंसीला हरिपदाब्जमानसवृत्ती ॥
द्या ऐसें वरदास ॥ प्रार्था जातांचि; मागतो वर दास. ॥ २९ ॥
वाणीसहि लावु चटी ॥ हरिनाम, न विस्मृति क्षण जिला उंचटी[10]; ॥
आह्मां हा हो सण तां[11]" ॥ विनवावा; हरि मुखास ये वोसणतां. ॥ १३० ॥
त्या सदुदारा, बावा ॥ उद्धवजी! माग कीं सदा रावावा ॥
सेवेंतचि देह; रितें ॥ पळ न टळो; फार दास्य हें दे हरि तें. ॥ ३१ ॥
कर्मेचि परिश्रमतां ॥ वारावा कर्मभोग न; परि श्रम तां ॥
उरवावा न मनांत; ॥ प्रेम असो फार माधवा! नमनांत. ॥ ३२ ॥
निष्कामत्वें शुचिता ॥ संपन्ना सत्क्रिया घडाव्या उचिता. ॥
स्वावनदक्ष-[12] भुजातें ॥ वद, 'आश्रय दे पदांबुजेंचि सुजातें. ॥ ३३ ॥
न पदापरती राहो ॥ मति, सदय भवांबुराशिपरतीरा[13] हो!' ॥
हें हरिस वदा, 'विसरा ॥ न तृषार्ता,' जो कुलप्रसव[14] दावि सरा[15]." ॥ ३४ ॥
सांजलि[16], साश्रु तदा स- ॥ व्रजपति जन काम करि असा श्रुत, दास. ॥

१ शार्ङ्ग = विष्णूच्या धनुष्याचें नांव. शार्ङ्गचापा = शार्ङ्ग आहे चाप (= धनुष्य) ज्याचें त्याला (= विष्णूला). २ चरित्रें; अथवा विशेषण मानून "ख्यातें प्रेमें" = सर्व प्रसिद्ध अशा प्रेमानें. ३ हत (= मारिले) आहेत (स्व ) रिपु (= शत्रु) ज्यांणीं त्या (= बळकृष्णानीं). ४ पावन, पवित्र. ५ केवळ (आपुलीं) मनेंच पुनीतें करिती असें नव्हे, पण भुवनें पुनीत करिती. ६ स्मरशरापासून उत्पन्न जहालेल्या ("घाया"). ७ जाण्यास इच्छिणारा. ८ घरीं. ९ अ-स-आनंद = सानंद नव्हे = सखेद. १० उपटी. ११ त्वां. १२ स्व-अवन-दक्ष-भुज = स्वजनांचें संरक्षण करण्याविषयीं समर्थ आहेत भुज ज्याचे त्या (कृष्णास). १३ संसाररूपी सागराचें पैल तीरच असा जो तूं. हें संबोधन आहे. १४ कुलाची उत्पत्ति ज्यापासून. १५ सरोवरास. १६ स-अंजलि = हात जोडून.

दे विविधोपायन[1] तें ॥ घे उद्धव; नमि शिरेंचि तो पाय नतें. ॥ ३५ ॥
पावे मथुरापुर; तें ॥ व्रजवासिप्रेम हरिस सांगे पुरतें;॥
वंदुनि मृदुपाय नतें ॥ स्वशिरें, अर्पी यथोक्त सदुपायन तें. ॥ १३६ ॥

॥ ॥ इतिश्रीमत्कृष्णविजये सप्तचत्वारिंशोऽध्यायः ॥ ४७ ॥ ॥

मांडुनि पाटी[2], रतिचा ॥ योग पुसे जे, गृहीतपाटीर तिचा ॥
ताप दयाघन सारा ॥ हरि; वंदूं सावळ्या तया घनसारा[3]. ॥ १ ॥
दे सकुतुक मलयज[4] न, ॥ प्रभुचें घडलें दुजें पदकमलयजन. ॥
दीनाचा भाउ, जरी ॥ अल्प भजन, दे असीम शोभा, उंजरी[5]. ॥ २ ॥
सुरुचिर[6]देहा रमणी ॥ भोगी, जाउनि गृहासि; दे हार मणि. ॥
काम पुरविला साचा; ॥ दे दुर्मति घे वर स्मरविलासाचा. ॥ ३ ॥
सैरंध्री[7] कृतकृत्या ॥ केली जी, तनु करूनि धिःकृतकृत्या[8], ॥
पावे श्रीपरिस रति- ॥ प्रसाद; ज्यास न सुरांगना परि सरती[9]. ॥ ४ ॥
वरद जलजनाभ[10] जनीं ॥ दावी ऐसें महाफल जना भजनीं. ॥
संगें अतनुशि[11] खंडी ॥ त्या स्त्रीच्या देव, जेंवि अहिस शिखंडी.[12] ॥ ५ ॥
अक्रूराला भवना[13] ॥ भेटाया, द्यावया वरा लाभ वना ॥
त्या दयमान वसंत, ॥ प्रभु जाउनि, सुखवि देव,मानव,संत. ॥ ६ ॥
स्मरला भाके कीं तें ॥ वदलाहोता; दयाब्द[14] हा केकीतें[15] ॥
भक्तातें विसरेल ॥ प्रभु कां? तत्ताप सर्व केंवि सरेल? ॥ ७
पूजुनि शुद्धवपूतें[16], ॥ अक्रूरें साधिला सदुद्धव पूतें. ॥
तो उत्सव दोंदीं[17] न ॥ ब्रह्मांडसमीं धरे; किति वदो दीन? ॥ ८ ॥
"पसरूनियां आ, म्यांचि ॥ स्वांबेच्या[18] सेविली सुधा आम्र्यांची[19]. ॥

१ विविध-उपायन = अनेक प्रकारचे नजराणे. २ नित्यक्रम. ३ मेघाचें केवळ सारच असा जो त्यास. याचा अन्वय असा आहेः— पाटी मांडुनि, जे रतिचा योग पुसे, तिचा सारा ताप गृहीतपाटीर (= स्वीकारिलें आहे चंदन ज्याणें) दयाघन हरि (= हरण करी). ४ चंदन. सकुतुक मलयज दे इतकेंच नव्हे, पण प्रभूचें दुजें पदकमलयजन (= चरणरूपी कमलाचें पूजन) घडे. ५ नीट करी. ६ फार सुंदर आहे देह जीचा. ७ दासी. ८ धिःकार केला आहे कृत्येचा जीणें. कृत्या = एक देवता. ९ "सरती" =बरोबरीस पोहचतात. १० कमलनाभ. ११ कामास. १२ मोर. 13 घरीं. १४ दयेचा केवळ मेघच. १५ मोरातें. १६ शुद्ध आहे शरीर ज्याचें (=कृष्ण). १७ उदरीं. १८ आपल्याआईच्या. १९ स्तनाची.

गोडी आहे नामीं, ॥ तैसी हरि! तींत[१] लेश पाहेंना मी. ॥ ९ ॥
पसरवि आ ह्मातारी[२] ॥ दे अमृत, तुजीहि कीर्ति आह्मां तारी; ॥
अज्ञानां आमांतें[३] ॥ जें दे आरोग्य, वा! न दे आमा तें. ॥ १० ॥
बहु चिटि[४] तों, कांटाळा ॥ ये मग दे माय तेहि तोकां टाळा[५]. ॥
'नित्य चिटा[६] कीं नामीं ॥ श्रम न,' ह्मणें 'क्षणहि हेचि[७] टाकीना,' मी. ॥
त्राणीं आळस, दापी[८] ॥ जाणतया, अजि न जीस बाळ सदा पी; ॥
थोरीं, आणि लहानीं, ॥ कीर्ति सम प्रीतिला, न आणि लहानी[९]. ॥ १२ ॥
कोणाहि न भी; डसवी ॥ ते आहि पाजी; विलंघिहि न भीड सती ॥
कीर्ति तुजी, जननीच्या ॥ परिस भली; करि सुखैकभाजनं[१०] नीचा. ॥ १३ ॥
कीर्तिसमहि मातेला ॥ ह्मणतों[११]; ये काय आज्यमहिमा तेला? ॥
हे माता अमृताची, ॥ न मृताची; कीर्ति तों मृताअमृताची. ॥ १४ ॥
तूज्या पदयुगलीची, ॥ रीति पहातों मनांत जों उगलीची, ॥
सुरभीची आजि कडे ॥ घे दीना, धांवते पसरि आ जिकडे. ॥ १५॥
धरिते भाव शनीच्या ॥ दृष्टीचा, भूतिवल्लभा[१२]! वशनिचा ॥
करि पीडा परम; उशी ॥ शांतीची, अघनगाशनी[१३], पर मउशी. ॥ १६ ॥
सुख यद्रज दे, वांचे ॥ ज्या अमृतें विश्व, पाय मज देवाचे ॥
हे नौकानाविक; ते ॥ ध्यावे, देऊनि चित्त, कां ना विकते? ॥ १७ ॥
लागो मोघा[१४] भावां[१५] ॥ आगि; तुह्मां भेटले न दोघां भावां. ॥
गेले भव[१६] देवा! जे ॥ नेणत, एकहि न त्यांत फळ दे वांजे. ॥ १८ ॥
धन्यचि हा दीन, वमीं ॥ नामें अगदें अहंममादी नव, मी. ॥
हे तूज असे विनती, ॥ मात्रा भवगदचिकित्सका[१७]! सेविन ती." ॥ १९ ॥
करि बहुशः स्तव, देहा ॥ चरणीं अक्रूर ठेवि, शस्त[१८] वदे हा. ॥
तेथ असाया दास ॥ प्रार्थि असें; लोभ जळिं असा यादासें[१९]. ॥ २० ॥
देव वदे, " अजि तातें ॥ प्रेमें या जिंकिलें तुवां अजितातें. ॥

---

१ "स्वांबेच्या आम्याच्या सुंबंत." २ यशोदा. ३ आह्मांतें. ४ पीतो. ५ चुकवाचुकव. ६ प्या. ७ तुझी कीर्ति. ८ दटावी. ९ लहानपणा. १० सुखाचें मुख्यस्थान. ११ ह्मणालोंअसतों. १२ हे ऐश्वर्याध्यक्षा! १३ अघ-नग-अशनी ( स्त्रीलिंग). पापपर्वताला वज्र. १४ व्यर्थ. १५ भक्तीला. १६ जन्म. १७ हे भगवदचिकित्सका! अहंममादि नव अगदेंमी वमीं ( ओकतों ), ह्मणून नामरूपी मात्रा दे. १८ प्रशस्त. १९ जलचरास.

यदुचि अहो भागवत ॥ श्रेष्ठा! न पवे उशीर[१]शोभा गवत. ॥ २१ ॥
तुजला जनका कांहीं ॥ भेद न हा पोष्य होय जन काकांहीं ॥
जो हित तोका कानीं ॥ पाजावा सदुपदेश तो काकांनीं. ॥ २२ ॥
तुमचा संता पद वा ॥ रजचि स्मरतां निवारि संतापदवा; ॥
जरि मन सेविल याला ॥ अशुभाच्या उशिर पळ नसे विलयाला. ॥ २३ ॥
बहुतांपरि साधूंतें ॥ श्रेष्ठम्हणों, तेंचि लेश परिसा; धूतें ॥
सत्पदरज भजकमळा; ॥ तत्पूता[२]ला सदा भजे मज कमळा[३]. ॥ २४ ॥
सुखद न भजकां पुरते, ॥ स्वार्थपरचि देव; गमति मज कापुर ते. ॥
न धरी जरि लोक टुक, ॥ स्वच्छ हिमहि सुरभि[४] होय परि तो कटुक. ॥ २५
साधु भले साधु भले; ॥ हे सर्वां सर्वकामसुरसा[५] दुभले. ॥
त्यजिति न दीना, वाडे ॥ शांतीचे, संसृतीनदीनावाडे[६]. ॥ २६ ॥
दीना तो भाउ खरा ॥ साधुन धन दे; न सस्य[७]शोभा उखरा[८]. ॥
हो खळहि, तथापि कवी* ॥ तद्धृदयीं शांतिशालिसुकथा[९] पिकवी. ॥ २७ ॥
तीर्थं तों तोय, शिळा ॥ मृन्मय देव, प्रसाद तरि होय शिळां[१०]; ॥
कीं करिति शुभा उशिरें; ॥ सुख द्या नमितां तुह्मी सदय भाउ शिरें. ॥ २८ ॥
शुद्धविवेका काजें ॥ लोकोपकृतें समुदितें काका जें† ॥
हित परिसा; बापाजी! ॥ रुग्णापत्यासि सद्रसा वा पाजी. ॥ २९ ॥
श्रीकुंती आका जी ॥ पांडुवियोगार्तमानसा, काकाजी! ॥
श्रमते बहुविध, वेंचे ॥ जीवन शोकांत; ताप बहु विधवेचे. ॥ ३० ॥
ती पंचसुता; पतिचें ॥ मरण; नवे भोगितें मन सुताप तिचें. ॥
बाळां चुलताचुलती ॥ पोषिति; वाहे प्रदीप्त चिंता चुल ती. ॥ ३१ ॥
वाटे जनदेव[११] शतें ॥ पुत्रांच्या मुग्ध; त्यासि मन दे वश तें ॥
पुत्रस्नेहा; लाहे ॥ कोण न मोहा महामते! हाला हे? ॥ ३२ ॥
सुत बहु नीच क्षुरें[१२]; जे ॥ तें करिल तिनेंहि झांकुनी चक्षु रजें[१३] ।
बहु अस्वछ विरहिता; ॥ आंतहि पाहत असेल न स्थविर[१४] हिता. ॥ ३३ ॥

---

१ वाळ्याची शोभा. २ तेणेंकरून पवित्र झालेल्याला. ३ लक्ष्मी. ४ सुवास. ५ सर्वमनोरथरूपी सुरसाला. ६ संसारनदीचे नावाडी. ७ धान्याची शोभा. ८ उकिरड्याला. ९ शांतीची कथा हेंच भात. १० उशीरानें दिलेला. ११ धृतराष्ट्र. १२ वस्त्रा. १३ रजोगुणेंकरून. १४ वृद्ध. *साधु. †आमच्या मूळप्रतींत या अर्धांतून एक मात्रा कमती आहे.

वैधव्यचि आधीं तें ॥ अंगारस्नान; दे सकळ आधींतें; ॥
शोकाचें गांव; तणें ॥ प्राण; तयातें दवाग्निचें आंवर्तणें[1]! ॥ ३४ ॥
दुःखक्षोभा, ऊन ॥ छद्म तसें, हरुनि, करुनि लोभा ऊन॥
पूर्ण करा. भाऊ न ॥ अजिती, आचार हा वरा भाऊन[2]. ॥ ३५॥
बाळसुता आत, पति- ॥ छत्र न माथां; असह्य हा आतप[3]. ती ॥
जातिव्रतति[4]; फुलांतें ॥ तीच्या साहेल ताप काय मुलांतें? ॥ ३६ ॥
समय निका काजा या ॥ त्वरचि गजाव्हंया[5]सि काका जायां; ॥
कळतां वृत्त मनाशी, ॥ तेंचि करूं, जें वरें सुवृत्तम[6] नाशी." ॥ ३७ ॥
मग सोद्धव बळहरि ते ॥ गेले सदनासि सकळखळबळहरि ते, ॥
प्रिय शुभदैवा, राजे ॥ विधिचे, शुचिचर्यांचि घेति कैवारा जे.॥ ३८ ॥

॥ ॥ इतिश्रीमत्कृष्णविजये अष्टचत्वारिंशोध्याय. ॥४८

स्वामिकृपा साधुनि, घे ॥ आज्ञा अक्रूर; सत्तपा साधु निघे. ॥
वृत्तांत जसा, व्हाया ॥ विदित तसा, पावलाचि गजसाव्हा[7] या. ॥ १ ॥
भेटे धृतराष्ट्रातें, ॥ भीष्मातें नीतिधर्मधृतराष्ट्रातें[8]; ॥
मोहमहानगभिदुरा[9] ॥ हरिचरणा जो भजे तया कविविदुरा; ॥ २ ॥
काय पृथा जी वाहे, ॥ "श्रम भोग" ह्मणे, "तनू वृथा जीवा हे," ॥
तीस; खळजना भाचे ॥ जे रिपु पाहे सखे जलजनाभाचे. ॥ ३ ॥
भेटे द्रोणास, कृपा, ॥ अन्यासहि; हा न इष्ट कोणा सकृपा[*]? ॥
करिती कौरव ते जें ॥ युक्त तया त्यांचियाचि[10] गौरव तेजें. ॥ ४ ॥
याच्या पौर वलक्ष[11]- ॥ ज्ञाना गाती; सुबुद्धि पौरव लक्ष- ॥
लाभ ह्मणति; शिर काया ॥ अर्पिति, हरिजनपदीं सुखीं शिरकाया. ॥ ५ ॥
कुंतीचा भाउ मग ॥ स्थिर राहे, घेत आप्तालाभा, उमंग[12] ॥
वृत्ताचा कुरुपाच्या[13] ॥ व्हाया, भगिनीमनांतिल्या कुरुपाच्या[14]. ॥ ६ ॥
करि बहुमास कळाया ॥ स्थिति रीति; कळे सदुत्तमा सकळा या. ॥

---

१ आमंत्रण. २ मानून. ३ ताप. ४ जाईचीवेल. ५ हस्तिनापुरास. ६ शुद्धाच्या. ७ हस्तिनापुरास. ८ नीतिधर्मेंकरूनधारण केलें राज्य ज्याणें त्यास (भीष्मास). ९ मोहरूपी पर्वतास वज्र असा जो त्यास. १० याचा अन्वय असा;— त्याच्याच तेजें जें गौरव युक्त (तें) ते कौरव तया करिती. ११ शुद्धज्ञानातें. १२ शोध. १३ कुरूपतीच्या. १४ क्रोधाच्या. हें "कुरुपाच्य" (कुरूपतीच्या) याचें विशेषण. * "हा" याचें विशेषण.

का मु[1]निसुत पोर, हित- ॥ द्वेषी, प्रियसाधुअहित, सुतपोरहित. ॥ ६ ॥
कीं नृपसुत पोर, हित- ॥ द्वेष्टे; ज्यां गमति पांडुसुत पोर हित. ॥ ७ इतिवा.
पाहुनि तो भाउ, सरी ॥ देवी न करी जिचो, विशोभा उसे[2]री ॥
जाली; बहुविध वाहे ॥ ताप; रडे, आठवूनि बहु, विधवा हे. ॥ ८ ॥
"आप्तमतिस दादा ही ॥ स्मरते कीं, जीस दुर्गति सदा दाही? ॥
पितरांस भ्रात्यांतें, ॥ ज्यांची पहिली दया अदभ्रा[3] त्यांतें? ॥ ९ ॥
वहिणीभावजयांचा ॥ स्नेह असे? पूर्ण आप्तभाव जयांचा; ॥
स्मरती सन्मति आली? ॥ कुंतीची आजि बरि तुह्मां स्मृति आली! ॥ १०॥
स्मरला मजला भाचा ॥ कृष्णहि कीं? आजि दिवस मज लाभाचा. ॥
जालें मन अभि[4]राम! ॥ स्मरतो कीं मत्सुतांसि या अभिरा[5]मं? ॥ ११ ॥
अग नग पौरव नीच, ॥ भ्रात्या! मी ही मृगीच पौरवनींच. ॥
भय फार; कशा वांचे ॥ यत्नें? असु हरिति दुष्ट वृ[6]कें शावांचे. ॥ १२ ॥
वदतां, मन भी माजें, ॥ करितेजाले सपत्न जन भीमा जें. ॥
हा अज्ञान, ग[7]रातें ॥ चारियलें; विदित सर्व या नगरातें. ॥ १३ ॥
स्वसुतां सुख भावो जी ॥ इच्छा, अनुमोदिती तिला [8]भावोजी; ॥
कुगति असी मामा[9]जी ॥ तळमळती देखतां असीमा माजी. ॥ १४ ॥
मनचि न नृप दे शतशा ॥ विदुरोक्ता; काय करुनि उपदेश तशा? ॥
सत्यवती सासू, या, ॥ असती तरि, वारिती सती, सासूयां[10]. ॥ १५ ॥
भव, भजतां, [11]हरि; [12]माये ॥ त्रिजगीं जीची दया न; ते हरि[13]माय ॥
दीनजना थानातें ॥ लाविल कीं, स्मरुनियां अनाथा नातें? ॥ १६ ॥
मी प्रहरहि आठ वितें ॥ चिंता, चिंतामणिप्रभुस आठवितें; ॥
स्तविल जग श्रु[14]तरीती, ॥ पितृभगिनीचे पुशील अश्रु तरी ती. ॥ १७ ॥
तूं सदुदार; कपाळीं ॥ पदरज लावूनि, दीनदा[15]रकें पाळीं. ॥
घे, घेशिल आं[16]तर जें; ॥ तारीं; न, भवीं बुडो, मळो आत, रजें. ॥ १८ ॥
नाहिं अनाथा, राया ॥ दीनाच्या बांधवा! जना थारा या. ॥

१ कौरव. २ वाळलेलें वांगें. ३ मोठी. ४ प्रसन्न. ५ जवळ आहे राम ज्याच्या, रामासहित (कृष्ण). ६ लांडगे. ७ विषातें. ८ विदुर. ९ व्यास. १० निंदायुक्त. ११ हरणकरी. १२ मावतो. १३ हरिरूपीमाता. १४ ऐकिलेले सभाव. १५ दीन मूल (पांडव). १६ नावेवरून नेण्याचें मोल.

वैधव्यचि आधीं तें ॥ अंगारस्नान; दे सकळ आधींतें; ॥
शोकाचें गांव; तणें ॥ प्राण; तयातें दवाग्निचें आंवतणें[1]! ॥ ३४ ॥
दुःखक्षोभा, ऊन ॥ छद्म तसें, हरुनि, करुनि लोभा ऊन॥
पूर्ण करा. भाऊ न ॥ त्यजिती, आचार हा बरा भाऊन[2]. ॥ ३५॥
बाळसुता आत, पति- ॥ छत्र न माथां; असह्य हा आतप[3]. ती ॥
जातिव्रतति[4]; फुलांतें ॥ तीच्या साहेल ताप काय मुलांतें? ॥ ३६ ॥
समय निका काजा या ॥ सत्वरचि गजाव्हयासि[5] काका जायी; ॥
कळतां वृत्त मनाशी, ॥ तेंचि करूं, जें वरें सुत्[6]त्तम नाशी." ॥ ३७ ॥
मग सोद्धव बळहरि ते ॥ गेले सदनासि सकळखळबळहरि ते, ॥
प्रिय शुभदैवा, राजे ॥ विधिचे, शुचिच्यार्चिं घेति कैवारा जे.॥ ३८ ॥
॥ ॥ इतिश्रीमत्कृष्णविजये अष्टचत्वारिंशोध्याय. ॥४८
स्वामिकृपा साधुनि, घे ॥ आज्ञा अक्रूर; सत्तपा साधु निघे. ॥
वृत्तांत जसा, व्हाया ॥ विदित तसा, पावलाचि गजसाव्हा[7] या. ॥ १ ॥
भेटे धृतराष्ट्रातें, ॥ भीष्मातें नीतिधर्मधृतराष्ट्रातें[8]; ॥
मोहमहानगभिदुरा[9] ॥ हरिचरणा जो भजे तथा कविविदुरा; ॥ २ ॥
काय पृथा जी वाहे, ॥ "श्रम भोग" ह्मणे, "तनू वृथा जीवा हे," ॥
तीस; खळजना भाचे ॥ जे रिपु पाहे सखे जलजनाभाचे. ॥ ३ ॥
भेटे द्रोणास, कृपा, ॥ अन्यासहि; हा न इष्ट कोणा सकृपा*? ॥
करिती कौरव ते जें ॥ युक्त तया त्यांचियाचि[10] गौरव तेजें. ॥ ४ ॥
याच्या पौर वलक्ष[11]- ॥ ज्ञाना गाती; सुबुद्धि पौरव लक्ष- ॥
लाभ ह्मणति; शिर काया ॥ अर्पिति, हरिजनपदीं सुखीं शिरकाया. ॥ ५ ॥
कुंतीचा भाउ मग ॥ स्थिर राहे, घेत आप्तालाभा, उमंगे[12] ॥
वृत्ताचा कुरुपाच्या[13] ॥ व्हाया, भगिनीमनांतिल्या कुरुपाच्या[14]. ॥ ६ ॥
करि बहुमास कळाया ॥ रिछाति रीति; कळे सदुत्तमा सकळा या. ॥

---

१ आमंत्रण. २ मानून. ३ ताप. ४ जाईचीवेल. ५ हस्तिनापुरास. ६ शुद्धाच्या. ७ हस्तिनापुरास. ८ नीतिधर्मैंकरूनधारण केलें राज्य ज्याणें त्यास (भीष्मास). ९ मोहरूपी पर्वतास वज्र असा जो त्यास. १० याचा अन्वय असा;– त्याच्याच तेजें जें गौरव युक्त (तें) ते कौरव तया करिती. ११ शुद्धज्ञानातें. १२ शोध. १३ कुरूपतीच्या. १४ कांख्याच्या. हें "कुरुपाच्य" (कुरूपतीच्या) याचें विशेषण. * "हा" याचें विशेषण.

२
का मुनिसुत पोर, हित- ॥ द्वेषी, प्रियसाधुअहित, सुतपोराहित. ॥ ६ ॥
कीं नृपसुत पोर, हित- ॥ द्वेष्टे; ज्यां गमति पांडुसुत पोर हित. ॥ ७ इतिवा.
पाहुनि तो भाउ, सरी ॥ देवी न करी जिची, विशोभा उसरी ॥
जाली; बहुविध वाहे ॥ ताप; रडे, आठवूनि बहु, विधवा हे. ॥ ८ ॥
"आप्तमतिस दादा ही ॥ स्मरते कीं, जीस दुर्गति सदा दाही? ॥
पितरांस भ्रात्यांतें, ॥ ज्यांची पाहिली दया अदभ्रा[३] त्यांतें? ॥ ९ ॥
वहिणीभावजयांचा ॥ स्नेह असे? पूर्ण आप्तभाव जयांचा; ॥
स्मरती सन्मति आली? ॥ कुंतीची आजि बरि तुह्मां स्मृति आली! ॥ १०॥
स्मरला मजला भाचा ॥ कृष्णहि कीं? आजि दिवस मज लाभाचा. ॥
जालें मन अभिराम[४]! ॥ स्मरतो कीं मत्सुतांसि या अभिरामें[५]? ॥ ११ ॥
अग नग पौरव नीच, ॥ भ्रात्या! मी ही मृगीच पौरवनींच. ॥
भय फार; कशा वांचे ॥ यत्नें? असु हरिति दुष्ट वृकें[६] शावांचे. ॥ १२ ॥
वदतां, मन भी माजें, ॥ करितेजाले सपत्न जन भीमा जें. ॥
हा अज्ञान, गॅरातें ॥ चारियलें; विदित सर्व या नगरातें. ॥ १३ ॥
स्वसुतां सुख भावो जी ॥ इच्छा, अनुमोदिती तिला भावोजी; ॥
कुगति असी मामांजी[८] ॥ तळमळती देखतां असीमा माजी. ॥ १४ ॥
मनचि न नृप दे शतशा ॥ विदुरोक्तां; काय करूनि उपदेश तशा? ॥
सत्यवती सासू, या, ॥ असती तरि, वारिती सती, सासूयां[१०]. ॥ १५ ॥
भव, भजतां, हरि[११]; माये[१२] ॥ त्रिजगीं जीची दया न; ते हरिमाये[१३] ॥
दीनजना थानातें ॥ लाविल कीं, स्मरुनियां अनाथा नातें? ॥ १६ ॥
मी प्रहरहि आठ वितें ॥ चिंता, चिंतामणिरमुस आठवितें; ॥
स्तविल जग श्रुतरीती[१४], ॥ पितृभगिनीचे पुशील अश्रु तरी ती. ॥ १७ ॥
तूं सदुदार; कपाळीं ॥ पदरज लावूनि, दीनदारकें[१५] पाळीं. ॥
घे, घेशिल आँतर[१६] जें; ॥ तारीं; न, भवीं बुडो, मळो आत, रजें. ॥ १८ ॥
नाहिं अनाथा, राया ॥ दीनाच्या बांधवा! जना थारा या. ॥

---

१ कौरव. २ वाळलेलें वांगें. ३ मोठी. ४ प्रसन्न. ५ जवळ आहे राम ज्याच्या, रामासहित (कृष्ण). ६ लांडगे. ७ विषातें. ८ विदुर. ९ व्यास. १० निंदायुक्त. ११ हरणकरी. १२ मावतो. १३ हरिरूपीमाता. १४ ऐकिलेले स्वभाव. १५ दीन मूल (पांडव). १६ नावेवरून नेण्याचें मोल.

दे सकृपा दान, तमीं ॥ न बुडेंसें अभयमात्र; पादा नत मी." ॥ १९ ॥
अक्रूर ह्मणे, " न सती ॥ शोकार्हा तूं; तुला अभद्रें नसती. ॥
निर्भय आका! राहें; ॥ आलें ब्रह्मचि[1] दयालु आकारा हें. ॥ २० ॥
त्या मुनिवित्ता[2] सारें ॥ ठाउक आहे करील चित्तासारें[3]. ॥
पुत्र तुजे वाढविल; ॥ त्रिजगच्छल्येंहि[4] यांकरें[5] काढविल. ॥ २१ ॥
न मळे आकाश मळें, ॥ सद्वत्सलदेवयशहि[6] आका! शमळें. ॥
नससी आका! रानीं; ॥ जाणवती सुत समर्थ आकारांनीं. ॥ २२ ॥
विदुर वदे, " वहिनी! ती ॥ पहिली सोडील काय देवहि नीति? ॥
प्रभु दयमान सहाय ॥ स्वजना; तुमचें ह्मणो न मानस 'हाय!,'" ॥ २३ ॥
अक्रूर ह्मणे, " मजला ॥ दे आज्ञा; येथिचा विचार उमजला. ॥
'येतों' ये तोंडासी;॥ प्रभुनामास्तीकिं* असदहि न तों डांसी." ॥ २४ ॥
मग जाउनि उर्वीशा[9] ॥ भेटे अक्रूरकवि; ह्मणे, " कुर्वीशा[10]! ॥
मेला पांडु; रहातें ॥ यश[11]; जोडिति सुज्ञ तेंचि पांडुर हातें. ॥२५ ॥
भाग्यमदें उतण्यांत ॥ स्थिति न बरी, वर्त सम सुतांपुतण्यांत. ॥
न कुमतिवशो[12] गा! ऊत ॥ श्री जीवन चपळ; साधु यश गाऊत. ॥ २६ ॥
कवि न वदे, हासाचें ॥ पद होतें वचन ह्मणुनि, देहा साचें; ॥
भावुनि देव, पुजा तें, ॥ आप्त न; विरह क्षणांत दे, वपु जातें. ॥ २७ ॥
कांता, बांधव, सुत, या ॥ तनुचे संबंधि जन; धनांधवसु[13] तया- ॥
पासुनि, दावुनि माया, ॥ हरिति; कसे आप्त, ज्यांचिया मनिं माया[14]? ॥ २८ ॥
न गणुनि पातक, पाळा[15]; ॥ येतो परि उग्र नरकपात कपाळा; ॥
दुर्गतिहेतु जन मनें ॥ धूर्त, करिति वरिवरीच हे तुज नमनें. ॥ २९ ॥
भी मन हे भार[16] तमीं ॥ बुडविति; वदतों हितेच्छु हे भारत! मी. ॥
टाकुनि लोभ, व्यास- ॥ प्रभवा[17]! विश्रांत पात्र हो भव्यासि[18]. ॥ ३० ॥

---

१ ब्रह्म आकारा आलें ( =ब्रह्मानें अवतार घेतला ). २ भगवंतास. ३ मनाजोगें. ४ त्रिजगाचीं दुःखें. ५ यांकरवीं ६ प्रेमळदेवाचें यश. ७ पापानें. ८ दंशकरी. ९ राजाला. ( धृतराष्ट्राला ). १० कुरुश्रेष्ठा. ११ यश मात्र राहतें. १२ अगा! तूं 'कुमतिवश' (=दुष्ट मतीच्या अधीन) होऊंनको. १३ धन- अंध-वसु=धन, अन्न, आणि रत्नें. १४ कपट. १५ पाळितां. १६ दुर्योधनादि. १७ हे धृतराष्ट्रा! १८ कल्याणास. * प्रभुनामरूपी आस्तीक ऋषि. असदहि= असत्. अहि.

बुडविति इष्टा पूर्तें ॥ हे काम, क्रोध, लोभ, इष्टांपूर्तें*. ॥
प्रज्ञाचक्षु[1]! द्रव दे ॥ तव त्वदया, अतितें[2] जरि सुत क्षुद्र वदे. ॥ ३१ ॥
हा तनय न, अहि; तातें ॥ त्वां वारावा. करील बहु अहितातें. ॥
नयपथविमुखां[3] बानें[4] ॥ शिक्षावें कुरुगृहाचिया खांबानें. ॥ ३२ ॥
बहु ह्मणतिल 'फट[5];' काळ ॥ ग्रासिल तुज; अयश केवळचि फटकाळ. ॥
वृत्त[6] जना सुखवु, जळ ॥ श्रांता जैसें; कुळीं तरिच मुख उजळ. ॥ ३३ ॥
उपजे जेव्हां प्राणी, ॥ वद, तेव्हां संगतीस कवणा आणी? ॥
जेव्हां भूपा! मरतो, ॥ कोणातें संगतीस घे पामर तो? ॥ ३४ ॥
सुकृतासुकृता[7] आंगें ॥ भोगी, कीं त्या सहाय असतो सांगें. ॥
सहवासहि तो मूर्त[8] ॥ श्रेयःप्रत्यूह[9] कृतसुहृन्मिष[10] धूर्त. ॥ ३५ ॥
मग कुजकी जसि दोरी, ॥ आयुष्याची तुटे; स्वपापशिदोरी[11] ॥
घे लुटिला तो नर; कीं ॥ स्वार्थपरिभ्रष्ट[12] रडत जातो नरकीं. ॥ ३६ ॥
ह्मणुनि स्वप्नासम या ॥ लोकास पहा; स्मर श्रुतीच्या समया[13]. ॥
हो शांतमना; शील ॥ स्वच्छ धरीं, गा हरीस; तम नाशील. ॥ ३७॥
वाटे चतुरा ज्या जी ॥ रीति बरि, भजे तिलाचि बहु राजाजी! ॥
परि करि जो निजहित, जी! ॥ धरि साधुपथ, क्षुधा तृषा निजहि तजी[14]."॥३८॥
भूप वदे, "वसुधेतें[15] ॥ येउनि, रुग्णासि[16] पाजि देव सुधेतें, ॥
साधो! तूंहि तसाच ॥ श्रेष्ठ कथिसि बोध हा मला हित, साच. ॥ ३९ ॥
श्रुतिस[17] सुविद्या वीची[18] ॥ प्रमुदब्धीचीच[19] हे नवी द्यावीचि; ॥
पसरी वपु, ढेंकरही ॥ दे, न मिटकियाचि दे, करि पुढें करही. ॥ ४० ॥
उक्ति तुझी परम मता; ॥ सोडीना दुष्ट चित्त हें पर ममता. ॥
न तगे त्वद्दयीं विषमीं; ॥ जाणतजाणतहि सेवितों बा विष मी! ॥ ४१ ॥
ऐसें मम मन, ताकीं ॥ आवडि फार; प्रिया जया ममता कीं. ॥
भवदुक्त्यमृतांत रुची ॥ न चिर धरि अभाग्य, साउलि न सुरतरुची. ॥ ४२ ॥

---

१ हे अंधा! २ दुष्ट. ३ न्यायमार्ग ठाऊक नाहीं त्यास. ४ बापानें. ५ छीः ६ वर्तणूक. ७ पुण्याला व पापाला. ८ मूर्तिमंत. ९ कल्याणास विघ्न. १० सुहृदाचें ज्याणें मिष केलें तो. ११ आपली पापसामग्री. १२ स्वार्थाविषयीं विन्मुख. १३ नियमा. १४ त्यजी. १५ पृथ्वीवर. १६ रोग्यास. १७ कानास. १८ लहरी. १९ हर्षसमुद्राचीच. * परोपकारी कृत्यानें.

वागमृत[१]सुधारा हे ॥ भग्नमनोभाजनांत[२] न बुधा! राहे; ॥
न धरि त्वद्दयतितउ[३] पळ ॥ त्वदुदितजळ[४], शुष्क सिंधुनिपतित[५] उपळ[६].॥ ४३ ॥
माया भ्रमहेतु जगा ॥ भगवंताची, असे विदित हें तुज गा. ॥
कोप करुंनको; टिकवे ॥ न इच्या मथनीं, प्रयत्न जरि कोटि कवे! ॥ ४४ ॥
कोणाहि नको टिपरी[७] ॥ हे नाकींची, श्रमेहि जन कोटि परी. ॥
हरि करिल दया, तर ती ॥ हरिलचि; मायाब्धि सेतुनें या तरती. ॥ ४५ ॥
तो प्रभु यदुराज गति- ॥ प्रद अवतरला; करील विभरा[८] जगती. ॥
त्या करितों मी नमन; ॥ श्रीशपदामृतनिधींत हो मीन मन." ॥ ४७ ॥
अक्रूरास कळे, हा ॥ नृप वदतां आणि पाहतां, सकळेहा[९]. ॥
मग सुहृदाज्ञा त्यानें ॥ घेउनि, नमिलें विमुक्तिदां[१०], ज्ञात्यानें. ॥ ४८ ॥
करुणाघनदेवाचे ॥ पाय नमी, वृत्त सर्वहि वदे वाचे. ॥
पुरले काम मनाचे;॥ अक्रूरमयूर[११], विसरुनि श्रम, नाचे. ॥ ४९ ॥

॥ ॥ इतिश्रीमत्कृष्णविजये एकोनपंचाशतमोऽध्यायः ॥ ४९ ॥ ॥

माजा प्रेमा सुदामा हरिसख दुवळा; शब्दसंदोह[१२] जो, हे ॥
साधूंपासीं श्रुतीनें[१३] पदर पसरुनी, जोडिले स्वल्प पोहे; ॥
या दीनोपायनातें[१४] बुधजनभगवान्[१५] प्रीतिनें, फार गोडी ॥
आणूनि, श्रोतृवक्त्रीं[१६] भरिल, बहु दया मानुनी तेहि थोडी. ॥ १ ॥
नसे तादृक् चेतोहर[१७] गुण जरी, साधु तरि या ॥
वरू, चूडारत्नीकृतविधुहि[१८] जैसा धुतरिया; ॥
भले सद्विद्यांचे नद करिति ते लोभ, विहिरी[१९] ॥
तयांचा मी; कर्त्या जडहि घडिला शोभवि हिरा. ॥ २ ॥

---

१ वाणीरूपी अमृतधारा. २ मनोरूपी फुटक्या भांड्यांत. ३ हृदय हीं चाळण. ४ तुझा उपदेश हें उदक. ५ समुद्रांत पडलेला. ६ दगड. ७ चिमटा. ( नाकास टिपरी लावणें ही एक शिक्षा आहे.) जरी ही शिक्षा आवडत नाहीं तरी जनकोटि अपराध करून श्रमे = शिक्षा भोगते. ८ भार रहित. ९ सकळ -ईहा = सकळ इच्छा. १० मुक्ति देणाऱ्या ( कृष्णास ). ११ अक्रूर रूपी मोर. व तिकडे अक्रूर आणि इकडे मोरोपंत. १२ शब्दसमूह. १३ कानानें. १४ दीन- उपायनातें = गरिबाच्या नजराण्याला. १५ बुधजनरूपी. कृष्ण १६ कर्णरूपी मुखांत. १७ मनोहर. १८ चूडारत्न (शिरोमणी ) केलें आहे विधूस ( चंद्रास) ज्याणें तो = शिव. १९ झरा.

अभय दिधलें आहे, वाहे श्रुतिप्रतिभा झरा; ॥
विधु[1]मणिचिया सारा तारापे[2] कारण पाझरा; ॥
जडहि कविता जोडी, गोडी गुणीं हरिच्या वरी; ॥
सहज तुमचा दीना हीना प्रसाद समुद्धरी. ॥ ३ ॥
प्रसाद तुमचा कलानिधि[3]हुनी गुणें आगळा[4]; ॥
हरी नत[5]मनोमळा, निजसुरद्रुमाचा मळा. ॥
करी रत सदा बळानुज[6]पदीं मना चंचळा; ॥
सुखेंचि पुरवी लळा[7]; सुचिर कीर्ति दे उज्वळा. ॥ ४ ॥
श्रीमद्भागवतामृतोदधि[9] तुह्मी, अर्थज्ञ ते मेघसे, ॥
आह्मी चातक पाहतों मुख, तृषासंशुष्क[10] ज्यांचे घसे, ॥
पीतां द्वि त्रि कण, क्षणीं सुख गमे तृप्त्युत्थ[11] गाढें[12]; कर ॥
ब्राह्मीचाहि[13] लिहों शकेचि न, असो तें, ग्रंथ हा ढेंकर. ॥ ५ ॥
रामकृष्णचरणीं समर्पित ॥ ग्रंथ; हो रसिकचित्त तर्पित[14]; ॥
न प्रमादभवें[15] दोष राहवू; ॥ सत्प्रमोदनयनोद[16] वाहवू. ॥ ६ ॥

॥ ॥ इतिश्रीमत्कृष्णविजयेश्रीरामनंदनमयूरेश्वरकृतिकृतौसज्जनप्रार्थना ॥ ॥

समाप्तश्चायंकृष्णविजयः ॥ श्रीरामकृष्णार्पणमस्तु.

---

१ चंद्रकांताच्या. २ ताराकांत = चंद्र. ३ चंद्राहून. ४ अधिक. ५ शरणागताच्या मनांतील मळास. ६ कृष्णपदीं. ७ हौस. ८ सर्वदा. ९ श्रीमत्-भागवत-अमृत-उदधि = श्रीमद्भागवतरूपी अमृताचा सागर. १० तहानेनें अत्यंत वाळलेले. ११ तृप्ति-उत्थ = तृप्तीपासून जहालें. १२. मोठें. १३ सरस्वतीचा १४ तृप्त. १५ मोहापासून होणारा. १६ सत्-प्रमोद-नयन-उद = सदानंदाचे अश्रु.

# शुद्धिपत्र.

## आर्यांमधील चुकांचें.

| पृष्ठ. | आर्या. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. | आर्या. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४ पू. | देवू | देऊ | ,, | ४ पू | लोलें[28] | लोलें[28] ; |
| ३ | १८ उ. | वसु देवा ची | वसुदेवाची | ,, | ,, | लसमानें[2] | लसमानें[2]; |
| ,, | १९ पू. | निर्जरमें[5]हिला | निर्जरमें[5]हिला; | ,, | ४ उ | भास्कर | भास्कर- |
| ,, | १९ उ. | मा[6] | मा[6]; | १० | १६ पू | प्रोक्तोनंदमंदिरीं[20] | प्रोक्ता नंदमं-दिरीं[20] |
| ,, | २१ पू. | आज्ञापी | आज्ञापी; | ,, | १७ पू | जा | ज्या |
| ,, | २२ पू. | शरदें[12]हेनीं | शरदें[18]हेनीं | ,, | १८ पू | धाकटा | धाकटा हा |
| ,, | ,, | पराहुतिहोतीं[13] | पराहुतिहोता[13] | ११ | २१ पू | आवर्ती[11] | आवर्ती[11]. |
| ,, | २३ पू. | माथुरें[14] | माथुरें[12] | ,, | २२ उ | रणीं | रणीं. |
| ,, | ,, | जनपदीं[15] | जनपदीं[13] | ,, | २४ पू | लोहें[25] | लोहें[25]; |
| ,, | २३ उ. | प्रकृति-[16] | प्रकृति-[14] | १३ | १४ उ | तुजा | तुज्या |
| ,, | ,, | शूरसेन,[17] | शूरसेन,[15] | ,, | १८ उ | होवुनी | होउनी |
| ,, | ,, | मर्तविप्र,[18] | मर्तविप्र,[16] | ,, | २१ उ | सुनय | सुनय; |
| ,, | ,, | कृती.[19] | कृती.[17] | ,, | २२ उ | करितां | करिती |
| ,, | २६ पू. | चुलता | चुलता; | १४ | २४ उ | त्याचा | त्यांचा |
| ४ | २९ उ. | अर्शनीं[6] | अर्शनी[6] | ,, | २६ पू | सवगुहाशयन[13] | सर्वगुहाशयन[13] |
| ,, | ३८ पू. | विमळें | विमळें[3] | ,, | २९ पू | सद्वेषें[20] | सदसद्वेष[20] |
| ५ | ४२ उ. | विपदा कुल जें | विपदाकुल जें. | १५ | ६ पू | वैकुंठापरिस | वैकुंठापरीस |
| ,, | ४४ पू. | जा | ज्या | १६ | १ पू | दुःख. शोका | दुःख-शोका |
| ,, | ४७ उ. | वाक्पतिचीं[35] | वाक्पतिच्या[35] | १७ | १६ पू | कृष्णलालसा[30] | कृष्णलालसा[30], |
| ६ | ४९ पू. | हरिणीचा, | हरिणीच्या, | ,, | १६ उ | सुकेर[31] | सुकेर[31], |
| ,, | ,, | जापरि | ज्यापरि | १९ | १ उ | तदा | तदा; |
| ७ | ७ उ. | सुखनिधिलोंभें[3]. | सुखनिधिलोंभें[3]. | ,, | ४ पू | लेंकाला. | लेंकाला |
| ,, | १२ पू. | यातें. | यातें; | २३ | २ पू | सुमहानंदें[23] | सुमहानंदें[23]; |
| ,, | १२ उ. | कंसभयातें | कंसभयातें- | २४ | ३३ पू | स्वांतीं[17] | स्वांतीं[17] |
| ,, | १३ उ. | जातें. | ज्यातें. | ,, | ३८ पू | हिमीं[26] | हिमीं[26]; |
| ८ | १९ पू. | उत्सवदाता[11]. | उत्सवदाता[11]; | २८ | ११ पू | भवनीं[3] | भवनीं[3] |
| ९ | २९ उ. | विघ्नाख्यकंप[14] | विघ्नाख्ये[14] कंप | ,, | ,, | विधिच्या[5] | विधिच्यां[4] |
| ,, | २ पू. | जा | ज्या | ,, | ११ उ | प्लवगांतें[6] | प्लवगांतें[5] |

| पृष्ठ. | आर्या. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| २८ | ” | भवपयोनिधिप्लव | भवपयोनिधिप्लव |
| २९ | २८ पु. | गुंते; | गुंते |
| ” | ” | माता, | माता; |
| ” | २ उ. | भ्रमती | भ्रमती; |
| ” | ” | दभ्रमती | दभ्रमती. |
| ३१ | २४ पू | वज्रकृंत | वज्रकृंत |
| ३२ | ३२ पू | तानें, | ताने, |
| ” | ” | नें. | ने. |
| ३५ | २९ उ | बळ | बळ. |
| ३८ | २२ उ | स्नेहवृद्धि | स्नेहवृद्धि, |
| ” | १ उ | सबळ | सबळ- |
| ३९ | २१ पू | ॥ या | यः ॥ |
| ४० | २ उ | श्रृंग | शृंग |
| ” | २७ पू | करब्ज | कराब्ज- |
| ४३ | ९ उ | खांत | स्वांत |
| ” | १५ पू | गात | गति |
| ” | ” | कुजितें | कूजितें |
| ४५ | २९ पू | लातालें; | लाताळें; |
| ” | ३० पू | दुर्मति . | दुर्मति- |
| ४६ | ४१ उ | जाणूनि | जाणुनि |
| ” | ५ उ | पीडा | पीडा- |
| ४७ | १३ पू | निरदनिभ, | नीरदनिभ, |
| ” | १५ पू | नांहिं | नाहिं |
| ” | १७ उ | मुत्हृत्कंदंबं | सुत्हृत्कदंब |
| ” | १० पू | नीरजनाभयदा | नीरजनाभ यदा |
| ४९ | ३५ पू | सहचरण; | संचरण; |
| ५० | ४३ पू | विकळसा | विकळमानसा |
| ५१ | ५३ उ | तुह्मापासुनि; | तुह्मांपासूनि; |
| ” | २ पू | डासी | डांसी |
| ” | ४ पू | अर्ध | अर्घ |
| ५२ | १८ पू | वसनिला | वसतिला |
| ५३ | २१ पू | सहित | सहित; |
| ” | ” | हित; | हित, |
| ” | २१ उ. | रक्षायास | रक्षायास, |
| ५३ | ” | पी, | पी; |
| ” | २२ उ. | सभृदंबुरूहकोशाली | सत्भृदंबुरूहकोशाली |
| ५४ | १९ पू. | खळ | खळ, |
| ५६ | १४ पू. | देव | देव- |
| ” | १५ पू | कानीं. | कानीं, |
| ” | १५ उ. | वल्लव | वल्लव |
| ६४ | ३० उ. | किजे, जीवें | किजे, जीव |
| ” | ३३ पू. | दिसती | दिसती. |
| ६६ | ६ पू. | अंन्नांवरहेमानें | अंन्नांवरहेमानें |
| ६८ | १२ उ. | तरांनां? | तरांनां? ” |
| ७६ | ३१ पू. | घृतपयोदधिमधुनीं. | घृतपयोदधिमधुनीं |
| ७९ | ७ उ. | मणिकीं; | मणिकीं, |
| ” | ९ पू. | स्वगुरूभयहि | स्वगुरूभयहि |
| ८० | १० उ. | सदैवही | सदैवहि |
| ” | १३ पू. | लावुनी | लावुनि |
| ८१ | २० उ. | महाभागा | महाभागां |
| ” | २१ पू. | आंहे | आहे |
| ” | २१ | निंवसा | निवसा |
| ” | ” | असाध्वस? | आसाध्वसं ? |
| ८२ | ३१ उ. | वांटे | वाटे- |
| ” | ३३ पू. | नीर; | नीरें |
| ” | ” | गळे | गळे |
| ८५ | ६६ उ. | श्रीचा | श्रीच्या |
| ८६ | ८ उ. | नभवसुत्हृद | न भवसुत्हृद |
| ८७ | १६ पू. | जा | ज्या |
| ८८ | २८ पू. | वनीं | वनिं |
| ८९ | ३१ पू. | जांचें; | ज्यांचें; |
| ” | ३८ पू | जांत | ज्यांत |
| ९१ | ६८ पू | पाउनि | पावुनि |
| ” | ४९ पू. | त्वा | त्या |
| ” | ५३ पू. | स्कंधींहि | स्कंधींहि |
| ” | ५६ उ. | ॥ न | न |

| पृष्ठ. | आर्या. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ९२ | ५८ पू. | आगामी ! | आगामी! |
| ९६ | १८ पू. | जाचें | ज्याचें |
| ९७ | २१ पू. | तिजें[६] | तिजें[६] ; |
| ९८ | २ उ. | जवळी; | जवळी;" |
| ९९ | १४ पू. | रासी; | रासीं ; |
| " | १५ पू. | जा | ज्या |
| १०० | २१ पू. | तिला | तिला; |
| १०१ | ४ पू. | खसुता | स्वसुता |
| " | २ उ. | लोक | लोक- |
| " | " | बैसुनि | बैसुनि, |
| १०२ | ११ उ. | मद मैळ | मदमैळ |
| " | १७ पू. | रानीं | रानीं; |
| १०३ | २१ पू. | हे | हे; |
| " | २२ उ. | रक्षी | रक्षीं |
| " | २३ उ. | देती[२३] | देती;[२३] |
| १०४ | २ पू. | प्रभु | प्रभु- |
| " | ६ पू. | रक्षि जे | रक्षिजे |
| १०५ | ८ पू. | मूर्तशृंगारेंहा | मूर्तशृंगारें हा |
| १०९ | १७ पू. | परिपाकें[२६] | परिपाकें,[२६] |
| " | १७ उ. | रक्तार्द्र पळेंस | रक्तार्द्रे, पळस |
| " | २१ उ. | साधु | साधु, |
| ११० | २७ उ. | मारिता | मारितां |
| १११ | ३५ उ. | गोपाळ | गोपाळ. |
| " | ३८ उ. | दरी | दरी- |
| ११२ | ४६ पू. | गडियांचें | गडियांचें |
| " | " | भवांब्धिसांगडि-यांचें | भवांब्धिसांगडियांचें |
| ११३ | ४ पू. | -वरूनी, | वरूनी, |
| ११४ | १७ पू. | जांत | ज्यांत |
| ११५ | २४ उ. | हेरंबादिचूडानिहितें? | हेरंबादिचूडानि-हितें. |
| ११६ | ३१ पू. | लीला | लीला- |
| " | ३५ पू. | नवचनें | न वचनें |
| " | ३६ उ. | दांतीं | दांतीं. |

| पृष्ठ. | आर्या. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ११८ | ४ उ. | यदुकुळेंगदनृप-जागा | यदुकुळगदनृपजागा |
| १२० | २१ पू. | थांची | यांची |
| १२२ | ३७ उ. | ईणें | इणें |
| १२५ | २ उ. | ड्याचें; | ड्यांचें; |
| १२६ | ११ पू. | वळिती ! | वळिती |
| १२९ | २५ पू. | रीग | रीघ |
| १३१ | ६ पू. | हरि मन | हरिमन |
| १३३ | २७ पू. | कंटकीं | कंटकीं |
| " | " | निषेधें | निषेधें |
| " | २७ उ. | धरांपाळक | धरापाळक |
| " | २७ उ. | हो[६] ; | हो[७] ; |
| " | " | तुंल्यासर्वे; | तुल्यार्सवें; |
| १३६ | २६ पू. | खडगवरा | खड्गवरा |
| १३७ | ४३ उ. | मामचिी; | मामींची; |
| " | ४३ पू. | योजुति | योजुनि |
| १३८ | ४७ उ. | तंभ | तंम |
| " | २ उ. | हा | " हा |
| " | ३ पू. | भी | मी |
| १४० | १९ उ. | पद भजना | पदभजना |
| " | २३ उ. | लाजे? | लाजे. |
| १४१ | ३१ पू. | एसी | ऐशी |
| " | ३३ उ. | कासि? | कशि? |
| " | ३२ उ. | शोकबाष्पेंरुद्ध-सिरोधी. | शोकबाष्परुद्ध-शिरोधी. |
| " | ३४ पू. | अभुदंभ | असुदंभ |
| १४२ | ३६ उ. | येतां | येतां, |
| " | " | हरुनि | हरुनि, |
| " | ४१ पू. | ते | तें |
| " | ४[illegible] उ. | घे; | घे, |
| " | ४६ उ. | ॥ सती! | सती! ॥ |
| १४३ | ४९ पू. | मागेन | मागेन " |
| " | ४९ उ. | असाया." | असाया. |
| " | ५३ | मतिस | मतिसे |

| पृष्ठ. | आर्या. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. | आर्या. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १४३ | ५५पू. | यां तें | यांतें | १४४ | ६४ . | वंदनि | वंदूनि |
| १४४ | ६० उ | भक्तक्रल्पतरु | भक्तकल्पतरु | ,, | ६६ उ. | सेवामाला. ,, | सेवायाला. ” |
| ,, | ,, | निधे | निधे | १४७ | ११ पू | मदागनाशा | मदागमनाशा |
| ,, | ६२ पू. | जा | ज्या | १६७ | ३३ उ. | अस्वछ | अस्वस्थ |
| १४४ | ६३ उ. | भांव | भांव | | | | |

## पाठांतर.

### पृष्ठ १४७, आर्या १५.

रवि बहुधा मावळला ।। लाजे, कीं साधु नंदधामा वळला; ।।
आपण तापद, वारि- ।। प्रदसा तो लोकशांत तापदवारि. ।।

### पृष्ठ १५६ आर्या ४४.

गेला ओंकित वमना ।। भाझ्यां, वार्ताचि ते असो, कितवमना.।।
याची काय रुचि? रहा ।। उगला आतां; गमे न काय रुचिर हा. ।।

## पाठपूर्णता.

### पृष्ठ १४९, आर्या २७.

ऐसीं पुत्रचरित्रें ।। वर्णी, विकिलें जयासि चित्त गिरित्रें,
तों ये फार गहिवर; ।। स्रवति जळें लोचनें अपार महिवर.

## टिपांतील चुकांचें.

| पृष्ठ. | आर्या. | अशुद्ध | शुद्ध. | पृष्ठ | आर्या. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | नमस्कार | नमस्कार, | ७८ | १५ | वेदस्तुत | वेदस्तुत |
| ४ | ४ | सुदेवरूपी | वसुदेवरूपी | ८१ | २७ | आनंदित | अनिंदित |
| " | ३८ | चंद्रला | चंद्राला | ८९ | २६ | गज | जग |
| ५ | ३४ | सारिख | सारिखा | " | २८ | अमताचे | अमृताचे |
| ६ | ९ | प्रकारचा | प्रकारचें | ९१ | १ | याच | याचें |
| ७ | २८ | त्याचा | तिच्या | " | ५ | स्वीस, दुष्ट | स्वीस. |
| ८ | ३१ | सर्ष | सर्प | " | * | न्यावे, | न्यावें, |
| ९ | १४ | कंप | वात | ९४ | २९ | विनादे | विनोद |
| " | २४ | चक्र | कमळ | " | ३३ | कौशल्यसाग-राची | कौशल्यसाग-राची |
| १० | १४ | वढील | वडील | | | | |
| " | २० | सांगितलेल्याप-रीं. | घरीं. | १०१ | २९ | हैं | हें |
| | | | | " | ३८ | यात्रा | याचा |
| १७ | १२ | मधुर | मधुर | १०६ | २५ | मष्टिका | मुष्टिक |
| " | २९ | विकाळ | विक्राळ | १०९ | २० | (भिजलेला) | (तांबडा) |
| ११ | २७ | आपली इच्छा | निजजनांची इ-च्छा | १०९ | २० | असा | , जसा |
| | | | | " | " | वृक्ष | फुलेला वृक्ष |
| २३ | २८ | वडिलांचीं | वडिलाचीं | १११ | २७ | ठकविणारातें | ठकविणारा |
| २८ | ६ | प्लवग | प्लव | ११३ | १५ | अश | अशा |
| ३३ | २ | आपल्या सुरानें | आपल्यासुरांनीं, किंवा निद्रिस्त. | ११४ | ५ | यादव. १३ | यादव. ६ |
| | | | | " | ४७ | भुकेची उत्पत्ति | भुकेपासून जहालेला. |
| ४० | २३ | मुख्य- | मुख- | | | | |
| ५० | ११ | करणारास. | करणाऱ्या. | ११६ | ८ | सरसरित् | सुरसरित् |
| ५२ | ३ | यज्ञआणिसुख देणाऱ्या द-याळूकृष्णास | देवांस वरदेणा-ऱ्यास | १२० | २५ | " स्वप्न " | " सूचक " |
| | | | | १२३ | १२ | स्त्रियांचें | स्त्रियांचे |
| | | | | " | ३४ | प्रभ. | प्रभु. |
| ५५ | ५ | ( =मनुष्य ) | ( = देव ) | १२४ | ५ | रथखालून | रथखालून |
| | | | | १२६ | १ | नंदाचें प्राण | नंदाचे गोरख |
| " | ३१ | जन्मराहत | जन्मरहित | " | ३८ | मागन | मागुन |
| ५६ | २७ | चंद्रवतु मूखांनीं | चंद्रवत् मुखांनीं | १२[illegible] | १ | प्रेदम | प्रमद |
| ५७ | ५१ | मानवांनीं | चतुरांनीं | " | २७ | धनु | धन्व |
| ५९ | २१ | तोडानें | तोंडानें. | १२९ | १ | हर्त्ता. | निवारण. |
| ६८ | १४ | धारांनीं | धारा | " | ६ | हस्तांत आहे व-ज्र ज्याच्या. | हस्त हेंच वज्र आहे ज्यास तो. |
| ६९ | ४० | पडणें. ३५पर्वतास | पडणें. | | | | |

| पृष्ठ. | आर्या. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. | आर्या. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १३४ | २ | कृष्णीं. | पर्वतीं. | १४२ | ३६ | बुडेलल्या | बुडालेल्या |
| १३८ | ७ | हातास | हातांस | १४३ | ४ | याचनेवर. | याचनेला. |
| १३९ | ४ | आलेला | घेतलेले | " | १३ | वधूसह | बंधूसह |
| १४२ | ३ | गगमुनीच्या | गर्गमुनीच्या | १५२ | * | " वुधा " | " सुधा " |